धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक २०/०२/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक २०/०२/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती,** स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
४	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
५	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
६	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
७	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
८	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
९	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
१०	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
११	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१२	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या
१३	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. अजिज शेख	आयुक्त
२	श्री. गणेश गिरी	उपायुक्त
३	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
४	श्री. विनायक बाजीराव कोते	सहा. आयुक्त
५	श्री मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
६	डॉ. श्री महेश मोरे	आरोग्याधिकारी
७	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी

८	श्री. युवराज वाघ	अधिक्षक परवाना विभाग
९	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१०	श्री. सी.एम. उगले	ओव्हरसिअर पा.पु. विभाग
११	श्री. गितेश सोनार	विद्युत विभाग
१२	श्री.विशाल निबाळकर	अभिलेखापाल
१३	श्री. किशोर सुडके	बाजार विभाग

मा. आयुक्त सो. स्थायी समिती सभापती पदी श्री. सुनिल तुळशिराम बैसाणे यांची निवड झाल्याबद्दल तसेच स्थायी समिती सदस्य पदी ज्या सदस्यांची निवड झाली त्याबद्दल प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करतो. अधिनियमातील तरतुदीनुसार सभापती निवडी नंतरची पहिला सभा आयुक्तांनी बोलाविणेची तरतूद आहे. त्यानुसार आजची पहिली सभा बोलाविण्यांत आली आहे.

मा. सभापती सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

प्रशासनाच्या वतीने मा.आयुक्त साहेब यांनी नुतन सभापती श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

विषय क्रमांक :- ०२ स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार व वेळ निश्चित करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे सर्व प्रथम नुतन सभापती श्री. सुनिल बैसाणे यांचे सभापती पदी निवड झाल्याबद्दल स्थायी समितीच्या सर्व सदस्यांच्या वतीने अभिनंदन करतो व त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देतो. सभापती च्या कार्यकाळात शहर विकासाचे प्रकल्प राबविले जावेत त्यासाठी आम्ही सदैव त्यांच्या बरोबर राहू. तसेच स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार गुरुवार ठेवण्यांत यावा अशी सुचना करतो. इतरही सदस्यांचे मत लक्षांत घेण्यांत यावे.

म. कमलेश देवरे सर्व प्रथम आमचे प्रमस्नेही श्री. सुनिल भाऊ बैसाणे यांची स्थायी समिती सभापती पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल विरोधी पक्षाच्या वतीने व सर्व सभाग,हातील सदस्यांच्या वतीने अभिनंदन करतो . त्याना धुळे शहरातील विकासाला संधी मिळाली आहे. विकासाच्या दृष्टीने धुळे शहरात जे मोठे प्रकल्प हाती घेण्यांत येतील त्यास आमचा पाठींबा असेल. आजची बैठक वार व वेळ ठरविण्यांसाठीची आहे परंतु आमच्या देवपूर परिसरात सद्यस्थिती सुरु असलेल्या भूमिगत पाईप लाईन मुळे अनेक रस्ते खराब झालेले आहे. त्यासंदर्भात मी पुढील स्थायी समितीच्या बैठकीत मत मांडेल. आजच्या बैठकीत स्थायी समितीची साप्ताहिक सभेचा वार गुरुवार हा ठेवण्यांत यावा असे आमचे मत आहे.

म. सभापती स्थायी समिती ही आर्थिक दृष्टीने महत्वपूर्ण समिती आहे.त्यासाठी सर्वांचे मत लक्षांत घेवून निर्णय घेण्यांत येतील. कोणत्याही प्रकारे भेदभाव होणार नाही.धुळे शहर सुंदर व स्वच्छ यासाठी मा. आयुक्त साहेब यांच्या इतर मनपातील कामाचा अनुभव कामी येणार आहे. तसेच उपायुक्त यांचा कामाचा अनुभव उपयोगी पडेल याची ग्वाही देतो.

म. युवराज पाटील सन्मा. सभापती यांचे स्थायी समितीच्या सदस्यांच्या वतीने अभिनंदन करतो.

म. सभापती	मा. श्री. युवराज अण्णा पाटील यांचे स्थायी समितीचे कामकाज चालवित असतांना अनमोल सहकार्य व अनुभव कामी येईल.
म. फातमा अन्सारी	नुतन सभापती यांचे अभिनंदन करते.आमच्या वार्डात दोन भागात पाणी देण्यांत यावे. आमच्या भागात पाणीपुरवठयांचे नियोजनाचा अभाव आहे. त्यासाठी आपण प्रयत्न करावे.
म.सभापती	आपल्या तक्रारी संदर्भात पाणीपुरवठा विभागातील अधिका-यांशी चर्चा करुन नियोजन करण्यांत येईल.
म. नगरसचिव	सन्मा. सदस्यांच्या सुचना लक्षांत घेवून मा. सभापती यांच्या आदेशानुसार स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार गुरुवार निश्चित करण्यांत येत आहे. तसेच मा. सभापती यांच्या सुचनेनुसार आवश्यकता भारसल्यास अन्य वेळी सभा भरविण्यांत येईल. तसेच सभेची वेळ सकाळी ११-०० वाजेची ठेवण्यांत येईल.
म. भारती माळी	सभेची वेळी ११-००वाजे ऐवजी १२-०० वाजेची ठेवण्यांत यावी कारण आम्हा महिला सदस्यांना घरातील कामे असतात.
म. सभापती	सुचना योग्य आहे.परंतु परिवाराचा विचार करतांना आपण १५ ते २० हजार नागरीकांचे प्रतिनिधीत्व करीत असतात. त्यामुळे थोडा वेळ आपण ॲजेस्ट करुन शकतो. तसेच प्रशासकीय कामकाजासाठी सकाळी ११-०० वाजेची वेळ योग्य आहे. तसेच आवश्यकतेनुसार आपण २४ तासाची मिटींग घेऊ शकतो.

सर्व प्रथम सर्व स्थायी समिती सदस्याचे तसेच प्रशासनाचे प्रमुख मा. आयुक्त, उपायुक्त यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच पत्रकार बंधु यांचे आभार मानतो. स्थायी समितीचे सभापती पद पक्षामुळे मिळाले त्या पक्षांचे आभार मानतो. धुळे शहरात लोक प्रतिनिधी म्हणून ज्या ज्या चांगल्या सुचना तसेच आमच्या चुका पत्रकार करुन देतील त्यामुळे आम्हाला चांगल्या प्रकारे काम करता येईल. आयुक्त साहेब स्थायी समितीस आवश्यक उपस्थित रहावे त्याच्या उपस्थितीमुळे स्थायी समितीमध्ये उपस्थित होणा-या समस्यांचे निराकरण शक्य होईल काही वेळेस कामानिमित्त शक्य झाले नाही तर ठिक आहे.अधिकारी व कर्मचारी यांना आग्रहाची विनंती आहे यापुढे स्थायी समितीची बैठक सुरु होणेपूर्वी उपस्थित रहावे. बैठक सुरु झाल्यानंतर जर कोणी उपस्थित झाले तर त्यांना जाब विचारला जाईल कर्तव्यांत कसूर करता कामा नये वेळोवेळी ज्या सुचना असतील त्यांचा विचार केला जाईल परंतु अधिकाराचा दुरुपयोग करुन नये. या शहरात पत्रकार बांधव वर्तमान पेपरातून काही समस्या छापून आणतात त्यांचा हेतु चांगला असतो. त्यांचे सुचना हया कामात सुधारणा होण्यासाठी असतात. त्यांचे आम्ही स्वागत करु. परंतु पत्रकार बांधवानाही विनंती आहे त्यांच्या सुचनाचा अवमान होणार नाही या शहराच्या विकासासाठी त्यांची साथ हवी आहे. चुक सुधारण्यांची संधी द्यावी. भारतीय जनता पक्षांचे प्रमुख नेते श्री. अनुप अग्रवाल धुळे लोकसभा मतदार संघाचे खासदार मा. सुभाषजी भामरे साहेब, तसेच मा. मंत्री जयकुमारजी रावल सो. तसेच या शहराचे महापौर सो. यांचे मार्गदर्शन व साथही आवश्यक आहे. या सर्वांचे आभार व्यक्त करतो. व आजच्या विषय पत्रिकेवरील विषयानुसार स्थायी समितीची साप्ताहिक सभा दर गुरुवारी व वेळ सकाळी ११-०० वाजे ठेवण्यांस सर्वाच्या समतीने मान्यता देतो.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०१ दिनांक २०/०२/२०२०

कार्यालयीन अहवालानुसार धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक दिनांक १७/०२/२०२० रोजी होऊन स्थायी समिती सभापती पदी श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम हे निवडून आलेले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 2 महानगरपालिका स्थायी समिती परिवहन समिती इत्यादीचे कामकाज यामध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

स्थायी समितीचे कामकाज

३) स्थायी समितीच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी—

अ) स्थायी समितीची सभा आठवड्यातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा अन्य वेळी भरवण्यांत आली पाहिजे.

ब) प्रत्येक स्थायी समितीची पहिला सभा आयुक्त ठरवील अशा दिवशी व वेळी भरवण्यात आली पाहिजे.आणि जर ती त्या दिवशी भरवण्यात आली नाही तर ती आयुक्त ठरवील अशा नंतरच्या एखादया दिवशी भरवण्यात आली पाहिजे. आणि स्थायी समितीची त्यानंतरची प्रत्येक सभा उक्त समिती वेळोवेळी ठरवील अशा दिवशी अशा वेळी भरवण्यात आली पाहिजे.अशी तरतूद आहे.

सर्व उपस्थित सन्मा.सदस्यांच्या सहमतीने स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार गुरुवार ठेवण्यांस व सभेची वेळ सकाळी ११-०० वाजेची ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच अन्य दिवशीही आवश्यकतेनुसार व तांतडीच्या प्रसंगी स्थायी समिती सभापती यांच्याआदेशाने बैठक आयोजन करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ३ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक २७/०२/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक २७/०२/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता मा.श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
३	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य
४	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
५	श्रीमती.उदासी कशीश गुलशन	सदस्या
६	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
७	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
८	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
९	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
१०	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
११	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
१२	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१३	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या
१४	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. अजिज शेख	आयुक्त
२	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
३	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखापरीक्षक
४	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
५	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
६	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी
७	श्री. के.एन. शिंदे	अभियंता

८	डॉ. श्री महेश मोरे	आरोग्याधिकारी
९	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री. पी.डी. नाईक	लेखापाल
११	श्री. रजमान अन्सारी	वरिष्ठ सहा. आस्थापना विभाग
१२	श्री. युवराज वाघ	अधिक्षक परवाना विभाग
१३	श्री. बी.एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१४	श्री. सी.एम. उगले	ओव्हरसिअर पा.पु. विभाग
१५	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१६	श्री. महेंद्र जोशी	प्रशासन अधिकारी मनपा शि.मं.
१७	श्री. भटू महानर	लिपीक भांडार विभाग
१८	श्री.विशाल निंबाळकर	अभिलेखापाल
१९	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
२०	श्री.अमोल तारगे	लिपीक बाजार विभाग

म. सभापती सर्व खाते प्रमुख जे खाते प्रमुख आलेले नाही ते का आले नाही त्यांचा खुलासा घेवून आयुक्तांकडे सादर करणेत यावा. उपस्थित सर्वांचे स्वागत

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज.

सन्मा. सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार व श्री. युवराज चैत्राम पाटील यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. जेष्ठ सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार यांनी धार्मिक कामामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे. तसेच सन्मा. श्री. युवराज अण्णा पाटील यांनी त्यांच्याकडेस त्यांच्या मुलीचा विवाह असल्याने सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे. सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार रजा मंजुर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २ दिनांक २७/०२/२०२०

सन्मा. सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार व श्री. युवराज चैत्राम पाटील यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार रजा मंजुर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-०३ वलवाडी मालमत्ता क्रं.६०७ येथे सामाजिक भुवन बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक रु. २७,१८,५२०/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३ दिनांक २७/०२/२०२०

धुळे मनपा हद्दीतील वलवाडी भागांतील मालमत्ता क्र.६०७ येथे समाज भवन बांधणेबाबत संदर्भीय पत्र प्राप्त आहे.उक्तबाबत समक्ष पाहणी केली असता सदर मालमत्ता क्र.६०७ हि सरपंच ग्रामपंचायत वलवाडी यांच्या नावे असून सदर भागांत अतिशय गरीब मोलमजुरी करणारे कष्टकरी दलित आदिवासी समाज बहुल भाग आहे.सदर भागांत स्थानिक नागरिकांच्या अनेक समस्या असून या भागामध्ये समाज भवन होणे गरजेचे आहे.उक्त कामाची सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे.

दि.३/२/२०२० च्या म. आयुक्त यांच्या समक्ष पाहणीनुसार व सुचनेनुसार सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यानुसार सदर कामास शासकीय दरसूची सन २०१९-२० नुसार रु.२७,१८,५२०/- मात्र खर्च अपेक्षित असून सदरच्या खर्चाची नोंद सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पा अंतर्गत करण्यात आली आहे.

कार्यालयीन अहवाल व सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/- X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-०४ म.महापौर यांचे दालनमधील antichember येथे पावर प्रेझेन्टेशन, इतर महत्वाच्या राजकीय घडामोडीचे आकलन होणेसाठी लावण्यांत आलेल्या LED टी. व्ही. संचाचे देयक रु. ८५०००/- मात्र अदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४ दिनांक २७/०२/२०२०

म.महापौर यांचे दालनमधील antichember येथे पावर प्रेझेन्टेशन,इतर महत्वाच्या राजकीय घडामोडीचे आकलन होणेसाठी व इतर प्रशासकीय कामकाजासाठी samsang कंपनीचा ५० इंचLED टी.व्ही. संच तांतडीने लावण्यात आला आहे.त्यानुसार न्यु कोमल इलेक्ट्रॉनिक्स,धुळे यांनी सदर LED टी.व्ही.संचाचे देयक रक्कम. रु८५०००/-मात्र सादर केले आहे.

उक्त काम हे म. महापौर यांच्या सूचनेने तांतडीने करण्यात आले असून LED टी.व्ही.संचाचे देयक रक्कम रु.८५०००/-मात्रला सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- X X X
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ४ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
शुक्रवार दिनांक २८/०२/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची अर्थसंकल्पीय विशेष सभा आज शुक्रवार दिनांक २८/०२/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता मा.श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. सोनार सुनिल वसंतराव	सदस्य
३	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
४	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
५	श्रीमती.उदासी कशीश गुलशन	सदस्या
६	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
७	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
८	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
९	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
१०	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
११	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
१२	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१३	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या
१४	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. अजिज शेख	आयुक्त
२	श्री. गणेश गिरी	उपायुक्त
३	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त

४	श्री. विनायक कोते	सहा. आयुक्त
५	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखापरीक्षक
६	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
७	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
८	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी
९	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
१०	डॉ. श्री महेश मोरे	आरोग्याधिकारी
११	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१२	श्री. लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
१३	श्री. पी.डी. नाईक	लेखापाल
१४	श्री. रजमान अन्सारी	वरिष्ठ सहा. आस्थापना विभाग
१५	श्री. युवराज वाघ	अधिक्षक परवाना विभाग
१६	श्री. बी.एस. रनाळकर	प्र.सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१७	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१८	श्री. महेंद्र जोशी	प्रशासन अधिकारी मनपा शि.मं.
१९	श्री. भटू महानर	लिपीक भांडार विभाग
२०	श्री.विशाल निंबाळकर	अधिलेखापाल
२१	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
२२	श्री. किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख
२३	श्री.सुक्राम आत्या राऊत	वाहन विभाग

म. सभापती सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मो स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज

सन्मा. सदस्य श्री. संतोष छगन खताळ यांनी आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर दिनांक २८/२/२०२०

सन्मा. सदस्य श्री. संतोष छगन खताळ यांनी आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ०५ मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांच्या पत्रानुसार सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे.

सन २०१९-२०चे सुधारीत व २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकावरील आयुक्तांचे मनोगत

"अर्थ आहे म्हणून परमार्थ आहे
अर्थ आहे म्हणून सारे सार्थ आहे
शहराचा अर्थसंकल्प आपुला
आपण सारे यथार्थ पार्थ आहे. "

मा. सभापती/सन्मा.सदस्य
स्थायी समिती, महानगरपालिका धुळे

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ नुसार सन २०१९-२० चे सुधारित व कलम ९५ नुसार सन २०२०-२१ चे मूळ महानगरपालिका अंदाजपत्रक आज मी स्थायी समितीसमोर सादर करत आहे सन २००१ ची जनगणना विचारात घेऊन लोकसंख्या तीन लक्ष पेक्षा अधिक झाल्यामुळे महानगर पालिकेची स्थापना ३० जून २००३ रोजी झाली असून महानगरपालिकेच्या निर्मीतीनंतरही महापालिकेच्या कारभारात अनेक स्थित्यंतरे होत गेली. धुळे शहरासाठी नियोजनबध्द् व विकासात्मक कामे करण्यावर भर दिला जात आहे. विविध समस्या मधून मार्गक्रमण करून वाटचाल करण्याचा महानगरपालिकेचा सदैव प्रयत्न राहिलेला आहे.स्थापनेनंतर १६ वा अर्थसंकल्प व माझे कार्यकाळामध्ये पहिला संभाव्य जमा व खर्चाचा अंदाज मी आज सादर करत आहे. सर्व तत्कालीन आयुक्तांनी केलेली केलेली कामे या पार्श्वभूमिवर मला मार्गक्रमण करणे सोयीचे ठरत आहे. स्व. पायगुडे साहेबांनी लावलेली आर्थिक व प्रशासकीय शिस्त , उन्हाळे साहेबांनी उत्पन्नवाढीसाठी केलेले प्रयत्न , भोसले साहेबांनी उंचवलेले अधिकारी व कर्मचा-यांचे मनोबल,श्रीमती संगिता धायगुडे यांनी अवलंबिलेली शिस्तप्रियता, सुधाकर देशमुख साहेबांनी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय ठेवून घेतलेले सकारात्मक निर्णय यापार्श्वभूमिवर माझी वाटचाल सोयीची झालेली आहे.

धुळे शहर हे अनेक धार्मिक स्थळांमुळे पावन भूमी मानली जात असून या शहराचा इतिहासही खूप मोठा आहे. जयपूर शहराप्रमाणे कॅप्टन ब्रिज या जिल्हाधिकाऱ्यांनी रचनाबद्ध शहर म्हणून विकसित केलेले आहे. तथापि शहर जरी रचनाबद्ध असले तरी शहरातील अनेक नागरी सुविधांचा अद्यापही अभाव असल्याने विकास कामे पार पाडणेची जबाबदारी वाढलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीच्या पाठशाळा असून या ठिकाणी समतोल न्याय व जनसामान्यांचे समाधान केंद्रस्थानी ठेवून व्यापक जनहितासाठी काम करत रहाणे हे आद्यकर्तव्य ठरते. जनता व लोकप्रतिनिधी यांच्यात सुसंवाद निर्माण झाल्यास विकासात्मक कामांना निश्चीतपणे गती मिळते.याच भूमिकेतून महानगरपालिकेने शहराच्या सर्वांगिण विकासासाठी विविध विकास कामे व उपक्रमांना केलेली सुरवात आशादायी ठरत आहे.

महानगरपालिकेकडे मर्यादित उत्पन्नाचे स्त्रोत आणि उत्पन्न वाढीस असणा-या मर्यादा यामुळे अनेक विकास कामे करण्यासाठी अडचणी निर्माण होतात.

" मंजिल मिले या ना मिले ये तो मुक्कदर की बात है
लेकिन हम कोशिश भी ना करे ये तो गलत बात है "

मागील वर्षी जमा व खर्चाचा अंदाज सादर करताना काही बाबी आश्वासित केल्या होत्या. अनेक वर्ष महानगरपालिकेकडे प्राप्त अनुदान वापराकरीता महानगरपालिकेच्या हिश्याची रक्कम वर्ग न केल्याने खर्च करता येत नव्हती. तथापि सुयोग्य नियोजन करून सर्व शासकीय

योजना मार्गी लावण्यासाठी व लोकांना नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खासकरून प्रयत्न करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून धुळे शहराची दीर्घकाळ प्रलंबित १३६ कोटी रुपये किमतीची पाणीपुरवठा योजना अंतिम टप्प्यात आली आहे. नगरोत्थान योजनेअंतर्गत रुपये चाळीस कोटी चा मंजूर प्रकल्प पूर्ण करण्यात आलेला आहे. याशिवाय नागरी दलित वस्ती योजना, नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना, रस्ता निधी अंतर्गत ची कामे, जिल्हा सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत ची कामे व अल्पसंख्यांक निधीअंतर्गत कामे यशस्वीरित्या राबविण्यात महानगरपालिकेस यश आले आहे.

महानगरपालिका या राज्यघटनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्था असून राज्यघटनेतील अनुसुची १२ नुसार महानगरपालिकेची कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आलेले आहेत. घटनात्मक तरतुदीनुसार राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कायद्यात सुधारणा केली असून त्याप्रमाणे विविध बाबींची अंमलबजावणी केली जात आहे.

दरवर्षी महानगरपालिकेचा जमा व खर्चाचा अंदाज प्रथम स्थायी समितीसमोर व स्थायी समितीमार्फत नंतर महापालिका सभेसमोर सादर करून मंजूर केला जातो. अर्थसंकल्पीय अंदाज हा वस्तुनिष्ठ असावा व त्यानुसार शाश्वत विकास साधला जावा ही प्रामाणिक अपेक्षा असणे अभिप्रेत आहे. त्या अनुषंगाने सन २०१९-२० चे जमा व खर्चाचे विवरण तयार करताना आभासी वाढ अंदाजपत्रकात न करण्याची विनंती करण्यात आली होती. प्रत्यक्षात मागील तीन वर्षाचे जमाखर्च आणि तफावत दर्शवणारा तक्ता खालील प्रमाणे आहे. (रू. लाखात)

अ.क्र.	वर्ष	प्रशासन तरतूद	स्था.स तरतूद	महासभा तरतूद	प्रत्यक्ष महसुली उत्पन्न	खर्च
१.	२०१६-१७	२६५३२.४०	२८०६५.३२	२९१३५.३२	१३५५२.४०	११२३९.१७
२.	२०१७-१८	१२४७७.७७	१५१२७.७७	१७०६७.७७	१५३६२.३७	१२९६५.६४
३.	२०१८-१९	१३२४१.७४	१५२४५.०८	१६७७२.०८	१७७३५.१२	१८०३३.७१

महानगरपालिकेकडे अनेक ठेकेदारांची देणे प्रलंबित असूनआर्थिक परिस्थितीमुळे या रकमा वेळच्या वेळी देण्यात महानगरपालिकेला शक्य झालेले नाही. वरील तक्त्यातील महसुली उत्पन्नाचे आकडेवारी लक्षात घेता प्रशासनाने सुचवलेल्या अंदाजपत्रकापेक्षा मा. स्थायी समिती व मा. महासभा यांच्याकडून तरतुदी वाढवून अर्थसंकल्प मंजूर करण्यात आलेला आहे. महसुली उत्पन्न अवाजवी विचारात घेतल्यामुळे त्याचा परिणाम महिला व बालकल्याण विभागासाठी राखीव निधी आणि अपंगांसाठी राखीव निधीच्या तरतुदींवर झाला असून त्याही तरतुदी जादाच्या ठेवणे भाग पडले आहे. या कारणास्तव महानगरपालिकेस विधानमंडळाच्या महिला हक्क कल्याण समितीची सामोरेही जावे लागले आहे. त्यामुळे गैरवाजवी तरतुदी होऊ नये किंवा गैरवाजवी खर्चाचा अंदाजही अंदाजपत्रकात असू नये यासाठी वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक तयार करणे ही आवश्यक बाब ठरते.

महानगरपालिकेच्या उत्पन्नासाठी एकत्रित मालमत्ता कर, दुकान भाडे, विकास शुल्क, पाणीपट्टी इत्यादी महत्त्वाची उत्पन्नाची साधने आहेत. वास्तविक पाहता यात वाढ करून उत्पन्न वाढविण्यासाठी उपाय योजना करणे बऱ्याच वेळा प्रशासनाकडून प्रस्तावित केले जाते. तथापि प्रचलीत दरवाजवी वाटत असल्याने सदर अंदाजपत्रकात आपण मालमत्ता कर, दुकान भाडे, विकास शुल्क आणि पाणीपट्टी यामध्ये वाढ सुचविण्यात आलेली नाही.

मात्र उत्पन्नवाढीसाठी आकारणी न झालेल्या मिळकतींना संकलित कराची आकारणी करणे, बेकायदेशीर नळकनेक्शन शोधून काढून त्यांच्यावर कारवाई करणे व नियमानुकूल करणे, दुकान गाळे भाडे पट्ट्यामध्ये सुसूत्रीकरण आणणे व वसुलीची प्रक्रिया सुलभ करणे, संकलित करा च्या आकारणीची पद्धत सुटसुटीत करून त्यात पारदर्शकता आणणे इत्यादी बाबींकडे आगामी वर्षात लक्ष केंद्रित करणे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२० च्या अनुषंगानेही महानगरपालिकेने विशेष प्रयत्न केले असून नविन अद्ययावत शौचालयांची निर्मीती , कच-यावर पुर्नप्रक्रिया , घनकचरा संकलन व वाहतूक यासाठी विशेष लक्ष देण्यात येत असून धुळे महानगरपालिकेला सर्वोत्तम मानांकन मिळण्यासाठी नागरीक,प्रशासन,पदाधिकारी नगरसेवक बंधु- भगिनी व प्रसार माध्यमे यांच्या माध्यमातून स्वच्छता ही चळवळ व्हावी व नागरीकांचीही मानसिकता तयार व्हावी यासाठी सर्व स्तरातून महानगरपालिका प्रयत्नशिल आहे.

महानगरपालिकेच्या कार्यपध्दती गतिमान व्हावी व त्यात आधुनिकता यावी यासाठी महानगरपालिकेची ई-गव्हर्नर्सकडे वाटचाल सुरू आहे.ऑनलाईन बांधकाम परवानगी ई कनेक्टीव्हीटी व्दारे मालमत्ता कराचा भरणा,ऑनलाईन ई निविदा याव्दारे पारदर्शकता व गतिमानता साधण्याचा प्रयत्न महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.

महानगरपालिकेकडे अतिक्रमणावर कार्यवाहीसाठी पुरेशी यंत्रणा उपलब्ध नाही. तरीही शहरात अतिक्रमण कार्यवाही व अनधिकृत बॅनर यावर कार्यवाही निर्भीडपणे करण्यात येत आहे. सदर यंत्रणा अधिक अद्ययावत व सक्षम करणेसाठी प्रयत्न केले जात आहे. त्याचबरोबर हॉकर्स झोन निर्मीतीसाठीही महानगरपालिका प्रयत्नशिल आहे.

सर्वसामान्य व अल्प उत्पन्न गटातील नागरीकांना घरकुलांची सोय उपलब्ध व्हावी यासाठी पंतप्रधान आवास योजनेचे कामही गतीने सुरू केलेले आहे. तसेच रमाई आवास योजना , शासकीय व खाजगी जमिनीवरील असणारे अतिक्रमीत घरांबाबत शासन निर्णयानुसार नियमाकुल करावयाची कार्यवाही सुरू झालेली आहे. महिला सक्षमिकरणासाठी स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी बचत गटांच्या माध्यमातून प्रभावी प्रयत्न सुरू आहेत. महिला बालकल्याण समितीसाठी तरतूद,दिव्यांगासाठी राखीव निधी अशा विविध प्रकारे नियोजन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू आहे.

वर्षानुवर्ष थकित असलेली प्रलंबित देयके व वित्तीय नियोजन स्विकारूण महानगरपालिकेला प्रगतीपथावर नेण्याचा मनस्वी प्रयत्न करण्यात येत आहे. शहराच्या एकूणच अर्थव्यवस्थेमुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीवर मर्यादा पडतात त्याचाच परिणाम म्हणून शहराच्या खर्चासाठी निधी उपलब्ध नसतो.त्यामुळे शासनाच्या योजनांचा पुरेपुर लाभ घेवून जास्तीत जास्त नागरी सुविधा पुरविण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न राहिलेला आहे. नगरसेवक व पदाधिकारी यांच्या सहकार्यामुळे नियोजनबध्द विकास कामे मार्गी लागत आहेत. महानगरपालिकेतील वरिष्ठ पातळीवर बहुतांशी पदे रिक्त असून अत्यल्प तांत्रिक कर्मचारी वर्ग मंजूर पदापैकी कमी भरलेली पदे व आर्थिक स्थिती या सर्वबाबींवर मात करून स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ सर्वेक्षण २०१९-२० शहर हागणदारी मुक्त करण्यासाठी ठेवलेले सातत्य, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण उपक्रमात मिळालेला प्रथम क्रमांक , ऑनलाईन बांधकाम परवानगी मध्ये मिळविलेला प्रथम क्रमांक , मालमत्ता कराच्या वसुलीसाठी होणारे यशस्वी प्रयत्न , मनपा निधी व शासन निधी यामधून होणारी शहरातील सर्वांगीण विकासकामे याबाबत धुळे महानगरपालिका आवश्यक भूमिका नोंदवित आहे.

" दाम उचे हो सकते है ख्वाहिशोके
मगर खुशिया हरगिज महंगी नही होती "

हाच आर्शिवाद घेऊन आपल्या सर्वांच्या सहकार्याने या शहराच्या सर्वांगिण विकास साध्य करण्यासाठी आपण सज्ज होऊ या.

महानगरपालिकेच्या अत्यावश्यक खर्चात सातत्याने वाढ होत असून उपलब्ध महसुली उत्पन्नाच्या मर्यादेत खालील प्रमाणे महत्त्वाच्या आवश्यक विकास कामे इत्यादी बाबीवर तरतुदी करण्यात येत आहेत.

१) वेतन / वेतन आयोग फरक :-

धुळे मनपातील कायम कर्मचा-यांना ७ वा वेतन आयोग लागू केल्यास संभाव्य जमा होणा-या महसुली उत्पन्नातून उक्त फरकाची रक्कम अदा करणे कामी रुपये ६.०० कोटी एवढी तरतूद प्रस्तावित करणेत आलेली आहे. म.न.पा. तील नियमित कर्मचारी/रोजंदारी कर्मचारी/ म्यु. फंड कर्मचारी व सेवा निवृत्त कर्मचा-यांना शासनाच्या वेतन अयोगानुसार शिफारशी लागू करण्यात आल्यामुळे दरमहा वेतन, निवृत्तीवेतन, रोजंदारी वाढलेले दर यात लक्षणीय वाढ झालेली आहे. म्यु. फंड कर्मचारी यांना माहे नोव्हेंबर २०१० पासून ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू करण्यांत आल्यामुळे दरमहा वेतनात वाढ झालेली दिसून येते.

२) विकास कामांचे प्रलंबित देयके :-

धुळे म.न.पात यापूर्वी मनपा निधीतून विविध विकास कामे करणेत आलेली आहे. परंतु निधी अभावी मोठया प्रमाणात दायीत्व/प्रलंबित देयके आहेत. त्यासाठी काही प्रमाणात अत्यावश्यक देयकांची अदायगी करणेसाठी तूर्त रुपये १ कोटीची तरतूद करणे आलेली आहे.

३) ई-गर्व्हनन्स:-

याअंतर्गत नागरीकाना सर्व नागरी सुविधा संगणकीय करण्याच्या माध्यमातून अचूक व विहित काळात मिळवून देण्यासाठी मनपाने निर्णय घेतलेला आहे. उदा. जन्म मत्युचे दाखले, व्यवसायाचे परवाने, घनकचरा व्यवस्थापन सुविधा, ऑनलाईन मालमत्ता कर भरणे, विवाह नोंदणी दाखले, भाडे तत्वावरील मनपाच्या सर्व मालमत्ता, Auto D.C.R, ई-टेंडर, एस.एम.एस लघुसंदेश, इ. प्रकल्प सुरु करणेत आलेले असून सदर प्रकल्पांची प्रभावी व अत्याधुनिक पध्दतीनुसार संगणकीय प्रणालीची अंमलबजावणी करणेत येईल. यासाठी अर्थसंकल्पात रक्कम रुपये १.०० कोटी तरतूद करणेत आलेली आहे.

४) नविन मिळकतींचा सर्व्हे करणे:-

महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ५ जानेवारी २०१८ अधिसूचनेनुसार धुळे शहराच्या हद्दवाढीबाबत अधिसूचना जारी करणेत आलेली असून सदर अधिसूचनेनुसार एकूण अकरा महसुली गावांपैकी चार महसुली गावांचे संपुर्ण क्षेत्र तर सात महसुली गावांचे भागश: क्षेत्र धुळे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यापैकी वलवाडी गावातील बखळ जागेवरील कर आकारणी दर हा जास्त आहे तो महानगरपालिकेच्या प्रचलित दराने करणे उचित होईल. सन २०२०-२१ या वर्षात मालमत्ता कराकरीता मिळकतीचा सर्व्हे करण्यांत येणार आहे. त्यामध्ये चटई क्षेत्र उल्लंघन, अधिकृत/अनधिकृत बांधकामे विचारात घेवून कर आकारणी, भाडेकरी वापर, कर आकारणी नसलेल्या मिळकती व नळजोडणी संख्या व आकारमान, सोलर वॉटर हिटर वापर, विहिर/कूप नलिका इ. बाबींचा प्रामुख्याने सदर

सर्व्हेक्षणात समावेश असून उक्त सर्व्हेक्षण जी.आय.एस. मॅपींग पध्दतीने करण्यात येणार असुन प्रत्येक मालमत्ता जी.आय.एस नकाशात लिंक करणेत येणार आहे. तसेच सदर सर्व्हेक्षणाचे संपूर्ण कामकाज हे संगणकीय प्रणाली व्दारे करण्याचे नियोजन आहे. शासनाच्या निर्णयानुसार व मार्गदर्शनानुसार सदर योजना राबविण्याचा मनपाचा मानस आहे. शासन निर्णयानुसार कल्याण डोंबीवली महानगरपालिकेने विकसीत केलेली (Mai Net) या संगणक प्रणालीचा वापर मालमत्ता कर आणि पाणीपट्टीचा भरणा करण्यासाठी केला जातो. मालमत्ताकराची मागणी नोंदवही संपुर्णपणे संगणीकृत करण्यात आली आहे.

५) वृक्षनिधी :-

वृक्ष प्राधिकरण समिती अस्तित्वात असून सन २०२०-२१ पासून वृक्ष प्राधिकरण समितीचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

६)राखीव निधी / महिला बालकल्याण :-

नगरविकास विभाग शासन निर्णय दि. १७/४/१९९३ नुसार मनपाने वार्षिक अर्थसंकल्प तयार करतांना मनपा निधीतील बांधील खर्च वजा जाता शिल्लक रकमेच्या ५% एवढी तरतूद महिला व बालकल्याण विभागसाठी करणेचे निर्देश असल्याने व शासन निर्णय दि. ६ नोव्हेंबर २०१० नुसार मनपा निधीतील बांधील खर्च वजा जाता शिल्लक रकमेच्या ५% स्वतंत्रपणे तरतूद करणेत आलेली आहे. यामुळे धुळे मनपा क्षेत्रातील महिलांचे आरोग्य सुधारणा, स्वावलंबन विकासकामे, प्रशिक्षण इ. उद्देश साध्य होऊ शकेल.

७) **राखीव निधी (आर्थिक व दुर्बल घटक)** :-

नगरविकास विभागाकडील दि. २६/२/२००१ च्या परिपत्रकानुसार मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटकांना त्यांचा सामाजिक स्तर उंचावणे करीता व शासन निर्णायतील कल्याणकारी योजना राबविण्याकरीता सन २०१९-२० च्या मुळ अंदाजपत्रकात ५% नुसार स्वतंत्रपणे तरतूद करणेत आलेली आहे. यामुळे काही प्रमाणात का होईना आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मदत होणार आहे.

८) राखीव निधी (अपंग दिव्यांग) :-

नगरविकास विभागाकडील दि. ३०/१०/२०१० चे परिपत्रकानुसार मनपा क्षेत्रात दिव्यांग (अपंग) नागरीकांना त्यांच्या पुर्नवसन व विकास करणेसाठी बांधील खर्च वजा जाता शिल्लक रक्कमेच्या ५% एवढा राखीव निधी ठेवण्यांत आलेला असून शासन निर्णायतील उक्त निधी मधुन सदर योजना वस्तु, साहित्य इ. वर खर्च करता येऊ शकेल व त्यामुळे उक्त दिव्यांग बंधु भगिनी हे स्वावलंबी होण्यास निश्चीतच मदत होऊ शकेल.

९) **शहरातील विकास कामे** :-

धुळे शहराची यु.आय.डी.एस.एस.एम.टी.अंतर्गत असलेली१३६कोटी खर्चाची पाणी पुरवठा योजना आज अंतिम टप्यात आहे. मुख्य जलवाहिनी, गुरूत्ववाहिन्या तसेच एकूण ७ जलकुंभाची कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचबरोबर धुळे शहरासाठी वरदायीनी ठरणारी सुमारे १५६ कोटी खर्चाची अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेचे काम प्रत्यक्षात सुरू होत असून या दोन्ही कामांमुळे शहराच्या पाणीपुरवठयावर मोठा सकारात्मक परिणाम होवून नियमित व

उच्चदाबाने पाणीपुरवठा करणे महानगरपालिकेत शक्य होणार आहे. त्याचबरोबर शहरासाठी १३६ कोटी रूपये खर्चाची भुयारी गटार योजना मंजूर झालेली असून त्यासाठी प्रथम टप्प्याचा निधी प्राप्त झालेला असून देवपूर भागात प्रत्यक्षात कामास सुरवात झालेली आहे. या सर्व योजना शहराच्या भविष्यकालीन विकासासाठी महत्वकांक्षी योजना असून यासाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण अधिकारी यांचेशी समन्वय ठेवून योजना गुणवत्तापुर्वक करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचबरोबर राज्यस्तरीय सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेच्या माध्यमातून शहर विकासासाठी १०० कोटींचा निधी प्राप्त झालेला असून यात शहरातील प्रमुख १६ रस्त्यांचे नुतनीकरण व सुशोभिकरणाचे काम हाती घेण्यात आलेले असून प्रत्यक्ष कामास सुरवात झालेली आहे. त्याचबरोबर जिल्हास्तरीय नगरोत्थान योजनेतून सुमारे १५ कोटी खर्चाची विविध प्रभागात मुलभूत सेवा सुविधा व विकासांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच नागरी दलित वस्ती योजना, नागरी दलित्तेतर योजना व विविध शासकीय अनुदानातून विकास कामे हाती घेण्यात आलेली आहेत.विविध विकास कामे व मुलभूत सेवा सुविधांचे कामे करतांनाच शहरातील सौंदर्य वाढावे व नागरीकांना विरंगुळयाची साधने निर्माण व्हावीत यासाठी चौक सुशोभिकरण तसेच विशेष निधी अंतर्गत सुमारे ५ कोटी रूपये खर्च करून पांझरा नदी किनारी उद्यानाची निर्मीती करण्यात येत आहे.

सन २०१९-२० व २०२०-२१ या वर्षात धुळे शहर विकासाच्या दृष्टीने विविध शासकीय योजना व महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो.

१) केंद्र शासनाच्या अमृत अभियानांतर्गत अक्कलपाडा धरणातून धुळे शहरासाठी पाणीपुरवठा योजना.

२) केंद्र शासनाच्या अमृत अभियानांतर्गत भुयारी गटार योजनेचा पहिला टप्पा राबविणे.

३) हद्दवाढीने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत विकास कामे करणे.

४)धुळे शहर व परिसरात शहरात परिवहन सेवा राबविणेचा विचार असून त्याकरीता लाक्षणीक रूपये ५० लक्ष मात्रची रूपये तरतूद ठेवणेत येत आहे.

५) धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाच्या अनेक कार्यक्रमांमध्ये प्रथम क्रमांकावर राहण्यात यशस्वी झाली असून माता बालसंगोपन, क्षयरोग निर्मूलन, एनयुएचएम व विविध लसीकरण यासारख्या कार्यक्रमांमध्ये भविष्यातही आघाडीवर राहण्याचा संकल्प आहे.

६) एनयुएचएम अंतर्गत नवीन दवाखाने विकसित करणे.

७) राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान अंतर्गत महिलांच्या बचत गटांचे बळकटीकरण करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

८)सुवर्णजयंती नगरोत्थानयोजनेअंतर्गत नवीन प्रकल्पानुसार रस्त्यांचे बांधकाम व बळकटीकरण करणे.

९) नागरी दलित वस्ती विकास योजनेअंतर्गत तसेच दलित वस्ती पाणी पुरवठा योजनेअंतर्गत विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करणे व विशेष घटक योजनेचे प्रकल्प राबविणे.

१०)शहरातील वितरण व्यवस्था नियोजनासाठी खासगी सल्लागार नियुक्त करून संपूर्ण शहराच्या पाणीपुरवठ्याचे री-इंजीनियरिंग करणे.

११) शहरात हरित क्षेत्रांचा विकास करणे.

१२) मनपा जागांवर अम्युझमेंट पार्क, प्लॅनेटोरियम, मनोरंजनात्मक सुविधा विकसीत करणे

१३) शहरातील मुख्य रस्त्यांवर सिग्नल व्यवस्था करणे

१४) धुळे शहरासाठी बायोगॅस प्रकल्प राबवविणे.

१५) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम (C & D) प्रकल्प राबविणे.

१६) धुळे मनपा क्षेत्रात प्रभाग समित्यांची स्थापना करणे.

मनपा अधिनियमातील सन २०१९-२० चे सुधारीत अंदाज रु ४२२११.७३ लक्ष यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु. २४३९.७३ लक्ष यासह एकूण जमा रु.२९१८८.६१ लक्ष आणि एकूण खर्च रु. २७९३३.७१ लक्ष लक्षात घेता मनपा निधी ०.२५ + शासन निधी १४२७७.७७ लक्ष अशी एकूण ४२२११.७३ लक्ष शिल्लकेचे सुधारीत अंदाजपत्रक मान्यतेवरुन सादर करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे मनपा अधिनियम १९४९ मधील कलम ९५ नुसार सन २०२०-२१ चे जमा/खर्चाचे मुळ अंदाज यामध्ये प्रारंभीची शिल्लक मनपा निधी ०.२५ + शासन निधी १४२७७.७७ व अपेक्षित/संभाव्य जमा रु. ५८४८१.१४ लक्ष असे एकूण रु.७२७५९.१६ लक्ष आणि अपेक्षित खर्च रु.७२७५६.७४ लक्ष विचारात घेता रु. मनपा निधी ०.२५ + शासन निधी २.१७लक्ष अशी एकूण ७२७५९.१६ लक्ष शिल्लकीचे जमा व खर्चाचे अंदाज मा स्थायी समितीसमोर मान्यतेवरुन सादर करण्यात येत आहे.कृपया त्यास मान्यता देण्यात यावी ही विंनती.

धुळे महानगरपालिकेच्या कार्यप्रणालीत मा पालकमंत्री श्री अब्दुल सत्तार अब्दुल नबी, मा. खासदार श्री सुभाषजी भामरे, मा. आमदार श्री फारूख शाह,विविध पक्षांचे प्रतिनिधी , जिल्हाप्रशासन ,पोलीस प्रशासन इतर सर्व शासकीय विभागाचे बहुमोल सहकार्य लाभात आहे. ही सर्व कामे मार्गी लावतांना मा. महापौर श्री चंद्रकांत सोनार , उपमहापौर मा. सौ कल्याणीताई अंपळकर, सभापती स्थायी समिती श्री सुनिल बैसाणे ,माजी सभापती श्री युवराज पाटील, सभागृह नेते श्री कांतीलाल दाळवाले , विरोधी पक्षनेते श्री साबीर शेख , महिला बालकल्याण समिती सभापती मा सौ स्नेहल जाधव , विविध पक्षांचे गटनेते , सर्व सन्मा सदस्य त्याचबरोबर शहरातील सर्व सामाजिक व सांस्कृतिक संस्था, जेष्ठ नागरीक , शहरातील मान्यवर व सर्व प्रसार माध्यमे व नागरीक यांचे सहकार्य व योगदान अतिशय महत्वपुर्ण ठरत आहे. महानगरपालिका कामकाजात भविष्यात अशा प्रकारे नियोजनबध्द विकासासाठी पदाधिकारी व अधिकारी कर्मचारी यांची पारदर्शक व कार्यक्षम व्यवस्था निर्माण करून सामान्य धुळेकर नागरिकांच्या अपेक्षापुर्तीसाठी आपण सारे सज्ज होऊया.

सदर अर्थसंकल्प तयार करतांना सन्मा.पदाधिकारी, सर्व सदस्य, उपायुक्त, मुख्य-लेखाधिकारी , मुख्यलेखापरीक्षक, लेखापाल तसेच पत्रकार बांधव व नागरीक यांनी वेळोवेळी सूचना केल्या या सर्वांचा मी आभारी आहे. **जय हिंद , जय महाराष्ट्र.**

म. सभापती धन्यवाद आयुक्त महोदय, धुळे मनपा धुळे ची स्थापना ३० जुन २००३रोजी झाली. मा. आयुक्त महोदय यांनी मनपाच्या हिताच्या दृष्टीने विचार करुन आपण २०१९ चे सुधारीत आणि २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक आपण या ठिकाणी सर्व सन्मा. सदस्य आणि महत्वाचे म्हणजे धूळेकर नागरिकांसाठी कर्मचा-यांच्या अभ्यासक वृत्तीने हे अत्यंत चांगले कुठेही गैरवाजी तरतुद न होवु देता कोणताही जास्तीचा कर वाढ न करता वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यामुळे मी स्थायी समितीचा अध्यक्ष म्हणुन आपले आभार व्यक्त करतो आयुक्त साहेबांची या शहराच्या विकासाठी तळमळ आहे. आपण प्रशासनाच्या माध्यमातुन ती व्यक्त केली. विकासाच्या दृष्टीने आपण तरतुद केली आहे.

" मेरा भी यही मकसद है, सिर्फ हंगामा खडा करना मेरा मकसद नही है, मेरा मकसद यही है की, धुलीयाँ शहर की जो बिघडी हुई सुरत है वह सुरत बदलनी चाहीये आणि ही सुरत बदलण्यासाठी आपल्या सर्वांची व पत्रकार बांधवाची मला गरज आहे. तसेच सदरच्या अंदाजपत्रकात छोट्या-छोट्या गोष्टीचा विचार करण्यात आला आहे. अंदाजपत्रकाध्ये मनपाच्या कर्मचा-यांचे हित यामध्ये जपले गेले आहे. तसेच धुळे शहराच्या विकासाच्या आवश्यक बाबी अंदाजपत्रकात यामध्ये नमुद करण्यात आल्या आहेत. यामाध्यमातुन आपण धुळे शहरांच्या नागरिकांची विश्वास जपण्याचा प्रयत्न करत आहोत. आणि त्या प्रयत्नामध्ये माझे सर्व वृत्तपत्रांचे संपादक, पत्रकार, छायाचित्रकार, वृत्त वाहिन्या यांचे मी आभार व्यक्त करतो की, खऱ्या अर्थाने ते आमच्या कामाला दिशा देण्याचे काम आपण करित आहेत. आणि कर्मचारी वर्गाला माझी विनंती आहे. पत्रकार बांधव या समाजाला दिशा देण्याचे काम करतात आणि ते दिशा देत असतांना त्यांच्या कार्यपध्दतीनुसार वर्तमानपत्रात बातमी देत असतात म्हणुन आपल्याला त्या बातमी बाबत वाईट वाटुन घेण्याचे कारण नाही. जर पत्रकार बांधव इतका जागृत आहेत तर माझे कर्मचारी बांधवही तेवढेच जागृत असले पाहिजे. येणा-या काळात मी कर्मचारी बांधवाकडुन अपेक्षा करतो की, वर्तमानपत्रात आपल्या विभागासंबंधीत बातमी आली तर त्याचे आयुक्त महोदय किंवा पदाधिकारी यांनी सुचना न करता आपण जर सुधारणा केली तर तो खरा आनंद होईल. तसेच आजच्या सादर झालेल्या अंदाजपत्रकात सन्मा. सदस्यांना विचार व्यक्त करावयाचे असतीत तर ते करु शकतात.

म.अमोलमासुळे सभापती महोदय,आज सन २०१९ चे सुधारीत आणि २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक आयुक्त साहेबांनी सादर केले आहे. आयुक्त महोदय तुमचे सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने आभार व्यक्त करतो. आपण अंदाजपत्रकात शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचे गोष्टी आपण आपल्या मनोगतातुन व्यवक्त केले. शहराचे जे मुख्य रस्ते, वृक्ष संवर्धन, शहर हरित क्रांती करणेसाठी महत्वाच्या बाबी आपण व्यक्त

केल्या आहेत. तसेच सन २०१९-२० चे जे अंतिम अंदाजपत्रक आहे त्याची प्रत सन्मा. सदस्यांना देण्यात आली आहे किंवा नाही याबाबत माहिती मिळावी.

म. सभापती माझ्या माहिती नुसार सन २०१९-२० चे अंतिम अंदाजपत्रक यामध्ये दिलेले आहे. तरी ही सन्मा. सदस्यांना माहितीसाठी पाहिजे असेल तर लेखा विभागाच्या प्रमुखांना ती माहिती पुरविणेबाबत आदेशीत करतो.

म.अमोल मासुळे सभापती महोदय, आयुक्त साहेबांनी जे अंदाजपत्रक सादर केले आहे. याठिकाणी बांधकाम विभाग किंवा पाणीपुरवठा विभाग सन २०२०-२१ जी महत्वपुर्ण कामे आपण प्रस्तावित केली आहेत ते कामानिहाय केलेली आहेत की निधी ठरवुन दिलेला आहेत. माझा उद्देश आहे की स्थायी समिती मार्फत कुठल्याही प्रभागात किंवा कोणत्याही नगरसेवकावर अन्याय होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

म. सभापती म.आयुक्त साहेबांनी जो बजेट सादर केलेला आहेत त्यात आपल्याला काही तरतुदी सुचवावयाच्या असतील तर आपण सुचवु शकतात आज आपल्याला अंदाजपत्रकाची माहिती देण्यात आलेली आहेत. याबाबत आपल्याला ज्या काही शंका असतील त्या लेखी स्वरुपात सादर कराव्यात. तसेच आपण धुळे शहराच्या विकासासाठी कुठल्याही प्रकारचा पक्षपात करणार नाही. तसेच येणा-या काळामध्ये आपल्याला अल्पसंख्याक निधी, अनुसुचित जमाती आदिवासी बांधवांकरीता निधीची मागणी शासनाकडे करावयाची आहे. माझ्या माहितीनुसार आपण त्या विभागाकडे मागणी केलेली नाही म्हणुन निधी उपलब्ध झालेला नाही. तसेच आज मा.आयुक्त साहेब यांनी समतोल अंदाजपत्रक स्थायी समिती समोर सादर केले त्या अंदाजपत्रकानुसार धुळे शहरातील नागरिकांचे हित जपलेले आहे. त्यासाठी आयुक्त महोदयांना कर्मचा-यांची मदत लागली असेल त्या सर्वांचे आभार व्यक्त करतो. अंदाजपत्रक म्हणजे शहराच्या विकासाचा आरसा असतो अंदाजपत्रक सादर करत असतांना अंदाजपत्रकातील सर्व बाबींचा विचार करावा लागतो.यासाठी सर्व सन्मा.सदस्य यांना प्रशासनाच्या बाबींचा विचार करणेसाठी वेळ दिलेला आहे परंतु मी आजच्या प्रसंगी सर्व वृत्तपत्रांच्या माध्यमातुन धुळे शहरातील नागरिक ज्यांना मनपा आणि लोकप्रतिनिधी कडुन अपेक्षा असते त्या विशीष्ट समाजातील न मानता कर्ते जे लोक आहेत ज्यांना धुळे मनपाला वैभवशाली पुणे आणि मुंबई सारखे पहावयाचे असेल तुमच्या प्रभागामध्ये धुळे शहराला आपण जी आर्थिक तरतुद करीत आहोत धुळे शहराच्या विकासासाठी आर्थिक तरतुद प्राप्त करण्यासाठी आपल्या ज्या काही सुचना असतील या ठिकाणी आपणास आवाहन करतो की, आपण त्या लेखी स्वरुपात कळवावे. मनपा प्रशासनाचा विचार करुन आर्थिक तरतुदी नुसार निर्णय घेण्यात येईल. तो पर्यंत सदरची सभा तहकुब करण्यात येत आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक ०१/१०/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा क्रं.४ अर्थसंकल्पीय तहकूब विशेष सभा शासनाच्या दिनांक ३/७/२०२०च्या आदेशानुसार आज गुरुवार दिनांक ०१/१०/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री. सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** ऑनलाईन पध्दतीने भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्री. सोनार सुनिल वसंतराव	सदस्य
४	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
५	श्रीमती.उदासी कशीश गुलशन	सदस्या
६	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
७	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
८	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
९	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
१०	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
११	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
१२	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१३	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य
१४	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. गणेश गिरी	अति. आयुक्त
२	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त

३	श्री. विनायक कोते	सहा. आयुक्त
४	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
५	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
६	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
७	डॉ. श्री महेश मोरे	आरोग्याधिकारी
८	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
९	श्री.बी.एस. रनाळकर	प्र.लेखापाल तथा सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१०	श्री.एन.पी. सोनार	जनगणना विभाग प्रमुख
११	श्री. रजमान अन्सारी	वरिष्ठ सहा.आस्थापना विभाग
१२	श्री. रविंद्र सोनवणे	अधिक्षक परवाना विभाग
१३	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१४	श्री. राजेश गायकवाड	वरिष्ठ लिपीक मनपा शि.मं.
१५	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
१६	श्री. किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख

म. सभापती — सन्मा.सदस्य मा.अति.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या ऑन लाईन बैठकीत स्वागत करतो.नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. सभापती — आजच्या या अंदाजपत्रकीय बैठकीमध्ये अत्यंत अशा धुळे महानगरपालिकेच्या हितासाठी धुळेकर नागरीकांच्या गरजा आणि सुख सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आपण तरतुदी सुचविणार आहे. त्या माध्यमातून विकास कामाचे देखील अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणार आहे.आजच्या या बैठकीमध्ये सन्मा.सदस्यांना माझी एक विनंती आहे.आपण अंदाजपत्रकीय बैठक घेत असतांना नागरीकांच्या मूलभूत ज्या काही मागण्या असतात.प्रभागातील नागरीक सुविधेच्या बाबतीमध्ये कुठलाही विषय आजच्या बैठकीमध्ये चर्चाला घेवू नये.अंदाजपत्रकीय बैठकीमध्ये ज्या बाबतीत चर्चेचा उहापोह झाला पाहिजे अशा प्रकारची मी तुमच्याकडून अपेक्षा व्यक्त करतो.अंदाजपत्रकीय बैठकीच्या बाबतीतमध्ये आपल्या सदस्यांना आपले जे मत असेल ते मांडू शकतात परंतु ते या विषयाला अनुसरुनच असले पाहिजे यांची दक्षता घ्यावी. कोणाला बोलावयाचे असेल तर ते बोलू शकतात.अंदाजपत्रकाबाबत ब-याच सदस्यांच्या मनामध्ये अनेक प्रश्न आहेत तत्पूर्वी मी श्री.रनाळकर यांनी नुकताच आता लेखापाल पदाचा पदभार स्विकारलेला असून कामकाजाला सुरुवात केलेली आहे.रनाळकर साहेब मला ज्या काही शंका उपस्थित करावयाच्या आहेत तसेच सन्मा.सदस्यांना देखील काही प्रश्न आहेत त्या त्याबाबत आपण सभागृहात माहिती द्यावी.

म. सभापती — प्री बजेट म्हणजे काय? याबाबत माहिती द्यावी.

म.रनाळकर — मी कालच लेखापाल पदाचा पदभार घेतलाआहे.अद्यापपावेतो अंदाजपत्रकाचे अवलोकन केले नाही अंदाजपत्रकाचे अवलोकन करून मी माझा खुलासा सादर करेल.

मा. सभापती — आपण या आधी सुद्धा विविध विभागात कामकाज केले आहे म्हणून आपणास लेखापाल पदावर नियुक्ती केलेली आहे प्री बजेट म्हणजे काय याचा खुलासा करावा.

रनाळकर — मी लेखा शाखेत काम केलेले आहे परंतु माझ्या कामाच्या कालावधीत तरी असे बजेटआलेले नव्हते आयुक्तांमार्फत स्थायी समितीपुढे अंदाजपत्रक सादर करण्यात येते व त्यानंतर स्थायी समिती मार्फत महासभेची मान्यता होते सद्यस्थितीत कोरोना प्रादुर्भाव असल्यामुळे अंदाजपत्रक अद्यापपावेतो अंतिम झालेले नाही प्रशासनामार्फत सादर केलेले अंदाजपत्रक स्थायी समितीपुढे आलेले आहे अत्यावश्यक सेवेच्या कामासाठीच प्री बजेट वापरण्यात यावा असे माझे मत आहे.

मा. सभापती — प्री बजेटच्या तपशिलाबाबत व सदर बाबीचा स्पष्टीकरण याबाबत उपायुक्तांनी खुलासा करावा किंवा या बाबत अभियंता शिंदे साहेब यांनी सभागृहात येऊन याबाबत माहिती द्यावीन 2020-21 या आर्थिक वर्षात मनपा प्रशासनाने किती विकास कामांना प्री बजेट अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.सन 2020-21 या आर्थिक वर्षात मनपा प्रशासनाने किती विकास कामांना प्री बजेट अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यांत आली. तसेच चालू आर्थिक वर्षात प्री बजेट अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेल्या कोण कोणत्या विकास कामांची देयके आतापावेतो अदा करण्यांत आली याबाबत आजच्या बैठकीत सविस्तर माहिती द्यावी.

मा.उपायुक्त यांनी याबाबत माहिती घेऊन कळविण्यात येईल असे स्पष्टीकरण केलेले आहे तथापि सन 2020-21या अंदाजपत्रकात व अंदाजपत्रक अंतिम नसताना प्री बजेटची कामे कोणत्या अधिकारात व नियमात केलेली आहे सदर बाब कायदेशीर आहे का जर कायदेशीर नसेल तर असेल आपण काय कारवाई केली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे यासंदर्भात बेकायदेशीर बाब निष्पन्न झाल्यास संबंधित विभाग व अधिकारी कर्मचारी यांच्यावर मा. आयुक्तांशी चर्चा करून कार्यवाही प्रस्तावित केली जाईल याची नोंद घ्यावी

म. अभियंता — अंदाजपत्रकात विविध कामांसाठी लेखाशिर्ष अंतर्गत तरतूद केली जाते व अंदाजपत्रकानुसार विकास कामे व मूलभूत सेवा सुविधांची कामे केली जातात यापूर्वी अंदाजपत्रकातील तरतुदी कामांसाठी वापरले गेले असतील परंतु एखादे काम आयुक्त किंवा सन्मा. पदाधिकारी किंवा सदस्य यांना नागरिकांच्या हितासाठी आवश्यक वाटलं असेल त्यासाठी बजेटमध्ये तरतूद नसेल तर आपण सुधारित अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येईल या अपेक्षेने आपण कामे व तरतूद प्रस्तावित करतो सुधारित अंदाजपत्रकात उर्वरित लेखाशिर्ष यातील तरतूद कमी-जास्त करून या कामांसाठी तरतूद प्रस्तावित केली जाऊ शकते सन्मा.सदस्य पदाधिकारी यांच्या मागणीनुसार व सुचनेनुसार अत्यावश्यक कामे प्री बजेटमध्ये प्रस्तावित केलेली आहेत.

मा. सभापती — सन 2020-21अंदाजपत्रक अद्याप कोरोना प्रादुर्भावामुळे बैठक नसल्याने स्थायी समितीच्या बैठकीत महासभेपुढे अंतिम झालेला नाही असे असताना अशा प्रकारच्या तरतुदी करता येतात का?

म.अभियंता — आमच्या विभागामार्फत यापूर्वी डिसेंबर २०१९ मध्ये पाणी पुरवठा बांधकाम विद्युत या कामांसाठी किती तरतूद आवश्यक आहे याचा लेखी अहवाल व तपशील लेखा विभागाकडे देण्यात आलेला होता यात कोणती कामे करावयाची आहेत कोणती प्रस्तावित आहेत कोणती प्रलंबित आहेत व त्यासाठी निधी किती लागणार आहे याची माहिती लेखा विभागास देण्यात आलेली आहे त्याप्रमाणे प्रशासनाने आयुक्तांमार्फत स्थायी समितीसमोर अंदाजपत्रक सादर केलेला आहे परंतु मध्यंतरीच्या काळात बैठका न झाल्याने अद्याप स्थायी समिती व महासभेमार्फत अंदाजपत्रक अंतिम झालेले नाही जोपर्यंत स्थायी समितीची व महासभेची मान्यता होत नाही तोपर्यंत आयुक्तांनी सादर केलेल्या अंदाज पत्रकाप्रमाणे प्रशासनामार्फत नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते

मा. सभापती — मा.आयुक्तांना याप्रमाणे अधिकार आहेत यात वाद नाही परंतु जी कामे प्री बजेट अंतर्गत तरतूद दर्शवून घेण्यात आलेली आहेत किंवा याबाबतची देयके देण्यात आलेली आहेत ते नियमानुसार आहे किंवा नाही याबाबत मला खुलासा आवश्यक आहे

म.अभियंता — लेखा विभागामार्फत अभिप्राय घेणे योग्य राहील आम्ही तांत्रिक अधिकारी व कर्मचारी याबाबत खुलासा देऊ शकणार नाही

मा. सभापती — परंतु सदर बाबी या नियमानुसार कायद्यानुसार योग्य आहेत का याचा प्रथम खुलासा होणे आवश्यक आहे

म. अभियंता — सदर प्री बजेट अंतर्गत प्रस्तावित केलेली कामे ही नागरिकांच्या आवश्यकतेनुसार व गरजेनुसार सन्मा. सदस्य किंवा महापौर पदाधिकारी यांच्या सूचनेनुसार व मागणीनुसार घेण्यात आलेले आहेत यात वैयक्तिक कोणताही अधिकारी व कर्मचाऱ्यांचा कोणताही लाभ नाही सन्मा.सदस्यांनी वॉर्डातील नागरिकांना सुविधा मिळावी यासाठी सुचवलेली असतात त्यास अंतिम मंजुरी देणे हे स्थायी समिती ती व आयुक्तांचे अधिकार असतात.

मा. सभापती- — मला याबाबत कायद्यातील तरतुदी व नियम जाणून घ्यावयाचे होते म्हणून याबाबत विचारणा करण्यात आलेली आहे

म.अमोल मासुळे — प्री बजेट अंतर्गत कोणत्या कामासाठी तरतुदी केले आहेत यात काही निविदा प्रसिद्ध आहेत काही कामे प्रस्तावित आहेत याबाबत माहिती मिळावी प्रशासनाने सादर केलेला बजेट पेक्षा किती रकमेची जादा कामे केली आहेत व किती देयके अदा केलेली आहेत याचा देखिल खुलासा होणे आवश्यक आहे

म. रनाळकर — प्री बजेट अंतर्गत निविदा निघालेली असतील त्या बाबतची माहिती बांधकाम विभागाकडे उपलब्ध होऊ शकेल व या कामांची किती देयके अदा झाली आहे त्याची माहिती लेखा विभागामार्फत देण्यात येईल

मा. सभापती — या चालू आर्थिक वर्षात बजेट अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांची यादी स्थायी समितीसमोर सादर करावी व किती देयके अदा केली याचा अहवाल सादर करावा

तसेच मनपा उत्पन्नावर परिणाम करणारी उत्पन्नाच्या दृष्टीने असलेली अत्यंत गंभीर बाब माझ्या निदर्शनास आलेली आहे यापूर्वी वसुली विभागातील लिपिक श्री. अमोल तारगे यांनी उपलोकायुक्त मुंबई यांच्याकडे मालमत्ता कर विभागातील कामकाजाबाबत तक्रार केली होती.याबाबतची याबाबत तक्रारीची नस्ती दिनांक२२/२/२०१९ रोजी आस्थापना विभागा मार्फत सहाय्यक आयुक्त यांना देण्यात आली होती सदर नस्ती महानगरपालिकेतून गायब झालेली आहेत ही अत्यंत गंभीर स्वरूपाची गोष्ट आहे यात मनपाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे याबाबत अद्याप पावेतो मनपा अधिकारी यांच्या वतीने किंवा प्रशासनाच्या वतीने कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही याबाबत चौकशी करून मला तीन दिवसाच्या आत अहवाल द्यावा जर संबंधित नस्ती मला मिळाली नाही तर प्रशासनाने यावर गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करावी प्रशासनाने याबाबत कार्यवाही केली नाही तर मी स्वतः याबाबत गुन्हा दाखल करणार आहे

म. अमोल मासुळे — सदरची बाब ही प्रशासनाच्या कार्यक्षेत्रातील आहे. त्यामुळे प्रशासनाने याबाबत गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे.

मा. सभापती — मी याबाबत स्वत: तीन दिवसानंतर यावर कारवाई करेल मी याबाबतची तक्रारीची उपायुक्त यांच्याकडे सादर करीत आहे

म. कशिश उदासी — मा.मासभापती महोदय कुमार नगर कब्रस्तान पुण्याचा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. कुमारनगरच्या सब्जी मंडी मधला हा प्रमुख रस्ता आहे. याबाबत सदर रस्त्याचे नूतनीकरणासाठी अंदाजपत्रकात तरतूद करावी

मा. सभापती- — अनेक प्रभागात मूलभूत विकासकामांच्या सुविधांची गरज आहे याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांच्या सूचना एकत्रित करून सदर काम नागरिकांच्या विकासासाठी आवश्यक असेल तर निश्चितच त्याच्या अंदाजपत्रकात नियोजन करू आपल्या सूचनाचा जरूर विचार करण्यात येईल

म. अभियंता — मी यापूर्वीच माहिती दिल्याप्रमाणे आम्ही आमच्या विभागामार्फत दिनांक १८/ १२/ २०१९ ला अंदाजपत्रकास संदर्भातील सर्व तपशील लेखी स्वाक्षरीने सादर केलेला आहे त्याबाबत त्यांची पोहोच देखील मला प्राप्त झालेली आहे यापूर्वी विचारणा केल्याप्रमाणे फ्री बजेटमध्ये आतापावेतो कार्यादेश दिलेली कामे १८ असून त्यासाठी ७ कोटी २२ लाख मात्र खर्च प्रस्तावित आहे तसेच प्रशासकीय मान्यता दिलेली प्री बजेटची कामे एकूण ७ असून त्यासाठी ६ कोटी ४६ लाख तरतूद प्रस्तावित आहे

मा.सभापती — याबाबत सर्व सन्माननीय सदस्य व उपस्थितांच्या चर्चेनुसार मी या ठिकाणी नमूद करतो की, अर्थसंकल्पासाठी सर्व प्रकारच्या तरतुदी मागणी ही संबंधित विभागाने लेखा विभागाकडे नोंदवावयाची असते या मागणीवर विभाग प्रमुखाची स्वाक्षरी असणे आवश्यक असते व त्याची नोंद घ्यायची असते.

लेखा विभाग त्यानंतर या सर्व मागणी रकमांचे एकत्रीकरण करणे अपेक्षित आहे. यानंतर लेखा विभाग मागणी केलेल्या रकमा यांचा अभ्यास करुन व त्यांची परिगणना करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली या तरतुदींचा समावेश करत असते.

मात्रआपल्या महानगरपालित अर्थसंकल्प हा फक्त लेखा विभागाने सादर केला पाहिजे व ही त्यांची जबाबदारी आहे असे आभासी चित्र तयार केलेले आहे.

सर्व विभाग प्रमुख हे अधिकारी पदाधिकारी कर्मचारी यांच्या अज्ञानाचा मोठया प्रमाणावर गैरफायदा घेत आहेत व आपल्या स्वत:च्या जबाबदारीतून सुटका करुन घेत आहेत ही बाब कोणत्याही प्रकारे नियमास धरुन नाही हे मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. जर स्पष्ट माहिती विभागाने दिली नाही तर नियमांचा भंग केला आहे असे समजून विभाग प्रमुखांना शिस्त भंगाच्या कार्यवाहीला सामोरे जावे लागेल व त्यांच्यावर स्थायी समिती मार्फत कार्यवाही प्रस्तावित करण्यांत येवून त्यांच्या सेवा पुस्तकात नोंद घेण्याबाबत कार्यवाही केली जाईल.

महानगरपालिका प्रशासनाने बांधकाम विभागाकडील त्या त्या लेखाशिर्षातील सन 2020-21च्या अंदाजपत्रकास अधिन राहून चालू आर्थिक वर्षात विकास कामांना प्रशासकीय मान्यता दिलेले व कार्यादेश दिलेले आहेत अशा कामांची यादी लेखाशिर्षानिहाय तात्काळ सादर करावी तदनंतर पुढील बैठक आयोजित करण्यांत येईल तोपावेतो सदर अंदाजपत्रकीय बैठक तहकूब करण्यांत येत आहे.

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक २२/१०/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची दिनांक २८/०२/२०२० रोजीची सभा क्रं.४ अर्थसंकल्पीय तहकूब विशेष सभा शासनाच्या दिनांक ३/७/२०२०च्या आदेशानुसार आज गुरुवार दिनांक २२/१०/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री. सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** ऑनलाईन पध्दतीने भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्री. सोनार सुनिल वसंतराव	सदस्य
४	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
५	श्रीमती.उदासी कशीश गुलशन	सदस्या
६	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
७	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
८	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
९	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
१०	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
११	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
१२	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या

१३	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य
१४	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. अजीज शेख	आयुक्त
२	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
३	श्री. विनायक कोते	सहा. आयुक्त
४	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
५	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
६	श्री. सी.एम. उगले	ओव्हरसिअर पाणीपुरवठा
७	डॉ. श्री महेश मोरे	आरोग्याधिकारी
८	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
९	श्री.बी.एस. रनाळकर	प्र.लेखापाल तथा सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१०	श्री.एन.पी. सोनार	जनगणना विभाग प्रमुख
११	श्री. रजमान अन्सारी	वरिष्ठ सहा. आस्थापना विभाग
१२	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१३	श्री. राजेश गायकवाड	वरिष्ठ लिपीक मनपा शि.मं.
१४	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
१५	श्री. किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख
१६	श्री. पी. डी. चव्हाण	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१७	श्री. प्रकाश सोनवणे	ओव्हरसिअर नगररचना विभाग
१८	श्री. हेमत पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१९	श्री. सी.सी. बागुल	ओव्हरसिअर पा.पु. विभाग
२०	श्री. राजू माईनकर	भांडारपाल
२१	श्री. तुषार ढाके	अग्नीशमन अधिकारी
२२	श्री. सुक्राम राऊत	वाहन विभाग प्रमुख
२३	श्री. विशाल निंबाळकर	अभिलेखापाल

म. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या ऑन लाईन बैठकीत स्वागत करतो.नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस मा. सभापती सो. यांचेकडून आलेली श्रध्दांजलीची यादी.

तत्कालीन धुळे नगरपालिकचे माजी नगराध्यक्ष तसेच माजी स्थायी समिती सभापती व दानशूर व सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असलेले श्री. चंद्रकांतजी केले काका यांचे नुकतेच अल्पशा: आजाराने दुख:द निधन झाले आहे. त्यांना आजच्या स्थायी समिती सभेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, सभापती स्थायी समिती,
अनुमोदक :-श्री. कमलेश नारायण देवरे,

म. सभापती — मा. श्री. केले काका यांना श्रध्दांजली अर्पण करणेसाठी सर्वानी दोन मिनिटे उभे राहावे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७२ दिनांक २२/१०/२०२०

तत्कालीन धुळे नगरपालिकचे माजी नगराध्यक्ष तसेच माजी स्थायी समिती सभापती व दानशूर व सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असलेले श्री. चंद्रकांतजी केले काका यांचे नुकतेच अल्पशा: आजाराने दुख:द निधन झाले आहे.

मा. श्री. केले काका यांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबीयांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे आत्म्यांस चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर ,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ०५ — मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांच्या पत्रानुसार सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

मा. सभापती — सर्व सन्माननीय सदस्य माननीय आयुक्त साहेब सर्व उपस्थित कर्मचारी तसेच पत्रकार बांधव यांचे मी आजच्या बैठकीत स्वागत करतो आपल्या सर्वांना ज्ञात आहे जगभरात कोरोना आपत्तीमुळे संपूर्ण जनमानसावर विपरीत परिणाम झालेला होता त्यामुळे संपूर्ण देशाचे आपल्या शहराचे गाडे ठप्प झाले होते त्यामुळे सन २०२० व २१ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना उशीर झालेला आहे. या महामारीच्या आपत्तीत मा. महापौर साहेब मा. आयुक्त साहेब व यांच्या मार्गदर्शनाखाली आपण विविध उपाय योजना प्रतिबंधात्मक कार्यवाही केलेली आहे त्यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य लाभले आहे. या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना मला सर्व सदस्य पदाधिकारी आपले सर्व नगरसेवक यांनी केलेल्या सूचनांचा आदर करून उत्पन्न वाढीचा विचार करून सर्वसमावेशक अर्थसंकल्प सादर करीत आहे व मला या ठिकाणी आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

आज चालु आर्थिक वर्षाचा (सन २०२०-२१) अर्थसंकल्प सादर करतांना मला विशेष आंनद होत आहे. आईच्या आशिर्वादाने मी आज ज्या ठिकाणी उभा आहे. त्याबाबतच माझ स्वप्न पुर्ण झाले आहे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने मला नेतृत्व करण्याची संधी उपलब्ध करून दिली तसेच स्थायी समिती सभापती म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली यासाठी आपले माजी मुख्यमंत्री विरोधी पक्ष नेते आदरणीय देवेंद्रजी फडवणीस साहेब तसेच या खानदेशचे विकास रत्न खासदार गिरीश भाऊ महाजन आमचे नेते जयकुमार रावल आमचे मार्गदर्शक गुरुवर्य या धुळे मतदार संघाचे खासदार डॉक्टर बाबासाहेब सुभाष भामरे यांच्या नेतृत्वात मी काम करीत आहे त्यांचे महापौर चंद्रकांत सोनार व शहराच्या विकासासाठी सर्वांगीण अग्रेसर असणारे आमचे मार्गदर्शक भाजपाचे महानगराध्यक्ष श्री अनुप अग्रवाल यांचे मी याठिकाणी प्रथमता आभार व्यक्त करतो याठिकाणी धुळेकर नागरिकांवर कोणताही करवाढ वजन असलेला अर्थसंकल्प सादर करीत आहे. धुळेकर नागरीकांवर कुठल्याही प्रकारचा कराचा आर्थिक बोजा न टाकता अर्थसंकल्प सादर करीत आहे.

बदल जाओ वक्त के साथ, या फिर वक्त बदलना सिखो
मजबुरींयोंको मत कोसना, हर हालमे चलना सिखो

वेळेनुसार व काळानुसार मनपाची परिस्थिती बदलली विशेष म्हणजे आर्थिक परिस्थिती संकटाशी मुकाबला आपण केला, काटयांमधुन आपण रस्ते काढलेत, कारण तशी हिम्मत आपण ठेवली.

सुना है आज समंदर को, गुमान आया है
उधरही ले चलो कश्ती, जहां तुफान आया है...

या अंदाजपत्रकात शहरातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी योजना व तरतुदी सादर करण्यांत येत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज स्वप्नपुर्ती महिला (हिरकणी) आत्मनिर्भर योजना

धुळे महानगरपालिकेचा प्रस्तावित अर्थसंकल्प नवरात्रीच्या उत्सवांमध्ये सादर करण्याचा सन्मान मला मिळत आहे.आणि अशा या नवरात्री काळामध्ये सादर होणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये महिलांसाठी तरतुद केली जाण आवश्यक आहे. जगतजननी म्हणुन जिचा सन्मान आहे. ज्या देशात आपण राहतो त्या देशात मातृसत्ताक पध्दतीचा इतिहास राहिला आहे. अशा या महिलांसाठी या आर्थिक बजेटमध्ये रु. १ कोटीची तरतुद करण्यात येत आहे.

या माध्यमातुन महिलांच्या सर्वांगीण कौशल्य विकासाचे केंद्र उभारण्याचा संकल्प आहे. महाराष्ट्रात अशा पध्दतीने महिलांना कौशल्य विकासासाठी आणि त्यांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंच्या विक्रीसाठी उभारले जाणारे पहिले केंद्र ठरणार आहे. विशेष म्हणजे सेवाभावी संस्थांच्या माध्यमातुन हे केंद्र चालविले जाईल. त्यात महिलांना प्रशिक्षण देण्यासोबत त्यांच्या आरोग्य व वैयक्तीक आयुष्यात महत्वाचे निर्णय घेत असतांना घ्यावयाची काळजी याबाबतही सजग केले जाईल.

हे महिला उद्योजकता केंद्र अथवा महिला मॉल, धुळे महानगरपालिकेच्य माध्यमातुन उभारले जाईल. यासाठी लागणाऱ्या पायाभुत सुविधा व प्रशिक्षणसाठीचा खर्च महानगरपालिका तरतुद केलेल्या निधीतुन अदा करेल. धुळे शहरातील तीन लाख माता भगिनींच्या कौशल्यांना विकसीत करुन, त्यांना छोटे छोटे रोजगार सुरु करण्यासाठी मार्गदर्शन करणे, त्यांना तंत्रशुध्द पध्दतीने प्रशिक्षीत करण्यासाठी या बजेटच्या माध्यमातुन काम केले जाईल.

धुळे महानगरपालिकेचा हा बजेट महिला शक्तीला अजन बळकटी देणारा ठरेल. या बजेटमध्ये महिलांसाठी चार वेगवेगळया टप्प्यांमध्ये काम केले जाणार आहे. पहिला टप्पा प्रशिक्षणाचा असेल त्यानंतर संबंधीत प्रशिक्षीत तरुणीला अथवा महिलेला रोजगार उपलब्ध करुन देण्याचा असेल, तिसरा महत्वाचा टप्पा म्हणजे त्या रोजगारासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ उभारुन देण्यासाठी मदत करण्याचा असेल, चौथ्या टप्प्यात या केंद्रात येणाऱ्या तरुणींना मासिक पाळी, जोडीदार कसा निवडावा, सुरक्षेची काळजी कशी घ्यावी, स्त्री पुरुष समानता, समंजस सहजीवन, सुजाण पालकत्व, कुटुंबाचे आरोग्य सोशल मिडीयाचा रचनात्मक वापर, उत्तम संवाद याबाबत मार्गदर्शन दिले जाईल. विशेष म्हणजे या योजनेच्या माध्यमातुन महिलांनी उत्पादीत केलेल्या वस्तुना बाजारपेठ मिळवुन दिली जाईल.

शहरातील एक हजार बचत गटाच्या महिलांना या कार्यक्रमामध्ये जोडले जाईल. त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तु, केंद्रात प्रशिक्षीत महिलांनी तयार केलेल्या वस्तुंची एकत्र बाजारपेठ महानगरपालिकेच्या माध्यमातुन सुरु केली जाईल. महाराष्ट्रामध्ये महिलांसाठी स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध करुन देणारी पहिली महानगरपालिका ही धुळे महानगरपालिका ठरेल.

शास्त्रशुध्द पध्दतीने आणि काळाची पावले ओळखुनत आपल्याला नियोजन करणे गरजेचे आहे. यामध्ये तरुणींना आणि महिलांना प्रामुख्याने फॅशन डिझाईनिंग, ब्युटी पार्लर, मोबाईल रिपेअरींग, वृध्दांची काळजी कशी घ्यायची, सॅनेटरी पॅड तयार करणे, ज्वेलरी मेकिंग, शिवणकाम, विणकाम, इव्हेंट मॅनेजमेंट, केटरींग इ. यात थिअरी आणि प्रॅक्टिकलचा समावेश असेल. अशा विविध व्यवसायाची कौशल्य शिकवली जातील.

यामध्ये २० पेक्षा अधिक व्यावसायीक अभ्यासक्रमांचा समावेश करण्याचा प्रयत्न राहील. विशेष म्हणजे फक्त आणि फक्त महिला आणि तरुणींसाठी हे महिला उद्योजकता केंद्राचे नियोजन करण्यात आले आहे. पाच वर्षासाठी कार्य कालबध्द हा कार्यक्रम राहील. यामध्ये पाच वर्षानंतर परिणाम दिसुन आले तर हा कार्यक्रम पुढे नेला जाईल. महानगरपालिकेच्या या महिला उद्योजकता केंद्रामुळे महाराष्ट्र राज्यात धुळे शहराचा नावलौकिक होईल. विशेष म्हणजे हे प्रशिक्षण केंद्र महानगरपालिका सामाजिक संस्थांच्या मदतीने उभारेल. तरतुद रु. १ कोटी

१)क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सुकन्या योजना :- रु. १५ लक्ष

धुळे मनपामार्फत सुकन्या योजना राबविली जाणार आहे. त्याअंतर्गत मुलीच्या अर्थात स्त्री जन्माचे स्वागत करण्यासाठी रु. ३०००/- ची मदत देण्यात येणार आहे. मुलीच्या जन्माबाबत समाजात सकारात्मक विचार रुजविण्यास त्यामुळे मदत होईल. खरे म्हणजे मुलगी / स्त्री ही पुरुषांपेक्षा कोठेही कमी नसते. किंबहुना काही कामात तर मुलांपेक्षा मुली आघाडीवर आहेत. १० वी १२ वी चे निकाल दरवर्षी जाहीर होतात तेव्हा ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते. देशाच्या विकासात पुढच्या काळात मुलींचा म्हणजेच महिलांचा मोठा वाटा असणार आहे. म्हणुनच सरकारने बेटी बचाव / बेटी पढाव अशी मोहिम सुरु केलेली आहे. धुळे मनपाच्या दवाखान्यात जन्मास येणाऱ्या कन्येच्या आईवडीलांना ही मदत देण्यात येईल व त्यांच्याकडुन तसा अर्ज भरुन घेतला जाईल. या योजनेसाठी धुळे मनपाच्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात रु. १५ लक्षची तरतुद करण्यात येत आहे.

२) गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिष्यवृत्ती योजना :- १० वी व इ. १२ वी ९० टक्के पेक्षा जास्त मार्कस मिळविणारे विद्यार्थ्यांसाठी :- (रु. १० लक्ष)

३)सावरकर पुतळा स्थलांतर :- रु. ५० लक्ष

४)दाता सरकार चौक सुशोभिकरण :- रु. १५ लक्ष

५)मनपा इंग्रजी शाळा शिक्षक मानधन व इतर शालेय सुविधा :- रु. २५ लक्ष

६)सांस्कृतिक कार्यक्रम :- रु. २५ लक्ष

७)अभ्यासिका :- रु. २५ लक्ष

८)मनपा कर्मचारी गणवेश :- रु. १० लक्ष

९)ग्रुप इन्शुरन्स कर्मचाऱ्यांसाठी :- रु. १० लक्ष

१०)मनपा हददी्तील नागरीक विमा :- रु. २५ लक्ष

११)महापुरुषांचे पुतळे सुशोभिकरण यात राजर्षी शाहु महाराज पुतळा उभारणे ,देवपूर साईबाबानगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, देवपूर येथील संत रोहिदास महाराज पुतळा कामासाठी तसेच शहरातील असलेले महापुरुषांचे पुतळे परिसर नुतनीकरण व दुरुस्ती इत्यादीसाठी तरतूद :- रु. ६० लक्ष

१२)नगरसेवक निधी प्रत्येकी रु. २० लक्ष :- रु. १६ कोटी

१३)शहरातील विविध भागात प्रवेशव्दार करणे यामध्ये आदिशक्ती एकविरा माता मंदिर, फाशीपुल लेनीन चौक, संतोषीमाता मंदिर व मोगलाई नेहरु पुतळा याठिकाणी स्वागत कमान उभारणे. :- रु. १ कोटी ३० लक्ष

१४) विशेष घटक योजनेअंतर्गत धुळे मनपा हददीत सामाजिक सभागृह बांधणेसाठी मनपा हिस्सा :- रु. ५० लक्ष

१५)आयुर्वेदिक दवाखाना दुरुस्ती :- रु. १५ लक्ष

१६)धुळे शहरातील सर्वधर्मिय प्रार्थना स्थळांवर ज्येष्ठ नागरीकांच्या सोयीसाठी सिमेंट बाक बसविणे :- रु. २५ लक्ष

१७)जवाहर स्टेडीयम दुरुस्ती :- रु. १५ लक्ष

१८)चितोडरोड अमरधाम येथे विद्युत शववाहिनी करणे :- रु. २० लक्ष

तसेच खालीलप्रमाणे उत्पन्नाच्या बाबी सुचविण्यात येत आहे.

मनपा उत्पन्नाच्या बाबी

अ.क्र.	कामाचे स्वरुप	उत्पन्नात वाढ
१	मनपा गाळे हस्तांतरण फी	रु. ५ कोटी
२	अनधिकृत मोबाईल टॉवर	रु. २ कोटी
३	नविन व वाढीव मालमत्ता (११ कलमी कार्यक्रमानुसार)	रु. १२ कोटी
४	गुंठेवारी पध्दतीनुसार जागा नियमानुकुल करणे	रु. ३ कोटी
५	लेआऊट अंतिम मंजुरी फी	रु. ३ कोटी
६	जाहिरात जागा भाडे	रु. १० लक्ष
७	सर्वपल्ली राधाकृष्ण शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या वर तसेच प्रबोधनकार ठाकरे व्यापारी संकुलाच्यावर नविन गाळे बांधणे व त्याअनुषंगाने मिळणारे उत्पन्न	५ कोटी
८	अवैध नळ कनेक्शन दंड वसुली उत्पन्न	रु. २५ लक्ष
९	शहरात प्रवेश घेणाऱ्या खाजगी बस धारकांकडुन फी आकारणी करणे.	रु. १ कोटी
१०	शहरातील सर्व मटन, मासे तसेच इतर मांस विकणाऱ्या व्यावसायीकांकडुन फी आकारणी करणे	रु.१० लक्ष
११	स.क्र. ७३ अ देवपुर भागात मनपाने व्यापारी संकुल (शॉपिंग मॉल) उभारुन त्यावर आकारणी करुन गाळेभाडे व डिपॉझिट पोटी उत्पन्न	रु. ५कोटी
	एकुण	३६ कोटी ४५ लक्ष

स्थायी समिती सदस्यांनी मागणी केले प्रमाणे प्रस्तावित अंदाजपत्रकात रक्कम रु. ४ कोटी २० लक्ष इतक्या कामांची तरतुद करण्यात येत असुन त्यांनी सुचविलेले कामे या आर्थिक वर्षात व लगतच्या आर्थिक वर्षात पुर्ण करणे आवश्यक असेल याशिवाय मनपा इतर सन्मा सदस्य यांचे बाबतीत महासभेत त्यांच्या सुचनांना प्राप्त करुन योग्य ती कामांची व आर्थीक तरतुदी करण्यास महासभेची मान्यता घेवुन प्रशासनाने याबाबत ताळमेळ बसवावा.

प्रशासनाने दोनही सभागृहांकडुन सन २०२०-२१ चा अर्थसंकल्प तरतुद अंतिम होतील याच्या अधिन कामांच्या आवश्यकतेप्रमाणे व योग्य त्या सभागृहाची मान्यता होईल या गृहीतावर यापुर्वीच कार्यान्वित केलेल्या योजना कामे इ. साठी अंदाजित रककम रु. १६ कोटी खर्च होणार असल्याचे प्रशासनाने कळविले आहे. वास्तविकत: प्रशासनाने सदरची कामे करण्यापुर्वी दोनही सभागृहांना अवगत करणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही न करता यापुर्वीच त्यांनी दिलेल्या मान्यता विचारात घेवुन प्रशासनाने कळविल्याप्रमाणे सदरची कामे

करणे का आवश्यक होते ही महत्वपुर्ण बाब विचारात घेवुन प्रशासनाने सुचविलेल्या कामांच्या तरतुदी हया प्रशासन उत्पन्नाचा १०० टक्के स्त्रोत सन २०२०-२१ च्या सुधारीत अंदाजपत्रकात निर्माण करेल याच्या अधिन राहुन सदर कामांवरील खर्चाचा समावेश करीत आहे. तसेच प्रशासनाला सुचित करीत आहे की, यापुढे प्रशासनाचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर आपत्ती निवारण व अत्यावश्यक सेवा सुविधे व्यतिरीक्त कुठल्याही प्रकारची कामे, योजना निर्माण करु नये असे केल्याने जे पण दायित्व महानगरपालिकेवर लादले जाईल त्यासाठी त्या त्या वेळेचे कार्यरत सर्व अधिकारी कर्मचारी व त्यास अंतिम मान्यता देणारे प्राधिकारी म्हणुन मा. आयुक्त सो. यांची ती वैयक्तीक जबाबदारी समजण्यात येईल.

मनपा हद्दीत व मनपा हद्दीबाहेर असलेल्या मनपा मालकीच्या जंगम व स्थावर मालमत्ता अस्तित्वात आहेत. मात्र वर्षानुवर्षांपासुन प्रशासनाकडुन सदर मालमत्तांचे कोणतेही आर्थिक मुल्यांकन झालेले नाही. यामुळे प्रशासनाकडुन आज अखेरपर्यंत अशा मालमत्तांचे मुल्यांकन लक्षात न घेता नियमबाहय पणे अर्थसंकल्प पारंपारीक पध्दतीने प्रशासन सादर करीत आहे.यामुळे नागरीकांना नाविण्यपुर्ण मुलभुत सुख सुविधा,योजना,कार्यान्वित करण्याची इच्छा असुनही सत्ताधारी पदाधिकारी यांना अर्थसंकल्पात योग्य त्या तरतुदी करता येत नाही. जर मनपाच्या मालकीचया सर्व प्रकारच्या मालमत्तांचे प्रशासनाने आर्थिक मुल्यांकन करुन व त्यांच्याकडुन सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात या मुल्यांकन तरतुदी विचारात घेवुन अर्थसंकल्प सादर केला तर अत्यंत नियोजनबध्द पध्दतीने शहराचा सर्वांगीण विकास होवु शकतो. असे निदर्शनास आले असुन प्रशासनाने यापुढील अर्थसंकल्प पारंपारीक पध्दतीने न करता आपल्या मालकीच्या सर्व प्रकारच्या मालमत्तांचा तात्काळ शोध घ्यावा व त्याचे शासकीय यंत्रणेकडुन तात्काळ आर्थिक मुल्यांकन करण्यात यावे असे आदेशीत करण्यात येत आहे. तसेच यापुढे सादर होणार अर्थसंकल्प हा शासनाच्या निर्देशाप्रमाणे व अधिनियम लेखा संहिता यात अधोरेखीत केलेल्या नियमांच्या अनुषंगानेच मनपा मालकीच्या सर्व प्रकारच्या मालमत्ता यांचे आर्थिक मुल्यांकन होवुन त्या रक्कमा जमेच्या धरुन अर्थसंकल्प सादर करणे बंधनकारक असेल. याकडे प्रशासनाचे गांभीर्यपुर्वक लक्ष वेधण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका प्रशासनाने स्थायी समितीस रु. ७२७ कोटी ५९ लक्ष कोटीचा अर्थसंकल्प सादर केला होता, त्यात स्थायी समितीने उत्पन्नात रु. ३६ कोटी ४५ लक्ष वाढ सुचविले आहे व रु. २८ कोटी ३५ लक्षच्या तरतुदी सुचविल्या आहेत. तसेच अंदाजपत्रकात राखीव तरतुदी होणारी वाढीबाबत प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

शेवटी एकच की,

मै सुरज हुं चमक छोड जाऊंगा,
मै डुब भी गया, तो चमक छोड जाऊंगा

म.युवराज पाटील — सभापती महोदय आपण आज अत्यंत चांगला अर्थसंकल्प सादर केलेला आहे पण या ठिकाणी मी उत्पन्न वाढीच्या दृष्टीने पाच कंदील भागात आपल्या महानगरपालिका मालकीचे चार मोठे शॉपिंग कॉम्प्लेक्स आहे त्यांची अवस्था सध्या फार खराब झालेली आहे त्यांचे नुतनीकरण केल्यास मनपाच्या उत्पन्नात भर पडू शकते.

म. अमोल मासुळे — सभापती महोदय धुळे शहरासाठी आपण एक आदर्श अर्थसंकल्प आज मांडलेला आहे. त्याबद्दल धुळेकर नागरिकांच्या व सर्व सदस्यांच्या वतीने मी आपले आभार व्यक्त करतो धन्यवाद देतो धुळेकर नागरिकांचे आपण प्रतिनिधीत्व करीत आहोत आपण त्यांचे देणे लागतो त्यामुळे त्यांच्या हितासाठी सभापती या नात्याने आपण महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत विद्यार्थी महिला व सर्व स्तरातील नागरिकांचे सक्षमीकरण व गुणवत्तेला चालना देण्यासाठी आपण या

अर्थसंकल्पात उपायोजना सुचवलेले आहेत शहरातील विविध विकास कामांना यामुळे गती मिळणार आहे त्यामुळे प्रथम मी आपले धन्यवाद व्यक्त करतो.

तसेच ज्या प्रमाणे घर अथवा कामाच्या ठिकाणी सुरक्षेसाठी सीसीटीव्ही ची आवश्यकता आहे त्याचप्रमाणे सार्वजनिक जागेवर अथवा विविध ठिकाणी चोरीचे प्रकार वाढल्याने सीसीटीव्ही ची आवश्यकता आहे धुळे शहर हे संमिश्र लोकसंख्या असणारे शहर असून काही भागा अत्यंत संवेदनशील आहे कोणत्याही जागेवर निगराणी ठेवण्यासाठी सीसीटीव्ही आवश्यक आहेत धुळे शहराने यापूर्वी दंगलीचा अनुभव घेतला आहे तसेच सुरक्षित रहदारीसाठी नियंत्रण राखणे आवश्यक आहे सीसीटीव्ही एक प्रकारे सुरक्षा ठेवणे कामी अत्यंत आवश्यक असणारी बाब आहे गुन्हेगारांवर वचक राहावा व शहराची सार्वजनिक शांतता धोक्यात येऊ नये व सर्व प्रकारच्या सुरक्षेसाठी शहरातील विविध भागात व मुख्य चौकांमध्ये सीसीटीव्ही बसविणे आवश्यक आहे त्यासाठी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी .

तसेच धुळे शहरात विविध भागात महानगरपालिकेची कुठल्याही प्रकारची परवानगी न घेता परस्पर मोबाईल टॉवरची उभारणी करून मनपाचा कर बुडवितात मनपा गाळे हस्तांतरणाचा फी बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे त्यापासून मनपाला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न प्राप्त होऊ शकते.

तसेच धुळे शहरात सद्यस्थितीत आपल्या रेकॉर्डवर 70—75 हजार मालमत्ता आहेत परंतु शास्त्रशुध्द पध्दतीने मालमत्तांची आकारणी केल्यास नवीन मालमत्ता रेकॉर्डवर येवू शकतात त्यांची आकारणी करावी.

तसेच नगररचना विभागामार्फत बांधकाम आराखडे मंजुरीसाठी कालावधी लागतो त्यामुळे अनेक विना परवानगी बांधकामे होत आहेत. बांधकाम परवानगी देणेसाठी सुसत्रता ठेवली व याबाबत गतीने कार्यवाही केली तर मोठया प्रमाणावर विकास शुल्काच्या माध्यमातून महानगरपालिकेला मोठया प्रमाणावर महसूल मिळू शकतो.

शहरातील मनपा मालकीच्या शाळाच्या ठिकाणी बी.ओ.टी. तत्वावर व्यापारी संकुल उभारणेबाबत प्रस्ताव कार्यान्वीत आहें याबाबत जलद गतीने कार्यवाही करुन अंमलबजावणी केल्यास मनपाच्या उत्पन्नात मोठया प्रमाणावर वाढ होऊ शकते.

मा.सभापती — सन्माननीय सदस्य श्री बंटी मासुळे यांनी अतिशय चांगल्या सूचना सादर केलेले आहेत सर्व विभाग प्रमुख यांनी याबाबत नोंद घ्यावी व त्याप्रमाणे अंमलबजावणी कार्यवाही करावयाची आहे.

म.भारतीताई माळी — आज सर्वांगीण व परिपूर्ण असे अर्थसंकल्प सभापती महोदयांनी सादर केलेला आहे व त्याची सुंदर मांडणी केली आहे त्याबद्दल मी त्यांचे प्रथमता अभिनंदन करते. या अंदाज पत्रकात या नवरात्रीच्या काळात शहरातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी ही तरतूद योजना केलेली आहे त्याबद्दल मी संपूर्ण महिलावर्गा तर्फे आपणास धन्यवाद देते अतिशय चांगला निर्णय आपण या ठिकाणी घेतलेला आहे तसेच यापूर्वी मागणी केल्याप्रमाणे धुळे शहरातील व प्रामुख्याने हद्दवाढ गावातील नवीन मालमत्तांना कर आकारणीसाठी माझ्या मागणीनुसार आपण प्रशासनामार्फत कारवाई सुरू केलेली होती मी सदर मागणी आपल्या महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे या दृष्टीने केलेली होती व त्यास सर्वांनी चालना दिलेली असून कार्यवाही सुरू झालेले आहे त्याबद्दल प्रथमता प्रशासनाचे व सभापती महोदय त्यांचे आभार व्यक्त करते कारण आपण तरतुदी सुचवतो उत्पन्न वाढीच्या बाबीही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे मी संपूर्ण या अंदाजपत्रकातील तरतुदी व योजनांना माझ्या संपूर्ण महिला वर्गाकडून शुभेच्छा देते धन्यवाद.

म.कमलेश देवरे — माननीय सभापती महोदय शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सुचवलेल्या तरतुदी व योजना या अत्यंत परिणामकारक व महत्त्वपूर्ण आहेत परंतु आपण सुचवलेल्या उत्पन्न वाढीच्या तरतुदींबाबत प्रशासनानेही त्याप्रमाणे कार्यवाही करून अंमलबजावणी करणे आवश्यक आहे व त्याची अंमलबजावणी प्रशासनामार्फत करण्यात यावे अशी अपेक्षा मी याठिकाणी व्यक्त करतो कारण उत्पन्नाचे स्तोत्र वाढले तरच आपण या शहराचा विकास करू शकतो यापूर्वी मनपा मालकीच्या जागाबाबत मी यापूर्वीही स्थायी समिती सभेत प्रश्न उपस्थित केला होता आपल्या मालकीच्या जागा किती त्या नावावर आहेत का त्या पासून किती उत्पन्न प्राप्त होते याची माहिती अद्याप पावेतो मिळाली नाही परंतु ती लवकरात लवकर देण्यात यावे त्यापासून आपल्याला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळणार आहे तसेच शहरातील आग्रा रोड भागात व गल्ली नंबर १ ते ६ या भागात संपूर्ण निवासी जागांवर व्यापारी बांधकामे व वापर सुरु आहे व त्यांना आजही घरगुती व जुन्या पद्धतीप्रमाणे मालमत्ता कर आकारणी होत आहे सदर जागांचे व मालमत्तांचे सर्वेक्षण केल्यास यातून महानगरपालिकेला कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळू शकतो. तसेच त्या भागात अनेक वाढीव व नियमबाह्य बांधकाम हेदेखील झालेली आहेत त्यांना दंड आकारणी करून नियमाकुल किंवा परवानगी दिल्यास त्याद्वारे ही आपल्याला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळू शकतो.

मा. सभापती — आपल्या सर्व सूचनांचा विचार केला जाईल व यापूर्वी अंदाजपत्रकात त्याबाबत विचार करून तरतुदी सुचवलेले आहेत. या अंदाजपत्रकाची अंमलबजावणी प्रशासन करते प्रशासनाचे प्रमुख म्हणून आयुक्त साहेब हे कार्यवाही करतात व त्यांच्यामार्फत अंमलबजावणी होते या अर्थसंकल्पाबाबत ते निश्चितच अंमलबजावणी करतील याबाबत शंका नाही आपल्या महानगरपालिकेत कर्मचाऱ्यांची कमतरता आहे अशा परिस्थितीत आपण काम करीत आहोत तरीही यात गती व सुधारणा देण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे याठिकाणी आयुक्तांना या अंदाजपत्रकात बाबत मार्गदर्शन करण्याची विनंती करतो.

मा.आयुक्त सो.:- — सभापती महोदय प्रशासनाने कायदेशीर तरतुदीप्रमाणे अंदाजपत्रक फेब्रुवारी महिन्यात सादर केले होते आणि आपले अंदाजपत्रक मार्च महिन्यात मंजूर व्हावे अशी तरतूद आहे व त्या पद्धतीने आपण कार्यवाही करत होतो पण मार्च महिन्यातच कोरोना च्या आपत्तीमुळे सर्व व कामकाजावर परिणाम झाला व अशा परिस्थितीत स्थायी समितीच्या मान्यतेच्या प्रक्रियेला उशीर झाला आपल्या सर्वांच्या प्रयत्नामुळे शासन जिल्हा प्रशासन तसेच मनपाचे अधिकारी कर्मचारी पदाधिकारी नागरिक यांच्या प्रयत्नातून आपण कोरोना प्रतिबंधासाठी फार मोठे काम केलेले आहे आणि याचाच परिणाम म्हणून सद्यस्थितीत कोरोना नियंत्रणात येत आहे . संपूर्ण राज्याचा आलेख पाहता आज आपण निश्चितच रिकवरी रेट प्रतिबंधात्मक उपाय योजनेमध्ये अग्रेसर आहोत परंतु अजूनही दक्षता घेणे तितकेच महत्त्वाचे आहे व सर्वांनी याबाबत नियमांचे पालन करावे व दक्षता घ्यावी असे मी यानिमित्ताने सुद्धा आव्हान करतो. प्रशासनामार्फत फेब्रुवारी महिन्यात ७२७ कोटीचा अंदाजपत्रक सादर केले होते या वर्षभरात या योजना राबवायच्या आहेत त्याचा उहापोह केलेला होता सभापती महोदयांनी अतिशय चांगल्या पद्धतीने आज अंदाजपत्रक सादर केलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो सभापती महोदयांनी वेळोवेळी खाते प्रमुखांची, सदस्यांची बैठक घेऊन या अंदाजपत्रकाचा अभ्यास केलेला आहे त्यानुसार आपण चांगले बजेट व चांगल्या कल्पना या शहरवासीयांनाही देण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. त्याबद्दल सर्व सन्माननीय सदस्य यांचे मी आभार व्यक्त करतो. अंदाजपत्रक संस्थेसाठी फार महत्त्वाचे असते व त्यानुसार पालन होणे महत्त्वाचे असते त्यासाठी स्थायी समितीची भूमिकाही महत्त्वाची आहे स्थायी समिती ही आर्थिक शिस्त लागावी

म्हणून कार्यरत असते आपले समिती त्या दृष्टीने कार्य करीत आहे याबद्दल कौतुक आहे प्रथमता प्रॉपर्टी टॅक्सचे मूल्यांकन करणे बाबत प्रश्न मांडलेला आहे सर्व मालमत्तांचे मूल्यांकन होणे आवश्यक आहे संपूर्ण आकारणी शास्त्रोक्त पद्धतीने होणे गरजेचे आहे अद्याप शहरात प्रॉपर असेसमेंट व सर्वेक्षण झालेले नाही त्यासाठी आपण एजन्सी नियुक्ती करीत आहोत त्या एजन्सीने विविध ठिकाणी काम केलेले आहे यात आपण शहरातील प्रत्येक प्रॉपर्टीचे आपण मूल्यांकन करून प्रक्रिया पूर्ण करणार आहोत शास्त्रोक्त पद्धतीने असेसमेंट करणार असून त्यामुळे शहराचे व महानगरपालिकेचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे या शहरात घरपट्टी चे दर किंवा टॅक्स वाढवण्याची गरज नाही परंतु शहरातील प्रत्येक मालमत्तेला आकारणी करणे ही महत्त्वाची बाब आहे मनपा जागांच्या बाबतीत कार्यवाही सुरू केलेली आहे जागांची माहिती त्यांचे करारनामे तपासणे याबाबत अंमलबजावणी करीत आहोत यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची ही नियुक्ती केलेली आहे लेआउट मधील ओपन स्पेस ताब्यात घेण्याबाबत प्रयत्न सुरू केले आहेत यासाठी महसूल विभाग जिल्हा भूमी अभिलेख विभाग यांच्याशी संपर्क सुरू असून याबाबत जिल्हाधिकारी साहेब यांनाही पत्रव्यवहार केलेला आहे मनपाच्या काही जागा कराराने दिलेल्याआहेत त्याबाबतही आम्ही माहिती काढत असून त्याची तपासणी सुरू आहे मनपा उत्पन्नवाढीसाठी प्रशासनही सर्व दृष्टीने कार्यरत असून वित्तीय शिस्तीने पालन करून आपण पुढील वाटचाल करण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

मा. सभापती

आपण धुळे शहराच्या विकासासाठी सर्वजण प्रयत्नशील आहोत. व सर्व जण मला सहकार्य करीत आहांत स्थायी समितीचे सर्व सदस्य मा. आयुक्त सो. तसेच अति. आयुक्त श्री. गिरी साहेब, उपायुक्त श्री. शांताराम गोसावी यांचे मला वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन लाभलेले आहे.धुळे महानगरपालिकेतील सर्व खातेप्रमुख व अधिकारी यांनी सुध्दा सहकार्य केलेले आहे.तसेच नगरसचिव मनोज वाघ यांनीही मला या कामात वेळोवेळी सहकार्य केलेले आहे आमच्या कार्यालयातील स्वीय सहायक श्री. पंकज सुर्यवंशी यांनी मला वेळोवेळी मदत केलेली आहे या सर्वांचे मी आभार व धन्यवाद व्यक्त करतो.,

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षांत घेवून तसेच उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ करुन सन 2019-20 चे सुधारीत व सन 2020-21 चे अंदाजपत्रक योग्य त्या फेरबदलासह अंतिम करुन मे. महासभेपुढे सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७३ दिनांक २२/१०/२०२०

धुळे महानगरपालिकेचा प्रस्तावित अर्थसंकल्प नवरात्रीच्या उत्सवांमध्ये सादर करण्याचा सन्मान मला मिळत आहे.आणि अशा या नवरात्री काळामध्ये सादर होणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये महिलांसाठी तरतुद केली जाण आवश्यक आहे. जगत जननी म्हणुन जिचा सन्मान आहे. ज्या देशात आपण राहतो त्या देशात मातृसत्ताक पध्दतीचा इतिहास राहिला आहे. अशा या महिलांसाठी या आर्थिक बजेटमध्ये **छत्रपती शिवाजी महाराज स्वप्नपुर्ती महिला (हिरकणी) आत्मनिर्भर योजना रु. १ कोटीची** तरतुद करण्यात येत आहे.

या माध्यमातुन महिलांच्या सर्वांगीण कौशल्य विकासाचे केंद्र उभारण्याचा संकल्प आहे.महाराष्ट्रात अशा पध्दतीने महिलांना कौशल्य विकासासाठी आणि त्यांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंच्या विक्रीसाठी उभारले जाणारे पहिले केंद्र ठरणार आहे. विशेष म्हणजे सेवाभावी संस्थांच्या माध्यमातुन हे केंद्र चालविले जाईल. त्यात महिलांना प्रशिक्षण देण्यासोबत त्यांच्या आरोग्य व वैयक्तीक आयुष्यात महत्वाचे निर्णय घेत असतांना घ्यावयाची काळजी याबाबतही सजग केले जाईल.

हे महिला उद्योजकता केंद्र अथवा महिला मॉल, धुळे महानगरपालिकेच्य माध्यमातुन उभारले जाईल.यासाठी लागणाऱ्या पायाभुत सुविधा व प्रशिक्षणसाठीचा खर्च महानगरपालिका तरतुद केलेल्या निधीतुन अदा करेल. धुळे शहरातील तीन लाख माता भगिनींच्या कौशल्यांना विकसीत करुन, त्यांना छोटे छोटे रोजगार सुरु करण्यासाठी मार्गदर्शन करणे, त्यांना तंत्रशुध्द पध्दतीने प्रशिक्षीत करण्यासाठी या बजेटच्या माध्यमातुन काम केले जाईल.

धुळे महानगरपालिकेचा हा बजेट महिला शक्तीला अजून बळकटी देणारा ठरेल. या बजेटमध्ये महिलांसाठी चार वेगवेगळया टप्प्यांमध्ये काम केले जाणार आहे. पहिला टप्पा प्रशिक्षणाचा असेल त्यानंतर संबंधीत प्रशिक्षीत तरुणीला अथवा महिलेला रोजगार उपलब्ध करुन देण्याचा असेल, तिसरा महत्वाचा टप्पा म्हणजे त्या रोजगारासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ उभारुन देण्यासाठी मदत करण्याचा असेल, चौथ्या टप्प्यात या केंद्रात येणाऱ्या तरुणींना मासिक पाळी, जोडीदार कसा निवडावा, सुरक्षेची काळजी कशी घ्यावी, स्त्री पुरुष समानता, समंजस सहजीवन, सुजाण पालकत्व, कुटुंबाचे आरोग्य सोशल मिडीयाचा रचनात्मक वापर, उत्तम संवाद याबाबत मार्गदर्शन दिले जाईल. विशेष म्हणजे या योजनेच्या माध्यमातुन महिलांनी उत्पादीत केलेल्या वस्तुना बाजारपेठ मिळवुन दिली जाईल.

शहरातील एक हजार बचत गटाच्या महिलांना या कार्यक्रमामध्ये जोडले जाईल. त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तु, केंद्रात प्रशिक्षीत महिलांनी तयार केलेल्या वस्तुंची एकत्र बाजारपेठ महानगरपालिकेच्या माध्यमातुन सुरु केली जाईल. महाराष्ट्रामध्ये महिलांसाठी स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध करुन देणारी पहिली महानगरपालिका ही धुळे महानगरपालिका ठरेल. शास्त्रशुध्द पध्दतीने आणि काळाची पावले ओळखुनत आपल्याला नियोजन करणे गरजेचे आहे. यामध्ये तरुणींना आणि महिलांना प्रामुख्याने फॅशन डिझाईनिंग, ब्युटी पार्लर, मोबाईल रिपेअरींग, वृध्दांची काळजी कशी घ्यायची, सॅनेटरी पॅड तयार करणे, ज्वेलरी मेकिंग, शिवणकाम, विणकाम, इव्हेंट मॅनेजमेंट, केटरींग इ. यात थिअरी आणि प्रॅक्टिकलचा समावेश असेल. अशा विविध व्यवसायाची कौशल्य शिकवली जातील.

यामध्ये २० पेक्षा अधिक व्यावसायीक अभ्यासक्रमांचा समावेश करण्याचा प्रयत्न राहील. विशेष म्हणजे फक्त आणि फक्त महिला आणि तरुणींसाठी हे महिला उद्योजकता केंद्राचे नियोजन करण्यात आले आहे. पाच वर्षासाठी कार्य कालबध्द हा कार्यक्रम राहील. यामध्ये पाच वर्षानंतर परिणाम दिसुन आले तर हा कार्यक्रम पुढे नेला जाईल. महानगरपालिकेच्या या महिला उद्योजकता केंद्रामुळे महाराष्ट्र राज्यात धुळे शहराचा नावलौकिक होईल. विशेष म्हणजे हे प्रशिक्षण केंद्र महानगरपालिका सामाजिक संस्थांच्या मदतीने उभारेल. तरतुद रु. १ कोटी

१)क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सुकन्या योजना :- रु. १५ लक्ष

धुळे मनपामार्फत सुकन्या योजना राबविली जाणार आहे. त्याअंतर्गत मुलीच्या अर्थात स्त्री जन्माचे स्वागत करण्यासाठी रु. ३०००/- ची मदत देण्यात येणार आहे. मुलीच्या जन्माबाबत समाजात सकारात्मक विचार रुजविण्यास त्यामुळे मदत होईल. खरे म्हणजे मुलगी / स्त्री ही पुरुषांपेक्षा कोठेही कमी नसते. किंबहुना काही कामात तर मुलांपेक्षा मुली आघाडीवर आहेत. १० वी १२ वी चे निकाल दरवर्षी जाहीर होतात तेव्हा ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते. देशाच्या विकासात पुढच्या काळात मुलींचा म्हणजेच महिलांचा मोठा वाटा असणार आहे. म्हणुनच सरकारने बेटी बचाव / बेटी पढाव अशी मोहिम सुरु केलेली आहे. धुळे मनपाच्या दवाखान्यात जन्मास येणाऱ्या कन्येच्या आईवडीलांना ही मदत देण्यात येईल व त्यांच्याकडुन तसा अर्ज

भरुन घेतला जाईल. या योजनेसाठी धुळे मनपाच्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात रु. १५ लक्षची तरतुद करण्यात येत आहे.

२) गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिष्यवृत्ती योजना :- १० वी व इ. १२ वी ९० टक्के पेक्षा जास्त मार्कस मिळविणारे विद्यार्थ्यांसाठी :- (रु. १० लक्ष)

३)सावरकर पुतळा स्थलांतर :- रु. ५० लक्ष

४)दाता सरकार चौक सुशोभिकरण :- रु. १५ लक्ष

५)मनपा इंग्रजी शाळा शिक्षक मानधन व इतर शालेय सुविधा :- रु. २५ लक्ष

६)सांस्कृतिक कार्यक्रम :- रु. २५ लक्ष

७)अभ्यासिका :- रु. २५ लक्ष

८)मनपा कर्मचारी गणवेश :- रु. १० लक्ष

९)ग्रुप इन्शुरन्स कर्मचाऱ्यांसाठी :- रु. १० लक्ष

१०)मनपा हद्दीतील नागरीक विमा :- रु. २५ लक्ष

११)महापुरुषांचे पुतळे सुशोभिकरण यात राजर्षी शाहु महाराज पुतळा उभारणे ,देवपूर साईबाबानगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, देवपूर येथील संत रोहिदास महाराज पुतळा कामासाठी तसेच शहरातील असलेले महापुरुषांचे पुतळे परिसर नुतनीकरण व दुरुस्ती इत्यादीसाठी तरतूद :- रु. ६० लक्ष

१२)नगरसेवक निधी प्रत्येकी रु. २० लक्ष :- रु. १६ कोटी

१३)शहरातील विविध भागात प्रवेशव्दार करणे यामध्ये आदिशक्ती एकविरा माता मंदिर, फाशीपुल लेनीन चौक, संतोषीमाता मंदिर व मोगलाई नेहरु पुतळा याठिकाणी स्वागत कमान उभारणे. :- रु. १ कोटी ३० लक्ष

१४) विशेष घटक योजनेअंतर्गत धुळे मनपा हददी्त सामाजिक सभागृह बांधणेसाठी मनपा हिस्सा :- रु. ५० लक्ष

१५)आयुर्वेदिक दवाखाना दुरुस्ती :- रु. १५ लक्ष

१६)धुळे शहरातील सर्वधर्मिय प्रार्थना स्थळांवर ज्येष्ठ नागरीकांच्या सोयीसाठी सिमेंट बाक बसविणे :- रु. २५ लक्ष

१७)जवाहर स्टेडीयम दुरुस्ती :- रु. १५ लक्ष

१४)चितोडरोड अमरधाम येथे विद्युत शववाहिनी करणे :- रु. २० लक्ष

तसेच खालीलप्रमाणे उत्पन्नाच्या बाबी सुचविण्यात येत आहे.

मनपा उत्पन्नाच्या बाबी

अ.क्र.	कामाचे स्वरुप	उत्पन्नात वाढ
१	मनपा गाळे हस्तांतरण फी	रु. ५ कोटी
२	अनधिकृत मोबाईल टॉवर	रु. २ कोटी
३	नविन व वाढीव मालमत्ता (११ कलमी कार्यक्रमानुसार)	रु. १२ कोटी
४	गुंठेवारी पध्दतीनुसार जागा नियमानुकुल करणे	रु. ३ कोटी
५	लेआऊट अंतिम मंजुरी फी	रु. ३ कोटी
६	जाहिरात जागा भाडे	रु. १० लक्ष
७	सर्वपल्ली राधाकृष्ण शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या वर तसेच प्रबोधनकार ठाकरे व्यापारी संकुलाच्यावर नविन गाळे बांधणे व त्याअनुषंगाने मिळणारे उत्पन्न	५ कोटी
८	अवैध नळ कनेक्शन दंड वसुली उत्पन्न	रु. २५ लक्ष

९	शहरात प्रवेश घेणाऱ्या खाजगी बस धारकांकडुन फी आकारणी करणे.	रु. १ कोटी
१०	शहरातील सर्व मटन, मासे तसेच इतर मांस विकणाऱ्या व्यावसायीकांकडुन फी आकारणी करणे	रु.१० लक्ष
११	स.क्र. ७३ अ देवपुर भागात मनपाने व्यापारी संकुल (शॉपिंग मॉल) उभारुन त्यावर आकारणी करुन गाळेभाडे व डिपॉझिट पोटी उत्पन्न	रु. ५कोटी
	एकुण	३६ कोटी ४५ लक्ष

स्थायी समिती सदस्यांनी मागणी केले प्रमाणे प्रस्तावित अंदाजपत्रकात रक्कम रु. ४ कोटी २० लक्ष इतक्या कामांची तरतुद करण्यात येत असुन त्यांनी सुचविलेले कामे या आर्थिक वर्षांत व लगतच्या आर्थिक वर्षात पुर्ण करणे आवश्यक असेल याशिवाय मनपा इतर सन्मा सदस्य यांचे बाबतीत महासभेत त्यांच्या सुचनांना प्राप्त करुन योग्य ती कामांची व आर्थीक तरतुदी करण्यास महासभेची मान्यता घेवुन प्रशासनाने याबाबत ताळमेळ बसवावा.

प्रशासनाने दोनही सभागृहांकडुन सन २०२०-२१ चा अर्थसंकल्प तरतुद अंतिम होतील याच्या अधिन कामांच्या आवश्यकतेप्रमाणे व योग्य त्या सभागृहाची मान्यता होईल या गृहीतावर यापुर्वीच कार्यान्वित केलेल्या योजना कामे इ. साठी अंदाजित रककम रु. १६ कोटी खर्च होणार असल्याचे प्रशासनाने कळविले आहे. वास्तविकत: प्रशासनाने सदरची कामे करण्यापुर्वी दोनही सभागृहांना अवगत करणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही न करता यापुर्वीच त्यांनी दिलेल्या मान्यता विचारात घेवुन प्रशासनाने कळविल्याप्रमाणे सदरची कामे करणे का आवश्यक होते ही महत्वपुर्ण बाब विचारात घेवुन प्रशासनाने सुचविलेल्या कामांच्या तरतुदी हया प्रशासन उत्पन्नाचा १०० टक्के स्त्रोत सन 2020-21 च्या सुधारीत अंदाजपत्रकात निर्माण करेल याच्या अधिन राहुन सदर कामांवरील खर्चाचा समावेश करीत आहे. तसेच प्रशासनाला सुचित करीत आहे की, यापुढे प्रशासनाचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर आपत्ती निवारण व अत्यावश्यक सेवा सुविधे व्यतिरीक्त कुठल्याही प्रकारची कामे, योजना निर्माण करु नये असे केल्याने जे पण दायित्व महानगरपालिकेवर लादले जाईल त्यासाठी त्या त्या वेळेचे कार्यरत सर्व अधिकारी कर्मचारी व त्यास अंतिम मान्यता देणारे प्राधिकारी म्हणुन मा. आयुक्त सो. यांची ती वैयक्तीक जबाबदारी समजण्यात येईल.

मनपा हददीत व मनपा हददीबाहेर असलेल्या मनपा मालकीच्या जंगम व स्थावर मालमत्ता अस्तित्वात आहेत. मात्र वर्षानुवर्षांपासुन प्रशासनाकडुन सदर मालमत्तांचे कोणतेही आर्थिक मुल्यांकन झालेले नाही. यामुळे प्रशासनाकडुन आज अखेरपर्यंत अशा मालमत्तांचे मुल्यांकन लक्षात न घेता नियमबाहय पणे अर्थसंकल्प पारंपारीक पध्दतीने प्रशासन सादर करीत आहे. यामुळे नागरीकांना नाविण्यपुर्ण मुलभुत सुख सुविधा, योजना, कार्यान्वित करण्याची इच्छा असुनही सत्ताधारी पदाधिकारी यांना अर्थसंकल्पात योग्य त्या तरतुदी करता येत नाही. जर मनपाच्या मालकीचया सर्व प्रकारच्या मालमत्तांचे प्रशासनाने आर्थिक मुल्यांकन करुन व त्यांच्याकडुन सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात या मुल्यांकन तरतुदी विचारात घेवुन अर्थसंकल्प सादर केला तर अत्यंत नियोजनबध्द पध्दतीने शहराचा सर्वांगीण विकास होवु शकतो. असे निदर्शनास आले असुन प्रशासनाने यापुढील अर्थसंकल्प पारंपारीक पध्दतीने न करता आपल्या मालकीच्या सर्व प्रकारच्या मालमत्तांचा तात्काळ शोध घ्यावा व त्याचे शासकीय यंत्रणेकडुन तात्काळ आर्थिक मुल्यांकन करण्यात यावे असे आदेशीत करण्यात येत आहे. तसेच यापुढे

सादर होणार अर्थसंकल्प हा शासनाच्या निर्देशाप्रमाणे व अधिनियम लेखा संहिता यात अधोरेखीत केलेल्या नियमांच्या अनुषंगानेच मनपा मालकीच्या सर्व प्रकारच्या मालमत्ता यांचे आर्थिक मुल्यांकन होवुन त्या रक्कमा जमेच्या धरुन अर्थसंकल्प सादर करणे बंधनकारक असेल. याकडे प्रशासनाचे गांभीर्यपुर्वक लक्ष वेधण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका प्रशासनाने स्थायी समितीस रु. ७२७ कोटी ५९ लक्ष कोटीचा अर्थसंकल्प सादर केला होता, त्यात स्थायी समितीने उत्पन्नात रु. ३६ कोटी ४५ लक्ष वाढ सुचविले आहे व रु. २८ कोटी ३५ लक्षच्या तरतुदी सुचविल्या आहेत. तसेच अंदाजपत्रकात राखीव तरतुदी होणारी वाढीबाबत प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

याप्रमाणे उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ घेवून मे. स्थायी समिती मार्फत खालील प्रमाणे तरतुदी तथा उत्पन्नाच्या बाबी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

अ.क्र.	लेखाशिर्षक	मे.आयुक्त सो यांनी केलेल्या तरतूदी	मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी	वाढ	घट
	जमा बाजू				
१	मनपा गाळे हस्तांतरण फी	१,००,००,०००	६,००,००,०००	५,००,००,०००	-
२	अनधिकृत मोबाईल टॉवर	५०,००,०००	२,५०,००,०००	२,००,००,०००	
३	नविन व वाढीव मालमत्ता (११ कलमी कार्यक्रमानुसार)	०	१२,००,००,०००	१२,००,००,०००	
४	गुंठेवारी पध्दतीनुसार जागा नियमानुकुल करणे	०	३,००,००,०००	३,००,००,०००	
५	लेआऊट अंतिम मंजुरी फी	०	३,००,००,०००	३,००,००,०००	
६	जाहिरात जागा भाडे	१,००,००,०००	१,१०,००,०००	१०,००,०००	
७	सर्वपल्ली राधाकृष्ण शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या वर तसेच प्रबोधनकार ठाकरे व्यापारी संकुलाच्यावर नविन गाळे बांधणे व त्याअनुषंगाने मिळणारे उत्पन्न	०	५,००,००,०००	५,००,००,०००	
८	अवैध नळ कनेक्शन दंड वसुली उत्पन्न	०	२५,००,०००	२५,००,०००	
९	शहरात प्रवेश घेणाऱ्या खाजगी बस धारकांकडुन फी आकारणी करणे.	०	१,००,००,०००	१,००,००,०००	
१०	शहरातील सर्व मटन, मासे तसेच इतर मांस विकणाऱ्या व्यावसायीकांकडुन फी आकारणी करणे	०	१०,००,०००	१०,००,०००	
११	स.क्र. ७३ अ देवपुर भागात मनपाने व्यापारी संकुल (शॉपिंग मॉल) उभारुन	०	५,००,००,०००	५,००,००,०००	

	त्यावर आकारणी करुन गाळेभाडे व डिपॉझिट पोटी उत्पन्न				
	एकुण	२,५०,००,०००	३८,९५,००,०००	३६,४५,००,०००	

अ.क्र.	लेखाशिर्षक	मे.आयुक्त सो यांनी केलेल्या तरतूदी	मे. स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी	वाढ	घट
	खर्च बाजू				
१	छत्रपती शिवाजी महाराज स्वप्नपुर्ती महिला (हिरकणी) आत्मनिर्भर योजना	०	१,००,००,०००	१,००,००,०००	
२	क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सुकन्या योजना	०	१५,००,०००	१५,००,०००	
३	डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिष्यवृत्ती योजना	०	१०,००,०००	१०,००,०००	
४	सावरकर पुतळा स्थलांतर	०	५०,००,०००	५०,००,०००	
५	दाता सरकार चौक सुशोभिकरण	०	१५,००,०००	१५,००,०००	
६	मनपा इंग्रजी शाळा शिक्षक मानधन व इतर शालेय सुविधा	०	२५,००,०००	२५,००,०००	
७	सांस्कृतिक कार्यक्रम	०	२५,००,०००	२५,००,०००	
८	अभ्यासिका	०	२५,००,०००	२५,००,०००	
९	मनपा कर्मचारी गणवेश	०	१०,००,०००	१०,००,०००	
१०	ग्रुप इन्शुरन्स कर्मचाऱ्यांसाठी	०	१०,००,०००	१०,००,०००	
११	मनपा हद्दीतील नागरीक विमा	०	२५,००,०००	२५,००,०००	
१२	महापुरुषांचे पुतळे सुशोभिकरण १.राजर्षी शाहु महाराज पुतळा उभारणे २.देवपूर साईबाबानगर नकाणेरोड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सुशोभिकरण करणे. ३. देवपूर संत रोहिदास महाराज पुतळा उभारणे. ४.शहरातील महापुरुषांचे पुतळे नुतनीकरण व दुरुस्ती	०	१) ३०,००,००० २) १०,००,००० ३) १०,००,००० ४) १०,००,०००	६०,००,०००	
१३	नगरसेवक निधी प्रत्येकी रु.२० लक्ष	०	१६,००,००,०००	१६,००,००,०००	
१४	शहरातील विविध भागात प्रवेशव्दार उभारणे. १.एकविरा देवीमंदिर येथे स्वागत कमान २)संतोषीमाता मंदिर येथे स्वागत	०	१) ४०,००,००० २) ३०,००,०००	१,३०,००,०००	

	कमान ३) फाशीपुल लेनिन चौक येथे स्वागत कमान. ४) मोगलाई नेहरु पुतळा येथे स्वागत कमान		३) ३०,००,००० ४) ३०,००,०००		
१५	गणेश उद्यन(महसूल कॉलनी) समोरील रस्ता कॉक्रीट करणे	०	५०,००,०००	५०,००,०००	
१६	क्रांतीनगर भागात अंतर्गत बंदिस्थ गटार करणे	०	५०,००,०००	५०,००,०००	
१७	विशेष घटक योजनेअंतर्गत धुळे मनपा हददीत सामाजिक सभागृह बांधणे	०	५०,००,०००	५०,००,०००	
१८	आयुर्वेदिक दवाखाना दुरुस्ती	२०,००,०००	३५,००,०००	१५,००,०००	
१९	धुळे शहरातील सर्व धर्मिय धार्मिक स्थळांवर ज्येष्ठ नागरीकांच्या सोयीसाठी सिमेंट बाक बसविणे	०	२५,००,०००	२५,००,०००	
२०	जवाहर स्टेडीयम दुरुस्ती	१०,००,०००	१५,००,०००	५,००,०००	
२१	चितोडरोड अमरधाम येथे विद्युत शववाहिनी करणे	०	२०,००,०००	२०,००,०००	
		३०,००,०००	२३,४५,००,०००	२३,१५,००,०००	

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षांत घेवून तसेच उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ करुन सन २०१९- २०२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक योग्य त्या फेरबदलासह अंतिम करुन मे. महासभेपुढे सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे
नगरसचिव कार्यालय
स्थायी समिती सभा क्रमांक ६ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक २८/०५/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक २८/०५/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता **मा. श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती,** स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
४	श्री.सोनार सुनिल वसंतराव	सदस्य
५	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य
६	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
७	श्रीमती.उदासी कशीश गुलशन	सदस्या
८	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
९	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
१०	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
११	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
१२	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
१३	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
१४	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१५	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या
१६	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. अजिज शेख	आयुक्त
२	श्री. गणेश गिरी	अतिरिक्त आयुक्त

३	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
४	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
५	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
६	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखापरीक्षक
७	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
८	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
९	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी
१०	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
११	डॉ. श्री महेश मोरे	आरोग्याधिकारी
१२	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१३	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
१४	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१५	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१६	श्री. सी.सी. बागुल	ओव्हरसिअर पा.पु.
१७	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बां.वि.
१८	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
१९	श्री. संजय गूजर	औषध भांडार
२०	श्री.विशाल निंबाळकर	अभिलेखापाल
२१	श्री. सुक्राम आत्या राऊत	मोटार वाहन विभाग

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. सभापती — आज संपूर्ण विश्वात कोरोना विषाणु प्रादुर्भावाने अनेक नागरीक मृत्यूमुखी पडलेले आहेत..या विश्व महामारीत मृत्यूमुखी पडलेल्या नागरीकांना तसेच धुळे शहरात कोरानामुळे मृत पावलेल्या नागरीकांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन धारण करावे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५दिनांक २८/०५/२०२०

सन्मा. सभापती सो. स्थायी समिती मनपा धुळे यांच्या सुचनेनुसार आज संपूर्ण विश्वात कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाने अनेक नागरीक मृत्यूमुखी पडलेले आहेत. या विश्व महामारीत मृत्यूमुखी पडलेल्या नागरीकांना तसेच धुळे शहरात कोरोनामुळे मृत पावलेले आहे. ही सभा त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी असून मृत पावलेल्या नागरीकांना दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करीत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

सभेच्या सुरुवातीस मा. सभापती साहेब यांच्याकडून आलेले अभिनंदनाची सुचना.

धुळे महानगरपालिकेचे आरोग्याधिकारी डॉ.महेश मोरे यांचा आज वाढ दिवस असल्याने त्यांचे मा. सभापती सो. यांचे हस्ते गुलाबपुष्प देऊन अभिनंदन करण्यांत आले.

मा. सभापती कोरोना विषाणुच्या या आपत्तीजनक परिस्थितीत सर्व देश वाटचाल करीत आहे. या परिस्थितीत आपल्या शहरात अनेक प्रतिबंधात्मक उपाय योजना व कार्यवाही धुळे महानगरपालिकेच्या वतीने पूर्वी पासूनच प्रभावीपणे राबविण्यांत आलेली आहे. यामध्ये आपले कर्तव्य दक्ष आयुक्त यांनी लॉकडाऊनच्या आधिपासूनच प्रतिबंधात्मक उपाय योजनांसाठी कार्यवाही केलेली होती. यामध्ये सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच वैद्यकीय स्टॉप नर्सेस स्वचछता कर्मचारी यांनी अतिशय मेहनतीने या सर्व अंमलबजावणीमध्ये परिश्रम घेतलेले आहे. त्यामुळे या सर्वांच्या अभिनंदनाचा ठराव सभागृहात पारीत करण्यांत येत आहे. तसेच कोरोना संसर्गामुळे मृत्यूमुखी झालेल्या मयताच्या अंत्यसंस्कारासाठी असलेल्या जागेबाबत गैरसमजातून वादाचे प्रसंग निर्माण झालेले होते. अंत्यसंस्कारासाठी जागेबाबत नागरीकांचा विरोध व वाद निर्माण झाल्यामुळे प्रशासनाला अडचणी निर्माण झालेल्या होत्या. अशा परिस्थितीत आपल्या धुळे महानगरपालिकेच्या नगरेसविका सौ. सारिका प्रवीण अग्रवाल यांचे पती श्री. प्रवीण अग्रवाल यांनी त्यांची स्वत:च्या मालकीची जागा अंत्यविधीसाठी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यांत येत आहे. तसेच कोरोना विषाणुमुळे मयत झालेल्या नागरीकाच्या अंत्यविधीसाठी गैरसमाजामुळे नातेवाईक मृत देह ताब्यात घेत नसल्याने अशा प्रसंगी शहरातील सामाजीक बाधिलकी असणा-या मुस्लीम समाजातील युवकांनी जातीभेद विसरुन अंत्यविधीसाठी सहकार्य केले हा समाजसेवेचा आदर्श त्यांनी धुळे शहरात निर्माण केला त्याबद्दल त्यांचेही अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे. तसेच या आपतकालीन परिस्थितीत स्वत:चा जिव धोक्यात घालून नागरीकांपर्यत कोरोना विषयी बातम्या पोहविण्यांचे काम या शहरातील पत्रकार व छायाचित्रकार बांधवानी केले त्यांचाही त्यानिमित्ताने अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६ दिनांक २८/०५/२०२०

कोरोना विषाणुच्या या आपत्तीजनक परिस्थितीत सर्व देश वाटचाल करीत आहे. या परिस्थितीत आपल्या शहरात अनेक प्रतिबंधात्मक उपाय योजना व कार्यवाही धुळे महानगरपालिकेच्या वतीने पूर्वी पासूनच प्रभावीपणे राबविण्यांत आलेली आहे. यामध्ये आपले कर्तव्य दक्ष आयुक्त यांनी लॉकडाऊनच्या आधिपासूनच प्रतिबंधात्मक उपाय योजनांसाठी कार्यवाही केलेली होती. यामध्ये सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच वैद्यकीय स्टॉप नर्सेस स्वचछता कर्मचारी यांनी अतिशय मेहनतीने या सर्व अंमलबजावणीमध्ये परिश्रम घेतलेले आहे. त्यामुळे या सर्वांच्या अभिनंदनाचा ठराव सभागृहात पारीत करण्यांत येत आहे. तसेच कोरोना संसर्गामुळे मृत्यूमुखी झालेल्या मयताच्या अंत्यसंस्कारासाठी असलेल्या जागेबाबत गैरसमजातून वादाचे प्रसंग निर्माण झालेले होते.अंत्यसंस्कारासाठी जागेबाबत नागरीकांचा विरोध व वाद निर्माण झाल्यामुळे प्रशासनाला अडचणी निर्माण झालेल्या होत्या. अशा परिस्थितीत आपल्या धुळे महानगरपालिकेच्या नगरेसविका सौ. सारिका प्रवीण अग्रवाल यांचे पती श्री. प्रवीण अग्रवाल यांनी त्यांची स्वत:च्या मालकीची जागा अंत्यविधीसाठी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यांत येत आहे. तसेच कोरोना विषाणुमुळे मयत झालेल्या नागरीकाच्या अंत्यविधीसाठी गैरसमाजामुळे नातेवाईक मृत देह ताब्यात घेत नसल्याने अशा प्रसंगी शहरातील सामाजीक बाधिलकी असणा-या मुस्लीम समाजातील युवकांनी जातीभेद विसरुन अंत्यविधीसाठी सहकार्य केले हा समाजसेवेचा आदर्श त्यांनी धुळे शहरात निर्माण केला त्याबद्दल त्यांचेही अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.तसेच या आपतकालीन परिस्थितीत स्वत:चा जिव

धोक्यात घालून नागरीकांपर्यंत कोरोना विषयी बातम्या पोहविण्यांचे काम या शहरातील पत्रकार व छायाचित्रकार बांधवानी केले त्यांचाही त्यानिमित्ताने अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-६ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
(दिनांक ३१/१/२०२०, २०/२/२०२०,२७/२/२०२०)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७ दिनांक २८/०५/२०२०

मागील स्थायी समिती सभा दि. ३१/१/२०२० चे स्थायी समिती ठराव नंबर १४९ ते १६३ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दि.२०/२/२०२० चे स्थायी समिती ठराव नंबर १अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दि.२७/२/२०२० चे स्थायी समिती ठराव नंबर २ ते ४अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-७ सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वर्षात कोविड-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामुळे आवश्यक त्या उपाय योजना करण्यासाठी मा.आयुक्त सो.यांच्या मान्यतेने तात्काळ खरेदी करण्यात आलेले औषधी व साहित्य प्रस्ताव मे.स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती या विषयाच्या संदर्भात सदस्यांना काही मत मांडावयाचे असे तर ते मांडावे.

म. अमोल मासुळे याठिकाणी थर्मल स्कॅनर सुरवातीस ८४०० प्रमाणे मागविले असल्याचे दिसून येत असून त्यानंतर २५ टर्मल स्कॅनर खरेदी करण्यांत आले. त्यांची किंमत पहिल्या किंमतीपेक्षा जास्त असल्याचे दिसून येत आहे. वास्तविकता किंमत कमी होणे अपेक्षित होते. तसेच सदर टर्मल स्कॅनर कुठल्या कंपनीचे आहे हे नमूद नाही.

म. आरोग्याधिकारी कोरोना संसर्गाच्या पहिल्या टप्प्यांत आपल्या शहरात रुग्ण नव्हते.तथापि उपाय योजनेचा भाग म्हणून एक थर्मल स्कॅनर खरेदी करण्यांत आले. तदनंतरच्या काळात रुग्ण संख्येत वाढ होत गेल्याने थर्मल स्कॅनरची मागणी जास्त व पुरवठा कमी अशी स्थिती निर्माण झाली ब-याच कंपन्याकडे थर्मल स्कॅनरचा तुटवडा होता. या संदर्भात मा. आयुक्त तसेच मा. महापौर व भाजपा महानगर प्रमुख श्री. अनुप अग्रवाल यांच्या समवेत बैठक झाली असता नाशिक येथील एका कंपनीकडे थर्मल स्कॅनर उपलब्ध असल्याचे समजले. तथापि सदर कंपनी त्याच सकॅनरचा पुरवठा नागपूर येथे करणार होती. परंतु श्री.अनुपभाऊ अग्रवाल यांनी त्यांच्याशी संपर्क करुन विनंती केल्याने त्यातील २५ टर्मल मशिन देण्यांचे मान्य केले. महानगरपालिकेस असणारी आवश्यकता व नागरीकांच्या सर्व्हेक्षणाची गरज लक्षात घेऊन तांतडीने उपलब्ध किंमतीत थर्मल स्कॅनर मशिन मागविण्यांत आलेले आहे.

म. अमोल मासुळे आमच्या प्रभागात दिनांक२३/५/२०२०रोजी शिवसागर कॉलनी भागात रुग्ण् आढळल्याने कंन्टेनमेंट झोन जाहीर करण्यांत आला.त्या भागात संपूर्ण नागरीकांची थर्मल स्कॅनरव्दारे तपासणी करणे आवश्यक होते. मशिन उपलब्ध नसल्याचे संबंधित भागातील नियुक्त पर्यवेक्षक यांनी सांगितले. याबाबत मी उपायुक्त गिरी साहेबांनाही कल्पना दिली होती. थर्मल स्कॅनर मशिन नसल्याने तपासणी झालेली नाही. सदर बाब ही अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. ६-६ दिवस होऊनही तपासणी होत यास जबाबदार कोण. काही ठिकाणी दिलेले थर्मल स्कॅनर मशिन खराब झालेले आहे. याठिकाणी प्रशासन चांगले काम करीत आहे याबद्दल दुमत नाही. परंतु वेळेवर तपासणी होणेही आवश्यक आहे. यासाठी अजून मशिनरी खरेदी करण्यांत यावी.

म. सभापती कोरोना बाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी. आपण सर्वांनी या काळात चांगले काम करीत असतांना अशा प्रकारे तक्रारी येणे हे चूकीचे आहे. विषय गंभीर आहे. याबाबत खुलासा करावा.

म. संतोष खताळ माझ्या प्रभागातही पॉझेटीव्ह रुग्ण आढळला होता. सदर रुग्ण मयत झालेला आहे. त्यांच्या घरी अनेक बाया एकत्र जमल्या होत्या. मी याबाबत मोरे सो. यांना सांगितले परंतु त्यांनी तपासणीसाठी माणूस पाठविला नाही.

म. आरोग्याधिकारी आपल्या प्रभागात कंन्टेनमेंट झोन करण्यांत आलेला असून त्यासाठी शरद नवले कर्मचारी देण्यांत आलेले होते. त्या अगोदर झालेल्या कंन्टेनमेंट झोनसाठी थर्मल स्कॅनर व ऑक्सीमिटर देण्यांत आलेले आहे. त्यामुळे सदर साहित्य मर्यादित असल्यामुळे साहित्यांचा तुटवडा होता. जे कंन्टेनमेंट क्षेत्र कमी झाले त्यांचेकडील साहित्य मागवून संबंधितांना देण्यांत येणार होते. परंतु नवीन आता २० थर्मल मिटरची ऑर्डर देण्यांत आलेली आहे.सन्मा.सदस्यांची पूर्ण प्रभागात तपासणी करण्यांत यावी अशी मागणी होती.

म. अमोल मासुळे कंन्टेनमेंट झोनसाठी नियुक्त कर्मचा-यांना प्रशिक्षण दिले आहे का? त्यांना सदर साहित्य हाताळता येत नाही किंवा त्यांना खराब साहित्य दिले असावे. याबाबत माझ्याकडेस पुरावा असून व्हिडिओ रेकॉर्डींग उपलब्ध आहे आपण त्यांची पहाणी करावी.

म. आयुक्त कोरोना ससंर्गाचा ज्या वेळेला चीन मध्ये प्रादुर्भाव झाला त्यावेळेपासून महानगरपालिकेने याबाबत दखल घेतली. व त्यावेळेपासून आपण यासाठी प्रयत्न करीत होतो. कोरोना भारतात पसरला तर फार मोठा धोका होऊ शकतो. आपले धुळे शहराची रचना ही त्या दृष्टीने हॉटस्पॉट होती. एका बाजूला मालेगांव, सेंधवा,जळगांव या सारख्या शहरामध्ये संसर्गाचा फैलाव मोठया प्रमाणावर होता. परंतु आपण सगळयांच्या माध्यमातून यात पदाधिकारी, नगरसेवक, पत्रकार, सामाजिक संस्था, अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रयत्नातून आपण उपाय योजनांच्या कार्यवाहीला लवकर सुरुवात केली. त्यामुळे आपण मर्यादेत आहोत. यासाठी आपण सातत्याने प्रयत्न केलेले आहेत. ज्या वेळेस थर्मल स्कॅनरची मागणी नव्हती त्यावेळेस आपण थर्मलस्कॅनर मशिन घेतलेले आहे. नंतर रुग्ण संख्या वाढल्याने थर्मल स्कॅनरचा तुटवडा झाला. त्यावेळेस मा. अनुपभैय्यांच्या माध्यमातून नाशिक येथून २५ थर्मल स्कॅनर विनंती करुन गरज असल्याने तांतडीने मागविण्यांत आले. ही सर्व कार्यवाही आपल्या विश्वासाच्या पाठबळावर केलेली आहे. आपण लॉकडाऊनच्या काळात बैठका घेवू शकत नव्हतो. आपला उद्देश चांगला होता संपूर्ण यंत्रणा यामध्ये एकदिलाने कार्यवाही करीत आहे.. एखाद्या मशिनमध्ये बिघाड होऊ शकतो. त्यामुळे चुकीचा संदेश जाणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. ज्या वेळेस ऑक्सीमिटरची गरज असल्याचे निदर्शनास आले त्यावेळेस आपण शासनाच्या सुचनेनुसार ऑक्सीमिटरची प्राधान्याने खरेदी केली. आपण कोणताही वेळ वाया घालवलेला नाही. सुरुवातीचे दिवसात शहरात रासायनिक फवारणी आवश्यक होती. त्यावेळेस नाशिक येथून स्प्रेमशिन तांतडीने मागविण्यांत

आले. आपण खर्चात जेवढी कपात करता येईल तेवढी करण्यांचा प्रयत्न केलेला आहे. मी आपल्याशी संवाद करीत असून संवादातूनच मार्ग निघतात. आपल्याकडे केसेस वाढू नये यासाठी प्रयत्न आहे. थर्मल तपासणीसाठी आपल्याकडेस कर्मचा-यांची व मनुष्यबळाची कमतरता असल्याने जिल्हाधिकारी महोदयांना विनंती करुन अतिरिक्त कर्मचारी वर्ग मागविण्यांत आला.

कंन्टेनमेंट झोन घोषित झाल्यानंतर वैद्यकीय तपासणी तांतडीने होणे गरजेचे आहे. अधिका-यांनी याबाबत दखल घेवून तांतडीने उपाय योजना करणे गरजेचे आहे. पुढच्या कालावधीत कंन्टेनमेंट जाहीर झाल्यानंतर तांतडीने तपासणी करावी. मी अधिका-यांना याबाबत आदेशित करीत आहे. पाणीपुरवठा व आरोग्य या कार्यवाहीत प्रशासनाकडून कोणताही प्रकारचा अडथळा व दिरंगाई नाही. आपण सर्वांनी कोरोना मध्ये प्रभावीपणे काम करण्यांचा निश्चित प्रयत्न केलेला आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनीही मनपा प्रशासनाचे अभिनंदन केलेले आहे.

म. सभापती — मा. आयुक्त यांनी व सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी कोरोना पार्श्वभूमीच्या कालावधीत केलेले काम हे खरोखरच अभिनंदनीय आहे.पुढील कार्यवाही बाबत अधिका-यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८ दिनांक २८/०५/२०२०

सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वर्षात कोविड-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामुळे पसरलेली रोगराई नियंत्रीत करणेसाठी उपाययोजना करण्यासाठी आजपर्यंतचे खरेदी करण्यातआलेले मा.आयुक्त सो. यांचे मंजुरीचे खालीलप्रमाणे विषय संबधीतास कार्यादेश देण्यात आले आहे.

१) सन २०१९-२० चे सर्जिकल व साहित्य खरेदी शिल्लक तरतुदीनुसार.

अ.क्रं	कार्यादेश क्रं व दिनांक	पुरवठादाराचे नाव	साहित्य.	रक्कम.
१	धुमपा/औ.भांडार/१६०/दि.१९/०३/२०	मे. लक्ष्मी डेंटल डेपो. धुळे	Thermal Scanner-01	८,४००/-
२	धुमपा/औ.भांडार/१६८/दि.२६/०३/२०	मे. अग्रवाल एजन्सी, दोंडाईचा	Hand Sanitizer-500	१,५०,०००/-
३	धुमपा/औ.भांडार/०३/दि.०९/०४/२०	मे. अग्रवाल एजन्सी, दोंडाईचा	Hand Sanitizer-1000	२,४०,०००/-
४	धुमपा/औ.भांडार/०४/दि.११/०४/२०	मे. दि लाईफ लाईन धुळे	O2JumboCylinder-07	२,७४४/-
५	धुमपा/औ.भांडार/०५/दि.११/०४/२०	मे. श्री साई फार्मा, धुळे	O2Flow Meter- 07	१२,९५०/-
६	धुमपा/औ.भांडार/०६/दि.१२/०४/२०	मे. जैमीत फार्मा. नाशिक	Thermal Scanner-25	२,२५,०००/-

२) सन २०२०-२१ चे सर्जिकल व साहित्य खरेदी तरतुदीनुसार.

अ.क्रं	कार्यादेश क्रं व दिनांक	पुरवठादाराचे नाव	साहित्य.	रक्कम.
१	धुमपा/औ.भांडार/०९/दि.१५/०४/२०	मे. श्री साई फार्मा, धुळे	Pulse Oxymeter-10	२०,७५०/-
२	धुमपा/औ.भांडार/१०/दि.१५/०४/२०	मे. अग्रवाल एजन्सी, दोंडाईचा	PPE Kit - 50	४०,०००/-
३	धुमपा/औ.भांडार/१५/दि.१८/०४/२०	मे. श्री साई फार्मा, धुळे	Face Shield -200 Disposable Cap-1000	३८,९००/-
४	धुमपा/औ.भांडार/२२/दि.२३/०४/२०	मे. श्री साई फार्मा, धुळे	Face Shield -500	३,७५,५००/-

			PPE Kit - 200 Dispo. Gloves-2500 N95 Face Mask- 500	
५	धुमपा/औ.भांडार/३५/दि.०४/०५/२०	मे. श्री साई फार्मा, धुळे	Pulse Oxymeter-20	४१,५००/-
६	धुमपा/औ.भांडार/३९/दि.०७/०५/२०	मे. सिनीक इंडिया कार्पो, धुळे	Face Shield -500 PPE Kit - 100	७६,१२५/-
७	धुमपा/औ.भांडार/४०/दि.०७/०५/२०	मे. अग्रवाल एजन्सी, दोंडाईचा	Sod.HypoChlorite2000	१,६०,०००/-
८	धुमपा/औ.भांडार/४१/दि.०७/०५/२०	मे. श्री साई फार्मा, धुळे	3LayerFaceMask-500 Disposable Cap-500 Hand Sanitizer- 200 Thermal Scanner-25 Digital B. P. Apa-15	१,८८,५२५/-

२)सन २०१९-२० चे नागरी हिवताप विभाग धुळे मनपा लार्व्हिसाईड खरेदी शिल्लक तरतुदीनुसार.

अ.क्रं	कार्यादेश क्रं व दिनांक	पुरवठादाराचे नाव	साहित्य.	रक्कम.
१	धुमपा/औ.भांडार/१६८/दि.२६/०३/२०	मे. अग्रवाल एजन्सी, दोंडाईचा	Sod.HypoChlorite2000	३,३६,०००/-
२	धुमपा/औ.भांडार/०३/दि.०९/०४/२०	मे. अग्रवाल एजन्सी, दोंडाईचा	Sod.HypoChlorite2000	३,३६,०००/-

३)सन २०१९-२० चे औषध खरेदी शिल्लक तरतुदीनुसार.

अ.क्रं	कार्यादेश क्रं व दिनांक	पुरवठादाराचे नाव	साहित्य.	रक्कम.
१	शासन निर्णय 3.2.2 नुसार Tab. Hydroxy Chloroquine खरेदी.	मे. युनिक डिस्ट्रीब्युटर, धुळे दिनांक २८/०३/२०२०	Tab.HydroxyChoroquin-300Mg- 300 Tab.	३,२७२/-

- कोविड-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामुळे पसरलेली रोगराई नियंत्रीत करण्यासाठी वरील प्रमाणे आजपर्यंत झालेला खर्च मनपा निधीमधुन दर्शविण्यात आलेला आहे.
- मा. जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण धुळे कडून प्राप्त होणारे शासन अनुदातुन शासन निर्णयाप्रमाने वरील नमुद खर्च शासन अनुदानाचे लेखाशिर्षामध्ये दर्शविण्यात येईल.

सदर माहिती मे. स्थायी समिती मध्ये अवलोकणार्थ सादर करण्यांत आली आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-८ तापी पाणीपुरवठा मूख्य वाहिनी वरील लिकेजेस दुरुस्तीचे कामे तांतडीने दोन दिवस पाणी पुरवठा बंदच्या कालावधीत करण्यांत करुन घेण्यांतआलेत, त्यासाठी झालेला खर्च रु.२,११,५६८/- मात्रला महाराष्ट्रमहानगरपालिकाअधिनियमचे प्रकरण५(२)(२)नुसारकार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. अमोल मासुळे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च बिल रु.२,११,५६८ मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ (२) नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९ दिनांक २८/०५/२०२०

दि.२०/०३/२०२० व दि.२१/०३/२०२० रोजी युआय एस एस एम टी (केंद्र शासनाकडील मंजूर) धुळे शहर पाणी पुरवठा योजने च्या एम.बि.आर जलकुंभाचे जोडणी करिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मागणीनुसार दोन दिवस तापी पाणी पुरवठा बंद ठेव्नेत आला होता.तापी पाणी पुरवठा बंद च्या नियोजित दोन दिवस कालावधीत विविध दुरुस्ती कामे क्षेत्र निहाय करणे बाबत आदेशित करणेत आले होते.यानुसार दि.२०/०३/२०२० व दि.२१/०३/२०२० तापी पाणी पुरवठा मुख्य वाहिनी सुखवद ते एम. बी. आर. पर्यंत चे लिकेजेस दुरुस्तीचे कामे करणेत आली आहेत.

तसेच दि.२२/०३/२०२० व दि.२३/०३/२०२० रोजी या वाहिनीवरील व्हाल दुरुस्ती तसेच वारंवार लिकेज होणारे मन होल १ दिलीप पाटील यांचे शेत २ दभाशी गावाजवळ शेतात मन होल वर नवीन ओव्हरलापिंग प्लेट लावून पूर्ण क्रांक्रीटीग धरणेत आले आहे.सदर कामे आकाश इंटर प्राईजेस,कंत्राटदार यांनी योग्य रित्या पूर्ण केली आहेत.सोबत सर्व कामांचे फोटोग्राफ जोडले आहेत.

उक्तप्रमाणेदि.२२/०३/२०२०,दि.२३/०३/२०२०,दि.२०/०३/२०२०व दि. २१/०३/२०२० रोजी केलेले कामाचे खर्च बिल रु २,११,५६८ /- मात्र आहे.करिता उक्त प्रमाणे कामे निर्धारित वेळेत पूर्ण करणेत आले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च बिल रु.२,११,५६८ मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ (२) नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९ — मनपा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे नवीन पोलसह प-लड लाईटस बसविणेचे काम तांतडीने करुन घेण्यांत आलेत,त्यासाठी झालेला खर्च रुपये २,६१,०५४/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरी देणे बाबत विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे — सदर विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च रुपये २,६१,०५४/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १० दिनांक २८/०५/२०२०

म.श्री.चंद्रकांत सोनार ,महापौर सो,यांनी शिवजयंती निम्मित म.न.पा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथील दि.14/02/2020 रोजी म.अभियंता यांचे समवेत पाहणी केली.या वेळी म.महापौर यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर व समोरील मावले येथील परिसर कायम स्वरूपी प्रकाश व्यवस्थेसह पोल लाईट बसविणे बाबत आदेश केलेत.येथील जुनी लाईट व्यवस्था खराब व फुटलेली असल्याने तसेच पुतळ्यावर चांगली प्रकाश व्यवस्था नसल्याने तातडीने शिवजयंती पूर्वी सदर काम करणेत आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर येथे 6 मीटर G.I पाईप पोल,90 watts flood लाईट व स्वतंत्र फिडर पिलर panal बसविणे आले.या कमी अंदाजपत्रकीय खर्च रु 2,61,054 /- असून सदर काम तातडीचे असल्याने पंडित इलेक्ट्रिकल्स ,धुळे यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च रुपये २,६१,०५४/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-१० बांभळे जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर बेड क्रं.२,४, ६ चे in / out व्हॉल्व दुरुस्ती करणेचे काम तांतडीने करणेत आले असून त्यासाठी झालेला खर्च रु.१,२५,९४२/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ५(२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ विषय मंजुर करण्यांत यावा.

म. अमोल मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदरील खर्च रक्कम रु.१,२५,९४२ /- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ५ (२) (२) कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११ दिनांक २८/०५/२०२०

दि.२०/०३/२०२० व दि.२१/०३/२०२० रोजी युडी आय एस एस एम टी केंद्र शासन पुरस्कर धुळे शहर पाणी पुरवठा योजनेच्या कामापैकी देवपूर एम.बि.आर चे जोडणी कमी तापी पाणी पुरवठा योजनेवरील पाणी पुरवठा बंद ठेवनेत आला.या कालावधीत आवश्यक दुरुस्ती कामे क्षेत्र निहाय करणे बाबत आदेशित करणेत आले होते.यानुसार या दोन दिवस कालावधीत बाभळे जलशुद्धीकरणकेंद्राच्या फिल्टर गलृ ीचे एनलेट व आउट लेट चे sluice valve दुरुस्तीचे कामे करून घेण्यात आलीत.

फिल्टर बेड १,२,४,६ चे व्हाल्व्चे चेक नट ,गेट इत्यादी सह सर्विसिंग चे कामे मे.आकाश इटरप्रायजेस यांनी केली असून चा कामाचे खर्च बिल रु.१,२५,९४२ (१२ % GST सह) आहे. करिता सदरील खर्च रक्कम रु.१,२५,९४२ /- करिता कार्योत्तर मंजुरी होणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ५ (२) (२) नुसार मंजुरी सादर झाले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदरील खर्च रक्कम रु.१,२५,९४२ /- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ५ (२) (२) कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११ धुळे मनपा कडील मालमत्ता कराची थकबाकी खटला राष्ट्रीय लोक अदालत आयोजन खर्चाबाबत कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ विषय मंजुर करण्यांत यावा.

म. अमोल मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदरील खर्च रु.३६५५०/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ५ (२) (२) कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२ दिनांक २८/०५/२०२०

धुळे महानगरपालिका वसुली विभागाकडील लोक अदालत दिनांक १४/१२/२०१९ रोजी आयोजित करणेत आले होते. त्यासाठी खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

अ.क्रं.	साहित्य तपशील	नग	प्रति नग रुपये	विष्णु भिकचंद पांडे (हलवाई विष्णु महाराज)	एकुण खर्च रुपये
१	मंडप १५ X ३०	२ ठिकाणी	-	१६००/-	१६००/-
२	दुपारचे जेवण	२४५	११०/-	२६९५०/-	२६९५०/-
३	रात्रीचे जेवण	१००	७०/-	७०००/-	७०००/-
४	पाणी जार	५०	२०/-	१०००/-	१०००/-
	एकुण खर्च सर्व करासोबत सादर केले.				३६५५०/-

त्यानुसार सदरचे नोंद स्टॉक पा.नं. वर घेण्यांत आलेली आहे. म.मु.ले.अ. सो यांचे कडेस प्रकरण सादर केले असता काम तांतडीचे असल्याने विष्णु भिकचंद पांडे (हलवाई विष्णू महाराज) यांचेकडून काम करुन घेण्यांत आले असून खर्च मान्यतेकरिता शिफारस करणेत आलेली आहे.

त्यानुसार म.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने झालेला खर्च रु.३६५५०/- मात्र कार्योत्तर मंजुरीस स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदरील खर्च रु.३६५५०/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ५ (२) (२) कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x

सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१२ दुसऱ्या टप्प्यातील भूमिगत गटार योजना तयार करणे कामी शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण - 2019/ प्र.क्र.54/नवि-1दि.4/6/2018अन्वये दिलेल्या दराप्रमाणे दि.निसर्ग कन्सल्टंट्न्सी, नाशिक यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे सदर विषयाची पार्श्वभूमी बाबत सभागृहास माहिती द्यावी.

म. सभापती अभियंता यांनी माहिती द्यावी.

म. अभियंता यापूर्वी धुळे शहरासाठी भूमिगत गटार योजनेचेप्रथम टप्प्याचे काम मंजूर झालेले असून त्याप्रमाणे देवपूर भागात प्रत्यक्षात कामास सुरुवात झालेली आहे. शहराच्या उर्वरीत भाग,हद्दवाढ गावासह मोहाडी, पेठ भाग मिलपरिसर मोगलाई इत्यादी भागाचा सर्व्हे करुन त्याप्रमाणे डी.पी. आर. व अहवाल पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडेस सादर करावा लागणार आहे. यासाठी मागे नाशिक येथे मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थितीत बैठक झाली असता त्या बैठकीत डी.पी.आर. तांतडीने सादर करणेबाबत कळविण्यांत आले होते. तथापि कोरोना पार्श्वभूमीवर सदर काम प्रलंबीत होते. याबाबत शासनास डी.पी.आर व अहवाल सादर करावयाचा आहे. पूर्वी याबाबतची व्यवस्थापन सल्लागार शुल्क २ % होते. परंतु शासनाने आता ०.७५% शुल्क निश्चित केलेले आहे. त्यानुसार व्यवस्थापन सल्लागार शासन दराप्रमाणे दि.निसर्ग कन्सल्टंट्न्सी, नाशिक यांना नियुक्त करणेबाबत प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३ दिनांक २८/०५/२०२०

शहराचे हद्दवाढ पूर्वी क्षेत्रफळ 46.46 कि. मी. होते. शहरात यापूर्वी10 %भागात भूमिगत गटार योजना मंजूर होती. शहरात साधारणत: 58 MLD STP ची आवश्यकता होती व पूर्ण शहरासाठी भूमिगत गटारीसाठी 275 कोटी रुपयाचा सविस्तर प्रकल्प अहवाल शासनाकडे यापूर्वी सादर केला होता. यापैकी प्रथम टप्प्यात अमृत योजने अंतर्गत 131.54 कोटी रुपयाची अशा योजनेला मंजुरी दिली आहे.

त्याप्रमाणे प्रथम टप्प्याचे व 58MLD STP ची काम सुरु करण्यात आलेले आहे. उर्वरित शहरातील भागासाठी सुमारे रु.200 कोटी मात्रची आवश्यकता आहे. तसेच धुळे शहराची 5 जानेवारी 2018 रोजी हद्दवाढ झाली असून त्यामध्ये क्षेत्रफळ 101.08 कि.मी झाले असून 11 गावांचा नव्याने समावेश झालेला आहे. हद्दवाढीच्या गावांसाठी भूमिगत गटार योजनासाठी सुमारे रु.150 कोटी मात्र अनुदानाची आवश्यकता आहे.

तरी धुळे शहरासाठी भूमिगत गटार योजनेसाठी एकूण रु.350 कोटी मात्रचे अनुदानाची आवश्यकता आहे.यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल करणेकामी कन्सल्टंटची नेमणूक करणे आवश्यक राहील व त्याप्रमाणे सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

सदरचे काम हे शासनाच्या अमृत अभियाना अंतर्गत प्रस्तावित असून अशा योजनेसाठी शासनाने शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-2019/ प्र.क्र.54/नवि-16 दि. 4/6/2018 अन्वये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूक कामी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

अ.क्र.	कामाचा तपशील	अदा करावयाची टक्केवारी
१	सविस्तर सर्व्हेक्षण करून प्रकल्प अहवाल तयार करून महानगरपालिकेस सादर करून मंजुरी घेणे.	०.५०% प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कमेवर
२	महानगरपालिकेमार्फत मंजुर प्रकल्प अहवालास शासनाचे संबंधित विभागामार्फत तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी घेणे.	०.२५% प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कमेवर

उक्त बाबत यापूर्वी या प्रकल्पासाठी दि.निसर्ग कन्सल्टंटन्सी, नाशिक धुळे महासभा ठराव क्र.7 दि. 2/2/2019 अन्वये नेमणूक झालेली आहे. त्याच दराने दुसऱ्या टप्प्यातील भूमिगत गटार योजना कामी दि.निसर्ग कन्सल्टंटन्सी, नाशिक यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेकामी प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार दुसऱ्या टप्प्यातील भूमिगत गटार योजना कामी दि.निसर्ग कन्सल्टंटन्सी, नाशिक यांची शासकीय दराप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१३ धुळे म.न.पा.अंतर्गत सन 2019-20 या वर्षाकरिता जलशुद्धीकरण केंद्रावर ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करणेकामी निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. भारतीताई माळी विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी निगोसिएशन अंती आलेले ठेकेदार यश केमिकल्स यांचे ब्लिचिंग पावडरचा दर रु.15,649/-प्रती मे. टन या प्रमाणे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४दिनांक २८/०५/२०२०

धुळे म.न.पा.अंतर्गत सन 2019-20 या वर्षा करिता जलशुद्धीकरण केंद्रावर ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करणेचे कामाबाबत ई निविदा क्रमांक 03 जा.क्र.धुमपा/ पापुवी/126 दिनांक 10/05/2019 अन्वये दिनांक11/05/2019 रोजी दैनिक मर्डर या वर्तमानपत्रात

प्रसिद्ध करण्यात आली.त्या नुसार दि. 27/05/2019पर्यंत निविदा दर मागविण्यात येऊन त्यात तीन (3) निविदा धारकांनी भाग घेऊन खालील प्रमाणे दर सादर केलेले आहे.

अ. क्र	ठेकेदाराचे नाव	ब्लिचिंग ग्रेड-1	ग्रासिम मेक ब्लिचिंग पावडर-1
१)	विक्रम केमिकल्स	रु. १६,९००/- प्रतीमेटन	२७,२८०/- प्रतीमेटन
२)	यश केमिकल्स	रु. १५,९९९/- प्रतीमेटन	२५,८८८/- प्रतीमेटन
३)	अलमाटी केमिकल्स	रु. १६,१००/- प्रतीमेटन	२६,७००/- प्रतीमेटन

वरील तकत्यानुसार सर्वात कमी निविदा दर यश केमिकल्स यांचा असून त्यांचे दर रु.15,999/- प्रती मे. टन असे होते.त्यानुसार त्या दराबाबत मा.आयुक्त सो.यांनी दि. 30/12/2019 रोजी वाटाघाटी (निगोशिएशन) करणे बाबत कार्यवाही करण्यास आदेशित केल्याप्रमाणे त्यांना धुळे मनपा जाक्र.धुमपा/पापुवी/1012 अन्वये दि.9/01/2020 रोजी पत्र देऊन निविदेतील दरा बाबत वाटाघाटीचे (निगोशिएशन) कळविण्यात आले. त्यानुसार यश केमिकल्स यांनी दि.9/01/2020 रोजी पत्र देवून त्याचे दरात रु.200/- प्रती मे. टन कमी करून रु.15,799/- मात्र प्रती मे.टन ब्लिचिंग पावडरचे दर कळविले होते.त्यानुसार रु.15,799/- च्या दरास मंजुरी करीता ठेवले असता मा. उपायुक्त सो. यांनी सम्बन्धित ठेकेदारांना समक्ष त्यांच्या दालनात बोलावून पुन्हा दर कमी करण्याचे सांगितले त्यांनी पुन्हा सदरचा दर रु. 50/- प्रती मे. टन कमी करून रु.15,749/- प्रती मे. टन नुसार ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करण्यास संमती दर्शवली होती.

त्यानुसार त्या दरास मंजुरी करीता मा.आयुक्त सो. यांचेकडे सदर प्रकरण पाठविले असता मा.आयुक्त सो. यांनी त्यांच्या दालनात ठेकेदाराशी समक्ष केलेल्या चर्चेनुसार दि. 30/01/2020 अन्वये सम्बन्धित ब्लिचिंग पुरवठादार यश केमिकल्स यांनी दि.31/01/2020 रोजी पुन्हा पत्र देऊन सदरच्या दरात रु.100/- प्रती मे.टन कमी करून यश केमिकल्स यांनी नवीन दर रु.15,649/- प्रती मे.टन ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करणे बाबत कळविले आहे.त्यानुसार सदर दर मान्यतेसाठी मे.स्थायी समितीपुढे अहवाल सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी निगोसिएशन अंती आलेले ठेकेदार यश केमिकल्स यांचे ब्लिचिंग पावडरचा दर रु.15,649/-प्रती मे. टन या प्रमाणे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-१४ नागरी दलित वस्ती सुधार पाणी पुरवठा योजना अंतर्गत हद्दवाढ अंतर्गतअवधान गावात नवीन ५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत,अंतिम निगोसिएशन अंती आलेल्या दरास मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ — हद्दवाढ अंतर्गत अवधान गावात नवीन ५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणेचा प्रस्तावासोबत आमच्या चितोड गांवातील जलकुंभाचा प्रस्ताव महासभेत मंजूर झालेला होता. आमच्या भागातील प्रस्ताव अद्याप पावेतो शासनास्तरवर का मंजूर झालेला नाही याची माहिती मिळावी.

म. अभियंता — सदर प्रस्तावासंदर्भात संबंधितांनी शासन स्तरावर स्वतंत्र प्रस्ताव घेवून व पाठपुरावा करुन प्रस्ताव मंजूर करुन घेतला आहे. त्यामुळे सदर कामाला मान्यता मिळाल्याने निविदा काढण्यांत आलेली आहे.आपला प्रस्ताव शासनाकडेस पाठविण्यांत येईल. आपणही शासन स्तरावर योग्य तो पाठपुरावा केल्यास व मंजुरी मिळाल्यास आपल्या कामाबाबत कार्यवाही करता येईल.

म.सभापती — संतोष भाऊ शिंदे साहेब सांगतात ते बरोबर आहे. आपल्याचितोड गावातील प्रस्तावाबरोबरच आमच्या मोगलाई जगदीशनगर येथील जलकुंभाचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. दोन्ही प्रस्तावा बरोबर शासनाकडे पाठविण्यांत यावे. शासनाकडेस मी स्वत: आपल्या बरोबर पाठपुरावा करेल व दोन्ही प्रस्ताव मंजुर करुन आणेल.

म. संतोष खताळ — विषय मंजूर करणेस हरकत नाही.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी ठेकेदार श्री. रोहित दिलीप अग्रवाल,ठेकेदार यांनी अंतिम निगोसिएशन अंती सदरचे काम हे शे.५.०० % जास्तीने करणेबाबत लेखी दिल्याने त्यांचे ५.००%जास्तीने आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५ दिनांक २८/०५/२०२०

नागरी दलित वस्ती सुधार पाणी पुरवठा योजना अंतर्गत हद्दवाढ अंतर्गत अवधान गावात नवीन 5 लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका ठराव नं.29 दि.28/02/2019 कामास म.जिल्हाधिकारी सो.,यांच्या कडील पत्र क्र. 13/ कक्ष-5/नपाप्र/ कावि/1135दि.04/12/2019अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.45,22,142/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत म.जी.प्रा. जळगाव यांचे पत्र क्र.मजीप्रावीज/ चि.शा. / तांत्रिक मंजुरी /48/793 दिनांक 02/03/2019 अन्वये रक्कम रु.45,22,142/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र.धुमपा/पापुवि/ 937 / दि. 06/12/2019 अन्वये दि.07/12/2019रोजी दैनिक वार्ता / देशोन्नती या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.30/12/2019 रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
1	श्री.रोहित दिलीप अग्रवाल	शे.8.00% जास्तीने	**सर्वात कमी दर**
2	श्री.आशिष एम. पटवारी	शे.10.10% जास्तीने	
3	मे.श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन	शे.12.00% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ श्री.रोहित दिलीप अग्रवाल यांचे दर शे.8.00% जास्तीने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ श्री.रोहित दिलीप अग्रवाल यांची दर शे.8.00% जास्तीने आलेले आहे. तरी सदरचे दर जास्तीने आलेले असल्याने दर कमी करणे कामी श्री.रोहित दिलीप अग्रवाल यांना दर वाटाघाटीसाठी नियमाप्रमाणे पत्र देण्यांत आले. याबाबत संबंधित ठेकेदाराने

शे. ७.००% जास्तीने काम करण्याबाबत पत्र सादर केले. याबाबत मा. आयुक्त यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार दर जास्त वाटत असल्याने स्वयंस्पष्ट अभिप्राय देण्याबाबत आदेशित केले.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा.मार्फत तयार करून तांत्रिक मंजुरी म.जी.प्रा. मार्फत घेण्यात आलेली आहे.सदर अंदाजपत्रकात जलकुंभ बांधणेचा ITEM हा जॉबवर्क नुसार दर आहे त्यामुळे रेट ॲनलीसीस केलेले नाही.ठेकेदाराने दर वाटाघाटी करून ७.००%जास्तीने दिलेले आहे. त्यात मार्केट मधील सिमेंट, रेती, खडी दर जास्त आहे. सदर आर.सी.सी.ई.एस.आर.आहेत. डीझाईन तयार करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील तसेच जलकुंभ पूर्ण झाल्यानंतर तपासणी झाल्यानंतर ठेकेदारास राखून ठेवलेली १० % रक्कम अदा करता येईल. तरी सदरचे शे. ७.००% जास्तीने दर मंजुरी बाबत मे. स्थायी समिती पुढे प्रस्तावित टिपणी नुसार म.आयुक्त सो.,यांनी दर जास्त आहेत फेर वाटाघाटी करणे बाबत सूचित केले आहे.

त्यानुसार ठेकेदार श्री. रोहित दिलीप अग्रवाल, ठेकेदार यांना दि. २७/२/२०२० रोजी दर वाटाघाटी साठी बोलविले असता श्री. रोहित दिलीप अग्रवाल, ठेकेदार यांनी लेखी पत्र देवून सदरचे काम हे शे. ५.००% जास्तीने करणे बाबत लेखी कळविले आहे.त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी ठेकेदार श्री. रोहित दिलीप अग्रवाल, ठेकेदार यांनी अंतिम निगोसिएशन अंती सदरचे कामहे शे. ५.०० %जास्तीने करणेबाबत लेखी दिल्याने त्यांचे ५.००% जास्तीने आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१५ नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१६ मध्ये जगदीश देवपूरकर ते साईबाबा ईस्त्रीवाले व भाऊसाहेब बेहरे ते सत्यसाईबाबा डी.पी.रोड भागात डांबरीकरण व गटार करणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत.त्याबाबत आलेल्या कार्यालयीनअहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.संतोष खताळ सदर प्रकरणातील सर्वात कमी दर असलेले ठेकेदाराने लेखी पत्र देऊन काम करणेस असमर्थता दर्शविलेली असल्याचे टिपणीत नमूद केले आहे.अशा प्रकारे काम नाकारणा-या ठेकेदारावर काय कार्यवाही करता येते याबाबत शासनाचे नियम आहेत का?

म. अभियंता सदर प्रकरणी ठकेदार अभिनव गीते यांनी लेखी पत्र देऊन काम करणेस असमर्थता दर्शविलेली आहे. सदर प्रकरणी सदर ठेकेदाराची बयाणा रक्कम जप्त करण्याबाबत कारवाई करण्यांत येईल.

म. संतोष खताळ माझ्याकडे शासनाचा जी.आर.आहे. त्यात काम करणेस नकार देणा-या ठेकेदारास काळया यादी टाकण्यांत यावे असे नमूद आहे.

म. अभियंता वारंवार अशा प्रकारे काम करणेस नकार देणा-या ठेकेदारास नियमाप्रमाणे कार्यवाही करुन ब्लॅक लिसट मध्ये टाकण्यांत यावे असे नमूद आहे.

म. संतोष खताळ सदर प्रस्तावातील ठेकेदारास काळया यादी टाकण्यांत यावे. विषयास माझा विरोध नाही तथापि ठेकेदारावर कार्यवाही करुन सदर कामाची फेर निविदा काढण्यांत यावी असे मत आहे. आपण

विषय मंजूर करीत असाल तर सदर प्रकिया नियमबाहय असल्याने प्रस्ताव मंजुरीस माझा विरोध नोंदवून घेण्यांत यावा.तसेच विषय क्रमांक १६ व २३ या विषय मान्यतेसही माझा विरोध नोंदविण्यांत यावा.

म. सभापती सदर प्रस्तावा संदर्भात मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार L-२ हिंद कन्सट्रक्शन यांनी शे.९% कमी दराने काम करणेची तयारी दर्शविल्याने त्यांचे शें. ९% कमीचे आलेल्या दरांस सन्मा.सदस्य श्री. संतोष खताळ यांचा विरोध नोंदवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६ दिनांक २८/०५/२०२०

नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्र.१६ मध्ये जगदीश देवपूरकर ते साईबाबा इस्त्रीवाले व भाऊसाहेब बेहरे ते सत्य साईबाबा डी. पी. रोड भागात डांबरी रोड व गटार करणे. कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.२५(अ) दि.२८/०२/२०१९ मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.२०/०९/२०१९ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.६९,६५,६४९/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.२३५ दि.१३/०८/२०१९ अन्वये रक्कम रु. ६९,६५,६४९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबतधुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./११४/ दि.१४/११/२०१९ अन्वये १४/११/२०१९ रोजीचे दै.आपला महाराष्ट्र/दै.पुण्य नगरी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०६/१२/२०१९ रोजी अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	अभिनय गीते	शे.८.९०%कमीने	**सर्वात कमी दर**
२	श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन	शे.२%जास्तीने	
३	हिंद कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रकीय दराने**	
४	आशिष एम. पटवारी	शे.३%जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **अभिनय गीते** यांनी दिलेले दर शे.८.९०%कमीने असून **अभिनय गीते** यांनी दिलेल्या पत्रानुसार काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. तसेच त्यांनी शासन निर्णय २६ नोव्हेंबर २०१८ नुसार पूर्तता केलेली दिसून येत नाही. तसेच L-२ हिंद कन्सट्रक्शन यांनी दिलेल्या पत्रानुसार L-१ च्या दरात शे. ९% कमी दराने दिलेल्या पत्रानुसार काम करण्यास सहमती दर्शविलेली आहे. नियमा नुसार अतिरिक्त सुरक्षा अनामत भरलेली आहे. सबब कंत्राटदार L-२ हिंद कन्सट्रक्शन यांनी शे.९% कमी दराने आलेले दर मंजुरीसाठी स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सदर प्रस्तावा संदर्भात मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार L-२ हिंद कन्सट्रक्शन यांनी शे.९% कमी दराने काम करणेची तयारी दर्शविल्याने त्यांचे शें. ९% कमीचे आलेल्या दरांस सन्मा.सदस्य श्री. संतोष खताळ यांचा विरोध नोंदवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

बहुमताने मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-१६ नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्र.१४ मध्ये महात्मा फुले पुतळा ते आण्णा भाऊ साठे नगर पावेतो रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ सदर विषयास माझा विरोध आहे त्यांची नोंद करण्यांत यावी.

म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार L-३ गायत्री कन्सट्रक्शन यांनी शे.८% कमी दराने करणेस समर्थता दर्शविल्याने त्यांचे शे.८% कमीने दिलेल्या दरास सन्मा.सदस्य श्री.संतोष खताळ यांचा विरोध नॉंदवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियामतील कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७ दिनांक २८/०५/२०२०

नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्र.१४मध्ये महात्माफुले पुतळा ते आण्णा भाऊ साठे नगर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.२५(अ) दि.२८/०२/२०१९मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.२०/०९/२०१९ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२९,८०,१८९/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.२४५ दि.१४/०८/२०१९ अन्वये रक्कम रु. २९,८०,१८९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./११४ दि.१४/११/२०१९अन्वये दि.१४/११/२०१९ रोजीचे दै.आपला महाराष्ट्र/दै.पुण्य नगरी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०६/१२/२०१९ रोजी अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	अभिमन्यू गीते	शे.७.७७%कमीने	
२	आस्था.स्वय.सेवा.सह.संस्था	शे.५%जास्तीने	
३	प्रकाश पांडव	शे.८%कमीने	**सर्वात कमी दर**
४	ए.के.सैफी	शे.२%जास्तीने	
५	गायत्री कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रकीय दराने**	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **प्रकाश पांडव** यांनी दिलेले दर शे.८%कमीने असून **प्रकाश पांडव** यांनी नियमा नुसार अतिरिक्त सुरक्षा अनामत धरलेली नाही. तथा काम करण्यास सहमत नसल्याने तसेच L-२ यांनी देखील काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. L-३गायत्री कन्सट्रक्शन यांनी शे.८% कमी दराने काम करण्यास समर्थता दर्शविलेली आहे. त्याप्रमाणे त्यांनी ऑनलाईन बयाणा रक्कम धरलेली आहे. सबब कंत्राटदार L-३ गायत्री कन्सट्रक्शन यांनी शे.८% कमी दराने आलेले असून ते मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार L-३ गायत्री कन्सट्रक्शन यांनी शे.८% कमी दराने करणेस समर्थता दर्शविल्याने त्यांचे शे.८% कमीने

दिलेल्या दरास सन्मा.सदस्य श्री.संतोष खताळ यांचा विरोध नोंदवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे. **बहुमताने मंजुर,**

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १७ जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत प्र.क्र.५ मध्ये केले नगर कृष्णाई ब्युटी पार्लर ते श्री.व्ही.आर पाटील यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची शे.०.९९% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८ दिनांक २८/०५/२०२०

जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत प्र.क्र.५ मध्ये केले नगर कृष्णाई ब्युटी पार्लर ते श्री.व्ही.आर पाटील यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे. बाबतच्या कामास मा. जिल्हाधिकारी,धुळे यांचे क्रमांक/क/कक्ष-५/नपाप्र/कावि/६७०/२०१९ दि. ३०/०७/२०१९ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३९,४०,११८/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे. उक्त बाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र.६५दि.३१/०५/२०१९ अन्वये रक्कम रु.३९,४०,११८/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./१११/२०१९दि.७/११/२०१९अन्वये दि.७/११/२०१९ रोजीचे दै.देशदूत/आपला नवराज्य या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.३०/११/२०१९ रोजी अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन	शे.२.००%जास्तीने	
२	हिंद कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**
३	आशिष एम.पटवारी	शे.३.००%जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दराने असून मा.आयुक्त सो. यांच्या आदेशानुसार जा.क्र./ बा.वि. /०४ /२०२० दि.०५/०५/२०२० नुसार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांना निविदा दर वाटाघाटी करणे बाबत पत्र देण्यात आले होते.त्यानुसार मे.हिंद कन्सट्रक्शन यांनी शे.०.९९% कमी दराने काम करण्याबाबत सहमती दर्शवलेली आहे. त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची शे.०.९९% कमी दरानेआल्याने स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने

सदर कामी कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची शे.०.९९% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १८ नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्र.४ चंदननगर भागात लहुजी वस्ताद व्यायाम शाळा ते कुंदन पान सेंटर पर्यंतव शशिकांत वागते बिलाल इस्तरी वाले यांच्या घरापर्यंत व वानखेडकर ते साहेबराव भामरे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर शे.१.००% कमीने आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९ दिनांक २८/०५/२०२०

धुळे मनपा अंतर्गत नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्र.४ चंदन नगर भागात लहुजी वस्ताद व्यायाम शाळा ते कुंदन पान सेंटर पर्यंतव शशिकांत वागते बिलाल इस्तरी वाले यांच्या घरापर्यंत व वानखेडकर ते साहेबराव भामरे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.२५अ दि.२८/०२/२०१९ मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.२०/०३/२०२० अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२७,१५,३७१/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.२२५दि.१३/०८/२०१९ अन्वये रक्कम रु. २७,१५,३७१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./११४ दि.१४/११/२०१९ अन्वये दि.१४/११/२०१९ रोजीचे दै.आपला महाराष्ट्र/दै.पुण्य नगरी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०६/१२/२०१९ रोजी अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	भूषण एल.चौधरी	शे.३%जास्तीने	
२	हर्षल पी.देवरे	शे.२%जास्तीने	
३	एकविरा कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.एकविरा कन्सट्रक्शन यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून मा.आयुक्त सो. यांच्या आदेशानुसार जा.क्र./बा.वि./५२७/२/ दि.०३/०३/२०२० नुसार मे. एकविरा कन्सट्रक्शन यांना निविदा दर वाटाघाटी करणे बाबत पत्र देण्यात आले होते.त्यानुसार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांनी शे.१.००% कमी दराने काम

करण्याबाबत सहमती दर्शवलेली आहे.त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर शे.१.००% कमीने आलेले दर मंजुरीसाठी स्थायी समिती समोर मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर शे.१.००% कमीने आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१९ धुळे मनपा हद्दीत नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्र.७ शिवधाम मंदिर ते बहावलपुरी भवन पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीनअहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २० दिनांक २८/०५/२०२०

धुळे मनपा हद्दीत नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्र.७ शिवधाम मंदिर ते बहावलपुरी भवन पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.२५(अ) दि.२८/०२/२०१९ मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.२०/०९/२०१९ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.४४,११,८१८/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.२२९ दि.१३/०८/२०१९ अन्वये रक्कम रु. ४४,११,८१८/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बावत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./११४दि. १४/११/२०१९अन्वये दि.१४/११/२०१९ रोजीचे दै.आपला महाराष्ट्र/दै.पुण्य नगरी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०६/१२/२०१९ रोजी अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	भूषण एल.चौधरी	शे.३%जास्तीने	
२	हर्षल पी.देवरे	शे.२%जास्तीने	
३	एकविरा कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.एकविरा कन्सट्रक्शन यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम धरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने त्यांचे दर मे.स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर करण्यांत आलेले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- २० मनपा हद्दवाढ गावातंर्गत जमा रकमेतून गोंदूर रोड ते मटन दुकान ते अंगणवाडी शाळा इमारत ते प्रफुल सिसोदे यांचे घर ते बिजली नगर पुला पावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करणे करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्याकार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार कंत्राटदार मे. भुषण एल. चौधरी यांचे दर शे.२ % कमीने आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१ दिनांक २८/०५/२०२०

धुळे मनपाचा हद्दवाढ अंतर्गत धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. ९० दि. १९/०९/२०१८ अन्वये गोंदूर रोड ते मटन दुकान ते अंगणवाडी शाळा इमारत ते प्रफुल सिसोदे यांचे घर ते बिजली नगर पुला पावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करणे रु. २९,५९,५८४/- मात्र खर्चास मंजुरीप्राप्त नुसार सदरचे कामाचे धुळे मनपा जा.क्र./ धुमपा / पापुवि/ ९९३ दि.०३/०१/२०२० अन्वये दि. ०४/०१/२०२० रोजीचा दै. लोकमत / पथदर्शी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१८/०१/२०२० अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	**भूषण एल चौधरी**	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**
२	अ.के.सैफी	शे.२% जास्तीने	
३	आस्था स्वयंरोजगार सेवा संस्था	शे.५% जास्तीने	

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **मे.भूषण एल चौधरी,** धुळे यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. तरी उक्त **मे.भूषण एल चौधरी,, धुळे** यांचे दर हे जास्तीचे आलेले असल्याने संबंधितांना इकडील जा.क्र./बा.वि./५२७/१ दि.०३/०३/२०२० अन्वये दर वाटाघाटीस बोलविले असता ठेकेदार यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दरा ऐवजी शे.२% कमीने करणेस तयारी दर्शविलेली आहे.

तरी दर वाटाघाटी अंती **मे. भूषण एल चौधरी** धुळे यांनी दिलेल्या पत्रानुसार दर शे.२% कमीने करणेस संमती दर्शविलेली आहे. सदरचे काम शे.२% कमीने दराने करणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केलेले आहे. सबब कंत्राटदार मे. भुषण एल. चौधरी यांचे दर शे.२ % कमीने करणे बाबत मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार कंत्राटदार मे. भुषण एल. चौधरी यांचे दर शे.२ % कमीने आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-२१ भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि.यांच्या सहाय्यता निधीअंतर्गत(सी.एस.आरफंड) उपलब्ध होणा-या रोबोटीक स्कॅव्हींग मशिन घेणेसाठी तयार करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालास प्रशासकीय कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती धुळे शहरासाठी व आरोग्य विभागासाठी अतिशयबहुमोल असा प्रस्ताव मा.आयुक्तांनी याठिकाणी सादर केलेला आहे. धुळे शहरातील ड्रेनेज स्वच्छताही आज पर्यत सफाई कामगारांच्या माध्यमातून केली जात होती. परंतु आयुक्तांनी याबाबत स्वत:पुढाकार घेवून भारत पेट्रोलियम कंपनीशी संपर्क केला व त्यांच्या सहाय्यता निधी मधून सुमारे ८३ लाख मात्र खर्चाची रोबोटीक मशिन आजमहानगरपालिकेला मिळालेली आहे. कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर ही महानगरपालिके साठी फार मोठी उपलब्धी आहे. या कामी सातत्याने पाठपुरावा करुन हा प्रस्ताव कंपनी कडुन मंजूर केल्याबद्दल मी शहर वासियांच्या वतीने आयुक्तांचे आभार व्यक्त करतो.

म.अमोल मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय घेवून प्रशासनाने केलेल्या कार्यवाही बाबत कोणत्याही स्वरुपाची आर्थिक व प्रशासकीय त्रुटी व उणिवा इत्यादी बाबी तपासून घेवून अशा कोणत्याही त्रुटी व उणिवा राहिल्यास स्थायी समितीस अवगत करुन त्यांची पूर्तता करण्याची संबंधित विभागाची जबाबदारी असेल यास अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी असणा-या खर्चास व प्रस्ताव रावविणेकामी झालेल्या प्रक्रियेस प्रशासकीय कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२ दिनांक २८/०५/२०२०

स्वच्छता कामगारांच्या नोकरीचा सर्वात वाईट भाग म्हणजे मॅनहोल साफ करणे हे अत्यंत धोकेदायक आणि बेकायदेशीर आहे.यात अजुनही बरेच कर्मचारी गुंतलेले आहेत. या प्रथेवर शासनाने बंदी घातलेली आहे मॅन्युअल स्कॅव्हेंजर आणि त्यांचे पुनर्वसन कायदा 2013 अंमलात आहे.

सदरच्या कायद्याची अंमलबजावणी करणे करीता तसेच मॅनहोल स्वच्छता देखभाल कार्यात मानवी सहभाग कमी करण्यासाठी व स्वच्छता कर्मचा-यांचा धोका कमी करण्यासाठी धुळे महानगरपालिकेने तत्परता दाखवुन मॅनहोलच्या अंतर्गत देखभाल करण्याचा विविध कामांसाठी

लोकांना आवश्यक असलेल्या धुळे महानरपालिकेची ईच्छा आहे. तंत्रज्ञानाद्वारे स्वच्छता कामगारांना अधिक सुरक्षित आणि सन्मानणीय वातावरण आणण्याची इच्छा आहे.

त्याअनुषंगाने मॅनहॉलची कार्यक्षम आणि प्रभावी साफसफाई करण्यासाठी मॅनहोल क्लीनींग रोबोट सारखे तंत्रज्ञानाचा वापर करणे तसेच स्वच्छता कामगारांना त्यांच्या सध्याच्या व्यवसायात प्रशिक्षण देऊन तांत्रिक माहिती वाढविण्याच्या दृष्टीने धुळे महानगरपालिकेत काम करणाऱ्या स्वच्छता कामगारांच्या सर्वांगीण गुणवत्तेची उन्नती करणे याचे उद्दीष्ट साध्य करणे करीता पायलट प्रकल्प राबविणे बाबत मे.भारत पेट्रोलीयम कॉर्पोरेशन लिमीटेड (BPCL) यांचेकडे दिनांक 17/2/2020 रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदरचा प्रस्ताव मे.भारत पेट्रोलीयम कॉर्पोरेशन लिमिटेड (BPCL) यांनी मान्य केला असुन प्रस्तावानुसार खालील प्रमाणे मॅनहोल क्लिनींग रोबोट मशिन घेण्यासाठी सी.एस.आर. फंडातुन अनुदान प्राप्त होणार आहे.

सदरचा प्रस्ताव यशस्वीरीत्या होण्यासाठी सामंजस्य करारनामा करण्यात आला आहे.

Sl. No.	Description	Rate (Rs.)	Qty	Amount (Rs.)
	CAPEX			
1	The Manhole Cleaning Robot (including GST)	38,07,860	2	76,15,720
2	Packing and shipping including freight charges, transit insurance, RTO passing (including GST)	1,71,973	2	3,43,946
	Operation and Maintenance			
3	1 year continuous technical support includes implementation, training, free service and 3 onsite visits, after commissioning of the machines	3,96,480	1	3,96,480
	Grand Total (Sr. No. 1-3)			**83,56,146**

सदरच्या प्रस्तावात नमुद नुसार दिनाक 11/3/2020 रोजी मे.भारत पेट्रोलीयम कॅर्पोरेशन लि. व धुळे महानगरपालिका धुळे यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. करारात नमुद नुसार निधी प्राप्त होणार असुन त्यापैकी करारनाम्यात दर्शवील्याप्रमाणे 30% रक्कम मनपास प्राप्त झालेली आहे.

उक्त प्रस्ताव व करारनाम्यानुसार धुळे महानगरपालिकेसाठी रोबोटीक स्क्व्हेनींग अँड स्किल डेव्हलपमेंट प्रकल्पासाठी 2 मॅनहोल क्लीनींग मशिन GEM Portal वरुन जेन रोबोटीक ईनोव्हेशन या कंपनीकडुन खरेदी करण्यात आले असुन जेन रोबोटीक ईनोव्हेशन या कंपनीने धुळे मनपा सोबत करारनामा करुन दिलेला आहे. त्याकामी दिनांक 4/5/2020 च्या मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार करारनाम्याचा परिशीष्ट क मध्ये दर्शवीलेल्या देय वेळापत्रकानुसार पहिला हप्ता 30% रु.23,87,900/- जेन रोबोटीक ईनोव्हेशन प्रा.लि.या कंपनीस वर्ग करण्यात आलेले आहे.

सद्या कोरोनामुळे स्थायी समितीची बैठक होत नसल्याकारणाने मा.महापौर सो. व मा. स्थायी सभापती सो. यांच्या समक्ष चर्चा केली असुन सदरच्या प्रकल्पास स्वतंत्रपणे कार्योत्तर मंजुरी घेणे बाबत निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने सदर प्रकल्पाच्या प्रक्रियेस मे.स्थायी समिती

समोर कार्योत्तर मंजुरीसाठी पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.जा.क्र./धुमपा/आरोग्य/834 दिनांक 20/3/2020 अन्वये रु.86,56,146/- खर्चास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय घेवून प्रशासनाने केलेल्या कार्यवाही बाबत कोणत्याही स्वरुपाची आर्थिक व प्रशासकीय त्रुटी व उणिवा इत्यादी बाबी तपासून घेवून अशा कोणत्याही त्रुटी व उणिवा राहिल्यास स्थायी समितीस अवगत करुन त्यांची पूर्तता करण्याची संबंधित विभागाची जबाबदारी असेल यास अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी असणा-या खर्चास व प्रस्ताव राबविणेकामी झालेल्या प्रक्रियेस प्रशासकीय कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- २२ धुळे मनपा सहाय्यक अनुदान अंतर्गत प्रभाग क्र.१० बहिरम बाबा मंदिर ते पश्चिमेस सिद्धेश्वर मार्बल पावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी सर्वात दर असलेले निविदा धारक श्री.भूषण एल.चौधरी यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या दरास व खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३ दिनांक २८/०५/२०२०

धुळे मनपा हद्दीत धुळे महानगरपालिका ठराव क्र. ९६(ब) दि. ३१/१२/२०१९ अन्वये सहाय्यक अनुदान अंतर्गत प्रभाग क्र. १० बहिरम बाबा मंदिर ते पश्चिम सिद्धेश्वर मार्बल पावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे रु.९८,०५,५९९/- मात्र खर्चास मंजुरीप्राप्त नुसार सदरचे कामाचे ई- निविदा क्र. १२४९ दि.०७/०४/२०२० अन्वये दि.०८/०४/२०२० रोजीचा दै.देशदूत / वार्ता या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०६/०५/२०२० अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.अ.के.सैफी	शे १% जास्तीने	
२	मे.गायत्री कन्सट्रक्शन	शे २% जास्तीने	
३	**श्री.भूषण एल.चौधरी**	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.भूषण एल.चौधरी** यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम धरलेली आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने अभिप्रायाची पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार श्री / मे **श्री.भूषण एल.चौधरी** यांची अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमीचे आलेल्या दरांस व खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- २३ नागरी दलित वस्ती सुधार अंतर्गत निला चौक भागात नटराज टाकीज रोड नीला चौक बोर्डा पासून ते मारोती मंदिर पावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. संतोष खताळ सदर विषयास माझा विरोध आहे त्यांची नोंद करण्यांत यावी.

म. कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार **कंत्राटदार L२ भूषण एल चौधरी यांनी शेकडा १०.२० % कमीने आलेले** आलेल्या सन्मा.सदस्य श्री.संतोष खताळ यांचा विरोध नोंदवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४ दिनांक २८/०५/२०२०

धुळे मनपा हद्दीत धुळे महानगरपालिका ठराव क्र. २५(अ) दि. २८/०२/२०१९ अन्वये नागरी दलित वस्ती सुधार अंतर्गत निला चौक भागात नटराज टाकीज रोड नीला चौक बोर्डा पासून ते मारोती मंदिर पावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे रु.२९,३६,४५६/- मात्र खर्चास मंजुरीप्राप्त नुसार सदरचे कामाचे ई- निविदा क्र. ११४ दि.१४/११/२०१९ अन्वये दि. १४/११/२०१९ रोजीचा दै.देशदूत / वार्ता या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०६/१२/२०२० अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	आस्था .स्वंय.से.सह.संस्था.क	शे ५% जास्तीने	
२	क्यूअरी इन्फो	शे १०% कमीने	**सर्वात कमी दर**
३	श्री.अ.के.सैफी	शे २% जास्तने	
४	मे.गायत्री कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	
५	श्री.भूषण एल.चौधरी	अंदाजपत्रकीय दराने	
६	हर्षल पी.देवरे	शे २% जास्तीने	
७	एकविरा कन्सट्रक्शन	शे २% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री. क्यूअरी इन्फो** यांचे दर अंदाजपत्रकीय दरा पेक्षा १० % कमीने आलेले आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री/मे श्री. क्यूअरी इन्फो** यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० % कमीने आलेले असताना शासन निर्णय दिनांक २६ नोव्हेंबर २०१८ अन्वय पूर्तता केलेली दिसून येत नाही **तसेच L२ भूषण एल चौधरी यांच्या पत्र नुसार L१ च्या दरात शेकडा १०.२०% कमी दराने दिलेल्या पत्रानुसार काम करण्यास सहमती दर्शवली आहे नियमा नुसार अतिरिक्त सुरक्षा अनामात भरलेली आहे सबब कंत्राटदार L२ भूषण एल चौधरी**

यांनी शेकडा १०.२० % कमी दराने आलेले असल्याने यांच्या दरास मे. स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सदर प्रस्तावासंदर्भात मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार शिफारस केल्याने सदर कामी कंत्राटदार L २ भूषण एल चौधरी यांनी शेकडा १०.२० % कमीने आलेल्या दरास सन्मा. सदस्य श्री.संतोष खताळ यांचा विरोध नोंदवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

बहुमताने मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-२४ १४व्या वित्त आयोग अंतर्गत हद्दवाढ गावातील महासभा ठराव नं.२५(ब) दि.२८/२/२०१९ अन्वये घेण्यांतआलेली कामे शासन निर्णय क्रं.चौविआ/२०१५/ प्र.क्र.२६ वित्त ४ दि. २१/१२/२०१५ नुसार अन्वये सदरचे कामे अनुज्ञेय नसल्याने सदरची कामे मनपा निधी अंतर्गत घेण्यांसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती अभियंता यांनी विषयांची माहिती द्यावी.

म. अभियंता म. सभापती सो यांच्या वतीने खुलासा करतो की. कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपाकडील महासभा ठराव क्रं. २५(ब) दिनांक २८/२/२०१९ अन्वये हद्दवाढ झालेल्या गावांमध्ये त्यांच्या असलेल्या १४ व्या वित्त आयोगाच्या शिल्लक निधी मधून अ.क्रं. १ ते १७ कामे १४ व्या वित्त आयोग अंतर्गत घेणेबाबत ठराव झालेला होता. आपल्याकडे ५ जानेवारी २०१८नुसार हद्दवाढ गांवे महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट झालेला आहे.हद्दवाढ झालेल्या गावातील मालमत्ता व त्यांची दायित्व ही दोघेही धुळे महानगरपालिकेवर आलेली आहे. त्याअनुषंगाने वित्त आयोगाची ग्रॅन्डर्स जमा होतात. यामधून कोणती कामे घ्यावी कोणती घेवू नये यासाठी ठराव करण्यांत येतो.यापूर्वी वित्त आयोगामध्ये कामे घेतांना शहरी विभागाचा निर्णय लागू झाला.त्यामुळे आपण लेखी सुचना जरी केली असली तरी काही कामे पूर्ण झाली तर काहीची वर्क ऑर्डर स्टेजला आहे. काही टेंडरला आहे. ही अट जरी पूर्ण झाली असली तरी आपण त्यास परवानगी देऊ शकत नव्हतो. त्यामुळे लेखापरीक्षकांनी याबाबत स्पष्ट अभिप्राय दिलेला आहे यासाठी खर्चाची तरतूद करणे आवश्यक राहील. आता आपणाला ४ मे २०२० रोजी शासनाने ३३% जी.आर. दिलेला आहे. त्याप्रमाणे आपण ३३% खर्चाबाबत निर्णय दिलेला आहे. त्याप्रमाणे हद्दवाढ गावातील कामे मनपा फंडातून करणेबाबत प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवलेला आहे.

म.सभापती याठिकाणी आपण सर्व विषयांना मंजुरी देत असतांना ७ ते २३ विषयांना एकमताने मंजुरी देत असतांना ३ विषयांना बहुमताने मंजुरी दिलेली आहे.विषय २४ हा १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत होता. परंतु आपले काही नगरसेवक यांना १४ व्या वित्त आयोगातून कसे काम करावे कसे करु नये याचे अवलोकन नसावे किंवा चूकुन कामाची यादी दिली गेली असावी आणि त्याच्या अधिन राहून आपण ठराव देखील केला असेल परंतु १४ व्या वित्त आयोगामध्ये शासनाने निर्धारीत केलेलेच काम घेण्यांत आलेले आहेत. ते नियमानेच केले जातील. १४व्या वित्त आयोगामध्ये जर रस्ता घेता येत नसेल तर आपण तो घेणार नाही. आणि ते देऊही शकत नाही. परंतु प्रशासनाने शासनाच्या आदेशाला अधिन राहून त्या ११ खेडयांमधून जो महसूल प्राप्त होणार आहे त्या महसूल प्राप्त पैशातूनच त्यांचे फंडातून जी रक्कम असेल ती देण्यांत यावी.

आणि याठिकाणी विषय येत असतांना प्रशासनाने आपणास बजेट मध्ये तरतूद केलेली नाही असे माझ्या माहितीनुसार निदर्शनास आलेले आहे. त्यानुसार प्रस्ताव सादर करतांना विचार केला पाहिजे होता तो केला गेलेला नाही त्यामुळे या कामाबाबत अंतीम अंदाजपत्रकात तरतूद करण्यांत यावी.

याठिकाणी त्या विषयाच्या बाबत तसेच सर्व विषयांच्या बाबतीत आणि याच्या नंतर सुध्दा जे जे काही विषय आपल्या विचाराधीन येतील आपल्या स्थायी समितीला मंजुरीसाठी येतील त्या सर्व विषयांच्या बाबतीत मुख्य लेखापरीक्षक यांचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपाची पूर्तता संबंधित विभागाने करण्याच्या अधिन राहून मा.आयुक्त सो. यांनी दर मान्यतेसाठी शिफारस केलेली बाबत विचारात घेवूनच मंजुरी देण्यांत येत आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालानुसार महासभा ठराव क्रं. २५ (ब) दिनांक २८/२/२०१९ अन्वये हद्दवाढ गावांमध्ये अ.क्रं. १ ते १७ कामे प्रस्तावित केलेली होती. यातील १४ व्या वित्त आयोगाच्या निधीअंतर्गत अनुज्ञेय असणारी कामे वगळून उर्वरीत अनुज्ञेय नसणारी कामे मनपा निधी अंतर्गत शासन निर्णयानुसार करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर कामांवरील खर्च त्या हद्दवाढ गावातील जमा होणा-या मालमत्ता करातून भागविण्यांत यावा. तसेच याकामाबाबत खर्चाच्या तरतूदी अंतिम अर्थसंकल्पात समाविष्ट करणे ही संबंधित विभागाची जबाबदारी असेल व लेखा विभागाने याबाबत अर्थसंकल्पापूर्वी तरतूद झाल्याची खात्री करावी.सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५ दिनांक २८/०५/२०२०

दिनांक ५ जानेवारी २०१८ रोजी हद्दवाढ झालेली असून हद्दवाढीतील आदेशानुसार मक्ता व दायित्व स्विकारण्याची जबाबदारी धुळे महानगरपालिकेची असल्याने त्यानंतरचे सर्व कामकाज मनपा अधिनियम तथा महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू असलेल्या शासन निर्णय व शासन परिपत्रकानुसार करणे उचित राहील असे मत आहे.

धुळे मनपाकडील मे. महासभा ठराव क्रं. २५(ब) दिनांक २८/२/२०१९ अन्वये हद्दवाढ अंतर्गत १० गावामध्ये अ.क्रं. १ ते १७ कामे १४ व्या वित्त आयोग अंतर्गत घेणेबाबत ठराव झालेला होता. त्याबाबत शासन निर्णय क्रं. शासन निर्णय क्रं. चौविआ/२०१५ /प्र.क्र. २६ वित्त ४ दि. २१/१२/२०१५ नुसार अ.क्रं. १ ते १७ मधील अनुज्ञेय कामाबाबतचा अहवाल प्रपत्र अ.,नस्ती सोबत जोडण्यांत आले आहे.

याबाबत मुख्य लेखाधिकारी यांच्या कडील अभिप्राय महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रं. शासन निर्णय क्रं. चौविआ/२०१५ /प्र.क्र. २६ वित्त ४ दि. २१/१२/२०१५ नुसार १४ व्या वित्त आयोग अंतर्गत पहिल्या आर्थिक वर्षाच्या (सन २०१५-१६) बेसीक ग्रन्डच्या वितरीत निधीतून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थानी (ग्रामपंचायती) करावयाच्या विनियोग ,त्यांचे नियोजन व संनियंत्रण बाबतच्या शासन निर्णयात ग्रामपंचायतीनी हाती घ्यावयाची कामे यांत १) पिण्याचे पाणीसंदर्भातील बाबी २) स्वच्छतेशी संबंधित बाबी ३) ग्रामपंचायत भवन व अंगणवाडी बांधकाम ४)दिवाबत्ती व सौरदिव्यांच्या वापरासंदर्भितील बाबी ५) आवश्यक देखभाल व दुरुस्ती शी संबंधीत बाबी

उपरोक्त अ नुसार कामे हाती घेण्याबाबत नमूद आहे. शासन निर्णयात रस्ता करणेबाबत उल्लेख नाही. उपरोक्त शासन निर्णयात नमूद कामाव्यतिरिक्त इतर कामांबाबत

शासन निर्णय आल्यास त्याबाबत संबंधित विभागाकडून अहवाल घेवून पुढील कार्यवाही करणे उचित होईल.

मुख्य लेखापरीक्षक यांनी याबाबत प्रस्तावित कामांपैकी रस्ता कामे ही प्रस्तुत निधीतून अनुज्ञेय नसल्याने सदर कामांचा खर्च मनपा निधीतून भागविणे आवश्यक असेल. तथापि तशी सक्षम प्राधिकरणाची पूर्व मान्यता घेवूनच पुढील कार्यवाही करणे योग्य होईल असे मत आहे.त्यानुसार म. आयुक्त सो. यांच्या दालनात दिनांक ३०/४/२०२० रोजी सर्व विभाग प्रमुख यांची बैठक संपन्न् झाली. या बैठकीत शासन निर्णयानुसार अनुज्ञेय नसलेली कामे मनपा निधीतूनच भागविणे आवश्यक असेल तथापि सक्षम प्राधिकरणाची पूर्व मान्यता घेवून पुढील कार्यवाही करणे योग्य होईल. असा अहवाल मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालानुसार महासभा ठराव क्रं. २५ (ब) दिनांक २८/२/२०१९ अन्वये हद्दवाढ गावांमध्ये अ.क्रं. १ ते १७ कामे प्रस्तावित केलेली होती. यातील १४ व्या वित्त आयोगाच्या निधीअंतर्गत अनुज्ञेय असणारी कामे वगळून उर्वरीत अनुज्ञेय नसणारी कामे मनपा निधी अंतर्गत शासन निर्णयानुसार करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर कामांवरील खर्च त्या हद्दवाढ गावातील जमा होणा-या मालमत्ता करातून भागविण्यांत यावा. तसेच याकामाबाबत खर्चाच्या तरतूदी अंतिम अर्थसंकल्पात समाविष्ट करणे ही संबंधित विभागाची जबाबदारी असेल व लेखा विभागाने याबाबत अर्थसंकल्पापूर्वी तरतूद झाल्याची खात्री करावी. त्याच प्रमाणे वित्त विभागाचे दि.४/५/२०२० चे शासन निर्णयाप्रमाणे प्रस्तुत प्रकरणांसाठी वित्तीय उपाय योजना कार्यवाही लागू असेल तसेच सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुताने मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे
नगरसचिव कार्यालय
स्थायी समिती सभा क्रमांक ७ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक ०४/०६/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक ४/६/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता **मा. श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह धरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
४	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य
५	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
६	श्रीमती.उदासी कशीश गुलशन	सदस्या
७	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
८	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
९	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
१०	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
११	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
१२	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
१३	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१४	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या
१५	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. गणेश गिरी	अतिरिक्त आयुक्त
२	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
३	श्री. विनायक कोते	सहा. आयुक्त

४	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखापरीक्षक
५	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
६	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी
७	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
८	डॉ. श्री महेश मोरे	आरोग्याधिकारी
९	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
११	श्री.रजमान अन्सारी	प्र.कार्यालय अधिक्षक
१२	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१३	श्री.विशाल निंबाळकर	अधिलेखापाल

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मो स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज

सन्मा. सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार यांनी आजच्या सभेस महत्वाच्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार यांनी महत्वाच्या कारणामुळे सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे. त्यांचे विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २६ दिनांक ४/६/२०२०

सन्मा.सदस्य श्री.सुनिल वसंतराव सोनार यांनी आजच्या सभेस महत्वाच्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजुर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२५ — धुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती २०२० कार्यक्रमासाठी करण्यांत आलेल्या विविध कामा वरील झालेला खर्च रु.१,२१,८००/-मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती २०२० कार्यक्रमासाठी करण्यांत आलेल्या विविध कामावरील झालेला खर्च रु.१,२१,८००/- मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २७ दिनांक ४/६/२०२०

दि.14-4-2020 रोजी झालेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मनपा मालकीच्या पोलीस मुख्यालय जवळील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या भोवती आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात यावी.तसेच जेल रोड ते sp ऑफिस पर्यंत दोन्ही बाजूस लायटिंग लावणे(जनरेटर सह),गेट उभारणे,झालर लावणे ई. कामे करणेसाठी, मा.सभापती मनपा धुळे यांचे पत्रानुसार व मा.पोलीस अधीक्षक धुळे यांचे दालनात बैठक आयोजितकरण्यात आली होती.सदर बैठकीत मा.आयुक्त, मा.सभापती, सन्मा. नगरसेवक नागसेन बोरसे मनपा धुळे उपस्थित होते.सदर ठिकाणी आवश्यक ती कामे करावी परंतु सदर ठिकाणी लोक एकत्रित येणार नाही तसेच सोशल distancing चे पालन करावे असे मा.आयुक्त यांनी आदेशित केले होते.

त्यानुसार मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स&केटर यांचे कडून सदर कार्यक्रमाची साउंड, विद्युत व्यवस्था,फ्लड लाईट ,पुष्पहार सजावट ई.कामे तातडीने करून घेण्यात आली. यासाठी आलेला खर्च रक्कम रु.82,600/-मात्र (GST सह) मक्तेदारानी सादर केलेला आहे. उक्त कामे वेळेत पूर्ण झालेली असून,कामांचे देयके मिळणेकरिता संबंधित मक्तेदारांनी लेखी कळविले आहे.

तरी उक्त खर्च हा सन 2019-20 च्या अंदाजपत्रकात महापुरुष पुण्यतिथी व जयंती उत्सव या लेखाशीर्षकात रु.10 लक्ष मात्रची तरतूद करणेत आलेली आहे.व सदरचा खर्च या लेखाशीर्षकातुन करणेत येणार आहे.

करिता उक्त कामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी होऊन **रक्कम रु.82,600/-** मात्र(GST सह) देयक कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे मान्यतेस होणेस सादर.तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पुर्णाकृती पुतळ्यास पोलिश व रंग काम करणे करिता खर्च रु.39,200/-मात्र असे एकुण रु. 1,21,800/- मात्र कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समिती समार सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती २०२०कार्यक्रमासाठी करण्यांत आलेल्या विविध कामावरील झालेला खर्च रु.१,२१,८००/- मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-२६ धुळे महानगरपालिकेत विविध विभागात १ ते १६ संगणक लिपीक (मानधनावरील) मानधनावर कार्यरत आहेत. त्यांची मुदत संपत असल्याने त्यांना फेर नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे .

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. युवराज पाटील आस्थापना विभागाकडून कर्मचा-यांची नियुक्तीसाठी

म. सभापती सन्मा. सदस्य श्री. युवराज पाटील यांना जो विषय मांडावयाचा आहे तो वेगळा आहे.आता विषय पत्रिकेवर १ ते १६ संगणक लिपीकांना मुदतवाढ देण्याबाबतचा विषय आलेला आहे. या कर्मचा-यांपैकी कार्हीना मनपा सेवेची आवश्यकता नाही का? या विषयासंदर्भात आस्थापना विभाग प्रमुख यांनी सविस्तर माहिती द्यावी.

म. कार्यालयीन अधिक्षक जा.क्र./धुमपा/आस्था/ तात्काळ दि २७/३/२०२० अन्वये १) निखील देशमुख २) सचिन शिंदे ३) सरिता चव्हाण ४) सुनिता आव्हाड ५) अंजना गायकवाड ६) दिलीप शिवदे , संगणक लिपीक मानधनावरील यांची आरोग्याधिकारी यांच्या कार्यालयात बदली करण्यात आली होती.

दिनांक २/५/२०२० रोजी आस्थापना विभागास वैदयकीय अधिकारी कुटुंब कल्याण केंद्र यांचा पत्र क्र ७६७७ चे अहवालानुसार श्री निखील देशमुख श्री सचिन शिंदे, श्रीमती सरिता चव्हाण, श्रीमती सुनिता आव्हाड, श्रीमती अंजना गायकवाड व दिलीप शिवदे हे हजर झाले नसलेबाबत अहवाल सादर केलेला आहे.श्री निखील देशमुख यांना मालमत्ता कर वसुली साठी मनपा एचडीएफसी बँक येथे देण्यात आलेले आहे. तसेच कु.ज्योती मोहन पुकळे हया कुटुंब कल्याण केंद्र येथे हजर झालेल्या आहे.

म. अमोल मासुळे सदर विषयांच्या कार्यालयीन टिपणीवर म.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी घेण्यांत आलेली नाही. तसे विषय क्रं. 27 च्या टिपणीवर मा. आयुक्त सो. यांची स्वाक्षरी घेण्यांत आली आहे. तसेच आस्थापना विभागाकडून कार्यालयीन अहवाल सादर करण्यांस उशीर केला जातो. सदर मानधनावरील कर्मचा-यांची मुदत संपवून गेल्यानंतर 2-3 महिन्यानंतर टिपणी सादर केली जाते. आस्थापना विभागाकडेस इतर विभागाप्रमाणे कामाचा जास्त लोड देखील नाही. तरी मग उशिर का केला जातो.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने प्रशासनामार्फत सादर झालेल्या प्रस्तावास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे. मात्र विभागाने प्रस्तावित प्रकरणी कलम 53 अन्वये मा. आयुक्त यांची मान्यता घ्यावी तसेच मुदतवाढीचा कालावधी 6 महिने पर्यत वाढविण्यांच्या संदर्भात कार्यवाही ही नियम तपासून करावी. तसेच कार्यालयीन आवश्यकतेनुसार मानधनावरील संगणक लिपीकांना कामाजाची गरज तपासून नियुक्ती देण्यांत यावी. तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय घेवून त्यानुसार विभागाने पुढील कार्यवाही करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २८दिनांक ४/६/२०२०

धुळे महानगरपालिकेत विविध विभागात संगणक लिपीक (मानधनावरील) मानधनावर कार्यरत आहेत. सदर संगणक लिपीक (मानधनावरील) यांना जा. क्र. /धुमपा/आस्था /१४९६ दि. १७/३/२०२० अन्वये ०२ महिनेकरीता फेर नियुक्ती देण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने खालील अ. क्र. १ व ८ वरील संगणक लिपीक यांची फेर नियुक्तीदि. १९/३/२०२० रोजी संपुष्ठात आलेली आहे. व अ. क्र. ४ वरील संगणक लिपीक यांची नियुक्ती दि १०/५/२०२० रोजी संपुष्ठात येणार आहे. तसेच अ. क्र.२,३,५,६ व ७ वरील संगणक लिपीक यांची फेर नियुक्ती दि. ०६/०५/२०२० रोजी संपुष्ठात येत आहे.

अ. क्र	उमेदवाराचे नाव	विभाग	अ. क्र.	उमेदवाराचे नाव	विभाग
१	पुजा विठठलसिंग परदेशी	उपमहापौर कार्यालय	५	लतेश सुरेश चौधरी	कंपोस्ट डेपो
२	राहुल सुभाष भावसार	आस्थापना विभाग	६	नितीन ज्ञानेश्वर महाले	कंपोस्ट डेपो
३	ज्योती मोहन पुकळे	आरोग्य विभाग	७	अंजना प्रल्हाद गायकवाड	बांधकाम विभाग
४	शोऐब रजा आदिल शेख	आरोग्य विभाग	८	पल्लवी जयराम सावरकर	आरोग्य विभाग

उक्त अ. क्र. १ ते ८ वरील संगणक लिपीक मानधनावरील यांनी फेर नियुक्ती मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे, तसेच त्यांच्या विभाग प्रमुखांनी फेर नियुक्ती देणेबाबत इकडील कार्यालयास अहवाल सादर केलेला आहे.

तसेच धुळे महानगरपालिकेत मालमत्ता कर विभागाकडील संगणक लिपीक मानधनावर कार्यरत आहेत. सदर संगणक लिपीक (मानधनावरील) यांना जा. क्र. /धुमपा /आस्था /१४९६ दि. १७/३/२०२०अन्वये ०२ महिनेकरीता फेर नियुक्ती देण्यात आलेली होती.

जा.क्र./धुमपा/आस्था/ तात्काळ दि २७/३/२०२० अन्वये १) निखील देशमुख २) सचिन शिंदे ३) सरिता चव्हाण ४) सुनिता आव्हाड ५) अंजना गायकवाड ६) दिलीप शिवदे , संगणक लिपीक मानधनावरील यांची आरोग्याधिकारी यांच्या कार्यालयात बदली करण्यात आली होती.

दिनांक २/५/२०२० रोजी आस्थापना विभागास वैदयकीय अधिकारी कुटुंब कल्याण केंद्र यांचा पत्र क्र ७६७७ चे अहवालानुसार श्री निखील देशमुख श्री सचिन शिंदे, श्रीमती सरिता चव्हाण, श्रीमती सुनिता आव्हाड, श्रीमती अंजना गायकवाड व दिलीप शिवदे हे हजर झाले नसलेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

श्री निखील देशमुख यांना मालमत्ता कर वसुली साठी मनपा एचडीएफसी बँक येथे देण्यात आलेले आहे. तसेच कु.ज्योती मोहन पुकळे हया कुटुंब कल्याण केंद्र येथे हजर झालेल्या आहे. त्या अनुषंगाने खालील अ. क्र.१ व ८वरील संगणक लिपीक यांची फेर नियुक्ती दि. ०६/०५/२०२० रोजी संपुष्ठात आलेली आहे.

अ. क्र	उमेदवाराचे नाव	विभाग	अ. क्र.	उमेदवाराचे नाव	विभाग
१	सरिता गंभीरराव चव्हाण	मालमत्ता कर	५	सचिन विनायक शिंदे	मालमत्ता कर
२	सुनिता दत्तात्रय आव्हाड	मालमत्ता कर	६	निखील रविंद्र देशमुख	मालमत्ता कर
३	शरद दामू मोहिते	मालमत्ता कर	७	साधना भानुदास पाटील	नगरसचिव विभाग
४	वर्षा छबीलदास माळी	नगररचना विभाग	८	योगिता रमेश चौधरी	सहा आयुक्त कार्या.

उक्त अ. क्र. १ ते १६ वरील संगणक लिपीक मानधनावरील यांनी फेर नियुक्ती मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे, तसेच त्यांच्या विभाग प्रमुखांनी फेर नियुक्ती देणेबाबत इकडील कार्यालयास अहवाल सादर केलेला आहे.

याबाबत म. उपायुक्त सो. यांनी अनुपस्थित कालावधी विचारात घेवू नये तसेच 3 महिनें करीता मुदतवाढ दयावी असे नमूद केले आहे. तरी संगणक लिपीक यांची फेर नियुक्तीची दिनांक संपुष्ठात आल्याच्या दिनाकांपासून 03 दिवसाचा सेवा खंड करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53(3) नुसार फेर नियुक्ती देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यांत आलेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने प्रशासनामार्फत सादर झालेल्या प्रस्तावास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे. मात्र विभागाने प्रस्तावित प्रकरणी कलम 53 अन्वये मा.आयुक्त यांची मान्यता घ्यावी तसेच मुदतवाढीचा कालावधी 6 महिने पर्यत वाढविण्यांच्या संदर्भात कार्यवाही ही नियम तपासून करावी. तसेच कार्यालयीन आवश्यकतेनुसार मानधनावरील संगणक लिपीकांना कामाची गरज तपासून नियुक्ती देण्यांत यावी.तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय घेवून त्यानुसार विभागाने पुढील कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-२७ धुळे मनपातील पाणीपुरवठा विभागातील मानधन तत्वावरील व्हॉलमन,पंप ऑपरेटर ,गाळणी चालक,गाळणी निरिक्षक फीटर व विजतंत्री या संवर्गातील कर्मचा-यांना मुदतवाढ देणे बाबतआलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती यासंदर्भात प्रभाग क्रं.5 मध्ये व्हॉलमन नसल्याने त्या जागेवर नवीन व्हॉलमनची नियुक्ती करावी. तसेच ज्या व्हॉलमन कर्मचा-यांच्या कामाबाबत तक्रारी असतील त्यांची सेवा खंडीत करावी.

म. भारती माळी — माझ्या प्रभागात गजानन कॉलनी येथे नुकतेच रस्ते तयार करण्यांत आलेले आहे. परंतु व्हॉलमन व फिटर यांनी संगनमताने प्रत्येक घरांना 10 हजार रुपये घेवून बेकायदेशीर रित्या नळ कनेक्शन दिलेले आहे. नागरीकांच्या याबाबत माझ्याकडे तक्रारी दाखल झालेल्या आहेत. तसेच साई किशन हॉटेल मागे नवीन वस्ती झालेली असून त्याठिकाणी पाईप लाईन नसल्याने पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. याबाबत मी अनेक वेळा संबंधित विभागाला लेखी तक्रार दाखल केली आहे. परंतु संबंधितावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. मनपाचे याबाबत आर्थिक नुकसान झालेले असून या कर्मचा-यांवर तात्काळ कार्यवाही करावी व त्यांच्या जागी प्रामाणिक कर्मचारी नियुक्त करावे.

म. सभापती — सदर बाब ही अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. रस्त्यांचे नुकसान करुन विदुरुपीकरण करणा-या कर्मचा-यांवर तात्काळ कार्यवाही करावी. तसेच बेकायदेशीर नळ घेण्या-या नागरीकांवर देखील कार्यवाही करावी.

म. उपायुक्त — अभियंता यांनी तात्काळ चौकशी करुन त्यांच्यावर कडक कार्यवाही करावी व बेकायदेशीर नळ कनेक्शन घेणा-या नागरीकांवर गुन्हे दाखल करण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने तसेच कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. या प्रस्तावरबाबत मा. मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय घेवून मदुतवाढीबाबत कार्यवाही करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २९ दिनांक ४/६/२०२०

१) मानधन तत्वारील व्हॉलमन , संवर्गातील खालील कर्मचा-यांना जा क्र /धुमपा/आस्था १०२४ दि ५/१२/२०१९ अन्वये ०६ महिने कालावधी करीता रु ८०००/- मात्र मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आली होती.सदर नियुक्तीचा कालावधी दि ४/६/२०२० रोजी संपत आहे .

अ क्र	कर्मचा-याचे नाव	अ क्र	कर्मचा-याचे नाव
१	चौधरी भुषण लक्ष्मण	९	श्री प्रमोद विठठल सोनवणे
२	दिपक छगन बागुल	१०	गणेश शंकर बिरारी
३	सोनवणे निलेश रामभाऊ	११	किरण राजेंद्रफुलपगारे
४	सैययद इमरान अली जाफर अली	१२	योगेश भानुदास वाखारकर
५	तुषार गिरीश चौधरी	१३	श्री ज्ञानेश्वर तुकाराम सैंदाणे
६	शिंदे दिनेश रामसिंग	१४	प्रणय प्रणय राजेंद्र लहामगे
७	चंद्रकांत मोतीलाल फुलपगारे	१५	रणदिवे राहुल अरुणराव
८	हेमराज भाईदास कोळी		

२) पंप ऑपरेटर संवर्गातील खालील कर्मचारी यांना जा क्र /धुमपा/आस्था १०२४दि ५/१२/२०१९ अन्वये ०६ महिने कालावधी करीता नियुक्ती देण्यात आली होती . सदर नियुक्तीची मुदत दि ४/०६/२०२० रोजी संपत आहे.

श्री कल्पतरु सदाशिव वाघ यांना जा क्र /धुमपा/आस्था/१४४४ दि ४/३/२०२० अन्वये व्हॉलमन या पदावरुन फीटर या वर्ग करणेत आले आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव
१	कल्पतरु सदाशिव वाघ	पंप ऑपरेटर	५	दिपक वसंत माळी	पंप ऑपरेटर
२	पोददार अमित अनिल	पंप ऑपरेटर	६	अमोल नरेंद्र अंपळकर	पंप ऑपरेटर
३	देवरे योगेश साहेबराव	पंप ऑपरेटर	७	ईश्वर विठठल बडगुजर	पंप ऑपरेटर
४	चेतन भानुदास सुडके	पंप ऑपरेटर	८	खैरनार रुपेश महेंद्र	पंप ऑपरेटर

३) गाळणी निरीक्षक संवर्गातील खालील कर्मचारी यांना जा क्र /धुमपा/आस्था १०२३ दि ५/१२/२०१९ अन्वये ०६ महिने कालावधी करीता नियुक्ती देण्यात आली होती . सदर नियुक्तीची मुदत दि ४/०६/२०२० रोजी संपत आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव
१	अमोल मधुकर पाटील	गाळणी निरीक्षक	३	खैरनार अरुण राजाराम	गाळणी निरीक्षक
२	गणेश दिगंबर शेलार	गाळणी निरीक्षक			

४) गाळणी चालक संवर्गातील खालील कर्मचारी यांना जा क्र /धुमपा/आस्था १०२५ दि ५/१२/२०१९ अन्वये ०६ महिने कालावधी करीता नियुक्ती देण्यात आली होती . सदर नियुक्तीची मुदत दि ४/०६/२०२० रोजी संपत आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव
१	रमेश वेडू बोरसे	गाळणी चालक	५	निलेश पंढरीनाथ करनाळे	गाळणी चालक
२	साळुंखे विनायक जगन	गाळणी चालक	६	किरण गोविंदा चव्हाण	गाळणी चालक
३	बडगुजर राहुल अंबादास	गाळणी चालक	७	राहुल नथ्थुसिंग जाधव	गाळणी चालक
४	महाजन उमेश रविंद्र	गाळणी चालक			

५) फीटर संवर्गातील खालील कर्मचारी यांना जा क्र /धुमपा/आस्था १०२४ दि ५/१२/२०१९ अन्वये ०६ महिने कालावधी करीता नियुक्ती देण्यात आली होती . सदर नियुक्तीची मुदत दि ४/०६/२०२० रोजी संपत आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव
१	इम्रान शेख इब्राहिम अजहर	फिटर (जा क्र /धुमपा/आस्था/१४४४ दि ४/३/२०२० अन्वये व्हॉलमन या पदावरुन फीटर या वर्ग करणेत आले आहे.)

६) विजतंत्री संवर्गातील खालील कर्मचारी यांना जा क्र /धुमपा/आस्था ९२५ दि २५/११/२०१९ अन्वये ०६ महिने कालावधी करीता नियुक्ती देण्यात आली होती . सदर नियुक्तीची मुदत दि २४/०५/२०२० रोजी संपत आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव
१	रोहित रंजन मराठे	विजतंत्री	३	केशव मधुकर महाजन	विजतंत्री
२	पवार परेश गुलाबराव	विजतंत्री	४	विश्वजित विजय गुर्जर	विजतंत्री

७) विजतंत्री संवर्गातील खालील कर्मचारी यांना जा क्र /धुमपा/आस्था ९२४ दि १६/११/२०१९ अन्वये ०६ महिने कालावधी करीता नियुक्ती देण्यात आली होती . सदर नियुक्तीची मुदत दि १५/०५/२०२० रोजी संपत आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव
१	देवेंद्र नामदेव सोनवणे	विजतंत्री	३	वराडे अक्षय राजेंद्र	विजतंत्री
२	रमन भिकु पाटील	विजतंत्री			

तरी वरील तक्त्यात दर्शविलेनुसार त्या त्या संवर्गातील कर्मचारी यांना सदयस्थितीत कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव विचारात घेवून तसेच त्यांच्या कामाची निकड लक्षात घेवून तसेच सदर कर्मचारी सद्य:स्थितीत कार्यरत असल्याने नियुक्तीचा कालावधी संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ०५दिवसाचा सेवा खंड करुन रु. ८०००/- मात्र एकत्रित मानधनावर ०६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी ठेवणेस मा. आयुक्तसो यांनी मान्य केले आहे. सदरचा विषय मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच कार्यालयीन अहवालासअधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय घेवून त्यानुसार विभागाने पुढील कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-२८ प्रभाग क्रं.१५ मधील एम .जी.पी मार्फत टाकण्यांत आलेल्या पाईप लाईनवर क्रॉस कनेक्शन करुन तांतडीने पाईप लाईन टाकण्यांत आली त्यासाठी झालेला खर्च रु. २,२२,६४६/- मात्र खर्चास मनपा अधिनियमातील प्रकरण ५ (२)(२) नुसार कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार प्रस्तावात नमूद कामी झालेल्या खर्च रु. २,२२,६४६/-मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३०दिनांक ४/६/२०२०

धुळे मनपा हद्दीतील प्र.क्र.१५ मधील नूतन कृषी नगर, शिवम नगर , उदय नगर , मित्रकुंज सोसा., भागात पाईप लाईन ही जीर्ण झालेली असल्याने बऱ्याच ठिकाणी फुटलेली असून त्यामुळे सदर भागात दुषित पाणीपुरवठा होत असल्याने सदर ठिकाणील नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न उद्भवला आहे. सदर परिसरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, धुळे मार्फत १६० एम.एम. ची एच.डी.पी. पाईप लाईन टाकणेत आलेली आहे. त्या पाईप लाईन वरून सदर भागाला पाणीपुरवठा केल्यास नागरिकांची पाण्याची सोय होणार आहे. त्यामुळे सदरचा भागात क्रॉस कनेक्शन करून पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे.

तरी सदरचे कामे हे नागरिकांचा पिण्याचा पाण्याच्या प्रश्न लक्षात घेता सदर काम करणे आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा श्री. संजय दगडू गायकवाड, ठेकेदार यांचे कडून करून घेणेत आलेले आहे. सदर कामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.२,२२,६४६/- मात्र आलेला आहे.तरी सदर काम विना निविदा करणे कामी तसेच काम करणे कामी आलेला रु.२,२२,६४६/-मात्र खर्चास मनपा अधिनियम १९४९ चा प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार प्रस्तावात नमूद कामी झालेल्या खर्च रु.२,२२,६४६/-मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ८ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक १८/०६/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक १८/०६/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता मा.श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
४	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य
५	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
६	श्रीमती.उदासी कशीश गुलशन	सदस्या
७	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
८	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
९	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
१०	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
११	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
१२	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१३	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या
१४	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. गणेश गिरी	अतिरिक्त आयुक्त
२	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
३	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
४	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
५	श्री. विनायक कोते	सहा. आयुक्त
६	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखापरीक्षक

७	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
८	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी
९	डॉ. श्री महेश मोरे	आरोग्याधिकारी
१०	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
११	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
१२	श्री. रमजान अन्सारी	कार्यालयीन अधिक्षक
१३	श्री. युवराज वाघ	परवाना अधिक्षक
१४	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१५	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१६	श्री. चंद्रकांत उगले	पा. पु. ओव्हरसिअर
१७	श्री. सी.सी. बागुल	ओव्हरसिअर पा.पु.
१८	श्री. हेमंत पावटे	ओव्हरसिअर पा.पु.
१९	श्री.विशाल निंबाळकर	अभिलेखापाल

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या प्रारंभी मा. सभापती यांनी सभागृहात सादर केलेली सूचना

म. सभापती — यापूर्वी झालेल्या बैठकीत नगरसचिव यांनी सभा शास्त्राविषयी सभागृहात सूचना सादर केलेली होती.सभाशास्त्रानुसार त्याची सूचना बरोबर होती. परंतु याठिकाणी सन्मा.नगरसेवकांचे प्रभागातील अडचणी मांडणेही व त्यांची सभागृहाच्या माध्यमातून निराकरण करणे आवश्यक असते. नगरसेवकाना त्यांच्या प्रभागातील अडचणी सादर करण्यासाठी सभागृह हे एकमेव ठिकाण आहे. यामुळे याबाबत संबंधित अधिका-यांच्या बैठका घेवून प्रश्न मार्गी लागत आहे व कामासही गती मिळत आहे.

आजच्या बैठकीस नगररचनाकार उपस्थित नाहीत.सभेच्या अजेंडा सर्व अधिका-यांना पाठविण्यांत येतो.त्यामुळे त्यांनी बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक होते.याबाबत म.उपायुक्त यांनी त्यांच्याकडुन लेखी खुलासा घेवून पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज

सन्मा. सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार व सौ. मंगला सुरेश पाटील यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.तसेच सन्मा. सदस्य श्री. सुनिल भाऊ सोनार यांना पुढील बैठकीत उपस्थित राहणेबाबत नगरसचिव यांनी सूचित करावे.

सन्मा. सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार व सौ. मंगला सुरेश पाटील यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.तसेच सन्मा. सदस्य श्री. सुनिल भाऊ सोनार यांना पुढील बैठकीत उपस्थित राहणेबाबत नगरसचिव यांनी सूचित करावे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा.सभापती महोदय यांचेकडून सभेच्या सुरुवातीस श्रध्दांजली अर्पण करणेबाबत आलेला प्रस्ताव

गेल्या २/३ दिवसापासून चीनच्या बॉर्डरवर वलगाना खो-यातील चीनी सैन्यांच्या संघर्षामध्ये आपले सैनिक बाधव वीरगती प्राप्त होवून शहीद झाले आहे. त्या शूरवीरांना तसेच जळगाव जिल्हयांचे माजी खासदार हरिभाऊ जावळे यांचे देखील निधन झाले आहे. त्यामुळे सर्वांना आजच्या बैठकीत भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

सूचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३२ दिनांक १८/०६/२०२०

सन्मा. सभापती श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे यांच्या यादीनुसार गेल्या २/३ दिवसापासून चीनच्या बॉर्डरवर वलगाना खो-यातील चीनी सैन्यांच्या संघर्षामध्ये आपले सैनिक बाधव वीरगती प्राप्त होवून शहीद झाले आहे. त्या शूरवीरांना तसेच जळगाव जिल्हयांचे माजी खासदार हरिभाऊ जावळे यांचे देखील निधन झाले आहे.

वरील सर्व मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुबियांचे दु:खात सहभागी असून मृतआत्मयास चिरशांती प्रदनार्थ दोन मिनिटे मौन राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली समपित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- २९ मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यत मंजुरी दिलेल्या कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर (दि.१/११/२०१९ ते ३०/४/२०२०) .

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे सदर विषयात अनुक्रमांक १३ वर रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी २४ लाख व अनुक्रमांक ३३ वर देवपूर भागातील खड्डे भरण्यासाठी नऊ लाख असे एकूण ३५ लाख रुपयांची खड्डे बुजवण्याचे काम झालेले आहे यात काम झाले आहे किंवा नाही याबाबत कामाची सद्यस्थिती नमुद केलेली नाही तसेच कुठले खड्डे बुजवण्यात आले याबाबत माहिती देणे आवश्यक आहे तसेच विषय क्रमांक १४,१६,१९ या ठिकाणी शेरा कॉलममध्ये रिकामे कॉलम आहेत तसेच हा विषय क्रमांक २८, २९, ३० या ठिकाणी कामाच्या ठिकाणी फक्त सर्वे नंबर चा उल्लेख केलेला आहे प्रभागाचा उल्लेख नाही त्यामुळे सदरचे काम कोणत्या प्रभागात झाले याबाबत अर्थबोध होत नाही तसेच विषय क्रमांक ३२ मध्ये प्रभाग क्रमांक १६,१७,१८ यामध्ये दुरुस्तीसाठी १६

लाख रुपये खर्च दर्शविला आहे सदर काम झाले आहे किंवा नाही याचा खुलासा करावा तसेच धुळे शहरात वृक्ष लागवडीसाठी खड्डे करण्या करता टेंडर काढण्यात आलेले आहे ते खड्डे कुठे केले याबाबत माहिती मिळणे आवश्यक आहे.

म.भारती माळी — याठिकाणी खड्डे बुजवण्यासाठी २४ लक्ष देवपूर भागासाठी १० लक्ष रुपये खर्च दाखवलेला आहे सुमारे ४० ते ५० रुपये खड्डे बुजवण्यासाठी खर्च करण्यात आलेले आहेत कोणते खड्डे बुजवले याची माहिती नाही मी माझ्या प्रभागातील परिस्थिती दाखविते आपण मागे वृक्ष लागवडीसाठी खड्डे खोदले होते यावर खर्च केलेला होता.आपण वृक्ष लागवडीसाठी मशिनरी खरेदी केलेली आहे मग त्यावर खर्च कसा झाला सदर काम कोणत्या निधी अंतर्गत आहे याचा उल्लेख नाही खड्डे बुजवणे वर फार मोठा खर्च झालेला आहे रस्ते दुरुस्तीची कामे आवश्यक आहे ह्या यादीतील कामे झाली आहेत का किंवा करावयाची आहेत याची माहिती द्यावी आमच्याही वार्डात नागरिकांचे अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न आहेत.

म. संतोष खताळ — नगरसेवकांना ५० हजार रुपये सुद्धा रस्ते दुरुस्तीसाठी मिळत नाही या ठिकाणी विशिष्ट प्रभागांमध्ये कामे घेतली जातात माझ्या प्रभागात काही खड्डे बुजवले गेलेले नाही फाशी पुलाच्या खालचा रोड अत्यंत खराब झालेला आहे त्यावर कोणाचे लक्ष नाही सर्वांना सारखा न्याय द्यावा ही विनंती या ठिकाणी यादीमध्ये काही भागात मोठ्या प्रमाणावर कामे दिसत आहेत व काही भागात कामे दिसत नाही या ठिकाणी आपली सत्ता आहे सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे.

म. अमोल मासुळे — या यादीतील अनुक्रमांक १९ येथे वृक्ष लागवडीसाठी खड्डे करण्यासाठी १५ लाख खर्च दर्शवलेला आहे चे काम कोणत्या एजन्सीला दिले त्यांची माहिती द्यावी व कोणते खड्डे बुजवले याबाबत माहिती द्यावी.

म.उगले — खड्डे बुजवण्याचे काम मनपा अंतर्गत आहे यापूर्वी निर्णय झाल्याप्रमाणे जुनी मनपाच्या बाजूला पारोळारोड हद्दीपर्यंत तसेच वडजाई रोड चाळीसगाव रोड महात्मा फुले पुतळा ते स्टेशन रोड या ठिकाणी शहर हद्दीतील रस्ते दुरुस्त करण्यात आलेले आहेत खड्डे बुजवण्यात आले आहे तसेच देवपूर भागात खडी मुरुमाने रस्ते बुजवण्यात आले असून जयहिंद ज्युनिअर कॉलेज ते जयहिंद सिनियर कॉलेज पर्यंत खड्डे बुजवण्याचे काम आदेशाप्रमाणे मुरुमाने बुजवण्यात आलेले आहेत.

मा. सभापती — आपण खड्डे बुजवण्याचे टेंडर काढलेले आहे मी याठिकाणी नमूद करू इच्छितो की सदरचे टेंडर तुकडे-तुकडे करून करण्यात आलेले आहे याचा उद्देश काय २५ लाखाच्या आत एस्टिमेट केले जातात एकत्रित रित्या टेंडर निघणे आवश्यक आहे.आपण ठेकेदाराच्या हितासाठी टेंडर करीत नाही देवपूर भागात भूमिगत गटार योजनेच्या रस्त्याचे काम ठेकेदार करणार आहे त्यामुळे देवपुर येथे खड्डे बुजवले ते कोणते याबाबतीत खुलासा करावा सदर विषय स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ पाठवले आहेत याठिकाणी कोणते खड्डे बुजवले याबाबत छायाचित्र जोडण्यात यावे सदर कामाबाबत कोणतीही आकलन होत नाही सदर कामाचे एस्टिमेट जाणून-बुजून २५ लाखाच्या आत केले जाते. प्रभाग क्रमांक १७ मध्ये अरुणकुमार वैद्य नगर पासून ते मित्र कुंज सोसायटी पावेतो काँक्रीट गटार करण्याचे काम १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत झालेले आहे सदरचे काम सहा महिन्यानंतर अवलोकनार्थ येत आहे सदरची कामे १५ दिवसाच्या आत नियमाप्रमाणे घेणे आवश्यक आहे तसेच माननीय आयुक्त साहेब यांना पंचवीस लाख पर्यंत खर्चाच्या प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार आहेत परंतु काही वेळेस देयकाची रक्कम २५ लाखाच्या वर जाऊ शकते त्यामुळे त्यास स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असते अशी देखील प्रस्ताव स्थायी समितीच्या निदर्शनास आणावी व मान्यतेनंतर सदर देयके अदा करण्याबाबत कार्यवाही करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३ दिनांक १८/६/२०२०

मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते२५ लाखापर्यंत मंजुरी दिलेल्या कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर (दि.१/११/२०१९ ते ३०/४/२०२०)अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशाची यादी

अनु क्र.	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामाचे नाव	रक्कम	निधी
१	१८७	०६/११/२०१९	प्र.क्र.११ दाता सरकार भवन येथील मोकळ्या जागेजवळ श्री. सतीश महाले ते वाडेकर यांच्या घरापर्यंत,पवननगर येथे विविध ठिकाणी गटार करणे.	९,९५,४६५/-	नगरोत्थाथान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत
२	१८९	०६/११/२०१९	प्र.क्र.११ मध्ये विठ्ठल नगर भागात हरी बोरुडे यांचेघरापासून ते पाटील याचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता व गटार करणे.	८,२५,४४४/-	नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत
३	१९०	०६/११/२०१९	धुळे शहरातील पांझरा नदी वरील सावरकर पुतळ्यासमोरील पुलावर रेलिंग बसविणे व विअरिंग कोट दुरुस्त करणे.	२४,६२,७२०/-	मनपा निधी अंतर्गत
४	१९१	०६/११/२०१९	प्रभाग क्र ७मध्ये राकेश परदेशी ते संजय कनोज यांचेघरापर्यंतकॉंक्रीट रस्ता करणे.	८,४५,०५५/-	नगरोत्थाथान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत
५	१९४	१४/११/२०१९	प्र.क्र.७ जय अंम्बे फॅन्सीस्टोर ते स्वामी टेउराम स्कूल कंपाऊंड पर्यंत आर.सी. सी. गटार करणे.	१९,९९,७८८/-	नगरोत्थाथान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत
६	१९८	१४/११/२०१९	प्र.क्र.७ मध्ये गीता कटारिया यांचे घर ते जे.डी. पोपली यांचे घर ते ब्लॉक नं ७ पर्यंत सिमेंट कॉंक्रीट गटार करणे.	१०,००,१६९/-	नगरोत्थाथान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत
७	१९९	१४/११/२०१९	प्र.क्र.५ मध्ये शिवाजी नगर भागातील गणपती मंदिर जवळील खुल्या जागेत उद्यान विकसित करणे.	११,९४,०७०/-	नगरोत्थाथान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत
८	२०४	०५/१२/२०१९	प्रभाग क्र १८ सहजीवन नगर, समता नगर भागात ढाके गुप्ता ते खोडे ते पाखले यांचे घरा पावेतो भूमिगत गटार करणे.	१४,९८,५५८/-	नगरोत्थाथान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत
९	२०५	०५/१२/२०१९	प्रभाग क्र १८ मध्ये भोलेबाबा नगर , कोळवले नगरभागातकिशोरराजपूतघर ते मनोज वाघ घर ते शरद खंडागळे ते भाई पंजाबीघरापावेतो भूमिगत गटार करणे.	१५,७०,५८६/-	नगरोत्थाथान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत
१०	२०६	०५/१२/२०१९	प्रभाग क्र १८मध्ये मोहाडी सर्व्हे नं ४८७/२ संजयभाऊ नगरयेथे शरद रघुवंशी ते गावडे ते देवचंद पाटील योगीराज पाटीलयांचे घरापावेतो ड्रेनेज लाईन टाकणे.	९,९३,७६५/-	नगरोत्थाथान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत
११	२०८	२१/१२/२०१९	प्रभाग क्र १८मध्ये अवधान गावातील अमरधाम दुरुस्ती करणे.	९,९९,४७०/-	नगरोत्थाथान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत
१२	२१२	०७/०१/२०२०	प्रभाग क्र. १९ मध्ये ख्वाजा नगर सलीम आपा ते अल खैर हायस्कूल येथे कॉंक्रीट गटार करणे.	९,८७,०६२/-	नगरोत्थाथान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत
१३	२१७	१३/०१/२०२०	धुळे शहरातील मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजविणे बाबत.	२४,९६,०७५/-	मनपा निधी अंतर्गत
१४	२१९	१५/०१/२०२०	प्र.क्र.१७ मध्ये अरुणकुमार वैदयनगर पासून मित्रकुंज सोसा. पावेतो कॉंक्रीट गटार करणे (श्री. पोप्तानी यांचे घरापासून ते श्री देवरे यांचे घरापर्यंत).	७,४८,५०६/-	

१५	२३९	०६/०२/२०२०	प्र.क्र. १८ अवधान गावात श्रीराम मंदिर समोरील रस्ता कॉक्रीट करणे.	६,६४,५९६/-	१४ व्या वित्त अंतर्गत
१६	२४०	०६/०२/२०२०	प्र.क्र. १६ केरुजी आप्पा घरापासुन ते संतोष महानोर यांचे घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे.	१४,३३,४५४/-	
१७	२४३	१०/२/२०२०	प्रभाग क्र. ९ गांधी पुतळा ते ज्योती टाकीज पावेतो रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.	१९,९८,८८९/-	मनपा निधी अंतर्गत
१८	२४४	१२/२/२०२०	प्र.क्र.२ मध्ये विद्या नगर भागातील प्लॉट नं. २२१ ते प्लॉट नं. २२६ पावेतो व प्लॉट नं. १४३ ते प्लॉट नं. १४८ व प्लॉट नं. ६५ ते प्लॉट नं.२२० पावेतो सिमेंट कॉक्रीट गटार करणे.	१९,९८,१३३/-	मनपा निधी अंतर्गत
१९	२५१	२०/०२/२०२०	धुळे शहरातील विविध भागात वृक्ष लागवडी करिता खड्डे खोदकाम करणे.	१५,९५,११२/-	
२०	२५७	०२/०३/२०२०	प्र.क्र. ५ ओम नगर स.नं.७५/१ अ ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड करणे.	११,६८,४८३/-	जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत
२१	२५८	०२/०३/२०२०	प्र.क्र.५मध्ये सुशांत कॉलनी स.नं. ३८ /२ अ ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड करणे.	१४,५५,७०७/-	जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत
२२	२६७	०३/०३/२०२०	प्र.क्र.१८ मध्ये अवधान येथे १० सीट सार्वं. शौचालय बांधणे.	१३,५३,५७८/-	१४ व्या वित्त अंतर्गत
२३	२६९	०३/०३/२०२०	चितोड गावातील गवळी वाडा स्मशान भूमी येथे रोड बांधणे.	१५,५४,९०७/-	१४ व्या वित्त अंतर्गत
२४	२७०	०३/०३/२०२०	प्रभाग क्र. १८ मध्ये खालचे गाव श्री.प्रशांत गोसावी ते श्री. भामरे व इतर भागात भूमिगत गटार करणे.	१३,८८,८८५/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत
२५	२७१	०३/०३/२०२०	प्रभाग क्र. १८ मध्ये खालचे गाव इंदिरा नगर भागात श्री.प्रशांत गोसावी ते काळू शेवाळे घरापर्यंत नेवाडेकर यांच्या घरापासून ते श्री. शिंगाडे यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	२०,६१,९९३/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत
२६	२७२	०३/०३/२०२०	प्रभाग क्र. १८ मध्ये खालचे गाव इंदिरा नगर भागात मारोती मंदिर ते शिवाजी व्यायाम शाळा श्री.सुरेश चैत्राम ते बाळू आव्हाळे आबा शिंपी ते श्री.बच्छाव यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१३,८८,८८५/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत
२७	२७३	०३/०३/२०२०	प्रभाग क्र. १८ मध्ये खालचे गाव इंदिरा नगर भागात मारोती मंदिर ते शिवाजी व्यायाम शाळा, श्री. सुरेश चैत्राम ते बाळू आव्हाळे, आबा शिंपी ते बच्छाव यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	२०,६१,९९३/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत
२८	२७६	०३/०३/२०२०	सर्व्हे नं.५२५ शर्मा यांचे घरापासून ते श्री. सुर्यवंशीयांचेघरापावेतोरस्ताडांबरीकरण करणे.	२४,९९,४९१/-	सहा.अनुदान अंतर्गत
२९	२८२	०३/०३/२०२०	सर्व्हे नं.४८७ पुष्पक अण्णा यांचे घर ते गुप्ता ते अनिल सांगळे ते सुनील सुराणा यांच्या घरापर्यंतरस्ताकाँक्रीटकरण करणे.	२४,८३,६९४/-	सहा.अनुदान अंतर्गत
३०	२८३	०३/०३/२०२०	सर्व्हे नं.४८७ राजू गिंडोदिया यांच्या घरापासून ते अतुल विभांडिक यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२४,९९,३९१/-	सहा.अनुदान अंतर्गत
३१	२८४	०३/०३/२०२०	सहा.अनुदान अंतर्गत शासकीय दुधडेअरी मालवारी यांच्या घरापासून ढाके ते राजु मराठे ते पालवे यांच्या चक्की पर्यंत रस्ता काँक्रीटकारण करणे.	२४,६७,९९८/-	सहा.अनुदान अंतर्गत
३२	२८५	०३/०३/२०२०	प्रभाग क्र.१५,१६,१७,१८ या प्रभागा मधील विविध कॉलनी व परिसरात पाईप लाईन,	१६,७७,०२६/-	पाईप लाईन निगा दुरुस्ती अंतर्गत

			व्हॉल,वनळकनेक्शन गळती बंद करणे.		
३३	२८६	०४/०३/२०२०	देवपूर परिसरातील मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजविणे.	९,९३,९५६/-	मनपा निधी अंतर्गत
३४	२८७	०४/०३/२०२०	प्र.क्र.५ नकाणे रोड वरील शिवमंदिरा वर व्यायाम शाळा बांधणे.	१२,८८,०८६/-	मनपा निधी अंतर्गत
३५	२८८	०४/०३/२०२०	प्र.क ९ गायकवाड चौक ते वरखेडी रोड ते पोलीस चौकी गटार करणे.	२४,९४,२९१/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत
३६	२८९	०४/०३/२०२०	प्र.क्र ११ मध्ये बाळापूर रतन विश्राम पाटील ते विनय रघुनाथ मिस्तरी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीत करणे	१३,९५,१६३/-	१४ व्या वित्त आयोगा निधी अंतर्गत
३७	३०२	२०/३/२०२०	प्र.क्र. १५ मध्ये कालिकादेवी नगर बोर्डापासून ते श्री. पटाईत यांच्या घरा पर्यंत व कुरकुले ते वाघ बापू यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे.	२४,७१,१७०/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना
३८	३०४	२०/३/२०२०	प्र.क्र.१५ मध्ये गोदाई कॉलनी येथे श्री सूर्यवंशी ते निकुंभे यांच्या घरा पर्यंत व श्री अमृत सागर ते श्री.चव्हाण यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे.	२४,७१,१७०/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना
३९	३०५	२०/३/२०२०	प्र.क्र.४ मध्ये चंदन नगर भागात बनछोडे यांच्या घरापासून ते बाबा वानखेडे घरा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२१,०१,०८७/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना
४०	३०६	२०/३/२०२०	प्र.क्र.४ मध्ये चंदन नगर डॉ. वाघमारे यांचे घरापासून जागृती मित्र मंडळ बोर्डा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	२१,४८,६२१/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना
४१	३०७	२०/३/२०२०	प्र.क्र.१ मध्ये लक्ष्मी नगर, परभणी वाडा ,गुरुदत्त नगर वड भिलाटी ,जि.प. शाळे मागील भिलाटी वलवाडी भागात बंदिस्त गटार करणे.	२३,६२,०२७/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना
४२	३०८	२०/३/२०२०	प्र.क्र.७ शितल कॉलनी स.न. ८/२ मधील ओपनस्पेसला वॉल कंपाऊंड करणे.	१८,६१,३११/-	जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत
४३	३०९	२०/३/२०२०	प्र.क्र. ७ सर्व्हे नं. ८/१ मधील ओपनस्पेसला संरक्षण भिंत बांधणे.	१८,७४,६७५/-	जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत
४४	३१२	२०/३/२०२०	प्र.क्र.३० नवजीवन नगर हरिभाऊ अजळकर घरासमोर मोकळ्या जागेत शौचालय बांधणे.	८,०९,८९२/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना
४५	३१५	२३/३/२०२०	प्र.क्र.१५ नारायण मास्तर चाळ ते एल.आय.सी कॉलनी पावेतो रस्ता व गटार करणे.	२९,८०,५७७/-	नागरी दलित वस्ती सुधार योजना
४६	०१	०१/०४/२०२०	प्र.क्र.१७ गौरी हौ.सो.व कोतवाल नगर भागात आर.सी.सी. गटार करणे.	१०,०७,९३४/-	मनपा निधी अंतर्गत
४७	०२	०१/०४/२०२०	प्र.क्र.१७ शेलारवाडी १०० फुटी डी.पी. रोड भागात रस्ता काँक्रीट करणे व डांबरीकरण करणे.	९,९६,३३५/-	मनपा निधी अंतर्गत
४८	०३	०१/०४/२०२०	प्र.क्र.१७ मधील जय मल्हार नगर श्री.सोनार यांचे घर ते डी.पी. रोड पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	१०,५७,२९२/-	मनपा निधी अंतर्गत
४९	०४	०९/०४/२०२०	प्र.क्र.१७ रासकर नगर ते सेवादास नगर भागात रस्ता काँक्रीट करणे,व गटार करणे.	९,९९,८५२/-	मनपा निधी अंतर्गत
५०	०५	०९/०४/२०२०	प्र.क्र.६ गाव दरवाजा ते मयूर पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१५,९७,३४९/-	मनपा निधी अंतर्गत

सदर माहिती मे. स्थायी समिती मध्ये अवलोकणार्थ सादर करण्यांत आली आहे.

सदर माहिती नियमाप्रमाणे मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेल्या कार्यादेशाच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आंत मे. स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ ठेवण्याची दक्षता यापुढे घ्यावी. तसेच प्रस्तावावरील खर्च 25 लाख मर्यादेपेक्षा जास्त होत असेल तर त्यास मे. स्थायी समितीची मान्यता घ्यावी व नंतरच सदर देयके अदा करण्यांची कार्यवाही करावी. सही/-x x x

सदरच्या

सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :-३० धुळे मनपा हद्दीतील मनोहर टॉकीज जवळील छत्रपती श्री. शिवाजी महाराज स्मारक येथे कलर काम व सुशोभिकरण करणेसाठी झालेला खर्च रुपये ६१,९६२/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम५(२)(२)अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सदर प्रस्तावासंदर्भात झालेल्या कामाचे छायाचित्र सोबत जोडावे.पुतळया परिसराची किरकोळ डागाडुगी किंवा सुशोभिकरणाचे काम बाकी असल्यास तेही करुन घेण्यांत यावे. सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्रायाची पूर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार सदर कामास व झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३४ दिनांक १८/६/२०२०

दरवर्षी दि.१९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्सव संपूर्ण महाराष्ट्र राज्यात व त्याचप्रमाणे धुळे शहरातही मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत असते.धुळे शहरातील प्रमुख शिवाजी महाराजांचा अस्तित्वातील पुतळा मनोहर टॉकीज जवळ याठिकाणी आहे.संपूर्ण शहरातील नागरिक त्यादिवशी सदर ठिकाणी छत्रपती श्री शिवाजी महाराजांना वंदन करण्यास येत असतात.शहरातील प्रमुख मिरवणुकांची सुरुवात सदर स्मारकाजवळून होते.सदर स्मारकाच्या आजूबाजूस लोखंडी रेलिंग बसविण्यात आलेली असून उक्त रेलिंगचा कलर बऱ्याच प्रमाणात खराब झाला असून त्याठिकाणी कलर काम करणे व सुशोभिकरणासाठी इतर अनुषंगिक कामे करणे अत्यंत आवश्यक आहे.

त्यानुसार ठेकेदार मे.रितेश कन्सस्ट्रक्शन यांना सदर काम तात्काळ करण्यास सांगितले होते. सदर ठेकेदार यांना सूचना दिल्यानुसार सदरचे काम करण्यात आले आहे. उक्त कामास अंदाजपत्रकानुसार खर्चरु.६१,९६२/- मात्र इतका खर्च करण्यात आला असून सदर कामाचे देयक मिळणेबाबत संबधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

तरी उक्त काम हे तात्काळ करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा मे. रितेश कन्सस्ट्रक्शन ठेकेदार यांच्या कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ५(२) (२)अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव सभेपुढे सादर झालेला आहे.

सदर प्रस्तावासंदर्भातझालेल्या कामाचे छायाचित्र सोबत जोडावे. पुतळया परिसराची किरकोळ डागाडुगी किंवा सुशोभिकरणाचे काम बाकी असल्यास तेही करुन घेण्यांत यावे. सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्रायाची पूर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार सदर कामास व झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३१ मानधन तत्वावरील संगणक प्रोग्रामर यांना पुनश्च ६ महिने कालावधीसाठी दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती यापूर्वी आपण मानधन तत्वावरील संगणक ऑपरेटर यांना 8000 रु. प्रतिमहा मानधन देऊन मुदत वाढ देण्यांचा विषय मंजूर केला होता.या प्रस्तावात15000 नमूद आहे. याबाबत खुलासा करावा.

म.कार्यालयीन अधिक्षक यापूर्वी मान्यता दिलेल्या प्रस्तावात संगणक ऑपरेटर यांना मुदतवाढ दिलेली आहे. आताच्या प्रस्तावात असलेले पद हे संगणक प्रोग्रामर चे आहे. त्यांच्याकडेस स्वच्छ सर्वेक्षण व ऑनलाईन डाटा अपडेट करणे इत्यादी महत्वाची कामे असल्याने त्यांचे मानधनात फरक आहे.

म. अमोल मासुळे आपण अशा पदांना किती वेळा मुदत वाढ देऊ शकतो.भविष्यात सदर कर्मचारी कायम सेवेचा दावा करण्यांची शक्यता नाकारता येत नाही.

म. संतोष खताळ मुदत वाढ देण्यांचे अधिकार कोणाचे आहे.

म. कार्यालयीन अधिक्षकआपण यापूर्वी 3 वेळा मुदत वाढ दिलेली आहे. मुदतवाढ देतांना सदर कर्मचा-यांची काही काळ सेवा खंडीत करुन त्यांना मुदत वाढ देण्यांत येते.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदत वाढ देता येते.

म. उपायुक्त आपण यापूर्वी संगणक ऑपरेटर पदाची जाहिरात प्रक्रिया केलेली असून अर्ज मागविलेले आहेत. परंतु कोरोनामुळे सदरचे काम प्रलंबीत आहे. आपण लवकरच सदर प्रक्रिया पूर्ण करुन कार्यवाही करणार आहोत.

म. सभापती संबंधित मानधनावरील कर्मचारी हे ब-याच दिवसापासून मनपा मध्ये काम करीत आहे त्यामुळे त्यांना कामाचा अनुभव आहे. नवीन कर्मचारी नियुक्त केल्यास पुनश्च त्यांच्या प्रशिक्षणात वेळेचा अपव्यव होऊन कामात अडचणी निर्माण होतात त्यामुळे आपण जुन्या कर्मचा-यांना प्राधान्य देतो. व मुदतवाढ देतांना त्यांची सेवा खंडीत केली जाते.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत म.मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३५ दिनांक १८/६/२०२०

श्री मो. जुनैद मो. इम्रान अन्सारी संगणक प्रोग्रामर यांना जा क्र /धुमपा/आस्था/ १००० दि.३०/११/२०१९ पासून ०६ महिन्याकरीता कंत्राटी तत्वावर रु. १५०००/- मात्र मानधनावर नियुक्ती देण्यात आली होती.

तरी श्री मो. जुनैद मो. इम्रान अन्सारी यांची ६ महिने कालावधीची नियुक्तीची मुदत दि ३०/०५/२०२० रोजी संपुष्ठात येत आहे.

म सहा. सार्व आरोग्याधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसारी श्री मो. जुनैद मो. इम्रान अन्सारी हे आरोग्य विभागात संगणक प्रोग्रॅमर म्हणुन कार्यरत असुन त्यांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१८/२०१९, २०२० तसेच ओडीएफ+GFC व स्वच्छ महाराष्ट्र अभियानाअंतर्गत येणारे ऑनलाईन कामे योग्य प्रकारे वरिष्ठांच्या ओदशाप्रमाणे केले आहे. तसेच शासनाने दिलेल्या निर्देशानुसार GFC, ODF व इतर इनुषंगीक कामे आरोग्य विभागातील तांत्रिक स्वरुपाचे संगणकीय कामकारीता, तसेच घंटागाडी वाहनांना बसविण्यात आलेले जीपीएस (GPS) प्रणालीचे ऑनलाईन अहवाल तयार करणे हे काम श्री जुनेद अन्सारी यांचेकडून करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे.

सद्यस्थितीत महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड यांचे पार्टलवर घनकचरा व्यवस्थापनाचे दैनंदिन अहवाल रोज ऑनलाईन पोर्टलवर सादर करावे लागतात.

उक्त मानधनावरील कर्मचारी श्री.अन्सारी यांनी दि ११/५/२०२० रोजी पुनश्च ०६ महिन्याकरीता फेर नियुक्ती मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

तरी म. सहा. आरोग्याधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार श्री मो. मो. इम्रान अन्सारी मानधनावरील संगणक प्रोग्रॅमर यांना रु १५०००/- मात्र मानधनावर किमान जुनैद ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) नुसार मे.स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव सभेपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत म. मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३२ धुळे मनपा हद्दीत मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.१२ मधील १०० फुटी रोड अजान सायरा हायस्कूल ते सत्तारबाडा रस्ता काँक्रीटीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.फातमाबी नुरुल अमीन प्र.क्र. १२ व १९ मधील १०० फूटी रोडचे काम चांगले झाले पाहिजे. सदर काम महत्वाचे आहे.त्यामुळे कामाची गुणवतत्ता व दर्जा पाहणे महत्वाचे आहे.

म. संतोष खताळ सदर प्रस्तावात ठेकेदाराने-२२ टक्के कमीने दर नमूद केलेले आहे.परंतु कार्यालयीन अहवालात अंदाजपत्रकीय दराने काम देणेबाबत नमूद केले आहे.सदर काम कमीने होणार आहे किंवा अंदाजपत्रकीय दराने देण्यांत येणार आहे याचा खुलाखा करण्यांत यावा.

म. सभापती कार्यालयाने त्यांच्या अहवालात अंदाजपत्रकीय दराने दर मान्यता करणेबाबत नमूद केले आहे. नगरसचिव कार्यालयाकडेस त्या स्वरुपाचा कार्यालयीन अहवाल सादर झालेला आहे. यामध्ये तफावत आहे. याबाबत विभागाने खुलासा करावा.

म. ओव्हरसिअर सदरचे काम २२ टक्के कमीने आलेले आहे. टिपणीत अंदाजपत्रकीय दराने नजरचूकीने नमूद करण्यांत आलेले आहे. सदर प्रस्ताव २२टक्के कमीने दर मंजुरीसाठी सादर केलेला आहे. त्यानुसार मान्यता देण्यांस शिफारस आहे.

म. सभापती प्रस्तावाच्या संदर्भात प्रशासनाने त्यांची झालेली चूक मान्य केली आहे. तसेच संबंधित ठेकेदार यांचे दर कमीने असल्याने त्यांनी नियमाप्रमाणे बॅंकऑफ बडोदा यांचेकडील बॅंक गॅरंटी सादर केलेली आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्रायाची पूर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार प्राप्त झालेल्या सर्वात कमीने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३६ दिनांक १८/६/२०२०

धुळे मनपा हद्दीत मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.१२ मधील १०० फुटी रोड अजान सायरा

हायस्कूल ते सत्तारबाडा रस्ता काँक्रीटीकरण करणे. कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.दि.--मा.आयुक्त सो.धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.२४/०१/२०२० अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.१,३४,४९,६९५/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.उक्त बाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्रक्र.०१ दि.२२/०१/२०२० अन्वये रक्कम रु.१,३४,४९,६९५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./१५५ दि.०१/०२/२०२० अन्वये दि.०१/०२/२०२० रोजीचे दिव्य मराठी / पथदर्शी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.२४/०२/२०२० रोजी अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	
२	मे.हिंद कन्सट्रक्शन	**शे.-२२.००%कमीने**	**सर्वात कमी दर**
३	गायत्री कन्सट्रक्शन	शे.१% जास्तीने	
४	भूषण एल.चौधरी	अंदाजपत्रकीय दराने	
५	सचिन पुरषोत्तम सनेर	शे.२% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांनी दिलेले दर सर्वात कमी असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे सर्वात कमी आलेले दर शेकडा २२% कमीने यास मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्रायाची पूर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार याकामी मे. हिंद कन्स्ट्रक्शन यांचे सर्वात कमी -२२ % कमीने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३३ धुळे मनपा हद्दीत मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.१३ मध्ये श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळा भंगार बाजार पावेतो ते ८० फुटी रोड पावेतो रस्ता काँक्रीट व गटार करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.फातमाबी नुरुल अमीन प.क्र. १२ व १९ मधील १०० फूटी रोडचे काम चांगले झाले पाहिजे. सदर काम महत्वाचे आहे.त्यामुळे कामाची गुणवतत्ता व दर्जा पाहणे महत्वाचे आहे.प्रस्तावास मान्यता द्यावी.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्रायाची पूर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकीय दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३७ दिनांक १८/६/२०२०

धुळे मनपा हद्दीत मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.१३ मध्ये श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळा भंगार बाजार पावेतो ते ८० फुटी रोड पावेतो रस्ता काँक्रीट व गटार करणे. कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.--- दि.-मा.आयुक्त सो.धुळे यांचे टिपणी मंजुरीने

दि.२४/०१/२०२० अन्वये उक्त कामाबाबत रक्कमरु.२,१३,१२,९१७/-मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.०२ दि.२२/०१/२०२० अन्वये रक्कम रु.२,१३,१२,९१७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./१५४दि.०१/०२/२०२० अन्वये दि.०१/०२/२०२० रोजीचे लोकमत/वार्ता या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि. २४/०२/२०२०रोजी अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन	शे.४.००% जास्तीने	
२	मे.हिंद कन्सट्रक्शन	शे.५.००% जास्तीने	
३	मे.गायत्री कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.गायत्री कन्सट्रक्शन** यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार **मे. गायत्री कन्सट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने यांच्या दरास मंजुरीस्तव प्रस्ताव मे.स्थायी समिती पुढे सादर झालेले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्रायाची पूर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार याकामी **मे.गायत्री कन्सट्रक्शन** यांचे आलेल्या अंदाजपत्राकीय दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३४ धुळे मनपा हद्दीत प्र.क्र.१० मध्ये अरुण मोरे ते देविदास धनजी ठाकरे यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रोड व गटार करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत.सदरचे काम मनपा निधी अंतर्गत करणेस्तव त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव **नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.**

म. संतोष खताळ विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सदरचे काम यापूर्वी १४ व्या वित्त आयोगातून घेण्यांत आलेले होते. तथापि १४ व्या वित्त आयोगाच्या निकर्षत सदर काम बसत नसल्याने सदर काम मनपा निधिमध्ये करणेबाबत यापूर्वी स्थायी समिती मध्ये ठराव पारीत करण्यांत आलेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्रायाची पूर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकीय दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३८ दिनांक १८/६/२०२०

धुळे मनपा हद्दीत मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.१० मध्ये अरुण मोरे ते देविदास धनजी ठाकरे यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रोड व गटार करणे कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.--- दि.---- मा.आयुक्त सो. धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०५/०६/२०२० अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२५,९८,८५६/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.३१२ दि.५/११/२०१९ अन्वये रक्कम रु.२५,९८,८५६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./ पा.पु.वि./ ९२७ दि.५/१२/२०१९अन्वये दि.१/२/२०२० रोजीचे लोकमत /मर्डर या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीतदि.३०/१२/२०१९ रोजी अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	**कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव**	**दिलेले निविदा दर**	**शेरा**
१	श्री.भूषण एल.चौधरी	शे.२.००% जास्तीने	
२	श्री.हर्षल पी देवरे	शे.३.००% जास्तीने	
३	मे.एकविरा कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.एकविरा कन्सट्रक्शन यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सदरचे काम यापूर्वी १४ व्या वित्त आयोगांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले होते.

तथापि १४ व्या वित्त आयोगाच्या निधी अंतर्गत अनुज्ञेय असणारी कामे वगळून उर्वरित कामे मनपा निधी अंतर्गत शासन निर्णयानुसार करण्यास स्थायी समिती ठराव क्र.२५ दि. २८/५/२०२० नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरचे काम मनपा निधी अंतर्गत करण्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

सबब कंत्राटदार **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने यांच्या दर मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्रायाची पूर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार याकामी **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांचे आलेल्या अंदाजपत्रकीय दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे
नगरसचिव कार्यालय
स्थायी समिती सभा क्रमांक ११ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक ०६/०८/२०२०
वेळ दुपारी ४-३० वाजता.

शासनाच्या दिनांक ३/७/२०२० च्या आदेशानुसार धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑनलाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक ०६/०८/२०२० रोजी दुपारी ४-३० वाजता **मा.श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा,धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह घेण्यांत आली या ऑनलाईन सभेसाठी खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन उपस्थित होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्री.सोनार सुनिल वसंतराव	सदस्य
४	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
५	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य
६	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
७	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
८	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
९	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
१०	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
११	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१२	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या
१३	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. अजिज शेख	आयुक्त
२	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
३	श्री. विनायक कोते	सहा. आयुक्त
४	श्री. दिपकांत वाघ	उप मुख्य लेखापरीक्षक
५	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
६	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव

७	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी
८	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
९	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री. लक्ष्मण पाटील	सहा.आरोग्याधिकारी
११	श्री. रमजान अन्सारी	प्र. कार्यालयीन अधिक्षक
१२	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१३	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१४	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बां.वि.

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मो स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.आपली आज प्रथमच शासनाच्या आदेशानुसार ऑन लाईन सभा आयोजित करण्यांत आलेली आहे. मागील २ वेळेस अपरिहार्य व तांत्रिक अडचणीमुळे स्थायी समिती ऑन लाईन बैठका रद्द करण्यांत आलेल्या होत्या. आजची ही प्रथमच ऑन लाईन बैठक असल्याने सर्वांनी सहकार्य करावे ही विनंती करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज

सन्मा. सदस्य श्री. मन्सुरी मुख्तार कासिम यांनी महत्वाच्या कामासाठी बाहेरगांवी असल्याने सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती नुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३९ दिनांक ०६/०८/२०२०

सन्मा.सदस्य श्री.मन्सुरी मुख्तार कासिम यांनी महत्वाच्या कामासाठी बाहेरगांवी असल्याने सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती नुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ३५ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
वि.२८/५/२०२०, ४/६/२०२० व १८/६/२०२०)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.युवराज पाटील — मागील सभांचे इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४० दिनांक ०६/०८/२०२०

मागील स्थायी समिती सभा

१) दि.२८/५/२०२० रोजीचे स्थायी समिती ठराव नंबर ५ ते २५ अखेर क्रमश तसेच बैठकीत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील सभापतीनी दिलेले निर्णय वाचून कायम करण्यांत करण्यांत येत आहे.

२) दि.४/६/२०२० रोजीचे स्थायी समिती ठराव नंबर २६ ते ३०अखेर क्रमश तसेच बैठकीत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील सभापतीनी दिलेले निर्णय वाचून कायम करण्यांत करण्यांत येत आहे.

३) दि.१८/६/२०२० रोजीचे स्थायी समिती ठराव नंबर ३१ ते ३८अखेर क्रमश तसेच बैठकीत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील सभापतीनी दिलेले निर्णय वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ३६ मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यत मंजुरी दिलेल्या कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर.
(दि.१/५/२०२० ते ३०/६/२०२०) अखेर

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती मा. आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु. 5 लाख ते 25 लाखापर्यत मंजुरी दिलेल्या बांधकाम विभागाकडील कार्यादेशाची वाचून माहिती देण्यांत आली.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४१ दिनांक ०६/०८/२०२०

मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यत मंजुरी दिलेल्या कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी. (दि.१/५/२०२० ते ३०/६/२०२०) अखेर

अ.क्र	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामाचे नाव	रक्कम	निधी
१	०९	०५/०५/२०२०	प्र.क्र.१ मध्ये इंदिरानगर भागात मारोती मंदिर ते नाला श्री पाटील ते सुदाम वाणी ते दादा मोरे ते दीपक पाटील ते नाला रस्ता काँक्रीट करणे.	२३,६८,८७६/-	नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत
२	१०	०५/०५/२०२०	प्र.क्र.१ युगंधर कॉलनी, धनदाई कॉलनी येथे रस्ते काँक्रीट करणे.	२१,५३,६७५/-	नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत
३	१२	०८/०५/२०२०	प्र.क्र.५ आंबेडकर नगर महादेव मंदिर ते ईश्वर मिल ते देविदास न्हावी दुकान चौकापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१३,५४,१३४/-	नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत
४	१४	२९/०५/२०२०	प्र.क्र.७भोईवाडा येथे भिमराव मोरे ते धनसिंग मोरे यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	८,४२,७७७/-	नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत
५	१५	२९/०५/२०२०	प्र.क्र.७ स्वामी टेउराम हायस्कूल ते श्रीकृपा कटलरी पर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१४,०१,११२/-	नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत
६	१६	२९/०५/२०२०	प्र.क्र.१० बर्फ कारखाना ते वरखेडी रोड पापा घारू यांच्या घरापर्यंत काँक्रीट गटार करणे.	२१,९४,३९५/-	सहाय्यक अनुदान अंतर्गत
७	१७	२९/०५/२०२०	प्र.क्र.१५ सिंहस्थ नगर साक्री रोड भागात नविन ६ इंची पाईप लाईन टाकणे.	६,८९,५७३/-	मनपा निधी अंतर्गत

८	१८	२९/०५/२०२०	प्र.क्र.१७सेवादास नगर श्री. दिनेश घोरपडे ते साई बाबा मंदिर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	९,९९,२९२/-	सहाय्यक अनुदान अंतर्गत
९	१९	२९/०५/२०२०	प्र.क्र.१०बर्फ कारखाना ते जयवंत दुसाने यांचे घरापर्यंत काँक्रीट गटार करणे.	२१,९४,३९५/-	सहाय्यक अनुदान अंतर्गत
१०	२०	२९/०५/२०२०	प्र.क्र.१० वरखेडी गावातील गवादरवाजा पूर्व ते श्री. मोहन चौधरी यांच्या घरापर्यंत डी.पी. रस्त्यास आर.सी.सी. पाईप व गटार करणे.	२१,९४,३९५/-	सहाय्यक अनुदान अंतर्गत
११	२१	२९/०५/२०२०	सेवादास नगर व शेलार वाडी भागात रस्ता काँक्रीत व बंदिस्त गटार करणे.	२४,६६,१०२/-	आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत
१२	२५	०८/०६/२०२०	धुळेशहरातील मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजविणे	२१,६०,५६०/-	मनपा निधी अंतर्गत
१३	२७	११/०६/२०२०	प्र.क्र.१७ मध्ये ,जिवरक नगर श्री.शिववारे यांच्या घरापासून ते अजबे नगर श्री.राहुल बेड यांच्या घरापर्यंत काँक्रीट गटार करणे.	८,०६,८३०/-	नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत
१४	२८	११/०६/२०२०	प्र.क्र.१७ मध्ये श्री.शांताराम पाटील ते दोहानी शेठ गल्स हायस्कूल (हॉस्टेल) पावेतो काँक्रीट गटार करणे.	८,९६,९२३/-	नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत
१५	२९	११/०६/२०२०	प्र.क्र.१५मोगलाईभागातील देशमुख वाड्यातील श्री.राजू काळे यांच्या घरापासून ते राकेश कुलेवार यांच्या घरापर्यंत काँक्रीट गटार करणे.	१३,११,१७४/-	नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत
१६	३२	११/०६/२०२०	प्र.क्र.२ घुगे नगर ते एकता नगर भागात रिटेनिंग वॉल बांधणे.	१४,८३,४९९/-	जिल्हा वार्षिक सर्व साधारण योजना
१७	३३	११/०६/२०२०	प्र.क्र.२ सदाशिव नगर ते स्वामी नारायण मंदिर पावेतो रिटेनिंग वॉल बांधणे.	१४,८३,४९९/-	जिल्हा वार्षिक सर्व साधारण योजना
१८	३४	११/०६/२०२०	प्र.क्र.१८ गौडवस्ती व गारुड वस्ती भागात बंदिस्त गटार करणे.	९,९९,८८०/-	मनपा निधी अंतर्गत
१९	३५	११/०६/२०२०	प्र.क्र.१८ वर्षावाडी भागात श्री.मनोज पोपट शिंदे ते राधाबाई पवार यांचे घरापावेतो ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीट रस्ता करणे.	९,९७,३९४/-	मनपा निधी अंतर्गत
२०	३६	११/०६/२०२०	प्र.क्र.१२ मध्ये सबदा ड्रायव्हर यांच्या घरापसुन ते हुसेन पेहलवान यांच्या घरापर्यंत हजरत अली गल्ली रस्ता काँक्रीट करणे.	५,००,४२३/-	मनपा निधी अंतर्गत
२१	३९	१६/०६/२०२०	प्र.क्र.३० मध्ये आण्णाभाऊ साठेनगर श्री. गोरखजाधव यांचे घरापासून ते मे.सौ. सोनवणे यांच्या घरापर्यंत काँक्रीट गटार करणे.	९,३९,२८७/-	नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत
२२	४४	१९/०६/२०२०	प्र.क्र.१८ मोहाडी येथे बाळू आबा नगर भागात गणपती मंदिर श्री.प्रकाश मधुकर मिस्तरी श्री. हिरामण भजीवाले घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे.	९,९८,८६१/-	मनपा निधी अंतर्गत

२३	४५	१९/०६/२०२०	प्र.क्र.११ श्री.संजय निंबा पाटील ते श्री.शिवराय पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	५,४२,४७३/-	मनपा निधी अंतर्गत
२४	४६	२३/०६/२०२०	प्र.क्र.५ विवेकानंद कॉलनी येथे श्री.नेरकर यांच्या घरा पासून ते रुची ब्युटी पार्लर पर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	२०,२२,२११/-	जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत
२५	४८	२३/०६/२०२०	धुळे शहरातील सूर्य मंदिर ते आझादनगर ड्रमवाले घर पावेतो रस्ता काँक्रीट करणे व सी.डी. वर्क करणे.	२४,७४,०२९/-	अल्प संख्याक बाहुल नागरी क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत

सदर माहिती मे. स्थायी समिती मध्ये अवलोकणार्थ सादर करण्यांत आली आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३७ सन२०१९-२०या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेख्यास मंजुरी देणेबाबतआलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल सोनार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेख्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४२ दिनांक ०६/०८/२०२०

सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे लेखे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अ नुसार व लेखा संहिता १९७१ नियम ६० व नमुना क्रं. २८ नुसार तयार आलेले असून सदर लेखे प्रमाणित करुन सादर करण्यांत आलेले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे लेखे यास महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९४ अ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३८ सन २०१९-२०अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रकमा प्रधान लेखाशिर्षातून दुस-या प्रधान लेखा शिर्षात वर्ग करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन २०१९-२० अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रकमा प्रधान लेखाशिर्षातून दुस-या प्रधान लेखाशिर्षात वर्ग करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४३ दिनांक ०६/०८/२०२०

सन २०१९-२० चे वार्षिक लेखे तयार करुन मे. स्थायी समितीपुढे मंजूर कार्यालयीन अहवालानुसार मंजुरीसाठी सादर करणेत आलेले आहे. सदर वार्षिक लेखे सोबत जोडलेला

तक्ता नमुना क्रं. १० मध्ये दर्शविल्यानुसार विविध लेखाशिर्षात एकुण रक्कम रु.४९३.२७ लक्ष चे तरतुदीपेक्षा जास्तीचा खर्च झालेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३अन्वये मंजूर झालेल्या अर्थसंकल्पात प्रधान लेखाशिर्षाखाली व एका उपशिर्षातून व दुस-या गौण शिर्षाखाली अथवा एका गौण शिर्षातून दुस-या गौणशिर्षाखाली पुढील कमाल मर्यादेच्या अधिन पूर्ण नियेजन बदल करावयाच्या रकमा बदल करता येतील. त्यानुसार प्रधान लेखाशिर्षात राहिलेल्या तक्त्यानुसार शिल्लक रकम रुपये ५२१.६२लक्ष मधून भागविण्याकरिता उक्त कार्यवाहीत महानगरपालिका अस्तित्वात असल्याने मे. स्थायी समिती पुढे ठराव होणेस प्रस्ताव सादर केलेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन २०१९-२० अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रकमा प्रधान लेखाशिर्षातून दुस-या प्रधान लेखाशिर्षात वर्ग करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३९ श्री धनराज धमाजी गवळी यांनी मानधनावर व्हॉलमन म्हणुन नियुक्ती मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल सोनार मानधनावर किती कर्मचारी लावण्यांत येणार आहे.

म.सभापती या विषयाबाबतीत आस्थापना विभागाचे रमजान अन्सारी यांनी माहिती द्यावी.सन्मा. सदस्यांनी याठिकाणी प्रश्न उपस्थित केला आहे.श्री.रजमान अन्सारी आस्थापना प्रमुख यांनी माहिती द्यावी.त्यांना रेजचा प्रॉब्लेम असल्याने उपायुक्त गोसावी साहेब यांनी यांबाबतचा खुलासा करावा.

म. उपायुक्त सन्मा. सर्दस्य श्री. नंदुभाऊ सोनार यांनी जो काही प्रश्न उपस्थित केला आहे. मानधनावर आवश्यकतेनुसार कर्मचारी घेत असतो. हे व्हॉलमनचे पद आहे. त्याकडेस आलेला कामाचा अनुभव लक्षांत घेता तसेच विभागानेही शिफारस विचारात घेता विशेष बाब म्हणून मा. सभापती यांचेकडेस प्रस्ताव ठेवलेला आहे. मी विनंती करतो कामाची निकड लक्षांत घेता घेवून सदर प्रस्तावास मान्यता द्यावी. आणि इतर प्रश्न उपस्थित केला की आपण किती लोक मानधनावर घेता याबाबत विनम्र खुलासा करतो आपल्याकडे जो आकृती बंध मंजूर आहे.आणि मंजूर काही रिक्त पदे आहे एकुण आढावा विचारात घेवून मानधनावर 6 महिन्यांकरिता कर्मचारी घेत असतो. या बाबत सन्मा.आयुक्त सो. यांना कायदयानुसार विशेष अधिकार आहे. त्यानुसार विभाग कार्यवाही करत असतो.

म सुनिल सोनार किती व्यक्ती घेणार आहे.एकच व्यक्ती घेणार आहे का?

म. उपायुक्त सदर प्रस्ताव विशेष बाब म्हणून आलेला आहे. प्रभाग क्रं. 5 चे नगरसेवक यांनी हा प्रस्ताव आणला होता. ज्या व्यक्ती कडील अनुभव लक्षांत घेता सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला आहे.

म. सुनिल सोनार सभापती महोदय थोडे विषयांतर करतो आहे.आमच्या भागात 8-8 दिवस पाणी येत नाही.

म. सभापती मी आपल्या प्रश्नाशी सहमत आहे. संबंधित अधिका-याची संमती घेवून बोललो होतो. तापी पाणीपुरवठा योजनेवरील लिकेजेस मुळे पाणी वितरणात विलंब होत आहे. तसेच सुकवद

पंपींग स्टेशन येथे 8-10 फूट गाळ साचला असल्यामुळे दुषित पाणी येत आहे. त्यामुळे पाणी वितरणस विलंब होत आहे.

म. विमलबाई पाटील — घंटागाडी 2 महिन्यापासून येत नाही.आमच्या प्रभागात 10-12 दिवस पाणी येत नाही. प्रभागात फवारणी होत नाही.

म. सभापती — सहा. आरोग्याधिकारी श्री. लक्ष्मण पाटील आपण वॉटर ग्रेस च्या अधिका-याबरोबर बैठकीचे आयोजन करावे कारण अनेक नगरसेवकांच्या घंटागाडया नियमित व वेळेवर येत नसल्याच्या तक्रारी आहेत. आस्थापना विभाग प्रमुख श्री. रमजान अन्सारी यांना सूचित करण्यांत येते की, सदर नियुक्त केलेला कर्मचारी 5 महिन्यांपासून त्याला त्याचा पगार मिळालेला नाही.

म.आस्थापना प्रमुख — धुळे मनपाच्या मंजूर आकृतीबंधानुसार व्हॉलमनचे एकुण 38 पदे मंजूर असून 21 कर्मचारी कायम सेवेत असून 17 पदे मानधनावरील कार्यरत आहे. सदरचा प्रस्ताव पाणीपुरवठा विभागाकडून आलेला आहे. सदर कर्मचारी 4 महिन्यापासून काम करत आहे. सदर कर्मचारी यांना परस्पर विभागामार्फत लावण्यांत आलेला आहे.

म. अभियंता — पाणीपुरवठा विभागाकडील रामनगर टाकीवरील व्हॉलमन कर्मचारी सेवानिवृत्त झाला आहे. सदर भागामध्ये पाणीपुरवठा करणेआवश्यक होते.यासंदर्भात आस्थापना विभागाकडे कर्मचा-यांची मागणी केली होती. परंतु कर्मचारी उपलब्ध करुन देण्यांत आला नाही. सदर भागातील नागरीकांना पाणीपुरवठा करणे आवश्यक होते.सदर इसम यांस भाग माहिती आहे. या कर्मचा-याने 5 वर्ष रोजंदारीने काम केलेले होते. म्हणून त्यांना कामावर घेतले होते. त्याला 5 महिन्याचा पगार स्वखर्चाने देऊ.

म.सभापती — याबाबतआपल्याला माहिती दिली होती. संबंधित पद मंजूर नसल्यामुळे आपण भरु शकत नाही असे म्हणता,तो व्यक्ती कोण आहे त्याकडे न बघता भागाला पाणी उपलब्ध झाले पाहिजे.

म. उपायुक्त — आपल्या कडे 38पदे मंजूर आहेत.ही पदे खूपच मर्यादित आहेत. व्हॉलमन हेअकुशल पद आहे.

म. सभापती — मानधन तत्वावर कर्मचा-यांना नियुक्त करणेबाबत महानगरपालिकेची विशिष्ट कार्यप्रणाली असून त्यानुसार आयुक्त यांच्या मान्यतेने जाहिरात प्रकाशित करण्यांत येते व उमेदवारांच्या नियमानुसार मुलाखती घेवून 11 महिन्यांची मानधनावर तात्पुरती नियुक्ती दिली जाते. तदनंतर कामाच्या आवश्यकतेनुसार सदर नियुक्तीत खंड देवून पुनश्च नियुक्ती देण्यांत येते किंवा जाहीरात प्रसिध्द केली जाते. स्थायी समितीसमोर सादर झालेला श्री. धनराज गवळी यांचा प्रस्ताव या कार्यप्रणाली बाहेरचा असल्याने त्यांनी विहीत कार्यप्रणाली नुसार मनपाकडे विनंती अर्ज करावा. श्री. गवळी यांचा कामाचा अनुभव व आवश्यकता लक्षांत घेता त्यांचा प्राधान्याने विचार करण्यांत यावा. तसेच हद्दवाढ गावातीलही प्रश्न लक्षांत घेवून त्याठिकाणी व्हॉलमन कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने हद्दवाढ गावांचे पाण्याचा प्रश्न लक्षांत घेता नागरीकांचे हित जपण्यासाठी अतिरिक्त व्हॉलमन नियुक्त करण्यांत यावे तसेच सदर पदाची नियुक्ती होई पावेतो संबंधित कर्मचारी यांस मानधनावर नियुक्तीबाबत लेखा परीक्षक यांचे अभिप्राय घेवून प्रशासनाने नियमोचित कार्यवाही करावी. तसेच शहराच्या आवश्यकतेनुसार अतिरिक्त व्हॉलमन पदाच्या नियुक्ती बाबत कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४४ दिनांक ०६/०८/२०२०

श्री धनराज धमाजी गवळी यांनी दिनांक 20/3/2020 रोजी विनंती अर्ज सादर करुन नमुद केले की, ते राम नगर जलकुंभ येथे व्हॉलमन म्हणुन 5 वर्ष काम केलेले आहे.त्यांना भागातील व्हॉल,पाईप लाईन बाबत माहिती असुन त्यांनी पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी श्री भिला रामदास मराठे सेवानिवृत्त झालेले असल्याने त्याच्या जागी व्हॉलमन म्हणुन मानधनावर नियुक्ती मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार अभियंता यांनी श्री धनराज धमाजी गवळी यांना राम नगर जलकुंभ येथे सुमारे 5 वर्षापासुन कामाचे अनुभव असल्याने श्री धनराज धमाजी गवळी यांना मानधनावर नियुक्ती होण्याबाबत अभियंता यांनी शिफारस केलेली आहे.

सन्मा.नगरसेवक श्री भगवान शंकरराव गवळी यांनी मा. सभापती स्थायी समिती म.न. पा. धुळे यांना दिनांक 3/6/2020 रोजी पत्र देवुन नमुद केले की, माझ्या प्रभागातील श्री धनराज धमाजी गवळी रा.साईबाबा नगर नकाणे रोड धुळे यांनी यापुर्वी महानगरपालिकेत पाणी पुरवठा विभागात व्हॉलमन म्हणुन 5वर्ष मानधनावर काम केलेले अहे. सद्यास्थितीत महानगरपिालकेत व्हॉलमन ची आवश्यकता असल्याचे समजते. तसेच त्यांची कौटुंबीक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने व त्यांना व्हॉलमन पदाच्या कामाचा अनुभव असल्याने त्यांना मानधनावर व्हॉलमन या पदावर नियुक्ती देणेबाबत शिफारस करण्यात येत आहे. असे नमुद केले आहे.

सदर पत्रावर सभापती स्थायी समिती म नपा धुळे यांनी स्थायी सामिती समोर प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहे.

धुळे महानगरपालिकेत सुधारीत आकृतीबंधानुसार एकुण 38 पदे व्हॉलमन चे मंजुर आहेत. त्यापैकी पाणी पुरवठा विभागात मंजुर असलेले व्हॉलमन पैकी 21 कायम कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच एकत्रीत मानधनावर एकुण 17 व्हॉलमन कार्यरत आहेत.त्यामुळे सद्यस्थितीत व्हॉलमन या पदांचे एकही पद रिक्त नाही.मंजुर पदांच्या व्यातिरिक्त पद मानधनावर भरल्यास भाविष्यात लेखा आक्षेप येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अभियंता यांच्याकडील दिनांक ४/७/२०२० रोजीच्या कार्यालयीन टिपणीनुसार धुळे शहराची हद्दवाढ होवून सुमारे २ वर्षाचा कालावधी लोटला असून शहराचे क्षेत्रफळ सुमारे १०२ चौ. मी. झालेला आहे व शहराची लोकसंख्या सुमारे ५ लक्ष झालेली आहे.

सद्यस्थितीत पाणीपुरवठा विभागात व्हॉलमन कर्मचा-यांची कमतरता असून शहरात नवीन पाण्याच्या टाक्या वाढल्यामुळ पाणीपुरवठा करणेस अत्यंत अडचणी निर्माण होत आहेत. पाणीपुरवठा विभागात श्री.धनराज घमाजी गवळी हे व्हॉलमन या पदावर मागील ३ महिन्यांपासून काम करीत असल्यामुळे त्यांना मानधन तत्वावर नियुक्तीदेण्याबाबत अहवालात नमूद केले आहे.

सदरचा प्रस्ताव मे. स्थायी समिती सभेपुढे सादर झाला असता सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालानुसार मानधन तत्वावर कर्मचा-यांना नियुक्त करणेबाबत महानगरपालिकेची विशिष्ट कार्यप्रणाली असून त्यानुसार आयुक्त यांच्या मान्यतेने जाहिरात प्रकाशित करण्यांत येते व उमेदवारांच्या नियमानुसार मुलाखती घेवून 11 महिन्यांची मानधनावर तात्पुरती नियुक्ती दिली जाते. तदनंतर कामाच्या आवश्यकतेनुसार सदर नियुक्तीत खंड देवून पुनश्च नियुक्ती देण्यांत येते किंवा जाहीरात प्रसिध्द केली जाते. स्थायी समिती समोर सादर झालेला श्री.धनराज गवळी यांचा प्रस्ताव या कार्यप्रणाली बाहेरचा असल्याने त्यांनी विहीत कार्यप्रणाली नुसार मनपाकडे विनंती अर्ज करावा. श्री. गवळी यांचा कामाचा अनुभव व आवश्यकता लक्षांत घेता त्यांचा प्राधान्याने विचार करण्यांत यावा. तसेच हद्दवाढ गावातीलही प्रश्न लक्षांत घेवून त्याठिकाणी व्हॉलमन कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने हद्दवाढ गावांचे पाण्याचा प्रश्न लक्षांत घेता नागरीकांचे हित जपण्यासाठी अतिरिक्त व्हॉलमन नियुक्त करण्यांत यावे तसेच सदर पदाची नियुक्ती होई पावेतो संबंधित कर्मचारी यांस मानधनावर नियुक्तीबाबत लेखा परीक्षक यांचे अभिप्राय घेवून प्रशासनाने नियमोचित कार्यवाही करावी. तसेच शहराच्या आवश्यकतेनुसार अतिरिक्त व्हॉलमन पदाच्या नियुक्ती बाबत कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-४० धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१ मध्ये परभणीवाडा भागांत १५० एम एम व्यासाची पाईपलाईन बदलविणेचे काम तांतडीने विना निविदा करुन घेण्यांत आले, त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम ५(२)(२)अन्वये खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल सोनार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च बिल रु.२,९७,२२४/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ (२) नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४५ दिनांक ०६/०८/२०२०

धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१ मध्ये परभणीवाडा भागांत १५० एम. एम. व्यासाची पाईपलाईन असून सदरची नाल्यातून गेली असल्याने नागरिकांना अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याने सदर ठिकाणी नवीनपाईपलाईन टाकण्यात आली असून त्यासाठी सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर कामास रु.२,९७,२२४/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम ठेकेदार श्री.संजय गायकवाड यांच्या कडुन पूर्ण करून घेण्यात आले आहे.

सदर ठेकेदार यांना तोंडी सूचना दिल्यानुसार त्यांनी वरील काम पूर्ण करून दिले आहे व सदर कामाचे देयक मिळणेबाबत संबधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

तरी उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा श्री. संजय गायकवाड ठेकेदार यांच्या कडुन करून घेण्यात आलेले असून सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च बिल रु.२,९७,२२४/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ (२) नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-४१ देवपूर भागांतील प्रभाग क्र.३ मधील इस्लामपुरा भागांत २० सिट सार्वजनिक शौचालय बांधणे कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती अभियंता सो. विषय क्रं४१ प्रशासकीय मान्यता देणेबाबत विषय आलेला आहे. सदर विषय १४ व्या वित्त आयोगाचा असल्याने विषयांस महासभेच्या मंजुरी घेण्यांची आवश्यकता आहे किंवा नाही याबाबत खुलासा करावा.

म. अभियंता — सदर विषयांची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली होती. वर्कऑर्डर झालेली होती. याबाबत १४ व्या वित्त आयोग अंतर्गत दरास मान्यता देण्यांत आलेली आहे व दर मान्यता स्थायी समितीने दिलेली आहे.तथापि सदरचे काम रिव्हाईज झाल्याने त्यास पुनश्च स्थायी समितीची मान्यता आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी आलेला आहे. १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत सार्वजनिक शौचालयाची कामे अनुज्ञेय आहेत. यांत ठरावीक रक्कम १४ व्या वित्त आयोगातून व उर्वरीत रक्कम मनपा निधीतून खर्च करावी लागेल यांत संबंधित ठेकेदाराने वर्कऑर्डर देऊनही काम न केल्याने त्यांचे डिपॉझीट जप्त करण्यांत आलेले आहे.रिव्हाईज कामासाठी सदर प्रस्ताव फेर मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

म. सभापती — हा विषय १४ व्या वित्त आयोगातून होणार आहे किंवा मनपा फंडातून होणार आहे.

म. अभियंता — १४ व्या वित्त आयोगातून प्रस्तावित केलेले होते. तथापि याबाबत शासनाच्या मार्गदर्शक सुचना आहेत. त्यानुसार प्रत्येक सीटसाठी ठरावीक रक्कम निश्चित करण्यांत आलेली आहे. तो खर्च १४ व्या वित्त आयोगातून करता येईल व उर्वरीत खर्च मनपा निधीतून करावा लागेल.

म. सभापती — १४व्या वित्त आयोगातून ३५टक्के रक्कम खर्च करता येणार आहे व उर्वरीत किती खर्च मनपा निधीतून खर्च करावा लागेल यांचा कार्यालयीन अहवालात उल्लेख नाही.

म. अभियंता — सदर कामास यापूर्वी स्थायी समितीने मान्यता दिलेली होती. त्यामुळे सक्षम प्राधिकरण स्थायी समिती आहे.अंदाजपत्रकीय खर्चाबाबत स्थायी समितीची मान्यता लागते

म. सभापती — सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवाल व अभियंता यांच्या अभिप्रायानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४६ दिनांक ०६/०८/२०२०

देवपूर भागांतील प्रभाग क्र.३मधील इस्लामपुरा भागांत २० सिट सार्वजनिक शौचालय बांधणे बाबतम. श्री.डॉ.फारुख शाह,आमदार धुळे शहर विधानसभा मतदार संघ यांच्याकडील झालेल्या बैठकीतील सुचनेनुसार तातडीने २० सिट सार्वजनिक शौचालय बांधणे बाबत सूचना केल्या आहेत.तसेच त्याप्रभागातील नगरसेवकांचीदेखील शौचालय बांधणे बाबत मागणी आहे.

प्रभाग क्र.३मध्ये शौचालया बांधण्यासाठीजागा उपलब्ध असून त्याठिकाणी अतिक्रमण होण्याची शक्यता आहे.तसेच परिसरातील नागरिकांची शौचालय नसल्याने गैरसोय होत आहे.सदरील भाग दाट वस्तीचा रहिवासी भाग असून अस्तित्वातील असलेल्या १० सिट शौचालयावर भार पडत आहे. त्यामुळे सदरील भागांत तातडीने २०सिट सार्वजनिक शौचालय बांधणे आवश्यक आहे. याबाबत सन्मा.सदस्या श्रीमती सईदाबी महंमद इकबाल (डॉलर) यांनी लेखी पत्र सादर करुन याबाबत मागणी केलेली आहे.तसेच सन्मा.सदस्य श्री. सईद बेग हाशम बेग यांनी ही पत्र सादर केलेले आहे.

सदर कामास शासकीय दरसूची सन २०१९-२० नुसार रु.२७,०३,८२०/-मात्र खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन २०२०-२१ च्या मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार आहे.

यापूर्वी सदर भागांत शौचालय बांधणेसाठी मे.ड्रिम मेकर्स कन्स.धुळे यांना इकडील कार्यालयीन आदेशजाक्र/धुमपा/बां.वि/२०/दि.९/०५/२०१७ नुसार कार्यादेश देण्यात आलेला होता. तथापि सदरचे काम न झाल्याने संबधित ठेकेदाराचे अनामत रक्कम जप्त करून नव्याने २०सिट सार्वजनिक शौचालय बांधणे बाबत मंजुरीस्तव सादर.सदर कामाची तरतूद यापूर्वी १४ व्या वित्त आयोगातून करण्यात आली आहे.त्यानुसार सदर काम १४ व्या वित्त आयोगातून करण्यास व सदर कामास येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळणेचा प्रस्ताव स्थायी

समितीपुढे सादर झालेला आहे. सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर प्रस्तावास मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवाल व अभियंता यांच्या अभिप्रायानुसार सदर कामास येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-४२ धुळे मनपा अंतर्गत प्रभाग क्र. १० मध्ये वरखेडी रोड अन्वरनाला ते वरखेडी रोड गाव दरवाजा पर्यंतचा रस्ता खराब झाल्याने सदर रस्ता दुरुस्तीचे एस्टीमेट रु.६२,४२,०००/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालवर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती अभियंता यांनी या विषयावर माहिती द्यावी.

म. अभियंता सदरचा विषय साधारण ६-७ महिन्यापूर्वीचा आहे. वरखेडीरोडला कचरा डेपो आहे तेथे कचरा वाहतूक करणारे टॅक्टर बंद पडलेले होते. सदर ठिकाणी टॅक्ट्रर बंद असल्याने रात्रीच्या सुमारास वरखेडी गावातील मोटार सायकल स्वाराचा टॅक्ट्रवर आदळून दु:खद निधन झाले होते. त्यावेळी गावातील नागरीकांनी रस्त्यावर आंदोलन करुन रस्ता बंद करुन कचरा वाहतूक बंद केलेली होती. त्यावेळेस सदर ठिकाणी लक्ष्मण पाटील व आरोग्य विभागातील इतर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी महापौर सो. यांनी समक्ष भेट देऊन सदर रस्ता रुंदीकरण व नुतरीकरणासंदर्भात अश्वासित केलेले होते. त्यानुसार सदर रस्ता मनपा निधी अंतर्गत प्रस्तावित करण्यांत आलेला आहे. याबाबत मान्यता देण्यांचे अधिकार सभागृहाचे आहेत.

म. सभापती यासंदर्भात सन्मा. सदस्यांना मत मांडावयाचे असल्यास त्यांनी मत मांडावे.

म. सुनिल सोनार याबाबत सभापतींनी निर्णय घ्यावा.

म. सभापती प्रस्ताव मान्यतेचे अधिकार संपूर्ण सभागृहाचे आहे.त्यामुळे याबाबत सर्वांनी मत मांडणे आवश्यक आहे. कोणाचे काही म्हणणे नसल्यास विषयास मान्यता देण्यांत येईल.

म. सभापती सन्मा. सदस्यांची सहमती गृहित धरुन व मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.याबाबत सन्मा.स्थायी समिती सदस्य श्री.संतोष खताळ यांनी सदर प्रस्ताव मान्यतेबाबत लेखी विरोधाचे पत्र सादर केलेले असून त्यांचा विरोध नोंदविण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४७ दिनांक ०६/०८/२०२०

धुळे मनपा अंतर्गत प्रभाग क्र. १० मध्ये वरखेडी रोड अन्वरनाला ते वरखेडी रोड गाव दरवाजा पर्यंतचा रस्ता खराब झाल्याने तेथे नागरिकांना रहदारीस अडचण येत असून लहान - मोठे खड्डे असल्याने अपघात देखील होत आहे.

तरी त्या रस्त्याचे काम त्वरित व ताबडतोब करणे बाबत म.महापौर सो.,यांनी मागणी केलेली असून त्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास अंदाजित खर्च रु.६२,४२,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. वरचा खर्च हा सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे दरसूची नुसार असून तो योग्य व वाजवी असा असून त्या खर्चाची नोंद धुळे मनपाच्या सुधारित अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सदर प्रस्तावासाठी रक्कम रु.६२,४२,०००/- मात्रच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरीस्तव मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांची सहमती गृहित धरुन व मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपा अंतर्गत प्रभाग क्र. १० मध्ये वरखेडी रोड अन्वरनाला ते वरखेडी रोड गाव दरवाजा पर्यंतच्या रस्त्याच्या कामास व खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत सन्मा. स्थायी समिती सदस्य श्री.संतोष खताळ यांनी सदर प्रस्ताव मान्यतेबाबत लेखी विरोधाचे पत्र सादर केलेले असून त्यांचा विरोध नोंदविण्यांत येत आहे. बहुमताने मंजुर,

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ४३ धुळे महानगरपालिकेच्या स्वच्छ सर्वेक्षण २०२०साठी जनजागृती करणेकामी ९५माय. एफ.एम. रेडिओ वाहिनीवर जाहिरात प्रसिध्द करण्यांत आली असून सदरकामी झालेला खर्च रुपये १,०६,२००/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम५(२)(२)अन्वये खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.युवराज पाटील विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदरील खर्च रक्कम रु.१,०६,२००/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ५ (२) (२) कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४८ दिनांक ०६/०८/२०२०

धुळे महानगरपालिकेच्या स्वच्छ सर्वेक्षण 2020 साठी शहरातील नागरीकांमध्ये मोठया प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक असून सदरची जाहिरात तांतडीने प्रसिध्द करणे आवश्यक असल्याने म. उपायुक्त सो. यांनी सूचित केलेले आहे.

तरी सदरची जाहिरात ९५ माय एफ.एम. या वाहिनीवर जाहिरात देण्यासाठी लेखी मागणी पत्र म. उपायुक्त सो. यांचे मान्यतेने भांडार विभागाकडेस मागणी पत्र सादर केलेले आहे.

सदरची जाहिरात संदर्भात म.उपायुक्त सो. यांचे सुचनेनुसार तांतडीने असल्याने त्वरीत जाहिरात दयावे लागणार असून सदर जाहिरात स्थानिक वाहिनीवर 95 माय एफ.एम. धुळे यांचेकडून करुन घेऊन म. स्थायी समिती पुढे कार्योत्तर मंजुरी घेवून बिल अदा करणेत येईल या चर्चेअंती काम करुन घेण्यांत आले आहे.

तरी सदरचे वाहिनी कडून खालील प्रमाणे जाहिरात प्रसिध्द करुन घेण्यांत आलेले असून त्यांचेकडील बिलाप्रमाणे त्यांनी खर्च दर्शविलेला आहे.

Station	StartDate	End Date	Commerical Type	Duration	Spots	Fct	Rate Per (१० Sec/ Count)	Amount
Dhule	१५/१/२०२०	३१/१/२०२०	FCT	३०	५१०	१५,३००	५०	७६,५००
						CGST		६,८८५
						SGST		६,८८५
						Total		९०,२७०

Dhule	०१/२/२०२०	३/२/२०२०	FCT	३०	९०	२७००	५०	१३,५००
						CGST		१,२१५
						SGST		१,२१५
				एकुण खर्च सर्व करासोबत सादर केले				१,०६,२००

तरी वरील प्रमाणे जाहिरात प्रसिध्द करुन घेण्यांत आल्यानुसार GST व इतर करासहित एकुण खर्च रु.१,०६२००/- मात्र अदा करणेस महानगरपालिका अधिनियम 5(2)(2) अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदरील खर्च रक्कम रु.१,०६,२००/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ५ (२) (२) कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ४४ धुळे शहरात कोविड-१९साठी शहरातील नागरिकांची आरोग्य तपासणी करणेसाठी मनपा शाळा क्रमांक ८ मध्येआवश्यक ती दुरुस्ती व साहित्य बसविणेसाठी झालेला खर्च रु. १,४८,९०९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल सोनार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. संतोष खताळ विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदरील खर्च रक्कम रु.१,४८,९०९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४९ दिनांक ०६/०८/२०२०

धुळे शहरात कोविड-१९ सर्वधित शहरातील नागरिकांची शासन आदेशान्वये सर्वी , खोकला आणि ताप केंद्राची निर्मिती करणे बाबत सूचित केल्यानुसार संदर्भीय आदेशान्वये धुळे मनपाचा शाळा क्र.८ मधील वर्ग खोल्या मध्ये स्थानिक परिसरातील नागरिकांची तपासणी केंद्राची निर्मिती करणे कामी सर्वधित शाळेच्या छताचे पत्र बदलणे , शौचालय दुरुस्ती करणे , दरवाजा , खिडकी तसेच तेथील वॉश बसीन भांडे ई. दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

तरी सदरचा तपासणी केंद्र येथील शाळेच्या छताचे पत्र बदलणे, शौचालय दुरुस्ती करणे दरवाजा,खिडकी तसेच तेथील वॉश बसीन भांडे ई.दुरुस्ती काम मे.हिंद कन्सट्रक्शन, ठेकेदार यांचे कडून विना निविदा करून घेणेत आलेले आहे.

तरी सदरचे कामास अंदाजपत्रकीय खर्च रु.१,४८,९०९/- मात्र आलेला असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७(क)अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी सादर झालेला आहे

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार

सदरील खर्च रक्कम रु. १,४८,९०९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ४५ धुळे शहरात कोविड-१९साठी शहरातील नागरिकांची आरोग्य तपासणी करणेसाठी मनपा मालकीच्या ७ दवाखान्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती व साहित्य बसविणेसाठी झालेला खर्च रु.२,८१,९९६/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल सोनार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. संतोष खताळ विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदरील खर्च रक्कम रु. २,८१,९९६/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५० दिनांक ०६/०८/२०२०

धुळे शहरात कोविड-१९ या साथीचा आजाराची उत्पत्ती झालेली असल्याने सदर आजारमुळे शासनाने आदेशित केलेल्या सुचणेनुसार शहरातील कोविड-१९ अंतर्गत नागरिकांची तपासणी व उपचार करणे बाबत धुळे मनपा मालकीचे दवाखानेद्वारे होणार असल्याने सोबत जोडलेल्या यादी नुसार मनपा म्लकीचे एकूण ७ दवाखाने येथे तपासणी व उपचार केंद्र उभारणेत आलेले आहे.

तरी सदरचा मनपा दवाखान्यातील शौचालय,दरवाजा, खिडकी,वॉश बेसिन,पाण्याची टाकी व नळ फिटिंग दुरुस्ती व नवीन बसविणे काम काम श्री.आशिष एम.पटवारी, ठेकेदार यांचे कडुन विना निविदा करून घेणेत आलेले आहे.

तरी सदरचे कामास अंदाजपत्रकीय खर्च रु.२,८१,९९६/- मात्र आलेला असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदरील खर्च रक्कम रु.२,८१,९९६/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ४६ धुळे शहरात कोविड-१९साठी शहरातील नागरिकांची आरोग्य तपासणी करणेसाठी मनपा शाळाच्या वर्ग खोल्यांमध्ये आवश्यक ती दुरुस्ती व साहित्य बसविणेसाठी झालेला खर्च

रु.२,७६,२४५/- मात्रला महाराष्ट्रमहानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल सोनार — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. संतोष खताळ — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदरील खर्च रक्कम रु. २,७६,२४५/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५१ दिनांक ०६/०८/२०२०

धुळे शहरात कोविड-१९ सबंधित शहरातील नागरिकांची शासन आदेशान्वये सर्दी , खोकला आणि ताप केंद्राची निर्मिती करणे बाबत सूचित केल्यानुसार संदर्भीय आदेशान्वये धुळे महानगरपालिका शाळाच्या वर्ग खोल्या मध्ये स्थानिक परिसरातील सर्दी , खोकला आणि ताप तपासणी केंद्राची निर्मिती करणे कामी आदेशान्वये सबंधित शाळाच्या मधील व तपासणी केंद्र येथील शौचालयाचे दरवाजे खिडकी तसेच बेसिन धांडे व केंद्राच्या ठिकाणील इतर दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

तरी सदरचा तपासणी केंद्र येथील शौचालयाचे दरवाजे खिडकी तसेच बेसिन धांडे व केंद्राच्या ठिकाणील इतर दुरुस्ती काम मे.हिंद कन्सट्रक्शन,ठेकेदार यांचे कडुन विना निविदा करून घेणेत आलेले आहे.

तरी सदरचे कामास अंदाजपत्रकीय खर्च रु.२,७६,२४५/- मात्र आलेला असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७(क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदरील खर्च रक्कम रु. २,७६,२४५/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे
नगरसचिव कार्यालय
स्थायी समिती सभा क्रमांक १२ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक २७/०८/२०२०
वेळ दुपारी ४-३० वाजता.

शासनाच्या दिनांक ३/७/२०२०च्याआदेशानुसार धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑनलाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक २७/०८/२०२० रोजी दुपारी४-३० वाजता **मा. श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह घेण्यांत आली या ऑनलाईन सभेसाठी खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन उपस्थित होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्री.सोनार सुनिल वसंतराव	सदस्य
४	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
५	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
६	श्रीमती उदासी कशिश गुलशन	सदस्या
७	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
८	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
९	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
१०	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
११	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१२	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
२	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
३	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
४	श्री.विनायक कोते	सहा. आयुक्त
५	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
६	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
७	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी
८	डॉ. महेश मोरे	आरोग्याधिकारी

९	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
११	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१२	श्री. रमजान अन्सारी	प्र. कार्यालयीन अधिक्षक
१३	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१४	श्री. सी.एम. उगले	ओव्हरसिअर पा.पु. वि.
१५	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बां.वि.
१६	श्री. हेमंत पावटे	ओव्हरसिअर बां.वि.
१७	श्री. रविंद्र सोनवणे	परवाना विभाग
१८	श्री. राजू माईनकर	भांडारपाल
१९	श्री. सोनवणे	प्रशासन अधिकारी म.न.पा शि.मं.
२०	श्री. संजय गुजर	औषध निर्माता
२१	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
२२	श्री. विशाल निंबाळकर	अभिलेखापाल

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज

सन्मा.सदस्य श्री.खताळ संतोष छगन यांनी महत्वाच्या कामासाठी बाहेरगांवी असल्याने सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती नुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५२ दिनांक २७/०८/२०२०

सन्मा.सदस्य श्री.खताळ संतोष छगन यांनी महत्वाच्या कामासाठी बाहेरगांवी असल्याने सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती नुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-४७ — मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५लाख ते २५ लाखापर्यत मंजुरी दिलेल्या कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर. (दि.१/७/२०२० ते३१/७/२०२०) अखेर

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल सोनार — सभापती सो.. विषय क्रं 47 आयुक्तांनी 5 ते 25 लाखाच्या आंत असलेल्या कामांना मान्यता दिलेला विषय अवलोकनार्थ सादर झालेला आहे. या यादी मधील अ.क्रं. 1 चे काम माझ्या

प्रभागातील असल्यामुळे माझ्या भागात गटारीचे 27- 28 वर्षा पूर्वी झालेल्या होत्या. जेव्हा नगरपालिका अस्तित्वात असतांना मी नगरसेवक या पदावर होतो. जी कामे झालेली होती त्या गटारीचे जिवंत विहिरीत पाणी जात होते. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून नवीन गटारी करण्याची गरज होती. त्यामुळे सदर काम आयुक्त सो. यांच्या मंजुरीने तांतडीने करुन घेण्यांत आले. सदर देयके लेखा विभागात अदायगीसाठी प्रलंबीत आहे. परंतु बजेट तरतुदीचे कारण दर्शवून बील थांबविण्यांत आलेले आहे. वास्तवीक हया बाबी कार्यादेश देण्यापूर्वी पहाणे व पूर्तता करणे आवश्यक होते. याबाबतची तरतूद बांधकाम विभागाने प्री बजेट मध्ये केलेली आहे व त्या बाबत लेखा विभागाला कळविले आहे. तरी बीलाबाबत तात्काळ कार्यवाही करावी ही विनंती.

म. मुख्य लेखाधिकारी सदर विषयामध्ये बांधकाम विभागानें तरतूद केलेली नाही.

म. सभापती बजेट मध्ये तरतूद नाही तर प्रस्ताव कसा मंजूर झाला.

म. मुख्य लेखाधिकारी सदर विषयात प्री बजेटमध्ये तरतूद करुन घेण्यांत यावी असे लिहले होते.

म. सभापती प्रशासकीय मान्यता कोणत्या बेसवर देण्यांत आलेल्या आहेत या बाबत मला खुलासा करावा.

म.मुख्य लेखाधिकारी हेअत्यावश्यक काम असल्यामुळे विभागाने बजेट मध्ये तरतूद करुन घेण्यांत येईल असे लिहून दिल्यामुळे सदरचे काम घेण्यांत आले आहे.

म. सभापती आजचा हा विषय आहे 5 लाख ते 25 लाख मंजुरी असलेला कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर करण्यांत आलेली आहेशासनाने यापूर्वी 33% मर्यादेत खर्च करण्याबाबत शासन निर्देश दिलेले आहेत. याबाबत प्रस्ताव मान्यता करतांना याचा विचार झालेला नाही.

म. मुख्य लेखाधिकारी विभागाने शासन निर्णयाबाबत नमूद केले आहे.

म. सभापती कोव्हीडच्या संदर्भात 33% बाबत यादी संदर्भात कुठलाही उल्लेख केलेला नाही.एकतर शासनाच्या आदेश चूकीचा असेल किंवा मला माहितीस्तव सादर केलेला नाही.

म.मुख्य लेखाधिकारी सदर 33 % खर्चाचा आदेश लागु राहील. विभागाने याबाबत प्रस्ताव सादर करतांना कार्यवाही करणे गरजेचे आहे.

म. सभापती श्री. शिंदे सो. मुंबईला उपचारासाठी गेले आहे. त्यामुळे या बैठकीला उपस्थित राहू शकले नाही. याबाबत श्री. उगले यांनी माहिती द्यावी.

म. ओव्हरसिअर ३३%खर्चाचा उल्लेख टिपणी मध्ये केलेला आहे.दि.4/5/2020च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही केली आहे. काम पूर्वी झालेले आहे. कार्यादेश नंतर दिला आहे. कार्यादेश देतांना 33% बिल अदा करणे बाबत टिपणीत नमूद केले आहे.

म. अमोल मासुळे मागच्या वेळेस आदेशित केले होते जे विषय अवलोकनार्थ सादर करण्यांत आले होते त्यांची यादी सादर करण्यांत आले नाही यात रस्तावरील खड्डे बजुविणेचे 2/3 कामे घेण्यांत आली होती.त्याबाबत माहिती मागविण्यांत आली होती.

म. युवराज पाटील प्रभागात घंटागाडीचा प्रश्नबाबत कार्यवाही होत नाही. 12 दिवसापासून घंटागाडी येत नाही.

म.सभापती विषय पत्रिकेवरील विषय झाल्यानंतर या विषयावर आपण चर्चा करुन कारण याबाबत आजच आयुक्त सो.यांनी आढावा बैठकीत स्वच्छतेबाबत स्पष्ट आदेश दिले आहे. स्वच्छताबाबत कोणाचीही गय केली जाणार नाही.

म. ओमल मासुळे सभापती सो. हा विषय गांभिर्याने घेऊन गणेश उत्सवात पूर्व तयारी म्हणून संपूर्ण धुळे शहर व हद्दवाढ गावामध्ये विशेष मोहीम राबवावी. रस्ता सफाई, घंटागाडी यांचे व्यवस्थित वेळापत्राक तयार करायला पाहिजे होते या ठिकाणी मनपा कुठेही गांभिर्य घेत नाही. 4-5 दिवस घंटागाडी भागात येत नाही सभापती सो. तुम्ही प्रशासनाला आदेशित करावे.

म. सभापती — आज सकाळी आयुक्ताच्या उपस्थित आरोग्याच्या विषयाच्या संदर्भात आढावा बैठक घेण्यांत आली त्यात उदयापासूनच धुळे शहरामध्ये सर्व प्रभागात स्वच्छता राबविण्यांचे आदेश केलेले आहे. आपल्या भागातील समस्या असतील त्यावर आरोग्य अधिकारी यांच्याशी संपर्क साधावयाचा आहे. जर काम झाले नाही तर संबंधितांवर कार्यवाही करण्यांत येईल.

म. सुनिल सोनार — सभापती साहेब धुळे महानगरपालिकेत अनेक महत्त्वाच्या पदांवर लिपिक संवर्गातील कर्मचारी प्रभारी अधिकारी म्हणून काम करीत आहेत वास्तविक त्यांच्या कामाचा अनुभव आतापर्यंत त्यांनी केली सेवा लक्षात घेता त्यांना त्या पदावर पदोन्नती देणे गरजेचे आहे सद्यस्थितीत धुळे महानगरपालिकेत अनेक पदे रिक्त आहेत त्या पदांवर तातडीने सदर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांना सामावून घेणे व पदोन्नती देणे आवश्यक आहे आज प्रदीप नाईक मनोज वाघ रमजान अन्सारी श्री किशोर सुडके रनाळकर असे अनेक कर्मचारी प्रभारी म्हणून प्रामाणिकपणे काम करीत आहेत तरी त्यांना पदोन्नती देण्याबाबतचा विषय स्थायी समिती समोर घेण्यात यावा व त्यांच्या सेवेचा विचार करून त्यांना तातडीने पदोन्नती देणेबाबत प्रशासनाने कारवाई करावी ही विनंती

म. सभापती — या विषयावर उपायुक्त सो. यांनी माहिती द्यावी.

म. उपायुक्त — कर्मचा-यांच्या पदोन्नतीचा हा विषय आहे. तो ज्या गतीने सोडविला गेला पाहिजे होता तो त्या गतीने सोडविला गेला नाही हा विषय अतिशय गंभीर आहे. याबाबत मा.आयुक्त सो.यांनी संबंधितांना सुचना दिलेल्या आहे. आपण हा जो विषय मांडला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग आहे त्या विभागाची जे शासन निर्णय, परिपत्रक आहे ती सर्व तपासून खात्री करुन निकाली काढण्यांत येईल त्यांची आम्ही दक्षता घेत आहेत. व आम्ही आपल्याला ग्वाही देऊ इच्छितो कोणावरही अन्याय होणार नाही.

म. सभापती — या ठिकाणी हे काम करण्याची प्रशासनाची मानसिकता आहे. या ठिकाणीही नामोउल्लेख केलेले कर्मचारी यांनी मनपासाठी जी सेवा केलेली आहे त्याची सर्वांना न्याय देण्याची मानसिकता प्रशासनाची आहे. महापौर सो. यांचे मत आहे. ज्या ज्या शासनाच्या गाईड लाईन असतील त्या त्या पदांना न्याय देण्यांत येईल असे मी तुम्हाला सांगतो.मी जातीने लक्ष घालून सर्व कर्मचा-यांना न्याय देण्यांचा प्रयत्न राहील.

या प्रस्तावातील नमूद कामांना मा.आयुक्त सो. यांच्या मान्यता पाहता व लेखा विभागाने नमूद केलेल्या सर्व बाबीची पूर्तता करुन घेण्यांत यावी. तसेच आयुक्त सो. यांनी दि. 4/5/2020 या शासन निर्णय तपासूनच सदर विभागाने पुढील कार्यवाही करावी तसेच यापूर्वी स्थायी समितीने विभागाला अतिरिक्त आयुक्त,उपायुक्त यांना दिलेल्या अधिकारा प्रमाणे मान्य केलेल्या कामाची यादी तात्काळ स्थायी समितीपुढे सादर करावी.

तसेच सद्यस्थितीत अनेक कर्मचारी महत्वाच्या पदांवर प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांना त्या पदाचा लाभ व जबाबदारी देण्यासाठी पदोन्नती तथा पदस्थापना देणेबाबत आस्थापना विभागाने तात्काळ कार्यवाही व अंमलबजावणी करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५३ दिनांक २७/०८/२०२०

मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यंत मंजुरी दिलेल्या कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर.

धुळे महानगरपालिका धुळे

(बांधकाम विभाग)

दिनांक :-१/०७/२०२० ते ३१/०७/२०२० अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

अ. क्र.	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामाचे नाव	रक्कम	निधी
१	५४	३/०७/२०२०	प्रभाग क्र.२ विद्या नगर भागात १)स्वामी नारायण मंदिर रोड ते प्लॉट नंबर ५७ २) प्लॉट नंबर ५९ ते ८७ पावेतो ३)प्लॉट नंबर ८५ ते प्लॉट नंबर १११ ४) प्लॉट नंबर १८३ ते प्लॉट नंबर १८७ पावेतो गटार करणे.	२४,९२,१४३/-	मनपा निधी अंतर्गत
२	५६	६/०७/२०२०	प्रभाग क्र.३ मध्ये देवपूर भागातील गुलमोहर कॉलनी बाबत श्री पोतदार ते श्री नितीन वानखेडे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	५,९२,९३१/-	मनपा निधी अंतर्गत
३	६६	१४/७/२०२०	प्रभाग क्रमांक ३ मधील गुलमोहर कॉलनी भागातील मराठे यांच्या घरापासून ते तरी घुगे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	९,९६,८७६/-	मनपा निधी अंतर्गत
४	७०	२०/७/२०२०	प्रभाग क्रमांक ३ वीटभट्टी भागातील आयुब भाई यांच्या घरापासून ते आरू भाई यांच्या घरा पावेतो व श्री युवराज भटकर यांच्या घरापासून ते गोसिया मज्जित पर्यंत व श्री रहीम मिस्त्री यांच्या घरापासून ते कलीम मिस्तरी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.	५,८८,३२८/-	आमदार निधी अंतर्गत
५	७१	२०/७/२०२०	प्रभाग क्रमांक 3 विटाभट्टी भागातील श्री रफिक पेंटर यांच्या घरापासून ते आसिफ बेग यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.	८,९४,३२८/-	आमदार निधी अंतर्गत
६	७२	२०/७/२०२०	प्रभाग क्रमांक तीन आग्रा रोड ते डॉक्टर पटेल यांच्या घरापर्यंत काँक्रीट रोड व गटार करणे.	७,५०,०००/-	आमदार निधी अंतर्गत
७	७३	२०/७/२०२०	प्रभाग क्रमांक 3 मध्ये सलीम शेख ते पोस्ट गल्लीपर्यंत सिमेंट काँक्रीट रोड व गटार करणे.	७,४८,०८९/-	आमदार निधी अंतर्गत
८	७४	२०/७/२०२०	प्रभाग क्रमांक ८ अकबर चौक हुसैनी बिल्डिंग ते बिस्ती गल्ली ते शरद दुग्धालय येथे कॉंक्रीट रस्ता करणे.	५,११,४५८/-	मनपा निधी अंतर्गत
९	७५	२०/७/२०२०	प्रभाग क्रमांक १२ मध्ये कबीर गंज भागात सत्तार भाई वाड्यापासून ते सबिर्सलाम मदरसा रस्ता काँग्रेस करणे.	९,९६,४२२/-	मनपा निधी अंतर्गत
१०	७७	२०/७/२०२०	प्रभाग क्रमांक ८ बिस्ती गल्ली खलील अन्सारी ते शरद दुग्धालय यांच्या घरापर्यंत नवीन ड्रेनेजलाईन टाकणे.	५,७६,६५२/-	मनपा निधी अंतर्गत
११	७९	२१/७/२०२०	प्रभाग क्रमांक ६ मध्ये महिंदळे हनुमान मंदिर ते इंदिरानगर येथील ४" व ६" एचडीपीई पाईप लाईन टाकणे.	७,९९,९१२/-	मनपा निधी अंतर्गत
१२	८०	२१/७/२०२०	प्र.क्र.६ मध्ये महिंदळे येथे होळी चौक ते मरिमाता मंदिर ते भगवान बाळा सोसायटी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे.	९,९९,४८५/-	मनपा निधी अंतर्गत
१३	८१	२१/७/२०२०	प्रभाग क्रमांक ६ येथे होळी चौक ते निलेश	१८,००,७२५/-	मनपा निधी अंतर्गत

			पाटील गोल गल्ली रस्ता काँक्रीट करणे .		
१४	८२	२१/७/२०२०	प्रभाग क्रमांक १० मध्ये शंकर भिल ते बन्सी भिडे यांच्या घरापर्यंत रोड व गटार करणे.	१७,९८,९२३/-	मनपा निधी अंतर्गत
१५	८३	२१/७/२०२०	प्रभाग क्रमांक ६ गाव विहीर ते आदिवासी वस्ती पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.	१४,९१,४४२/-	मनपा निधी अंतर्गत
१६	८४	२१/७/२०२०	प्रभाग क्रमांक ६ मोराणे अमरधाम येथे पेव्हिग ब्लॉक बसविणे.	१४,८७,६७०/-	मनपा निधी अंतर्गत
१७	८५	२१/७/२०२०	प्रभाग क्रमांक १७ मध्ये सेवादास नगर भागात रावण पाटील ते श्री गुप्ता यांच्या घरापर्यंत रस्ता कांक्रिटीकरण करणे.	९,९९,८९७/-	मनपा निधी अंतर्गत
१८	८८	२१/०७/२०२०	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी कबीर गंज भागात प्लॉट नं.१२१ ते प्लॉट नं.१३१ पर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	९,८४,३७१/-	मनपा निधी अंतर्गत
१९	९४	२९/०७/२०२०	प्रभाग क्र. १ मध्ये वलवाडी भागातील अशोक नगर व इंदिरानगर भागात पाईपलाईन टाकणे.	६,२०,३७६/-	मनपा निधी अंतर्गत
२०	९६	२९/०७/२०२०	प्रभाग क्र. १४ मध्ये राजवाडे नगर भागात श्री.उध्दव कचवे यांच्या घरापासून ते जे.बी.महेश्वरी यांच्या घरा पर्यंत व श्री.चंद्रकान्त मुलमुले ते श्री.तारगे यांच्या घरापर्यंत भूमिगत पाईपलाईन टाकणे.	९,९३,५६६/-	मनपा निधी अंतर्गत
२१	९७	२९/०७/२०२०	प्रभाग क्र. ५ श्रेयस कॉलनी भागातील हनुमान मंदिरा समोरील खुल्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	९,९९,९७४/-	मनपा निधी अंतर्गत
२२	९८	२९/०७/२०२०	प्रभाग क्र.१९ मध्ये जामचामळा ४० गावरोड भागात भरत नगर पासून ते आसिफ पठाण,मनीस हवालदार ते हुसेन मस्जिद ते याकुब वायरमेन ते मनीस शहा इस्माईल वेंडर यांचे घरापर्यंत काँक्रीट गटार करणे.	१४,९५,८९१/-	मनपा निधी अंतर्गत
२३	९९	२९/०७/२०२०	प्रभाग क्र. १९ मध्ये अजमेरा नगर खडीपट्टी भागात चांद बी यांचे घरापासून ते अमीन मिस्तरी यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	९,४९,६९४/-	मनपा निधी अंतर्गत
२४	१००	२९/०७/२०२०	प्रभाग क्र.६ नकाणे अमरधाम जवळील जागेवर महिलांसाठी शौचालय बांधणे.	१३,२१,८८०/-	महिला व बाल कल्याण निधी अंतर्गत
२५	१०१	२९/०७/२०२०	प्रभाग क्र. ६ नकाणे येथील मयूर पाटील ते भगवान पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	९,७५,८०५/-	मनपा निधी अंतर्गत
२६	१०२	२९/०७/२०२०	प्रभाग क्र. १८ मध्ये पार्वती नगर भागात ड्रेनेज लाईन टाकणे.	७,४९,३४५/-	आ.फारूक शहा यांचे निधीतून
२७	१०४	२९/०७/२०२०	प्रभाग क्र. ६ नकाणे आदिवासी वस्ती येथे १० सीट महिलांसाठी शौचालय बांधणे.	१३,२१,८८०/-	महिला व बाल कल्याण निधी अंतर्गत
२८	१०७	३१/०७/२०२०	प्रभाग क्र.१९ रहेबर बाग भाग येथे सलीम मन्सुरी यांच्या घरापासून ते अलीम मौलाना	९,८८,१६८/-	मनपा निधी अंतर्गत

			यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.		
२९	१०८	३१/०७/२०२०	प्र.क्र.१२ अपना हॉटेल पासून ते अब्दुल हमीद प्लॉट वाले यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	९,८४,३७१/-	मनपा निधी अंतर्गत

या प्रस्तावातील नमूद कामांना मा.आयुक्त सो. यांच्या मान्यता पाहता व लेखा विभागाने नमूद केलेल्या सर्व बाबीची पूर्तता करुन घेण्यांत यावी. तसेच आयुक्त सो. यांनी दि. 4/5/2020 या शासन निर्णय तपासूनच सदर विभागाने पुढील कार्यवाही करावी तसेच यापूर्वी स्थायी समितीने विभागाला अतिरिक्त आयुक्त,उपायुक्त यांना दिलेल्या अधिकारा प्रमाणे मान्य केलेल्या कामाची यादी तात्काळ स्थायी समितीपुढे सादर करावी.

तसेच सद्यस्थितीत अनेक कर्मचारी महत्वाच्या पदांवर प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांना त्या पदाचा लाभ व जबाबदारी देण्यासाठी पदोन्नती तथा पदस्थापना देणेबाबत आस्थापना विभागाने तात्काळ कार्यवाही व अंमलबजावणी करावी.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ४८ तापी पाणीपुरवठा मुख्य वाहिनीवरील लिकेजेस दुरुस्ती कामे करणेसाठी झालेला खर्च रु. ८२,७१२/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल सोनार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अधिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च बिल रु. ८२,७१२/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ क नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५४ दिनांक २७/०८/२०२०

तापी पाणीपुरवठा मुख्य जलवाहिनी ९६५ एम एम च्या बाभळे एम.बी.आर दरम्यान pure वॉटर वरील लिकेजेस दुरुस्तीचे कामेदि.20 व 25 जून रोजी करणेत आली आहेत.दिनांक 20/06/2020 शनिवार रोजी जुना आग्रा रोड (सोनगीर ते बाभळे) जामफळ तलाव catchment एरिया मधील सोनगिर बारी पासून जवळील पोल्ट्री फॉर्म जवळ तसेच जुनी हिरा हॉटेल जवळील तसेच बाभळे पाणी पुरवठा केंद्रावरील दोन लिकेजेस दुरुस्तीचे कामे तातडीने करून घेण्यात आली.सोबत या कामाचे फोटो सादर आहेत.

तसेच दिनांक 25/06/2020 रोजी साडेसात वाजता दरम्यान सोनगीर टोल नाक्याच्या पुढे सुरभी हॉटेल जवळ मोठी गळती लागली. या ठिकाणी पाईपलाईनचे man hole झाकण झीर्ण झाल्याने फाटल्याने मोठ्या crack मुळे सदरचे काम नवीन प्लेट लावून पॅच वर्क करण्यात आले.सदरील दोन्ही कामे तातडीची असल्याने व मोठ्या प्रमाणात गळती थांबविणे आवश्यक असल्याने लगेच काल मर्यादित करून घेण्यात आली आहेत.सोबत कामाचे स्थळ फोटो जोडले आहेत .सदरील दोन्ही कामे मे,आकाश इंटरपाईजेस यांनी पूर्ण केली असून सोबत प्रमाणे प्राथमिक बिल रु. ८२,७१२/- मात्र चे एकत्रित सादर आहे.

सदर कामे तातडीने व कालमर्यादेत करणे आवश्यक असल्याने त्याबाबत वरिष्ठांना अवगत करून करणेत आली आहेत. करिता सदरचे कामाकरिताचे खर्चास कार्यात्तर मंजुरीचे अधिकार म.स्थायी समिती यांना असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम 67 चे क नुसार केलेल्या कारवाईबाबत ,त्याकरिता च्या उपलब्ध तरतुदीन्वये (अर्थसंकल्पीय तरतूद) होणारा खर्च याविषयीचे प्रतिवृत्त म.स्थायी समिती स देणेचे निर्देश आहेत.

उक्त मान्यतेस अधीन तापी पाणीपुरवठा मुख्य वाहिनीवरील लिकेजेस दुरुस्ती कामी मे,आकाश इंटरपाईजेस,धुळे यांचे खर्च देयक रु. ८२,७१२/- मात्रचे खर्चास कार्यात्तर मान्यतेसाठी मे. स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च बिल रु. ८२,७१२/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ क नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ४९ कोविड १९ च्या प्रतिबंधात्मक उपाय योजना व कार्यवाहीसाठी भांडार विभागामार्फत ५ पुरवठादारांकडून विविध प्रकारचे साहित्य खरेदी व कामे तांतडीने बाजार भावाप्रमाणे करण्यांत आले, याकामी झालेला एकुण खर्च रु.८,१०,४५७/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल सोनार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च रु. ८,१०,४५७/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ क नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५५ दिनांक २७/०८/२०२०

धुळे महानगरपालिका शहरात कोव्हीड-१९ या रोगाचा प्रार्दुभाव रोखणे करीता उपाय योजना सर्व्हेक्षण या करीता तातडीने खरेदी केलेले साहित्या बाबतचे प्राप्त बिल अदा करणेस व झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत.. धुळे शहरात कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव होऊ नये यासाठी केंद्रीय व राज्य शासनाच्या सुचनेनुसार उपाय योजना करणेची अंमलबजावणीसाठी म.आयुक्त सो., यांचे दालनात झालेल्या तातडीचे बैठकीत शहरात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखणे करीता तातडीने सर्व्हेक्षण करणे. कॉरन्टाईन पेशंट यांना साहित्य पुरविणे कामगार यांना साहित्य पुरविणे गर्व्हमेंट पॉलिटेक्नीकल येथील पेशंट यांना हॅन्डलुम साहित्य असे विविध कामे म.अधिकारी यांचे मागणी रिपोर्ट प्रमाणे साहित्य खरेदी करणेत आले आहे. सदर साहित्य खरेदी करणेत येऊन त्यांची नोंद भांडार कोविड रजिस्टर मध्ये घेण्यात आलेली आहे. तसेच रजिस्टर साहित्य प्राप्त झाले बाबत स्वाक्षरी करून साहित्य अदा करणेत आलेले आहे.

तरी वरील प्रमाणे साहित्याची बिल प्राप्त झालेले असुन खालील प्रमाणे तपशिल सादर करणेत येत आहे.

अ.क्र.	प्राप्त बिल तपशिल	पुरवठाधारक	बिल अदा रक्कम	शेरा
१	कोव्हीड -19 करीता मास्क, सॅनिटायझर, रेकॉर्डींग, लेझर प्रिन्टर्स,गुड नाईट मशिन, फेरीवाला पास इत्यादी साहित्य	प्राप्त बिल अ.क्र.१ ते ७	२,३५,६०७/-	
२	हॅन्डलुम साहित्य फोम रेक्झीन गादी, बेडशिट,पिलो,कव्हर, पिलो, सोलापुर चादर	मे.गुरूनानक सप्लायर्स धुळे	१,७६,४९९/-	
३	कोव्हीड-19 करीता सर्व्हेक्षण करणे आरोग्य विभाग करीता विविध प्रकारचे साहित्य म.आयुक्त सो यांनी सुचित केल्यानुसार साहित्य खरेदी करणे	मे.न्यु सेन्ट्रल बुक स्टॉल	१,३६,८९२/-	
४	म.महापौर यांनी सुचित केल्याप्रमाणे शहरात कोरोना रोगाचा प्रादुर्भाव रोखणे करीता शहरात फवारणी करीता स्प्रे	मे भारत मॅटीनरी,धुळे	१,००,९३३/-	
५	कोरोना प्रार्दुभाव रोखणे करीता शहरात उर्दु व मराठी पॉम्पलेट मलेरीया कर्मचारी यांना किट सॅनिटायझर स्प्रे नोझल प्लॅस्टीक लॉक वॉश बेसीग स्टॅड अंपग व्यक्ती करीता धान्य वाटप करणेस वाहन व्यवस्था करणे	श्री व्यंकटेशन इन्टर्प्राझेस	१,६०,५२६/-	
	एकुण खर्च		८,१०,४५७/-	

तरी सदर तक्तयाप्रमाणे खर्च अदा करणे करीता म.आयुक्त सो यांनी सदरचा खर्च अदा करणेस मे.स्थायी समिती पुढे सादर करणेस मंजुरी दिलेली असुन सदरच्या खर्चास कार्यात्तर मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च रु. ८,१०,४५७/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ क नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५० धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत उद्घाटन प्रसंगी झालेला वाढीव खर्च रु. १७,५५४/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.युवराज पाटील विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या

अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च रु. १७,५५४/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ क नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५६ दिनांक २७/०८/२०२०

धुळे महानगरपालिका नविन प्रशासकिय इमारत उभारणी नंतर सदर इमारत उदघाटन प्रसंगी मा.नामदार श्री.शरदचंद्रजी पवार साहेब यांचे उपस्थितीत सोहळा आयोजित करणेत आलेला होता.सदर कार्यक्रम प्रसंगी व्यवस्था करणेसाठी स्थायी समिती ठराव क्र.८५ दि.१/०९/२०१८ रोजी मंजुरी घेण्यात आलेली होती त्यामध्ये राजु भावसार फेटेवाले यांचे कडेस स्वागत,रांगोळी पुतळा व्यवस्था देण्यात आलेली असुन त्याकरीता २२०००/- मात्र खर्च मंजुरी घेण्यात आलेली आहे.

तरी सदर कार्यक्रम स्थळी म.महापौर सो यांचे सुचने नुसार गृहिणी स्वागत सखी , मावळे, उदघाटन साहित्यात वाढ करणेचे सुचित केल्यानुसार वाढीव काम करून घेण्यात आलेले आहे. तरी सदर वाढीव कामानुसार मे. राजेंद्र शॉपींग सेंटर (राजु भावसार फेटेवाले) यांनी रक्कम रूपये ३९५५४/- मात्र बिल सादर केले असुन मागिल मजुर खर्च रू २२०००/- मात्र असुन उर्वरीत रक्कम रूपये १७५५४/- मात्रस झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेस सादर करणेस म.आयुक्त सो यांनी मंजुरी दिलेली आहे. सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील वाढीव खर्च रु. १७,५५४/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ क नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५१ कोविड १९ कोरोना सदृश् परिस्थितीत स्थलांतर होणारे मजूर तथा कामगार यांच्या भोजन व पाणी व्यवस्था करणेत आलेली असून त्यासाठी झालेला खर्च ४,५४,७००/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ क अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल सोनार माझ्या प्रभागात पॉलीटेकनीक कॉलेजला पुष्कळसे कोव्हीडचे पेशंट आहे.त्यांना काल रात्री १० वाजेपर्यंत जेवण सुध्दा मिळालेले नव्हते. त्यांना सुविधा नाही मी या संदर्भात गिरी साहेब यांना सुध्दा भ्रमनध्वनी वरुन कळविले आहे.

म. अमोल मासुळे हया विषयामध्ये पॉलिटेकनिक येथे जे कोव्हीडचे पेशंट ठेवले आहे. त्याना रात्री १० वाजेपर्यंत जेवण मिळाले नाही. याबाबत स्पेशल मिडियावर पोस्ट शेअर झालेली आहे. अशा गोष्टींना कारणीभूत कोण आहे, त्या शोधून त्यांच्यावर कार्यवाही करावी.

म. धांडारपाल सदर ठेकेदार हा कोव्हीड सेंटर येथे चांगल्या प्रकारे जेवण पुरवतो कोव्हीड पेंशंट यांनी आयुक्त सो.व म.जिल्हाधिकारी यांच्या समोर सांगितले आहे.काल पुरवठादारांच्या कामागाराला त्रास झाल्यामुळे जेवण देण्यांस उशीर झाला.

म. अमोल मासुळे — सभापती सो. हे उत्तर अपेक्षित नाही. आम्हाला तो एवढा मोठा पुरवठादार आहे त्यांचे काम १ कामागारावर अवलंबून आहे का? आपले त्याठिकाणी शेकडो पेशंट आहे. त्यांची अशी अवहेलना होत असेल हे चांगले आहे का? डी.एम.सी. समन्वय ग्रुपवर प्रविण अग्रवाल यांनी १ क्लीप शेअर केली आहे. ती क्लीप पहा व त्या ठिकाणी रुग्णाच्या भावना पहा.

म. सभापती — तुमच्या भावना हया धुळेकर जनतेच्या भावना आहेत. जो ठेकेदार आहे त्यांना आम्ही आपले कर्मचारी यांचे फोन वर जे भाषण झालेले त्यात काही गफलत झाली असेल दोषींवर कारवाई करण्यांत येईल.

म. अमोल मासुळे — सदरची चुक आपल्या प्रशासनाच्या माणसाची आहे तो पुरवठादार बोलला ७ वाजले तरी फोन आला नाही.

म. भांडारपाल — मी संबंधितांना ५ वाजेजा फोन केला आहे. त्या संबंधीची क्लीप मी स्वत: आरोग्याधिकारी यांना दाखविली आहे.

म. सुनिल सोनार — त्या ठिकाणी माझ्या प्रभागातील व धुळे शहरातील पुष्कळ पेशंट आहे. जर त्यांची अशी अवहेलना होत आहे व आपल्या पालिकेचे कर्मचारी असल्याने जास्त बोलताही येत नाही.

म. सभापती — या विषयाबाबत आरोग्य अधिकारी या नात्याने आपण त्या ठिकाणी व्हीजीट देतात का नाही याबाबत सविस्तर खुलासा करावा.

म. आरोग्याधिकारी — या बाबतीत संबंधित ठेकेदाराबाबत कुठल्याही पेशंटची अशी तक्रार केलेली नव्हती. आपण जी सोय उपलब्ध करुन दिली आहे त्या बाबत कलेक्टर सो.व आयुक्त सो. यांनीही समाधान व्यक्त केले आहे. ही पहिलीच वेळ आहे.जेवणाच्या बाबतीत तक्रार आलेली आहे. याबाबत संबंधित ठेकेदाराला बोलावून त्यांची चौकशी केली जे बर्कर होते त्यांना संबंधित ठेकेदाराने कळविले होते त्या क्लीप मध्ये ठेकेदाराच्या माणसाने कबुल केले की मी सांगायला विसरलो.

म. अमोल मासुळे — बांभळे जलशुध्दीकरण केंद्र येथे आपण काही सदस्य घेवून पहाणी केली होती. त्याठिकाणी आपल्या लक्षात आले असेल की धुळे शहराला पाणीपुरवठा करणारा एवढा मोठा प्रकल्प आहे. त्या ठिकाणी १ ही केमिस्ट नाही. त्याठिकाणी आपण पुढाकार घेवून प्रशासनाला जाहिरात काढायला लावली. जाहिरात काढल्यानंतर त्याठिकाणी मुलाखती घेण्यांत आल्या होत्या. यामध्ये पात्रता नसलेल्या उमेदवाराला नियुक्ती देण्यांत आलेली आहे. त्याबाब्त सदस्य श्री. संजय पाटील यांनीही लेखी आक्षेप घेतला आहे. त्या संबंधी माझ्याकडेही पुरावे उपलब्ध आहेत जी समिती गठीत करण्यांत आली होती त्यांचे सदस्य कोण होते यांची माहिती मिळावी.

म.प्र.कार्यालय अधिक्षक — समितीचे अध्यक्ष म्हणून अति. आयुक्त श्री. गिरी साहेबाना नियुक्त करण्यांत आले होते. गिरीसाहेब, गोसावी सो. एम.जी.पी.चे उपकार्यकारी अभियंता पाटील सो. शिंदे सो. प्राध्यापक बिरारी सो. यांची समिती होती. तसेच बिपकांत वाघ हे देखील समिती मध्ये होते.

म. अमोल मासुळे — कार्यालय अधिक्षक श्री. रमजान अन्सारी यांच्याकडेस मनपाची ऐवढी मोठी जबाबदारी आहे तरी आपण आठवून आठवून नांवे सांगत आहेत. याठिकाणी रसायन तज्ञाची जागा भरण्यांत आली या ठिकाणी गोसावी नामक व्यक्तीला मनपाने नियुक्त के ले आहे. तर कागदपत्राची प्रत्यक्ष पाहणी करतांना असे आढळून आले आहे जो व्यक्ती पात्र होता त्याला अपात्र करण्यांत आले व जो व्यक्ती अपात्र होता त्याला पात्र करण्यांत आले. या मागील गौडबंगाल काय व कोणत्या अधिका-याने केले त्यांचे स्पष्ट नांव घेऊन सांगतो उपायुक्त श्री.गोसावी साहेब यांनी त्यांचा पदाचा दुरुपयोग करुन पात्र उमेदवाराला अपात्र केले व अपात्र उमेदवाराला पात्र केले. कशासाठी ? या ठिकाणी प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. आस्थापना प्रमुख श्री. रमजान अन्सारी यांनी याबाबत उत्तर दिले पाहिजे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांनी मनपाच्या जबाबदार अधिका-यावर गंभीरआरोप केलेला आहे. आणि आपण विभागाचे अत्यंत जबाबदार व्यक्ती आहेत. सभासदाच्या आरोपाचा आपण याठिकाणी खुलासा केला पाहिजे. त्यांनी केलेला आरोप आपल्याला मान्य आहे का याबाबत खुलासा करावा.

म.प्र.कार्यालय अधिक्षक — योग्य उमेदवाराची निवड करण्याची जबाबदारी समितीची आहे आमचे काम उमेदवाराची पात्रता यादी समितीपुढे ठेवण्याची जबाबदारी होती. समितीने मुलाखती घेवून निर्णय घ्यावयाचा असतो.

म.अमोल मासुळे — संबंधित अधिका-याशी फोनवर बोलणे झाले होते. संबंधित उमेदवार या जागेसाठी पात्र नाही जे अधिकारी आहेत यांनी दडपण आणून पात्र उमेदवाराला अपात्र केले आणि अपात्र उमेदवाराला पात्र केले आहे. रमजान अन्सारी तुम्ही जे उत्तर दिले ते याठिकाणी अपेक्षित नाही.

म.सभापती — सन्मा. सदस्यांनी हा जो आरोप केला आहे. तो कुठल्या आधारावर केला हे माहित नाही. एखाद्या निवड समितीमध्ये एकादया पदाच्या बाबतीमध्ये अशा प्रकारे होत असेल तर या बाबत सखोल चौकशी झाली पाहिजे. या बाबत मला ७ दिवसाच्या आत या समितीच्या प्रमुखाचा लेखी मत मा. आयुक्त सो. यांच्या समोर ठेवायचे आहे. जर यामध्ये दोष सिध्द होत असेल आपण ज्या अधिका-यावर आरोप केले आहे त्यांची जबाबदारी किती होती हे देखील तपासले पाहिजे आणि जर अशा प्रकारे झाले असेल तर आपण मा. आयुक्त सो. यांचा समितीच्या अहवालानुसार कार्यवाही करण्यांत येईल. रमजान अन्सारी तुम्हाला सूचित करतो धुळे मनपा मधील एकाच ठिकाणी अनेक वर्षापासून जे जे कर्मचारी काम करत असतील असे शासनाच्या ध्येय धोरणानुसार खात्यांतर्गत बदल झाले पाहिजे असे ७ दिवसात ती कार्यवाही करायची आहे.अनेक खात्यामध्ये एकाच पदावर काम करणारे कर्मचारी त्यांच्या पदाचा दुरुपयोग करतात असे माझ्या निदर्शनास आले आहे. गोसावी सो. यांनी खुलासा करावा.

म.उपायुक्त — आदरणीय नगरसेवक अमोल मासुळे यांनी उपस्थित केलेल्या विषय अत्यंत गंभीर आहे. नगरपालिका व महानगरपालिकेत माझी 20 वर्षे सेवा झालेली असून आस्थापना विषयक मला असलेले ज्ञान व माहितीच्या आधारे उमेदवारांची अर्हता तपासून पात्र उमेदवार निवड समितीच्या मुलाखतीकरिता सादर करण्यांत आलेला होता. सदर कार्यवाहीमध्ये माझी कोणतीही चूक नसून याबाबत काही अनियमितता असल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी मी घेण्यांस तयार आहे. सदर विषयाबाबत प्राप्त तक्रारीनुसार स्थानिक महाविद्यालयातील प्राचार्याकडे खातर जमा केलेली आहे. व एम.एस्सी. केमिस्ट्री व एम.एस्सी.ऑर्गनिक केमिस्ट्री या दोन्ही पदवीका एकच व समकक्ष असल्याचे संबंधितांनी सांगितले आहे.

म. अमोल मासुळे — या मनपात जे पण अधिकारी असतील त्यांचा मागील कार्यकाळ तपासला पाहिजे.

म. सभापती — सभासदाच्या भावना लक्षांत घेता या ठिकाणी गोसावी साहेबानी स्वत:हून खुलासा केलेला आहे. रमजान अन्सारी यांना मी सूचित करतो ज्या अधिकारी कर्मचारी यांच्यावर खात्यातंर्गत काही कार्यवाहया झाल्या असतील अशा कर्मचा-यास व अधिका-यास कुठल्याही आर्थिक व्यवहार देऊ नये.त्यामुळे मनपाचे नुकसान होणार नाही अशा ठिकाणी नियुक्ती देऊ नये. याची खातरजमा करण्याची जबाबदारीही रमजान अन्सारी यांची असणार आहे.असे जे कर्मचारी त्यांची यादी तयार करुन आयुक्त सो. यांच्या निदर्शनास आणून द्यावी आणि आयुक्त सो. हे जबाबदार अधिकारी असल्याकारणाने ते प्रशासनाचे प्रमुख असल्याने निर्णय घेतील या केमिस्टच्या विषयाबाबत ७ दिवसाच्या आत चौकशी अहवाल स्थायी समिती समोर सादर करायचा आणि जर आपणास कोणी दोषी वाटत असेल तर त्यांच्यावर कार्यवाही करण्यांत येईल.

म. सुनिल सोनार — नगररचना विभागात आमच्या भागातील बिल्डींग प्लॅन मंजुरीसाठी ७- ८ महिन्यांपासून पेडींग पडले आहे. कमलेश सोनवणे, प्रकाश सोनवणे यांचा बिल्डींग प्लॅन मंजूर पेक्षा लेआऊट मंजूर करण्यावर जास्त भर असतो.परदेशी साहेब हे टिपण्या करुन परस्पर विल्हेवाट लावत असतात.हे पालिकेत पाय ठेवत नाही यांच्यावर काय कार्यवाही करणार प्रकाश सोनवणे७-८ वर्षापासून एकाच ठिकाणी आहे यांचा खुलासा करावा.

म. सभापती — याचा खुलासा श्री. परदेशी साहेब यांनी करावा.

म. अमोल मासुळे — सन्मा. सदस्यांनी चांगला विषय घेतला आहे. सभापती सो. २ दिवसापूर्वी S.P. साहेबाना निवेदन दिले. नगररचना मधील इंजिनअर आहेत त्यांना लेआऊट संदर्भातील जे प्रकरण आहे त्यात जास्त इन्टरेस्ट आहे. माझी एक मागणी अशी आहे की सन २०१५ ते २०२० पर्यत धुळे शहरात जे क्षेत्रफळ आहे त्यात किती लेआऊट मंजूर करण्यांत आले. नगररचना मार्फत किती लेआऊट मंजूर करण्यांत आलेले आहे. स्थायी समितीमध्ये त्यांनी लवकर अहवाल सादर करावा धुळे शहरात कशा प्रकारे लेआऊटला मंजुरी दिलेली आहे.मी नगररचना विभागावर एक आरोप करु इच्छितो माझ्या प्रभागात गेल्या दोन वर्षापासून ले आऊट टाकण्यात आलेला आहे. त्या संबंधीत तक्रार मी नगररचना विभागाला दिलेली आहे. लेआऊट मध्ये रस्ता आहे. पण रस्त्यामध्ये प्लॉट टाकण्यांत आलेला आहे.सद्यस्थिती मध्ये तो प्लॉट देखील विकला गेलेला आहे. या सर्व गोष्टींना कोण जबाबदार आहे. ज्या वेळेस आपल्याकडे लेआऊट सादर होतील त्या वेळी त्या विषयावर चर्चा केलेली योग्य राहील. पुढच्या मिटींग मध्ये सन२०१५-२०२० पर्यत जे ले आऊट मंजूर केले असतील त्यांची माहिती मिळावी.

म. सुनिल सोनार — लेआऊट धारकांना तात्पुर्ती मंजूरी दिली होती त्याच्या सनद तयार झाल्या त्याचे उतारे तयार करुन घेतले.

म. अमोल मासुळे — धुळे मनपाच्या मालकीच्या ज्या जागा आहेत अशा शेकडो जागा महापालिकेने कराराने धुळेकरांना जागा दिलेल्या आहेत त्या पुन्हा मनपाने हस्तांतरीत करुन त्यांना जो नवीन बाजार भाव आहे त्या नुसार ॲफीडेव्हीट करुन त्यांना देण्यांत यावे करार संपलेला असतो किंवा नसो सर्व मालमत्ता ताब्यात घेतल्या पाहिजे. त्यामुळे मनपाला १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त फायदा होणार आहे. लवकरात लवकर नगररचना विभागाला आदेशित करुन जागा हस्तांतरण करुन घेतल्या पाहिजे.

म. सभापती — श्री. परदेशी साहेब सन्मा.सदस्यांच्या प्रश्नाची माहिती आपल्याला मिळाली असेल याबाबतचा सविस्तर खुलासा या ठिकाणी करावयाचा आहे.नगररचना विभागात होत असलेला हा सावळा गोंधळ या कारभाराची आपणाला पूर्ण कल्पना आहे. किंवा नाही माहित नाही माझ्या देखील या विभागाच्या बाबतीत काही तक्रारी आहेत तत्पूर्वी सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचा खुलासा करावा.

म. नगररचनाकार — मनपाच्या जागासाठी इस्टेट मॅनेजर म्हणून खाते स्वतंत्रपणे आहे. नगररचना विभागातील व्हॅल्यूएशनचा भाग आपल्याकडे आहे जी मनपा मालकीची इस्टेट डिपार्टमेंट त्यात मनपाचा फक्त मुल्यांकनाचा विषय आहे. आपल्या अधिलेखाप्रमाणे महानगरपालिकेचा विचार केला तर मनपाच्या मालमत्ता हे बांधकाम विभागाकडे आहे.आरोग्य विभागाकडे, शिक्षण मंडळ विभागाकडे काही मालमत्ता आहेत. त्यांनी त्याबाबत यादी करुन दिली तर त्यांचा नवीन ठराव करायाचा साठी त्यांना काय भाडयाने दिली आहे याबाबत ही जबाबदारी नक्की करणार आहोत. लेआऊट संदर्भात जी तक्रार आहे रस्ता वर प्लॉट टाकला नाही त्यांनी अतिक्रमण केले होते त्यांना आपण नोटीस दिली होती. त्यावर कार्यवाही करण्यांत आली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्य हे कुणावरही निराधार आरोप करीत नाही ते जबाबदार व्यक्ती आहे. याबाबतची तक्रार माझ्याकडे दिली होती. नगररचना विभागातील कर्मचा-यांचे नांव देखील उपस्थित केलेले आहे. आपल्या मनपामध्ये जे कोणी ले आऊट धारक आहे ते ऑन लाईन असेल किंवा ऑप लाईन असेल तो दाखल केल्या नंतर तो ले आऊट मध्ये अनेक प्रकारच्या त्रुटया काढल्या जातात त्या त्रुटयांची पूर्तता केल्यानंतर पुन्हा दुसरी त्रुटी काढली जाते. त्या त्रुटी काढल्यासाठी फाईलला २,३,४ महिने लागून जातात. तो फाईलवाला जास्त हतबल होवून जातो. आणि नंतर तुमच्या खात्यातील कर्मचारी परस्पर त्या व्यक्तीशी संपर्क साधतात आणि संपर्क साधल्यानंतर ती फाईल तात्काळ मंजूर होते. माझ्या जवळ असे पुरावे आहेत मी कुठलाही दावा पुराव्या शिवाय करत नाही मी स्वत: याबाबतची खातर जमा केलेली आहे. परस्पर त्या व्यक्तीला संपर्क साधून २/ ३ दिवसात पूर्ण केली जाते. जर संपर्क साधला नसेल तर त्यात अनेक त्रुटया कायदयाच्या आधारे काढल्या जातात आणि ती फाईल विलंब होते आणि ही बाब खरी आहे का याचा खुलासा करावा.

म. नगररचनाकार — कोणती फाईल आहे. त्याच नांव सांगितले तर मी आपणाला स्पष्टीकरण देतो.

म. सुनिल सोनार — संजय बहाळकर हे माझ्या कौटुंबिक संबंधीत आहे. माझे परिचित श्री. अनिल हजारीमल जैन गांधीनगर मधील प्लॉटचे मंजुरीला टाकलेले आहे. एक ते दीडवर्षापासून वेळोवेळी त्रुटया दाखल आहे. हेच जर परस्पर गेले तर काय घ्यावयाचे ते घ्यायची तयारी दर्शवितात त्यांच्यावर काय विश्वास दाखवयाचा आणि काय स्पष्टीकरण ऐकायचे किती खोटे बोलतात.

म. सभापती — साहेब आपण फाईल टाकली आणि फाईल टाकल्यानंतर त्रुटया एकदा काढतात का एकाची पूर्तता केल्यानंतर पुन्हा काढतात.जो कोणी व्यक्ती आहे त्याला कसे सांगतात असे का करतात

म. नगररचनाकार — सर मी हजर झाल्यानंतर कोणत्याच फाईल मध्ये २ वेळेस त्रुटी काढल्या नाहीत.

म. सुनिल सोनार — साहेब मी तुमच्याकडे किती वेळा आलो.

म. नगररचनाकार — कोणती फाईल आरक्षणाची का?

म. सुनिल सोनार — आरक्षणाची फाईल तर एक नाटक आहे.

म. नगररचनाकार — श्री. अनिल हजारीमल जैन यांची फाईल माझ्याकडे आली नाही बघून मी सांगतो.

म. सभापती — परदेशी साहेब तुम्ही या खात्याचे प्रमुख आहोत मनपाच्या मालकीच्या जागा बाबत या विषयावरुन गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस प्रशासनाला पत्र दिलेले आहे ते पत्र दिल्यानंतर सुध्दा आज पावेतो गुन्हा दाखल झालेला नाही. त्या फाईल मध्ये ती फाईल माझ्याजवळ आहे. किशोर मोहनलाल बाफना ४८२- अ या बाबतचा आपल्या मनपाची मालमत्ता असतांना ती मालमत्ता खोटया कागदपत्राच्या आधारे विकून हा सदरचा लॅन्ड माफिया याचा गोरख धंदा आहे अशा प्रकारे त्रिकूट तयार करुन सरकारी जमिनी लाखोचे काम हा व्यक्ती करतो १७-१८ कोटी रुपयांशी त्यांनी समोरच्या माणसाशी व्यवहार केला आहे. येणा-या काळामध्ये त्यांचा जागचे विषय सुध्दा पुढे येईल आजच्या आपल्या महाराष्ट्रला खुलासा वाचला का तुम्ही त्या खुलाशाला त्यांनी आपल्या धुळे महानगरपालिकेवर आरोप केला आहे. की धुळे मनपाने त्याला बदनाम करण्यासाठी त्याला कुठेतरी अडचणीत आणण्यासाठी व पैसे मिळू नये म्हणून त्याला बदनाम करण्यांचे कट कारस्थान सभापती नगरसेवक आयुक्त सो. यांच्यावर केलेला आहे. यांचा खुलाशाबाबत मनपाच्या पॅनलवर असलेले ठाकूर यांच्याकडून खुलासा करुन घ्यावा आणि त्यांच्यावर गुन्हा नोंदणीसाठी बहाळकर,सोनवणे यांना पुढे न करता तुम्ही नगररररचनाकार तक्रारदार होण्यास पुढे या. तुम्हाला मी सूचित करतो या फाईलचा अभ्यास केल्यानंतर माझ्या असे लक्षांत आले आहे की यामुळे संजय बहाळकर,ज्यांनी फाईल मंजूर केली आहे ते आयुक्त त्यानंतर नगररचना प्रमुख परदेशी सो. यांनी याबाबतचा लेखी अहवाल

द्यावा. ती फाईल मंजूर करत असतांना मनपा क्षेत्रामध्ये काय काय निर्णय घेतले आहे त्याचा खुलासा ३/४ दिवसात देणे आवश्यक आहे. कारण येणा-या काळामध्ये मनपाला हा भामटा व्यक्ती ३/ ४ कोटी रुपये भरपाई घेण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून तुम्ही या फाईलवर निर्णय घेत असतांना काय निर्णय घेतला तो लेखी स्वरुपात हवा आहे आणि तो लेखी खुलासा करत असतांना मनपाचे नुकसान होणार नाही व मनपाचे अधिकारी कर्मचारी अडचणीत येणार नाही यांची आपल्याला काळजी घेणे महत्वाचे आहे. कारण आजच्या आपला महाराष्ट्राच्या खुलाशानंतर आज तो ज्याने खोटे कागदपत्र दस्ताऐवज तयार करुन लाखो करोडो रुपयांची मालमत्ता हडप केली आहे. तो व्यक्ती आज आपल्याला आरोपीच्या पिंज-यामध्ये उभा करतो आहे. ही फार गंभीर गोष्ट आहे. या फाईलच्या संदर्भात आयुक्त सो. यांच्याशीही माझी चर्चा झालेली आहे. आपण निर्णय घेतलेला खुलासा मला कळवा आणि दुसरी गोष्ट रमजान अन्सारी यांना मी सूचीत करतो नगररचना विभागामध्ये ज्यांची ३/ ३ वर्ष झालेली असतील अशा कर्मचा-यांच्या २ दिवसात खात्यांतर्गत बदल्या झाल्या पाहिजे. आता मला निपक्ष्पणे या फाईलची गटाबाबत चौकशी करणे गरजेचे आहे आणि हे जे कर्मचारी या ठिकाणी असतील त्या ठिकाणी भविष्यकाळात गडबड घोटाळा होण्याची शक्यता असते जो पर्यत चौकशी होत नाही तो पर्यतबदली खात्यांतर्गत झाली पाहिजे. तुम्ही तिन्ही अधिकारीनी २ दिवसात खुलासा करावा असे मी स्थायी समितीत सूचित करतो. त्याचा लेखी ठराव करण्यांत यावा कारण ही मालमत्ता सार्वजनिक जनतेच्या हितासाठी आहे कूणीही अधिकारी पदाधिकारी स्वार्थासाठी नाही आहे अशा अनेक प्रॉपर्टी आहे या प्रॉपर्टी बावत नगरसेवक झाल्यानंतर पत्र दिलेले आहे पत्र दिल्यानंतर त्यांची पूर्तता करणेसाठी पुढील स्थायी समितीत नगररचना विभागातील टॉवर बावतील असतील, मनपा मालकीचे भूखंड बाबत असतील, मनपाने करार करुन दिलेल्या जागा ज्यांचा करार संपला असेल त्या सर्व जागा मनपाच्या नांवे करण्यांत यावे जे नांव लागले गेले नसेल तर ते नांव लावण्यासाठी इतर कामे सोडून मनपाचे उत्पन्नवाढीसाठी प्रमुख बाव आहे असे या ठिकाणी मी सूचित करतो आपण मनपाचे कर्तव्य दक्ष अधिकारी आहेत परदेशी साहेब मला तुमच्या कडून फार अपेक्षा आहे माझे व्यक्तीगत दोष कोणशी नाही ना अधिकारी ना कर्मचारी आम्ही ५ वर्ष येथे आहे पुढे येऊ अथवा न येऊ परंतु तुम्ही अधिकारी आहेत तुमचे ३०/ ४० वर्ष सेवा देण्यांचे अधिकार आहेत जो अधिकारी अधिकाराचा गैरवापर करतो त्याच्यावर येणा-या काळामध्ये कार्यवाही करण्यांत येईल असे मी स्थायी समिती सभापती या नात्याने सूचित करतो. आणि महासभेमध्ये महापौर आयुक्त सो. यांना समोर आणून कोणाचीही गय केली जाणार नाही कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल केले जाईल आणि मनपाची ही प्रॉपर्टी अबाधीत राहील या साठी आम्ही कटीबध अधिकारी कर्मचारी लोकसेवक यांच्या सोबत आहे. याची मी ग्वाही देतो सन्मा. सदस्य आपल्या अखत्यारीत काम करत असतात जो काम करतो त्याच्या कडून चूका होतात. लोक प्रतिनिधी म्हणून अनेक चुका होत असतात अधिकारी कडून झालेल्या चूका माफ नसतात आम्ही लोक प्रतिनिधी आहोत आम्हाला बोलण्याची मुभा आहे अधिका-यांना नाही ज्या कमी स्वरुपात चुका झाल्या असतील त्यांना चूका सुधारण्याची संधी देऊ कोणाच्या जिवावर बेतेल असे काम येणा-या काळामध्ये करायचे नाही. लोक प्रतिनिधी आणि अधिकारी हे मनपाचे दोन घटकांचे चाक आहे. हे चाके सोबत राहिले नाही तर हा मनपाचा रथ पुढे जाणार नाही.

म. अमोल मासुळे ज्या मनपाच्या मालकीच्या मिळकती आहे त्या सर्व आपल्या ताब्यात घेण्यांत यावे.

म. सभापती

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचेअभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च रु.४,५४,७००/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ क नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच कोविड सेंटर येथील भोजन व्यवस्था व इतर व्यवस्थेबाबत आरोग्याधिकारी यांनी समक्ष वेळोवेळी भेट देऊन खातर जमा करावी.

तसेच केमिस्ट भरती बाबत सन्मा.सदस्यांनी केलेल्या तक्रारी नुसार निवड समितीतील सदस्यांनी याबाबतचा तात्काळ खुलासा तथा अभिप्राय स्थायी समितीपुढे सादर करावा.

तसेच नगररचना विभाग व अन्य विभागात वर्षानुवर्षे नियुक्त असलेल्या कर्मचारी तथा अधिकारी यांची खाते बदलाबाबत तात्काळ आस्थापना विभागाने कार्यवाही करावी .

नगररचना विभागाने यापूर्वी नगरपालिका / महानगरपालिका यांनी विविध संस्था व व्यक्तींना मनपा मालकीच्या जागा कराराने / भाडेपट्टयाने दिलेल्या आहेत याबाबत तात्काळ माहिती सादर करावी. तसेच सर्व्हे नं. ४८२ अ बाबत म. उपायुक्त,म. नगररचनाकार व संबंधित श्री. संजय बहाळकर यांनी याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा. व सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करुन लेखी खुलासा संबंधित विभागाने करावा.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५७ दिनांक २७/०८/२०२०

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ तसेच साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये धुळे महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना दि.२२/३/२०२० पासुन करणेत येत आहे.

त्यानुसार धुळे महानगरपालिका मार्फत शहरातील स्थलांतर होणारे मजुर कामगार यांची राहण्याची व्यवस्था अग्रवाल विश्राम भवन नदी किनारी करण्यात आलेली होती तरी त्यांना भोजन व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तातडीने करावी लागणार असुन सदरचे काम तातडीने व्यवस्था करणेस शहरातील भोजन मक्तेदार मे.धनलक्ष्मी मंडप ॲण्ड़ डेकोरेटर्स धुळे यांना अति.आयुक्त् सो. यांचे सक्षम चर्चे नुसार सुचित केलेले होते.

तरी सदर व्यवस्थेबाबत महानगरपालिका शिक्षण मंडळ यांचे नियंत्रण ठेवणे बाबत म.आयुक्त सो.यांनी सुचित केले होते तरी सदर व्यवस्थेबाबत धुळे म.न.पा शिक्षण मंडळ यांचे पत्र क्र.३३ दि.२१/५/२०२० ने श्री.राजेश रमेश गायकवाड (मुख्य लिपीक म.न.पा शिक्षण मंडळ तथा निवारा व्यवस्थापक व श्री. महेंद्र श्रीधर जोशी (प्रशासन अधिकारी म.न.पा शिक्षण मंडळ) यांचे मार्फत प्राप्त झाले आहे.

तरी सदरचे बिल अदा करणेस दि.२०/०७/२०२० चे टिपणी नुसार Covid-१९ च्या अनुशंगाने भोजन पुरवठा भांडार विभाग मार्फत होत असल्याने सदरची कार्यवाही भांडार विभाग मार्फत करणेत येत असुन सदर प्राप्त बिल व शिक्षण मंडळ धुळे यांचे मागणी प्रमाणे सदरचे काम तातडीने करून घेण्यात आलेले नुसार खालील प्रमाणे तपशिल सादर करणेत येत आहे.

दिनांक पासुन	दिनांक पावेतो	व्यक्तीची संख्या	दिवस	भोजन किती वेळ(सकाळ व संध्याकाळ)	एकुण	दर	एकुण
२५/०४/२०२०	०६/०५/२०२०	१००	१२	२	२४००	११५	२७६०००
०७/०५/२०२०	१०/०५/२०२०	८६	५	२	८६०	११५	९८९००

११/०५/२०२०	१३/०५/२०२०	८२	४	२	६५६	११५	७५४४०
१४/०५/२०२०	१९/०५/२०२०	१५	७	२	२१०	११५	२४१५०
				एकुण			४३२४००

दिनांक पासुन	दिनांक पावेतो	व्यक्तीची संख्या	दिवस	जारची संख्या दोन वेळचे (सकाळ व संध्याकाळ)	एकुण	दर	एकुण
२५/०४/२०२०	०६/०५/२०२०	१००	१२	६०	७२०	२०	१४४००
०७/०५/२०२०	१०/०५/२०२०	८६	५	५०	२५०	२०	५०००
११/०५/२०२०	१३/०५/२०२०	८२	४	४५	१८०	२०	३६००
१४/०५/२०२०	१९/०५/२०२०	१५	७	१०	७०	२०	१४००
				एकुण			२२३००

तरी सदरचे भोजन मक्तेदार यांनी धुळे म.न.पा शिक्षण मंडळ प्रशासक अधिकारी यांचे मागणी नुसार पुरवठा केलेला आहे. त्यांची नॉंद कोविड रजिस्टर मध्ये घेण्यात आलेली आहे. त्यावर त्यांनी स्वाक्षरी नमुद केलेली आहे.

उपरोक्त सेवा ही जागतिक कोरोना प्रार्दुभाव रोखणे करीता मजुर कामगार यांना सेवा पुरविणे साठी सेवा घेण्यात आलेली आहे. सदरचा खर्च हा धुळे म.न.पा निधी मधुन किंवा शासनाकडुन उपलब्ध होणारा निधी मधुन भागविता येणार आहे.

तरी वरील प्रमाणे सेवा तातडीची असल्याने सदरची सेवा प्राप्त करून घेण्यात आलेली आहे. तरी त्याकरीता येणारा खर्च रू ४,५४,७००/-मात्र संपुर्ण करासहित असुन सदरचा करणेत आलेल्या खर्चास व प्राप्त करून घेतलेल्या सेवा तसेच पुरवठा धारक यांचे बिल अदा करणेस महानगरपालिका अधिनियम ६७ क अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी मिळणेस मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च रु. ४,५४,७००/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ क नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच कोविड सेंटर येथील भोजन व्यवस्था व इतर व्यवस्थेबाबत आरोग्याधिकारी यांनी समक्ष वेळोवेळी भेट देऊन खातर जमा करावी.

तसेच केमिस्ट भरती बाबत सन्मा. सदस्यांनी केलेल्या तक्रारी नुसार निवड समितीतील सदस्यांनी याबाबतचा तात्काळ खुलासा तथा अभिप्राय स्थायी समितीपुढे सादर करावा.

तसेच नगररचना विभाग व अन्य विभागात वर्षानुवर्षे नियुक्त असलेल्या कर्मचारी तथा अधिकारी यांची खाते बदलाबाबत तात्काळ आस्थापना विभागाने कार्यवाही करावी.

नगररचना विभागाने यापूर्वी नगरपालिका / महानगरपालिका यांनी विविध संस्था व व्यक्तींना मनपा मालकीच्या जागा करारानें / भाडेपट्टयाने दिलेल्या आहेत याबाबत तात्काळ

माहिती सादर करावी. तसेच सर्व्हे नं. ४८२ अ बाबत म. उपायुक्त,म. नगररचनाकार व संबंधित श्री. संजय बहाळकर यांनी याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा. व सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करुन लेखी खुलासा संबंधित विभागाने करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५२ सन २०२०-२१ या वर्षाकरिता धुळे मनपा आरोग्य विभागाकडील दवाखान्यासाठी ॲलोपॅथी औषधे खरेदीसाठी अंदाजित खर्च रु.८४,९०,०९०/-मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई निविदा प्रसिध्द करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल सोनार विषय मंजूर करण्यांत यावा.

म.अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा आरोग्य विभागाकडील दवाखान्यासाठी ॲलोपॅथी औषधे खरेदीसाठी अंदाजित खर्च रु.८४,९०,०९०/-मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५८ दिनांक २७/०८/२०२०

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील ११ ॲलोपॅथी दवाखाने, २ सुतिकागृह व १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्यकेंद्रासाठी सन २०-२० या वर्षासाठी लागणारी औषध भांडार विभागातुन पुरवठा होणेबाबत संबधीत दवाखान्यांचे वैद्यकिय अधिकारी यांनी मा. आरोग्य अधिकारी यांचे मार्फत भांडार विभागात रिपोर्ट सादर केला आहे. सदर औषधांची यादी शासन निर्णयाप्रमाने Generic आहे.

भारत सरकारचे औषध मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या DPCO दरांप्रमाने व अन्यबाबत DPCO वर उपलब्ध नसलेली औषधांचे स्थानिक बाजारभावानुसार सर्वात कमी असलेल्या दरांनुसार सर्व ॲलोपॅथी दवाखान्यांचे मागणी रिपोर्ट प्रमाणे ९६ प्रकारचे औषध खरेदीसाठी एकुण खर्च रु.८४,९०,०९०/-मात्र येणार आहे.भारत सरकारचे औषध मंत्रालयाने दि. 1/4/2017 पासुन ६६० औषधांचे निर्धारीत केलेले दर (DPCO) यादी जोडली आहे.**सध्य स्थीतीत एकही शासकीय दर करार अस्तीत्वात नाही**. तांत्रीक मान्यता जोडली आहे.

सन २०२०-२१ या वर्षासाठी औषधाची ई-निविदा तयार करुन वृत्तपत्रात प्रसिध्द केल्यास ई-निविदा प्रणालीव्दारे स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळेल व प्राप्त झालेल्या ई-निविदा दरांप्रमाने तुलनात्मक सर्वात कमी दरांनुसार औषधी खरेदी होतील, तसेच बाबवार गुणवत्ता व दर यानुसार अनुक्रमे उत्कृष्ट व कमी असलेल्या दरांप्रमाणे औषध खरेदी होतील व मनपाचा आर्थीक फायदा होउन रुग्णांसाठी चांगल्या प्रतिची औषधी उपलब्ध होतील. गुणवत्तेबाबत शंका राहु नये यासाठी पुरवठा केलेल्या औषधाचे ॲनालिसीस टेस्ट रिपोर्ट सादर करण्याबाबत पुरवठादारास बंधणकारक राहील.

शासनाकडून राष्ट्रीय आरोग्य अभीयान (NUHM) अंर्तगत सदर औषधी पुरवठा होण्याची शक्यता विचारात घेऊन रुग्णांची गैरसोय होऊ नये यास्तव **दरांना मंजुरी घेऊन**

कार्यादेश आवश्यक्तेनुसार विभागुन देण्याची दक्षता घेण्यात येईल. सन २०२०-२१ या वर्षात जर शासनाकडून मागणीप्रमाने औषधांचा पुरवठा झाला नाही तर रुग्णांची गैरसोय होऊ नये यास्तव ई-निविदा प्रणालीव्दारे प्राप्त झालेल्या तुलनात्मक कमी दरांप्रमाने आवश्यक औषध खरेदी करने सोयीचे होणार आहे.यासाठी आर्थीक व प्रशासकीय मंजुरी व ई-निविदा प्रसीध्द करणे आवश्यक आहे.

धुळे मनपा चे ११ ॲलोपॅथी दवाखाने, २ सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्यकेंद्रासाठी सन २०२०-२१ या वर्षासाठी लागणारी ९६ प्रकारचे औषध खरेदीसाठी DPCO दरांप्रमाने तसेच स्थानिक बाजारभावाप्रमाने अंदाजीतखर्च रु. ८४,९०,०९०/-मात्र येणार आहे.

सन २०२०-२१ या वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात औषध खरेदीसाठी प्रशासनाने सुचवलेले तरतुद एकुण रु.१,००,००,०००/- मात्र आहे. त्यापैकी आयुर्वेद पंचकर्म रुग्णालयासाठी लागणारी आर्युर्वेद औषधी खरेदीसाठी रु.२,४८,९९०/- मात्रचा प्रस्ताव सादर केलेला आहे. ॲलोपॅथी औषध खरेदी साठी रु.९७,५१,०१०/- शिल्लक राहात आहेत.
सबब, ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी रु. ८४,९०,०९०/- मात्र खर्चास आर्थीक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यास विषय मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा आरोग्य विभागाकडील दवाखान्यासाठी ॲलोपॅथी औषधे खरेदीसाठी अंदाजित खर्च रु.८४,९०,०९०/-मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५३ सन २०२०-२१ या वर्षाकरिता धुळे मनपा आरोग्य विभागाकडील दवाखान्यासाठी सर्जिकल व साहित्य खरेदीसाठी अंदाजित खर्च रु.४१,७२,८६९/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई निविदा प्रसिध्द करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती विषय क्रं.53 बाबत मला माहिती पाहिजे धुळे मनपाच्या कोणत्याही सर्जिकल वार्डात शस्त्रक्रिया होत नाही प्रसुती वर्ग वगळता कोणतेही साहित्य घेतले जात नाही सर्जिकल होत नाही तरी आपण का सजिकल साहित्य घेंत आहे आणि ते का खरेदी करता आहे आणि मागच्या 3 वर्षात किती शस्त्रक्रिया झाल्या त्यावर किती खर्च झाला यांची माहिती मिळू शकेल का?

म. आरोग्याधिकारी याबाबत जे कुटुंब कल्याण केंद्रामध्ये ऑपरेशन होतात. सध्या कोरोनाचा काळ असल्यामुळे 3-4 महिन्यापासून ऑपरेशन बंद आहे नियमीत वर्षभर कुटुंब कल्याण मध्ये शस्त्राक्रिया होत असतात. तसेच आपल्याकडे 2 प्रसुतीगृह आहेत. त्यांच्यासाठी ही साहित्य लागत असते. म्हणून सर्जिकल साहित्य आपण मागवत असतो. मागच्या दोन वर्षामध्ये जे काही साहित्य खरेदी केले होते ते किती वापरले गेले याची माहिती श्री. संजय गुजर देतील.

म. सभापती 3 वर्षात आता पर्यत किती शस्त्रक्रिया झाल्या असतील.

म. आरोग्याधिकारी सर मी माहिती घेवून सांगतो.

म. अमोल मासुळे 41 लाख रु. जो खर्च दाखविला आहे तो वर्षभरात आहे का आणि 19-20 चा किती खर्च होता.

म. भांडारपाल (संजय गुजर) सन 19-20 माध्ये रु. 8,55,040/- इतकेचे साहित्य लागले आहे.

म. अमोल मासुळे सन 19-20 ला 8 लाख तर आता 41 लाख का? ५ पट जास्त आहे.

म. भांडारपाल (संजय गुजर) सन 18-19 व 19- 20 मध्ये शासनाकडून काही औषधी आलेली होती. त्याच्यामुळे तो खर्च कमी झालेला होता. आताही एस्टीमेट कॉस्ट आहे. त्याच्यामध्ये निविदा प्रसिध्द झाल्यानंतर जे काही दर येतील त्या दरांना मंजुरी घेवून आवश्यकते प्रमाणे 2-3 टप्प्यामध्ये औषधे मागविली जातील.

म. सुनिल सोनार फक्त DSR जरी धरला तरी खर्च किती पट वाढणार आहे 5 पट वाढला आहे.

म. आरोग्याधिकारी याच्यामध्ये वेगवेगळे सर्जिकल उत्पन्न आहे. आपल्याकडे जी काही डिमांड झालेली आहे त्यानुसार ही एस्टीमेटेड कॉस्ट आहे. आपला जशी गरज लागेल तसा खर्च करतो. वर्षाच्या सुरवातीला फक्त दर मंजूर करुन ठेवतो. वर्ष भरात जशी गरज लागेल तशी खरेदी करतो. सर्जिकल खरेदी करण्यासाठी मागच्या वर्षी किती तरतूद केली होती (15 लाखाची होती) त्यापैकी 8 लाख55 हजार खर्च झालेला आहे. दर मंजुरीसाठी एवढा खर्च आपण ठेवलेला आहे. याच्या मध्ये घेणारा खर्च तो कमी राहणार आहे.

म. सुनिल सोनार जे पण सर्जिकल साहित्य मागवावयाचे आहे ते मागवा पण सभापती व सदस्यांना काय काय सामान मागविता आहे यांची यादी दया.

म. अमोल मासुळे सभापती सो. आपण ज्या प्रकारे नगररचना विभागाचे प्रश्न आहे तसे बांधकाम आरोग्य विभागातील प्रश्न योग्य प्रकारे हाताळावे ही नम्र विनंती.

म. सभापती ही जी खरेदी आहे ती आपण जी.एम. पोर्टलवर पण करु शकतो का

म. आरोग्याधिकारी G.M, पोर्टल वरुन पण करतो पण हे एस्टीमेट आपण बाजार दराप्रमाणे काढले आहे. यांच्यानंतर आपण ई टेंडरींग करणार ई टेंडरींगवर जे दर येतील यात काही दर शासन मान्य असतात तर काही नसतात ज्या नसतात ते आपण ई टेंडरींगवर मध्ये टाकणार आहे. जे दर ई टेंडरींग मध्ये येतील त्या नुसार केले जाईल G.M. पोर्टलवर काही गोष्टी नेहमी पेक्षा जास्त दराच्या असतात.

म. सभापती डॉक्टर सो. गुजर सो. मला पुढच्या स्थायी समितीच्या मिटींगच्या आधी सभासदांना मागील 3 वर्षामध्ये काय काय खरेदी केले त्याचा सविस्तर अहवाल स्थायी समितीच्या माहितीस्तव सादर करावा. मनपाच्या आरोग्य विभागाच्या संबंधीत धुळेकर नागरीकांना चांगल्या सुखसुविधा मिळाल्या पाहिजे अशा पध्दतीने काम करा. कोव्हीड मध्ये धुळे मनपाचे अतयंत चांगले काम आहे. सभासदांच्या माहितीसाठी पुढील मिटींग मध्ये सविस्तर अहवाल सादर करावा.

म. सभापती या प्रस्तावात मागील ३ वर्षाचा खर्च तपासून अंदाजित रक्कम निश्चित करणे आवश्यक असेल व सदर साहित्य खरेदीची आवश्यकता आरोग्याधिकारी यांनी प्रमाणित केलेली असल्याने त्यासाठीची सर्वस्वी जबाबदारी त्यांची असेल. मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेप्रमाणे ३ वर्षाची निविदा दर मागणी करावी. मुख्य लेखा परीक्षक यांचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून कार्यालयीन टिपणीनुसार मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील ११ ॲलोपॅथी दवाखाने, २ सुतिकागृह व १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्यकेंद्रासाठी सन २०२०-२१ या वर्षासाठी लागणारी सर्जिकल व साहित्य भांडार विभागातुन पुरवठा होणेबाबत संबधीत दवाखान्यांचे वैद्यकिय अधिकारी यांनी मा. आरोग्य अधिकारी यांचे मार्फत भांडार विभागात रिपोर्ट सादर केला आहे.

सध्यस्थीतीत एकही शासकीय दरकरार अस्तीत्वात नसल्याने सर्जिकल व साहित्यचे स्थानिक बाजारभावानुसार सर्वात कमी असलेल्या दरांनुसार, DPCO दरांप्रमाने सर्व ॲलोपॅथी दवाखान्यांचे मागणी रिपोर्ट प्रमाणे १20 प्रकारचे सर्जिकल व साहित्य खरेदीसाठी एकुण खर्च रु. ४१,७२,८६९/-मात्र येणार आहे. तांत्रीक मान्यता जोडली आहे.

सन २०२०-२१ या वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात सर्जिकल व साहित्य खरेदीसाठी प्रशासनाने सुचवलेले तरतुद एकुण रु.५०,००,०००/- मात्र आहे. शासनाकडून राष्ट्रीय आरोग्य अभीयान (NUHM) अंर्तगत सदर सर्जिकल व साहित्याचा पुरवठा होण्याची शक्यता विचारात घेऊन रुग्णांची गैरसोय होऊ नये यास्तव **दरांना मंजुरी घेऊन कार्यादेश आवशक्तेनुसार विभागुन देण्याची दक्षता घेण्यात येईल.** सन २०२०-२१ या वर्षात जर शासनाकडून मागणीप्रमाने सर्जिकल व साहित्याचा पुरवठा झाला नाही तर रुग्णांची गैरसोय होऊ नये यास्तव ई-निविदा प्रणालीव्दारे प्राप्त झालेल्या तुलनात्मक कमी दरांप्रमाने आवश्यक सर्जिकल व साहित्य खरेदी करने सोयीचे होणार आहे. यासाठी आर्थीक व प्रशासकीय मंजुरी व ई-निविदा प्रसीध्द करणे आवश्यक आहे.

सन २०२०-२१ या वर्षासाठी सर्जिकल व साहित्याची ई-निविदा तयार करुन वृत्तपत्रात प्रसिध्द केल्यास ई-निविदा प्रणालीव्दारे प्राप्त झालेल्या निविदाधारकांची सर्जिकल व साहित्य तुलनात्मक सर्वात कमी दरांप्रमाणे खरेदी होतील, तसेच बाबवार गुणवत्ता व दर यानुसार अनुक्रमे उत्कृष्ट व कमी असलेल्या दरांप्रमाणे सर्जिकल व साहित्य खरेदी होतील व मनपाचा आर्थीक फायदा होऊन रुग्णांसाठी चांगल्या प्रतिची सर्जिकल व साहित्य उपलब्ध होतील. गुणवत्तेबाबत शंका राहु नये यासाठी पुरवठा केलेली सर्जिकल व साहित्य ISI Mark चे पुरवठा करणेबाबत पुरवठादारास बंधणकारक राहील.

सबब, धुळे मनपा चे ११ ॲलोपॅथी दवाखाने, 2 सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्यकेंद्रासाठी सन २०२०-२१ या वर्षासाठी लागणारी 120 प्रकारचे सर्जिकल व साहित्य खरेदीसाठी स्थानिक बाजारभावाप्रमाने अंदाजीत खर्च रु.४१,७२,८६९/-मात्र येणार आहे.

सबब, सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार १२० प्रकारचे सर्जिकल व साहित्य खरेदीसाठी अंदाजीतखर्च रु.४१,७२,८६९/- मात्रला आर्थीक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यास विषय मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून आरोग्य विभागाकडील दवाखान्यासाठी सर्जिकल व साहित्य खरेदीसाठी अंदाजित खर्च रु.४१,७२,८६९/-मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

या प्रस्तावात मागील ३ वर्षाचा खर्च तपासून अंदाजित रक्कम निश्चित करणे आवश्यक असेल व सदर साहित्य खरेदीची आवश्यकता आरोग्याधिकारी यांनी प्रमाणित केलेली असल्याने त्यासाठीची सर्वस्वी जबाबदारी त्यांची असेल. मा.आयुक्त सो.यांच्या मान्यतेप्रमाणे ३ वर्षाची निविदा दर मागणी करावी. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५४ जागतीक संसर्गजन्य आजार कोरोना विषाणु (COVID १९) चे प्रतिबंधात्मक कार्यवाही उपाययोजनासाठी डेडीकेटेड कोविड केअर सेंटरसाठी लागणारे Tab. Favipiravir २०० Mg ५१००Tab.खरेदीसाठी शासकीय दर कराराप्रमाणे एकुण खर्च रु.२,३३,८८६/-मात्रला कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.युवराज पाटील विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च रु.२,३३,८८६/- मात्रला कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६० दिनांक २७/०८/२०२०

धुळे शहरामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रभाव बघता धुळे महानगरपालिका संचलीत डेडीकेटेड कोविड केअर सेंटर अजमेरा कॉलेज मधील सध्यस्थीती कोराना +Ve रुग्ण संख्या वाढत असल्याने व त्यांना औषधउपचार तेथेच करावा लागत असल्याने अत्यावश्यक औषध Tab. Favipiravir २०० Mg तात्काळ मिळणेबाबत वैद्यकिय अधिकारी व औषध निर्माता डेडीकेटेड कोविड केअर सेंटर अजमेरा कॉलेज यांनी मा. आरोग्याधिकारी सो. यांचे मार्फत औषध भांडार विभागाकडे मागणीपत्र सादर केले आहे.

संचालक वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन मुंबई, यांचे क्रं.संवैशिवसं/कोविड-19/ औषधीबाबी/ सुधारित दर निच्छीती/ 3277/ 2020 दि.4/8/2020 शासकीय दर करारानुसार M/S Glenmark Pharmaceuticals Ltd.यांचेकडून खरेदीसाठी Tab. Favipiravir २०० Mg दर 34 गोळीचे पॅकींगसाठी रु.1559.24/- प्रमाने 150 x 34 गोळीसाठी रु. २,३३,८८६/- मात्र खर्च येणार आहे.

तातडीची बाब विचारात घेता डेडीकेटेड कोविड केअर सेंटर मधील रुग्णांना औषध उपचारासाठी सदर Tab. Favipiravir २०० Mg ची ५१००Tab संचालक वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन मुंबई शासकीय दरकरारानुसार M/S Glenmark Pharmaceuticals Ltd. यांचेकडून खरेदीसाठी कार्यादेश देण्यात आला आहे त्यासाठी येणारा खर्च रु. २,३३,८८६/- मात्रला आरोग्य व सुखसोई या मुख्य लेखाशिर्षात, दवाखानेसाठी औषध खरेदी या उपलेखाशिर्षातुन खर्च करणेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून व कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी सदरील खर्च रु.२,३३,८८६/- मात्रला कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक १३ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक १०/०९/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

शासनाच्या दिनांक ३/७/२०२० च्या आदेशानुसार धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑनलाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक १०/०९/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता **मा. श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह घेण्यांत आली या ऑनलाईन सभेसाठी खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन उपस्थित होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	शेरा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती	ऑनलाईन उपस्थित
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य	ऑनलाईन उपस्थित
३	श्री.सोनार सुनिल वसंतराव	सदस्य	ऑफ लाईन उपस्थित
४	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	ऑनलाईन उपस्थित
५	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या	ऑनलाईन उपस्थित
६	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	ऑनलाईन उपस्थित
७	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य	ऑफ लाईन उपस्थित
८	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य	ऑफ लाईन उपस्थित
९	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या	ऑनलाईन उपस्थित
१०	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या	ऑफ लाईन उपस्थित
११	श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या	ऑनलाईन उपस्थित

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. गणेश गिरी	अति. आयुक्त
२	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
३	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
४	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी
५	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
६	श्री.के.एन. शिंदे	अभियंता
७	डॉ. महेश मोरे	आरोग्याधिकारी
८	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
९	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी

१०	श्री. एन.पी. सोनार	कार्यालय अधिक्षक
११	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१२	श्री. भालचंद्र खरोटे	लिपीक आस्थापना वि.
१३	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१४	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बां.वि.
१५	श्री. रविंद्र सोनवणे	परवाना विभाग
१६	श्री. राजू माईनकर	भांडारपाल
१७	श्री. सोनवणे	प्रशासन अधिकारी म.न.पा शि.मं.
१८	श्री. संजय गुजर	औषध निर्माता
१९	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
२०	श्री. किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख

मा. सभापती सन्मा.सदस्य मा. अति.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा ऑन लाईन कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज

सन्मा.सदस्या श्रीमती देवरे सुरेखा भागवत यांनी महत्वाच्या कामासाठी बाहेरगांवी असल्याने सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती नुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६१ दिनांक १०/०९/२०२०

सन्मा.सदस्या श्रीमती देवरे सुरेखा भागवत यांनी महत्वाच्या कामासाठी बाहेरगांवी असल्याने सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती नुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

दिनांक 10/09/2020 रोजी आयोजित मे.स्थायी समिती साप्ताहिक बैठकीच्या प्रारंभी सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय.

सभेच्या प्रारंभी मा.सभापती स्थायी समिती यांनी मागील झालेल्या बैठकांमध्ये प्रशासनाकडून विविध विषय संदर्भात अहवाल मागवण्याचे आदेशित केले होते याबाबत अहवाल प्राप्त झाला किंवा नाही याबाबत सचिवांकडे विचारणा केली असता फक्त आरोग्य विभागातील मागील स्थायी समितीच्या विषय क्रमांक ५२ व ५३ संदर्भातील माहितीचा अहवाल प्राप्त झाल्याचे सचिवांनी विदीत केले व सदर माहिती सभापती यांच्याकडे सुपूर्द केली या माहितीबाबत मा. सभापती यांनी सदर अहवाल हा परिपूर्ण नसून ढोबळ स्वरुपाचा आहे व व इतर सदस्यांनाही सदर अहवाल प्राप्त होणे गरजेचे आहेत असे सांगितले याबाबत सर्व विभाग प्रमुखांना मागील स्थायी समितीच्या बैठकीत झालेला अहवाल तातडीने व स्वयंस्पष्ट पणे अहवाल सादर करण्याबाबत सभापती यांनी बैठकीत आदेशित केले

बैठक सुरू असताना स्थायी समितीचे सन्मा. सदस्य श्री अमोल मासुळे व अन्य सदस्य सभागृहात दाखल झाले व त्यांनी नेटवर्क मध्ये अडथळा निर्माण होत असल्याने प्रत्यक्ष बैठकीत सहभागी होणे बाबतची विनंती मा. सभापती महोदय यांना केली त्यानुसार मा. सभापती महोदयांनी नेटवर्क व संवादात व्यत्यय येतअसल्यामुळे संबंधित सन्मा. सदस्यांना बैठकीत उपस्थित राहण्याची संमती दिली तसेच सोशल डिस्टन्स व इतर निकषांचे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आली

तसेच ज्या अधिका-यांना ऑनलाइन संवादात अडचण येत असेल व ते जर कार्यालयात उपस्थित असतील तर त्यांनी सभागृहात येण्याबद्दल मा. सभापती यांनी आदेशित केले

सन्मा.सदस्य श्री.अमोल मासुळे यांनी मागील बैठकीच्या वेळेस सभागृहात केमिस्ट भरती बाबत झालेल्या गैरप्रकारासंदर्भात अहवाल सादर करण्याचे सुचित केले होते त्यानुसार संबंधित उपायुक्त श्री.शांताराम गोसावी यांनी या भरती प्रक्रियेत अनियमितता केली असल्याचा आरोप त्यांनी केला तसेच अपात्र उमेदवारास पात्र ठरविण्यात आले असल्याचे व बेकायदेशीर नियुक्ती केली असल्याचे त्यांनी सांगितले मागील बैठकीत निवड समितीत कोण कोण सदस्य होते याबाबतची माहिती प्राप्त झालेली नसून नियुक्त उमेदवार श्री विशाल गोसावी हा समकक्ष पदवीधारक असून त्याचा अनुभवही ही कमी कालावधीचा आहे तसेच या संदर्भात संबंधित शिक्षण संस्थेच्या प्रमुख प्राध्यापकांचे पत्र प्राप्त असून यात संबंधित पदासाठी नियुक्ती उमेदवार हा योग्य नसल्याचे सभागृहात स्पष्ट केले तसेच खुल्या प्रवर्गातील जागेवर राखीव उमेदवार भरती केल्याने ही नियुक्ती बेकायदेशीर असल्याचे व उमेदवारावर अन्याय झाले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले याबाबत उपायुक्त श्री. गोसावी यांनी केलेल्या बेकायदेशीर नियुक्तीबाबत आक्षेप नोंदविला.

याबाबत मा.सभापती यांनी सदर भरती प्रक्रिया कशा पद्धतीने राबवली गेलेली आहे याबाबत खुलासा करण्यासाठी आस्थापना विभागाचे संबंधित श्री भालचंद्र खरोटे यांना आदेशित केले असता त्यांनी सदर नसती उपायुक्त श्री गोसावी साहेब यांच्याकडे असल्यामुळे खुलासा सादर करता आले नाही असे स्पष्ट केले.

यासंदर्भात अति. आयुक्त श्री.गिरी साहेब यांनी खुलासा करावा असे सभापती यांनी आदेशित केले.

यावर अति.आयुक्त श्री गिरी साहेब यांनी सांगितले की भरती करताना वैयक्तिक कोणत्याही व्यक्तीचा अधिकार नसतो त्यासाठी निवड समिती कायद्यानुसार असते सदरचा निर्णय निवड समितीने घेतलेला आहे आपण दिलेल्या आरोपांबाबत चौकशी करून आपल्याकडे अहवाल सादर केला जाईल असे सांगितले.

याबाबत मा.सभापती यांनी सांगितले की मी जाहिरात प्रक्रियेची माहिती घेतलेली आहे जाहिरात केमिस्ट पाणी या विषयाशी संबंधित होती आस्थापना विभागाने उमेदवारांची पडताळणी करून पात्र व अपात्र उमेदवारांची यादी तयार केली. पात्र उमेदवारांच्या यादीत नियुक्त उमेदवाराचे नाव नव्हते अपात्र यादी मध्ये सदर उमेदवाराचे नाव होते. नंतर याबाबत उपायुक्त श्री गोसावी यांनी पात्र यादीत नाव समाविष्ट केले व पुनश्च यादी प्रकाशित केली समकक्ष पदवीचा आधार घेऊन बेकायदेशिर नियुक्ती केलेली आहे त्याची चौकशी होणे गरजेचे आहे. यासाठी स्थायी समितीच्या तीन सदस्यांची त्रिसदस्यीय समिती तयार करण्यात येईल व याबाबत संपूर्ण कागदपत्रांची चौकशी करून प्रशासनाकडे अहवाल सादर केला जाईल व त्यावर प्रशासनाने कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे असे आदेशित केले.

सन्मा.सदस्य श्री सुनील सोनार यांनी त्यांच्या प्रभागात सुमारे तीन ते चार वर्षापासून आठ ते दहा दिवस पाणी पुरवठा होत असल्याची तक्रार करून याबाबत कारवाई करण्याची मागणी केली तसेच मागील स्थायी समितीच्या बैठकीत नगररचना विभागातील नियुक्त ओव्हरसिअर यांच्या बदल्या करण्याबाबत मागणी केली होती त्याबाबत कार्यवाही झाली नसून यावर खुलासा करण्याची मागणी केली. तसेच नगररचना विभागातील संजय बहाळकर यांच्या बाबतीत मागील सभेत फाईलचा नावानिशी उल्लेख करून आरोप केलेला होता याबाबतही खुलासा सादर करावा.

याबाबत मा.सभापती यांनी नगररचनाकार यांना खुलासा सादर करण्यांचे आदेशित केले.यावर नगररचनाकार यांनी सर्वे नंबर ४८३ अ या लेआउट बाबत आलेल्या तक्रारी संदर्भात सांगितले की याबाबतचा खुलासा तयार असून तो आजच अंतिम करून माननीय सभापती साहेब यांच्याकडे सादर करण्यात येईल तसेच नगररचना विभागातील संबंधित अभियंता यांना त्यांच्याकडील प्रलंबित प्रस्तावांबाबत विचारणा केली असून याबाबतीत प्रलंबित प्रस्ताव

निकाली काढण्यासाठी दहा दिवसांची मुदत दिलेली आहे त्यानुसार मुदत संपल्यानंतर त्यांच्यावर तातडीने नोटिसा बजावल्या बाबत कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगितले

माननीय सभापती महोदय यांनी सर्वे नंबर ४८३अ चे मालक किशोर बाफना यांनी मनपाची जागा हडप करून पुनश्च टीडीआर घेत असल्याचे सांगितले याबाबत यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश असूनही अद्याप पावेतो गुन्हा दाखल करण्यास विलंब होत असल्याबाबत खुलासा करण्यास नगररचनाकार यांना आदेशित केले यावर नगररचनाकार यांनी याबाबत सांगितले की आम्ही पोलीस विभागाच्या संपर्कात आहोत पोलीस विभागाकडून मनपा नगररचना अधिनियमाच्या तरतुदी बाबत माहिती विचारली होती सदरची माहिती आम्ही समक्ष जाऊन सदर संबंधित अधिकाऱ्यांना दिलेली आहे यात मनपाची लेआऊट मंजूर करताना १०% ओपन प्लेस ठेवावी लागते ती विकता येत नाहीत या सदर जागा मनपाच्या कस्टडीत असते याबाबत गुन्हा दाखल करण्यासंदर्भात आवश्यक ती माहिती पोलीस विभागाला दिलेली आहे संबंधित व्यक्तीला टीडीआर देण्याबाबत कोणतीही कार्यवाही नगररचना विभागाने प्रस्तावित केलेली नसल्याचे सांगितले

मा. सभापती यांनी मागील बैठकीत सन्माननीय सदस्य श्री संजय बहाळकर यांच्या बाबत नावानिशी तक्रार केली होती ते सध्या आपल्या विभागात कोणत्या पदावर कार्यरत आहे व त्यांचे मुळ पद काय आहे याबाबत विचारणा केली असता नगररचनाकार यांनी सांगितले किती आमच्या विभागात क्षेत्रीय अधिकारी म्हणून कार्यरत आहे त्यांना नगररचना अधिनियमानुसार प्लॅन मंजुरी, अनधिकृत बांधकामे व इतर अनुषंगिक कामे करणयाची जबाबदारी देण्यांत आलेली आहे. यावर सभापती यांनी सांगितले की बहाळकर हे आरेखक आहे व त्यांना क्षेत्रीय अधिकारी म्हणून काम दिलेले आहे ज्या व्यक्तीवर आरोप आहेत त्याच व्यक्तीवर आपण काम सोपवतो ही बाब बरोबर नाही आज पर्यंत शहरातील सुमारे मनपा मालकीच्या ५५०ओपन प्लेसवर मनपाचे नाव लागलेले नाही तसेच बहुतांशी जागा नगरपालिका महानगरपालिकेने संस्था व्यक्तींना दिलेल्या आहेत त्यांचे करार देखील संपलेले आहेत सदर जागा करोडो रुपयांची आहे त्यावरही कार्यवाही नाही श्री किशोर बाफना यांनी चुकीचे कागदपत्रे दाखल करून परवानगी घेतलेली आहे सदर परवानगी तातडीने रद्द करावी

यावर नगररचनाकार यांनी सांगितले की सदर लेआउटला तात्पुरती मंजुरी दिलेली आहे रद्द करण्या आधी नियमानुसार सुनावणी घ्यावी लागेल व त्यानुसार पुढील कारवाई निर्माण करता येईल तात्पुरती मंजुरी एक वर्षासाठी दिली जाते त्यानंतर लेआउट धारकाला तीन वर्षापर्यंत मुदतवाढ घेता येऊ शकते .

यावर मा.सभापती यांनी विचारले की आतापर्यंत किती लेआऊटला अंतिम मंजुरी दिलेली आहे किंवा ज्याची मुदत संपली अशांचे लेआउट रद्द केले का याची माहिती सादर करावी व याबाबत तपासणी करून संबंधितांना पुनश्च लेआउट सादर करण्याबाबत आदेशित करावे.

सन्मा. सदस्यश्री.सुनील सोनार यांनी विचारणा केली की मागील चार वर्षात किती लेआऊट यांना तात्पुरती मंजुरी देण्यात आली व प्लॅन मंजुरीचे किती प्रकरण आपल्याकडे या आर्थिक वर्षात प्रलंबित आहेत याचीही माहिती सादर करा.

सन्मा.सदस्य श्री कमलेश देवरे यांनी आपल्या मनपाच्या किती खुल्या जागा आहेत व किती जागांवर नांव लावलेले नाही. तसेच मनपाच्या किती जागा कराराने दिलेले आहेत याबाबतची माहिती सादर करण्याबाबत विचारणा केली तसेच ओपन प्लेस यांना नाव लावणे बाबत तहसीलदार यांच्याकडे मागे प्रस्ताव पाठवण्यात आलेला होता परंतु नंतर सदरची कार्यवाही सिटी सर्वे विभागाकडे वर्ग करण्यात आलेली आहे परंतु अद्याप त्यावर ही कार्यवाही झालेली नाही उपायुक्त श्री गिरी साहेब यांच्या घराच्या बाजूला ओपन प्लेस आहे त्यावर संबंधिताने अतिक्रमण केलेले आहे. सदर अतिक्रमण काढण्यास गेले असता सदर जागा संबंधित इसम आपल्या नावावर असल्याचे सांगतो अशा संपूर्ण बाबी ओपन प्लेस बाबत झालेल्या आहे तरी याबाबत ची माहिती मिळण्यास विनंती केलेली आहे.

सन्मा.सदस्य अमोल मासुळे यांनी शहरातील महत्वाच्या जागा प्रतिष्ठीत व्यक्तींना कराराने दिल्या असल्याचे नमूद करून सदर जागा ताब्यात घेणे बाबत मागणी केली किंवा सदर जागा मुदत वाढ करून नवीन रेडिरेकनर प्रमाणे

संबंधितांना दिल्यास मनपाच्या उत्पन्नात वाढ होऊ शकेल म्हणून अशा जागा शोधून त्याबाबत कार्यवाही करण्याची ची मागणी केली.

यावर अति.आयुक्त श्री गणेश गिरी यांनी सांगितले की नगरपालिका असताना अनेक संस्थांना व्यक्तींना जागा दिलेल्या आहेत परंतु आता कायद्यात बदल झालेला आहे.लेआउट मधील ओपन प्लेस संबंधित पुन्हा धारकांच्या नावावर त्यांच्या उपयोगासाठी असते त्याचा गैरवापर करावयाचा नसतो कराराने दिलेल्या जागांची मुदत संपली तर तसेच जागांचा गैरवापर होत असेल तर त्या जागा ताब्यात घेतल्या जातील याबाबत कालावधी लागणार असल्याने एक महिन्याच्या आत सर्व सविस्तर माहिती विभागाने सादर करावी असे आदेश केले याबाबत आस्थापनाने संबंधित विभागात स्वतंत्र आदेश निर्गमित करावा व एक महिन्याची मुदत देऊन सर्व माहिती मागवावी असे सभागृहात आदेशित केले.

सन्मा.सदस्य सौ भारतीताई माळी यांनी देवपूर भागात भुयारी गटारीच्या झालेल्या कामांमुळे रस्त्यांची परिस्थिती अत्यंत वाईट झालेली असल्याचे नमूद करून प्रभागात 15-15दिवस घंटागाडी येत नाही लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाही याबाबत कार्यवाही करण्याची मागणी केली तसेच सन्माननीय सदस्य श्री सुनिल सोनार यांनी घंटागाडी बाबत तक्रार केली.

सन्मा. सदस्य श्री कमलेश देवरे यांनी सांगितले की भुयारी गटारीच्या कामामुळे झालेल्या रस्त्यांच्या प्रश्नाबाबत मी पहिल्या मीटिंग पासून तक्रार केलेली आहे अभियंता कामावर येत नाही लक्ष देत नाही आमच्या भागातील एका नागरिकाने बांधलेल्या चेंबर बाबत निकृष्ट कामाबाबत तक्रार केलेली होती चेंबर अंदाजपत्रकानुसार बनवले जात नाही त्यांनी जिल्हाधिकारी साहेबांकडे तक्रार केली आहे याबाबत कार्यवाही होणे अपेक्षित आहे पुढच्या बैठकीला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना बोलवण्यात यावे व त्यांच्याकडून खुलासा घेण्यात यावा अशी मागणी केली.

सन्मा. सदस्य श्री.अमोल मासुळे यांनी पाण्याचा प्रश्न उपस्थित करताना त्यांच्या प्रभागातील शाळा नंबर २८ येथे बांधण्यात आलेल्या जलकुंभाच्या पाणीपुरवठा अद्यापही सुरू केल्या नसल्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे असल्याचे सांगून याबाबत अद्याप पर्यंत कारवाई झाली नाही याचा खुलासा करण्याची मागणी केली.

यावर अभियंता यांनी सूचित केले की तापी नदी मध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ आल्याने तसेच विद्युत मंडळाच्या अडचणी तापी लाईनचे वारंवार लिकेज होणे यास्तव तापी पाणीपुरवठा योजनेवरून वारंवार पाणीपुरवठा विस्कळीत झालेला होता हनुमान तेकडी वरून सतरा ते अठरा एमएलडी पाणी मिळते याबाबत तापी योजनेवरून रामनगर जलकुंभ भरण्याचे नियोजन होते व हनुमान टेकडी वरील बचत झालेल्या पाण्यातून शाळा नंबर २८ येथील जलकुंभ घेण्याचे नियोजन होते परंतु परिस्थितीमुळे सदरचे नियोजन करू शकलो नाही तापी योजना जेव्हा पूर्ण क्षमतेने सुरू राहील त्यावेळेस हा शाळा नंबर २८ मधील जलकुंभ भरण्याबाबत नियोजन करता येणे शक्य आहे.

तसेच शहरातील विस्कळीत पाणी पुरवठा बाबतही नियोजन सुरू असून आम्ही आमच्या पूर्ण क्षमतेने याकामी कटिबद्ध आहोत व लवकरच पाणी वितरण सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत तसेच पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी शहराचे पूर्ण सर्वेक्षण करण्यासाठी तज्ञ संस्था नियुक्ती बाबत निविदा प्रक्रिया सुरू असून उद्या सायंकाळपर्यंत निविदा प्रसिद्ध होईल व जीवन प्राधिकरणातर्फे सुरू असलेल्या भूमिगत गटारीच्या कामात अनेक अडचणी आहेत याबाबत मा. सभापती साहेबांनी ही बैठक घेतली आहे व त्यासंदर्भात संबंधित विभागाचे ठेकेदार व अभियंता यांना आदेश दिलेले आहेत. त्यांनी लवकरात लवकर आपल्या कामात सुधारणा करून काम करण्याबाबत दिनांक सात सप्टेंबर च्या बैठकीत मान्य केलेले आहे व कामात सुधारणा होण्यासाठी सभापती महोदय स्वतः प्रयत्न करीत आहेत असा खुलासा सादर केला.

यावर मा. सभापती यांनी सांगितले की पाणीपुरवठ्याचा प्रश्न हा गंभीर स्वरूपाचा आहे व नागरिकांना यामुळे विनाकारण मनस्ताप सहन करावा लागतो आपले पाण्याचे नियोजन सुरळीत करण्यासाठी योग्य तो समन्वय ठेवून काम करावे व तात्काळ वितरणातील अडचणी दूर कराव्यात असे आदेशित केले यावर अभियंता यांनी लेखा विभागामार्फत पाणीपुरवठा असलेल्या कामांच्या देयकाना विलंब लागतो व व कामात अडचणी निर्माण होतात असे विधान केले यावर

मा. सभापती यांनी लेखाधिकारी श्री भामरे यांना याबाबत अडचणी येणार नाहीत व पाणीपुरवठ्याच्या प्रश्नांना प्रथम प्राधान्याने लक्ष देऊन कार्यवाही करावी असे आदेशित केले.

सन्मा.सदस्य युवराज पाटील यांनी त्यांच्या प्रभागात घंटागाडी टॅक्टर येत नसल्याची तक्रार करून श्री लक्ष्मण पाटील यांना वारंवार तक्रार करून देखील कार्यवाही झाली नाही व सुधारणा होत नाही असे विदीत केले तसेच भागातील पाणीपुरवठा अनियमित झाले आहे नागरिकांना वेळेवर सुविधा मिळत नाही असे सांगितले.

यावर मा. सभापती यांनी सांगितले की सदरचा प्रश्न अनेक सदस्यांचा व शहरातील मोठा प्रश्न आहे याबाबत लक्ष्मण पाटील यांना संबंधित ठेकेदार अधिका-यांसमवेत बैठक आयोजित करण्याबाबत आदेशित केले होते परंतु अद्याप पर्यंत बैठक आयोजित झालेली नाही याबाबत पाटील यांनी ताबडतोब बैठकीचे आयोजन करावे व त्या ठिकाणी सर्व संबंधित नगरसेवकांनी उपस्थित रहावे असे आदेशित केले.

सन्मा. सदस्य सौ भारतीताई माळी यांनी त्यांच्या प्रभागात पाणी सोडण्याची वेळ अत्यंत अनियमित असून रात्री-बेरात्री पाणी सोडण्यात येते त्यामुळे महिलांना मोठया प्रमाणावर त्रास होतो. त्यामुळे पाणी सोडण्याच्या वेळेत बदल करावा तसेच याबाबत संबंधित भागातील अभियंता व नगरसेवक यांची एकत्रित बैठक घेऊन समन्वय करून नियोजन करावे अशी मागणी केली यावर सभापती यांनी ताबडतोब वेळेबाबत पाणीपुरवठा विभागाने दक्षता घ्यावी व संबंधित विभागांच्या बैठका घेऊन योग्य ते नियोजन करावे असे आदेशित केले.

उपस्थित सन्मा.सदस्यांनी ऑनलाइन बैठकी बाबत तक्रार करून यापुढे ऑफलाईन बैठक सभागृहात आयोजित करावी अशी मागणी केली यावर नगर सचिव यांनी याबाबत शासनाचे ऑनलाईन बैठक घेण्याबाबत स्पष्ट आदेश असून त्यामुळे सभागृहात बैठक घेण्याची कार्यवाही सध्या करता येऊ शकत नाही यासंदर्भात शासनाचे आवश्यक ते मार्गदर्शन तातडीने मागवून शासनाचे मार्गदर्शन आल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे सुचित केले

मा. सभापती यांनी बैठकीच्या समारोप प्रसंगी सांगितले की मागील बैठकीत विचारणा झालेल्या अनेक प्रश्नांबाबत संबंधित विभागाने खुलासा सादर केलेला नाही व त्याबाबतचा अहवाल दिलेला नाही सदर बाब ही गंभीर स्वरूपाची आहे याबाबत विविध विषय चर्चेसाठी येतात.परंतु कारवाई होत नाही यासाठी स्थायी समितीतील तीन सदस्यांची त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येत असून या समितीमार्फत स्थायी समितीने उपस्थित केलेल्या प्रश्नांची चौकशी करून त्याचा अहवाल मा.आयुक्तांसमोर कार्यवाहीसाठी सादर करण्यात येणार आहे. त्यानुसार अशी त्रिसदस्य समिती गठीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच सर्व सन्मा.सदस्यांच्या चर्चेनुसार व मागणीनुसार आजची साप्ताहीक सभा तहकूब करण्यांत येत असल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
शुक्रवार दिनांक १८/०९/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

शासनाच्या दिनांक ३/७/२०२० च्या आदेशानुसार धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑनलाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक १०/०९/२०२० रोजीची तहकूब करण्यांत आलेली ऑनलाईन साप्ताहिक सभा आज शुक्रवार दिनांक १८/०९/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यांत आली या ऑनलाईन सभेसाठी खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन उपस्थित होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा	शेरा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती	ऑनलाईन उपस्थित
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य	ऑनलाईन उपस्थित
३	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या	ऑनलाईन उपस्थित
४	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य	ऑफ लाईन उपस्थित
५	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या	ऑनलाईन उपस्थित
६	श्रीमती उदासी कशिश गुलशन	सदस्या	ऑनलाईन उपस्थित
७	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य	ऑनलाईन उपस्थित
८	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या	ऑफ लाईन उपस्थित
९	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या	ऑनलाईन उपस्थित
१०	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या	ऑनलाईन उपस्थित
११	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य	ऑफ लाईन उपस्थित
१२	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य	ऑफ लाईन उपस्थित
१३	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या	ऑनलाईन उपस्थित
१४	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या	ऑफ लाईन उपस्थित

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. गणेश गिरी	अति. आयुक्त
२	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
३	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
४	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
५	श्री. विनायक कोते	सहा. आयुक्त
६	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
७	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी
८	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
९	श्री.के.एन. शिंदे	अभियंता
१०	डॉ. महेश मोरे	आरोग्याधिकारी
११	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१२	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
१३	श्री. एन.पी. सोनार	कार्यालय अधिक्षक

१४	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१५	श्री. रमजान अन्सारी	पत्र.कार्यालयीन अधिक्षक
१६	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१७	श्री. सी.एम. उगले	ओव्हरसिअर पा.पु.
१८	श्री. सी.सी. बागुल	ओव्हरसिअर पा.पु.
१९	श्री. रविंद्र सोनवणे	परवाना विभाग
२०	श्री. आर.सी. पाटील	शा. अभियंता एम.जी.पी विभाग
२१	श्री. डी.डी. पाटील	शा. अभियंता एम.जी.पी विभाग
२२	श्री. एस.एस. धोत्रे	सहा. अभियंता एम.जी.पी विभाग
२३	श्री. योगेश खैरनार	ठेकेदार प्रतिनिधी
२४	श्री. राजेश गायकवाड	प्रशासन अधिकारी म.न.पा शि.मं.
२५	श्री. संजय गुजर	औषध निर्माता
२६	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
२७	श्री. किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख

मा. सभापती सन्मा.सदस्य मा. अति.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा ऑन लाईन कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज

सन्मा.सदस्या श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन यांनी तब्येत बरी नसल्याने सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती नुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६२ दिनांक १८/०९/२०२०

सन्मा.सदस्या श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन यांनी तब्येत बरी नसल्याने सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती नुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-५५ हनुमान टेकडी जलशुध्दीकरण केंद्राचे फिल्टर मिडिया खराब झालेले असून सदर फिल्टर मिडियाची रेती बदलविणे व फिल्टर दुरुस्ती करण्यांचे अंदाजपत्रक रु.४३,३७,३९१/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे सदरची रेती कोणती आहे. आणि कोणकोणती कामे करावयाचे आहे. सन २००५ मध्ये बदलली, आणि २०१५ मध्ये बदलली का?त्याचा कालावधी किती आहे?आपण लेट का झालो. दर वेळेस

पाईपलाईन व इतर कामाची दुरुस्ती केली जाते व कार्योत्तर मंजुरीसाठी विषय येतात याबाबत सविस्तर माहिती मिळावी.

म.ओव्हरसिअर पा.पु. हनुमान टेकडी जलशुध्दीकरण केंद्रामधील फिल्टर मिडीयातील रेती दर १२ ते १५ वर्षानंतर बदलणे आवश्यक असते. यात रेती, ८ एम.एम. रबर,१२ एम.एम. २० एम.एम. असा दीडफूटाच्या वर फिल्टर मिडिया मध्ये थर असतो. पाणी शुध्दीकरणासाठी हे थर आवश्यक असतात. हे जर कमी झाले तर रॉ वॉटर शुध्द पाण्यांत मिळसले जावू शकते असे एकुण ७ फिल्टर असतात. ९.५ मिटर बाय ७ मिटरचे फिल्टर बेड आहे. यांत रेलींगला कलर काम तसेच १०० मिटरची पाईप गॅलरी लिक असल्याने दुरुस्ती तसेच एम.एस स्ट्रक्चरला पूर्ण ऑक्सीपेंट मारणे, तसेच पी.व्ही.सी. पाईप बदलणे इत्यादी कामे यात करावी लागणार आहेत. तसेच ६ एम.एम. नर्मदा रेती,८ एम.एम. रबर हे सर्व साहित्य गुजरात मधून मागवावे लागते.आपण या कामाची समक्ष पहाणी करावी अशी विनंती आहे.

म. सभापती सदर काम करणे आवश्यक आहे का? व त्यामुळे काय फरक होऊ शकतो.

म.ओव्हरसिअर पा.पु. सदरचे काम बारा ते पंधरा वर्षात करणे आवश्यक असते सध्या सहा इंच किती शिल्लक आहे नकाने तलावातून रो वॉटर हनुमान टेकडी जलशुद्धीकरण केंद्रावर येते तेथून ते फिल्टरला येते कॅरी कॅल्क्युलेटर होऊन त्यावर रसायनांचा डोस दिला जातो नंतर फिल्टर मीडियाला येऊन रेती द्वारे शुद्ध होऊन पाणीपुरवठा केला जातो

म.संतोष खताळ सध्या हनुमान टेकडी जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता किती आहे एका दिवसात किती पाणी फिल्टर होते यापूर्वी आपले सन्माननीय सदस्य श्री शितल भाऊ नवले यांनी शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तज्ञ सल्लागार समिती नियुक्ती बाबत सूचना केली होती त्याबाबत काय कार्यवाही झाली हनुमान टेकडी तसेच बाबल्याच्या शुद्धीकरण केंद्र सुखवत पंपिंग स्टेशन येथील सर्व कामांची दुरुस्ती एकाच वेळी करावी त्यासाठी एकाच वेळेस खर्च करावा शहराच्या दृष्टिकोनातून पाणीपुरवठ्याचा मोठा प्रश्न आहे त्या ठिकाणी खर्च केलाच पाहिजे प्रत्येक वेळी असा खर्च करून नियमितपणे पाणी पुरवठा होत नाही त्याचा विचार करण्यात यावा पाच दिवसाआड पाणीपुरवठा होतो एकाच वेळी दुरुस्ती करून पाणीपुरवठा सुरळीत करा आम्ही आमचे म्हणणे माडतो सूचना करतो पण त्याच्यावर कारवाई होत नाही 28 एम एल डी पाणी शुद्धीकरणाची हनुमान टेकडी येथे क्षमता आहे सध्या अठरा एमएलडी पाणीपुरवठा होतो काम झाल्यावर क्षमता वाढली पाहिजे. याबाबत खुलासा करावा

म.ओव्हरसिअर पा.पु. येथील जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता अठरा एमएलडी आहे फिल्टर बेडचे काम केल्यावर तीन ते चार क्षमता वाढू शकते यापूर्वी 18 एम एस डी वरून 42 क्षमता करण्याचा प्रयत्न केला होता हनुमान टेकडी येथे टयुब सेंटलर टाकण्यात आले होते. नंतर ते वारंवार चोकअप होत असल्यामुळे काढून टाकण्यात आले. फिल्टर मीडियाचे काम झाल्यावर सुमारे तीन ते चार क्षमता वाढणार आहे तसेच पाणीपुरवठ्यासाठी तज्ञ संस्था नियुक्ती बाबत पुढील आठवड्यात निविदा निघणार आहे. आपल्या सूचनेनुसार जलशुद्धीकरण केंद्रावरील एकत्रित कामे करण्यासाठी 79 लाखाचा प्रस्ताव तयार आहे तो लवकरच स्थायी समितीपुढे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर होणार आहे

म. सभापती स्थायीसमितीमध्ये सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे समाधानकारक रितीने अधिकारी व कर्मचारी वर्गाने देणे आवश्यक आहे यानुसार संबंधितांनी नोंद घ्यावी व त्याचा अहवाल सादर करावा.

सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालानुसार तसेच लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून हनुमान

टेकडी जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर दुरुस्ती व रेती बदलविणे कामी येणारा अंदाजपत्रकीय खर्च रु.४३,३७,३९१/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६३ दिनांक १८/०९/२०२०

हनुमान टेकडी जलशुद्धीकरण केंद्र हे १९८३ मध्ये सुरु झालेले होते. त्यानंतर २००५ मध्ये रेत बदलणेचे काम केले होते.२००५ नंतर १५ वर्षापासून करणेत आलेले नाही. हनुमान टेकडी जलशुद्धीकरण केंद्र येथील फिल्टर मिडिया खराब झालेली असल्याने सदर जलशुद्धीकरण केंद्रावरून दुषित पाणी पुरवठा होण्याची शक्यता असल्याने सदरचा फिल्टरची दुरुस्ती मधील रेती बदलणे आवश्यक आहे.

तरी सदरचा ठिकाणी समक्ष पाहणी करून फिल्टर दुरुस्ती व रेती बदलविणे कामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.४३,३७,३९१/- मात्र येणार आहे. तरी सदर कामीचा खर्च रु.४३,३७,३९१/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी कामी स्थायी समितीपुढे सादर करण्यांत आलेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालानुसार तसेच लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून हनुमान टेकडी जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर दुरुस्ती व रेती बदलविणे कामी येणारा अंदाजपत्रकीय खर्च रु.४३,३७,३९१/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-५६ डेडरगाव जलशुद्धीकेंद्रावरून आलेली मुख्य जल वाहिनी वाहून गेल्याने त्याठिकाणी त्वरित नवीन डी.आय.लाईन टाकणेत आलेली असून याकामी झालेला खर्च रु.९,७०,८०२/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे याठिकाणी सदर प्रस्ताव सादर झालेला आहे परंतु जलवाहिनी वाहून जाणे हा प्रकार धक्कादायक आहे याबाबत आवश्यक ती चौकशी करून निर्णय होणे अपेक्षित आहे याबाबत खुलासा करावा.

म.ओव्हरसिअर पा.पु. डेडरगाव तलावाचे ओव्हरफ्लो चे पाणी नाल्यामध्ये येते पाईपलाईन लागत असल्याने पाण्याच्या वेगाने पाईपलाईन वाहून गेलेली आहे.

म. सभापती पाईपलाईन जमिनीच्या खाली असते परंतु सदर पाईपलाईन जमिनीच्या खाली आहे किंवा वरती आहे यावर खुलासा करावा.

म.ओव्हरसिअर पा.पु. डेडरगाव तलाव ते मालेगाव जलशुद्धीकरण केंद्राच्या पर्यंत तीनशे एम एम.ची पाईपलाईन आहे डेडरगाव जलशुद्धीकरण केंद्राच्या पुढे सातशे मीटरच्या पुढे नाला असून डेडरगाव तलावाचे पाणी नाल्यात येते व नाल्याद्वारे हरण्यामाळ तलाव भरला जातो मागील तीन ते चार बेळा नाल्याला पूर आला साधारण ७० ते ८० मीटर पाईपलाईन नाल्याच्या वरील बाजूस आहे व सदर पाईपलाईन शंभर वर्षापूर्वीची जुनी पाईपलाईन आहे नाला असल्यामुळे दोन फूट जमिनीच्या वरती पाईपलाईन आहे यामुळे संपूर्ण पाईपलाईन तुटलेली होती आम्ही समक्ष पाहणी केली व पुर्ण नवीन पाईप टाकलेले आहेत.

म. सभापती या कामाची पाहणी करण्याची सदस्यांची इच्छा असेल तर आपण त्या ठिकाणी जाऊन परंतु याबाबत वारंवार असा प्रकार होणे हे महापालिकेच्या हिताचे नाही त्यामुळे आता काम करताना दक्षता घ्यावी व कामाची गुणवत्ता ठेवून काम पूर्ण करावे.

म. अमोल मासुळे सदर प्रकार दोन ते तीन वेळा झालेला आहे सदर पाईप लाईन पाहून गेली परंतु पाईप लाईन मनपाकडे उपलब्ध आहे का याचा खुलासा करावा.

म. सभापती याबाबत सन्माननीय सदस्य सोबत समक्ष पाहणी करू व आपली याबाबत लेखी तक्रार द्या त्यानुसार आपण चौकशी करून यावर निश्चित कारवाई करू.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार तसेच लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रु. रु.९,७०,८०२/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७ क नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६४ दिनांक १८/०९/२०२०

धुळे म.न.पा.अंतर्गत डेडरगाव जलशुद्धीकेंद्रावरून आलेली मुख्य जल वाहिनी नाल्या मध्ये वाहून गेल्याने त्याठिकाणी त्वरित नवीन डी.आय. लाईन टाकणे बाबत डेडरगाव जलशुद्धीकेंद्रावरील गाळणी चालक यांनी दि.०७/०७/२०२०अन्वये मागणी केलीली आहे. त्यानुसार तेथे त्वरित व तातडीने पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे.कारण कि, संपूर्ण मोहाडी परीसरातील व कॉलनी परीसरातील पाणी पुरवठा बंद झालेला आहे.

त्यानुसार सदरचे काम हे श्री. गौरव विजय बुरकुले रा.धुळे यांच्या कडून त्वरित व तातडीने विनानिविदा करून घेण्यात आलेले आहे.

सदर ठेकेदार श्री. गौरव विजय बुरकुले रा.धुळे यांना तोंडी सूचना दिल्यानुसार सदरचे काम केले असून उक्त कामाचे अंदाजपत्रकानुसार खर्च रु.९,७०,८०२/- मात्र इतका करण्यात आला असून सदर कामाचे देयक मिळणे बाबत संबधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

तरी उक्त काम हे तातडीने व नागरिकांच्या जीवनाशी निगडीत असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.गौरव विजय बुरकुले रा.धुळे यांच्या कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (क)अन्वये करण्यास मंजुरीसाठी व रु.९,७०,८०२/- खर्चास व कार्योत्तर मंजुरी देणेबाबत प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार तसेच लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रु. रु.९,७०,८०२/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७ क नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषयक्रमांक:- ५७ धुळे महानगरपालिकेच्या शाळा ६४,८,२०,५६,२५ येथे कोविड १९ अंतर्गत वैद्यकीय केंद्र करण्यांत आलेले असून त्याठिकाणी विद्युतीकरण व्यवस्था करणेकामी आलेला खर्च रु.१,६३,५८६/-मात्र कार्योत्तर मंजुरी देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार तसेच लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन सदर कामी झालेला खर्च रु.१,६३,५८६/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ क नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६५ दिनांक १८/०९/२०२०

धुळे शहरात covid-१९ संबंधित शहरातील नागरिकांची शासना आदेशन्वये सर्दी, खोकला आणि ताप केंद्रांची निर्मिती करणे सुचित केल्यानुसार संदर्भीय आदेशान्वये धुळे महानगरपालिकेच्या शाळा नं. ६४,८,२०,५६,२५ येथील वर्ग खोल्या मध्ये स्थानिक परिसरातील सर्दी खोकला आणि ताप तपासणी केंद्राची निर्मिती करणे कामी आदेश संबंधित शाळांच्या वर्ग खोल्यामध्ये फॅन , ट्यूबलाइट, वायरिंग बोर्ड इत्यादी व्यवस्था करणे आवश्यक आहे.

तरी सदर च्या तपासणी केंद्र येथे शाळांमध्ये फॅन, टुबलाईट ,वायरिंग बोर्ड इत्यादी व्यवस्था मे.हिंद कंट्रक्शन ठेकेदार यांचेकडून विनानिविदा करणे करून घेण्यात आलेले आहे. तरी सदरच्या कामास अंदाजपत्रकीय खर्च रु.१,६३,५८६/- मात्र आलेला सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम 67(क)विनानिविदा करण्यात मंजुरीसाठी व खर्चास कार्यात्तर मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार तसेच लेखापरीक्षक यांचे अभिप्राय तपासून त्यानुसार संबंधित विभागाने पुर्तता करण्यांच्या अधिन सदर कामी झालेला खर्च रु.१,६३,५८६/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ क नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-५८ शहरातील मलेरिया व अन्य स्वच्छता विषयक कामांसाठी आस्था स्वयंरोजगार सेवा संस्थेमार्फत कामगार पुरविण्यांत आलेले असून सदर संस्थेची मुदत संपल्याने नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होई पावेतो सदर संस्थेस मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हिना पठाण सदर प्रस्तावाला माझा विरोध नोंदविण्यात यावा.

म. सभापती या विषयाबाबत संबंधितांनी खुलासा करावा व सदर संस्थेस मुदतवाढ द्यावी याची माहिती द्यावी.

म.आरोग्याधिकारी आस्था स्वयंरोजगार संस्था या संस्थेची मुदत संपलेली आहे नवीन निविदा प्रक्रिया सुरू केलेली आहे नवीन ठेकेदार नियुक्त होईपावेतो जो मधला कालावधी आहे त्यासाठी मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

म. सभापती त्या संस्थेचे काम समाधानकारक आहे का?

म.आरोग्याधिकारी मी याबाबत मलेरिया विभागाबाबत सांगू शकतो आस्था संस्थेचे कर्मचारी हे मलेरिया विभागाकडे आहेत त्यांना दैनंदिन कामकाजाची नोंद ठेवण्यासाठी नोंद वही दिलेली आहे. यामध्ये कामाची नोंद ठेवलेली आहे स्वच्छतेच्या कामाची जबाबदारी चंद्रकांत जाधव कडे आहे ते याबाबत चांगल्या पद्धतीने खुलासा देऊ शकतील नवीन ठेकेदार नियुक्तीचा प्रक्रिया सुरू आहे सद्यस्थितीत आपल्याकडे मनुष्यबळ असल्याने प्रक्रिया होईपावेतो मुदतवाढ देणे आवश्यक आहेत.

म.सभापती सदर संस्थेला मुदतवाढ द्यावी त्यांचे काम समाधानकारक आहे का याबाबत खुलासा करावा.

म.सहा.आरोग्याधिकारी आस्था स्वयंरोजगार संस्थेचा तीन वर्षापूर्वी कामगार करण्याचा ठेका देण्यात आलेला होता यात प्रति दिवस प्रति कामगार 377 .12 या दराने दर मंजूर केलेले होते यात तीन वर्षाचा संबंधित संस्थेशी करार करण्यात आलेला होता सदर करार जुलै 2020 मध्ये संपलेला आहे सद्यस्थितीत कोरोनाचा काळ असल्याने कर्मचाऱ्यांची आवश्यकता होती मे महिन्यामध्ये मा. आयुक्तांनी आदेश दिल्याने टेंडर प्रक्रिया सुरू केली होती यात किमान वेतन कायदा प्रमाणे टेंडर प्रक्रिया राबविण्यासाठी लेखा परीक्षकांनी अभिप्राय दिले होते शासनाच्या निर्देशाप्रमाणे व किमान वेतन कायद्याप्रमाणे सद्यस्थितीत 599 रुपये दर प्रस्तावित आहे परंतु त्या दराप्रमाणे टेंडर प्रक्रिया राबवावी किंवा कसे याबाबत कार्यालय प्रक्रिया सुरू आहे लेखा विभागाने ठरवून दिले तर निविदा प्रक्रिया पुढे करू शकतो असता संस्थेचे कर्मचारी काही प्रभागात स्वच्छतेसाठी नेमलेले आहेत यात प्रामुख्याने कोविड केअर सेंटर पॉलिटेक्निक सिव्हील हॉस्पिटल व अन्य ठिकाणी सदर संस्थेचे कर्मचारी नियुक्त आहेत या ठिकाणी कामाची आवश्यकता असल्याने कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत सद्यस्थितीत मनुष्यबळ असल्याने नवीन टेंडर प्रक्रिया होईपावेतो मुदतवाढ देणे यासाठी प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर केलेला आहे.

म. सभापती सदर संस्थेला मुदत वाढ दिली तर मनपा चा फायदा आहे किंवा कसे याबाबत खुलासा करावा.

म.सहा.आरोग्याधिकारी मागील दराची व आता शासनाच्या प्रस्तावित दराची तुलना केली तर यात वेतनात सुमारे दोनशे ते सव्वादोनशे रुपयांचा फरक आहे व तो फायदा महानगरपालिकेला मिळू शकतो.

म. सभापती आस्था संस्थेबाबत यापूर्वी सदस्यांच्या व नगरसेवकांच्या तसेच नागरिकांच्या तक्रारी होत्या सद्यस्थितीत कोविडचा काळ असल्याने त्या संस्थेच्या कामात सुधारणा झाली आहे किंवा कसे याबाबत खुलासा करावा.

म. सहा. आरोग्याधिकारी आस्था संस्थेसंदर्भात त्यांनी करारात केलेल्या अटी व नियम यांच्या संदर्भात तक्रारी आलेल्या होत्या यात कर्मचाऱ्यांचा विमा उतरवणे त्यांना शासन निर्णयाप्रमाणे लाभ देणे याबाबत तक्रारी होत्या परंतु आपण याबाबत त्यापोटी यांच्या कडून जास्त रक्कम कपात केली आहे अद्यापपावेतो कर्मचाऱ्यांच्या कामाबाबत तक्रार नाही.

म. सभापती सद्यस्थितीत धुळे महानगरपालिकेत ११ खेडे समाविष्ट झालेले आहेत त्यामध्ये असता संस्थेचे कर्मचारी नियुक्त आहेत का.

म.सहा.आरोग्याधिकारी ११ खेडी समावेश करतांना ग्रामपंचायतीने नियमबाह्य भरती केलेली होती म्हणून त्यांना सेवेत सामावून घेतले नव्हते तथापि कामाची गरज असल्याने तत्कालीन आयुक्तांनी निर्देश दिले होते व त्या कर्मचाऱ्यांना ठेका पद्धतीने आस्था स्वयंरोजगार संस्थेमार्फत त्यांचा समावेश केलेला होता.

म. सभापती आता सदर संस्था कशा पद्धतीने काम करणार आहे किंवा कसे? यांनी कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीसाठी प्रस्ताव सादर केला आहे का खाते पूर्वीच्याच दराप्रमाणे काम करणार आहेत त्यावर खुलासा करावा.

म.सहा.आरोग्याधिकारी यापूर्वी काम देताना दहा टक्के नैसर्गिक दरवाढ गृहीत धरून मुदतवाढ द्यावी असा ठराव केलेला आहे परंतु आपण त्यानुसार दर लागू केलेले नाहीत.

म. सभापती मुदत वाढदिली तर महानगरपालिकेचा फायदा होणार आहे का?

म.संतोष खताळ आस्था संस्थेच्या ठेक्यात ग्रामपंचायतीचे कर्मचारी समाविष्ट केलेले आहे असे आपले म्हणणे आहे परंतु सद्यस्थितीत जे कर्मचारी आहेत त्यांचा समावेश नाही माझ्या प्रभागातील कर्मचारी दिले होते ते पंधरा पंधरा दिवस कामावर येत नाही तसेच संस्थेला एक वर्षाची मुदत दिलेली होती परंतु ठराव करताना तीन वर्षाचा केला याबाबत खुलासा करावा

म. सभापती याबाबत सन्माननीय सदस्यांचे पत्र घेऊन त्यांच्या प्रभागातील कर्मचाऱ्यांची तपासणी करावी व त्यांच्या मागणीप्रमाणे पूर्तता करावी तसेच मागे स्थायी समितीने याबाबत निर्णय घेतलेला आहे तो

स्थायी समितीचा निर्णय आहे सद्यस्थितीत घरची परिस्थिती असून मनुष्यबळाची गरज आहे व मुदतवाढ दिल्यास सद्यस्थितीत मनपा चा फायदा होणार आहे.

म.संतोष खताळ सदर निविदेची प्रक्रिया मे महिन्यापासून सुरू आहे चार महिने त्यासाठी लागलेले आहेत अजून किती महिने लागणार आहेत.

म.अमोल मासुळे सदरचा विषय हा मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने व कामाची आवश्यकता लक्षांत घेता सद्यस्थितीत असलेल्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने फार महत्वाचा आहे.त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक हित लक्षांत घेता मागील स्थायी समिती ठरावाप्रमाणे एक वर्षापर्यंत मुदतवाढ देण्यांस हरकत नाही.तसेच नैसर्गिक दरवाढ देण्याबाबत प्रशासनाने दराबाबत खात्री करुन निर्णय घ्यावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवाल विचारात घेता मनपाचे आर्थिक हित व सद्यस्थितीत कोवीड १९ची परिस्थिती तसेच महानगरपालिका येथील आस्थापनावरील मनुष्यबळाची कमतरता लक्षांत घेता आस्था स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेला मागील स्थायी समिती ठराव नं. ३८ दि.१८/६/२०१७ अन्वये दि.१/१०/२०२० पासुन १ वर्षाकरिता मुदतवाढ देण्यांत येत आहे. तसेच सदर संस्थेला मुदतीच्या कालावधीत नैसर्गिक दरवाढ देणे बाबत प्रशासनाने निर्णय घेण्यात यावा. मनपाचे आर्थिक हित लक्षांत घेता सदरची मुदतवाढसंपूर्णत मनपाचे आर्थिक हित असे पर्यत मात्र एका वर्षापर्यतच लागू राहणार आहे व एक वर्षाची मुदत संपण्यापूर्वी नवीन निविदा प्रक्रिया राबविण्यांची जबाबदारी प्रशासनावर राहील. त्यानंतर विभागाने मनपा हिताचे दर खात्री करुन पुढील निर्णय घेण्यांत यावे. या प्रस्तावास सन्मा. सदस्या हिना पठाण यांचा विरोध असल्याने त्यांच्या विरोध नोंदवून सदर प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

संबंधित संस्थेकडुन कामागार प्राप्त करुन घेतांना घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कामाकरीता प्रभाग निहाय कामगारांची संख्या निश्चित करावी.तसेच हिवताप निर्मुलन विभागाकडे शासनाच्या मंजूर आराखडयानुसार रिक्त पदांची संख्येइतकी कामगारांची उपलब्धता संबंधित संस्थेकडुन उपलब्ध करुन घेण्यांत यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६६ दिनांक १८/०९/२०२०

मलेरीया व आरोग्य विभागात दैनंदीन साफसफाईसाठी जाहिर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता त्यात सर्वात कमी दर आस्था स्वयं.सेवा सह.संस्था, धुळे यांचे प्रति कामगार प्रती दिवस रु.377.12/- प्राप्त झाल्याने सदर दरास ठरावान्वये मान्यता देऊन सदर दरास मंजुरी देऊन कामाची 3 वर्षाची मान्यता देऊन 3 वर्षासाठी कार्यादेश देण्यात आला होता.

त्यानुसार आस्था स्वयं.सेवा सह.संस्था, धुळे यांनी आवश्यकतेनुसार कामगार पुरविले असुन सद्यस्थितीत खालील प्रमाणे कामगार पुरवित आहे.

अ.क्र.	विभाग	कामाचे नांव	एकुण कामगार
1	आरोग्य विभाग	गांडुळखत प्रकल्प	7
2		ड्रेनेज कामाकरीता	10
3		हद्दवाढ गावामध्ये साफ सफाईसाठी कामगार	28
4		जलकुंभ व जलकुंभ परिसर साफसफाई	16
5		प्रभाग निहाय दैनंदीन साफसफाईसाठी	100
6	मलेरीया	सॅनिटायझर फवारणी करणेकामी	30
7		नविन जिल्हा रुग्णालय येथे साफसफाईसाठी पुरविलेले	8

8	विभाग	जुने जिल्हा रुग्णालय येथे साफसफाईसाठी पुरविलेले	12
9		शासकीय तंत्रनिकेतन कोवीड केअर सेंटर येथे साफसफाईसाठी पुरविलेले कामगार	20
		अजमेरा कॉलेज कोवीड केअर सेंटर येथे साफसफाईसाठी पुरविलेले कामगार	8
एकुण :-			**239**

दि.21/7/2020 रोजी विभागामार्फत अहवाल सादर करुन सदर संस्थेची 3 वर्षाची मुदत दि.31/7/2020रोजी संपत असल्याने नविन ई-निविदा प्रसिध्द करण्याबाबत मा.आयुक्त सो. यांनी दि.12/3/2020 च्या अहवालात दिलेल्या निर्देशानुसार विभागामार्फत दि.4/5/2020रोजी ई-निविदा नविन संस्था नेमणेकामी निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही प्रस्तावीत केली असुन सदर निविदेस विलंब लागणार असल्याने सद्यस्थितीत सुरु असलेले काम बंद होणार असल्यामुळे सद्यस्थितीत कोरोना आजार सुरु असुन स्वच्छ सर्व्हेक्षण-2021 ची पुर्वतयारी सुरु झाल्याने त्या दृष्टीकोनातुन साफसफाईचे सातत्य राखणे आवश्यक असल्याने दि.1/8/2020 पासुन 1 महिना सद्यस्थितीत पुरवित असलेले कामगार सुरु ठेवणे बाबत आस्था स्वयं.सेवा संस्था यांना पत्र देण्यात आले आहे.

मा.सभापती सो.यांचे पत्रानुसार सदर संस्थेची कामाची मुदत दि.31जुलै 2020 रोजी संपत असल्याने सद्यस्थितीत कोरोना आजाराचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर असल्याने विभागामार्फत काय उपाययोजना करण्यात आलेली व सद्यस्थितीत आस्था स्वयं.सेवा संस्था यांचे आरोग्य व मलेरीया विभागात किती कर्मचारी कार्यरत आहे व सद्यस्थितीत करीत असलेल्या कामाबाबत किती खर्च अपेक्षीत आहे याबाबतचा अहवाल स्थायी समितीपुढे सादर करण्यास कळविले आहे.

मा.महापौर यांचे पत्रानुसार सदर संस्थेस 3 वर्षासाठी काम देण्यात आले असुन संस्थेने चांगल्याप्रकारे काम केले असल्याने सदर संस्थेची कामाची मुदत 3 वर्षाची संपल्याने नविन निविदा प्रक्रियेस विलंब होणार असल्याने नविन निविदाधारक नेमेपर्यत संस्थेने करुन दिलेल्या करारनाम्याच्या अटी शर्तीनुसार मुदतवाढ देणे बाबत तसे स्थायी समितीपुढे सादर करणेबाबत कळविले आहे.

त्यानुसार सद्यस्थितीत आस्था स्वयं.सेवा संस्थेमार्फत आरोग्य विभागात 161 व मलेरीया विभागात 78 असे एकुण 239 कामगार पुरवित असुन त्यांच्या प्रती कामगार रु.377.12/- या मंजुर दरानुसार मासिक रु.27,09,350/- खर्च होत आहे. सदरचे काम हे घनकचऱ्याशी संबंधीत असल्याने 14 वा वित्त आयोगातुन खर्च भागविण्यात येत आहे.

तरी विभागामार्फत नविन ई-निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही प्रस्तावीत असुन सदर प्रक्रिया पुर्ण होईपावेतो संस्थेला मजुर दरानुसार काम सुरु ठेवणे योग्य होईल असे मत आहे तरी याबाबतचा विषय मे.स्थायी समितीपुढे अवलोकनासाठी अहवाल ठेवण्यांत आला असता सदर अहवालात मा.उपायुक्त सो.यांनी सदर संस्थेला १ महिन्याकरिता मुदतवाढ देणे बाबत शिफारस केली असता त्यात मा.अति.आयुक्त सो.यांनी मुदतवाढ बाबत निर्णयार्थ मे.स्थायी समितीकडे सादर करणे बाबत शिफारस केली आहे.त्यानुसार त्यास मा.आयुक्त सो.यांनी मान्यता दिलेली आहे.त्यानुसार सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवाल विचारात घेता मनपाचे आर्थिक हित व सद्यस्थितीत कोवीड १९ची परिस्थिती तसेच महानगरपालिका येथील आस्थापनावरील मनुष्यबळाची कमतरता लक्षांत घेता आस्था स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेला मागील स्थायी समिती ठराव नं.३८ दि.१८/६/२०१७अन्वये दि.१/१०/२०२० पासुन १ वर्षाकरिता मुदतवाढ देण्यांत

येत आहे. तसेच सदर संस्थेला मुदतीच्या कालावधीत नैसर्गिक दरवाढ देणे बाबत प्रशासनाने निर्णय घेण्यात यावा.मनपाचे आर्थिक हित लक्षांत घेता सदरची मुदतवाढ संपूर्णत मनपाचे आर्थिक हित असे पर्यत मात्र एका वर्षापर्यतच लागू राहणार आहे व एक वर्षाची मुदत संपण्यापूर्वी नवीन निविदा प्रक्रिया राबविण्यांची जबाबदारी प्रशासनावर राहील. त्यानंतर विभागाने मनपा हिताचे दर खात्री करुन पुढील निर्णय घेण्यांत यावे. या प्रस्तावास सन्मा. सदस्या हिना पठाण यांचा विरोध असल्याने त्यांच्या विरोध नोंदवून सदर प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

संबंधित संस्थेकडुन कामगार प्राप्त करुन घेतांना घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कामाकरीता प्रभाग निहाय कामगारांची संख्या निश्चित करावी.तसेच हिवताप निर्मुलन विभागाकडे शासनाच्या मंजूर आराखडयानुसार रिक्त पदांची संख्येइतकी कामगारांची उपलब्धता संबंधित संस्थेकडुन उपलब्ध करुन घेण्यांत यावी.

बहुमताने मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे
नगरसचिव कार्यालय
स्थायी समिती सभा क्रमांक १४ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक २४/०९/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

शासनाच्या दिनांक ३/७/२०२०च्या आदेशानुसार धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑनलाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक २४/०९/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह घेण्यांत आली या ऑनलाईन सभेसाठी खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन उपस्थित होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्री.सोनार सुनिल वसंतराव	सदस्य
४	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
५	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य
६	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
७	श्रीमती उदासी कशिश गुलशन	सदस्या
८	श्री. मनसुरी मुख्तार कासिम	सदस्य
९	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
१०	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
११	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
१२	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
१३	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
१४	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१५	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
२	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
३	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
४	श्री.विनायक कोते	सहा. आयुक्त
५	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
६	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
७	श्री. नामदेव भामरे	मुख्य लेखाधिकारी

८	डॉ. महेश मोरे	आरोग्याधिकारी
९	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
११	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१२	श्री. एन.पी. सोनार	जनगणना विभाग प्रमुख
१३	श्री. रमजान अन्सारी	प्र. कार्यालयीन अधिक्षक
१४	श्री. सी.एम. उगले	ओव्हरसिअर पा.पु. वि.
१५	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बां.वि.
१६	श्री. हेमंत पावटे	ओव्हरसिअर बां.वि.
१७	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१८	श्री. सी.सी. बागुल	ओव्हरसिअर पा.पु. वि.
१९	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
२०	श्री. किशोर सुडके	बाजार प्रमुख

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सन्मा. सभापती यांचेकडून आलेली श्रध्दांजलीची यादी

मा.सभापती यांच्या यादीनुसार मुंबई उच्च न्यायालयांचे औरंगाबाद येथील जेष्ठ विधीज्ञ तसेच महानगरपालिकेचे कायदेशीर सल्लागार व धुळयाचे सुपुत्र ॲडव्होकेट पी.एम. शहा यांचे नुकतेच दु:खद निधन झाले.अतिशय अभ्यासू व व्यासंगी व्यक्तीमहत्व म्हणून वकीली क्षेत्रात त्यांचा नावलौकीक होता. महानगरपालिकेच्या अनेक प्रकरणामध्ये त्यांनी महानगरपालिकेची बाजू सक्षमतेने मांडून महापालिकेस न्याय मिळवून दिलेला आहे.अशा थोर न्यायदान क्षेत्रातील महनीय व्यक्तीमहत्वास आजच्या बैठकीत श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

तसेच धुळे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री. बी.डी. बुवा यांचेही कोरोनाच्या संसर्गामुळे सुरत येथे दु:खद निधन झाले. त्यांनीही आजपर्यत नगरपालिका व महानगरपालिके साठी दिलेली सेवा गौरवास्पद होती.श्री.बी.डी. बुवा यांनाही आजच्या बेठकीत स्थायी समितीच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

म. सभापती — दोन्ही मान्यवरांच्या दु:खद निमित्त दोन मिनिटे मौन उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दाजली समपित करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६७ दिनांक २४/०९/२०२०

मा.सभापती यांच्या यादीनुसार मुंबई उच्च् न्यायालयांचे औरंगाबाद येथील जेष्ठ विधीज्ञ तसेच महानगरपालिकेचे कायदेशीर सल्लागार व धुळयाचे सुपुत्र ॲडव्होकेट पी.एम. शहा यांचे नुकतेच दु:खद निधन झाले.अतिशय अभ्यासू व व्यासंगी व्यक्तीमहत्व म्हणून वकीलीक्षेत्रात त्यांचा नावलौकीक होता. महानगरपालिकेच्या अनेक प्रकरणामध्ये त्यांनी महानगरपालिकेची बाजू सक्षमतेने मांडून महापालिकेस न्याय मिळवून दिलेला आहे.अशा थोर न्यायदान क्षेत्रातीलमहनीय व्यक्ती महत्वास आजच्या बैठकीत श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

तसेच धुळे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री. बी.डी. बुवा यांचेही कोरोनाच्या संसर्गामुळे सुरत येथे दु:खद निधन झाले. त्यांनीही आजपर्यत नगरपालिका व महानगरपालिके साठी दिलेली सेवा गौरवास्पद होती. श्री. बी. डी. बुवा यांनाही आजच्या बेठकीत स्थायी समितीच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

वरील दोन्ही मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांच्या कुंटुबीयांच्या दु:खात सहभागी असून मान्यवरांच्या दु:खद निधनानिमित्त दोन मिनिटे मौन उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५९ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (६/८/२०२० व २७/८/२०२०)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६८ दिनांक २४/०९/२०२०

मागील स्थायी समिती दिनांक ६/८/२०२०चे ठराव नंबर ३९ तें ५१ अखेर तसेच बैठकीत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील सभापतीनी दिलेले निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती दिनांक २७/८/२०२०चे ठराव नंबर ५२ ते ६० अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत करण्यांत येत आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६० मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यत मंजुरी दिलेल्या कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर.(दि.०७/०८/२०२० ते १०/०९/२०२०)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे कार्यादेशाची यादी सादर झालेली आहे. यातील अ.नं.१ व २ हे देवपूर भागातील रस्त्यांवरील खड्डे बुजविणेचा विषय आहे. त्यासाठी एकुण २५ लाखाचे दोन्ही प्रस्ताव आहे. मागील स्थायी समितीच्या मिटींगामध्येही खड्डे बुजविण्यांचा प्रस्तावाबाबत चर्चा झालेली होती. देवपूर भागातील सदस्यांनी गंभीर तक्रारी केल्या होत्या.यापूर्वी ४० ४ते ४५ लाखाचे खड्डे बुजविण्यांचे विषय घेण्यांत आलेले होते.याबाबत खुलासा करण्याबाबत बैठकीत ठरलेही होते. मागील यादीबाबत आपण आदेशित केले होते की यात झालेल्या कामांची यादी स्थायी समिती समोर सादर करावी याबाबतही खुलासा करावा.

म. संतोष खताळ यादी मध्ये प्रत्येक प्रभागाचे काम घेण्यांत आलेले आहे प्रभाग क्रं. १६ चे एकही काम घेण्यांत आलेले नाही.प्रभाग क्रं.१६ उपेक्षित प्रभाग आहे. आयुक्तांना अधिकार आहेत. आम्ही पत्र दिलेले आहे. आमचे काम घेण्यांत येत नाही.यातील कामे गरजेचे आहे का? आमच्या प्रभागात अनेक अत्यावश्यक कामे आहेत ते कोणतेही काम होत नाही. आमचे काम घेण्यांत यावे. तोपर्यत हा विषय नामंजूर करावा.

म. सभापती या विषयावर श्री.उगले यांनी खुलासा करावा.

म. ओव्हरसिअर — देवपूर भागातील खड्डेबुजविण्याच्या प्रस्तावाबाबत कार्यादेश देण्यांत आलेले आहेत. परंतु काम करण्यांत आलेले नाही व यावर कोणताही निधी खर्च करण्यांत आलेला नाही. पावसाळा संपल्यानंतर सदर भागातील खड्डे बुजविण्यांत येतील. या अगोदर झालेल्या यादीतील कोणतेही काम झालेले नाही. पावसाळा संपल्यानंतर काम करण्यांत येणार आहे. तसेच सन्मा. सदस्य श्री.संतोषभाऊ खताळ यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत खुलासा करण्यांत येतो की, आयुक्तांचा अधिकारात ५ ते २५ लाखापर्यंतचे कार्यादेश दिलेले कामे माहितीसाठी येत असतात.इतर कामे नगरसेवकांनी त्यांच्या नगरसेवक निधीतून कामे करण्याबाबत पत्र दिल्याने घेण्यांत आलेली नाही व कार्यादेश झालेले आहे. प्रभाग क्रं.१६ मध्ये समक्ष पाहणी केली गटारीच्या कामाची वर्कऑर्डर झालेली आहे.ते काम दोन दिवसात सुरु करण्यात येणार आहे.जे कार्यादेश आता झाले ते पुढच्या स्थायी समितीला अवलोकनार्थ येणार आहेत. कामाची जी यादी आहे त्यात गटार क्रॉसींगचे काम आहेत ते ५ लाखाच्या आत असल्याने सदर कामे या यादीत येणार नाहीत.

म. संतोष खताळ — सगळयांत कमी कामे प्रभाग क्रं. १६ मध्ये झालेले आहेत प्रशासन याकामी दुजाभाव करते.

म. सभापती — कामाची यादी दिल्यानंतर पाठपुरावा करणे आवश्यक असते. आपल्या कामाबाबत दुजाभाव होणार नाही. यादी माझ्याकडे सादर करा. मी स्वत: याबाबत प्रयत्न करील.

म. अमोल मासुळे — उगले साहेब यांचा खुलासा योग्य नाही खड्डे केव्हा बुजले जातात खड्डे पावसाळयापूर्वी बुजले जाणे आवश्यक आहे.पावसानंतर खड्डे बुजवून उपयोग काय पावसाळयात अपघाताची शक्यता मोठया प्रमाणावर असते. पावसाळयापूर्वी तयारी करणे आवश्यक आहे. आता पैसे खर्च करुन उपयोग नाही विषय नामंजूर करावा.

म. भारतीताई माळी — देवपूर भागात खड्डे बुजविण्यासाठी मागील मिटींगमध्ये विषय आलेला होता.वृक्ष संवर्धनासाठी १५लाख असा प्रस्ताव होता.मी ३-४ महिन्यांपासून प्रभाग क्रं.2मधील नागरीकांनां जाण्या येण्यासाठी रस्ता नाही ३ लाखांचे एस्टीमेंट आहे.तीन महिन्यांपासून अभियंता यांचेकडेस पडलेले आहे.त्यासाठी तरतूद नसल्याचे कारण पुढे केले जाते.मग आता या आलेल्या विषयांवर तरतूद कुठुन येते.हे विषय गरजेचे आहे क? या कामांना तरतूद कुठुन उपलब्ध होते हा विषय नामंजूर करावा.

म. ओव्हरसिअर — आपण प्रशासनामार्फत पावसाळयाच्या आधी डिसेंबर जानेवारी व पावसाळयानंतर खड्डे बुजविणे आवश्यक असते. डिसेंबर जानेवारीमध्ये शहरातील मुख्य पेठ भागातील रस्त्यांचे खड्डे बुजविले होते. यादीतील कामाची वर्कऑर्डर आता दिलेली आहे. पावसाळयानंतर जे खड्डे पडतात ते बुजविण्यासाठी पूर्वतयारी म्हणून कार्यवाही केलेली आहे. हया कामांचे कार्यादेश झालेले आहेत व यावर कोणताही खर्च केलेला नाही.

म. सभापती — सन्मा. सदस्यांनी यापूर्वीही खड्डे बुजविण्याचा विषय चर्चेला घेतला होता. आपण तुकडा पद्धतीने एस्टिमेट करून टेंडर काढले मी यापूर्वीही एकत्रित टेंडर काढण्यात आदेशित केले होते परंतु आता आपली सर्व प्रक्रिया पूर्ण झालेली आहे देवपूर भागातील रस्त्यांची अवस्था भूमिगत गटार योजनेच्या कामामुळे खराब झालेले आहे त्या निविदा प्रक्रिया सदरचे काम त्या ठेकेदाराने करणे अपेक्षित आहे या आलेल्या प्रस्तावातील खड्डे बुजविण्याच्या कामात कोणत्या रस्त्याचे व कुठल्या खड्डे बुजवले जाणार आहेत याची माहिती मिळत नाही निविदा प्रक्रिया यापूर्वीच राबवणे आवश्यक होते आपण उशिरा प्रक्रिया सुरू करतो त्यामुळे नागरिकांना त्रास होतो आपण एका रस्त्यावर दोन वेळा पैसे खर्च करतो सन्माननीय सदस्यांना तातडीचे व नागरिकांच्या हिताचे काम असेल तर त्या कामांना प्राधान्य दिले पाहिजे भूमिगत गटार योजनेच्या कामात रस्ते दुरुस्त होणार आहेत याचा देखील विचार झाला पाहिजे याआधी जे ही

खड्डे बुजवण्याचा निर्णय घेतलेला आहेत त्यांचे कार्यादेश थांबवण्यात यावे जोपर्यंत आपल्याला कोणते रस्ते व खड्डे बुजवण्याची प्राथमिकता आहे ते स्थायी समितीसमोर ठेवा तोपर्यंत यावर कारवाई करण्यात येऊ नये.

म. सईद बेग मिर्झा — विटाभट्टी परिसरात डेरेस लाईनची काम केले गेलेले आहे तेथे खड्डे झालेले आहेत याबाबत मी स्वतः तक्रार केलेली आहे परंतु कार्यवाही झालेली नाही नगर्सवक निधीमध्ये दुजाभाव केलेला आहे आम्हाला नगरसेवक निधी मिळालेला नाही.

म. सभापती — यावर आपण मान्य आयुक्तांशी चर्चा करून निर्णय घेऊ.

म. विमलबाई पाटील — माझ्या प्रभागात काही अनेक रस्ते खराब झालेले आहेत तेथे खडी मुरुम टाकणे गरजेचे आहे रस्ते दुरुस्ती करणे फार गरजेचे आहे नागरिकांच्या अनेक तक्रारी येत आहेत.

म. सभापती — आपण याबाबत लेखी तक्रार माझ्याकडे सादर करावी प्रशासनाने सन्माननीय सदस्यांच्या तक्रारीची नोंद घेऊन तातडीने कार्यवाही करावी आपण प्रभागातील कॉलन्यांच्या नावासह तपशील सादर करावा.

म. सुरेखाताई देवरे — देवपूर भागातील कोणते खड्डे बुजवणार आहेत याची आम्हाला सविस्तर माहिती मिळावी

म.सभापती — खड्डे बुजवण्याचा विषय आलेला प्रस्ताव आपण त्यासाठी स्थगित ठेवला आहे.

म. अमोल मासुळे — या यादीतील अनुक्रमांक १० मध्ये विखे नगर नाल्यावर संरक्षण भिंत बांधण्याचे काम केलेले आहे सदर काम अत्यंत गरजेचे होते परंतु या कामाचे सादर झालेले अंदाजपत्रक संशोयास्पद स्वरूपाचे वाटते याबाबत खुलासा करावा.

म. ओव्हरसिअर — सदरचे अंदाजपत्रक स्लॅप कलरचे होते त्याची लांबी ३५ मीटर व रुंदी ९ मिटर आहे त्या ठिकाणी रिटेनिंग वॉल अॅबेत वॉल घेतलेली आहे ९००एम.एम.चे १७ मीटर पाईप टाकलेले आहेत संबंधित नगरसेवकांना याबाबत एस्टिमेट ची प्रत देण्यात येईल.

म. सभापती — संबंधित नगरसेवकांनी अंदाजपत्रकाची व कामाची प्रत्यक्ष पाहणी करून शंकांचे निरसन करावे व त्यांच्या संमती नंतरच काम सुरू करण्यात यावे.

म. सुरेखाताई देवरे — आमच्या प्रभागात पाणीपुरवठा बाबतही अनेक अडचणी आहेत यावरही उपाय योजना तातडीने करण्यात यावी.

म. सभापती — पाणीपुरवठा नियोजनाबाबत विभागाला सूचना देण्यात आलेल्या आहेत त्यानुसार नियोजन करण्यात येत आहे वितरणात तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे अडथळे निर्माण होत आहेत आपण त्याबाबत सर्वजण प्रयत्नशील आहोत.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार अ.क्रं.१ व २ वर नमूद कामाचे अंदाजपत्रकाबाबत अभियंता यांनी केलेला खुलासा पाहता सभेत तो स्विकृत करता येत नाही.अंदाजपत्रकात कामाचे ठिकाण नमूद नसणे शिवाय भुयारी गटारमुळे रस्ते खराब असणे व ते दुरुस्त करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेची असतांना ते वगळून खड्डे कसे बुजवणार व यामुळे कामाचे फलीत समजू शकणार नाही. यामुळे सदर अंदाजपत्रक नियमानुसार तपासणेकामी सक्षम तांत्रिक अधिकारी (पी.डब्ल्यु.डी व इतर) यांची नेमणूक करणे उचित होईल तो पर्यत विभागाने पुढील कार्यवाही करु नये.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६९ दिनांक २४/०९/२०२०

धुळे महानगरपालिका बांधकाम विभागाकडून होतअसलेल्या विकास कामासाठी दि.०७/०८/२०२० ते १०/०९/२०२० अखेर विकास कामांची निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी सोबत जोडली आहे.कृपया उक्त यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवण्यात यावी.

दिनांक :- १०/०८/२०२० ते १०/०९/२०२० अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

अ.क्र.	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामाचे नाव	रक्कम	निधी
१	११८	१०/०८/२०२०	देवपूर भागातील मुख्य रस्त्यावरील खड्डे खडी व मुरुमाने बुजविणे.	१४,९३,०९७/-	मनपा निधी अंतर्गत
२	११९	१४/०८/२०२०	देवपूर भागातील मुख्य रस्त्यावरील खड्डे डांबर कामाने बुजविणे.	९,६९,५७२/-	मनपा निधी अंतर्गत
३	१२०	१४/०८/२०२०	प्र.क्र.६ मोराणे डेअरी कॉलनीच्या मागील बाजूला मुतारी बांधणे.	५,००,३५३/-	मनपा निधी अंतर्गत
४	१२१	२४/०८/२०२०	प्र.क्र.२ सर्व्हे नं.५७/५८ येथील जागेवर खेळणी व बेंचेस बसविणे.	९,९६,५३०/-	खासदार निधी अंतर्गत
५	१२९	२५/०८/२०२०	प्र.क्र.६ महिंदळे निळकंठेश्वर कॉलनी, अजिंक्यतारा सोसा.येथे ४ इंच व ६ इंच पाईप लाईन टाकणे.	५,९४,२५०/-	मनपा निधी अंतर्गत
६	१३१	२५/०८/२०२०	प्र.क्र.१५ सर्व्हे नं.५७४ अशोक नगर भागात ओपनस्पेसला वॉल कंपाऊंडकरणे.	७,२७,३०६/-	आर्थिक व दुर्बल घटक निधी अंतर्गत
७	१३२	२५/०८/२०२०	प्र.क्र.१५ वैभव नगर ते सुशील नगर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	१६,०१,२३७/-	आर्थिक व दुर्बल घटक निधी अंतर्गत
८	१३३	२५/०८/२०२०	प्र.क्र.१८ मध्ये शासकीय दुध डेअरी परिसरात बंदिस्त गटार करणे.	९,९३,७६५/-	मनपा निधी अंतर्गत
९	१३४	२५/०८/२०२०	प्र.क्र.१५ भावसार कॉलनीतून जाणाऱ्या नाल्याचे बंदिस्तीकरण करणे.	८,७८,१६३/-	१४ व्या वित्त आयोगा अंतर्गत
१०	१३६	२५/०८/२०२०	शेलारवाडी व विखे नगर येथीलनाल्यावर स्लॅब क्लवर्त व संरक्षण भिंत बांधणे.	२१,९०,५२२/-	मनपा निधी अंतर्गत
११	१४२	०४/०९/२०२०	प्रभाग क्र.१३ मध्ये वडजाई रोड पासून ते शाह जमान खानापर्यंत अक्सारनगर येथे गटार व रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९४,४२०/-	आमदार निधी अंतर्गत
१२	१४५	१०/०९/२०२०	देवपूर भागातील प्र.क्र.३ मधील पौर्णिमा नगर भागात श्री.पी.के.महाजन ते श्री. अमोल देसले यांच्या घरापर्यंत रस्ताडांबरीकरण करणे.	९,९५,८१२/-	मनपा निधी अंतर्गत
१३	१४६	१०/०९/२०२०	देवपूर भागातील प्र.क्र.३ मधील पौर्णिमा नगर भागात श्री. अमोल देसले ते श्रीमती बालीबाई गीते यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	९,९६,८७६/-	मनपा निधी अंतर्गत
१४	१४७	१०/०९/२०२०	प्र.क्र.६ मोराणे अमरधाम वॉल कंपाऊंड बांधणे.	९,९९,८०२/-	मनपा निधी अंतर्गत
१५	१४८	१०/०९/२०२०	प्र.क्र.६ मध्ये मोराणे नगांव बायपास ते पांडव नगर रस्ता काँक्रीटीकरण करणे.	९,९८,१८३/-	मनपा निधी अंतर्गत

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार अ.क्रं.१ व २ वर नमूद कामाचे अंदाजपत्रका बाबत अभियंता यांनी केलेला खुलासा पाहता सभेत तो स्विकृत करता येत नाही.

अंदाजपत्रकात कामाचे ठिकाण नमूद नसणे शिवाय भुयारी गटारमुळे रस्ते खराब असणे व ते दुरुस्त करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेची असतांना ते वगळून खड्डे कसे बुजवणार व यामुळे कामाचे फलीत समजू शकणार नाही.यामुळे सदर अंदाजपत्रक नियमानुसार तपासणे कामी सक्षम तांत्रिक अधिकारी (पी.डब्ल्यु.डी व इतर) यांची नेमणूक करणे उचित होईल तो पर्यंत विभागाने पुढील कार्यवाही करु नये.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६१ धुळे महानगरपालिकेतील मानधन तत्वावर कार्यरत लिपीक / टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांचे मानधन वाढीबाबत तसेच नियमाप्रमाणे एकत्रित सेवा खंडीत करुन एकत्रित मुदतवाढी बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.तसेच सदर विषय मंजुर करणेबाबत सन्मा.सदस्या श्रीमती अन्सारी नुरुल अमीन यांचे आलेले लेखी पत्र सभागृहास वाचून दाखविले व म. सभापती सो. यांचेकडेस सुपुर्द केले.

म. अमोल मासुळे संगणकऑपरेटर हे महानगरपालिका सेवेत समाधानकारकपणे काम करीत आहेत निवडणूक अशा अनेक प्रसंगी त्यांनी आपली सेवा महानगरपालिकेला दिलेली आहे त्यांच्या मानधनात वाढ करणे हा प्रस्ताव मंजूर करावा त्याचबरोबर धुळे महानगरपालिकेत अंगणवाडी बालवाडी शिक्षिका व मदतनीस कार्यरत आहेत तेदेखील अल्प मानधनावर सद्यस्थितीत काम करीत आहेत त्यांची नगरपालिका महानगरपालिकेत बरीच सेवा झालेले आहेत बरेच कर्मचारी आता सेवानिवृत्तीच्या मार्गावर आहेत त्यांनादेखील मानधन वाडी करून न्याय देण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी

म. सभापती सदर कर्मचारी है चांगल्या प्रकारे सेवा देत आहेत व त्यांचे कामाचे स्वरूप ही ही स्वतः बघितलेले आहे त्यांच्या मानधनवाढीचा प्रस्ताव मी स्वतः आयुक्तांकडे सादर करण्याबाबत सांगितले होते याबाबत आयुक्तांनी ही अत्यंत सकारात्मक रीतीने तातडीने प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर केलेला आहेत.त्यांची सेवा खंडित करून त्यांना वाढीव मानधनात मुदतवाढ देण्याचा विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे परंतु या कामात जर कोणी कसूर केली तर त्यांची सेवा कायमस्वरूपी खंडित करण्यात यावी तसेच याच बरोबर अंगणवाडीसेविकांचा विषय महत्त्वाचा आहे त्याही अत्यंत कमी मानधनावर मी प्रकारचे काम धुळे महानगरपालिकेत करीत आहेत त्यांचा प्रस्ताव स्वतंत्रपणे स्थायी समितीसमोर सादर करण्यात यावा तसेच याबाबत शासनाचे निर्देश तपासून प्रस्ताव सादर करावा.

म. उपायुक्त सदर विषय हा महत्त्वाचा आहे प्रशासन सुद्धा याबाबत गंभीर आहे शासनाचे असणारे निर्देश व नियम तपासून आस्थापना विभागामार्फत तातडीने अंगणवाडी व बालवाडी शिक्षकांचा मानधनाबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर पुढील कालावधीत सादर केला जाईल.

म. सभापती संगणक ऑपरेटर यांचा स्थायी समितीसमोर झालेला मानधन वाढीचा प्रस्ताव विचारात घेता याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व सादर झालेल्या कार्यालयीन अहवालास अधीन राहून प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७० दिनांक २४/०९/२०२०

दिनांक १०/०८/२०२० च्या कार्यालयीन अहवालानुसार दि.११/०९/२०२० रोजी मा. आयुक्त सो.यांचेकडे झालेल्या चर्चेनुसार सद्यस्थितीत मानधनावर कार्यरत संगणक ऑपरेटर

यांना स्थायी समितीचा यापूर्वी दि.३१/०१/२०२०रोजी झालेल्या ठरावानुसार रु.१००००/- मानधनास वाढ दिलेली आहे.

त्यानुसार खालील कार्यरत संगणक ऑपरेटर यांना रु.१००००/-मानधनावर फेर नियुक्ती देण्याबाबत पुनश्च स्थायी समितीपुढे विषय पाठविणे आवश्यक आहे.त्यानुसार खालील १ ते १७ कार्यरत संगणक ऑपरेटरची यादी सादर करण्यांत येत आहे.

अ.क्र.	संगणक ऑपरेटरचे नाव	विभाग	आदेश क्र.	नियुक्तीचा कालावधी
१.	नितीन ज्ञानेश्वर महाले	महापौर कार्या.	जा.क्र./धुमपा/आस्था/१९३७ दि. २५/६/२०२०	११/५/२०२० ते ११/११/२०२०
२.	लतेश सुरेश चौधरी	कंपोस्ट डेपो	जा.क्र./धुमपा/आस्था/१९३७ दि. २५/६/२०२०	११/५/२०२० ते ११/११/२०२०
३.	राहुल सुभाष भावसार	कोरोना कक्ष	जा.क्र./धुमपा/आस्था/१९३७ दि. २५/६/२०२०	११/५/२०२० ते ११/११/२०२०
४.	शोऐबरजा आदिल शेख	आरोग्य	जा.क्र./धुमपा/आस्था/१९३७ दि. २५/६/२०२०	११/५/२०२० ते ११/११/२०२०
५.	कुणाल संजय दरगुडे	सहा.आयुक्त कार्या.	जा.क्र./धुमपा/आस्था/१६८१ दि. ११/५/२०२०	११/५/२०२० ते ११/११/२०२०
६.	पुजा विठ्ठलंसग परदेशी	उपमहापौर कार्या.	जा.क्र./धुमपा/आस्था/१६८१ दि. ११/५/२०२०	०४/०६/२०२० ते ०४/१२/२०२०
७.	अंजना प्रल्हाद गायकवाड	बांधकाम	जा.क्र./धुमपा/आस्था/१६८१ दि. ११/५/२०२०	०४/०६/२०२० ते ०४/१२/२०२०
८.	पल्लवीजयराम सावरकर	लाईट विभाग	जा.क्र./धुमपा/आस्था/१६८१ दि. ११/५/२०२०	०४/०६/२०२० ते ०४/१२/२०२०
९.	सचिन विनायक शिंदे	कंपोस्ट डेपो	जा.क्र./धुमपा/आस्था/१६८१ दि. ११/५/२०२०	०४/०६/२०२० ते ०४/१२/२०२०
१०.	निखिल रविंद्र देशमुख	मालमत्ता कर	जा.क्र./धुमपा/आस्था/१६८१ दि. ११/५/२०२०	०४/०६/२०२० ते ०४/१२/२०२०
११.	सरिता गंभिरराव चव्हाण	मालमत्ता कर	जा.क्र./धुमपा/आस्था/१६८१ दि. ११/५/२०२०	०४/०६/२०२० ते ०४/१२/२०२०
१२.	सुनिता दत्तात्रय आव्हाड	मालमत्ता कर	जा.क्र./धुमपा/आस्था/१६८१ दि. ११/५/२०२०	०४/०६/२०२० ते ०४/१२/२०२०
१३.	शरद दामु मोहिते	मालमत्ता कर	जा.क्र./धुमपा/आस्था/१६८१ दि. ११/५/२०२०	०४/०६/२०२० ते ०४/१२/२०२०
१४.	वर्षा छबीलदास माळी	नगररचना विभाग	जा.क्र./धुमपा/आस्था/१६८१ दि. ११/५/२०२०	०४/०६/२०२० ते ०४/१२/२०२०
१५.	योगिता रमेश चौधरी	सहा.आयुक्त कार्या.	जा.क्र./धुमपा/आस्था/१६८१ दि. ११/५/२०२०	०४/०६/२०२० ते ०४/१२/२०२०
१६.	जितेंद्र सुभाष शिंदे.	बाजार विभाग	जा.क्र./धुमपा/आस्था/२२८५ दि. ०७/८/२०२०	२९/०६/२०२० ते २९/१२/२०२०
१७.	दिलीप खुशाल शिवदे	विरोधी पक्ष नेता कार्या.	जा.क्र./धुमपा/आस्था/२२८५ दि. ०७/८/२०२०	२९/०६/२०२० ते २९/१२/२०२०

उक्त अ.क्र. १ ते १७ संगणक ऑपरेटर यांचा नियुक्ती कालावधी वेगवेगळया तारखेस संपत आहे.परंतु सदर ऑपरेटर यांचे मानधन रु.८०००/-वरुन रु.१००००/-करावयाचे झाल्यास वरील सर्व ऑपरेटर यांची सेवा खंडीत करुन नव्याने १०,००० मात्र एकत्रित मानधनावर दि.०१/१०/२०२० पासुन ६ महिनेकरीता मानधनावर नियुक्ती देणे बाबत तसेच यापुढे संगणक

ऑपरेटर मानधनावर घेतांना रु.१००००/-मानधनास मान्यतेबाबतचा विषय मे.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

याबाबत सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा लक्षांत घेवून तसेच कार्यालयीन अहवालास अधिन १ ते १७ संगणक ऑपरेटर यांना त्यांचे मानधन रु.८०००/- वरुन रु.१००००/- मात्र लागू करण्यांस तसेच सदर सर्व ऑपरेटर यांची सेवा खंडीत करुन सदर मानधनवाढ दि. १/१०/२०२० पासून लागू करण्यांस व उक्त कर्मचारी यांना पुढे ६ महिनेकरिता नियुक्ती देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.परंतु या कामात जर कोणी कसूर केली तर त्यांची सेवा कायम स्वरूपी खंडित करण्यात यावी.

तसेच मनपा सेवेत सद्यस्थितीत कार्यरत असणा-या आंगणवाडी व बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांच्या मानधन वाढीचा प्रस्ताव शासनाचे निर्देश व नियम तपासून प्रशासनाने पुढील बैठकीत स्वतंत्रपणे सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६२ एम.एस. डब्ल्यु.नियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नवी दिल्ली या शासन मान्य संस्थेचे तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्यांत आलेले असून सदर प्रस्ताव अवलोकनार्थ मे.स्थायी समिती समोर सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कमलेश देवरे या प्रस्तावाबाबत सविस्तर खुलासा प्रशासनामार्फत करण्यांत यावा.

म. उपायुक्त स्वच्छ सर्वेक्षण २०२१ सुरू झालेले आहे सद्यस्थितीत १४ वा वित्त आयोगाचा कालावधी संपलेला असून १५ व्या वित्त आयोगाची कार्यवाही सुरू झालेली आहे आपल्याला वित्त आयोग अंतर्गत वर्षभरात सुमारे दहा ते बारा कोटी अनुदान मिळते धुळे महानगरपालिकेचे आर्थिक स्तोत्र मर्यादित आहे त्यामुळे वित्त आयोगाच्या अनुदान शहरासाठी फार महत्त्वाचे आहे पंधराव्या वित्त आयोगाच्या निर्देशानुसार शासनाने स्वच्छ सर्वेक्षण मानांकन मिळवणे बंधनकारक कलेले आहे व त्यानुसारच अनुदान उपलब्ध होणार आहेत मा. आयुक्तांनी हा विषय महत्त्वपूर्ण असल्याने स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर केलेला आहे आपण सध्या चांगल्या मानांकनात आहोत आणि यात सातत्य ठेवणे गरजेचे आहे ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट ही संस्था शासन मान्य संस्था आहे या संस्थेबरोबर आयुक्तांनी समक्ष चर्चा केलेली आहे यासाठी स्वच्छ सर्वेक्षण २०२१ मध्ये चांगले मानांकन मिळवण्यासाठी व यासाठी तांत्रिक मार्गदर्शनासाठी तज्ञ व्यक्तींना बोलावले आहे कमीत कमी खर्चात हा प्रस्ताव कसा तयार करता येईल याबाबतचा विचार केलेला आहे आपल्याला स्वच्छ सर्वेक्षणामध्ये डॉक्युमेंटेशन व अंमलबजावणी यासाठी ज्या अडचणी येतात त्यावरच तांत्रिक मार्गदर्शन व सन्माननीय तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत ही शासन मान्य संस्था असून शासनाशी संलग्न असणारी देश पातळीवरील संस्था आहे यामुळे सदर प्रस्ताव विभागाने तयार करून आयुक्तांनी त्यावर मान्यता दिली आहे व कार्यादेश दिलेला आहे. व अवलोकनार्थ स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर झालेला आहे आपल्याकडे तांत्रिक कर्मचारी मर्यादित आहे त्यामुळे मानांकनात वाढ व सातत्य राहावे म्हणून आपण या संस्थेस काम सोपवले आहे.

म.कमलेश देवरे — हा चांगला प्रस्ताव आहे परंतु यामध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी घंटा गाड्यांचे नियंत्रण व घनकचरा वरील नियंत्रण व त्याची अंमलबजावणी हा विषय व या बाबी घेतलेल्या आहेत का आपण त्यांना मोठ्याप्रमाणावर मानधन देत आहोत व त्याचा उपयोग शहरासाठी होणे आवश्यक आहे.

म.उपायुक्त — घनकचरा व्यवस्थापन आपल्या दैनंदिन स्वरूपाचा भाग आहे ही संस्था स्वच्छ सर्व्हेक्षणाच्या अंमलबजावणीसाठी तांत्रिक मार्गदर्शन करणारी तज्ञ संस्था आहे व त्यानुसार ते मार्गदर्शन करणार आहेत.

म. सभापती — याबाबत सहाय्यक आरोग्य अधिकारी श्री चंद्रकांत जाधव यांनी खुलासा करावा.

म.सहा.आरोग्याधिकारी — भारताचे पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांनी संपूर्ण देशात स्वच्छ भारत अभियान सुरु केलेले आहे. यात घरगुती शौचालय घनकचरा व्यवस्थापन प्लास्टिक बंदी स्मार्ट सिटी अमृत योजना या बाबींचा समावेश यात आहे.शहरी आरोग्य मंत्रालयाने या सर्व कामासाठी पॅनलवर ४७ संस्था नियुक्त केलेल्या आहे यामध्ये ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट ही संस्था केंद्र शासनाने निर्धारित केलेली आहे त्यांच्या कडून स्वच्छ भारत अभियाना मध्ये एमआय. एस. व पोर्टल माहिती व प्रत्यक्ष ग्राऊंड लेव्हलला कशा पद्धतीने कामकाज करावे यासाठी सदर संस्था तांत्रिक मार्गदर्शन करणार आहे घनकचरा व्यवस्थापनामध्ये ज्या अडचणी आहेत त्याबाबतही सदर संस्था मार्गदर्शन करणार आहेत आपल्याला घनकचरा ट्रांसपोर्टेशनसाठी अडचणी होत्या.याबाबत संबंधित संस्थेशी व त्या तज्ञ लोकांशी चर्चा झालेली आहे कचरा साठवणुकीचे विकेंद्रीकरण करून जागेवरच कचरा वर्गीकरण करणे व नंतर प्रोसेसींग प्लॅट अथवा कंपोस्टला पाठवणे व त्यावर प्रक्रिया करणे याबाबत ते मार्गदर्शन करीत आहेत व साधारण दोन महिन्यापासून संस्थेचे काम सुरू झालेले आहे

म. सभापती — संबंधित संस्थेला टेंडर न करता काम देण्यात आलेले आहे ते नियमाप्रमाणे आहे का ?

म.सहा.आरोग्याधिकारी — स्वच्छ संरक्षण अंतर्गत डीपीआर तयार झालेले आहे त्या घनकचरा व्यवस्थापनाच्या नियम 2016च्या मार्गदर्शक सुचनानुसार शासन निर्देश आहेत त्यामध्ये नमूद आहे की आपण अशा तज्ञ संस्थेची मदत घेऊ शकतो असे स्पष्ट निर्देश आहेत व सदरचा खर्च २५ लाखाच्या आत असल्याने मा.आयुक्तांनी त्यास मान्यता दिलेली आहे

म. सभापती — या संस्थेला अनुभव आहे का याची आपण तपासणी केलेली आहे का?

म. उपायुक्त — सदर संस्था ही राज्य शासनाने नियुक्त केलेली संस्था आहे व शासनाच्या एक्सपोर्ट कमिटीवर ही संस्था कार्यरत आहे सर्वांना याबाबत प्रशिक्षण या संस्थेमार्फत देण्यात येते.

म. सभापती — या कामासाठी सद्यस्थितीत समन्वयक म्हणून शरयू सनेर या काम करीत आहेत त्यांचे काम काय व त्यांचा काय उपयोग आहे याचा खुलासा करावा.

म.सहा.आरोग्याधिकारी — स्वच्छ भारत मिशन मध्ये सध्या शेवटचा टप्पा सुरू आहे यापुढच्या प्रोसेसमध्ये टेक्निकल बाबी समाविष्ट आहेत यात प्रोसेसिंग प्लॅनींग, बायो मायनिंग, रेनोवेशन करणे या महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन होणे आवश्यक व गरजेचे आहे आपल्याकडे यासाठी तांत्रिक प्रशिक्षित कर्मचारी नाही. आपले स्वच्छता निरीक्षक सुद्धा प्रभारी म्हणून काम करीत आहे त्यामुळे या संस्थेतील तज्ञांचा व त्यांच्या मार्गदर्शनाचा उपयोग घेऊन त्याप्रमाणे काम करण्यात येणार आहे.

म. सभापती — केंद्र शासनाच्या वतीने आपण शहरासाठी मानांकन ठेवण्यासाठी प्रयत्न करीत आहोत श्रीमती शरयू सनेर यांना शासनामार्फत पगार देण्यात येतो किंवा कसे? तसेच त्यांच्या मार्फत किंवा त्यांच्या माध्यमातून आपण काम करू शकत नाही का ?

म. उपायुक्त — शरयू सनेर यांचा पगार व मानधन संबंधित संस्थेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. आपल्या कामात सुधारणा होण्यासाठी सदर तांत्रिक मार्गदर्शन आवश्यक आहे घंटागाडी शौचालय यावरही ही उपाययोजना व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे सदर तज्ञ संस्थेची पीएमसी म्हणून जबाबदारी आहे या ठिकाणी अधिकारी उपलब्ध आहेत त्यांच्या समवेत आपण बैठक घेऊन ते कशा पद्धतीने काम करणार आहेत व त्याचा महानगरपालिकेस काय फायदा होणार आहे त्याचा प्रत्यक्ष डेमो घेऊन स्थायी समिती समोर सादर करावा व त्याप्रमाणे स्थायी समिती सभापती व सदस्यांच्या सूचना व मार्गदर्शनानुसार पुढील काम घेण्यात यावे.

म. अमोल मासुळे — पंधराव्या वित्त आयोगासाठी हे काम महत्त्वाचे आहे परंतु यासंदर्भात कोणते कर्मचारी काम करत होते याची माहिती मिळावी व दोन तज्ञ व्यक्तींसाठी एवढ्या मोठ्या प्रकारचे मानधन दिलेले आहे ते कितपत योग्य आहे एवढे मानधन दिल्याने आपणास फायदा होणार आहे का यापूर्वी शहर समन्वयक नियुक्त आहेत व आपल्या महानगरपालिका पालिकेतही दोन संगणक प्रोग्रामर कर्मचारी नियुक्त आहेत त्यांच्यामार्फत हे काम होऊ शकत नाही का या विषयास माझा विरोध नाही परंतु खर्चाचा विषय आहे त्यामुळे याचा विचार करावा.

म. संतोष खताळ — यामध्ये कचरा व सार्वजनिक शौचालय या गोष्टी महत्त्वाच्या आहेत त्यासाठी ग्राउंड लेव्हल ला काम होणे गरजेचे आहे कचऱ्याची समस्या आहेत शौचालयाची समस्या आहे आपले अधिकारी व कर्मचारी ठेकेदाराला पाठीशी घालत आहेत आपण तज्ञ मार्गदर्शक यांचा उपयोग केला तरीसुद्धा जाऊन लेवलला काम होणे महत्त्वाचे आहे यापूर्वीच आम्ही कचरा संकलनासाठी विकेंद्रीकरणाची आपण योग्य रीतीने नियोजन केले तर शहरातील संपूर्ण कचरा उचलला जाईल अशी सुचना केलेली होती. परंतुअंमलबजावणी झालेली नाही. आता सद्यस्थितीत ८० घंटागाडी आहेत तरी शहरात तक्रारी आहेत हा विषय मंजूर करावा परंतु आपले ग्राउंड लेव्हल चे काम प्रथम व्यवस्थित करा आपणास अनुदान मिळणार आहे मानांकन मिळणार आहे ही गोष्ट चांगली आहे पण फक्त कागदपत्री काम करणे योग्य नाही.

म. उपायुक्त — प्रशासन या विषयात चांगल्या पद्धतीने काम करण्याबाबत प्रयत्नशील आहे यासाठी सद्यस्थितीतील मनुष्यबळ व आर्थिक स्थिती याचा विचार होणे आवश्यक आहे शहराचे कार्यक्षेत्र घंटागाडयांची क्षमता वाहतुकीसाठी लागणारा वेळ यासारख्या अनेक बाबीवर अडचणी आहेत आम्ही आता नवीन टेंडर तयार केलेले आहे तो देखील स्थायी समितीसमोर ठेवण्यात येऊन आपल्या सूचना व मार्गदर्शन घेण्यात येणार आहे परंतु तरी देखील अपेक्षित काम संबंधित ठेकेदाराकडून होत नाही यासाठीच आम्ही प्रशासन व आरोग्य विभागाच्या असणाऱ्या जबाबदारीत काही बदल केलेले आहेत.श्री जाधव यांनी संबंधित सन्मान्य सदस्यांची चर्चा करून व संपर्कात राहून आरोग्यविषयक किरकोळ बाबींबाबत व स्वच्छतेच्या कामाबाबत तातडीने दखल घ्यावी आम्ही प्रशासनाकडून याबाबत पूर्णपणे प्रयत्नशील आहोत.

म. सभापती — या कामासाठी किती कालावधी लागणार आहे व कामाचा तपशील याबाबत माहिती देण्यात यावी.

म. उपायुक्त — या कामासाठी साधारण आठ महिन्याचा कालावधी निश्चित केलेला आहे सदर तज्ञ संस्था व व्यक्ती काय काम करणार आहेत याचे सादरीकरण स्थायी समितीसमोर सादर करण्यात येईल व त्यानुसार त्यांचा तपशील स्थायी समितीसमोर सादर केला जाईल. व या संस्थेच्या नियुक्तीमुळे मानांकनात कशा पद्धतीने वाढ होईल व सदर संस्था नेमके कोणते काम करणार आहे याची माहिती स्थायी समितीसमोर देण्यात येईल

म. सभापती

सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व सादर झालेला प्रस्ताव विचारात घेता मा. आयुक्त सो. यांची यापूर्वीच दिलेली मान्यता लक्षांत घेवून रु.२५ लक्षचे आतील खर्चापर्यत कार्यवाही करता येईल मात्र सदर बाबींवर रु.२५ लक्ष पेक्षा जादा खर्च होणार असल्यास त्यांची मान्यता म.स्थायी समितीकडे सादर करणे आवश्यक असेल.त्याचप्रमाणे सदर मान्यता ही मा.आयुक्त यांनी दिली असून विषय अवलोकनार्थ सभेपुढे आला आहे. यामुळे यातील नियमोचीत बाबी संदर्भात भविष्यात आक्षेप आल्यास ती संपूर्णत:प्रशासनाची जबाबदारी असेल यांचे अधिन राहून सदर प्रस्तावाचे अवलोकन करण्यांत आलेले आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७१ दिनांक २४/०९/२०२०

अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था सन १९९३ पुर्वीची सरकार मान्य संस्था आहे. सदरची संस्था शहरी क्षेत्रामध्ये सर्वात मोठी एन.जी.ओ.आहे.सदरची संस्था उत्तम व अनेक विषयांवर सल्लागार म्हणुन काम करते.

दिनांक ८एप्रिल२०१६ रोजी प्रसिध्द झालेल्या परिपत्रकानुसार प्रत्येक स्थानीक स्वराज्य संस्थेसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ लागु करण्यात आलेला आहे. तसेच राष्ट्रीय हरीत लवाद कायद्याअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ चे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी स्थानीक स्वराज्य संस्थेची आहे.स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) मध्ये दरवर्षी स्वच्छ सर्व्हेक्षण स्पर्धेत स्थानीक स्वराज्य संस्थेने भाग घ्यावयाचा आहे.त्यात घनकचरा नियम२०१६च्या नुसार उच्च मानांकन मिळविण्यासाठी तसेच ODF++चे सातत्य टिकावे व Water+ हे स्वच्छ भारत अभियानात महत्वाचा भाग आहे.

तरी उक्त कामासाठी तांत्रीक सल्लागार नियुक्त करणे गरजेचे आहे. सदरच्या प्रस्तावानुसार त्या करीता अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्थेचे **दोन तज्ञ प्रतिनिधी** धुळे महानगरपालिका कार्यालयीन वेळेत पुर्ण काम करतील व त्यांच्याकडुन खालील प्रमाणे कामे करुन घेता येतील.

1) स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्व्हेक्षण (DOF++,GFC, Water+) स्पर्धांसाठी लागणारे कागदपत्र तयार करणे व शासनाच्या पोर्टलवर विहित पध्दतीने माहिती भरणे
2) राष्ट्रीय हरीत लवाद कायद्याअंतर्गत व प्रदुषण मंडळ यांच्या नियमानुसार घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या अनुषंगाने शासनाच्या पोर्टलवर योग्य ती माहिती भरणे
3) कचरा विलगीकरण, होम कंपोस्टींग, MRF याबाबत योग्य त्या मार्गदर्शन व कृती आराखडा तयार करणे
4) सिंगल युज प्लास्टीक बंदी बाबत जनजागृती व कृती आराखडा तयार करणे व मार्गदर्शन करणे
5) स्वच्छ भारत अभियान अंतर्गत C&D, Biomining आणि बायोगॅस ह्या प्रकल्प बाबत योग्य ते मार्गदर्शन करणे.

उक्त कामासाठी अखील भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था दिल्ली यांनी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे रुपये २,७०,०००/-प्रती महिना मागणी केली होती.त्याअनुषंगाने मा. उपायुक्त सो. व मा.आयुक्त सो. यांनी सदर संस्थेस वाटाघाटी साठी बोलविले होते.

त्याअनुषंगाने झालेल्या चर्चेनुसार वाटाघाटी अंती सदर संस्थेस प्रतीमाह रु.२,५०,०००/- (विना जीएसटी) ठरवुन सदर प्रस्ताव मान्य करण्यात आलेला आहे. त्यानुसार मा.आयुक्त सो. यांनी सदरचा अहवाल मे.स्थायी समितीपुढे माहितीसाठी सादर करणे बाबत

निर्देश दिले आहे.त्यानुसार सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे अवलोकनासाठी सादर झालेला आहे.

उक्त सादर झालेला अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार मा.आयुक्त सो.यांची यापूर्वीच दिलेली मान्यता लक्षांत घेवून रु.२५ लक्षचे आतील खर्चापर्यत कार्यवाही करता येईल मात्र सदर बाबींवर रु.२५ लक्ष पेक्षा जादा खर्च होणार असल्यास त्यांची मान्यता म.स्थायी समितीकडे सादर करणे आवश्यक असेल.त्याचप्रमाणे सदर मान्यता ही मा.आयुक्त यांनी दिली असून विषय अवलोकनार्थ सभेपुढे आला आहे. यामुळे यातील नियमोचीत बाबी संदर्भात भविष्यात आक्षेप आल्यास ती संपूर्णत:प्रशासनाची जबाबदारी असेल यांचे अधिन राहून सदर प्रस्तावाचे अवलोकन करण्यांत आलेले आहे.

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे
नगरसचिव कार्यालय
स्थायी समिती सभा क्रमांक १५ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक२९/१०/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

शासनाच्या दिनांक ३/७/२०२०च्याआदेशानुसार धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑनलाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक २९/१०/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा** भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह घेण्यांत आली या ऑनलाईन सभेसाठी खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन उपस्थित होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्री.सोनार सुनिल वसंतराव	सदस्य
४	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
५	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य
६	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
७	श्रीमती उदासी कशिश गुलशन	सदस्या
८	श्री. मनसुरी मुख्तार कासिम	सदस्य
९	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
१०	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
११	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
१२	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
१३	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
१४	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१५	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य
१६	श्रीमती अन्सारी फातमाबी नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. गणेश गिरी	अति. आयुक्त
२	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
३	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
४	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
५	श्री.विनायक कोते	सहा. आयुक्त
६	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
७	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव

८	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
९	डॉ. महेश मोरे	आरोग्याधिकारी
१०	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
११	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
१२	श्री. बी. एस. रनाळकर	प्र. लेखापाल तथा सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१३	श्री. एन.पी. सोनार	जनगणना विभाग प्रमुख
१४	श्री. रमजान अन्सारी	प्र. कार्यालयीन अधिक्षक
१५	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१६	श्री. सी.सी. बागुल	ओव्हरसिअर पा.पु. वि.
१७	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
१८	श्री. किशोर सुडके	बाजार प्रमुख
१९	श्री. राजेश गायकवाड	वरिष्ठ लिपीक मनपा शिक्षण मंडळ
२०	श्री. सुक्राम राऊत	वाहन विभाग प्रमुख

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा अति.आयुक्त सो. उपायुक्तसर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

मा.सभापती- — सर्व सन्माननीय सदस्य अधिकारीवर्ग छायाचित्रकार पत्रकार बांधव यांचे मी याठिकाणी प्रथमता स्वागत करतो आपण स्थायी समिती मार्फत मागील गुरुवारी सन 2020-21या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक सादर केले आपण त्यामध्ये या शहरासाठी अनेकविध उपायोजना व कार्यक्रमाबाबत तरतूद प्रस्तावित केली याबाबत मला अनेक ठिकाणाहून अनेक वर्गातून चांगल्या पद्धतीचे समाधानकारक प्रतिसाद मिळाला आपण सर्व स्थायी समिती सदस्यांच्या एकमताने या आर्थिक अंदाजपत्रकास मान्यता दिली त्याबद्दल प्रथम मी आपल्या सर्वांचे आभार व्यक्त करतो याठिकाणी पत्रकार बांधवांनी ही या अंदाजपत्रकास योग्य प्रकारे प्रसिद्धी देऊन क चांगले काम या शहरासाठी करू शकतो असा विश्वास सर्वाना दिलेला आहे या योजनांच्या अंमलबजावणी साठी आपण असेच एकत्रितरीत्या काम करणार आहोत आपण सर्वजण काम करू अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करतो मागे स्थायी समितीच्या बैठकीत अंदाजपत्रक बाबत माहिती देण्याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आदेशित करण्यात आलेले होते त्याप्रमाणे माहिती आली किंवा नाही सदर माहिती लेखापाल श्री. रनाळकर यांच्याकडे दिली असावी अशी माझी अपेक्षा आहे तथापि ज्यांनी माहिती दिली असेल व ज्यांनी कामात कुचराई केलेली आहे अशा कर्मचाऱ्यांना बाबत यांनी प्रशासनास माहिती द्यावी व त्या प्रमाणे प्रशासनाने यापुढे करणाऱ्या करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्रशासनामार्फत कार्यवाही करावी तसेच याबाबत त्यांच्या सेवा पुस्तकात नोंद घेण्याबाबत अतिरिक्त आयुक्त श्री गिरी साहेबांना यापूर्वी आदेशित केले होते त्याप्रमाणे ते कारवाई करतील अशी अपेक्षा मी याठिकाणी व्यक्त करतो व स्थायी समितीने दिलेल्या सूचनांचे प्रशासनाने अंमलबजावणी व पालन करावयाचे आहे असे मी या ठिकाणी आदेशित करतो नगरसचिव यांनी बैठकीच्या विषयांस सुरुवात करावी.

विषय क्रमांक:- ६३ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.(दि.१०/९/२०२०,१८/९/२०२०,२४/९/२०२०)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कमलेश देवरे — मागील स्थायी समितीच्या बैठकीत शहरातील ओपन प्लेस बाबत माहिती मागितली होती व अतिरिक्त आयुक्त असे गिरी साहेब यांनी याबाबत एक महिन्याच्या आत माहिती देतो असे आदेशित केले होते तथापि याबाबत अद्याप पावेतो कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही तसेच मनपाने कराराने जागा दिलेली आहेत त्याबाबतही माहिती मिळावी अशी अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करतो

म.सभापती — याबाबत मला आज सकाळीच श्री सोनार यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली आहे मी लवकरच सर्व सन्माननीय सदस्यांना सदर माहिती देण्याबाबत व्यवस्था करीत आहेत. मनपाच्या आर्थिक हिताचे विषय आपण वेळोवेळी मांडत आहात. आपल्या जागृतेबद्दल मी प्रथमत: आपले अभिनंदन करतो.

म.कमलेश देवरे — मनपाच्या अशा किती जागा आहेत व त्यावर अद्याप पावेतो सदर जागा नावावर लावण्याबाबत तसेच ज्या जागा करणे दिले आहेत त्या जागा ताब्यात घेण्याबाबत आपण काय कार्यवाही केली याबाबतची माहिती सभागृहात मिळावी अशी विनंती करतो

म.अमोल मासुळे — मनपाने कराराने जागा दिलेल्या आहेत यापैकी बरेच जागांची करार संपलेली आहेत त्यावर काय कार्यवाही केली याची माहिती मिळावी. या सर्व बाबीमुळे मनपाचे आर्थिक हित होणार आहे. त्यामुळे सदर प्रश्नावर तांतडीने कार्यवाही होणे महत्वाचे आहे.

म.नारायण सोनार — याबाबत मी सर्व माहिती एकत्रित केलेली असून मला पंधरा ते वीस दिवसांपूर्वी सर्व माहिती मिळालेली आहे त्याप्रमाणे मी माझ्याकडे उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे सर्व यादी आज सकाळी मा. सभापती सो.कडे सादर केलेली आहे सुमारे 550जागा मनपा मालकीच्या असून त्यावर नाव लावण्याची कार्यवाही सुरू आहे याबाबत मा. जिल्हाधिकारी मा. प्रांत सो. तसेच तहसीलदार यांना देखील वेळोवेळी पत्र दिलेले आहे व आजच याबाबत पुनश्च स्मरणपत्र देण्यात आलेले आहे तसेच मनपाने एकूण १९७ जागा कराराने दिलेले आहेत त्या जागा पैकी काही जागांचे करारनाम्याप्रमाणे मुदत संपुष्टात आलेली आहे अशा जागा ताब्यात देण्याबाबत कार्यवाही सुरू केली असून वकिलांमार्फत सदर जागांच्या मालकांना संस्थाचालकांना नोटीस देण्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात आले असून लवकरच या संदर्भात कायदेशीर मार्गदर्शन घेऊन कायदेशीररीत्या संबंधितांना नोटीस बजावल्या जातील. माझ्याकडे अन्य कर्मचारी नसल्याने मी कर्मचारी देणेबाबत मागणी केलेली आहे.

म. सभापती — संबंधित माहिती प्राप्त झालेली आहे याबाबत लवकरच प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही व कायदेशीर कार्यवाही सुरू केले आहे तथापि याबाबत गतीने पुढे अंमलबजावणी करावी असे मी याठिकाणी प्रशासनाला आदेशित करतो व संबंधित माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल.मी याबाबत स्वस्ता पाठपुरावा करणार असून नोटीस बजावण्यासाठी कर्मचा-यांची कमतरता असल्यास आपण सर्वजण नोटीस बजावण्यासाठी सहकार्य करु.श्री.सोनार यांना या कामासाठी कर्मचारी देणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. याबाबत अति.आयुक्त श्री. गिरी सो. यांनी प्रशासनामार्फत खुलासा करावा.

म. अति. आयुक्त — यासंदर्भात माहिती काढण्यांत आलेली असून मनपा मालकीच्या ओपन स्पेसला नांव लावण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.तसेच ज्या जागा कराराने दिलेल्या आहेत. त्यांना मनपा मार्फत नियमाप्रमाणे कायदेशीर मार्गदर्शन घेवून नोटीसा बजावण्याची कार्यवाही करण्यांत येत आहे.

म.कमलेश देवरे — मला खेदाने सांगावेसे वाटते की मी यापूर्वी वारंवार देवपूर भागात सुरू असलेल्या भूमिगत गटार योजनेच्या कामामुळे खराब झालेल्या रस्त्याविषयी दुरुस्ती करण्याची मागणी केलेली आहे तथापि अद्याप पावेतो संबंधित विभागामार्फत व ठेकेदारामार्फत कोणत्याही प्रकारची सुधारणा झालेली नाही त्यामुळे देवपूर परिसरातील परिस्थिती अत्यंत बिकट व गंभीर स्वरूपाची झालेली आहे अनेक अपघात होत असून नागरिकांना घराबाहेर पडणे मुश्कील झाले आहे सद्यस्थितीत दिवाळीचा सण जवळ येत आहे अशा परिस्थितीत सदरची बाब अत्यंत त्रासदायक व गंभीर स्वरूपाची असून याबाबत आपण तातडीने काहीतरी उपाय योजना कराव्यात अशी मी कळकळीची मागणी या निमित्ताने करीत आहे सदरचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत देण्यास आमचा या पूर्वीपासूनच विरोध होता मी त्या संदर्भात उच्च न्यायालयात देखील याचिका सादर केली होती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यापेक्षा आपल्या महानगरपालिकेकडे सक्षम कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे परंतु शासनाच्या धोरणामुळे निर्णयामुळे सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग झालेली आहे व आज धुळे शहरात नाहक त्रास भोगावा लागत आहे

म. सभापती — सन्माननीय सदस्य श्री कमलेश भाऊ आपणास माहीतच आहे आपण वेळोवेळी या संदर्भात बैठक घेऊन समक्ष पाहणी देखील केली आहे व संबंधित अधिका-यांना देखील आवश्यकता सूचना दिलेल्या आहेत त्याप्रमाणे त्यांची कार्यवाही त्यांनी सुरू केली असल्याचे कळवले होते याबाबत आपल्या धुळे शहराचे खासदार डॉ. सुभाष बाबा भामरे यांनी बैठक घेऊन संबंधित अधिका-यांना आदेशित केले आहे व त्यांनी केलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी आम्ही खासदार महोदय मार्फत लवकरच पुढील आठवड्यात

करणार आहोत या वेळेस देवपूर च्या सर्व भागातील नगरसेवकांनाही आम्ही बोलणार आहोत व कामाच्या प्रगतीबाबत समक्ष आढावा घेणार आहोत याबाबत अभियंता यांनी झालेल्या कार्यक्रमाची माहिती द्यावी.

म. अभियंता — याबाबत माहिती देतो की सदर कामाच्या दुरुस्तीबाबत यापूर्वी संबंधित विभागाचे अधिकारी व ठेकेदार यांच्या प्रत्यक्ष बैठका मान्य सोबती यांनी घेतलेल्या असून वेळोवेळी कामाची पाहणी केली आहे आता पावेतो 80 कि.मी. काम झालेले असून सुमारे13कि.मी. रस्त्यांचे दुरुस्तीचे काम करण्यांत आलेले आहे. तथापि कामाच्या गुणवत्तेत सुधारणा नसल्याने त्यांना आतापर्यंत २७ वेळा नोटिसा मनपा मार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देण्यात आलेल्या आहेत तथापि कामात सुधारणा नसल्याने मा. खासदार महोदयांनी सुद्धा याबाबत नाराजी व्यक्त करून सर्व संबंधित अधिकारी व ठेकेदार यांना कामात गतीने सुधारणा करण्याचे व काम एक महिन्याच्या आंत पूर्ण करण्यांचे बैठकीत आदेशित केले होते व त्यानुसार खासदार महोदय लवकरच पाहणी करणार आहेत.

म.सभापती — सन्माननीय सदस्य श्री कमलेश भाऊ आपल्या भावना अतिशय योग्य व कळकळीची आहेत सदरच्या कामावर आपण सर्वजण जागरूक राहून वेळोवेळी प्रयत्न करीत आहोत व याबाबत आपण प्रयत्नशील आहोतच सदरचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरू आहे यापूर्वी सर्वसामान्य नागरिकांना सदरचे काम महानगरपालिकांमार्फत होत आहे अशी कल्पना असल्याने नागरी समाजाचे वातावरण निर्माण झाले होते परंतु आता नागरिकांनाही याबाबत कल्पना आलेली आहे परंतु आपणही सर्व जण यासाठी प्रयत्नशील असून लवकरच या कामात सुधारणा व गती देण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७४ दिनांक २९/१०/२०२०

मागील स्थायी समिती सभा दिनांक १०/९/२०२० चे ठराव नंबर ६१ व सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दिनांक १८/९/२०२० रोजी चे ठराव नंबर ६२ ते ६६ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दिनांक २४/९/२०२० रोजीचे ठराव नंबर ६७ ते ७१ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६४ — मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यंत मंजुरी दिलेल्या कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर.
(दि.१४/०९/२०२० ते १५/१०/२०२०) अखेर

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती — मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु. ५ लाख ते २५ लाखापर्यंत मंजुरी दिलेल्या कार्यादेशाची (बांधकाम विभागाकडील) वाचून माहिती देण्यांत आली.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७५दिनांक २९/१०/२०२०

मा. आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु. ५ लाख ते २५ लाखापर्यंत मंजुरी दिलेल्या) धुळे महानगरपालिका बांधकाम विभागाकडून होत असलेल्या विकास कामासाठी दि. १४/०९/२०२० ते १५/१०/२०२० अखेर विकास कामांची निर्गमित केलेल्या कार्यादेशाची वाचून माहिती देण्यांत आली.

धुळे महानगरपालिका धुळे (बांधकाम विभाग)

दिनांक :- १४/०९/२०२० ते१५/१०/२०२० अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

अ.क्र.	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामाचे नाव	रक्कम	निधी
१	१५०	१४/०९/२०२०	प्रभाग क्र.१६ मध्ये चितोड रोड गवळीवाडा भागातील बागुल आर.सी.सी.गटार (बंदिस्त) करणे.	९,९८,६८५/-	मनपा निधी अंतर्गत
२	१५१	१४/०९/२०२०	प्रभाग क्र.१६ मध्ये बेडु माता परिसरात काँक्रीट रस्ता व गटार करणे.	१०,२८,०७८/-	मनपा निधी अंतर्गत
३	१५७	०६/१०/२०२०	प्र.क्र.४ मधील अक्षर हाउस ते आर एस.एस. कार्यालय पावेतो रस्ता काँक्रीट करणे.	२०,८४,८३०/-	मनपा निधी अंतर्गत (रस्ता दुरुस्ती)
४	१५८	०६/१०/२०२०	प्र.क्र.४ मधील भिडेबाग परिसरात श्री.देशपांडे यांच्या घरापासून ते श्री.उपासने यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	९,५८,३९९/-	मनपा निधी अंतर्गत
५	१५९	०७/१०/२०२०	प्र.क्र.९ मधील कोटेचा क्लास ते पोलीस चौकी पर्यंतचा रस्ता काँक्रीट करणे.	२४,९९,०८३/-	सर्वसाधारण रस्ता अनुदान
६	१६०	०७/१०/२०२०	प्र.क्र.९ मधील सुभाष नगर ग.नं.९ महादू वाणी ते प्रदीप भामरे यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	२४,९८,४९४/-	सर्वसाधारण रस्ता अनुदान
७	१६१	०७/१०/२०२०	प्र.क्र.१० गाव दरवाजा ते विजय व्यायाम शाळा ते मोहन चौधरी यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	२४,९८,३२०/-	सर्वसाधारण रस्ता अनुदान
८	१६९	१२/१०/२०२०	प्र.क्र.७ साक्री रोड जवळील बिस्कीट कंपनी पासून ते कुमार नगर पुलापावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	२४,९५,९९५/-	आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत
९	१७०	१२/१०/२०२०	प्र.क्र.७ मिलिंद हौसिंग सोसा.भागात १० सीट सार्व.शौचालय बांधणे.	१८,२७,१६७/-	आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६५ शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत महानगरपालिका आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार नियुक्ती करणेबाबत कार्यवाही करण्यांत येत असून याबाबतचा अहवाल अवलोकनार्थ मे.स्थायी समिती समोर सादर.

म. नगरसचिव याबाबत मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की सदर प्रस्ताव आस्थापना विभागामार्फत स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर झालेला आहे सदर प्रस्तावात सदर भरती प्रक्रियेत दिव्यांगाचे आरक्षण नमूद करणे गरजेचे असल्याने सदर प्रक्रिया पुन्हा नव्याने राबविण्यात येणार आहे त्यासाठी प्रशासनामार्फत सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत मला पत्रान्वये अवगत करण्यात आलेले आहे त्यानुसार सदर बाब स्वभावाचे निदर्शनास आणून देण्यात येत आहे

म. सभापती प्रशासनाच्या आलेल्या पत्रानुसार सदरप्रस्तावाबाबत प्रशासनाने नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही व पुर्तता करुन पुनश्च प्रस्ताव सादर करावा.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७६ दिनांक २९/१०/२०२०

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत महानगरपालिका आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार नियुक्ती करणेबाबत कार्यवाही करण्यांत येत असून याबाबतचा अहवाल अवलोकनार्थ मे. स्थायी समिती समोर सादर करण्यांत आला असता प्रशासनाच्या आलेल्या पत्रानुसार सदरप्रस्तावाबाबत प्रशासनाने नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही व पुर्तता करुन पुनश्च प्रस्ताव सादर करावा.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६६ धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील वाहन क्र.एम.एच. १८ जी. १००७ जेसीबी वाहनांची वाढीव दुरूस्ती खर्च रक्कम ₹.७२,७८१/- खर्चास अनुसूची ड प्रकरण ५(२)(२) नुसार मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सभापती- सदर प्रस्तावात जे.सी.बी. दुरुस्तीसाठीचा खर्च 73,781 मात्र दर्शवलेला आहे नवीन जेसीबी चा खर्च आहे का जुन्या जेसीबी चा खर्च आहे व याबाबत सविस्तर अहवाल सभागृहात सादर करावा.

म.राऊत सदर जे.सी.बी. हे जुने असून सुमारे 12 वर्षापूर्वी खरेदी केलेले आहे. या स्वरुपाचे एकच मशिन असून त्यांच्या वाढीव कामाचे दुरुस्तीचे बील मान्यतेसाठी सादर केलेले आहे. धुळे जिल्हयांत हे एकमेव मशिन आहे. सदरची दुरुस्ती कंपनीचे अधिकृत डिलर यांच्याकडून केलेली आहे.

म. अमोल मासुळे सदर दुरुस्तीसाठी वार्षिक खर्च किती येतो.सदर दुरुस्ती वारंवार करण्यांत येते. आतापर्यत किती खर्च झालेला आहे.

म. राऊत सदर जे.सी.बी. मशिनच्या दुरुस्तीसाठी आतापर्यंत सुमारे 15 लाख खर्च झालेला आहे. याबाबतची नोंद मनपाच्या नोंदवहीत घेण्यांत आलेली आहे.यात विविध प्रकारची दुरुस्तीची कामे समाविष्ट आहे.

म. सभापती आपले काम योग्य असल्याबाबत मी माहिती घेतलेली आहे. तथापि याबाबत अधिक जागृकतेने आपण मनपा आर्थिक हितासाठी प्रयत्न करावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्ष यांचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७७ दिनांक २९/१०/२०२०

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील जेसीबी वाहन क्र.एम. एच.१८ जी. १००७ नादुरूस्त बाबत मेकॅनिक यांनी अहवाल सादर केला होता. त्यानुसार दरपत्रक मागविणेत येऊन एल-I दरपत्रक (₹.२७४०८२/-) मात्रच्या खर्चास पुरवठा धारक यांना जा.क्र./ धुमपा/ बावि/१४ दि.२७/०४/२०२० नुसार वाहन विभागाकडुन सुयान इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. धुळे जेसीबी मशिन अधिकृत वितरक यांच्या कडेस दुरूस्ती कामे सुरू आहे. परंतु दुरूस्ती कामे करीत असताना मेकॅनिक यांचे अहवालानुसार अधिकृत वितरक यांचे कडील इस्टिमेट पाहता खालील प्रमाणे दुरूस्ती करावी लागणार आहे. त्यास वाढीव खर्च ₹.७२,७८१/- मात्र खर्च येणार आहे.व त्यास म.आयुक्त सो यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ खंड (क तरतुदीनुसार ₹.२५ लक्ष पर्यंतचा संविदा करणेचे अधिकार बनविण्याचा अधिकार आहे. परंतु संविदेची माहिती म.स्थायी समिती कडेस सादर करणे बंधरकारक आहे. त्यानुसार सदर संविदा मे.स्थायी समिती कडेस अवलोकनार्थ सादर करण्यांत येत आहे.

महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम ७२ खंड(क) मधील तरतुद नुसार सदर खर्च रूपये ₹.७२,७८१/-मात्रला मा.आयुक्त सो.यांना मंजुरीचे अधिकार आहेत. सदर मशिन वरील वाढीव दुरूस्ती रक्कम ₹.७२,७८१/- खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात आली आहे. व दरपत्रक मागवुन करण्यातआलेला खर्च ₹.२,७४,०८२/-व वाढीव खर्च ₹.७२,७८१/- मात्रच्या खर्चास मे.स्थायी समिती कडेस ७२ खंड (क) अधिन राहुन अनुसूची ड प्रकरण ५ नियम २ पोटनियम २ नुसार अवलोकणार्थ व मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्ष यांचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर ,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६७ धुळे म.न.पा कडील मालमत्ता कराची थकबाकी खटला राष्ट्रीय लोक अदालत आयोजनासाठी झालेला खर्च रु.६०,९००/-मात्रला कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखा परीक्षकाचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७८ दिनांक २९/१०/२०२०

धुळे महानगरपालिका मालमत्ता कर विभागाकडील थकबाकी कर संदर्भात धुळे मनपा व जिल्हा न्यायालय यांचे संयुक्तीने दि.८/२/२०२० रोजी राष्ट्रीय लोक अदालत भरविणे करीता म आयुक्त सो यांनी सुचित केले आहे.

तरी सदरचे नियोजन मध्ये मंडप, नाश्ता, जेवण असे नियोजन करणे करीता मालमत्ता कर विभाग प्रमुख यांनी लेखी मागणी पत्र म उपायुक्त सो यांचे मान्यतेने भांडार विभागाकडेस मागणी पत्र सादर केलेले आहे.

सदरचे नियोजन संदर्भात म उपायुक्त सो यांचे सुचनेनुसार तातडीने असल्याने त्वरीत साहित्य उपलब्ध करून दयावे लागणार असुन सदर चे नियोजन स्थानिक सेवा धारक विष्णु भिकाचंद पांडे (हलवाई विष्णु महाराज) धुळे यांचे कडुन करुन घेवुन म.स्थायी समिती पुढे कार्योत्तर मंजुरी घेवून बिल अदा करणेत येईल या चर्चे अंती काम करून घेण्यात आले आहे.

तरी सदरचे सेवा धारक यांनी खालीलप्रमाणे काम करून दिलेले असून त्यांचे कडील बिल प्रमाणे दिलेले असुन सेवा धारक यांना जीएसटी नंबर लागु नसल्याने त्यांनी खालीलप्रामणे खर्च दर्शविलेला आहे.

अं.क्र.	साहित्य तपशिल	नग	विष्णु महाराज	एकुण खर्च रु.
१	मंडप ४५×३० व १५×३० कनात ३०×१५तसेच खुर्ची, टेबल	बिला प्रमाणे	१२,४००/-	१२,४००
२	**नाश्ता,**आलुवडा,समोसा,पोहे,जलेबी / चहा	२५० नग	५०	१२,५००
३	**जेवण,**गुलाब जामुन, मटर पनिर, मिक्स व्हेज, चपाती,दालफ्राय,जिराराईस,पापड,आचार सलाड,	३०० नग	११०	३३,०००
४	चहा	३००	१०	३,०००
एकूण खर्च रूपये				६०,९००

तरी वरील प्रमाणे काम करून घेण्यात आले नुसार जीएसटी व इतर करासहित एकुण खर्च रू.**६०,९००/-**मात्र करणेत आलेला आहे तरी सदरचे बिल अदा करणेस महानगरपालिका अधिनियम ५(२)२अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत मे.स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्ष यांचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रुपये ६०,९००/-मात्रला मनपा अधिनियम प्रकरण ५ (२)(२) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ६८ म.न.पाकोविड 19 केअर सेंटर अजमेरा आयुर्वेदमहाविद्यालय येथे विद्युत संच मांडणीची व्यवस्था करणे कामी झालेला खर्च रुपये६६,२०४/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सुनिल सोनार विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखा परीक्षकाचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७९ दिनांक २९/१०/२०२०

म.जिल्हाधिकारी सो यांच्या आदेशाने म.न.पा **covid-१९** केअर सेंटर अजमेरा आयुर्वेद महाविद्यालय येथे तयार करण्यात आले.कार्यालयीन आदेश कार्यालयीन आदेश:जा.क्र.धूमपा /आस्था /1926दि.24/06/2020 नुसार**covid-१९** केअर सेंटर शासकीय तंत्रनिकेतन येथील विद्युत जबाबदारीचे आदेश प्राप्त आहे.दि.22/07/2020 म.उपायुक्त आणि म.वैद्यकीय अधिकारी, म. अभियंता मनपा धुळे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी कोरोनाकेअर सेंटर मध्ये फॅन ,ट्यूबलाइट, वायरिंग बोर्ड इत्यादी व्यवस्था करणे आवश्यक आहे सदर काम तात्काळ करणे गरजेचे आहे.

तरी विद्युत विभाग आदेश जा.क्र धूमपा 65/ दि.30/07/2020 च्या अभियंता म.न.पा यांच्या आदेशाने शासनदरसूची201 /विद्युत/.बा.सा/81-9 नुसार सदर म.न.पा कोविड **१९** केअर सेंटर अजमेरा आयुर्वेद महाविद्यालय येथे विद्युत संच मांडणीची व्यवस्था करणे मे,आकाश इंटरप्राईजेस ,धुळे.यांचेकडून विनानिविदा करणे करून घेण्यात आलेले आहे.

तरी सदरच्या कामास अंदाजपत्रकीय खर्च **रु.66,204/-**मात्र आलेला सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम 67 (क) विनानिविदा करण्यात मंजुरीसाठी व खर्चास कार्यात्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्ष यांचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून सदर कामी झालेला खर्च **रु.66,204/-**मात्र आलेला सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम 67 (क) विनानिविदा करण्यात मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ६९ धुळे मनपा प्रभाग क्रं.१४ मध्ये विठ्ठलनगर भागात ४ इंची पिण्याची पाईप लाईन तांतडीने टाकण्यांतआली त्यासाठी झालेला खर्च रु.३,३८,७१९/- मात्रला महाराष्ट्र मनपा अधिनियमातील प्रकरण ५(२) (२)नुसार कायोत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. युवराज पाटील विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखा परीक्षकाचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८० दिनांक २९/१०/२०२०

धुळे मनपा हद्दीतील प्र.क्र. १४ मधील विठ्ठल नगर भागात मुख्य डी.पी. रस्त्यापासून असलेल्या जलवाहिनी पासून पिण्याच्या पाईप लाईन नसल्यामुळे तेथील नागरिकांना पाणी पुरवठा करणे आवाहन असल्याने मुख्य जलवाहिनी विठ्ठल नगर पावेतो ४" पाईप लाईन टाकणे गरजेचे असल्याने पाईप लाईन टाकणेत आली तसेच पश्चिम हुडको भागात पाणी वितरणाचे दोन भाग करणे

गरजेचे असल्याने १०" नळ कनेक्शन टाकणेत आलेले आहे तसेच राजवाडे नगर भागात दुषित पाणीपुरवठा होत असल्याने ६" पाईप लाईन टाकणेत आली. तरी वरील सर्व काम पाणीपुरवठा दृष्टीने गरजेचे असल्याने सदर काम करण्यात आलेली आहे. तरी उक्त कामी रु.३,३८,७१९/- मात्र खर्च येणार आहे.तरी सदरचे काम हे नागरिकांचा पिण्याचा पाण्याच्या प्रश्न लक्षात घेता सदर काम करणे आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा श्री. संजय दगडू गायकवाड, ठेकेदार यांचे कडून करून घेणेत आलेले आहे. सदर कामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.३,३८,७१९/- मात्र आलेला आहे.

तरी सदर काम विना निविदा करणे कामी तसेच काम करणे कामी आलेला रु.३,३८,७१९/- मात्र खर्चास मनपा अधिनियम १९४९ चा प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रुपये ३,३८,७१९/- मात्रला मनपा अधिनियम प्रकरण ५ (२)(२) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ७०

मनपा निधी १९-२० अंतर्गत धुळे मनपाच्या सर्व पा.पु. केंद्रावरील मोटर्स, पंपसेट, स्वीच गिअर, ई. ची दुरुस्ती करणेकरिता दोन वर्षाकरिता वार्षिक निविदा दर (आयटेम दर) मागविणेत आले त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सभापती — या प्रस्तावासंदर्भात प्रशासनामार्फत खुलासा करण्यांत यावा की जे दर आलेले आहेत ते दर प्रत्येक ॲटमनुसार वेगळे आहेत का आणि ते कायम राहणार आहेत का?

म. विद्युत अभियंता — या निविदेमध्ये जे दर आलेले आहे ते ॲटमेनुसार असून ते दोन वर्षासाठी कायम राहणार आहेत. त्यात कोणतीही वाढ होणार नाही.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षकाचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून आलेल्या निविदा दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८१ दिनांक २९/१०/२०२०

मनपा निधी १९-२० अंतर्गत धुळे मनपा पा.पु.केंद्र येथील मोटर्स,पंपसेट,स्वीच गिअर,ई.ची दोन वर्षाकरिता वार्षिक निविदा दर मागविणेबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावान्वये रक्कम **रु.५२,२४,३३३/-** मात्र प्रति वार्षिक खर्चास आर्थिक व **प्रशासकीय मंजुरी** देणेत आली आहे.

उक्त बाबत म.जी.प्रा. धुळे/ म.जी.प्रा. मंडळ नाशिक/ **शहर अभियंता मनपा धुळे** /कार्यकारी अभियंता महावितरण यांचे **पत्र क्र.५११.दि.१३-३-२०२०** अन्वये रक्कम **रु.५२,२४,३३३/-**मात्र खर्चास **तांत्रिक मंजुरी** मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका **जा.क्र./विवि/पापु/२८१. दि.२९-४-२०२०** अन्वये व **दि.३०-४-२०२०** च्या **दै.पुण्यनगरी/राजरंग टाईम्स** किंवा धुळे महानगपालिका / महाराष्ट्र शासनाच्यावेबसाईट www.dhulecorporation.org / www.mahatender.gov.in वर खुल्या ई-निविदा/कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून **दि.११-२-२०२०** रोजी निविदा मागविणेत

आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र	कंत्राटदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.पंडित इलेक्ट्रिकल्स,धुळे	सर्वात कमी दराने (आयटम नुसार)	L१
२	मे.ओम श्री मंगलमूर्ती इले.नाशिक		
३	मे.तुळजाई Enterprizes,मालेगाव		
	मे.बडगुजर & कंपनी,नाशिक		

करिता ठेकेदार **मे.पंडित इलेक्ट्रिकल्स,धुळे** यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

(२) धुळे महानगरपालिका, धुळेचे तापी पाणी पुरवठा केंद्र वगळता धुळे शहरातील 1 ते13 पाणीपूरवठा केंद्र व हद्दवाढ 10 गावातील सार्वजनिक पाणी पुरवठा व्यवस्थेचे विविध दुरूस्ती कामे करणेकरीता मागविणेत आलेल्या ई निविदा पध्दतीने प्राप्त आयटेम रेट दरात मे.पंडीत इलेक्ट्रिकल्स यांचे दर एल-1 आहेत.

सदरील सर्व धुळे शहर पाणी पुरवठा केंद्रावरील वेळोवेळी करावयाच्या दुरूस्ती कामांसाठी अंदाजपत्रकीय 168 बाबीकरीता आयटेम रेट मागविणेत आलेत. प्राप्त एल.1 निविदा दर मे.पंडीत इलेक्ट्रिकल्स यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहेत.सदरील अंदाजपत्रकीय दर सर 2018-19 चे दरसुची प्रमाणे आहेत. सदरील दर सद्यास्थितीत सन 2020-21 प्रमाणे 2 वर्षापुर्वीचे आहेत. तसेच मक्तेदारास सदर दराप्रमाणे दोन वर्ष मुदतीपर्यंत काम करावयाचे आहे. मक्तेदारास कुठलीही दरवाढ मिळणार नाही. करीता दोन वर्ष मुदतीकरीता ई निविदा प्राप्त एल-1 यांचे दर अंदाजपत्रकीय दराने योग्य व उचित असल्याने दर मान्यतेस म.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षकाचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून आलेले एल.१ निविदाधारक श्री.पंडील इलेक्ट्रीकल्स, धुळे यांच्या प्राप्त निविदा दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ७१ धुळे मनपा हद्दीत मनपा निधी अंतर्गत वलवाडी भागातील मालमत्ता क्र.६०७ येथे समाज भवन बांधणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. संतोष खताळ विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षकाचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून आलेल्या निविदा दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८२ दिनांक २९/१०/२०२०

धुळे मनपा हद्दीत मनपा निधी अंतर्गत वलवाडी भागातील मालमत्ता क्र. ६०७ येथे समाज भवन बांधणे. कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.३ दि.२७/०२/२०२० मा.आयुक्त सो. धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.२८/०१/२०२० अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३१,८५,७६४/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.४९२ दि.०३/०३/२०२० अन्वये रक्कम रु.२८,३७,७७९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./२४/२०२० दि.२५/०६/२०२० अन्वये दि.२५/०६/२०२०रोजी दैनिक दिव्य मराठी/ पथयात्री या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१३/०७/२०२० रोजी अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	चेअ.गौरव मजूर स.सो.लि.निशाने	शे.३.००% जास्तीने	
२	कृषभ सतिष खिवसरा	शे.१.००% जास्तीने	
३	एकविरा कन्सट्रक्शन	**अंदाजपत्रकीय दराने**	**सर्वात कमी दर**

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांनी दि.०८/१०/२०२० रोजी दिलेल्या पत्रात शे.०.९९% कमी दराने काम करण्यास सहमती दर्शवलेली आहे. तरी **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांच्या शे.०.९९% कमी दरास मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षकाचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून **मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे आलेले** निविदा दर०.९९% कमीने या दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ७२ १४ व्या वित्त आयोग अंतर्गत धुळे शहरातील सार्वजनिक शौचालयांचे एकुण १४४ युनिट पैकी ८१ युनिट दुरुस्ती करणे कामी येणारा खर्च रु.१,७१,६०,५९५/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन पूर्व मंजुरीसाठी प्रस्ताव म.जिल्हाधिकारी यांचेकडेस सादर करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सभापती सदरचा प्रस्ताव म.जिल्हाधिकारी यांचेकडेस सादर होणार आहे.यांत हद्दवाढीतील ११ गावामधील शौचालयांचा समावेश करण्यांत आलेला आहे का? किंवा आपण प्रस्तावात करु शकतो का?

म. अभियंता या प्रस्तावात शहरातील दुरुस्ती करावयाचे शौचालयांचा समावेश आहे. हद्दवाढीतील गावामधील शौचालयांचा समावेश नाही.हद्दवाढीतील कामांचा प्रस्ताव आपण दुस-या टप्प्यामध्ये समावेश करुन सादर करणार आहोत.

म. अमोल मासुळे सभापती महोदय, सदर शौचालयांच्या दुरुस्तीसाठी वारंवार खर्च करावा लागतो यासाठी ज्या संस्थेस कार्यादेश देण्यांत येईल त्या संस्थेने किमान ५ वर्ष सदर शौचालयांच्या देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहील त्यांचा कोणत्याही मोबदला संस्थेस मिळणार नाही. या सर्व बाबींचा समावेश निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती मध्ये करावा.

म. भारतीताई माळी सदर शौचालयांचे काम योग्य रितीने व्हावे यासाठी शौचालय देखभाल दुरुस्तीच्या कामाचा अनुभव असणा-या संस्थांना निविदा प्रक्रियेत प्राधान्य देण्यांत यावे. व सदर संस्थेस कामाचा अनुभव आहे किंवा नाही याबाबत खातर जमा करावी.

म.सभापती सदर प्रस्तावास सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.तसेच सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचनानुसार याकामासाठी सद्यस्थितीत ज्या संस्था शौचालय देखभाल दुरुस्तीचे काम करीत आहे अशा संस्थाना दुरुस्ती कामासाठी प्राधान्य देण्यांत यावे. व प्रस्तावात नमूद युनिट प्रमाणे स्वतंत्र ई निविदा प्रसिध्द करावी. तसेच याकामासाठी निविदा प्रक्रिया राबवितांना सदर संस्थेस कामाचा अनुभव आहे किंवा नाही याची

खातर जमा करावी. तसेच ज्या संस्थेस कार्यादेश देण्यांत येईल त्या संस्थेने किमान ५ वर्ष सदर शौचालयांच्या देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहील त्यांचा कोणत्याही मोबदला संस्थेस मिळणार नाही. या सर्व बाबींचा समावेश निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती मध्ये करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८३ दिनांक २९/१०/२०२०

म.आयुक्त सो.,यांच्या दालनात झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे या कामाबाबत १४ व्या वित्त आयोग अंतर्गत असलेले सर्व शासन निर्णय पाहता महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.एफ. एफ.सी.-८०१५ /प्र.क्र. १०६/ नवि-४, मंत्रालय मुंबई दि. ०२/०३/२०१७ च्या शासन निर्णया नुसार १४ व्या वित्त आयोगाच्या मुलभूत अनुदानातील किमान ५०% शौचालय, घनकचऱ्याचे संकलन यावर खर्च करणे अनिवार्य आहे. ५०% च्या मर्यादेत मुलभूत अनुदानातून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत हगणदारी मुक्त झालेल्या ठिकाणाच्या (ODF),सौंदर्यीकरण करणे व शहर हागणदारीमुक्त होणास मदत होईल अशा शौचालयाची दुरुस्तीची कामे करण्यासाठी म.जिल्हाधिकारी यांचा पूर्व मान्यतेने खर्च करण्यात येतील.

त्याप्रमाणे लेखा विभागात १४ व्या वित्त आयोग अंतर्गत प्राप्त निधी रु.१,४८,६०,२३,४१७/- मात्रच्या ५०% प्रमाणे रु.७४,३०,११,७१०/- मात्रच्या रक्कमेत आजपर्यंत झालेला खर्च वजा जाता लेखा विभागाकडील माहिती नुसार रु.५५.०० कोटी मात्र शिल्लक आहे. शिल्लक रक्कमेतून धुळे शहर हद्दीमधील शौचालय १४४ युनिट पैकी८१ युनिट(१०३५ सिट) नादुरुस्त झालेले आहे. सदर शौचालय दुरुस्ती करणे आवश्यक आहे.यासाठी एकुण रु.१,७१,६०,५९५/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.यातअ)५१ युनिटसाठी रु.८८,०३,३६९/- ब) ३० युनिटसाठी रु.८३,५७,२२६/- असे एकुण रु.१,७१,६०,५९५/- मात्रच्या कामाचे दोन स्वतंत्र ई निविदा प्रसिध्द करावयाची आहे. सदरअंदाजपत्रकात दर्शविलेल्या रक्कमेतून वाढ घट होवू शकते.त्याकरिता म. जिल्हाधिकारी यांचे कडे पूर्व परवानगी घेणे आवश्यक असल्याने सदरचा विषय प्रशासकीय मंजुरीसाठी मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सदर प्रस्तावास सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून तात्काळ प्रस्ताव आवश्यक त्या मान्यतेसाठी म. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रशासनामार्फत सादर करावा.

याकामासाठी सद्यस्थितीत ज्या संस्था शौचालय देखभाल दुरुस्तीचे काम करीत आहे अशा संस्थाना दुरुस्ती कामासाठी प्राधान्य देण्यांत यावे.व प्रस्तावात नमूद युनिट प्रमाणे स्वतंत्र ई निविदा प्रसिध्द करावी. तसेच याकामासाठी निविदा प्रक्रिया राबवितांना सदर संस्थेस कामाचा अनुभव आहे किंवा नाही याची खातर जमा करावी. तसेच ज्या संस्थेस कार्यादेश देण्यांत येईल त्या संस्थेने किमान ५ वर्ष सदर शौचालयांच्या देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहील त्यांचा कोणत्याही मोबदला संस्थेस मिळणार नाही. या सर्व बाबींचा समावेश निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती मध्ये करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ७३ दैनंदिन बाजार फी न भरणा-या पथ विक्रेत्यांवर दंड आकारणी व कार्यपध्दती ठरविणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सभापती सदर प्रस्ताव संदर्भात आपण नेमकी काय कारवाई करणार आहात व कशा पद्धतीने करणार आहोत याबाबत सविस्तर खुलासा सभागृहापुढे सादर करावा

म.किशोर सुडके आपल्याकडे दैनंदिन बाजार फी वसुली महानगरपालिका कर्मचाऱ्यांना मार्फत करण्यात येते परंतु आपल्याकडे कर्मचारी कमी असल्याने सन २०१८ १९ मध्ये दोन वेळा बाजार फी वसूल बाबत ठेका

काढण्यात आला त्यासाठी स्थायी समितीने देकार रक्कम निश्चित केलेली होती परंतु निविदा कोणीही भरली नाही मनपाच्या उत्पन्नवाढीसाठी आपण आता दहा रुपये फी वरून पंधरा रुपये केलेली आहे तथापि पथविक्रेते वेळोवेळी फी भरत नसल्याने त्यांच्यावर पाचपट दंडात्मक कार्यवाही निश्चित करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे दर व कर ठरवण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे त्यानुसार प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे

म. सुनिल सोनार — सद्यस्थितीत दैनंदिन बाजार फी वसुली कोणामार्फत केली जाते.

म. किशोर सुडके — सद्यस्थिती आपण मनपा कर्मचाऱ्यांकडून दैनंदिन बाजार फी वसूल करतो त्यासाठी चार कर्मचारी नियुक्त केलेले आहेत

म. सुनिल सोनार — सदर कर्मचाऱ्यांकडून०संपूर्ण शहर कव्हर होते का व त्यांच्याकडून योग्यप्रकारे रक्कम वसुली होते का सदर कर्मचारी कामात कुचराई करतात त्यांच्या बदल्या करण्यात याव्या सद्यस्थितीत आग्रारोड लाच सुमारे पाचशे गाड्या उभ्या आहेत त्यांच्याकडून फी नियमाप्रमाणे वसूल केली तर मनपाचे उत्पन्न वाढेल

म. सभापती — सद्यस्थितीत आपल्या कर्मचाऱ्यांकडून दैनंदिन बाजार फी किती वसूल होते

म. किशोर सुडके — यापूर्वी आपण रोज दैनंदिन बाजार फीचा भरणा स्वीकारत होतो परंतु मध्यंतरात कोरोनामुळे लॉकडाऊनची परिस्थिती निर्माण झाल्याने ही कार्यवाही बंद होती आपण आता सोमवारपासून रोज भरणा घेणारआहोत कमी फी वसुलीबाबत कर्मचाऱ्यांना यापूर्वी नोटिसा काढलेल्या होत्या परंतु लॉकडाऊन परिस्थितीमुळे पथक विक्रेते फी भरण्यास टाळाटाळ करतात नकार देतात अशाप्रकारची लेखी उत्तरे संबंधित कर्मचा-यांकडून प्राप्त झालेली आहेत त्यामुळे बाजार विभाग अतिक्रमण पथकामार्फत फेरी विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही केल्यास दैनंदिन बाजार फीच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते

म.सभापती — आपण यापूर्वी निविदा काढलेली आहे निविदेमध्ये निश्चित केलेली रक्कम प्रत्यक्षात वसूल होणारी रक्कम यात मोठ्या प्रमाणावर तफावत आहे त्यामुळे कोणीही निविदा भरत नाही या रकमेच्या निश्चितीबाबत व रक्कम किती घ्यावी याबाबत आपण काही पडताळणी किंवा तपासणी केली का त्याबाबत आपण काय कार्यवाही केली

म.किशोर सुडके — यासंदर्भात कार्यालयीन टिपणी सादर केलेली आहे त्यात चार पर्याय सुचवले आहेत शहराचे तीन भाग करावे मासिक फी वसूल करावी व त्याप्रमाणे नव्याने निविदा काढावी किंवा स्थायी समिती कडून निविदा रक्कम निश्चित करावी असे पर्याय आहेत याबाबत पुढील कार्यवाही सुरू आहे

म. सुनिल सोनार — सद्यस्थितीत रोजचा भरणा किती येतो शहरात सद्यस्थितीतपथ्य विक्रेत्यांचीसंख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे अशा परिस्थितीत रोज आपण किती वसूल करतो

म.किशोर सुडके — सद्यस्थितीत साप्ताहिक तीस ते पस्तीस हजार रुपये भरणा येत आहे

म. सुनिल सोनार — सदर बाब अत्यंत गंभीर आहे पथ विक्रेत्यांची संख्या लक्षात घेता दैनंदिन तीस ते पस्तीस हजार रुपये भरणा वसूल होऊ शकतो

म.अमोल मासुळे — सदर बाब अत्यंत गंभीर आहे आम्ही सर्व सदस्य मिळून एका दिवसात ३० ते ३५ हजार रुपये गोळा करू शकतो आम्ही चार नगरसेवक शहरात फिरतो व एका दिवसात जास्तीत जास्त भरणा करण्यासाठी प्रयत्न करु महानगरपालिकांमार्फत प्रशासनामार्फत सुरू असलेली कार्यवाही अत्यंत हलगर्जीपणा ची आहे

म. सभापती — आता आपण निविदा काढली त्याची रक्कम किती निश्चित केली होती

म.किशोर सुडके — ५८ लाख रुपये देकार रक्कम निश्चित होती

म. सभापती — सद्यस्थितीला भरणा लक्षात घेता एवढ्या मोठ्या प्रमाणावर निश्चित केलेली देकार रक्कम प्रशासनाला अपेक्षित आहे का व ती रक्कम येऊ शकते का

म.किशोर सुडके — आपण यापूर्वी दहा रुपये प्रमाणे फी वसूल करत होतो परंतु आपण मागेच पंधरा रुपये दैनंदिन बाजार फी निश्चित केलेली आहे त्याप्रमाणे आपण रक्कम निश्चित केलेली होती

म. सभापती — यासंदर्भात सूचित करू इच्छितो की येणारा दैनंदिन वसूल फारच कमी प्रमाणात आहेत जे कर्मचारी सद्यस्थितीत वसुली करत आहेत त्यांच्या बदल्या करा तसेच धुळे शहराचे चार भाग करा. वर्षाचा हिशोब न करता एक किंवा दोन महिन्यांचे उत्पन्न गृहीत धरून निविदा रक्कम निश्चित करा निश्चित झालेली रक्कम सुरक्षा म्हणून निविदा धारकाकडून जमा करा या प्रमाणे आपण कार्यवाही केल्यास जास्तीत जास्त भरणा आपल्याला मिळू शकतो आता पाचपट दंडाची शिफारस प्रशासनामार्फत केलेली आहे परंतु दंडात्मक कारवाई करताना व्देष बुद्धी व जबरदस्ती करून वसूल करू नये पथ विक्रेते हे धुळे शहराचे नागरिक आहेत जर वसुली करताना अडचण येत असेल तर पोलिस प्रशासनाची मदत घ्या दोन-तीन जणांवर कारवाई करा म्हणजे अन्य पथविक्रेत्यांना जरब बसेल व त्याप्रमाणे ते दैनंदिन बाजार फी जमा करतील याबाबत उपायुक्त श्री गोसावी साहेब यांची मदत घ्या ज्या कर्मचा-याबाबत वसूली संदर्भात तक्रार असेल त्यांचा लेखी अहवाल आयुक्त साहेब यांच्याकडे सादर करा व जे कामात कुचराई करतील त्यांच्यावर कारवाई करा

म.अमोल मासुळे — हा विषय फार गंभीर आहे आपण याबाबत सविस्तर माहिती प्रशासनाकडून घ्यावी प्रशासनानेही याबाबत नीट अभ्यास करून सविस्तर अहवाल स्थायी समितीपुढे ठेवावा तोपावेतो सदर विषय तहकूब ठेवावा

म. सुनिल सोनार — सविस्तर माहिती द्या तोपर्यंत विषय तहकूब ठेवावा.

म. सभापती — याबाबत सदस्य व प्रशासनाची बैठक घेऊन या विषयाबाबत धोरण निश्चित करण्यात येईल व तोपावेतो हा विषय तर तहकूब ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८४ दिनांक २९/१०/२०२०

धुळे महानगरपालिका बाजार विभागात दैनंदिन बाजार फी वसुली करिता (११ गावे हद्दवाढ क्षेत्रासह)अपूर्ण कर्मचारी संख्या असल्याने चालू वर्षी २ वेळा निविदा काढून कोणीही भरलेली नाही.

दैनंदिन बाजार फी वसुली कर्मचा-यांना वेळोवेळी वसुलीचे उद्दिष्टये देण्यांत आलेली आहे. तसेच दंडाची शिफारस केलेली आहे. मात्र कोरोना परिस्थिती, काही ठिकाणही पथविक्रेत्यांची दादागिरी अशी कारणे सांगितली जातात.

तरी उत्पन्न वाढीसाठी धुळे मनपा दै.बाजार फी कराची पावती न घेणा-या पथविक्रेत्यांना देखील पावती रकमेच्या ५ पट दंड आकारणीह करणेस व पावती तपासणीहचे व दंड वसुलीचे अधिकार बाजार विभागासह अतिक्रमण विभागाला देखील देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे ठेवणेबाबत म.आयुक्त सो. यांनी दि. २०१०/२०२० रोजीच्या टिपणीने मंजुरी दिली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३३२ नुसार सदरचा विषय मंजुरी साठी मे. स्थायी समितीपुढ सादर झाला असता सर्व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षांत घेता याबाबत सदस्य व प्रशासनाची बैठक घेऊन या विषयाबाबत धोरण निश्चित करण्यात येईल व तोपावेतो हा विषय तर तहकूब ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ७४ — प्रभाग क्रं. १४ मधील विशालनगर भागातील रस्ते डांबरीकरण करणेसाठी रु.२९,९६,०९४/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखा परीक्षकाचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८५ दिनांक २९/१०/२०२०

धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्रं. १४ मधील विशालनगर भागात सुमारे १५-२० वर्षापासून रस्त्यांची कामे झालेली नसल्यामुळे सदर भागात रस्ते करणे बाबत माननीय सदस्य श्री. युवराज पाटील यांनी पत्र दिलेले असता मनपा अंदाजपत्रकात धुळे शहरातील नवीन वसाहतीमध्ये रस्ते करणेबाबत ३०,००,०००/-मात्र तरतूद करण्यांत आलेली आहे. त्यामुळे विशालनगर भागात रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.त्यासाठी रु.२९,९६,०९४/-मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर अंदाजपत्रकातील खर्च रु.२५,००,०००/- पेक्षा जास्त असल्याने प्रशासकीय मान्यता मिळणे करिता मे.स्थायी समिती पुढे सादर करण्यांत आलेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षकाचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून प्रस्तावात नमूद खर्च रु.२९,९६,०९४/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक १६ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक ५/११/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

शासनाच्या दिनांक ३/७/२०२० च्या आदेशानुसार धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑनलाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक ०५/११/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता मा.श्री सुनिल तुळशिराम वैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह घेण्यांत आली या ऑनलाईन सभेसाठी खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन उपस्थित होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. वैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्री.सोनार सुनिल वसंतराव	सदस्य
४	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
५	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
६	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
७	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
८	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
९	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
१०	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
११	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
१२	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१३	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य
१४	श्रीमती अन्सारी फातमाबी नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. गणेश गिरी	अति. आयुक्त
२	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
३	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
४	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
५	श्री.विनायक कोते	सहा. आयुक्त
६	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
७	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
८	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
९	डॉ. महेश मोरे	आरोग्याधिकारी
१०	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
११	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
१२	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी तथा प्र. मुख्यलेखाधिकारी

१३	श्री. पी.डी. नाईक	लेखापाल
१४	श्री. एन.पी. सोनार	ईस्टेट मॅनेजर
१५	श्री. रमजान अन्सारी	प्र. कार्यालयीन अधिक्षक
१६	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१७	श्री. सी. एम. उगले	ओव्हरसिअर पा.पु.
१८	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बांधकाम
१९	श्री. सी.सी. बागुल	ओव्हरसिअर पा.पु. वि.
२०	श्री. राजू माईनकर	भांडारपाल
२१	श्री. प्रसाद जाधव	अतिक्रमण विभाग
२२	श्री. किशोर सुडके	बाजार प्रमुख
२३	श्री. राजेश गायकवाड	वरिष्ठ लिपीक मनपा शिक्षण मंडळ
२४	श्री. विशाल निंबाळकर	अभिलेखापाल

मा. सभापती सन्मा.सदस्य मा अति.आयुक्त सो. उपायुक्तसर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी

धुळे शहरातील नामवंत मल्ल तसेच महाराष्ट्र चॅम्पीयन तसेच माजी नगरसेवक श्री. राजधर एलजी कोळी पहेलवान यांचे नुकतेच अल्पशा:आजाराने दिनांक 5/11/2020 रोजी दुख:द निधन झाले आहे.धुळे शहरात कुस्ती क्षेत्रात त्यांचे कार्य हे अभिमानास्पद राहिलेले आहे.मल्ल विद्येला मानाचे स्थान त्यांच्या कर्तृत्वाने प्राप्त झाले होते. तरी त्यांना आजच्या स्थायी समिती सभेत भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

सुचक :- सौ. भारती अशोक माळी

अनुमोदक:- श्री. युवराज चैत्राम पाटील

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार मान्यवरांना आजच्या सभेत भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८६ दिनांक ०५/११/२०२०

सन्मा.सदस्यांच्यां यादीनुसार धुळे शहरातील नामवंत मल्ल तसेच महाराष्ट्र चॅम्पीयन तसेच माजी नगरसेवक श्री.राजधर एलजी कोळी पहेलवान यांचे नुकतेच अल्पशा: आजाराने दिनांक 5/11/2020रोजी दुख:द निधन झाले आहे.धुळे शहरात कुस्ती क्षेत्रात त्यांचे कार्य हे अभिमानास्पद राहिलेले आहे.मल्ल विद्येला मानाचे स्थान त्यांच्या कर्तृत्वाने प्राप्त झाले होते.

वरील मान्यवरांचे दु:खद निधनामुळेआजच्या सभेत त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली सर्मर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ७५ प्रभाग क्र.१६ मधील राऊळवाडी भागात नवीन १० शीट शौचालय बांधकाम करण्यांत आलेले असून सदर शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी श्रमीक स्वयंरोजगार सेवा सह. संस्था,धुळे यांना मागील मंजूर दराप्रमाणे देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मागील मंजूर दरानुसार श्रमीक स्वयंरोजगार सेवा सह.संस्था, धुळे यांना साफसफाई व देखभाल किरकोळ दुरुस्तीसाठी देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८७ दिनांक ०५/११/२०२०

सन्मा.नगरसेवक श्री.संतोष खताळ यांच्या पत्रानुसार प्रभाग क्र.१६ मधील राऊळवाडी भागातील १० शौचालय बांधकाम विभागामार्फत नविन बांधकाम करण्यात आले असुन ते नागरीकांसाठी वापर करणेकामी श्रमीक स्वयंरोजगार सेवा सह.संस्था,धुळे यांना साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी देणे बाबत शिफारसपत्र सादर केलेले आहे.

संबंधीत स्व.निरीक्षक यांनी समक्ष पाहणी करुन दिलेल्या अहवालानुसार सदर ठिकाणी मनपा मार्फत नविन शौचालय बांधण्यात आले असुन सदर शौचालयात दरवाजे, खिडकी, रंगरंगोटी, नळ,लाईट, सेप्टी टँकची व्यवस्था असुन त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.व सदरचे शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी श्रमीक स्वयंरोजगार सेवा संस्थेला देणेकामी अहवाल सादर केला आहे.

त्यानुसार उक्त शौचालयात बोरींग पाण्याची व्यवस्था, लाईट फिटींग, इ. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला आवश्यक असल्याने मा.अभियंता सो. यांना पत्र देण्यात आले होते. त्यानुसार सदर शौचालयात पाण्याची व्यवस्था,लाईट फिटींग, इ. बाबींची पुर्तता करण्यात आली असुन सदर शौचालय नागरीकांसाठी खुले करुन साफसफाई देखभाल दुरुस्तीसाठी देणे योग्य होईल असा दाखला दिलेला आहे.

श्रमीक स्वयंरोजगार संसथा यांना यापुर्वी एकुण ६ युनिट सुलभ शौचालय साफसफाई देखभाल व किरकोळ दुरुस्तीसाठी देण्यात आले असुन सदर संस्था चांगल्या प्रकारे साफसफाईचे काम करीत आहे. उक्त शौचालय साफसफाई व देखभालीसाठी दिल्यास त्या भागातील नागरीकांची शौचालयाची समस्या सुटु शकेल. तरी सदर संस्थेला धुळे म.न.पा मे.स्थायी समिती ठराव क्र.९६ दि.२१/१२/२०१७ रोजी पारीत केलेल्या ठरावात मंजुर केलेल्या कार्या.जा.क्र./धुमपा/आरोग्य/५८/ २०२०-२१ दिनांक ४/६/२०२० अन्वये ठरवुन दिलेल्या दरानुसार प्रभाग क्र.१६मधील राऊळवाडी भागातील १० सिट शौचालय साफसफाई व देखभाल किरकोळ दुरुस्तीसाठी देणेकामी सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून श्रमीक स्वयंरोजगार संस्था यांना प्रभाग क्रं.१६ मधील राऊडवाडी भगातील १० सीट शौचालय धुळे म.न.पा मे.स्थायी समिती ठराव क्र.९६ दि.२१/१२/२०१७ रोजी पारीत केलेल्या ठरावात मंजुर केलेल्या कार्या.जा.क्र./ धुमपा/ आरोग्य /५८/२०२०-२१ दिनांक ४/६/२०२० अन्वये ठरवुन दिलेल्या दरानुसार ७ वर्षाकरिता साफसफाई व देखभाल किरकोळ दुरुस्तीसाठी देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ७६ प्रभाग क्र.१७मधील रंगारी चाळ भागात नवीन १० शीट स्त्री सुलभ शौचालय बांधकाम करण्यांत आलेले असून सदर शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी श्रमीक स्वयं रोजगार सेवा सह.संस्था, धुळे यांना मागील मंजूर दराप्रमाणे देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे सदरचा प्रस्ताव माझ्या प्रभागातील असून या भागात महिलांसाठी सन 2018-19 मध्ये सुलभ शौचालय तयार करण्यात आले होते सदर कामासाठी सुमारे दोन वर्ष झालेली आहेत तेथे श्रमीक स्वयं रोजगार

सेवा संस्थेमार्फत सुमारे दोन वर्षापासून देखभाल दुरुस्तीचे काम सुरू आहे सदर संस्थेतील कर्मचारी येथील स्थानिक रहिवासी आहेत सदर काम ते व्यवस्थित रित्या करीत असून त्यांच्या बाबत कोणतीही तक्रार नाही तसेच शौचालयात निर्माण होणारे किरकोळ काम देखील ते वेळोवेळी सांगण्याप्रमाणे करीत आलेले आहेत सदरचे काम हे केवळ तोंडी आदेशाने त्यांनी समाधानकारक केले आहे माझ्या मते त्यांना कामाचा मोबदला मिळणे आवश्यक आहे तरी या बाबत प्रशासनाने दखल घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

म. लक्ष्मण पाटील — सदरचे शौचालय चौदा ते पंधरा महिन्यापासून बांधून तयार असून श्रमिक संस्थेमार्फत त्यांची देखभाल दुरुस्ती सुरू आहे त्यांच्या कामावर कोणतीही तक्रार नाही.

मा. सभापती — ते सुमारे सतरा-अठरा महिन्यापासून काम करीत आहे त्या कामाचे बिल त्यांना आता केलेले आहे का किंवा त्यांना त्याप्रमाणे कार्यादेश दिलेले आहे का कोणाच्या आदेशावरून देखभाल दुरुस्तीचे काम करीत आहेत.

म. लक्ष्मण पाटील — शौचालय बांधून तयार होते सदर शौचालयांच्या जवळ असलेल्या सुलभ शौचालयाच्या देखभाल दुरुस्तीचे काम सदर संस्था यापूर्वी करत होती. त्यामुळे त्यांना याही शौचालयांच्या देखभाल दुरुस्तीचे काम करण्याबाबत विनंती करण्यात आली होती व त्यांनी त्यानुसार काम केलेले आहे.

मा. सभापती — जर सदर संस्थेने काम केले असेल तर त्यांना कामाचा मोबदला देणे आवश्यक आहे व त्यांनी तर चांगले काम केले असेल तर त्याप्रमाणे पडताळणी करावी व त्यांना कशाप्रकारे बिल अदा करता येईल त्याची शहानिशा करून मोबदला देण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मार्गील मंजूर असलेल्या दरानुसार श्रमीक स्वयंरोजगार संस्था यांना साफसफाई व देखभाल किरकोळ दुरुस्तीसाठी ७ वर्षाकरिता देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८८ दिनांक ०५/११/२०२०

सन्मा.नगरसेवक श्री.शितलकुमार मोहन नवले व श्री.अमोल पावबा मासुळे यांनी प्रभाग क्र.१७ मधील रंगारीचाळ १० सिट स्त्री सुलभ शौचालय हे बांधकाम विभागामार्फत नविन बांधकाम करण्यात आले असुन ते नागरीकांसाठी वापर करणेकामी श्रमीक स्वयं रोजगार सेवा सह.संस्था यांना साफसफाई देखभाल दुरुस्तीसाठी देणे बाबत शिफारसपत्र सादर केलेले आहे.

संबंधीत स्व. निरीक्षक यांनी समक्ष पाहणी करुन दिलेल्या अहवालानुसार रंगारी चाळ येथील १० सिट स्त्री शौचालय नविन बांधकाम करण्यात आले असुन सदर शौचालयात दरवाजे, खिडकी, नळ, लाईट, सेप्टी टँकची व्यवस्था असुन त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.व सदरचे शौचालय साफसफाई देखभाल दुरुस्तीसाठी श्रमीक स्वयंरोजगार सेवा संस्थेला देणे बाबत अहवाल सादर केला आहे.

श्रमीक स्वयंरोजगार संस्था यांना यापुर्वी एकुण ६ युनिट सुलभ शौचालय साफसफाई देखभाल व किरकोळ दुरुस्तीसाठी देण्यात आले असुन सदर संस्था चांगल्याप्रकारे साफसफाई चे काम करीत आहे. उक्त शौचालय साफसफाई व देखभालसाठी दिल्यास त्या भागातील नागरीकांची शौचालयाची समस्या सुटु शकेल. तरी सदर संस्थेला मे.स्थायी समिती ठराव क्र. ९६ दिनांक २१/१२/२०१७ रोजीच्या ठरावान्वये व कार्या.जा.क्र /धुमपा/ आरोग्य/६९३ दिनांक १६/२/२०१८अन्वये ठरवुन दिलेल्या दरानुसार प्रभाग क्र.१७ मधील रंगारीचाळ येथील १० सिट शौचालय साफसफाई देखभाल व किरकोळ दुरुस्तीसाठी ७ वर्षाकरिता देण्यास पुढील योग्य त्या मंजुरीसाठी मे. स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून श्रमीक स्वयंरोजगार संस्था यांना दरानुसार प्रभाग क्र.१७ मधील रंगारीचाळ येथील १० सिट शौचालय धुळे म.न.पा मे.स्थायी समिती ठराव क्र.९६ दि.२१/१२/२०१७ रोजीच्या ठरावान्व्ये व कार्या.जा.क्र./धुमपा/आरोग्य/६९३ दिनांक १६/२/२०१८अन्वये ठरवुन दिलेल्या दरानुसार ७ वर्षकरिता साफसफाई व देखभाल किरकोळ दुरुस्तीसाठी देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच सदर संस्थेने मागील कालावधीत शौचालय देखभाल दुरुस्तीचे काम योग्य प्रकारे केलेले असेल तर त्यांचा नियमाप्रमाणे मोबदला देण्यासाठी आवश्यक ती पूर्तता व कार्यालयीन कार्यवाही करण्यांत यावी.व त्याप्रमाणे कार्योत्तर मान्यतेसाठी मे.स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर करावा.

शहरातील विविध प्रभागात शौचालय देखभाल दुरुस्तीचे काम विविध संस्थाना दिलेले आहे. सदर संस्था काम व्यवस्थित रित्या व समाधानकारक पणे करतात किंवा नाही याबाबत संबंधित भागातील स्वच्छता निरीक्षकांनी नियमितपणे खातरजमा करावी तसेच दरमहा सदर संस्था चालकांची बैठक घेवून नागरीकांच्या व सन्मा. सदस्यांच्या देखभाल दुरुस्तीबाबत तक्रारी किंवा सुचना असतील त्यांचे तांतडीने निराकरण करण्यांत यावे व अहवाल स्थायी समितीपुढे सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-७७ प्रभाग क्रं.१४अण्णाभाऊ साठेनगर भागात नवीन १० शीट शौचालय बांधकाम करण्यांत आलेले असून सदर शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी श्रमीक स्वयंरोजगार सेवा सह. संस्था, धुळे यांना मागील मंजूर दराप्रमाणे देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.युवराज पाटील सदर प्रस्ताव माझ्या भागातील असून आउटलेट न जोडल्याने सदरचे शौचालय वापरात नव्हते त्यामुळे तेथे बेकायदेशीरपणे नागरिकांनी निवास सुरू केलेला होता सदर बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे.यापुढे शौचालय बांधल्यानंतर तांतडीने देखभाल दुरुस्तीसाठी देण्यांत यावे.

मा. सभापती सदरची बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे याबाबत नागरिकांनीयाबाबत आरोग्य विभागाने शहानिशा करावी व तातडीने कार्यवाही करावी

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मागील मंजुर झालेल्या दरानुसार श्रमीक स्वयंरोजगार संस्था यांना दरानुसार ७ वर्षकरिता साफसफाई व देखभाल किरकोळ दुरुस्तीसाठी देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८९ दिनांक ०५/११/२०२०

माजी स्थायी समिती सभापती श्री. युवराज चैत्राम पाटील सो. मनपा धुळे यांनी प्रभाग क्र.१४ मधील अण्णाभाऊसाठे नगर येथील १० सिट स्त्री सुलभ शौचालय हे बांधकाम विभागामार्फत नविन बांधकाम करण्यात आले असुन ते नागरीकांसाठी वापर करणेकामी श्रमीक स्वयंरोजगार सेवा सह.संस्था यांना साफसफाई देखभाल दुरुस्तीसाठी देणे बाबत शिफारसपत्र सादर केलेले आहे.

संबंधीत स्व.निरीक्षक यांनी समक्ष पाहणी करुन दिलेल्या अहवालानुसारअण्णाभाऊ साठे नगर येथील १० सिट स्त्री शौचालय नविन बांधकाम करण्यात आले असुन सदर शौचालयात दरवाजे, खिडकी, नळ, लाईट, सेप्टी टँकची व्यवस्था असुन त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.व सदरचे शौचालय साफसफाई देखभाल दुरुस्तीसाठी श्रमीक स्वयंरोजगार सेवा संस्थेला देणे बाबत अहवाल सादर केला आहे.

श्रमीक स्वयंरोजगार संस्था यांना यापुर्वी एकुण ६ युनिट सुलभ शौचालय साफसफाई देखभाल व किरकोळ दुरुस्तीसाठी देण्यात आले असुन सदर संस्था चांगल्याप्रकारे साफसफाई चे काम करीत आहे. उक्त शौचालय साफसफाई व देखभालसाठी दिल्यास त्या भागातील नागरीकांची शौचालयाची समस्या सुटु शकेल. तरी सदर संस्थेला मे.स्थायी समिती ठराव क्र.९६ दिनांक २१/१२/२०१७ रोजीच्या ठरावान्वये व कार्या.जा.क्र./धुमपा/आरोग्य/६९३ दिनांक १६/२/२०१८ अन्वये ठरवुन दिलेल्या दरानुसार प्रभाग क्र.१४ मधील अण्णाभाऊ साठे नगर येथील १० सिट महिला शौचालय साफसफाई देखभाल व

किरकोळ दुरुस्तीसाठी देण्यास पुढील योग्य त्या निर्णयास्तव मे. स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच मुख्य लेखापरीक्षकाचे आक्षेप तपासून व लेखा आक्षेपांची संबंधित विभागाने पूर्तता करण्याच्या अधिन राहून श्रमीक स्वयंरोजगार संस्था यांना दरानुसार प्रभाग क्र.१४अण्णाभाऊ साठेनगर भागात नवीन १० शीट बांधण्यांत आलेले शौचालय धुळे म.न.पा मे.स्थायी समिती ठराव क्र.९६ दि.२१/१२/२०१७ रोजी पारीत केलेल्या ठरावात मंजुर केलेल्या कार्या. जा.क्र./ धुमपा / आरोग्य /५८/२०२०-२१दिनांक ४/६/२०२० अन्वये ठरवुन दिलेल्या दरानुसार ७ वर्षकरिता साफसफाई व देखभाल किरकोळ दुरुस्तीसाठी देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ७८ धुळे मनपा जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे रसायन (अॅलम) चा तुटवडा होवू नये म्हणून मागील कार्यादेश व दराप्रमाणे मे.महालक्ष्मी टेडर्स जळगांव यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती सदर विषयासंदर्भात अभियंता यांनी सभागृहास माहिती द्यावी.

म. अभियंता धुळे शहरासाठी लागणारे रसायनाबाबत आपण निविदा काढून 17/1/2020 ला मे. महालक्ष्मी टेडींग कंपनीचे स्थायी समितीने मंजूर केलेले होते. त्यानुसार त्यांना कार्यादेश देण्यांत आलेला होता. त्यावेळी त्यांना आलेला दर रु. 5900/- प्रति मेट्रीक टन असून त्यांस मंजुरी दिलेली होती. त्यावेळेस शासकीय दर रु. 7016/- प्रति मेट्रीक टन होता. याप्रमाणे कमी दराने निविदा दर प्रापत झाल्याने स्थायी समितीने मंजुरी दिलेली होती. सन 2019-20 या वर्षामध्ये अॅलमचा प्रतिटन शासकीय भाव 8106/- आहे. आपणास जुन्या दराने ठेकेदाराने मालाचा पुरवठा करण्यांस सहमती दर्शविलेली आहे. याबाबत मनपा हिताचा विचार करता मागील दराप्रमाणे सद्यस्थितीत अॅलम घेणे मनपा हिताचे आहे. अशी आमची धारणा आहे. याबाबत स्थायी समितीने निर्णय घ्यावयाचा आहे.

म. सभापती आपली जुनी मागणी 2000 मेट्रीक टनाची होती. सध्या धुळे महानगरपालिका क्षेत्रात 11 गावांचा समावेश झालेला आहे. त्यामुळे मागणी मध्ये वाढ होणार आहे का?

म. अभियंता मागणी वाढणार आहे. पण सध्या जुन्या दराप्रमाणे व कॉन्टीट प्रमाणे माल घेणार आहोत.

म. सभापती मागील मंजूर दर व नवीन शासकीय दर यात किती तफावत आहे.

म. अभियंता जुना मंजूर दर आहे 5900 व शासकीय नवीन दर आहे 8106 साधारण 2000 रुपयाप्रमाणे प्रति मेट्रीक टन तफावत आहे.

म.अमोल मासुळे जुन्या दरानुसार महानगरपालिकेचा फायदा होणार असल्याने विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सद्यस्थितीत लॉकडाऊनची स्थिती असल्याने औद्योगिक कारखाने अद्याप पूर्ण क्षमतेने सुरु झालेले नाही. त्यामुळे रसायने पुरवठा करणे कामात व्यत्यय येण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुनश्च निविदा पिक्रिया करणे, कार्यादश देणे इ. प्रक्रियेत विलंब लागू शकतो तसेच मागील मंजूर दर व सद्यस्थितीत असलेला असलेला शासकीय दर यांचा विचार करता मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने व जलशुध्दीकरण केंद्रावर रसायनांचा तुटवडा भासू नये यासाठी तसेच नागरीकांच्या मुलभूत सेवेचा विषय असल्याने व संबंधीत पुरवठादार सन 2019-20 च्या मागील वर्षी असणा-या रु. 5900/- प्रति मेट्रीक टन या दरात पुरवठा करण्यास तयार असल्याने मनपावर कुठल्याही प्रकारचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार नसल्याने मनपाचे आर्थिक हित पाहता निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो किंवा जास्तीत जास्त 1 वर्षापावेतो मुदतवाढ देण्यांस मान्यता

देण्यांत येत आहे. तसेच मनपा हद्दवाढीचा विचार करता कार्यादेशात नमूद प्रमाणापेक्षा अतिरिक्त मालाची आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे संबंधित संस्थेकडून रसायने घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९० दिनांक ०५/११/२०२०

धुळे मनपा जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे रसायन ॲलम पुरवठा करणे कामी सन 2019-20 यावर्षात मे.महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी जळगांव यांना धुळे मनपा जा.क्र./धुमपा/ पापुवि /1047 दि.17/01/2020 अन्वयेग्रेड 1-1500 मेटन व ग्रेड 4-500 मेटनअसा एकुण 2000 मे. टनचा ॲलमचा पुरवठा कार्यादेश देण्यात आलेला होता.

नुसार त्यांनी आजपावेतो जवळपास 1719 मे. टन ॲलमचा पुरवठा सुरळीतपणे केलेला आहे.त्यांच्याकडे अत्यंत ॲलम शिल्लक असल्याने व सध्या पासाळ्याचे दिवस असल्याने व संपूर्ण जगात कोवीड 19 चा प्रादुर्भाव असल्याने सन 2020-21 यावर्षा करीता नविन ॲलमचा निविदा प्रक्रिया व कार्यादेश करारनामा करणे कामी शासनाच्या निर्णय अभावी अडचणी उद्भवू शकतात.

त्यामुळे चालू वर्षाचा कालावधीसाठी (सन 2020-21 यावर्षाकरीता) मागील ॲलमचे पुरवठादार मे. महालक्ष्मी ट्रेंडींग कंपनी जळगांव यांनी मागणी केल्याप्रमाणे ते मागील सन 2019-20 यावर्षातील ॲलमच्या दराने पुढील वर्षाकरीता (सन 2020-21) ॲलमचा पुरवठा करण्यास तयार आहेत. धुळे महानगरपालिका जलशुद्धीकरण केंद्रावर लागणारे रसायन ॲलमची सन 2020-21 यावर्षाची निविदा प्रकीया सुरू असून निविदा प्रसिध्दी त्यास मंजुरी कार्यादेश करारनामा या प्रक्रीया करण्यासाठी 2 ते 3 महिन्याचा कालावधी लागणार असून याकालावधीत जलशुध्दीकरण केंद्रावर रसायनांचा (ॲलमचा) तुटवडा होऊ नये म्हणून मा. आयुक्तसो यांनी सन 2019-20 वर्षातील ॲलम पुरवठा धारक यांच्याकडून मालाचा पुरवठाबाबत दि.26/10/2020 रोजी मान्यता दिलेली आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सद्यस्थितीत लॉकडाऊनची स्थिती असल्याने औद्योगिक कारखाने अद्याप पूर्ण क्षमतेने सुरु झालेले नाही. त्यामुळे रसायने पुरवठा करणे कामात व्यत्यय येण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुनश्च निविदा पिक्रिया करणे, कार्यादश देणे इ. प्रक्रियेत विलंब लागू शकतो तसेच मागील मंजूर रु. 5900/-प्रति मेट्रीक टन या दरात पुरवठा करण्यास तयार असल्याने मनपावर कुठल्याही प्रकारचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार नसल्याने मनपाचे आर्थिक हित पाहता निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो किंवा जास्तीत जास्त 1 वर्षापावेतो मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच मनपा हद्दवाढीचा विचार करता कार्यादेशात नमूद प्रमाणापेक्षा अतिरिक्त मालाची आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे संबंधित संस्थेकडून रसायने घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-७९ धुळे महानगरपालिकेचे विविध प्रकल्पासाठी शासनाच्या मंजूर दराप्रमाणे मे. बिलकॉन कन्सलंटसी औरंगाबाद यांनाआर्किटेक्ट नियुक्ती देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे प्रशासनाच्या माध्यमातून हा प्रस्ताव सादर झालेला आहे. यांत धुळे शहरात विविध योजना सदर संस्था करणार असल्याचे नमूद आहे. परंतु यापूर्वी आपण विविध योजनासाठी आर्किटेक्ट नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे नव्याने अशा प्रकारे नियुक्ती करणे संयुक्तीक नाही यामुळे मनपावर आर्थिक भार निर्माण होणार आहे. हा विष्य आवश्यकता नसतांना प्रशासनामार्फत घेण्यांत आलेला आहे. हा विषय नामंजूर करावा.

म. कमलेश देवरे आपल्याकडे या एजन्सीला काम दिल्यानंतर कोणत्या योजना या संस्थेमार्फत करण्यांत येणार आहे यांची माहिती मिळावी. तसेच याअगोदर आपण विविध कामांसाठी आकिटेक्ट नेमलेले आहे व त्यांच्या

मार्फत आपण काम करीत आहोत.त्यामुळे नवीन आकिटेक्ट नियुक्तीची आवश्यकता आहे का याचा खुलासा करावा.

म. प्रदीप चव्हाण — यासंदर्भात संबंधित एजन्सीने मनपाकडे पॅनलवर नियुक्ती करणेसाठी विनंती अर्ज केलेला होता.सदर संस्थेने यापूर्वी विविध नगरपालिका /महानगरपालिका येथे रमाई घरकुल योजना, कर मूल्यांकन, राज्य तलाव संवर्धन, नदी संवर्धन, तीर्थक्षेत्र विकास,अल्पसंख्यांक विकास योजना व दलित वस्ती विकास कार्यक्रम इत्यादी योजनांचे काम केले असल्याबाबत कळविले आहे.शासनाच्या नियमानुसार व दरानुसार त्यांना फीअदा करावयाची आहे. नियुक्ती बाबत निर्णय सभागृहाने घ्यावयाचा आहे.

म. सभापती — आकिटेक्ट नियुक्ती बाबत निविदा प्रक्रिया का केली नाही.

म. पी.डी. चव्हाण — आपण प्रशासनामार्फत प्रस्ताव मे. स्थायी समितीसमोर सादर केलेला आहे.

म. सभापती — प्रस्ताव सादर करतांना आपण सविस्तर टिपणी ठेवली नाही.सदर आकिटेक्ट नेमके कोणते काम करणार आहे. याची माहिती प्रस्तावात नाही तसेच त्यांच्या कामामुळे किंवा नियुक्तीमुळे मनपाला कोणता लाभ होणार आहे आपण यापूर्वी विविध योजनांसाठी आकिटेक्ट नियुक्ती केलेली आहे.परंतु टिपणीत उल्लेख नाही. कार्यालयीन अहवाल सविस्तर सादर केलेला नाही.

म. पी.डी. चव्हाण — सदर संस्थेला पॅन्लवर नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

म. सभापती — याबाबत आपण सविस्तर टिपणी देणे आवश्यक होते. शासन योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आपण संस्था नियुक्त करतो. सदर संस्था नेमके कोणते काम करणार आहे याचा टिपणीत बोध होत नाही. तसेच धुळे शहरात देखील विविध स्थानिक आकिटेक्ट व संस्था आहेत.त्यांना शहराच्या एकुणच परिस्थितीची पूर्णपणे जाणीव आहे.अशा काही संस्थाचे प्रस्ताव आपल्याकडे आलेले आहेत का?

म. पी.डी. चव्हाण — प्रस्ताव आलेले नाही.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षांत घेवून यापूर्वी या कामासाठी एका एजन्सीची नेमणूक करण्यांत आलेली असल्याने सद्यस्थितीत या विषयास मंजुरी देणे योग्य होणार नाही आर्थिक विषय असल्याने मनपाचे हित पाहता व सदस्यांच्या मागणीनुसार सदर विषय नामंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९१ दिनांक ०५/११/२०२०

बिलकॉन कन्सल्टन्सी, औरंगाबाद, यांनी धुळे महानगरपालिकेत (प्रकल्प व्यवस्थापक / आर्किटेक्ट) म्हणून नेमणूक होणे बाबत संदर्भीय पत्र दिलेले आहे. संदर्भीय पत्रात त्यांनी महाराष्ट्रातील विविध नगर परिषदेमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेअंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करीत आहे. आमच्या एजन्सीने रमाई घरकुल योजना, कर मूल्यांकन, राज्य तलाव संवर्धन, नदी संवर्धन, तीर्थक्षेत्र विकास, अल्पसंख्यांक विकास योजना व दलित वस्ती विकास कार्यक्रम इत्यादी योजनेमध्ये काम केले आहे. आमच्या एजन्सीला सदरील योजनेच्या कामाचा अनुभव आहे.उपरोक्त काम करण्यासाठी आमच्या एजन्सीकडे तज्ञ मनुष्यबळ व योग्य ती साधन सामग्री उपलब्ध आहे.आमची एजन्सी आपल्या महानगरपालिके अंतर्गत वरील सर्व योजनेचे काम करू इच्छित आहे.

तरी धुळे मनपाची हद्दवाढ लक्षात घेता व शासनाकडील विविध प्रकल्प मार्गी लावण्यासाठी धुळे महानगरपालिकेत तांत्रिक मनुष्यबळ फारच कमी असल्यामुळे शासकीय कामे करणेसाठी प्रकल्प व्यवस्थापक आर्किटेक्ट यांची आवश्यकता आहे. त्यानुसार शासनाच्या दिनांक 4 जून 2018 च्या परिपत्रका प्रमाणे प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क असे एकूण 2% (प्रकल्पाच्या किमतीच्या प्रमाणात) या दरानुसार नियुक्ती करणेबाबत प्रस्ताव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा लक्षांत घेवून यापूर्वी या कामासाठी एका एजन्सीची नेमणूक करण्यांत आलेली असल्याने सद्यस्थितीत या विषयास मंजुरी देणे योग्य होणार नाही आर्थिक विषय असल्याने मनपाचे हित पाहता व सदस्यांच्या मागणीनुसार सदर विषय नामंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x

सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-८० धुळे मनपा हद्दीतील वरखेडीरोड येथे FSTP प्लॉन्टसाठी रेडिमेड वॉल कपौंड बांधणेकामी झालेला खर्च रु.४,९९,७१६/- मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५(२)(२)अन्वये कार्योत्तर मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती सदर प्रस्तावाबाबत सभागृहात माहिती सादर करावी.

म. पी.डी. चव्हाण FSTPप्लॉन्ट हा शहरासाठी तसेच स्वच्छ सर्वेक्षणाच्या निकषामध्ये महत्वाचा घटक आहे. सदर प्लॉन्टची गरज असून त्यास स्वच्छ सर्वेक्षणात गुणांक प्राप्त झालेले आहे. त्यामुळे सदर ठिकाणी आवश्यक ती दुरुस्ती व पूर्तता करणे गरजेचे होते. त्रयस्त संस्थेमार्फत वेळोवेळी सदर ठिकाणी पहाणी करण्यांत येते त्यामुळे सदरचे काम तांतडीने करुन घेणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केले होते. त्यानुसार ठेकेदारामार्फत काम करुन घेण्यांत आले आहे.

म. अमोल मासुळे याचा महानगरपालिकेला फायदा काय? त्याचा खुलासा करावा.

म. उपायुक्त आपल्या पालिकेचे विविध भागात खाजगी शौचालय आहेत.त्यात जमा होणारा मैलावर शास्त्रक्तो पध्दतीने प्रक्रिया होणे गरजेचे होते.आता पावेतो सदर प्रक्रिया होत नव्हती. यासाठी शासनाने स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत सदर प्रकल्प उभारणे बंधनकारक होते. यासाठी 25 लक्ष रुपये अनुदान प्राप्त झालेले आहे.सदर प्रकल्प हा मनपाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेची बाब होती.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९२ दिनांक ०५/११/२०२०

धुळे मनपा हद्दीतील वरखेडी रोड येथे FSTP प्लान्ट साठी रेडीमेड कंपाऊंड वॉल बांधणे बाबत संदर्भीय पत्र प्राप्त झाले आहे.सदरील ठिकाणी महाराष्ट्रातील इतर नगरपालिकेंचे पाहणी दौरे असतात तसेच स्वच्छ सर्व्हेक्षण अंतर्गत देखील सदरप्लान्ट साठी गुणांकन देण्यात येतात.त्यामुळे सदरील ठिकाणी तातडीने रेडीमेडकंपाऊंड वॉल बांधणे बाबत आदेशित केले होते.सदरचे काम ठेकेदार श्री.संजय गायकवाड यांच्या कडून पूर्ण करून घेण्यात आले आहे.

सदर ठेकेदार यांना तोंडी सूचना दिल्यानुसार त्यांनी वरील काम पूर्ण करून दिले आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसूची सन2019-20 नुसार रु.4,99,716/-मात्र खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन 2020-21 च्या मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.संजय गायकवाड ठेकेदार यांच्या कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम 5(2)(2)अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदरचे काम विना निविदा श्री.संजय गायकवाड ठेकेदार यांच्या कडून करून घेण्यात आलेले असल्याने त्याकामी झालेला खर्च रुपये 4,99,716/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील 5(2)(2)अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक १७ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक १०/१२/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

शासनाच्या दिनांक ३/७/२०२० च्या आदेशानुसार धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑनलाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक १०/१२/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता मा.श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह घेण्यांत आली या ऑनलाईन सभेसाठी खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन उपस्थित होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
४	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
५	श्री. मंन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
६	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
७	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
८	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
९	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
१०	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
११	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१२	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्य
१३	श्रीमती अन्सारी फातमाबी नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
२	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
३	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
४	श्री.विनायक कोते	सहा. आयुक्त
५	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
६	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
७	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हर सिअर
८	डॉ. महेश मोरे	आरोग्याधिकारी
९	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी तथा प्र. मुख्यलेखाधिकारी
११	श्री. पी.डी. नाईक	लेखापाल

१२	श्री. एन.पी. सोनार	इस्टेट मॅनेजर
१३	श्री. रमजान अन्सारी	प्र.कार्यालयीन अधिक्षक
१४	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१५	श्री. सी. एम. उगले	ओव्हरसिअर पा.पु.
१६	श्री. सी.सी. बागुल	ओव्हरसिअर पा.पु. वि.
१७	श्री. राजू माईनकर	प्र भांडारपाल
१८	श्री. प्रसाद जाधव	प्र अतिक्रमण विभाग प्रमुख
१९	श्री. किशोर सुडके	प्र. बाजार प्रमुख
२०	श्री. राजेश गायकवाड	वरिष्ठ लिपीक मनपा शिक्षण मंडळ
२१	श्री. रविंद्र सोनवणे	प्र. एल.बी. टी अधिक्षक
२२	श्री. हेमंत पावटे	ओव्हरसिअर
२३	श्री. सुक्राम राऊत	वाहन विभाग
२४	श्री. तुषार ढाके	सहा. अर्गनीशमन अधिकारी

मा. सभापती सन्मा.सदस्य मा उपायुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचा अर्ज.

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्य श्री.सुनिल वसंतराव सोनार यांनी आजच्या सभेस बाहेरगांवी जात असल्याने रजा मंजूर करणे बाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९३ दिनांक १०/१२/२०२०

सन्मा. सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ८१ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे (दि.२९/१०/२०२०,५/११/२०२०)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय पत्रिकेवरील विषय सुरू करण्याआधी धुळे महानगरपालिका हद्दीतील एका महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा करणे गरजेचे आहे धुळे शहरात कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणावर वाढलेला असून नागरिकांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे यासंदर्भात सहाय्यक आरोग्य अधिकारी श्री चंद्रकांत जाधव यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी अत्यंत चुकीच्या पद्धतीने उत्तर देऊन कार्यवाही पासून टाळाटाळ करण्याचा प्रयत्न केलेला आहे आपल्याकडे मनुष्यबळाचा अभाव असल्याने कार्यवाहीस विलंब लागत आहे असे उत्तर त्यांनी दिलेली आहे वास्तविकता नागरिकांच्या जिवाशी निगडित असणारा हा प्रश्न फार गंभीर झालेला आहे मोहाडी येथे मागे सहा वर्षाच्या बालिकेस कुत्र्यांनी लचके तोडून घायाळ केले याठिकाणी भविष्यात एखाद्या नागरिकाचा जीव गेल्यास जबाबदार कोण राहील यामध्ये जातीने लक्ष घालून ठोस कार्यवाही होणे अपेक्षित आहे मागे कुत्रे पकडण्यासाठी ठेकेदार नियुक्त केलेला होता परंतु

काही कारणास्तव त्याला पळवून लावण्यात आले याबाबत ठोस उपाययोजना करावी अशी आमची याठिकाणी मागणी आहे

म.सभापती:- सदर प्रश्न खरोखरच अतिशय गंभीर स्वरूपाचा आहे आपल्याकडे मनुष्यबळाची कमतरता आहे ही गोष्ट ठीक आहे परंतु हा नागरिकांच्या आरोग्याचा व जीवाचा प्रश्न आहे कुत्र्या बरोबरच भटक्या जनावरांचा प्रश्न गंभीर झालेला आहे भर रस्त्यात अनेक भटके जनावर मोकाट फिरताना दिसत आहे याबाबत कार्यवाही नसल्याने महानगरपालिकेवर बदनामीचे ताशेरे ओढले जात आहे या संदर्भात आपण काय कारवाई केली व काय उपाययोजना करणार आहोत याची माहिती सभागृहाला देण्यात यावी

म.चंद्रकांत जाधव- आपण जखमी व पिसाळलेल्या कुत्र्याबाबत शासनाच्या नियमावली प्रमाणे कार्यवाही करण्याचे काम करीत आहोत तथापि या गोष्टी सही मनुष्यबळामुळे मर्यादा येतात ही गोष्ट खरी आहे याबाबत कायद्याचेही बाबी निर्माण झालेले आहेत तसेच आपल्याकडे पशुवैद्यकीय अधिकारी पद नसल्याने त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला ठोस अशी कार्यवाही करता येऊ शकेल सदर पद रिक्त आहे कृपया याबाबत आस्थापना विभागामार्फत कार्यवाही होणे अपेक्षित आहे

म.सभापती:- पशुवैद्यकीय अधिकारी पद भरणे बाबत आस्थापना विभागामार्फत काही कार्यवाही केली आहे का याबाबत माहिती द्यावी

म.रमजान अन्सारी अद्याप पावेतो कार्यवाही झालेली नाही तथापि सदर विभागाने मागणी करावी त्यानुसार कारवाई करण्यात येईल

म.उपायुक्त पशुवैद्यकीय अधिकारी पद हे शासनाच्या आकृतिबंधात समाविष्ट आहे सद्यस्थितीत पशुवैद्यकीय अधिकारी पद हे मानधन तत्वावर देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल आपल्याकडे मनुष्यबळाची कमतरता आहे तरीपण आपण पर्यायी व्यवस्था करणे गरजेचे आहे इतर महानगरपालिकांमध्ये या संदर्भात कशा प्रकारे कार्यवाही व काम चालते याबाबत माहिती घेऊन कार्यवाही होणे गरजेचे आहे याबाबत तातडीने माहिती घेऊन आवश्यक ती उपाययोजना व कार्यवाही करावी अन्यथा त्याच्या भागातील स्वच्छता निरीक्षकांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल

म.सभापती याबाबत आपण किती दिवसात कारवाई करणार याची माहिती सभागृहाला द्यावी

म.चंद्रकांत जाधव याबाबत माहिती घेऊन निविदा व इतर प्रक्रिया या कारवाईसाठी पंधरा दिवसाचा अवधी लागेल तोपर्यंत कारवाई करण्यात येईल

म.कमलेश देवरे याठिकाणी बंटी भाऊंनी जो विषय घेतलेला आहे तो अतिशय गंभीर विषय आहे आपण धुळे शहराचे काहीतरी देणे लागतो त्याप्रमाणे कर्मचारी व अधिकाऱ्यांनी काम करणे गरजेचे आहे याबाबत दुसऱ्या महानगरपालिकेत व नगरपालिकेत कशा प्रकारे कामकाज चालते याबाबत माहिती घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही तातडीने गंभीरतेने होणे गरजेचे आहे याबाबत सातत्याने बैठकांमध्ये चर्चा होते परंतु ठोस निर्णय होत नाही तरी या बाबत कार्यवाही करावी

म.सभापती आपल्या सर्वांच्या भावना अतिशय योग्य आहेत मोकाट कुत्री व जनावरांचा प्रश्न गंभीर आहे मोकाट जनावरांना बाबतही अनेकदा कार्यवाही केली परंतु त्या जनावरांचे मालक ही महानगरपालिकेस दाद देत नाही याबाबत प्रशासनाने गंभीरतेने दखल घ्यावी व येत्या पंधरा दिवसात कोणत्याही परिस्थितीत कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल स्थायी समितीपुढे सादर करावा

श्री कमलेश देवरे सभापती साहेब मागच्या बैठकीत शहरातील मोकळ्या जागांचा प्रश्नाबाबत चर्चा झालेली होती त्यात आपण १९७ जणांना नोटिसा दिलेले आहेत व त्याबाबत कायद्याच्या बाबी तपासून

पुढील कारवाई केली जाईल असे प्रशासनामार्फत सांगण्यात आले होते त्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा करावा

म.नगर रचनाकार — संबंधितांना नोटिसा दिल्या आहेत त्यांचे उत्तर सादर झालेले नाही याबाबत अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

म.एन.पी. सोनार — ज्या संस्थांचे करार संपलेले आहेत अशा संस्थांना अंतिम नोटिसा देण्यात येत आहे याबाबत मनपाचे विधी तज्ञ यांच्याकडून नोटिशीचा ड्राफ्ट तयार करण्यात आलेला असून लवकरच सर्व संस्थांना नियमाप्रमाणे नोटिसा देऊन कार्यवाही करण्यात येत आहे भविष्यात कायदेशीर बाबी निर्माण होऊ नयेत यासाठी तज्ञांचा मार्गदर्शन घेण्यात येत आहे तथापि माझ्या कडे कर्मचारी उपलब्ध नसल्याने थोडा वेळ लागत आहे.

म.सभापती — आस्थापना विभागाने याबाबत तातडीने नोंद घ्यावी व सोनार यांच्याकडेच कर्मचारी उपलब्ध करून देण्यात यावा सदर जागा या मनपा चे प्रमुख उत्पन्नाचे स्तोत्र आहेत त्याबाबत तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे याबाबत तातडीने कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही करावी व त्याचा संपूर्ण अहवाल सभागृहापुढे सादर करावा बाबत अनेक प्रश्न निर्माण झाले असून अनेक संस्था व लोकांनी या जागा हडप केलेल्या आहेत यामध्ये सिटी सर्वे नंबर ४० बाबतही अशा स्वरूपाचा वाद निर्माण झालेला आहे शहरातील काँग्रेस भवन या संस्थेसही मनपाने जागा दिलेली आहे व त्याचा देखील करार संपलेला आहे मी या ठिकाणी आदेशित करतो की तातडीने अशा जागांबाबत कार्यवाही करावी व काँग्रेस भवनची ही जागा ताब्यात घ्यावी अन्यथा मला स्वतःला याबाबत कार्यवाही करण्यासाठी उभे राहावे लागेल. व जागांचा ताबा घेण्यासाठी आम्ही आमच्या सदस्यांसह कार्यवाही करू.

म.कमलेश देवरे — सभापती महोदय थोड्या दिवसापूर्वी तुम्ही अतिक्रमणाचाप्रश्न चांगल्याप्रकारे मार्गी लावलेला आहे बारा पत्थर वरील व्यवसायीकांबाबत आपण समक्ष एसपी साहेबांकडे निवेदन देऊन अतिक्रमणाबाबत कार्यवाही करण्याची पत्र दिलेले होते व त्यानुसार कार्यवाही झालेली आहे त्याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन करतो परंतु सद्यस्थितीत छत्रपती शिवाजी पुतळा ते नगावबारी पर्यंत रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट झाले आहे दुतर्फा फेरीवाल्यांची अतिक्रमण यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे या मार्गावर सुमारे दोन ते अडीच हजार फेरीवाले दिवसभर ठाण मांडून बसतात सद्यस्थितीत कोरोना परिस्थिती असल्याने गंभीर धोका निर्माण होऊ शकतो तसेच साक्री रोड चाळीसगाव रोड व शिवाजी रोड चौपाटी येथे देखील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर विक्रेते बसलेले असतात व रस्त्यावर दुकाने थाटायला सुरुवात झालेली आहे रहदारीचा प्रश्नही बिकट झालेला आहे तसेच थोर पुरुषांच्या पुतळ्याच्या सभोवताली ही वाहने पार्किंग करून उभी असतात व तेथे अतिक्रमणाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे कृपया याबाबत ठोस कार्यवाही करावी ही सभागृहास विनंती आहे.

म.सभापती — मी याबाबत मागेच एसपी साहेबांना समक्ष भेटून निवेदन दिले बारा पतथर येथील वीस ते बावीस दुकानांवर कार्यवाही करण्यात आली याबाबत आयुक्त महोदयांना सुद्धा पत्रव्यवहार केलेला आहे परंतु यावरही न थांबता आपण मनपा व पोलिस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमानाने याबाबत मोहीम घेणार आहोत अतिक्रमण व रहदारीचा प्रश्नामुळे शहरात जातीय वाद यापूर्वी निर्माण झालेला आहे व तशीच बाब आठवड्यापूर्वी बारा पत्थर येथे निर्माण झालेली होती मनपा प्रशासन व पोलिस प्रशासन यांच्या वतीने संयुक्त कारवाईसाठी बैठक घेऊन याबाबत लवकरच ठोस कार्यवाही करणार आहोत तसेच शहरातील मूलभूत नागरिक सुविधांसाठी आपल्या महानगरपालिकेतील अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांचे मोबाईल नंबर

शहराच्या विविध भागात असलेल्या आपल्या दवाखान्यांमध्ये दर्शनी भागात प्रदर्शित करण्यात यावे जेणेकरून नागरिकांना त्यांच्या छोट्या-छट्या समस्यांबाबत महानगरपालिके पर्यंत येण्याची गरज पडणार नाही आपल्या महानगरपालिका दवाखान्यांमध्ये असलेल्या दर्शनी भागात अशाप्रकारे प्रमुख अधिकारी व कर्मचारी यांचे मोबाईल नंबर संपर्कासाठी प्रदर्शित करावे अशी मी प्रशासनाला सूचना करतो.

म.सभापती मागील स्थायी समिती मध्ये शहरातील रस्त्यांवरील खड्डे दुरुस्तीबाबत सदस्यांनी प्रश्न निर्माण केले होते व त्याबाबत प्रशासनास याबाबत खुलासा सादर करण्याची सूचना केली होती त्यानुसार आज सभागृहापुढे खुलासा सादर झालेला आहे यात कोणत्या रस्त्यांवरील खड्डे बुजवण्यात आले याची माहिती व अहवाल देण्यात आलेला आहे यासंदर्भात मा. आयुक्त महोदयांनी देखील शहरातील रस्त्यांच्या खड्ड्यांची परिस्थिती वाईट असून याबाबत खड्डे दुरुस्ती बाबत कार्यवाही करणे गरजेचे असून निर्णय घेण्यासाठी कळलेले होते आपल्या सभागृहापुढे सदर अहवाल सादर झालेला आहे भविष्यात कोणत्या रस्त्यांवरील खड्डे बुजवले जाणार आहेत याबाबत माहिती सभागृहात सादर करण्यात आलेली आहे व संपूर्णता खड्डे बुजवले नंतर तो अहवाल स्थायी समितीकडे सादर करावा सद्यस्थितीत शहरातील प्रमुख मार्गांवरील खड्डे दुरुस्तीचे काम हाती घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९४ दिनांक १०/१२/२०२०

मागील स्थायी समिती सभा दि.२९/१०/२०२० चे ठराव नंबर ७४ ते अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच धुळे मनपा स्थायी समिती सभा दि.५/११/२०२० चे ठराव नंबर ८६ ते ९२ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ८२ मा.बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नीला मालमत्ता कर माफी योजना या योजनेंतर्गत राज्यातील नागरी स्थानिकस्वराज्य संस्थांमधील माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट देण्याबाबतचा प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे माहितीस्तव सादर.

म.नगरसचिव:- सदर प्रस्ताव सभागृहाच्या माहितीसाठी सादर झालेला आहे यात शासनाच्या आदेशात सुधारणा झालेली असून यामध्ये माजी सैनिक व सैनिक विधवा पत्नी यांना मालमत्ता करातून सूट देणेबाबत नवीन आदेशानुसार निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाची प्रत आजच वसुली अधिकारी रनाळकर यांनी नगरसचिव कार्यालयाकडे दिलेले आहे सदर प्रत व माहिती सभागृहापुढे सादर करीत आहे.

म.सभापती:- या योजनेची अंमलबजावणी कशा पद्धतीने करणार आहेत शासनाने माजी सैनिकांचा सन्मान व्हावा म्हणून ही योजना सुरू केलेली आहे अत्यंत चांगली योजना आहे आणि सदर योजना यांच्या नावाने सुरू झालेली आहे ते देशाचे आदरणीय व्यक्तिमत्व हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा सर्वांनाच आदर आहे त्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने सुरू झालेल्या या योजनेची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होणे गरजेचे आहे आपण योजनेची अंमलबजावणी कशाप्रकारे करणार आहात कृपया सभागृहास माहिती द्यावी.

म.रनाळकर:- यापूर्वीच्या शासन निर्णयानुसार जे शौर्यपदधारक माजी सैनिक होते त्यांना व त्यांच्या विधवा पत्नींना ही योजना लागू होती परंतु नवीन शासन निर्णयानुसार माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नींना या योजनेत समाविष्ट केलेले आहे त्यांच्या पत्नीच्या नावावर जर मालमत्ता असेल त्यांनादेखील या योजनेतून सवलत मिळणार आहे सन 2019 20 थकबाकी यामध्ये वसूल करून घ्यावयाची आहे जर सन 2020 21 टॅक्स भरला गेला असेल तर पूर्वलक्षी प्रभावाने त्यांना पुढच्या वर्षी सूट देण्यात येणार आहे.

म. सभापती:- ही योजना फक्त माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नी साठी आहे या त्यांच्या वारसाचा देखील समावेश आहे का

म.रनाळकर:- सदर योजना फक्त माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नी यांच्यासाठीच लागू आहे यात यामध्ये संबंधितांना सैनिक बोर्डाकडून असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे त्याप्रमाणे सैनिक बोर्डाकडून तशी यादी सादर झालेली आहे.

म.उपायुक्त:- शहरात बरेच माजी सैनिक आहे त्यांना या शासनादेश याबाबत अवगत होणे गरजेचे आहे यासाठी आपण या योजनेचा जास्तीत जास्त वृत्तपत्रातून प्रसिद्धी द्यावी तसेच स्थानिक चॅनेलवर ही याबाबत माहिती प्रसारित करावी. गरज असल्यास आपल्या कर्मचाऱ्यांकडून त्याप्रमाणे सर्व्हे करा व त्यांची माहिती घ्या.

म.सभापती:- माजी सैनिकांच्या सन्मानासाठी ही योजना आहे त्यांना या योजनेचा लाभ देताना सुलभ पद्धतीने आदरपूर्वक लाभ देण्याबाबत कारवाई होणे गरजेचे आहे त्यांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. व व त्यांना सन्मानपूर्वक वागणूक देण्यात यावी.

म.रनाळकर:- यासंदर्भात सैनिक बोर्डाकडून सुमारे 250 लोकांची यादी तयार केलेली आहे शासन निर्णयानुसार ते आवश्यक कागदपत्रे जमा करून सादर करीत आहे.

म.सभापती:- अविवाहित असणाऱ्या शहीद जवानांच्या आई-वडीलांना देखील या सवलतीचा लाभ होणे बाबत शासन निर्णयात नमूद आहे अतिशय चांगला निर्णय आहे आपण त्यांना कोणताही त्रास होणार नाही याप्रमाणे दक्षता घ्यावी व त्यांना सन्मानपूर्वक वागणूक देऊन मालमत्ता करात सूट देण्याबाबत कार्यवाही करावी. कार्यालयीन अहवालानुसार व शासन निर्णयानुसार सदर योजना तांतडीने लागू करण्यांत यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९५दिनांक १०/१२/२०२०

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मालमत्ता कराबाबत महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९,मुंबई महापालिका अधिनियम १८८८व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम१९६५मध्ये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.तसेच शासन निर्णय दिनांक ०५/०४/२०१६ व दिनांक ०७/०४/२०१६ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेतात राहणा-या केवळ संरक्षण दलातील शौर्य पदक धारकांना व माजी सैनिकांच्या विधवा पत्नीच्या नावावर असलेल्या एका मालमत्तांना मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. धुळे महागनरपालिका दिनांक ०५/०४/२०१६ चे शासन निर्णयांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

संदर्भीय शासन निर्णय मध्ये राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील मालमत्ता कराबाबतवरील अधिनियमात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. शासन निर्णय

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती लक्षात घेऊन "मा.बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नीला मालमत्ता कर माफी योजना" या योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात वास्तव्य करणा-या सर्व माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.अशा कर माफीस पात्र ठरणा-या व्यक्तीने जिल्हा सैनिक कल्याण अधिका-याचे प्रमाण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

सन २०१९-२० वित्तीय वर्षाची संपूर्ण मालमत्ताकराची थकबाकी भरुन तसेच या अगोदर मालमत्ता धारकांनी मालमत्ता कर भरला असेल त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने लाभ मिळणार नाही. परंतु अशा मालमत्ता धारकांना पुढील आर्थिक वर्षात शासन निर्णयानुसा मालमत्ता करात सूट देण्यात येईल.

सदर निर्णयाची अंमलबजावणी सन २०२०-२१ पासून एका मालमत्तेस फक्त मालमत्ता करावर सूट देणेबाबत करावायाची आहे. सदर प्रस्ताव सभागृहाच्या माहितीस्तव सादर करण्यांत आलेला आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ८३ प्रजनन व बाल आरोग्य (RCH-II)अभियाना अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता लागु करण्यांत आलेला आलेला आहे.सदर बाबत माहितीस्तव मे. स्थायी समिती समोर सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती:- सदर प्रोत्साहन भत्ता कोणत्या कर्मचा-यांना कशा पद्धतीने लागू केलेला आहे याबाबत खुलासा करावा.

म. आरोग्याधिकारी:- आपल्याकडे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत त्यांनी कोविड मध्ये चांगले काम केलेले आहे शासनाने त्यांच्या मानधनाच्या प्रमाणात जास्तीत जास्त 75 प्रमाणे प्रोत्साहन भत्ता लागू करणेबाबत कळवले होते त्यांना शासनाकडून त्याप्रमाणे अनुदान प्राप्त झाले होते तसेच त्यांच्या बरोबरीने काम करणारेआर.सी.एच.चे कर्मचारी आहेत त्यांचे मानधन महानगरपालिकांमार्फत दिला जात आहे त्यांना प्रोत्साहन भत्ता लागू करण्याबाबत प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे सदरचा खर्च महापालिकेमार्फत करण्यात येणार आहेत त्यांनी देखील होईल मध्ये काम केले असून त्याप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

म. सभापती:- याच बरोबर आपल्या महानगरपालिकेतील सफाई कामगारांनी देखील कोविड मध्ये अतिशय चांगल्या पद्धतीने काम केलेले आहे त्यांना प्रोत्साहन भत्ता देणे बाबत काही शासन निर्णय आहेत का.

म.उपयुक्त:- याबाबत शासन निर्णय आहेत आरोग्य अधिकारी यांनी याबाबत माहिती घ्यावी व त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करावा

म. सभापती:- आपल्या महानगरपालिकेतील स्वच्छता कर्मचारी देखील कोरोनाच्या काळात अतिशय चांगल्या पद्धतीने काम केले आहे शासन निर्णय तपासून त्यांनादेखील प्रोत्साहन भत्ता लागू करण्याबाबत कार्यवाही करावी व तसा प्रस्ताव पुढील स्थायी समितीच्या बैठकीत सादर करावा.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९६ दिनांक १०/१२/२०२०

महाराष्ट्र राज्यात कोविड १९ या विषाणुच्या उद्रेकाच्या काळात राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रोत्साहन भत्ता लागुकरण्याकरीता पत्र देण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यात कोविड १९ या विषाणुचा उद्रेकाच्या काळातसदर साथ नियंत्राणात आणण्याच्या दृष्टीने व रुग्णांवर उपचार करण्याकरीता प्रजनन व बालआरोग्य (RCH-II) अभियानातील अधिकारी व कर्मचारी त्यांच्या जीवाची पर्वा न करता व त्यांना स्वत:ला सदर रोगाची लागण होईल याची तमा न बाळगता अहोरात्र कार्यरत आहे.तरी अश्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता लागु करण्यात आले आहे. असेसदर पत्रात नमुद आहे. संदर्भियक्र. 3 नुसार महानगरपालिका अंतर्गत प्रजनन व बाल आरोग्य (RCH-II) कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना सदर कोविड—19 प्रोत्साहन भत्ता संबंधित महानगरपालिका यांच्या निधीतुन देण्याबाबत मनपा स्तरावर निर्णय घेण्यात यावाअसे नमुद आहे.

तरी धुळे महानगरपालिका धुळे प्रजनन व बालआरोग्य (RCH-II) अभियाना अंतर्गत कार्यरत १४ अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी 12 अधिकारी व कर्मचारी कोविड १९ या प्रोत्साहन भत्ता लागु करण्यांत आलेला आहे. **सदर प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर करण्यांत आला आहे.**

धुळे महानगरपालिकेतील स्वच्छता कर्मचारी देखील कोरोनाच्या काळात अतिशय चांगल्या पद्धतीने काम केले आहे शासन निर्णय तपासून त्यांनादेखील प्रोत्साहन भत्ता लागू करण्याबाबत कार्यवाही करावी व तसा प्रस्ताव पुढील स्थायी समितीच्या बैठकीत सादर करावा

सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ८४ १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत देवपूर भागातील प्र. क्र. ३ मधील इस्लामपुरा भागात २० सिट सार्वजनिक शौचालय बांधणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सईद बेग विषय मंजूर करण्यांत यावा.

म. युवराज पाटील विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने १४ व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे अनुज्ञेय रक्कमेस व आलेल्या निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे. १४ व्या वित्त आयोग खर्चाचा कालावधी तपासणे सदर कालावधी संपलेली असल्यास नव्याने मंजुरी घेण्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९७ दिनांक १०/१२/२०२०

१४ व्या वित्त आयोगांतर्गत देवपूर भागातील प्र.क्र.३ मधील इस्लामपुरा भागात २० सिट सार्वजनिक शौचालय बांधणे. कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.४६ दि.०६/०८/२०२० मा.आयुक्त सो. धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०६/०७/२०२० अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२७,०२,१६२/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.६७९ दि.०७/०९/२०२० अन्वये रक्कम रु. २७,०२,१६२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि./६७ दि. २८/०९/२०२० अन्वये दि.२८/०९/२०२० रोजीचे देशदूत / खानदेश मैदान या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१६/१०/२०२० रोजी अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	मे.गायत्री कन्सट्रक्शन	शे.५.००% जास्तीने	
२	प्रियदर्शनी कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर
३	अे.के.सैफी	शे.१.००% जास्तीने	

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कंत्राटदार मे.प्रियदर्शनी **कन्सट्रक्शन** यांनी दि.११/११/२०२० रोजी दिलेल्या पत्रात शे.१% कमी दराने काम करण्यास सहमती दशविलेली आहे. तरी मे.प्रियदर्शनी **कन्सट्रक्शन** यांच्या शे.१% कमी दरास मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवलास अधिन राहून सदर कामी मे. प्रियदर्शनी कन्स्ट्रक्शन यांनी दिलेल्या लेखी पत्रानुसार शे.१% कमीच्या दरांस मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच १४ व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सुचनां प्रमाणे अनुज्ञेय रक्कमेस व आलेल्या निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे. १४ व्या वित्त आयोग खर्चाचा कालावधी तपासणे सदर कालावधी संपलेली असल्यास नव्याने मंजुरी घेण्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल.

सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ८५ बडगुजर प्लॉट येथे नवीन ESR जलकुंभ बांधणेचे कामास दि.३१/१२/२०१४ ते २८/०८/२०१८ पर्यंत मुदत वाढ देणे व देयक अदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुंळे:- या ठेकेदारास यापूर्वीही मुदतवाढ दिलेली आहे त्यांना किती वेळा मुदतवाढ द्यावी त्याचे काही नियम आहेत किंवा नाही मी पुर्ण टिपणीचे वाचन केलेले आहे ठेकेदार काम पूर्ण का करत नाही या प्रस्तावात माहिती घेऊन चर्चा करावी व नंतरच निर्णय घ्यावा.

म.कमलेश देवरे:- ठेकेदाराने यापूर्वी काम केलेले आहे परंतु तांत्रिक व पर्यायी अडचणीमुळे कामास विलंब झालेला आहे तरी मुदतवाढ देण्यास हरकत नाही.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदरचे काम वेळेत पूर्ण न केल्याने तसेच प्रशासनाने मागणी केले प्रमाणे नमूद कालावधीकरिता प्रतिदिन पाच रूपये या प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यांचे अधिन राहून मुदतवाढ देणेस व देयक अदा करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९८ दिनांक १०/१२/२०२०

धुळे महानगरपालिका अंतर्गत बडगुजर प्लॉट येथे नविन ESR जलकुंभ बांधणेचे कामास मंजुरी देण्यास आलेली होती त्यानुसार श्री.एम.आर.जाधव यांना जा.क्र./ पा.पु.वि./ 105/ दि.5/5/2007 अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात होता.

धुळे महानगरपलिका अंतर्गत बडगुजर जलकुंभेचे नवीन जलकुंभ बांधणेचे काम श्री.एस.आर जाधव,ठेकेदार धुळे यांना देण्यात आली होती.व त्यांना दि.31/12/2014 पावेतो मुदतवाढ स्थायी पावेतो ठराव क्र.71/दि.27/8/2010अन्वये देण्यात आली होती.परंतु ठेकेदाराच्या आर्थिक अडचणीमुळे व मनपा धुळे यांना वीज जोडणीसाठी,नवीन जलकुंभ वितरण व्यवस्थेस जोडणेसाठी व वाढीव अश्वशक्तीचे (७५ HP) पपिंग मशनरी बसविणेसाठी इ.कामे पूर्ण करणेस वाढीव अवधी लागला त्यामुळे कामास विलंब झाला.त्यामुळे जलकुंभाच्या कामास दि.31/12/2014 ते 28/8/2018 पावेतो मुदतवाढ देण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांना अधिकार देणेसाठी स्थायी समितीचा ठराव होणेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदरचे काम वेळेत पूर्ण न केल्याने तसेच प्रशासनाने मागणी केले प्रमाणे नमूद कालावधीकरिता प्रतिदिन पाच रूपये या प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यांचे अधिन राहून मुदतवाढ देणेस व देयक अदा करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-८६ प्र.क्र.१९ मध्ये रहेबर बाग सर्वे नं.436 येथे ओपनस्पेसला संरक्षण भिंत बांधणेचे एस्टीमेट रु. रु.31,07,151/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हिना पठाण विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९९ दिनांक १०/१२/२०२०

धुळे मनपा हद्दीतील प्र.क्र.19 मध्ये रहेबर बाग सर्वे नं.436 येथे ओपनस्पेसला संरक्षण भिंत बांधणे कामाबाबत सन्मा.सदस्या श्रीमती हिना पठाण यांनी यादी सादर केलेली असून प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केलेली असता सदर ठिकाणी मनपाच्या नावावरील मोकळी जागा असून अतिक्रमण होण्याची दाट शक्यता आहे.म्हणून सदर ठिकाणी संरक्षण भिंत बांधणे गरजेचे आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसूची सन 2019-20 नुसार रु.31,07,151/-मात्र खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन विकास शुल्क (बेटरमेंट चार्जेस) अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास व खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ८७ धुळे मनपा अंतर्गत प्रभाग क्र.६ मध्ये विविध ठिकाणी व्हॉल व पाईप लाईन टाकणेचे काम तांतडीने विना निविदा करुन घेण्यांत आलेत त्यासाठी झालेला खर्च रुपये4,93,645/-मात्रला मनपा अधिनियमचे प्रकरण 5(2)(2) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. युवराज पाटील विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावात नमूद झालेला खर्च रुपये4,93,645/-मात्रला मनपा अधिनियमचे प्रकरण 5(2)(2) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०० दिनांक १०/१२/२०२०

धुळे मनपा अंतर्गत प्रभाग क्र.6 मध्ये पशु मोराणे पशु वैद्यकीय दवाखाना ते प्रकाश पाटील पाईप लाईन,छ.शिवाजी पुतळा,बजरंगचौक, म्हसोबा चौकअशा विविध ठिकाणी व्हॉल व पाईप लाईन टाकणे बाबत. सन्माननीय सदस्य यांनी मागणी केलेली आहे.

त्यामुळे उक्त भागातील पाणी पुरवठा बंद असून कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने तबडताब पाईप लाईन व व्हॉलचे काम आवश्यक आहे. त्यांनुसार त्या कामास अंदाजीत खर्च रु. 4,93,645/- मात्र येणार असून ते काम पाणी पुरवठ्याशी संबंधीतअसल्याने त्वरीत करावे लागणार आहे.

त्यानुसार सदरचे काम हे प्रियंका मजुर सह. सोसायटी, धुळे यांच्याकडून विना निविदा करवायचे आहे. तरी सदरच्या कामास मनपा अधिनियम 1949 चे प्रकरण 5 (2) (2) नुसार सदर कामाचा खर्च रु.4,93,645/- मात्रच्या खर्चास मे. स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावात नमूद झालेला खर्च रुपये4,93,645/-मात्रला मनपा अधिनियमचे प्रकरण 5(2)(2) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ८८ धुळे मनपा हद्दीत प्रि.बजेट अंतर्गत प्रभाग क्रमांक १० मध्ये वरखेडी रोड अनवर नाला ते वरखेडी गाव दरवाजा रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कमलेश देवरे सदर निविदा कोणत्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध केलेले आहे याचा उल्लेख कार्यालयीन अहवालात आम्हाला दिसून येत नाही

म.नगरसचिव सदर प्रस्ताव बांधकाम विभागामार्फत नगरसचिव विभागाकडे सादर झालेला आहे त्यांनी ज्याप्रमाणे कारण अहवाल सादर केला तसा अहवाल स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

म. सी.सी. बागुल सदर कामी ई निविदा प्रसिद्ध झालेली आहे ये व वर्तमानपत्रात देखील निविदा प्रसिद्ध झालेली आहे नियमाप्रमाणे कायदेशीर प्रक्रिया याबाबत पूर्ण झालेली आहे.

म.सभापती

संबंधित अभियंत्यांनी निविदा प्रक्रिया कायदेशीर झालेली आहे.असा खुलासा केलेला आहे. महासभेने दिलेल्या प्री. बजेट मान्यतेप्रमाणे व प्रशासनाने त्याबाबत स्विकारलेले दायित्व तसेच प्रशासनाचा आलेला अहवाल व संबंधित निविदा प्रक्रिया इ. सर्व बाबी विचारात घेवून प्रस्तावित मंजुरी दरास मान्यता देण्यांत येत आहे. मा प्रशासनाने पुढील कामाचे आदेश देण्यापूर्वी उपलब्ध निधी व तरतूद इ. तपासावी. कोणतेही अतिरिक्त दायित्व तयार होणार नाही याची जबाबदारी प्रशासनाची राहील.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०१ दिनांक १०/१२/२०२०

धुळे मनपा हद्दीत प्रि.बजेट अंतर्गत प्रभाग क्रमांक १० मध्ये वरखेडी रोड अनवर नाला ते वरखेडी गाव दरवाजा रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे स्थायी समिती ठराव क्रमांक ४७दिनांक०६/०८/२०२०रोजीच्या मा.आयुक्त सो. यांच्या टिपणी मंजुरीने दिनांक २५/०८/२०२०अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रू.६२,४२,०००/- मात्र खर्चाची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्रमांक ५७१ दिनांक २३/०३/२०२० अन्वये रक्कम रू.६२,४१,९२९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र. / बा.वि. /५८ /२०२० दिनांक ०७/०९/२०२० अन्वये दिनांक ०७/०९/२०२० रोजी दैनिक ---- या अंकात प्रसिध्द केली असता मुदतीत दि.२८/०९/२०२०पावेतो अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	भुषण लक्ष्मण चौधरी	शे.३% जास्तीच्या दराने	
२	ऋषभ सतिष खिवसरा	शे.२% जास्तीच्या दराने	
३	एकविरा कन्स्ट्र.	अंदाजपत्रकीय दराने	सर्वात कमी दर

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.एकविरा कन्सट्रक्शन यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमाप्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने असल्याने सर्वात कमी दर आहेत. तरी मे. एकविरा कन्सट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे सादर करण्यांत आलेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार महासभेने दिलेल्या प्री. बजेट मान्यतेप्रमाणे व प्रशासनाने त्याबाबत स्विकारलेले दायित्व तसेच प्रशासनाचा आलेला अहवाल व संबंधित निविदा प्रक्रिया इ. सर्व बाबी विचारात घेवून प्रस्तावित मे. एकविरा कन्स्ट्रक्शन यांच्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 नुसार मान्यता देण्यांत येत आहे. मात्र प्रशासनाने पुढील कामाचे आदेश देण्यापूर्वी उपलब्ध निधी व तरतूद इ. तपासावी. कोणतेही अतिरिक्त दायित्व तयार होणार नाही याची जबाबदारी प्रशासनाची राहील.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ८९ धुळे मनपा मालकीच्या विविध आरक्षित जागेत विकास करण्यासाठी वास्त विशारद /प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे करिता निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कमलेश देवरे:- सदर प्रस्तावात नमूद आराक्षणाच्या जागा नेमक्या कुठे आहेत याबाबत खुलासा करावा. आरक्षण विकसित करण्यासाठी वास्तुविशारद नियुक्त करण्याचा विषय आहे यासाठी वास्तुविशारद याची आवश्यकता आहे का याची माहिती द्यावी.

म.पी.डी.चव्हाण:- प्रस्तावात पाच जागा असून देवपूर सर्वे नंबर २८ २ येथे आयुक्त निवासस्थान बांधणे आरक्षण क्रमांक ४१ मध्ये बगीचा विकसित करणे आरक्षण क्रमांक ४२ मधील व्यापारी संकुल बांधणे आरक्षण क्रमांक ४३ मध्ये मल्टीपर्पज भवन बांधणे आणि मनपा शाळा क्रमांक ५२ २८ १७ येथे आरक्षण विकसित करणे अशा जागा असून यापैकी सर्व्हे नंबर २८/२ ही जागा नवरंग जलकुंभ जवळची असून तेथे ३हेक्टर जागा आहेत त्या जागेवर आरक्षण आहेत तसेच इतर शाळांच्या जागांवर असणारे आरक्षण विकसित करावयाचे आहे.

म. हिना पठाण:- बीओटीवर व्यापारी संकुल बांधून महानगरपालिकेचा कोणताही फायदा होणार नाही यापूर्वी मनपा शाळा क्रमांक २१ व मनोहर टाकी समोर व्यापारी संकुल बांधलेल्या आहेत त्यांचा कोणताही फायदा झालेला नाही सदरचे काम कोणत्याही परिस्थितीत बीओटी, बीओएल या तत्वावर किंवा अन्य कार्यपद्धतीने देण्यास आमचा विरोध आहे.

म.अमोल मासुळे:- सदर टिपणी सविस्तर अहवाल नमूद नाही त्यांनी आवश्यक ती माहिती दिलेली नाही. नाही सदरचे काम बीओटीवर देणार किंवा कशा पद्धतीने देणार व नेमक्या जागा कुठे आहेत किती ती जागा आहे त्यावर नेमके आरक्षण कोणती आहे याबाबत सविस्तर टिपणी सादर होणे आवश्यक होते. याबाबत सविस्तर अहवाल मागून चर्चा करण्यात यावी तोपर्यंत सदर विषय तहकुब ठेवावा.

म. सभापती :- सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चानुसार सदर टिपणीत सविस्तर अहवाल नमूद नाही तसेच आवश्यक ती माहिती दिलेली नाही. नाही सदरचे काम बीओटीवर देणार किंवा कशा पद्धतीने देणार व नेमक्या जागा कुठे आहेत किती ती जागा आहे त्यावर नेमके आरक्षण कोणती आहे याबाबत सविस्तर टिपणी सादर होणे आवश्यक होते. याबाबत सविस्तर व स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा तो पावेतो सदर विषय तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यात येते आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०२ दिनांक १०/१२/२०२०

धुळे मनपाचा देवपूर स.नं. २८/२ आरक्षित जागेत म.आयुक्त निवासस्थान बांधणे २)आरक्षण क्र. ४१ मध्ये बगीचा विकसित करणे ३) आरक्षण क्र. ४२ मध्ये व्यापारी संकुल बांधणे ४) आरक्षण क्र. ४३ मध्ये मल्टी पर्पज भुवन बांधणे ५) मनपा शाळा क्र. ५,२,२८,१७ येथे येथील आरक्षण विकसित करणे कामी वास्तू विशारद / प्रकल्प सल्लागार नेमणूक करणे बाबत मा.आयुक्त सो., यांनी दि.३१/०७/२०२० अन्वये टिपणी मंजुरी देण्यात आलेली आहे.

तरी उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र. /पापुवि /३१७ / २०२० दि. १७/०९/२०२० अन्वये दि.१८/०९/२०२० रोजीचे दै.पुण्य नगरी / वार्ता या अंकात ई- निविदा प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०७/१०/२०२० निविदा धारकांचे खालीलप्रमाणे दर आलेले आहे.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा	शेरा

१	देवरे धामणे आर्कीटेक्ट, नाशिक	शे.२.६०%	(संभाव्य अंदाजपत्रकीय खर्चाच्या)
२	परमेश असोसीएटीव, नाशिक	शे.१.९५%	(संभाव्य अंदाजपत्रकीय खर्चाच्या)
३.	मे.सावकार प्लॅनर्स, नाशिक	शे.१.७४%	(संभाव्य अंदाजपत्रकीय खर्चाच्या) सर्वात कमी दर

व

री प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर मे.सावकार प्लॅनर्स, नाशिक यांचे शे.१.७४% आलेले आहे. तरी उक्त मे.सावकार प्लॅनर्स, नाशिक यांचे दर हे जास्तीचे आलेले असल्याने संबंधितांना इकडील जा.क्र./पा.पु.वि./४९० दि.१२/११/२०२० अन्वये दर वाटाघाटीस बोलविले असता सदर ठेकेदार यांनी म. आयुक्त सो., यांचे समक्ष सदरचे काम शे. १.७४% ऐवजी शे. १.२४% ने करणेस तयारी दर्शविलेली आहे. तसेच निविदा अटी शर्ती नुसार सदर कामाची वास्तू विशारद फी ज्या विकासकाची निविदा मंजुरी होईल त्या विकासकाकडूनच टप्प्या टप्प्याने मनपा मार्फत अदा केली जाईल.

तरी दर वाटाघाटी अंती मे.सावकार प्लॅनर्स,नाशिक यांनी दि.१९/११/२०२०रोजी दिलेले पत्रानुसार दर शे.१.२५% ने करणेस संमती दर्शविलेली आहे.तथापि सदरचे काम शे.१.२५% दराने करणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केलेले आहे. सबब सदर काम शे.१.२५% दराने देणेबाबत मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चानुसार सदर टिपणीत सविस्तर अहवाल नमूद नाही तसेच आवश्यक ती माहिती दिलेली नाही. नाही सदरचे काम बीओटीवर देणार किंवा कशा पद्धतीने देणार व नेमक्या जागा कुठे आहेत किती ती जागा आहे त्यावर नेमके आरक्षण कोणती आहे याबाबत सविस्तर टिपणी सादर होणे आवश्यक होते. याबाबत सविस्तर व स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा तो पावेतो सदर विषय तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यात येते आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १० वलवाडी स.नं.७३/अ जागेवर भाजी मंडई व व्यापारी संकुल विकसित करणे कामासाठी वास्तू विशारद यांची नेमणूक करणे करिता निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे सदर प्रस्तवाही वरीलप्रमाणेच असल्याने सदरचा प्रस्ताव तहकुब करण्यात यावा.

म.सभापती सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चानुसार सदर टिपणीत सविस्तर अहवाल नमूद नाही तसेच आवश्यक ती माहिती दिलेली नाही. नाही सदरचे काम बीओटीवर देणार किंवा कशा पद्धतीने देणार व नेमक्या जागा कुठे आहेत किती ती जागा आहे त्यावर नेमके आरक्षण कोणती आहे याबाबत सविस्तर टिपणी सादर होणे आवश्यक होते. याबाबत सविस्तर व स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा तो पावेतो सदर विषय तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यात येते आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०३ दिनांक १०/१२/२०२०

धुळे मनपा हद्दीतील वलवाडी स.नं.७३/अ जागेवर भाजी मंडई व व्यापारी संकुल विकसित करणे कामासाठी आर्किटेक्ट नेमणूक करणेबाबतच्या कामासाठी इकडील

कार्यालयीन ई-निविदा सूचना जाक्र/धुमपा/बां.वि/३३/दि.०८/०७/२०२० नुसार दै.दिव्य मराठी या वृत्तपत्रात प्रसिद्ध केली असता खालील प्रमाणे निविदाधारकांनी भाग घेतला आहे.

अ.क्र.	ठेकेदाराचे नाव	निविदा दर	शेरा
१)	मे.देवरे धामणे आर्किटेक्ट नाशिक.	२.७०%	L२
२)	सावकार प्लॅनर्स,नाशिक.	२.४५%	L१

उक्त कामी ठेकेदार सावकार प्लॅनर्स,नाशिक यांची २.४५% (सर्वात कमी दर) दराची निविदा आहे.तथापि सदर ठेकेदार यांना इकडील कार्यालयीन पत्रजा.क्र/धुमपा / बां.वि/२६४/ दि.१७/११/२०२० नुसार दर वाटाघाटी साठी बोलविले असताठेकेदार सावकार प्लॅनर्स,नाशिक यांनी सदरचे काम प्रकल्प किमतीच्या १.२५% दराने करण्यास तयार असल्याबाबत पत्र दिले आहे.त्यानुसार ठेकेदार सावकार प्लॅनर्स, नाशिक यांचे दर मंजुरीकरिता सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चानुसार सदर टिपणीत सविस्तर अहवाल नमूद नाही तसेच आवश्यक ती माहिती दिलेली नाही. नाही सदरचे काम बीओटीवर देणार किंवा कशा पद्धतीने देणार व नेमक्या जागा कुठे आहेत किती ती जागा आहे त्यावर नेमके आरक्षण कोणती आहे याबाबत सविस्तर टिपणी सादर होणे आवश्यक होते. याबाबत सविस्तर व स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा तो पावेतो सदर विषय तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यात येते आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९१ धुळे शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड फायनल प्लॉट नं.१५३ या आरक्षित जागेवर खाजगी करणातून बी.ओ.टी./ बी.ओ.एल. टी. या तत्वावर व्यापारी संकुल विकसित करणे कामासाठी वास्तू विशारद तज्ञ / प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे करिता निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे सदर प्रस्तवाही वरीलप्रमाणेच असल्याने सदरचा प्रस्ताव तहकुब करण्यात यावा.

म.सभापती सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चानुसार सदर टिपणीत सविस्तर अहवाल नमूद नाही तसेच आवश्यक ती माहिती दिलेली नाही. नाही सदरचे काम बीओटीवर देणार किंवा कशा पद्धतीने देणार व नेमक्या जागा कुठे आहेत किती ती जागा आहे त्यावर नेमके आरक्षण कोणती आहे याबाबत सविस्तर टिपणी सादर होणे आवश्यक होते. याबाबत सविस्तर व स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा तो पावेतो सदर विषय तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यात येते आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०४ दिनांक १०/१२/२०२०

धुळे शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड फायनल प्लॉट नं. १५३ या आरक्षित जागेवर खाजगी करणातून बी.ओ.टी. / बी.ओ.एल. टी. या तत्वावर व्यापारी संकुल विकसित करणे कामासाठी वास्तू विशारद तज्ञ / प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे बाबत मा.आयुक्त सो., यांनी दि.२२/०९/२०२० अन्वये टिपणी मंजुरी देण्यात आलेली आहे.

तरी उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र. /पापुवि /३३० / २०२० दि.२८/०९/२०२० अन्वये दि.२९/०९/२०२० रोजीचे दै.पुण्य नगरी / आपला नवराज्य या

अंकात ई- निविदा प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.२०/१०/२०२० निविदा धारकांचे खालीलप्रमाणे दर आलेले आहे

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	देवरे धामणे आर्कीटेक्ट, नाशिक	शे.२.४०%	(संभाव्य अंदाजपत्रकीय खर्चाच्या) **सर्वात कमी दर**
२	झेड.ए. आर्कीटेक्ट,	शे.३.००%	(संभाव्य अंदाजपत्रकीय खर्चाच्या)

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **मे.देवरे धामणे आर्कीटेक्ट, नाशिक** यांचे शे.२.४०% आलेले आहे. तरी उक्त **मे.देवरे धामणे आर्कीटेक्ट,नाशिक** यांचे दर हे जास्तीचेआलेले असल्याने संबंधितांना इकडील जा.क्र./बां.वि./५३७ दि. २७/११/२०२० अन्वये दरवाटाघाटीस बोलविले असता सदर ठेकेदार यांनी म. आयुक्त सो., यांचे समक्ष सदरचे काम शे.२.४०% ऐवजी शे.१.२५% ने करणेस तयारी दर्शविलेली आहे.

तरी दर वाटाघाटी अंती **मे.देवरे धामणे आर्कीटेक्ट,नाशिक** यांनी दि.०१/१२/२०२० रोजी दिलेले ई- मेल संदेशानुसार दर १.२५% ने करणेस संमती दर्शविलेली आहे. तथापि सदरचे काम १.२५% दराने करणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केलेले आहे. सबब सदर काम १.२५%दराने देणेबाबत मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चानुसार सदर टिपणीत सविस्तर अहवाल नमूद नाही तसेच आवश्यक ती माहिती दिलेली नाही. नाही सदरचे काम बीओटीवर देणार किंवा कशा पद्धतीने देणार व नेमक्या जागा कुठे आहेत किती ती जागा आहे त्यावर नेमके आरक्षण कोणती आहे याबाबत सविस्तर टिपणी सादर होणे आवश्यक होते. याबाबत सविस्तर व स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा तो पावेतो सदर विषय तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यात येते आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९२ धुळे महानगरपालिका हद्दीतील पाईपलाईन वरील लिकेजेस काढणे याकरिता ३ वर्ष मुदती करिता वार्षिक निविदा दर मागविणेत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे तीन वर्ष मुदती करता पाईपलाईन लिकेज विषय घेण्यात आलेला आहे या विषयात देखील सविस्तर माहिती देण्यात आलेली नाही

म. सभापती श्री पी.डी. चव्हाण यांनी माहिती सादर करावी.

म. पी डी चव्हाण सदर प्रस्ताव लिकेज काढण्याचा असून तीन वर्षासाठी हा प्रस्ताव आहे यात तीन निविदा प्राप्त झालेल्या होत्या. धुळे शहरातील लिकेज काढण्यासाठी जे काही साहित्य लागते त्यानुसार आइटम रेट मागवण्यात आलेले आहेत ते शेकडा आठ टक्के कमी आलेले आहेत त्यानुसार दर मान्यतेसाठी सदर प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर केलेला आहे.

म. अमोल मासुळे मागे स्थायी समितीमध्ये देखील लिकेजेच्या खर्चाबाबत प्रस्ताव आले होते.

म. पी डी चव्हाण सदर प्रस्तावातील दर ॲटम प्रमाणे मागवलेले आहे आहे त्यावेळेस आपण लिकेजेच्या कामाचे इस्टिमेट करून टेंडर काढले होते त्यामुळे सदर प्रस्ताव मागील स्थायी समितीसमोर आलेला होता आता आपण आइटम रेट प्रमाणे निविदा दर मागवले आहेत.

म. सभापती — यापूर्वी आपण महानगरपालिके मार्फत चार भागातील लिकेजेस काढण्यासाठी टेंडर काढलेल्या होते ते वेगळे आहे का.

म. पी डी चव्हाण — ते टेंडर एका वर्षासाठी होते.

म.सभापती — सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चा व उपस्थित सदस्यांच्या सहमतीने यापूर्वी ३ प्रभागांची पाईप लाईन लिकेजस बाबत निविदा प्रक्रिया राबविण्यांत आलेली आहे. त्याबाबत तुलनात्मक दरांबाबत सविस्तर अहवाल सादर करावा तो पावेतो सदर विषय तहकूब ठेवण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०५ दिनांक १०/१२/२०२०

धुळे महानगरपालिका हद्दीतील पाईपलाईन वरील लिकेजेस काढणे याकरिता ३ वर्ष मुदती करिता वार्षिक निविदा दर मागविणे बाबतच्या कामाची इकडील कार्यलयामार्फत ई - निविदा सूचना क्र.२६/ दि.२४/०६/२०२० रोजी ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.तसेच दै.दिव्य मराठी/श्रमराज्य या वर्तमान पत्रात प्रसिद्धी देण्यात आली होती.सदर ई-निविदेत दि.१६/०७/२०२० रोजी तांत्रिक लिफाफा उघडणे निश्चित होते.त्यानुसार सदर कामी तांत्रिक लिफाफा उघडला असता एकूण ३ निविदाधारकांनी विहित मुदतीत निविदा सादर केली आहे.ते खालीलप्रमाणे-

१)ए.के.सैफी, २)साई कृपा बी.बी.एस.एस.एस.एस.लि.धुळे., 9३)गायत्री कन्सट्रक्शन

सदर कामाची ई-निविदा Item Rate नुसार असल्याने त्यानुसार उपरोक्त निविदा धारकांनी खालीलप्रमाणे निविदा दर सादर केले आहे.

अ.क्र	कंत्राटदारठेकेदराचे नाव/	दिलेले निविदा दर	शेरा
१	ए.के.सैफी	शे.८.०० % कमीने (सर्व बाबी करिता)	L१
२	साई कृपा बी.बी.एस.एस.एस. धुळे	अंदाजपत्रकीय दर (सर्व बाबी करिता)	L२
३	गायत्री कन्सट्रक्शन	शे.१०% जास्तीने (सर्व बाबी करिता)	L३

उक्त कामी ठेकेदार ए.के.सैफी यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांचे दर मंजुरीकरिता व करारनामा करताना ३ वर्षाचे दर freeze करणे तसेच उक्त कामाच्या खर्चाची तरतूद करणेबाबत सदरचा विषय मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चा व उपस्थित सदस्यांच्या सहमतीने यापूर्वी ३ प्रभागांची पाईप लाईन लिकेजस बाबत निविदा प्रक्रिया राबविण्यांत आलेली आहे. त्याबाबत तुलनात्मक दरांबाबत सविस्तर अहवाल सादर करावा तो पावेतो सदर विषय तहकूब ठेवण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९३ — धुळे मनपा हद्दीतील घन कचरा संकलन व वाहतूक करणे कामी नियुक्त वॉटरग्रेस प्रॉडक्स नासिक यांच्या आलेल्या खुलाशा संदर्भात निर्णय घेणेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे:- — वॉटर ग्रेस ही संस्था अनेक वर्षांपासून कार्यरत आहे त्या संस्थेबाबत आणि तक्रारी आलेले आहेत प्रशासनाच्या टिपणीच्या अधीन राहून आयुक्तांनी याबाबत समिती गठीत करून निर्णय घ्यावा तोपावेतो प्रशासनाने तातडीने नवीन निविदा प्रसिद्ध करून त्यात आवश्यक त्या अटी व

शर्तीच्या समावेश करून कार्यवाही करावी. सदरचे काम चांगल्या प्रकारे होईल याची दक्षता घ्यावी तसेच इतर महानगरपालिकेतील कार्यपद्धतीचा अभ्यास करावा इंदोर सारख्या शहरात चांगल्या प्रकारे काम केले जाते त्यांच्याकडूनही माहिती घ्यावी आयुक्तांनी याबाबत समिती गठीत करून स्थायी समितीपुढे स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा.

म. हिना पठाण:- प्रभागात आठ दिवस घंटागाडी येत नाही सदर संस्थेची वागणूक अत्यंत बेजबाबदारपणाची आहे तसेच बेजबाबदारपणे उत्तरे दिली जातात त्याची कचराची फार मोठी समस्या आहे सदर संस्थेच्या कार्य पद्धती बाबत अनेक तक्रारी आहेत सदर संस्थेला काळया यादीत टाकण्यात यावे.

म. सभापती:- मी आपल्या मताशी सहमत आहे प्रशासनाच्या वतीने सध्या माझी वसुंधरा अभियान स्वच्छ सर्वेक्षण मोहीम हे उपक्रम सुरू आहेत आपण त्यासाठी सर्वजण प्रयत्न करीत आहोत अशा परिस्थितीत जर सदर संस्थेने काम बंद केले तर आपल्याकडे पर्याय उपायोजना काय आहेत याची माहिती द्यावी.

म. चंद्रकांत जाधव:- सदर संस्थेचे काम समाधान कारक नाही याबाबत त्यांना वारंवार नोटिसा दिल्या आहेत व वारंवार दंडात्मक कार्यवाही केलेली आहे परंतु त्यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा होत नाही. 15 ते 20 वाहने दररोज बंद असतात त्यामुळे तक्रारी वाढत आहेत नियमाप्रमाणे ओला व सुका कचरा वर्गीकरण करणे आवश्यक असते परंतु तीही कार्यवाही होत नाही. याबाबत वारंवार नोटिसा दिलेले आहेत जर संस्थेने काम बंद केले तर नवीन निविदा प्रक्रिया करण्याची कार्यवाही सुरू केलेली आहे व त्या प्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे.

म. सभापती:- आपल्या कडील वाहने सदर संस्थेला वापरासाठी दिलेले आहे. त्यांची परिस्थिती काय आहे.

म.चंद्रकांत जाधव:- आपल्या 79 छोट्या गाड्या सदर संस्थेला दिलेल्या आहेत व नऊ 406 गाड्या म्हणजे जवळपास 89 गाड्या संस्थेकडे आहेत परंतु आजच्या परिस्थितीत 70 ते 80 टक्के गाड्या सुरू आहेत.

म. सभापती:- निविदा प्रक्रिया राबवण्यासाठी किती दिवस लागणार आहेत.

म.चंद्रकांत जाधव:- आपण निविदा प्रक्रिया सुरू केलेली आहे मागील अनुभव व त्रुटी लक्षात घेऊन आपण सर्व बाबींचा विचार करून निविदा ड्राफ्ट तयार करण्यासाठी नागपूर येथील एजन्सी नियुक्त केलेले आहे त्यांच्यामार्फत सुक्ष्म अटी शर्तींचा समावेश करून निविदा ड्राफ्ट प्राप्त तयार करण्यात आलेला आहे व त्याची प्रक्रिया सुरू आहे या कालावधी साधारण दोन महिने लागण्याची शक्यता आहे.

म. सभापती:- तोपर्यंत कचरा बिलकुल करू नये संकलनाची व्यवस्था कशी होईल. सदर संस्था ही पोहोचलेली संस्था आहे त्या संस्थेचे अनेक ठिकाणी काम सुरू आहेत. व कामा बाबतही तक्रारी आहेत सदर संस्थेला काळया यादीत टाकण्यापूर्वी कायदेशीर बाबी तपासणे आवश्यक आहे याबाबत न्यायालयीन बाब निर्माण झाली तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहे वास्तविक सदर बाब ही प्रशासनाची निगडित बाब आहे दर प्रस्ताव स्थायी समितीसमोर येणे गरजेचे नव्हते या प्रस्तावाबाबत प्रशासनाच्या वतीने त्यांच्या अधिकारात कार्यवाही होणे आवश्यक होते जर संबंधित संस्था न्यायालयात गेली व त्यांनी स्थायी समिती व जबाबदारी निश्चित केली व नुकसान भरपाई मागवली तर ती गंभीर प्रसंग निर्माण होऊ शकतो सदरच्या प्रस्तावाबाबत प्रशासनाने त्यांच्या अधिकारात निर्णय घेणे आवश्यक होते जर आपण आज कारवाई केली तर काम बंद होऊ शकते निविदा प्रक्रियेत दोन महिन्याचा कालावधी लागणार आहे तो पर्यंत आपण काम करणार आहोत सध्या साथीचे रोग सुरू आहेत नागरिकांच्या आरोग्याचा देखील प्रश्न आहे सदर बाब न्यायालयीन प्रक्रियेत येण्याची शक्यता आहे.

ठेकेदाराला काळया यादीत टाकून प्रश्न सुटणार नाही हा प्रशासनाचा भाग आहे महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय आहे.घनकचरा व्यवस्थापनाची अंमलबजावणी आयुक्त यांनी करावयाची आहे ठेकेदारावर जर तक्रारी असतील तर त्यांना देयके अदा करू नये असे शासन निर्देश आहेत सदर संस्थेला प्रथम बिल देताना त्यामध्ये लेखापरीक्षकांनी अभिप्राय नमूद केलेले आहेत त्याबाबत काय पूर्तता झाली याचीही ही तपासणी होणे आवश्यक आहे. ठेकेदारावर कारवाई करताना नागरिकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता व काळजी घेणे गरजेचे आहे.

सदरच्या कार्यालयीन अहवालानुसार व सन्मा सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार वॉटरग्रेस कंपनी ही पूर्णत: दोषी असल्याचे आढळून आलेले असून त्यांनी निविदा अटी शर्ती करारनाम्याचे सकृतदर्शनी पूर्णत: उल्लंघन केले असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रशासनाने सादर केलेल्या अहवालानुसार वरील बाबींचा विचार करता वॉटरग्रेस कंपनीबाबत उचित निर्णय् घेण्यासाठी म.आयुक्तांनी त्याच्यास्तरावर समिती गठित करून त्या समितीचा स्वंयस्पष्ट अहवाल व निर्णय मे.स्थायी समितीपुढे सादर करावा.तसेच सदर संस्थेमार्फत नियुक्त कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदानुसार मानधन अदा केले नसल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. याबाबत प्रशासनाने खातरजमा करावी व त्या स्वरूपाची कार्यवाही झालेली नसल्यास संबंधित संस्थेविरूध्द करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार उचित कारवाई करण्यात यावी. सदरबाबतीत न्यायालयीन प्रक्रिया निर्माण होण्याची शक्यता असल्याने याबाबत सक्षम न्यायालयात कॅव्हेट दाखल करणेबाबत कार्यवाही करावी. व सदरचे कंत्राटदाराचा करार दि.३१/१२/२०२० पावेतो संपुष्टात आणून प्रशासनाने दि.१ जानेवारी २०२१ पावेतो तात्काळ नवीन मक्तेदार नियुक्तीची निविदा प्रक्रिया कार्यवाही करावी व कोणत्याही परिस्थितीत धुळेकर नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी व त्यानुसार प्रशासनाने पर्यायी व्यवस्था करावी. तसेच संबंधित संस्थेला महानगरपालिकेमार्फत वाहने पुरविण्यात आलेली आहे. सदर संस्थेचा ठेका रदद करण्यापुर्वी सर्व वाहनांची दुरूस्ती करून घेणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०६ दिनांक १०/१२/२०२०

धुळे महानगरपालिका हद्दीतील घनकचरा संकलन व वाहतुक करण्याचे काम वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक या संस्थेस देण्यात आले आहे. संस्थेच्या कामाबाबत संस्थेस वारंवार नोटीस व दंडात्मक कार्यवाही करुनही कामात सुधारणा करीत नसल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे संस्थेस काळया यादीत का टाकण्यात येऊ नये याबाबत जा.क्र./धुमपा/ आरोग्य/ २८७ दि.२४/९/२०२० अन्वये नोटीस देवुन खुलासा मागविण्यात आला होता. संस्थेने सदर खुलासा असमाधानकारक व उडवाउडवीचा सादर केल्याने जा.क्र./ धुमपा/ आरोग्य /३०३ दि. ६/१०/२०२०अन्वये पत्र देवुन दि.८/१०/२०२० रोजी सुनावणीसाठी बैठक बोलविण्यात आली होती. सदर बैठकीत संस्थेचे प्रोप्रायटर श्री.चेतन बोरा व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. व संस्थेस १५ दिवसात आपले शेवटचे म्हणणे मांडण्यासाठी कामात सुधारणा करण्यासाठी अंतीम संधी देण्यात आली होती. सदर बैठकीत नंतर संस्थेने दि.२७/१०/२०२० रोजी खालील प्रमाणे खुलासा सादर केला आहे.

धुळे महानगरपालिकेने घनकचरा संकलन व वाहन करीता वाहनाचे काम ३ वर्षाकरीता आमच्या संस्थेस दिलेले आहे. सदरची निविदा १६८ टिपीडी कचरा शहरात निर्माण होईल असा अंदाज करुन ३ वर्षाकरीता रक्कम रु.१७,७९,१६,९१४/- करीता ई-निविदेद्वारे करण्यात आलेली आहे. कचरा संकलन व वाहतुक करीता आमची रक्कम रु.प्रति दिन ९१८/-

कमी दराची निविदा स्विकारुन महानगरपालिकेसोबत दिनांक ७/३/२०१९ रोजी करारनामा करुन दिलेला आहे.

सदर करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार वॉटरग्रेस प्रॉडक्टस ही संस्था धुळे महानगरपालिकेचे कचरा संकलन व वाहतुकीचे काम करीत आहे. सदर काम करीत असतांना संस्थेस विविध प्रकारे अडचणीला सामोरे जावे लागत आहे.

१) धुळे महानगरपालिकेने कचरा वाहतुकीकरीता खरेदी केलेल्या वाहनांमधुन कचरा वाहतुक करण्याची क्षमता ही कमी आहे. धुळे शहराचा भौगोलीक विस्तार विचारात घेता सदर वाहनांना लागणाऱ्या या इंधनावरील खर्च हा मोठ्या प्रमाणात येत आहे.

२) धुळे महानगरपालिकेने पुरविण्यात आलेल्या वाहनांमार्फत संपुर्ण शहरासाठी सेवा देऊ शककत नाही. त्यामुळे आमच्या संस्थेने स्वखर्चाने जवळपास ४० ते ४५ वाहने लावुन कचरा संकलित करीत आहे. सदर वाहनांचे भाडे देण्याबाबत निविदेत व करारनाम्यात तरतुद नसल्यामुळे संस्था हि स्वत: सदरचा भुर्दंड सोसत आहे. त्यामुळे संस्थेवर अतिरीक्त आर्थिक जबाबदारी पडत आहे.

३) धुळे मनपासोबत झालेल्या करारनाम्यानुसार पान क्र.१४ आर्टिकल ५ मुद्दा क्र.५.१ (बी) अनुसार धुळे मनपाने सदरील कामाचे देयक दरमहा १० तारखेच्या आत मे.वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांना अदा करावयाचे आहे परंतु धुळे मनपाने कधीही १० तारखेच्या आत सदर कामाचे देयक अदा केलेले नाही. त्यामुळे देखील आम्हास आर्थिक कसरतीला सामोरे जावे लागत आहे.

४) घनकचरा संकलनसाठी वाहनांवरती लागणारे वाहनचालक व मजुर हे स्थानीक स्तरावर घेण्यात आलेले आहे.सदर वाहनचालक व मजुर यांच्या अंतर्गत वादामुळे संस्थेस काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहे. सदर कामावर नियंत्रण ठेवणाऱ्या पर्यवेक्षक अधिकाऱ्यांनाही मोठ्या प्रमाणात मानसिक त्रास होत आहे.

५) कोवीड-१९ विषाणुंच्या प्रादुर्भावामुळे सदर ठेक्या अंतर्गत काम करणाऱ्या कामगारांची कोवीड-१९ विषाणुमुळे आजारी पडण्याच्या भितीमुळे काम करण्याची मानसिकता नाही. त्यामुळे सदरील कामगार कामावर येण्यास नकार देतात अथवा चालढकल करत असतात त्यामुळे देखील काम करणे अवघड झाले आहे.

६) सदर निविदा काढतेवेळी धुळे महानगरपालिकेने जास्तीत जास्त अपेक्षित प्राकलन धुळे मनपा क्षेत्रात दैनंदीन १६८ मे.टन कचरा निर्माण होतो असे धरुन निविदा काढण्यात आल्या त्या अनुषंगाने आम्हास कचरा संकलन करण्याच्या मक्ता मिळालेला आहे. परंतु आपणांस कळवु इच्छीतो की सदरील दैनंदीन १६८ मे.टन याचे प्राकलन हे चुकीचे झालेले असुन धुळे महानगरपालिका क्षेत्रामध्ये आमचेमार्फत सर्वसाधारणपणे २००ते२५० मे.टन दैनंदीन कचरा संकलन केला जात आहे.सदरील कचऱ्याचे संकलन हे आपण दिलेल्या निविदा अटी शर्तीमध्ये दिलेल्या प्राकलनापेक्षा दैनंदीन १६८ मे.टनापेक्षा जास्त आहे. १६८ मे.टन पेक्षा जास्त कचरा संकलन केल्यास धुळे महानगरपालिकेच्या स्वच्छता निरीक्षकांमार्फत कचरा संकलन करणेस मज्जाव केला जातो त्यामुळे देखील कचरा हा शहरात पडुन राहतो.

७) इंधन,वेतन तसेच नियंत्रण व पर्यवेक्षणावरील खर्च कोविड-१९ च्या कालावधीत मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे कंपनीवर आर्थिक बोजा पडला आहे. लोकांची मानसिकता नाही. याबाबत महानगरपालिकेकडून कोणतीही आर्थिक मदत व दरवाढ मिळालेली नाही. त्यामुळे कंपनीस मोठ्या प्रमाणात तोटा सहन करावा लागत आहे.

८) कचरा संकलन व वाहतूक करिता कचरा डेपोवरील रस्ते व रेम्प तसेच करारनाम्यातील नमूद केल्याप्रमाणे आवश्यक त्या सुविधा महानगरपालिकेकडून प्राप्त होण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आहे.

९) कंपनीस कामाचे आदेश मिळाल्यापासून ते आजपावेतो खर्च व उत्पन्नाचा अंदाज घेतला तर मोठ्या प्रमाणात तोटा सहन करावा लागत आहे. सदरचा तोटा संस्थेस भविष्यातही सहन करावा लागणार आहे इंधनाच्या दरातील वाढ, महागाईच्या दरातील वाढ महागाईच्या निर्देशांकातील वाढ उपलब्ध अपुऱ्या पायाभूत सुविधा वाहनाची कचरा संकलन व वाहतूक करण्याची क्षमता विचारात घेता भविष्यात संस्थेस काम करणे खुप अडचणीचे होणार आहे. त्यामुळे आपणास विनंती करण्यात येते संस्थेस येणाऱ्या आर्थिक अडचर्णीचा विचार करता संस्थेला सदर काम करण्यास स्वारस्य राहिले नसून आमची सदरची निविदा करारनामा पृष्ठ क्र.१८ व १९ (b) TERMINATION FOR AUTHORITY'S EVENT DEFAULT मुददा क्र. २ व। नुसार रद्द करून नियमानुसार तसेच निविदा कार्यादश घेण्यावेळी जमा केलेली सुरक्षा अनामत व नियमित बिलातून कपात केलेली सुरक्षा अनामत आम्हास परत करावे, विनंती

१०) धुळे मनपातर्फे आमच्या दरमहाच्या बिलानून कपात केलेली व आम्हास लागू नसलेली GST, शासकीय विमा, लेबर चार्जेस, सरचार्जेस इत्यादी कपात केलेली आहे. तरी सदरील रक्कम आम्हास परत मिळावी याबाबत आम्ही वेळोवेळी धुळे मनपाच्या लेखा विभागास लागू होत नसलेबाबत कळविलेले आहे, तसेच याबाबत लेखी स्वरूपात देखील कळविलेले आहे. तरी आम्हास लागू नसलेली परंतु आमच्या दरमहाच्या देयकातून कपात केलेली रक्कम परत करण्यात यावी, ही नम्र विनंती.

११) करारनामा अटीशी पृष्ठ क्र.१९व २०आर्टिकल ८ मुद्दा क्र .८.१ AMICABLE RESOLUTION अन्वये सदर निविदेबाबत विचार करावा

१२) कचरा संकलन व वाहतूक ही शहराच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून अत्यावश्यक सवा असल्यामुळे जोपर्यंत पर्यायी व्यवस्था महानगरपालिका करत नाही अथवा जोपर्यंत आमच्या विनंतीनुसार ठेका बंद करण्याबाबत आदेश होत नाही तोपर्यंत संस्था काम करणार आहे. कृपया आमच्या विनंतीचा सहानुभूतीपूर्वक विचार होऊन योग्य कार्यवाही व्हावी ही विनंती.

तरी उक्त बाबत मा.आयुक्त सो.यांच्याशी समक्ष केलेल्या चर्चेअंती वॉटरग्रसे प्रॉडक्टस,नाशिक हे काम समाधानकारक करीत नसल्याने नविन ई-निविदा प्रसिध्द करणे बाबत निर्देश दिले आहे. त्यानुसार घनकचरा संकलन व वाहतुक कामी प्रारुप निविदा व मुल्यमापन अहवाल तयार करणेसाठी आर.जगताप असोसीएट अँड कन्सल्टंट अँड इंजिनीयरींग सर्व्हिसेस, नागपुर यांना जा.क्र./ धुमपा/आरोग्य/ ३७३, ३७४ दिनांक १९/११/२०२० अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

तरी सदर संस्थेने सादर केलेला खुलासा हा असमाधानकारक असुन उडवा उडवीचा आहे.तरी याबाबत संबंधीत संस्थेस काळ्या यादीत टाकावे किंवा मुद्दा क्र.८.१ AMICABLE RESOLUTION (कंत्राटदार व मनपा यांच्यात काहि वाद विवाद झाल्यास पहिल्यांदा शांततेने सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल तसेच १५ दिवसाच्या आत चर्चा करावी लागेल आणि वाद मिटविण्याचा प्रयत्न केला जाईल) याबाबत स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

सदरच्या कार्यालयीन अहवालानुसार व सन्मा सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार वॉटरग्रेस कंपनी ही पूर्णत: दोषी असल्याचे आढळून आलेले असून त्यांनी निविदा अटी शर्ती करारनाम्याचे सकृतदर्शनी पूर्णत: उल्लंघन केले असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रशासनाने सादर केलेल्या अहवालानुसार वरील बाबींचा विचार करता वॉटरग्रेस कंपनीबाबत उचित निर्णय् घेण्यासाठी म.आयुक्तांनी त्याच्यास्तरावर समिती गठित करून त्या समितीचा स्वंयस्पष्ट अहवाल व निर्णय मे.स्थायी समितीपुढे सादर करावा.तसेच सदर संस्थेमार्फत नियुक्त कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदानुसार मानधन अदा केले नसल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. याबाबत प्रशासनाने खातरजमा करावी व त्या स्वरूपाची कार्यवाही झालेली नसल्यास संबंधित संस्थेविरूध्द करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार उचित कारवाई करण्यात यावी. सदरबाबतीत न्यायालयीन प्रक्रिया निर्माण होण्याची शक्यता असल्याने याबाबत सक्षम न्यायालयात कॅव्हेट दाखल करणेबाबत कार्यवाही करावी. व सदरचे कंत्राटदाराचा करार दि.३१/१२/२०२० पावेतो संपुष्टात आणून प्रशासनाने दि.१ जानेवारी २०२१ पावेतो तात्काळ नवीन मक्तेदार नियुक्तीची निविदा प्रक्रिया कार्यवाही करावी व कोणत्याही परिस्थितीत धुळेकर नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी व त्यानुसार प्रशासनाने पर्यायी व्यवस्था करावी. तसेच संबंधित संस्थेला महानगरपालिकेमार्फत वाहने पुरविण्यात आलेली आहे. सदर संस्थेचा ठेका रदद करण्यापुर्वी सर्व वाहनांची दुरूस्ती करून घेणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x

सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९४ धुळे महानगरपालिका हद्दीतील (हद्दवाढ गावासह) संपुर्ण मिळकतीचे तांत्रिक व अद्ययावत यंत्रणेव्दारे पुर्नमुल्यांकन / रिव्हिजन करणे बाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कमलेश देवरे जे सर्वेक्षण होणार आहे त्या प्रॉपर्टी धारकांना कशाप्रकारे आकारणी केली जाणार आहे व त्यासाठी प्रक्रिया काय असणार आहे याचा आवश्यक खुलासा करावा.

म.सभापती सदर प्रस्ताव बाबत उपायुक्त यांनी सविस्तर खुलासा करावा.

म.उपायुक्त प्रशासनामार्फत स्थायी समितीसमोर सविस्तरपणे विषय सादर केलेला आहे आपल्या धुळे मनपा चा जर अभ्यास केला तर आपणास घरपट्टी व पाणीपट्टी हे उत्पन्नाचे दोन प्रमुख स्त्रोत आहेत पूर्वी जकात कर होता नंतर एलबीटी कर लागू झाला आता एलबीटी सुद्धा बंद झालेले आहे त्यामुळे सध्या घरपट्टी व पाणीपट्टी हे प्रमुख उत्पन्न आहे घरपट्टी च्या बाबतीत आपण अभ्यास केला तर हद्दवाढ झाल्यानंतर खूप मोठ्या प्रॉपर्टीज शहरात समाविष्ट झालेले आहेत व शहरातील अनेक प्रॉपर्टी असून काही मध्ये मोठ्या प्रमाणावर बदल देखील झालेले आहेत वसुली विभागात सध्या तीस ते पस्तीस कर्मचारी आहेत दर महिन्याला कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत कर्मचाऱ्यांनी कितीही प्रामाणिकपणे काम केले व त्याप्रमाणे आकारणी केली तरी त्याबाबत साशंकता निर्माण होऊ शकते याबाबत नागरिकांचे समाधान होईलच असे नाही सदरा कानी करण्याचे काम यापूर्वी आपण मॅन्युअली स्वरूपात करत होतो. पण आता नवीन टेक्नॉलॉजी निर्माण झालेली आहे याचा आपल्याला कसा वापर करता येईल याबाबत चर्चा

केली व त्यातून अन्य महापालिका तील कार्यपद्धतीचा अभ्यास केला पनवेल कल्याण-डंबिवली तसेच अन्य ठिकाणी जीपीएस यंत्रणेमार्फत शहरातील प्रॉपर्टीचे असेसमेंट केलेली आहे. आपल्याकडे असेसमेंट मध्ये असमानता आहे. आपल्याकडे स्वत:हून नागरिक घरपट्टी आकारण्याची मागणी करतात पण आपण मनुष्यबळाअभावी व यंत्रणा अभावी वेळेवर कार्यवाही करू शकत नाही त्याकरिता हा उत्पन्नाचा महत्त्वाचा भाग असलेला घरपट्टी आकारणी करण्याची कार्यवाही मजबूत करणे आवश्यक आहे व सर्व प्रॉपर्टी धारकांना समान न्याय कसा मिळेल या अनुषंगाने हा प्रस्ताव विचारपूर्वक प्रशासनामार्फत तयार करण्यात आलेला आहे.या प्रस्तावामुळे घरपट्टी मध्ये कोणत्याही प्रकारची करवाढ व घरपट्टी वाढ होणार नाही यामध्ये महानगरपालिका हद्दीतील ज्या प्रॉपर्टी ना टॅक्स आकारणी नाही अशा प्रॉपर्टी ना टॅक्स आकारणी होणार आहे. सदर यंत्रणा पूर्णपणे कॉम्प्युटर राईस यंत्रणा आहे ही यंत्रणा अत्यंत सदोष असून यात कोणताही फेरफार अथवा बदल करता येणार नाही आपल्याकडे सर्वसाधारणपणे घरपट्टी आकारणीच्या दोन पद्धती आहेत यात एक भांडे मूल्यावर आधारित व भांडवली मूल्यावर आधारित कर आकारणी आहेत व त्याप्रमाणे असेसमेंट करण्यात येते यापुढे शासन भांडवली मूल्यांवर आधारित कर आकारणी करणे बाबत निर्णय घेत आहेत. त्यानुसार संबंधित संस्थेची चर्चा करून भविष्यात शासनाच्या निर्णयाप्रमाणे कर आकारणी करावयाची झाल्यास त्याप्रमाणे प्रणालीत आवश्यक ते फेरबदल व त्यानुसार कार्यवाही करता येईल येईल अशी पद्धती तयार करण्यात आलेली आहे यासाठी त्यांना कोणताही अतिरिक्त मोबदला द्यावा लागणार नाही सदर एजन्सीद्वारे संपूर्ण सॅटेलाईटद्वारे सूक्ष्म पद्धतीने मोजणी व सर्वेक्षण होणार आहे सदर सर्वेक्षण अत्यंत अद्ययावत मशिनरी व साहित्याद्वारे होणार आहे त्यासाठी त्यांचे प्रशिक्षित तांत्रिक कर्मचारी व अधिकारी नियुक्त आहेत आपल्या संपूर्ण मालमत्तेची मोजणी होऊन त्यांचे रेकॉर्ड तयार होणार आहे त्यांचे असेसमेंट करणे घरपट्टी आकारणी करणे त्यांचे बिल वाटप करणे नागरिकांच्या हरकती बाबत सुनावणी घेणे अंतिम यादी प्रसिद्ध करणे तसेच सदर टेक्नॉलॉजी व यंत्रणा पाच वर्षांपर्यंत कार्यरत ठेवणे या सर्व बाबी प्रस्तावात अंतर्भूत आहेत सदर यंत्रणा अत्यंत पारदर्शकअसल्यामुळे महापालिकेच्या मालमत्तांची माहिती क्षणार्धात मिळू शकणार आहे प्रशासनाने जाणीवपूर्वक व त्यांचा अभ्यास करून प्रस्ताव सादर केलेला आहे हा दीर्घकालीन उत्पन्न वाढीसाठी व शहरासाठी अत्यंत आवश्यक प्रस्ताव आहे यामुळे निश्चितच उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे तसेच सर्वांवर मालमत्ताना एक समान पद्धतीने हाताळणे होणार आहे. यामध्ये आपल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकर्तीचे सुद्धा सर्वेक्षण मोजणी व मूल्यांकन होणार आहे त्यामुळे आपल्याला त्याचा मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे.

म.कमलेश देवरे — अतिशय चांगला प्रस्ताव आहे परंतु आपण नागरिकांना करआकारणी करताना मागील सहा वर्षाची कर आकारणी करतो यापुढे कशा पद्धतीने आकारणी करणार आहेत.

म.उपायुक्त — सदरची कार्यवाही व निर्णय हा प्रशासनाचा भाग आहे आपण याबाबत आवश्यक ते पुरावे तपासून त्याप्रमाणे निर्णय घेण्याची जबाबदारी महापालिकेची आहे.

म.सभापती — अतिशय चांगला प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर झालेला आहे यामुळे महापालिकेचे उत्पन्नातही भरीव वाढ होऊन उत्पन्न मिळणार आहे. कार्यालयीन अहवालास अधिन राहून आलेले मे. स्थापत्यकन्सटंटस अमरावती यांच्यावाटाघाटी अंती आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 अन्वये मान्यता देण्यांत येत आहे.आकारणीची कारवाई करताना नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यायची आहे तसेच संबंधित एजन्सी अटी व शर्तीचा भंग करणार नाही याबाबत एजन्सीला आदेश प्रशासनामार्फत देण्यात यावेत तसेच

एजन्सी नेमके कशा प्रकारचे काम करणार आहे याबाबतची माहिती स्थायी समितीच्या सदस्यांना व्हावी यासाठी पुढच्या बैठकीत एजन्सीलाआपल्या कार्यवाहीचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी बोलवण्यात यावेत.

तसेच सदर संस्थेने काम सुरु केल्यानंतर प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे मुल्यांकन व तपासणी करुन संस्थेस त्याप्रमाणे टप्प्याटप्याने देयके अदा करण्यात यावी. तसेच संस्थेमार्फत करण्यात आलेल्या कामाची तपासणी प्रशासनामार्फत करण्यात यावी. व तपासणीनंतरच देयके अदा करण्यात यावीत.मनपाच्या उत्पन्नात या प्रस्तावामुळे भरीव वाढ होणार आहे. तथापी संस्थेच्या कार्यपध्दतीमुळे नागरीकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. संस्थेच्या कार्यपध्दतीमुळे वाद किंवा नागरीकांना त्रास झाल्यास सदर संस्थेचा ठेका रदद करण्याबाबत कार्यवाही करावी. याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येत आहे. तसेच सदर संस्थेचे कामानंतर अंतिम देयक देण्यापुर्वी संस्थेने केलेल्या कामाचा संपुर्ण तपशील व अहवाल स्थायी समितीसमोर सादर करावा.प्रशासनाने कार्यालयीन अहवालात प्रस्तावित केलेल्या खर्चापेक्षा जादा खर्च होत असल्यास त्यासाठी प्रथम मे. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असेल याबाबत संबंधीत संस्थेकडुन वरील बाबींचा उल्लेख करुन आवश्यक त्या अटीशर्तींचा करारनामा करण्यात यावा.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०७ दिनांक १०/१२/२०२०

धुळे मनपा शहर हद्दीमध्ये सन 1992-93 पासुन संपुर्ण मालमत्तेचे फेर आकारणी झालेली नाही सन 1996-97 व 2001 या वर्षात फेर आकारणीचे काम हाती घेण्यात आले असता प्राधिकृत मुल्यनिर्धारण अधिकारी उपलब्ध न झाल्याने फक्त नवीन मालमत्तांचे आकारणीची कार्यवाही करण्यात आली तसेच 2007-08 मध्ये सन 1992-93 नंतरच्या व2001-02 पुर्वीच्या मालमत्तांचे पुर्नमुल्यांकण करण्यात येऊन 40% कर आकारणीत वाढ करण्यात आलेली असून दर 5वर्षांनी फेर मुल्यांकण करावयाची कार्यवाही मनुष्यबळाअभावी व (कर्मचारी) मुल्यनिर्धारण अधिकारी नसल्याने झाली नाही.

2014-15 या आर्थिक वर्षात 11 कलमी कार्यक्रमांअतर्गत जुने पाडून नविन वापरात बदल असे अंदाजित 2000 मालमत्तांचे मोजमाप करण्यात आले.

उक्त परिस्थितीचे अवलोकन केले असता.

१) धुळे शहरातील सर्व जुने नविन मालमत्तांचे पुर्नमुल्यांकण 15 वर्षात झालेले नाही.
२) सन 2011-12 मध्ये मालमत्ता कर विभागात लागलेल्या अग्नीकांडची घटना घडल्याने सन 2010 पुर्वीचे रेकॉर्ड नष्ट झालेले आहे.
३) संपुर्ण मालमत्ता नकाशा सहित रेकॉर्डवर उपलब्ध नाही.
४) अद्ययावत यंत्रणा व अनुभवी कर्मचारी उपलब्ध नाही. इमारतीचे वय निश्चित होत नाही. वार्डाची रचनेप्रमाणे रेकॉर्ड नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार महानगरपालिकेस दर पाच वर्षांनी हद्दीतील संपुर्ण मिळकती यांचे पुर्नमुल्याकंन करणे आवश्यक आहे.संपुर्ण मालमत्तांचा जी.आय.एस.आधारीत प्रत्यक्ष स्थळ सर्वेक्षण करुन युनिक प्रापर्टी ऑथेरीटी कोड नोंदणी वही तयार करणे, मुल्यांकनाकरीता तांत्रिक सर्वेक्षण मनपा निर्देशात माहिती संकलीत करणे अद्यावत संगणीकृत नकाशे काढणे वार्ड निहाय मालमत्तांचे डिजीटल फोटो काढणे संगणीकृत नकाशे फोटो डेटावरुन जोडणे,झोन प्रमाणे नकाशा तयार करणे, सर्व मुल्य निर्धारण ऑनलाईन

मुल्यानिर्धारण सेवा तसेच ऑनलाईन मालमत्ता कर भरणा प्रणाली व्दारा सुधारीत मुल्यांकण करणे अभिप्रेत आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिका हद्दीतील एकुण 77000 मालमत्ता संगणक नोंदणीकृत आहेत मात्र वाढते नागरीकीकरण नविन बांधकामे जुने बांधकामात सुधारणा करुन झालेल्या सुधारीत वाढीव बांधकामे बघता प्रत्यक्ष जागेवर जाऊन 100% मिळकतीची नोंदणी करणे आवश्यक आहे त्यामुळे मोठया प्रमाणावर अद्याप कर न लागलेल्या अथवा वाजवी कर आकारणी न झालेल्या मालमत्ता निवडता येतील व त्यांच्यावर कर आकारणी करुन मनपाचे मोठया प्रमाणावर उत्पन्न वाढविणे शक्य होईल अशा इमारतींना शासकीय अधिसुचना पत्रक दर18/04/2011चे सुधारीत कलम अन्वये 6 वर्षापासुन कर आकारणीचे अधिकार मनपास प्राप्त झाल्याने आता पर्यंत कर न लागलेल्या मिळकतीची आकारणी करुन उत्पन्न वाढविता येईल.

सद्यपरिस्थितीत मालमत्ता कर विभाग एकुण 61 डिमांडसाठी ५ निरिक्षक व 28 मालमत्ता कर लिपीकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.आजच्या स्थितीत जनरल रिव्हिजन करावयाचे असल्यास शहराचा झालेला विस्तार बघता तसेच शासनाच्या आदेशानुसार हद्दवाढ होऊन 11 गावांचा समावेश झाल्याने मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्याकरीता मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. मालमत्ता कर विभागातील मनुष्यबळ लक्षात घेता जनरल रिव्हिजन करण्यासाठी बराच अवधी लागेल. व मनुष्यबळही अधिक लागेल. त्यामुळे संपूर्ण शहराचे (हद्दवाढ सह)पुर्ण मुल्यांकन व रिव्हीजन करण्याबाबत आवश्यक आहे.

त्या नुसार प्रशासनामार्फत उक्त संपूर्ण वस्तुस्थितीचा विचार करता याकामी ई निविदा व्यापक वृतपत्रात प्रसिध्द करण्या बाबत निर्णय घेण्यांत आलेला होता.

त्यानुसार योग्य त्या प्रक्रियेव्दारे ई निविदा प्रसिध्द करण्यांत आली. सदर निविदेतील दुसरी फेर निविदा(तिसरी वेळ) मधील निविदाधारकांची ऑनलाईन पध्दतीने निविदा संख्या पडताळणी कामी मंजुरी मिळाल्यानंतर दिनांक 17/04/2020 रोजी निविदेत तिन(03) निविदा धारकांनी सहभाग नोंदविला असुन त्याची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

१) स्थापत्य कंन्सलटंट प्रा. लि.अमरावती
२) अर प्रोजेक्ट इंजिनीअर्स कंसल्टंट,प्रा.लि.अमरावती
३) कोलब्रो गृप, नागपुर

निविदेतील सहभागाती निविदाधारकांचे तांत्रीक लिफाफा उघडण्यात येऊन निविदा समितीचेमंजुरीने दि.15/08/2020रोजी समितीचे वतीने खालील 02 निविदाधारकांना Qualification Criteriअंतर्गत G-I,G-2,G-3 सॉप्टवेअर रजिस्ट्रशन,अनुभव, यापूर्वी 2 मनपाचे काम पुर्ण केले आहे. का, मनपाचे बाजार विभाग व पाणी पुरवठा विभागाचे काम केले आहे का इ.बाबत परिपुर्ण नसल्याने अ.क्रं.२ व ३ निविदा धारकांना अपात्र करण्यसात आले आहे.

निविदेतील ३ पैकी अ.नं.१ निविदा धारक मे.स्थापत्य कंनलटंट,अमरावती हे निविदेच्या अटी शर्ती Qualification Criteria मध्ये प्राप्त असल्याने तसेच निविदेची ३ री वेळ असल्याने ०१ निविदा धारक असल्यास निविदेचा वित्तीय दर लिफाफा उघडण्यांत आला असता सदरचे दर हे जास्तीचे असल्याने सदर निविदाधारकास दिनांक २०/११/२०२० रोजी निगोसिएशनसाठी म. आयुक्त सो. यांचे समक्ष बोलविण्यांत येवून चर्चा करण्यांत आली.

या निविदेत यापूर्वी असणारे अ.नं. १६,१७,१८ व १९ या कामाबाबत वाटाघाटीत चर्चा केली असता महानगरपालिकेस सद्यस्थितीत सदर कामाची आवश्यकता नसून सदर

कामांबाबत महानगरपालिकेशी संलग्न असणा-या बँकाशी करार करुन त्यांचे मार्फत सदरची कार्यवाही करण्याबाबत निश्चित करण्यांत आलेले आहे. उर्वरीत बाबी बाबत निगोसिएशन अंती मे.स्थापत्य कंन्सलटंट,अमरावती यांनी दिनांक२४/११/२०२०रोजी लेखी पत्राव्दारे खालील प्रमाणे दर सादर केलेले आहे.

Sl. No	Description of Work / Item(s)	No.of Qty	Units	STHAPATYA CONSULTANTS INDIA PVT. LTD.		
				Rate	TENDER RATE	Negotiontion Rate
1.	Property Tax Department. (Property Survey) -Carrying out all detail work mentioned in scope of work section 3A(II)	1.00	Per Property Unit	220	220	220
2	Property Tax Department. (Numbering, Computerization Of Entire Work, Assessment Of Property Tax And Allied Taxes etc.) -Carrying out all detail work mentioned in scope of work section 3A(I), 3A(III), 3A(IV),3A(V),3A(VI),3A(VII), 3A (VIII),3A(IX),3A(X),3A(XI),3A(XII)	1.00	Per Property Unit	360	360	340
3	Providing Annual maintenance and Supply for the property tax dept as providing yearly tax collection postings,Bills of taxes, demand registers and collection register etcwith preprinted multicolor stationary and maintaining the database etc as per tender document scope of work for 4 Year. as per scope of work section 3F(I).	1.00	Per Property Unit Per Year	115	115	82
4	Providing desktop Software for computerization of the property tax department as per Scope of work section 3E(I)	1.00	Unit	2000000	2000000	1500000
5	Providing Software for the Computerization of municipal counter payment for property tax department as per Scope of work section 3E(II)	1.00	Unit	1800000	1800000	1500000
6	Providing Software interface for door to door android based property tax collection as per Scope of work section 3E(III)	1.00	Unit	2000000	2000000	1500000

7	municipal asset management (Lands & Buildings) system -Carrying out all detail work mentioned in scope of work section 3B.					
8	For area upto 1000 Sq.mtr(Lands & Buildings)	1.00	Per Property Unit	4000	4000	3700
9	For area above 1000 sq.mtr for lands	1.00	Per Property Unit	5000	5000	4550
10	For area above 1000 sq.mtr for Buildings	1.00	Per Property Unit	8000	8000	7800
11	Providing Annual maintenance and Supply for the municipal asset Rent calculation and collection tax dept as providing yearly tax collection postings, Bills of taxes, demand registers and collection register etc with preprinted multicolor stationary and maintaining the database etc as per tender document scope of work for 4 Year. as per scope of work section 3F(VI).	1.00	Per Property Unit Per Year	150	150	120
12	Providing Software for computerization of the Municipal property asset,Computerization of municipal Rent counter payment and door to door android based municipal rent collection as per Scope of work section 3E(IV)	1.00	Unit	1500000	1500000	800000
13	Providing Annual maintenance and Supply for the water tax dept as providing yearly tax collection postings, Bills of taxes, demand registers and collection register etc with preprinted multicolor stationary and maintaining the database etc as per tender document scope of work for 4 Year. as per scope of work section 3F(VII).	1.00	Per Property Unit Per Year	101	101	70
14	Providing Software for computerization of the Municipal Water Tax, Computerization of municipal counter payment for water tax and door to door android based	1.00	Unit	1200000	1200000	1000000

	municipal water tax collection as per Scope of work section 3E(V)					

सदर कामी वार्षिक अंदाजे २ कोटी खर्च अपेक्षित आहे. तथापि सदर काम हे महानगरपालिकेच्या उत्पन्न् वाढीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असून मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे.

सदर निविदाधारकामार्फत हद्दावाढसह संपूर्ण मनपा हद्दीतील मालमत्ताचे अद्ययावत तंत्राव्दारे सर्व्हेक्षण् व पुर्नमुल्यांकन करण्यांत येणार असून आकारणी व वसुलीसाठी संगणकीय व्यवस्था,नळ कनेक्शन सर्व्हेक्षण, मनपा मालकीच्या मालमत्ताचे मुल्यांकन , व यासाठी आधुनिक व तांत्रिक यंत्रणा उभारणे इत्यादी कामे ५वर्षासाठी करण्यांत येणार आहे.

तरी मे. स्थापत्य कंन्सलटंट, अमरावती यांच्या निगोसिएशन अंती आलेल्या दरांस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे निर्णयार्थ सादर झालेला आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून आलेले मे.स्थापत्य कन्सटंटस अमरावती यांच्यावाटाघाटी अंती आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 अन्वये मान्यता देण्यांत येत आहे.आकारणीची कारवाई करताना नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यायची आहे तसेच संबंधित एजन्सी अटी व शर्तींचा भंग करणार नाही याबाबत एजन्सीला आदेश प्रशासनामार्फत देण्यात यावेत तसेच एजन्सी नेमके कशा प्रकारचे काम करणार आहे याबाबतची माहिती स्थायी समितीच्या सदस्यांना व्हावी यासाठी पुढच्या बैठकीत एजन्सीला आपल्या कार्यवाहीचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी बोलवण्यात यावेत.

तसेच सदर संस्थेने काम सुरु केल्यानंतर प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे मुल्यांकन व तपासणी करुन संस्थेस त्याप्रमाणे टप्प्याटप्याने देयके अदा करण्यात यावी. तसेच संस्थेमार्फत करण्यात आलेल्या कामाची तपासणी प्रशासनामार्फत करण्यात यावी. व तपासणीनंतरच देयके अदा करण्यात यावीत.मनपाच्या उत्पन्नात या प्रस्तावामुळे भरीव वाढ होणार आहे. तथापी संस्थेच्या कार्यपध्दतीमुळे नागरीकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. संस्थेच्या कार्यपध्दतीमुळे वाद किंवा नागरीकांना त्रास झाल्यास सदर संस्थेचा ठेका रदद करण्याबाबत कार्यवाही करावी. याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येत आहे. तसेच सदर संस्थेचे कामानंतर अंतिम देयक देण्यापुर्वी संस्थेने केलेल्या कामाचा संपुर्ण तपशील व अहवाल स्थायी समितीसमोर सादर करावा.प्रशासनाने कार्यालयीन अहवालात प्रस्तावित केलेल्या खर्चापेक्षा जादा खर्च होत असल्यास त्यासाठी प्रथम मे. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असेल याबाबत संबंधीत संस्थेकडुन वरील बाबींचा उल्लेख करुन आवश्यक त्या अटीशर्तींचा करारनामा करण्यात यावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे
नगरसचिव कार्यालय
स्थायी समिती सभा क्रमांक १८ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
मंगळवार दिनांक २२/१२/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज मंगळवार दिनांक २२/१२/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री. सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह धरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
४	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य
५	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
६	श्रीमती.उदासी कशीश गुलशन	सदस्या
७	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
८	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
९	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
१०	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
११	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
१२	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
१३	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१४	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या
१५	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
२	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
३	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार

४	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
५	श्री. डी.व्ही. जाधव	मुख्य लेखाधिकारी
६	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
७	डॉ. श्री महेश मोरे	आरोग्याधिकारी
८	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
९	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
१०	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल
११	श्री. रमजान अन्सारी	प्र. कार्यालय अधिक्षक
१२	श्री. आर.बी. सोनवणे	परवाना विभाग अधिक्षक
१३	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१४	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१५	श्री. सी.सी. बागुल	ओव्हरसिअर पा.पु.
१६	श्री. पी.डी. चव्हाण	ओव्हरसिअर बां.वि.
१७	श्री.हेमंत पावटे	ओव्हरसिअर बां.वि
१८	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
१९	श्री. किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख
२०	श्री.प्रसाद जाधव	प्र अतिक्रमण विभाग प्रमुख
२१	श्री. संजय गुजर	औषध भांडार
२२	श्री.महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी मनपा शि.मं.
२३	श्री.सुक्राम आत्या राऊत	मोटार वाहन विभाग

मा. सभापती — सन्मा. सदस्य मा. आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

नगरसचिव — धुळे महानगरपालिकेत मुख्य लेखाधिकारी पदी श्री. दिनकर जाधव यांची नियुक्ती झालेली आहे. सभागृहाच्या वतीने त्यांचा सन्मान व सत्कार याठिकाणी करण्यांत येत आहे.

मुख्य लेखाधिकारी पदी श्री. दिनकर जाधव यांनी सभागृहात परिचय दिला व त्यांचा सत्कार सभापती श्री. सुनिल बैसाणे यांच्या हस्ते करण्यांत आला.

सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचा अर्ज.

सभेच्या सुरुवातीस सन्मा.सदस्य श्री.सुनिल वसंतराव सोनार यांनी जवळच्या नातेवाईकाच्या अंत्ययात्रेस उपस्थिती देणेसाठी बाहेरगांवी जात असल्याने रजा मंजूर करणे बाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांनी त्यांच्या नातेवाईकांच्या अंत्ययात्रेस जावयाचे असल्याने सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजुरीबाबत विनंती केली आहे.तरी त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सन्मा.सदस्य सन्मा.सदस्य श्री.सुनिल वसंतराव सोनार यांनी जवळच्या नातेवाईकाच्या अंत्ययात्रेस उपस्थिती देणेसाठी बाहेरगांवी जात असल्याने रजा मंजूर करणे बाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/ - x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-९५ मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यत मंजुरी दिलेल्या कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर.
(दि.१५/१०/२०२० ते ११/१२/२०२०) अखेर

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती मा. आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु. 5 लाख ते 25 लाखापर्यत मंजुरी दिलेल्या बांधकाम विभागाकडील कार्यादेशाची वाचून माहिती देण्यांत आली.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०९ दिनांक २२/१२/२०२०

धुळे महानगरपालिका बांधकाम विभागाकडुन होत असलेल्या विकास कामासाठी दि. १५/१०/२०२० ते ११/१२/२०२० अखेर विकास कामांची निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी सोबत जोडली आहे. उक्त यादी मे.स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर करण्यांत आली आहे.

धुळे महानगरपालिका धुळे
(बांधकाम विभाग)

दिनांक :- १५/१०/२०२० ते ११/१२/२०२० अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

अ.क्र.	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामाचे नाव	रक्कम	निधी
१	१७४	१५/१०/२०२०	प्र.क्र.११ मध्ये बाळापुर शिवार एकता नगर येथे HDPE पाईपलाईनटाकणे.	६,५९,५१७/-	मनपा निधी अंतर्गत
२	१८५	२०/१०/२०२०	प्रभाग क्र.१३ मध्ये फिरदोसनगर भागात स्वेस उर्दु हायस्कुल जवळसराफ शेठ यांच्या घरापासुन ते कलाम रउफ यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ताकरणे.	९,९७,२२५/-	मनपा निधी अंतर्गत
३	१८६	२०/१०/२०२०	धुळेमनपा चक्करबर्डी पासुन ते पंचशील शाळे पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	९,९९,२९२/-	मनपा निधी
४	१९५	२८/१०/२०२०	धुळेमनपा हद्दीतील चितोड रोड अमरधाम येथील अंत्यविधीचे ओटे दुरुस्त करणे.	७,२३,१९७/-	अमरधाम दुरुस्तीअंतर्गत
५	१९६	०२/११/२०२०	प्रभागक्र.१९मध्ये सुलतानिया नगर भागात अलहेरा हायस्कूल जवळील गल्ली भागात कॉंक्रीट गटार करणे.	९,९६,९८८/-	मनपा निधीअंतर्गत
६	१९८	०२/११/२०२०	प्र.क्र.८मध्ये शिवाजी मार्केट मागे व मौलाना हायस्कूल समोर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.	६,०३,२१२/-	मनपा निधीअंतर्गत
७	१९९	०२/११/२०२०	प्र.क्र.४मधील आनंद नगर व प्रोफेसर कॉलनी भागातील खुल्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	७,०९,६९४/-	मनपा निधीअंतर्गत
८	२०५	०६/११/२०२०	प्रभागक्र.३ मधील इस्लामपुरा भागात डी.पी.ते फारुख फौजीयांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे.	६,७५,५२१/-	मनपा निधीअंतर्गत

९	२११	११/११/२०२०	प्र.क्र.१९मध्ये जामच्या मला चाळीसगाव रोड घरत नगर पासून ते आसिफ पठाण,अनिस हवालदार तेहुसेन मस्जिद तेयाकुब वायरमेन ते अनिस शहा इस्माईल वेंडर यांचे घरापर्यंत काँक्रीट गटार करणे.	१४,९५,८९१/-	मनपा निधीअंतर्गत
१०	२१२	११/११/२०२०	संघाप्पा कॉलनी येथील शिव मंदिर ओपनस्पेस मध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणे व काम्पोसिट पॅनल लावणे.	९,६६,५९२/-	मनपा निधी अंतर्गत
११	२२१	०४/१२/२०२०	प्रभाग क्र.८ मध्येकाझी प्लॉट मुनोद अन्सारी ते ८० फुटी रस्तापर्यंत सिमेंट कॉक्रीट गटार करणे.	९,९३,३७५/-	मनपा निधीअंतर्गत
१२	२२२	०४/१२/२०२०	धुळे मनपा हद्दीतीलप्रभाग क्र.२ मधील तापीमाई सोसायटीच्यानाल्यापासून ते श्री.अशोक सोनार यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	९,९९,४५२/-	मनपा निधीअंतर्गत
१३	२२३	०७/१२/२०२	प्र.क्र.९ मध्ये खुनीमस्जिद ते कोटेचा क्लासेस पावेतो आर.सी.सी. गटार करणे.	२२,८९,०८१/-	मनपा निधीअंतर्गत

सही/ - x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ९६ धुळे मनपाचा अग्निशमन केंद्र जवळील पाटबंधारे विभागाच्या पाटावरून मोगलाई साठी पाणीपुरवठा करणारी १५० एम.एम.दुरुस्तीचे काम तांतडीने विना निविदा करुन घेणे कामी आलेला रु.१,५१,४५२/- मात्र खर्चास मनपा अधिनियम १९४९ चा प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी आलेला खर्च रु. १,५१,४५२/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ (२) नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर११० दिनांक २२/१२/२०२०

धुळे मनपाचा अग्निशमन केंद्र जवळील पाटबंधारे विभागाच्या पाटावरून मोगलाई साठी पाणीपुरवठा करणारी १५०एम.एम. जुनी पाईप लाईन होती. सदर पाट हा धोकादायक झाल्यामुळे व सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रस्त्यास अडथळा येत असल्याने सदर पूल पाडण्यात आला त्यावेळी १५० एम.एम. पाईप लाईन फुटून पाणी पुरवठा विस्कळीत झाला होता. सदर ठिकाणी महानगरपालिकेने बांधलेल्या पुलावरून नविन पाईप लाईन टाकून पाणीपुरवठा सुरळीत करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे कामे हे नागरिकांचा पिण्याचा पाण्याच्या प्रश्न लक्षात घेता सदरचे काम करणे आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा श्री. संजय दगडू गायकवाड, ठेकेदार यांचे कडून करून घेणेत आलेले आहे. सदर कामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.१,५१,४५२/-मात्र आलेला आहे.

तरी सदर काम विना निविदा करणे कामी तसेच काम करणे कामी आलेला रु.१,५१,४५२/-मात्र खर्चास मनपा अधिनियम १९४९ चा प्रकरण ५(२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी आलेला खर्च रु. १,५१,४५२/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ (२) नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/ - x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९७

धुळे मनपा अंतर्गत फुलवाला चौक येथे ६०० एम.एम. मुख्य जलवाहिनी तसेच साक्री रोड मोगलाई मच्छीबाजार येथे लाईनवर एअर व्हाल नसल्यामुळे ती लाईन वारंवार तुटफुट लिकेज होत असल्याने दोन्ही कामे तांतडीने विना निविदा करुन घेणे कामी आलेला रु.४६,५५२/- मात्र खर्चास मनपा अधिनियम १९४९ चा प्रकरण ५(२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी आलेला खर्च रु. रु.४६,५५२/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ (२) नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १११ दिनांक २२/१२/२०२०

धुळे मनपा अंतर्गत फुलवाला चौक येथे ६०० एम.एम. मुख्य जलवाहिनी लिकेज झालेली असून लाखो लिटर शुद्ध पाण्याची नासाडी होत आहे. तसेच साक्री रोड मोगलाई मच्छीबाजार येथे लाईनवर एअर व्हाल नसल्यामुळे ती लाईन वारंवार तुटफुट होत असल्याने पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. त्यामुळे वरील दोघी कामे तातडीने व अत्यावश्यक करणे आवश्यक असल्याने व नागरिकांच्या पिण्याचा पाणी प्रश्न निर्माण झालेला असल्याने सदरचे काम श्री.संजय गायकवाड, ठेकेदार यांचे कडुन विना निविदा करून घेणेत आलेले आहे.

तरी सदरचे कामास अंदाजपत्रकीय खर्च रु.४६,५५२/- मात्र आलेला असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ५(२)(२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी आलेला खर्च रु. रु.४६,५५२/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ (२) नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/ - x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९८

कोव्हीड १९ रोगाचा प्रार्दुभाव रोखणे याकामी तातडीची खरेदी केलेल्या विविध साहित्य खरेदी करणेसाठी झालेला खर्च रु. रू९६,४१९/- मात्रला कार्यात्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी आलेला खर्च रु. रू९६,४१९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ (२) नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११२ दिनांक २२/१२/२०२०

शहरात कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव होऊ नये यासाठी केंद्रीय व राज्य शासनाच्या सुचनेनुसार उपाय योजनेची अंमलबजावणीसाठी म.आयुक्त सो यांचे दालनात झालेल्या तातडीच्या बैठकीत शहरात कोरोना रोगाचा प्रादुर्भाव टाळणे करीता उपाय योजना करणे संदर्भात म.आयुक्त यांनी सुचित केल्या प्रमाणे तातडीने साहित्य खरेदी करण्यात आले आहे.

तरी मागणी नुसार खालील प्रमाणे साहित्याचा तपशिल सादर करणेत येत आहे.

अ.क्र.	पुरवठादाराचे नाव	पुरविलेल्या साहित्य प्रकार	नग संख्या	दर	GST	एकुण रक्कम
१	न्यु सेंट्रल बुक स्टॉल	2 Q राजिस्टर	५०	८४.५०	७६२	५,०००
२	न्यु सेंट्रल बुक स्टॉल	४×६ बोथ साईड बोर्ड	०२	३,३९०	१२२०	८,०००
		३×४ बोथ साईड बोर्ड	०२	१,६९५	६१०	४,०००
		२×३ बोथ साईड बोर्ड	०२	८४७	३०४	२,०००
		व्हाईट बोर्ड मार्कर	१२	२१	४४	३००
		डस्टर	०४	४२	३०	२००
		मीटर स्केड	०२	१२७	४५	३००
३	न्यु सेंट्रल बुक स्टॉल	बॉक्स फाईल	०२	६७.८०	१४	३८०
		पंचींग मशिन	०१	६७.८०	१२	
		मार्कर	०५	४२.३७५	७	
		स्टॅम्प पॅड	०२	७६.२६	१३	
४	न्यु सेंट्रल बुक स्टॉल	२Q रजिस्टर	५३	८४.७५	८०८	५,३००
५	न्यु सेंट्रल बुक स्टॉल	१Q रजिस्टर	१००	५०.८५	९१४	६,०००
६	न्यु सेंट्रल बुक स्टॉल	१Q रजिस्टर	६७	५०.८५	६१३	४,०२०
७	न्यु सेंट्रल बुक स्टॉल	३Q रजिस्टर	५०	१२७.१२	१,१४४	१२,२१७
		A4 झेरॉक्स कागद	१०	१८३.९१	२२०	
		बॉक्स फाईल लहान	१०	५९.३२	१०७	
		बॉक्स फाईल मोठी	०५	६७.८०	६१	
		स्टॅपलर पीन	०३	१६,१०	९	
		पंचींग मोठे	०३	१२७.१२	६९	
		पेन्सिल	०३	४४.६४	१७	
		स्टॅपलर मोठे	०३	२५४.२५	१३७	
८	न्यु सेंट्रल बुक स्टॉल	2Q रजिस्टर	१००	८४.७५	१५२६	१०,०००
९	न्यु सेंट्रल बुक स्टॉल	१Q रजिस्टर	६४५	५०,८५	५,९०४	३८,७०२
				एकूण खर्च रूपये		**९६,४१९/-**

त्यानुसार खरेदी करणेस म.आरोग्य अधिकारी सो यांनी तातडीने मागणी केल्यानुसार न्यु सेंट्रल बुक स्टॉल यांचे कडुन साहित्य प्राप्त करण्यात आलेले आहे. तरी सदरचे पुरवठा धारक यांनी तातडीने साहित्याचा पुरवठा केला आहे

तरी प्राप्त साहित्याची नोंद भांडार विभाग कडील कोव्हीड रजिस्टर मध्ये पान नं------ वर नोंद घेण्यात आलेली आहे.

उपरोक्त साहित्य खरेदी ही जागतीक कोरोना प्रादुर्भाव रोखणे करीता व शहरातील नागरीकांना आरोग्य सुविधा पुरविणे साठी घेण्यात आलेले आहे.साहित्य खरेदी करीता धुळे म.न.पा निधी मधुन किंवा शासनाकडुन उपलब्ध होणारा निधी मधुन खर्च भागवता येणार आहे.

तरी सदरचे साहित्य प्राप्त बाबत म.सहा.आरोग्य अधिकारी सो., यांची कोवीड रजिस्टर वर स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

तरी वरील प्रमाणे काम तातडीचे असल्याने सदर काम करून घेण्यात आलेले आहे. तरी त्या करीता येणारा खर्च रक्कम रू.९६,४१९/-मात्र संपुर्ण कर GST सह असुन सदर करून घेण्यात आलेल्या कामास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच पुरवठा धारक यांचे बिल अदा करणेस महानगरपालिका अधिनियम५(२)(२)अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी मिळणेस मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी आलेला खर्च रु. रू९६,४१९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ (२) नुसार कायोत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/ - x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९९ धुळे मनपा मालकीच्या विविध आरक्षित जागेत विकास करण्यासाठी वासतु विशारद / प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे करिता निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे मागील बैठकीत सदर विषय तहकुब केले त्यानुसार प्रशासनाने आता सविस्तर टिपणी सादर केलेली आहे त्यात त्यांनी जागा क्षेत्र आरक्षण नमूद केलेले आहे यापूर्वी अनेक मनपा मालकीच्या जागांवर बीओटी तत्त्वावर शॉपिंग तथा अन्य कामे करण्यात आलेली आहेत आतापर्यंत असे किती कामे दिली गेलीत व त्यापासून मनपास किती उत्पन्न मिळाले याची माहिती मिळावी बीओटी तत्त्वावर शॉपिंग दिलेले आहेत त्यापासून मनपास किती उत्पन्न मिळाले आहे याची माहिती सभागृहात सादर करावी जर बीओटी तत्त्वावर मनपास आर्थिक लाभ नसेल तर मनपा मार्फत सदर आरक्षण विकसित करावे याबाबत मनपाच्या आर्थिक हिताचा विचार करावा व त्यानुसार निर्णय घ्यावा.

म. अभियंता धुळे मनपाच्याआरक्षित जागांवर आरक्षण विकसित करणे यासाठी सल्लागार तथा वास्तुविशारद निवड याबाबतची निविदा स्थायी समितीसमोर सादर केले आहे त्यातून प्रथम उपलब्ध जागेचे क्षेत्र त्याठिकाणी करावयाचे विकसन त्याचा आराखडा त्यापासून मिळणारे उत्पन्न याचा प्रथम फिजिबिलिटी रिपोर्ट घेण्यात येणार आहे आणि मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने आवश्यक असणारे प्लॅन व आराखडे पुनश्च मान्यतेसाठी स्थायी तथा महासभेसमोर सादर करण्यात येतील त्यानंतर सदर जागा बीओटी तत्त्वावर द्याव्यात किंवा मनपा मार्फत विकसित कराव्यात याचा निर्णय घेण्यात येईल आता फक्त आर्किटेक नियुक्ती बाबतचा विषय सादर झालेला आहे आपण यापूर्वी बीओटी तत्त्वावर तीन ठिकाणी कार्यादेश दिलेले आहेत त्यापैकी एक पारोळा रोड छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पाचकंदील अशा ठिकाणी शॉपिंग कॉम्प्लेक्स बीओटी तत्त्वावर बांधण्याचे कार्य आदेश दिले होते त्यापैकी दोन ठिकाणी काम पूर्णत्वास आलेले आहे.उर्वरित पाच कंदील येथील जागेबाबत न्यायालयीन वाद असल्याने

सदर मार्केट खाली झालेले नाही ज्या संस्थांना आपण काय आदेश दिले आहेत त्यांनी आतापर्यंत आपल्याला ५० ते ६० नोटिसा दिले आहेत जागा खाली करण्याबाबत त्यांनी त्यात विनंती केलेलीआहे व जागाआमच्या ताब्यात द्या असे नोटिशीत म्हटले आहे परंतु न्यायालयीन बाब असल्याने अद्याप सदरचे काम सुरू झालेले नाही.

म.सभापती

यासंदर्भात स्थायी समितीच्या सन्माननीय सदस्य फातमा बी नुरूल अमीन व हिनाताई अस्लम पठाण यांनी पत्र दिलेले आहे त्यांनी नमूद केलेले आहे की मनपाने यापूर्वी बीओटी तत्वावर बांधलेल्या व्यापारी संकुल या पासून कुठल्याही प्रकारचा आर्थिक लाभ महानगरपालिकेला होत नाही त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होते या विषयास आमचा विरोध असून विरोध नोदविण्यात यावा व बीओटी तत्त्वावर निर्माण केलेल्या व्यापारी संकुल आबाचा विषयांबाबत सविस्तर अहवाल स्थायी समितीकडे सादर करावा असे पत्रात नमूद केलेले आहे मी या ठिकाणी सूचित करतो की आपण बीओटी तत्त्वावर यापूर्वी तीन ठिकाणी कार्यादेश दिलेल्या आहेत त्या पासून मनपास किती उत्पन्न मिळाले व त्यापासून नगरपालिकेस किती फायदा झाला याचा सविस्तर अहवाल पुढील स्थायी समितीसमोर सादर करावा सदर प्रस्ताव फक्त वास्तुविशारद नियुक्ती करण्याबाबतचा आहे त्यामुळे कार्यालयीन अहवालास व अटी शर्तीना अधीन राहून सदर प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे. तसेच आरक्षणास कुठल्या प्रकारची बाधा पोहोचणार नाही याची दक्षता घेण्यात यावी त्याचप्रमाणे न्यायालयीन वादाबाबत ही दक्षता घ्यावी स्थायी समिती सदस्यांच्या सुचनेनुसार सदरच काम हे मनपा उत्पन्न वाढीच्या दृष्टीने मनपा मार्फत करणेबाबत प्राधान्य दयावे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११३ दिनांक २२/१२/२०२०

धुळे मनपाचा देवपूर स.नं. २८/२ आरक्षित जागेत म.आयुक्त निवासस्थान बांधणे २)आरक्षण क्र. ४१ मध्ये बगीचा विकसित करणे ३) आरक्षण क्र. ४२ मध्ये व्यापारी संकुल बांधणे ४) आरक्षण क्र. ४३ मध्ये मल्टीपर्पज भुवन बांधणे ५) मनपा शाळा क्र. ५,२,२८,१७ येथे येथील आरक्षण विकसित करणे कामी वास्तू विशारद / प्रकल्प सल्लागार नेमणूक करणे बाबत मा.आयुक्त सो., यांनी दि.३१/०७/२०२० अन्वये टिपणी मंजुरी देण्यात आलेली आहे.

तरी उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पापुवि/३१७/२०२० दि. १७/०९/२०२० अन्वये दि.१८/०९/२०२० रोजीचे दै.पुण्य नगरी / वार्ता या अंकात ई- निविदा प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०७/१०/२०२०निविदा धारकांचे खालीलप्रमाणे दर आलेले आहे

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	देवरे धामणे आर्कीटेक्ट, नाशिक	शे.२.६०%	(संभाव्य अंदाजपत्रकीय खर्चाच्या)
२	परमेश असोसीएटीव, नाशिक	शे.१.९५%	(संभाव्य अंदाजपत्रकीय खर्चाच्या)
३.	सावकार प्लॅनर्स, नाशिक	शे.१.७४%	(संभाव्य अंदाजपत्रकीय खर्चाच्या) सर्वात कमी दर

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **मे. सावकार प्लॅनर्स, नाशिक** यांचे शे.१.७४%आलेले आहे.तरी उक्त **मे.सावकार प्लॅनर्स, नाशिक** यांचे दर हे जास्तीचे आलेले असल्याने संबंधितांना इकडीलजा.क्र./पा.पु.वि./४९०दि.१२/११/२०२०अन्वये दर वाटाघाटीस बोलविले असता सदर ठेकेदार यांनी म. आयुक्त सो., यांचे समक्ष सदरचे काम शे. १.७४% ऐवजी शे. १.२४% ने करणेस तयारी दर्शविलेली आहे. तसेच निविदा अटी शर्ती नुसार सदर कामाची वास्तू विशारद फी ज्या विकासकाची निविदा मंजुरी होईल त्या विकासका कडूनच टप्प्या टप्प्याने मनपा मार्फत अदा केली जाईल.

तरी दर वाटाघाटी अंती **मे. सावकार प्लॅनर्स, नाशिक** यांनी दि.१९/११/२०२० रोजी दिलेले पत्रानुसार दर शे.१.२५% ने करणेस संमती दर्शविलेली आहे. तथापि सदरचे काम शे.१.२५% दराने करणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केलेले आहे. सबब सदर काम शे.१.२५% दराने देणेबाबत मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर करणेत आलेला आहे.

सदर प्रस्तावात नमूद जागे बाबत तपशील खालील प्रमाणे

अ.क्र.	कामाचे नाव	आरक्षण क्र.	एकूण जागा	जागेचा तपशील
१.	देवपूर स.नं. २८/२ आरक्षित जागेत म.आयुक्त निवासस्थान बांधणे	४०	०.५१ आर	स.नं.२८/२ नवरंगजलकुंभ जवळ
२.	आरक्षण क्र. ४१ मध्ये बगीचा विकसित करणे	४१	०.८२ आर	स.नं.२८/२ नवरंगजलकुंभा लगत
३.	आरक्षण क्र. ४२ मध्ये व्यापारी संकुल बांधणे	४२	०.२२ आर	स.नं.२८/२ नवरंगजलकुंभा लगत
४.	आरक्षण क्र. ४३ मध्ये मल्टीपर्पज भुवन बांधणे	४३	०.५३ आर	स.नं.२८/२ नवरंगजलकुंभा लगत
५.	मनपा शाळा क्र. २,५,१७, २८ येथे येथील आरक्षण विकसित करणे	शाळा क्र.२	३४३७.३ चौ.मी.	सि.स.नं. ११७९ सुभाष पुतळा
		शाळा क्र.५	१९२४.८ चौ.मी.	सि.स.नं. २९९८ राजकमल टॉकीज जवळ
		शाळा क्र.१७	२६.८ चौ.मी.	सि.स.नं. ४४७४ देवपूर नेहरू चौक
		शाळा क्र.२८	१ हे. ०१ आर	सि.स.नं.५६१/२अ चितोड रोड

प्रथम टप्प्यात नियुक्त आर्कीटेक्ट कडून सर्वेधित जागेवर विकसित करावयाच्या बाबीचे प्लॅन व आराखडे मागविण्यात येणार आहे. तद्दनंतर मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने आवश्यक त्या आराखड्यांची निवड व छाननी मा. आयुक्त तथा पदाधिकारी यांचे मार्फत करण्यात येईल व तद्दनंतर पुढील प्रक्रिया तथा कार्यवाही करण्यात येईल.त्यासाठी प्रथमत: वास्तू विशारद नियुक्त करणे कामआवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव संदर्भीय ठरावानुसार मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून याकामी **मे.सावकार प्लॅनर्स, नाशिक** यांचे वाटाघाटी अंती आलेले निविदा दर शे.१.२५% यास मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच बीओटी तत्त्वावर यापूर्वी तीन ठिकाणी कार्यादेश दिलेले आहेत त्या पासून मनपास किती उत्पन्न मिळाले व त्यापासून महापालिकेस किती फायदा झाला याचा सविस्तर अहवाल पुढील स्थायी समितीसमोर सादर करावा सदर प्रस्ताव फक्त वास्तुविशारद नियुक्ती करण्याबाबतचा आहे त्यामुळे कार्यालयीन अहवालास व अटी शर्तीना अधीन राहून सदर प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे. तसेच आरक्षणास कुठल्या प्रकारची बाधा पोहोचणार नाही याची दक्षता घेण्यात यावी त्याचप्रमाणे न्यायालयीन वादाबाबत ही दक्षता घ्यावी स्थायी समिती

सदस्यांच्या सुचनेनुसार सदरच काम हे मनपा उत्पन्न वाढीच्या दृष्टीने मनपा मार्फत करणेबाबत प्राधान्य दयावे.

सर्वानुमते मंजुर,
सही/ - x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १०० वलवाडी स.नं.७३/अ जागेवर भाजी मंडई व व्यापारी संकुल विकसित करणे कामासाठी वास्तू विशारद यांची नेमणूक करणे करिता निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती सदर प्रस्ताव हा विषय क्रं.९९ प्रमाणेच असल्याने त्या अटी शर्तीनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देंण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११४ दिनांक २२/१२/२०२०

धुळे मनपा हद्दीतीलवलवाडी स.नं.७३/अ जागेवर भाजी मंडई व व्यापारी संकुल विकसित करणे कामासाठी आर्किटेक्ट नेमणूक करणेबाबतच्या कामासाठी इकडील कार्यालयीन ई-निविदा सूचना जाक्र/धुमपा/बां.वि/३३/दि.०८/०७/२०२० नुसार दै.दिव्य मराठी या वृत्तपत्रात प्रसिद्ध केली असता खालीलप्रमाणे निविदाधारकांनी भाग घेतला आहे.

अ.क्र.	ठेकेदाराचे नाव	निविदा दर	शेरा
१)	मे.देवरे धामणे आर्किटेक्ट नाशिक.	२.७०%	L२
२)	सावकार प्लॅनर्स,नाशिक.	२.४५%	L१

कामी ठेकेदार सावकार प्लॅनर्स,नाशिक यांची २.४५% (सर्वात कमी दर) दराची निविदा आहे.तथापि सदर ठेकेदार यांना इकडील कार्यालयीन पत्रजा.क्र /धुमपा / बां.वि/२६४/ दि. १७/११/२०२०नुसार दर वाटाघाटीसाठी बोलविले असता ठेकेदार सावकार प्लॅनर्स, नाशिक यांनी सदरचे काम प्रकल्प किमतीच्या१.२५% दराने करण्यास तयार असल्याबाबत पत्र दिले आहे.त्यानुसार ठेकेदार सावकार प्लॅनर्स,नाशिक यांचे दर मंजुरीकरिता सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे ठेवला असता दि.१०/१२/२०२०च्या स्थायी समितीच्या आदेशानुसार खालीलप्रमाणे अहवाल सादर करीत आहे.

धुळे मनपा हद्दीतीलवलवाडी स.नं.७३/अ जागेवर भाजी मंडई व व्यापारी संकुल विकसित करणे विकसित करणेकामी आर्किटेक्ट नियुक्तीबाबत असून प्रथम टप्यात नियुक्त आर्किटेक्ट कडून संबधित जागेवर विकसित करावयाच्या बाबींचे प्लॉन व आराखडे मागविण्यात येतील तद्नंतर मनपास आर्थिकदृष्ट्या हिताचे आवश्यक त्या आराखड्याची निवड म.आयुक्त तथा म.पदाधिकारी यांच्यामार्फत करण्यात येईल व तद्नंतर पुढील प्रक्रिया तथा कार्यवाही करण्यात येणार आहे.त्यासाठी प्रथमता: आर्किटेक्ट नियुक्ती करणे आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मे.स्थायी समिती समोर निर्णयार्थ सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून याकामी **मे. सावकार प्लॅनर्स, नाशिक** यांचे वाटाघाटी अंती आलेले निविदा दर शे.१.२५% यास मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच बीओटी तत्त्वावर यापूर्वी तीन ठिकाणी कार्यादेश दिलेले आहेत त्या पासून मनपास किती उत्पन्न मिळाले व त्यापासून महापालिकेस किती फायदा झाला याचा सविस्तर

अहवाल पुढील स्थायी समितीसमोर सादर करावा सदर प्रस्ताव फक्त वास्तुविशारद नियुक्ती करण्याबाबतचा आहे त्यामुळे कार्यालयीन अहवालास व अटी शर्तीना अधीन राहून सदर प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे. तसेच आरक्षणास कुठल्या प्रकारची बाधा पोहोचणार नाही याची दक्षता घेण्यात यावी त्याचप्रमाणे न्यायालयीन वादाबाबत ही दक्षता घ्यावी. सन 2020-21 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात सदर व्यापारी संकुलामधून मनपास 5 कोटी मात्र उत्पन्न् अपेक्षित असल्याने त्यानुसार स्थायी समितीने उत्पन्नाचे प्रमुख् स्त्रोत म्हणून तरतूद करण्यांत आलेली आहे. त्यामुळे सदरचे काम मनपा मार्फतच करण्याबाबत कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/ - x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १०१ धुळे शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड फायनल प्लॉट नं.१५३ या आरक्षित जागेवर खाजगी करणातून बी.ओ. टी./ बी. ओ. एल. टी. या तत्वावर व्यापारी संकुल विकसित करणे कामासाठी वास्तू विशारद तज्ञ / प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे करिता निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती सदर प्रस्ताव हा विषय क्रं. ९९ व १०० प्रमाणेच असल्याने त्या अटी शर्तीनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देंण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११५ दिनांक २२/१२/२०२०

धुळे शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड फायनल प्लॉट नं. १५३ या आरक्षित जागेवर खाजगी करणातून बी.ओ.टी./ बी.ओ.एल. टी. या तत्वावर व्यापारी संकुल विकसित करणे कामासाठी वास्तू विशारद तज्ञ / प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे बाबत मा.आयुक्त सो., यांनी दि.२२/०९/२०२० अन्वये टिपणी मंजुरी देण्यात आलेली आहे.

तरी उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र. / पापुवि / ३३० /२०२० दि. २८/०९/२०२० अन्वये दि.२९/०९/२०२० रोजीचे दै. पुण्य नगरी / आपला नवराज्य या अंकात ई- निविदा प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.२०/१०/२०२० निविदा धारकांचे खालील प्रमाणे दर आलेले आहे.

अ.क्र.	कंत्राटदार/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	देवरे धामणे आर्कीटेक्ट, नाशिक	शे.२.४०%	(संभाव्य अंदाजपत्रकीय खर्चाच्या)सर्वात कमी दर
२	झेड.ए. आर्कीटेक्ट,	शे.३.००%	(संभाव्य अंदाजपत्रकीय खर्चाच्या)

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **मे.देवरे धामणे आर्कीटेक्ट, नाशिक** यांचे शे.२.४०% आलेले आहे. तरी उक्त **मे.देवरे धामणे आर्कीटेक्ट,नाशिक** यांचे दर हे जास्तीचे आलेले असल्याने संबंधितांना इकडील जा.क्र./बां.वि./५३७ दि.२७/११/२०२० अन्वये दर वाटाघाटीस बोलविले असता सदर ठेकेदार यांनी म. आयुक्त सो., यांचे समक्ष सदरचे काम शे.२.४०% ऐवजी शे.१.२५% ने करणेस तयारी दर्शविलेली आहे.

तरी दर वाटाघाटी अंती **मे.देवरे धामणे आर्कीटेक्ट, नाशिक** यांनी दि.०१/१२/२०२० रोजी दिलेले ई- मेल संदेशानुसार दर १.२५% ने करणेस संमती दर्शविलेली आहे. तथापि सदरचे काम १.२५% दराने करणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केलेले आहे. सबब

सदर काम १.२५% दराने देणेबाबत मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावात नमूद जागे बाबत तपशील खालील प्रमाणे

अक्र	कामाचे नाव	आरक्षण क्र.	एकूण जागा	जागेचा तपशील
१.	धुळे शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड फायनल प्लॉट नं.१५३ या आरक्षित जागेवर खाजगी करणातून बी.ओ.टी./ बी.ओ. एल. टी. या तत्वावर व्यापारी संकुल विकसित करणे	आरक्षित भूखंड फायनल प्लॉट नं. १५३	३,०९,८८८ चौ.फु.	दसेरा मैदान टाकी जवळ

प्रथम टप्प्यात नियुक्त आर्कीटेक्टकडुन सबंधित जागेवर विकसित करावयाच्या बाबीचे प्लॅन व आराखडे मागविण्यात येणार आहे. तद्दनंतर मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने आवश्यक त्या आराखड्यांची निवड व छाननी मा.आयुक्त तथा पदाधिकारी यांचे मार्फत करण्यात येईल व तद्दनंतर पुढील प्रक्रिया तथा कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी प्रथमतः वास्तूविशारद नियुक्त करणे काम आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव संदर्भीय ठरावानुसार मे.स्थायी समिती पुढे फेर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून याकामी **मे.देवरे धामणे आर्कीटेक्ट, नाशिक** यांचे वाटाघाटी अंती आलेले निविदा दर शे.१.२५% यास मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच बीओटी तत्त्वावर यापूर्वी तीन ठिकाणी कार्यादेश दिलेले आहेत त्या पासून मनपास किती उत्पन्न मिळाले व त्यापासून महापालिकेस किती फायदा झाला याचा सविस्तर अहवाल पुढील स्थायी समितीसमोर सादर करावा सदर प्रस्ताव फक्त वास्तुविशारद नियुक्ती करण्याबाबतचा आहे त्यामुळे कार्यालयीन अहवालास व अटी शर्तीना अधीन राहून सदर प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे. तसेच आरक्षणास कुठल्या प्रकारची बाधा पोहोचणार नाही याची दक्षता घेण्यात यावी त्याचप्रमाणे न्यायालयीन वादाबाबत ही दक्षता घ्यावी . स्थायी समिती सदस्यांच्या सुचनेनुसार सदरच काम हे मनपा उत्पन्न वाढीच्या दृष्टीने मनपा मार्फत करणेबाबत प्राधान्य दयावे.

सर्वानुमते मंजुर,

सही/ - x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १०२ धुळे महानगरपालिका हद्दीतील पाईपलाईन वरील लिकेजेस काढणे याकरिता ३ वर्ष मुदती करिता वार्षिक निविदा दर मागविणेत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नगरसचिव सदर विषय मागील बैठकीत तहकुब केलेला होता प्रशासनामार्फत याबाबत सविस्तर अहवाल बैठकीत सादर झालेला आहे त्याप्रमाणे आपणास निर्णय घ्यावयाचा आहे.

म.सभापती याबाबत संबंधित ओव्हरसियर यांनी कार्यालयीन अहवाल सभागृहात सादर करावा.

म. प्रदीप चव्हाण शहराचे जुने क्षेत्रफळ 46.46 स्क्वेअर मीटर होते आता शहराची हद्दवाढ झाल्यानंतर शहराचे क्षेत्रफळ वाढले आहे शहराचे क्षेत्रफळ सुमारे 101 चौरस मीटर झालेले आहे. क्षेत्रफळ बघता आपल्याकडे मीटर कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे त्यामुळे आयुक्त साहेब यांच्या आदेशाने सुमारे तीन वर्षासाठी लीकेज काढणे बाबत निविदा मागवली होती त्याप्रमाणे आपण निविदेत प्रमाणे रेट मागवले होते यात एक्सावेशन पाईप चे रेट जॉईंट व्हॉल दुरुस्ती, खड्डे बुजवणे इत्यादी प्रमाणे टेंडर मागविले होते त्यात तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या सर्वात कमी 8 टक्के कमिने

निविदा प्राप्त झालेली आहे पहिल्या आणि त्याची मुदत संपल्याने ती निविदा रद्द झालेली आहे त्यामुळे संपूर्ण शहरातील लिकेंज दुरुस्तीसाठी निविदा मागवलेली आहे आणि दर मंजुरीसाठी विषय स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

म.सभापती — आपण मागे स्वतंत्र भागासाठी निविदा काढली होती यापुढे कुठल्याही स्वतंत्र प्रभागाची निविदा निघणार नाही अशी खात्री आहे ही एकत्रित संपूर्ण शहरासाठी निविदा असेल आणि आपण ज्या एजन्सीला काम देतो आहे त्यांच्याकडून एकच लिकेज वारंवार होणार नाही याची काळजी घ्यावी व त्यानुसार अटी-शर्ती मध्ये या मुद्द्यांचा समावेश करावा.

म.प्रदिप चव्हाण — त्यासाठीच आपण या निविदा मध्ये तीन वर्षासाठी रेट फ्रिज करीत आहोत.

म.सभापती — नागरिक व नगरसेवकांच्या तक्रारीचे तात्काळ निवारण झाले पाहिजे तसेच शहराचा विस्तार पाहतासंबंधित संस्थेकडे त्या प्रमाणे पुरसे मनुष्यबळ असणे आवश्यक आहे त्यानुसार त्यांच्याकडून हमीपत्र घेण्यात यावे अनावश्यक पाणी वाया जाऊ नये नागरिकांना शुद्ध व वेळेवर पाणी पुरवठा करणे हा आपला उद्देश आहे.कार्यालयीन अहवालास अटी शर्तींच्या अधीन राहून सदर प्रस्तावातील आलेल्या निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे तसेच याच बरोबर शहरातील बऱ्याच ठिकाणी जुन्या पाईपलाईन आहेत सुमारे पंचवीस तीस वर्षापासून च्या टाकण्यांत आलेल्या असून त्या जीर्ण झालेल्या आहेत त्या सुद्धा बदलणे आवश्यक आहे आपण कृपया त्याचाही सर्वे करावा व त्याप्रमाणे त्या वाहिन्या बदलण्याबाबत कार्यवाही करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११६ दिनांक २२/१२/२०२०

धुळे महानगरपालिका हद्दीतील पाईपलाईन वरील लिकेजेस काढणे याकरिता ३ वर्ष मुदती करिता वार्षिक निविदा दर मागविणे बाबतच्या कामाची इकडील कार्यलयामार्फत ई-निविदा सूचना क्र.२६/दि.२४/०६/२०२०रोजी ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.तसेच दै.दिव्य मराठी/श्रमराज्य या वर्तमान पत्रात प्रसिद्धी देण्यात आली होती.सदर ई-निविदेत दि.१६/०७/२०२० रोजी तांत्रिक लिफाफा उघडणे निश्चित होते.त्यानुसार सदर कामी तांत्रिक लिफाफा उघडला असता एकूण ३ निविदाधारकांनी विहित मुदतीत निविदा सादर केली आहे.ते खालीलप्रमाणे-

१)ए.के.सैफी

२)साई कृपा बी.बी.एस.एस.एस.एस.लि.धुळे.

३) गायत्री कन्सट्रक्शन

सदर कामाची ई-निविदाItem Rate नुसार असल्याने त्यानुसार उपरोक्त निविदा धारकांनी खालीलप्रमाणे निविदा दर सादर केले आहे.

अ.क्र.	कंत्राटदारठेकेदराचे नाव/	दिलेले निविदा दर	शेरा
१	ए.के.सैफी	शे.८.०० % कमीने (सर्व बाबी करिता)	L१
२	साई कृपाबी.बी.एस.एस. एस. एसलि. धुळे.	अंदाजपत्रकीय दर (सर्व बाबी करिता)	L२
३	गायत्री कन्सट्रक्शन	शे.१०% जास्तीने (सर्व बाबी करिता)	L३

उक्तकामी ठेकेदार ए.के.सैफी यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांचे दर मंजुरीकरिता व करारनामा करताना ३ वर्षाचे दर freeze करणे तसेच उक्त कामाच्या खर्चाची तरतूद करणेबाबत सदरचा विषय मे.स्थायीसमितीपुढे ठेवण्यात आला असता धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.१०५ दि. १०/१२/२०२० नुसार खालीलप्रमाणे अहवाल सादर करीत आहे.

प्रभाग क्र.१५,१६,१७ व १८ या प्रभागांमधील विविध कॉलनी परिसरात पाईप लाईन, व्हल व नळ कनेक्शन गळती बाबत अंदाजित रक्कम रु.१६,७७,०२६/-मात्र १ महिना

मुदतीकरिता सदरचे काम श्री. दत्तात्रय कैलास दुसाणे यांना इकडील कार्यालयीन कार्यादेश जाक्र/धुमपा/बां.वि/२८५/२०२०दि.०३/०३/२०२० अन्वयेदेण्यात आला होता.सदर कार्यादेशाचा कालावधी संपल्याने व सदरचे काम पूर्ण झाल्याने नव्याने धुळे शहरातील पाईपलाईन वरील लिकेजेस काढणे याकरिता ३ वर्षाचे दर मागविण्यात आले होते.

उक्त कामी १ ते ३६ बाबींचे दर मागविण्यात आले होते.त्यानुसार ठेकेदार ए.के. सैफी यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांचे दर मंजुरीकरिता व करारनामा करताना ३ वर्षाचे दर freeze करणे तसेच उक्त कामाच्या खर्चाची तरतूद करणेबाबत सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधीन राहून या कामी आलेले ठेकेदार श्री.ए.के. सैफी यांचे १ ते ३६ बाबीकरिता आलेले दर शे. ८% कमीने यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे.

नागरिक व नगरसेवकांच्या तक्रारीचे तात्काळ निवारण झाले पाहिजे तसेच शहराचा विस्तार पाहता संबंधित संस्थेकडे त्या प्रमाणे पुरसे मनुष्यबळ असणे आवश्यक आहे त्यानुसार त्यांच्याकडुन हमीपत्र घेण्यात यावे अनावश्यक पाणी वाया जाऊ नये नागरिकांना शुद्ध व वेळेवर पाणी पुरवठा करणे हा आपला उद्देश आहे. कार्यालयीन अहवालास अटी शर्तींच्या अधीन राहून सदर प्रस्तावातील आलेल्या निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे तसेच याच बरोबर शहरातील बऱ्याच ठिकाणी जुन्या पाईपलाईन आहेत सुमारे पंचवीस तीस वर्षापासून च्या टाकण्यांत आलेल्या असून त्या जीर्ण झालेल्या आहेत त्या सुद्धा बदलणे आवश्यक आहे आपण कृपया त्याचाही सर्वे करावा व त्याप्रमाणे त्या वाहिन्या बदलण्याबाबत कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/ - x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १०३ धुळे महानगरपालिकेकडे कार्यरत बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांच्या मानधनात वाढ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. भारती माळी सदर विषयास मान्यता देण्यांत येत आहे

म.कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती याबाबतच्या येणा-या संभाव्य खर्चाबाबत अंदाजपत्रकात तरतूद करण्यांच्या व कार्यालयीन अहवालास अधिन राहून बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११७ दिनांक २२/१२/२०२०

श्रीमती मनिषा अर्जुन शिंदे व इतर १५ बालवाडी शिक्षिका व मदतणीस यांनी विनंती अर्ज करुन महानगरपालिका शिक्षण मंडळामध्ये सन १९८६ ते १९९० या दरम्यान बालवाडी शिक्षिका व मदतणीस म्हणून नोकरीला होते, त्याच्यावर बालवाडी शिक्षिका व मदतणीस कामाची जबाबदारी सोपविण्यात आलेली होती. बालवाडया सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत डयूटी होती.त्यासाठी शिक्षिका यांना रुपये ४०००/- व मदतणीस यांना रुपये २०००/- वेतन देण्यात येत होते.

तथापि सन २०१८ मध्ये सर्व बालवाडी शिक्षिका व मदतणीस यांना धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनाकडे वर्ग करण्यात आलेले आहे. त्यामुळे कार्यालयाची वेळ

९.४५ ते ५.४५ इतकी असुन कामाचे ६ तास जास्त वाढलेले आहे. तसेच कामकाजाचे स्वरुप बदलेले आहे.त्यामुळे सदर अर्जदार यांनी किमान वेतन कायदयानुसार वेतन मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. उक्त प्रकरणी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिका हद्दीत महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका शिक्षण मंडळाकडील शाळांमध्ये पुर्व प्राथमिक शिक्षणासाठी बालवाडया सन १९९० पुर्वीपासून सुरु आहेत.तथापि पालकांच्या इंग्रजी माध्यमाकडील कल वाढल्याने शिक्षण मंडळातील विदयार्थी संख्या कमी झाली असून पूर्वीची ६५ शाळांची संख्या आज रोजी २० वर आली आहे. पूर्वी प्रत्येक शाळेस एक बालवाडी सुरु केली होती. मात्र आज रोजी बालवाडीमध्ये अनेक शाळेत विदयार्थी नसल्याची बाब निदर्शनास आली असल्याने शाळेत व बालवाडयात विदयार्थीची पटसंख्या व उपस्थीती विचारात घेवुन महानगरपालिकेच्या उपलब्ध मनुष्यबळाचा अपव्यय टाळण्यासाठी अल्प किंवा नगण्य विदयार्थी संख्या असलेल्या बालवाडया बंद करणे व्यापक लोकहिताचा विचार करता आवश्यक ठरते. त्यामुळे तत्कालीन आयुक्त यांनी खालील प्रमाणे ०७ शिक्षिका व ०९ मदतणीस यांची सेवा दिनांक २६/७/२०१८ पासून मध्योपुर्वीपासून पासून जा.क्रधुमपा /१५० दिनांक२५/७/२०१८अन्वये महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आलेले आहे.

अंगणवाडी शिक्षिका व मदतणीस यांना मानधन वाढीबाबत माहिला व बालविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडील दिनांक १२ मार्च २००८, दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ तसेच दिनांक १६ ऑगस्ट २०१९ रोजीचे शासन निर्णय आहे. सदर शासन निर्णयानुसार अंगणवाडी शिक्षिका व मदतणीस यांच्या नियुक्ती कालावधी तसेच शैक्षणीक अर्हतेनुसार मानधन यादीबाबत तपशील दिलेला आहे.

महानगरपालिका शिक्षण मंडळ अंतर्गत महानगरपालिका शाळांमधुन सुरु असलेल्या बालवाडी वर्गास अध्यापन करणा-या बालवाड़ी शिक्षिका व मदतणीस यांना महानगरपालिकामार्फत महिला व बालविकास विभागाकडील दिनांक १६ ऑगस्ट २०१५ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे मासीक मानधन दिले जाते.

सदयास्थितीत कार्यरत शिक्षिकेस मासीक मानधन रुपये४०९९/- व मदतणीस मासीक मानधन रुपये 2000/- मात्र दिले जाते.माहिला व बालविकास विभागाकडील दिनांक १६ ऑगस्ट २०१९अन्वये बालवाठी शिक्षिकेस वाढीव मानधन रुपये ८०००/- व मदतणीस वाढीव मानधन रुपये४२५०/-मंजुर केले आहे.यावाबत तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

अ.क	पदनाम	सद्यादेय असलले मानधन रुपये	वाढीवमानधन रुपये	वाढणारी मानधन वाढ रुपये
1	बालवाडी शिक्षिका	4019/-	8000/-	3901/-
2	बालवाडी मदतीस	2000/-	4250/-	2250/-

प्रशासन अधिकारी म न पा शिक्षण मंडळ धुळे यांचे दिनांक ६/७/२०२० रोजीच्या पत्रानुसार महानगरपालिका शिक्षण मंडळ धुळे अंतर्गत बालवाडी वर्गास अध्यापनासाठी एकुण14शिक्षिका व एकुण १३ मदतणीस कार्यरत आहेत.तसेच महानगरपालिकेकडे विविध विभागात एकुण 7 शिक्षिका व एकुण 7 मदतनिस कार्यरत आहे असे एकुण 21 मदतणीस कार्यरत आहेत.

तरी मुख्य लेखाधिकारी यांनी दिलेल्या निर्देशनुसार व प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ यांच्याकडील दि 6/7/2020 रोजीच्या पत्रात नमुद एकुण 21 शि क्षिका व एकुण 20 मदतणीस यांना मानधन वाढ केल्यास खालीलप्रमाणे खर्चात वाढ अपेक्षीत होणार आहे .

तरी उक्त नुसार बालवाडी शिक्षिका यांना 4099/-वरुन 8000/- मानधन वाढ केल्यास 12महिनेसाठी रु 9,83,052/- मात्र वाढीव खर्च होणार आहे.

तसेच बालवाडी मदतणीस यांना रुपये २०००/- वरुन रुपये ४२५०/- मानधन वाढ केल्यास १२ महिन्यासाठी रुपये ५,४०,०००/-मात्र वाढीव खर्च होणार आहे. एकुण वाषिर्क खर्च रु 1523052/- इतकी वाढ होणार आहे.

महानगरपालिका शिक्षण मंडळाने शिक्षिका व मदतणीस यांच्या मानधनात वाढ करायची असेल तर त्यासाठी महानगरपालिका अर्थसंकल्पात तशी आर्थीक तरतुद करण्याचे लेखी पत्र लेखा विभागाकडे प्रथम सादर करणे आवश्यक असेल. तसेच मानधन वाढ करणेही आर्थीक बाब असल्याने याबाबत सदरचा विषय मा.स्थायी समिती पुढे सादर करणे उचित होईल असे मत असल्याबाबत नमुद केलेले आहे.सदर प्रस्ताव मा आयुक्त सो यांनी मान्यता दिलेली आहे.तरी सदर विषय में स्थायी सामिती पूढे निर्णयार्थ सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांनी दिलेली सहमती लक्षात घेता याबाबतच्या येणा-या संभाव्य खर्चाबाबत अंदाजपत्रकात तरतूद करण्यांच्या व कार्यालयीन अहवालास अधिन राहून बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/ - x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १०४ स्वच्छ भारत अभियान नागरी अंतर्गत ३०TPD क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प उभारणेच्या कामास प्रशासकिय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती सदर विषयाची चव्हाण साहेब यांनी माहिती देण्यांत यावी.

म. प्रदीप चव्हाण आपल्याला स्वच्छ महाराष्ट्र अंतर्गत शासनाने दि २८ जानेवारी २०२० रोजी एकुण ८० शहरासाठी बायो गॅस प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यात आपल्या धुळे शहराचे नांव असून आपल्याला १२ कोटी रुपये ३० टन प्रति दिवस क्षमतेसाठी मंजूर केलेले आहे. यांत केंद्र शासनाचा हिस्सा आहे. ४.२० कोटी रुपये, राज्य शासनाचा हिस्सा २.७९ कोटी रुपये व महानगरपालिकेचा हिस्सा ५ कोटी रुपये आहे. अशा प्रकारे प्रस्ताव मंजूर केलेला आहे. यामध्ये जो बायो डिग्रेबल वेस्ट म्हणजे ओला कचरा या ओल्या कच-यापासून आपण बायोगॅस प्रकल्प उभारतो आहे.त्यांचे जे प्रमाण आहे एकास एक असे आहे. म्हणजे १००० किलो ओला कचरा असेल तर त्यात १००० लिटर पाणी मिसळून तो एका बायलर मध्ये क्रश करतो. क्रश करुन ती स्लरी होते. ती स्लरी एक मोठे डायजेस्टर असते त्यात ४५ दिवस आपण त्यामध्ये ठेवतो.काऊ डगने त्यांचे कलचर करुन त्यापासून गॅस तयार होतो. १००० किलो ओल्या कच-यापासून १०० क्युबीक मिटर गॅस तयार करतो. याचे जर आपण एलपीजी प्रमाणात कन्व्हरर्शन केले तर ५० क्युबिक पर डे आपणाला १००० किलो ओल्या कच-या पासून गॅस मिळणार आहे. साधारणत: १०० केव्ही मिटर गॅस पासून १२५ KWH विज निमिर्ती होऊ शकते. यामध्ये रॉ बल्युन्स मध्ये सुरुवातीला यातील जो रॉ गॅस आहे. तो हार्मपुल असल्यामुळे आपण त्याच्यातून काढुन घेणार आहोत.आणि त्यातील पिवर गॅस आहे म्हणजे मिथेल हा एक बल्युन मध्ये समावेश करुन त्याचा आपण स्ट्रीट लाईट, प्रोसींग प्लॅटला पंपींग स्टेशन वीज S.T.P.प्लॉन्ट आपणास वापरता येणार आहे.प्रशासकीय मंजुरी नंतर मुख्य

अभियंता एमजीपी नाशिक यांचेकडेस तांत्रिक मंजुरीला पाठवू तांत्रिक मंजुरीनंतर त्यांची निविदा प्रक्रिया राबविणार आहोत.

म. अमोल मासुळे — याचा वापर कुठे होणार आहे.

म. प्रदीप चव्हाण — याचा वापर वरखेडीला जो प्लॅट बांधत आहे त्याठिकाणी वापरु शकतो.

म. उपायुक्त — स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शासनाचा हा प्रकल्प मंजूर झालेला आहे. यांच्या अंतर्गत केंद्र व राज्य शासनाचे अनुदान आहे.आपली लोकवर्गणी देखील आहे. म्हणजे युएलबीचा हिस्सा आहे. आपण जो हा मुद्दा उपस्थित केला हा ही सुरुवातीला प्रस्ताव होतांना महत्वाचा आहे. आम्ही सर्व साधारणपणे निविदा प्रक्रिया करतांना संबंधित निविदाधारकाने ४ ते ५ वर्ष देखभाल दुरुस्ती केली पाहिजे कारण आपल्याकडे तांत्रीक कर्मचारी वर्ग नाही. त्यावर आपण उपाय योजना करणार आहोत.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून तांतडीने सदर कामाचे टी.एस. करुन निविदा प्रसिध्द करण्यांत यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११८ दिनांक २२/१२/२०२०

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये बायोगॅस प्रकल्प उभारण्यास दि.२८ जानेवारी २०२० च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यात धुळे महानगरपालिकेस रु.१२.०० कोटी मात्रचा बायोगॅस प्रकल्प उभारण्यास प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यात केंद्र शासनाचे अनुदान (३५%) रक्कम रु.४.२० कोटी राज्य शासन अनुदान (२३.३%) रक्कम रु.२.७९६० कोटी व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा रक्कम रु.५.००४० कोटी मंजूर केला आहे.

त्यानुसार धुळे महानगरपालिकेमार्फत ३०TPD क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प उभारणेसाठी कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.११,८०,२२,०४३/-मात्र तयार केले असून सदर प्रकल्प वरखेडी रोड येथील अस्तित्वातील गांडुळ खत प्रकल्प येथे उभारला जाणार असून सदर प्रकल्पासाठी मनपाचा हिस्सा रु.५.००४० कोटी मात्रअसून त्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून तांतडीने सदर कामाचे टी.एस. करुन निविदा प्रसिध्द करण्यांत यावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/ - x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १०५ — धुळे मनपा सहाय्यक अनुदान योजनअंतर्गत प्रभाग क्रमांक ७ मध्ये क्रबस्थान ते वाहालपुरी भवनपावेतो रस्ता डांबरीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणेबाबत खर्च रू.४६,८६,७३४/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून तांतडीने सदर कामाचे निविदा प्रसिध्द करण्यांत यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११९ दिनांक २२/१२/२०२०

धुळे मनपा सहाय्यक अनुदान योजने अंतर्गत प्र.क्र.७ मध्ये कब्रस्थान ते बहालपुरी भवन पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणे या कामाबाबत संदर्भीय पत्रान्वये सादर करण्यात आलेले असून प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केलेली असता सदरच्या भागात रस्ता नसल्याने तेथील नागरिकांना रहदारीस अडथळा येत असल्याने तेथे रस्त्याची आवश्यकता आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसूची सन २०१९-२० नुसार रु. ४६,८६,७३४/-मात्र खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन सहाय्यक अनुदान योजने अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून तांतडीने सदर कामाचे निविदा प्रसिध्द करण्यांत यावी.

सर्वानुमते मंजुर,

सही/ - x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १०६ — धुळे मनपा सहाय्यक अनुदान योजनअंतर्गत प्रभाग क्रमांक ७ मध्ये मोहन रेस्टॉरेंट ते मुस्लीम क्रबस्तान पावेतो रस्ता डांबरीकरण करणे याबाबत खर्च रू.५५,३३,८०८/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सदर प्रस्तावात विभागामार्फत मोहन रेस्टांरेंट असा उल्लेख् आहे.तथापि सदर जागा ही मोहन मेडिकल पासून ते मुस्लीम कब्रस्थान पावतो आहे. याप्रमाणे दुरुस्ती करण्यांत यावी सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून तांतडीने सदर कामाचे निविदा प्रसिध्द करण्यांत यावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२० दिनांक २२/१२/२०२०

धुळे मनपा सहाय्यक अनुदान योजने अंतर्गत प्र.क्र. ७ मध्ये मध्ये मोहन मेडिकल ते मुस्लीम कब्रस्थान पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे या कामाबाबत संदर्भीय पत्रान्वये सादर करण्यात आलेले असून प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केलेली असता सदरच्या भागात रस्ता नसल्याने तेथील नागरिकांना रहदारीस अडथळा येत असल्याने तेथे रस्त्याची आवश्यकता आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसूची सन २०१९-२० नुसार रु.५५,३३,८०८/- मात्र खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन सहाय्यक अनुदान योजने अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून तांतडीने सदर कामाचे निविदा प्रसिध्द करण्यांत यावी.

सर्वानुमते मंजुर,

सही/ - x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १०७ सन २०२०-२१ या वर्षाकरीता धुळे मनपा आरोग्य विभागाकडील १२ॲलोपॅथी दवाखाने, २ सुतिकागृह,१कुटुंब कल्याण केंद्रासाठी लागणारी ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी कमी असलेल्या ई निविदा दराना व खर्च रूपये ४४,५०,६०७/-मात्रला मंजुरीसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सभापती याबाबत सविस्तर अहवाल संबंधित अधिकारी यांच्यामार्फत सभागृहात सादर करावा.

म.संजय गुजर धुळे मनपा अंतर्गत एकूण 15 दवाखाने आहेत यात दोन सुतिकागृह एक कुटुंब कल्याण केंद्र आणि बारा ओपीडी सेंटर आहेत या सर्व दवाखान्यांमध्ये तीन वर्षात ज्या औषधी ला गेले आहेत त्याप्रमाणे अहवाल घेऊन मागणी सादर केलेली आहे व त्यानुसार निविदा मागविण्यात आलेले आहेत यामध्ये सुमारे 47 टक्के कमिने निविदा दर प्राप्त झालेले आहेत आलेल्या औषधांचे आपण गुणात्मक दर्जा तपासण्यासाठी टेस्टिंग रिपोर्ट घेतो व प्रत्येक दवाखान्यातील वैद्यकीय अधिका-यांचे औषधांच्या बाबतीत दाखला घेण्यात येतो.

म.सभापती निविदा द्वारे आपण औषध खरेदीची कार्य प्रणाली राबवली आहे यामध्ये खोकल्याचे औषध आपण देतो त्यात काही कंटेंट असतात सदर कंटेन सर्वांना लागू असतात का आपण त्यासाठी वेगळे औषध देतो.

म.संजय गुजर आपण सर्व साधारण नागरिकांना उपयुक्त राहील अशी औषधी खरेदी करतो व त्याप्रमाणे औषधी देतो मागील वर्षांचा अनुभव पाहता अद्याप पाहतो याबाबत कोणताही नागरिकांना त्रास झाल्याचे उदाहरण नाही.

म.सभापती सदर निविदा धारक सुमारे 47 टक्के कमीने औषधांचा पुरवठा करतो आहे त्यामध्ये औषधी कशा स्वरुपाची आहे सध्या बाजारात जेनेरिक औषधे सुद्धा मिळतात आपण जी निविदा प्रसिद्ध केली त्यात काही अटी-शर्ती टाकल्या होत्या का जर संबंधित पुरवठादार 47% कमीने औषधी पुरवठा करतो आहे तर त्याबाबत गुणवत्ता तपासणे गरजेचे आहे तसेच सदर अजून कमी करण्यासाठी आपण काही कार्यवाही केलेली आहे का.?व त्या पद्धतीने निगोसिएशन केलेले आहे का?

म.संजय गुजर ई.टेंडर काढल्यानंतर आपण त्या पद्धतीने प्रस्ताव ठेवला होता त्यात 47% कमीने टेंडर आलेले आहेत.

म.सभापती यामध्ये मनपा चा अधिक फायदा होण्यासाठी व दर कमी होण्यासाठी संबंधित संस्थेची निगोसिएशन करणे आवश्यक होते औषधी मध्ये सुद्धा अनेक प्रकार आहेत इतक्या कमी दरात जर संबंधित पुरवठादार औषधी पुरवतो आहे त्या अर्थी त्याला सदर पुरवठा करणे परवडत आहे त्यामुळे संबंधित पुरवठादारास एकदा निगोसिएशन करावे व त्या संदर्भात चर्चा करावी व त्याप्रमाणे कार्यादेश देण्यात यावा. त्यानुसार आलेल्या प्रस्तावित निविदा दरास मान्यता देण्यात

येत आहे तथापि सदर औषधांच्या गुणवत्तेबाबत संबंधितांकडून हमीपत्र घेण्याची जबाबदारी प्रशासनाची राहील हा नागरिकांच्या आरोग्याचा महत्त्वाचा विषय असल्याने गुणवत्तेबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड करण्यात येऊ नये.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर१२१ दिनांक २२/१२/२०२०

कार्यालयीन टिपणी प्रमाणे, धुळे मनपा चे १1 ॲलोपॅथी दवाखाने, २ सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र व 1 नागरी आरोग्यकेंद्रासाठी सन २०20-21या वर्षासाठी लागणारी ॲलोपॅथी औषधे खरेदीसाठी व स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळणेसाठी जा.क्रं/धुमपा/ औ.भांडार/ 237/दि.16/09/2020 नुसार दिनांक 17/०9/2020 चे दै. दिव्य मराठी व दै. समाज सारथी या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या ई-निविदा सुचना क्रं 54 Tender I.D. २०२०_DMCD_६१०६९४_१ ई-प्रणालीव्दारे ई-निविदाची अंतीम मुदत दिनांक ०५/१०/२०२० पर्यंत १) मे. गगन फार्मा, मुंबई २) मे. सरीता डिस्ट्रीब्युटर भायंदर, ठाणे 3) मे. श्री. साई फार्मा, धुळे या ३ निविदाकारांनी भाग घेतलेला आहे.

धुळे म.न.पा. स प्राप्त 3 निविदाधारकांचे तांत्रीक पाकीट मनपाचे मागणीप्रमाणे योग्य असल्याने निविदाधारकाचे Commercial Bid उघडण्यात आले.

धुळे मनपा स प्राप्त 3 निविदाधारकांचे तुलनात्मक कमी असलेल्या दरांप्रमाणे येणारा **एकुण खर्च रु.४४,५०,६०७/-मात्र येणार आहे.**

1) मे.गगन फार्मा, मुंबई :- यांचे मुळ यादीतील अनु.क्रं. 3, 10, 13, 22, 23, 24, 26, 27 व 39 या 09 प्रकारचे औषधांचे तुलनात्मक दर सर्वात कमी असुन उक्त खरेदीसाठी पृष्ठ क्रं. P-367 प्रमाणे **रू.5,96,824/-मात्र** खर्च येणार आहे.

2) मे. सरीता डिस्ट्रीब्युटर, भायंदर, ठाणे:- यांचे मुळ यादीतील अनु.क्रं. 5, 20, 21, 29, 30, 32, 33, 35, 36, 39 ते 53, 62, 65, 68, 70, 75, 76, 78, 86, व 96 या 33 प्रकारचे औषधांचे तुलनात्मक दर सर्वात कमी असुन उक्त खरेदीसाठी पृष्ठ क्रं. P-367 प्रमाणे **रू.5,37,680/-मात्र** खर्च येणार आहे.

3) मे. श्री. साई फार्मा, धुळे:- यांचे मुळ यादीतील अनु.क्रं. 1, 2, 4, 6 ते 9, 11, 12, 14 ते 19, 25, 28, 31, 34, 37, 38, 54 ते 61, 63, 64, 66, 67, 69, 71 ते 74, 77, 79 ते 85 व 87 ते 95 या 55 प्रकारचे औषधांचे तुलनात्मक दर सर्वात कमी असुन उक्त खरेदीसाठी पृष्ठ क्रं. P-367/368 प्रमाणे **रू.33,16,103/-मात्र** खर्च येणार आहे.

औषधी यादीमधील अ.क्रं. 39 चे दोन निविदाकारांचे दर समान असल्याने दोन्ही निविदाकरांकडून खरेदीसाठी समान प्रमाणात विभागणी केली आहे. सबब, ई-निविदा प्रणालीव्दारे धुळे मनपास प्राप्त झालेल्या **तुलनात्मक कमी असलेल्या ई-निविदा दरांना मान्यताआदेशास्तव** व सन २०20-21 या वर्षासाठी धुळे म.न.पा.चे १1 ॲलोपॅथी दवाखाने, २ सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र व 1 नागरी आरोग्यकेंद्राचे मागणी प्रमाणे वरील 96 प्रकारचे औषधांचे खरेदीसाठी **खर्च रु.४४,५०,६०७/- मात्रला मंजुरीआदेशास्तव** सादर. उक्त खर्च अंदाजित खर्चापेक्षा रू.40,39,483/- मात्रने ने कमी येणार आहे.(47.57% ने कमी.) (उक्त 96 प्रकारचे औषधांचे खरेदीसाठी अंदाजित खर्च रु.84,90,090/- मात्र येणार होता.)

दि. 1-12-2016 चे शासन निर्णय 4.4.3.1 ब) नुसार "निविदा पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत यामध्ये (-) २०% ते (+) 10% तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. या किंमत श्रेणीमध्ये किंमत न आल्यास फेरनिविदा काढावी." **धुळे मनपा स प्रात्प झालेले ई-निविदा दर अंदाजित खर्चापेक्षा 47.57% ने कमीने प्राप्त झाले आहे त्यामुळे मनपाचा आर्थीक फायदा होत**

आहे. फेर निविदा प्रसिध्द केल्यास जास्तीचे दर प्राप्त होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

सन २०20-21 या वर्षात अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात औषध खरेदीसाठी रू. 1,00,००,०००/- मात्र तरतुद आहे. त्यामधुन सन २०20-21 या वर्षासाठी लागणारी आयुर्वेद औषधी खरेदीसाठी रु.2,48,990/- मात्र खर्चास प्रशासकीय मान्यता व ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी रु.84,90,090/- मात्र खर्चास मे. स्थायी समिती ठराव क्रं. 58 / दि. 27/08/2020 नुसार मा. आयुक्त सो. यांची प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

उद्योग उर्जा कामगार विभागाचा दि. 01/12/2016 चे शासन निर्णयानुसार (खरेदी नियमावली) अधिन राहुन न्युनतम दरांची औषधे खरेदी करण्याची दक्षता घेण्यात येईल. धुळे मनपा स प्राप्त ई-निविदा दर योग्य व वाजवी आहेत. कार्यादेशाप्रमाणे प्राप्त औषधांचे दर Mrp दरांपेक्षा कमी असल्याची खात्री करण्यात येईल. औषधांचे गुणवत्तेबाबत शंखा राहु नये यासाठी AnalysiesTestReport घेण्यात येतील.

सबब, सन २०२०-२१ या वर्षासाठी लागणारी औषध खरेदीसाठी तुलनात्मक कमी असलेल्या ई-निविदा प्रणालीव्दारे प्राप्त तुलनात्मक कमी दरांप्रमाणे ९६ प्रकारचे औषध खरेदीसाठी खर्च रु.४४,५०,६०७/- मात्रला मंजुरीस्तव व तुलनात्मक कमी दर असलेल्या वर नमुद 1 ते 3 या ई-निविदाधारकांकडून 3% सुरक्षा अनामत रक्कम जमा करुन रु 100/- चे स्टँम्प पेपरवर करारनामा लिहून देण्याचा आदेश देण्याबाबत विषय मे. स्थायी समिती पुढे मंजुरीतव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधिन राहून औषधी खरेदीसाठी आलेल्या सर्वात कमी दरास महाराष्ट महानगरपालिका अधिनियम 73 अन्वये मान्यता देण्यांत येत आहे.

तथापि सदर औषधांच्या गुणवत्तेबाबत संबंधितांकडुन हमीपत्र घेण्याची जबाबदारी प्रशासनाची राहील हा नागरिकांच्या आरोग्याचा महत्त्वाचा विषय असल्याने गुणवत्तेबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड करण्यात येऊ नये. तसेच कार्यादेश देण्यापूर्वी आलेल्या दराबाबत पुनश्च संबंधित पुरवठाधारकांशी दराबाबत चर्चा करण्यांत यावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/ - x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १०८ दैनंदिन बाजार फी वसुलीसाठी निविदा देकार रक्कम निश्चित करणे व निविदा प्रक्रिया राबविणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. अमोल मासुळे अनेक वर्षापासून सदर विषय रेंगाळत आहे याबाबत अनेक आरोप देखील झालेले आहेत यामध्ये आपण मनपा मार्फत बाजार फी वसुलीसाठी किती कर्मचारी नियुक्त केले आहेत त्यांच्या वेतनावर किती खर्च होतो व तो खर्च वजा जाता मनपास किती उत्पन्न मिळते याची माहिती सभागृहाला द्यावी याचा विचार प्रथम करावा आपण अवाजवी रक्कम ठेवून निविदा प्रसिद्ध करतो व त्याला प्रतिसाद मिळत नाही म्हणून याबाबत संपूर्ण विचार करून वार्षिक उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने निर्णय घ्यावा.

म.संतोष खताळ सदर विषय साधारण दोन वर्षापासून प्रलंबित आहे प्रशासनामार्फत अवास्तव देखा रक्कम ठरवली जाते व त्यामुळे निविदा जात नाही त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया नेहमीप्रमाणे सुरू राहते एक

वर्षाचा हिशोब करा कर्मचाऱ्यांचे वेतन वसुली पासून येणारे उत्पन्न याचा ताळमेळ घ्या व तेवढ्याच रकमेची निविदा प्रसिद्ध करा व हा प्रश्न एकदाचा मार्गी लावा.

म.सभापती — याबाबत प्रथम बाजार विभाग प्रमुख श्री.सुडके यांनी खुलासा करावा.

म.उपायुक्त — आपण मागील वर्षभरात किती उत्पन्न मिळाले या वर्षात किती उत्पन्न मिळाले. त्यात आपला अस्थापना खर्च किती झाला व त्यातून वजावट करून निव्वळ उत्पन्न किती मिळाले याचा हिशोब विभागाने काढावा याबाबत विभागावर वारंवार आरोप केले जातात त्यामुळे पारदर्शीपणे वस्तुस्थिती सभागृहात सादर करा.

म.किशोर सुडके — सन 15-16 मध्ये आपल्याकडे स्वच्छेने सुमारे पंधराशे फेरीवाल्यांची नोंदणी केली होती व ते गृहीत धरून मागील वर्षी स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर केलेला होता. स्थायी समितीने 32 लाख 50 हजार देकार रक्केमला मान्यता दिली होती व त्या अनुषंगाने आपण तीन वेळा निविदा प्रसिद्ध केली होती त्यानंतर फेब्रुवारी 2020 मध्ये स्थायी समितीने दहाऐवजी पंधरा रुपये दैनंदिन बाजार फी निश्चित केलेली आहे त्यानुसार आपण 58 लाख देकार रक्कम निश्चित करून दोन वेळा निविदा काढली पण निविदा आलेली नाही सध्या बाजार विभागात कर्मचाऱ्यांची कमतरता शिवाय हद्दवाढ क्षेत्र लक्षात घेता आपण दंडात्मक रक्कम आकारण्याचा प्रस्ताव समितीपुढे सादर केलेला होता पण सदर विषय झालेला आहे त्यात चर्चा झाल्या नुसार मागील तीन वर्षांची आकडेवारी काढलेली आहे त्यात कर्मचाऱ्यांचे पगार वार्षिक 1,40,000/- रुपये होतात व त्यानुसार रक्कम वजा जाता स्थायी समितीने निश्चित करावे.

म.सभापती — याबाबत प्रथमता मनपा आर्थिक हिताचे विचार करता शिल्लक काय राहील याचा तपशील प्रशासनाने द्यावा मनुष्यबळासाठी पगारावर किती खर्च होतो किती उत्पन्न येते त्यासाठी काय प्रक्रिया राबवावी याबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल स्थायी समितीसमोर सादर करावा त्यानंतर स्थायी समितीने निर्णय घेईल.

म.किशोर सुडके — बाजार विभागाकडे सध्या पाच कर्मचारी आहेत एका कर्मचाऱ्यांचा पगार 140000 आहे व वार्षिक पगार साधारणत 16,80,000/- इतका वेतनावर खर्च आहे मागील तीन वर्षाचे उत्पन्नाची सरासरी काढली होती त्यामध्ये दहा टक्के नैसर्गिक वाढ व सद्यस्थितीत पाच रुपयांनी झालेली वाढ या प्रमाणे रक्कम 43,44,0 00/- येते यात कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील 16 लाख 80 हजार मात्र खर्च कमी केला तर निव्वळ उत्पन्नाची रक्कम 26 लाख 64 हजार एवढी येते.

म.उपायुक्त — याबाबत संबंधित विभागाकडून माहिती घेतली असता सर्वसाधारणपणे दिवसाचा दहा हजार दैनंदिन बाजार फी वसूल होते वर्षाचे 365 दिवस याप्रमाणे 36 लाख रुपये उत्पन्न वार्षिक अपेक्षित आहे यासाठी आपले पाच कर्मचारी आहेत त्यांच्या वेतनावर सरासरी बीस हजार वेतन धरले तर 80 ते 90 हजार पगार द्यावा लागतो सर्वसाधारणपणे दहा लाख रुपये खर्च वार्षिक वेतनासाठी येतो यात 26 लाख निव्वळ उत्पन्न अपेक्षित आहे तसेच ज्या पंधराशे लोकांनी नोंदणी केली आहे ते आज कायम आहेत का याचाही विचार होणे आवश्यक आहे त्यामुळे रक्कम निश्चित करताना ही बाब विचारात घ्यावी लागेल आपण तीन ते चार वेळा प्रयत्न करूनही यामध्ये मार्ग निघत नसेल तर विभागाने ठोस निर्णय घेणे अपेक्षित आहे. याबाबत प्रशासनाकडून त्रुटी राहता कामा नये त्यामुळे संपूर्ण अभ्यास करून स्वयंस्पष्ट अहवाल सभागृहापुढे सादर करावा तसेच निविदेची रक्कम चर्चेअंती स्थायी समितीने ठरवावी लिलावाच्या बाबतीत आपण ई निविदेद्वारे प्रयत्न केला होता पण त्यात भाग घेतला जात नाही त्यामुळे ओपन लिलाव पारदर्शक प्रमाणे झाल्यास उत्पन्नात निश्चित वाढ होणार आहे व पारदर्शी प्रमाणे सर्व व्यवहार होतील याबाबत स्थायी समितीने निर्णय घ्यावा.

म.सभापती

यामध्ये काही अनधिकृत व्यक्तीकडुन बाजार फी वसूल केली जात असल्याची तक्रार आहे त्यामुळे पुढील कार्यवाही त्याचाही विचार होणे आवश्यक आहे.तसेच संबंधित लिलाव घेणाऱ्या निविदा धारकास मनपा मार्फत संरक्षण देणे किंवा वसुलीबाबत त्यांच्या काही तक्रारी असल्यास त्याबाबत मार्ग काढणे हे देखील गरजेचे आहे त्यामुळे समन्वय राहून मनपाचे हित जपले जाणार आहे यासाठी लिलाव पद्धतीने सदर निविदा प्रसिद्ध करावी व प्रशासनाच्या अहवालानुसार 26 लाख निव्वळ उत्पन्न असून त्यापुढे बोली सादर करणाऱ्या निविदा धारकास प्राधान्य द्यावे तसेच जास्तीत जास्त खूप असणाऱ्या वर्तमानपत्रात या जाहीर लिलावास प्रसिद्धी द्यावी तसेच प्रशासनातील प्रमुख अधिकारी व पदाधिकारी यांच्या समक्ष सभागृहात पारदर्शीपणे जाहीर लिलाव करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार दैनंदिन बाजार फी वसुलीसाठी खुल्या लिलाव पद्धतीने निविदा काढण्यात तसेच रक्कम रुपये 26,64,607/- मात्र या अंदाजित रकमेपेक्षा जास्त रक्कम बोली बोलणाऱ्या ठेकेदारास महानगरपालिकेच्या अटी शर्तींवर लिलाव करण्यास मान्यता देण्यात येत आहे

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२२ दिनांक २२/१२/२०२०

धुळे महानगरपालिका दै. बाजार फी वसुली कामी (११ गावे हद्दवाढ क्षेत्रासह) पुर्ण वसुली होणेकामी बाजार विभागात अपुर्ण कर्मचारी संख्या असल्याने सन २०१८-१९ मध्ये दै.बाजार फी प्रत्येकी रू. १०/- असतांना मे. स्थायी समिती ठरावानुसार रू. ३२.५० लक्ष या निश्चित केलेल्या रकमेवर ३ वेळा निविदा काढण्यांत आली मात्र कोणीही भरली नाही.

चालु वर्षी दै. बाजार फी रू. १५ प्रत्येकी नुसार ५८.५० लक्ष करीता २ वेळा निविदा काढुनही कोणी भरली नाही. मनपा उत्पन्नवाढीसाठी दै. बाजार फी कराची पावती न घेणा-या पथविक्रेत्यांना देखील ५% दंडाबाबत म.आयुक्तसो. यांनी मंजुरी दिल्यानुसार महानगरपालिका अधिनियम मधील कलम ३३२ नुसार सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे ठेवण्यांत आला असता संदर्भीय ठरावानुसार तहकुब ठेवण्यांत आला आहे.

म. सभापती सो. यांनी दि.७-१२-२०२० रोजी आयोजित केलेल्या मनपा अधिकारी मिटींग मध्ये झालेल्या चर्चेनुसार टिपणी सादर केली असता म. आयुक्त सो. यांचेकडील दि. १५-१२-२०२०रोजीच्या मंजुर टिपणीनुसार निविदाधारकांकडुन निविदा रकमेच्या डिपॉझिट रक्कम २५%ऐवजी रू.५लक्ष (अंदाजे एक महिन्याची रक्कम ठेवावे),देकार रक्कम २४ समान हप्त्यामध्ये अदा करावी,पुढील प्रत्येक १५ दिवसांची रक्कम ॲडवान्स मध्ये अदा करावी अशी शिफारस केलेली आहे.

दैनंदिन बाजार फी वसुली निविदा देकार रक्कम निश्चित करणे व म.आयुक्त सो. यांचे शिफारशी नुसार निविदा प्रक्रिया राबविणे यासाठी सदरचा प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे निर्णयार्थ सादर झलेला आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व प्रशासनाने सादर केलेला अहवाल लक्षांत घेता त्यानुसार दैनंदिन बाजार फी वसुलीसाठी खुल्या लिलाव पद्धतीने निविदा काढण्यात तसेच प्रशासनाच्या अहवालानुसार रक्कम रुपये 26,64,607/-.मात्र या अंदाजित रकमेपेक्षा जास्त रक्कम बोली बोलणाऱ्या ठेकेदारास महानगरपालिकेच्या अटी शर्तीस अधिन राहून दैनंदिन बाजार फी वसुलीचा ठेका देण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

यासाठी लिलाव पद्धतीने सदर निविदा प्रसिद्ध करावी व प्रशासनाच्या अहवालानुसार 26 लाख निव्वळ उत्पन्न असून त्यापुढे बोली सादर करणाऱ्या निविदा धारकास प्राधान्य द्यावे तसेच जास्तीत जास्त खूप असणाऱ्या वर्तमानपत्रात या जाहीर लिलावास प्रसिद्धी द्यावी तसेच प्रशासनातील प्रमुख अधिकारी व पदाधिकारी यांच्या समक्ष सभागृहात पारदर्शीपणे जाहीर

लिलाव करण्यांत यावा. तसेच आयुक्तांनी कार्यालयीन अहवालात नमूद केलेले अभिप्राय निविदा अटी शर्तीत नमूद करावेत.

सर्वानुमते मंजुर,

सही/ - x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १०९ ई-निविदा सूचना क्र.65 धुळे महानगरपालिका हद्दीतील शहर भागातील जुने पथदिवे काढुन नवीन LED पथदिवे बसविणे.तसेच आवश्यकतेप्रमाणे गर्डर पोल, स्ट्रीट लाईट कंडक्टर, केबल वायर,टायमर contacter,MCCB,RCCB, स्ट्रीट लाईट कंट्रोल प्यानल व इतर संबंधित विद्युत साहित्य बसविणे.ई (दर करार पध्दतीने आयटम रेट)निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म सभापती सदर विषय हा शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे ही मूलभूत समस्या आहे त्यामुळे यांनी निविदाधारक काय कार्यवाही करणार आहे व त्यामुळे महानगरपालिकेचा फायदा काय आहे व त्यांची कार्यपद्धती कशी राहणार आहे याबाबत सर्वप्रथम सभागृहापुढे खुलासा सादर करावा.

म.भारतीताई माळी सदर निविदा धारक देवपूर भागात कुठून सुरुवात करणार आहे व किती प्रभागात हा उपक्रम राबवणार आहेत याची माहिती मिळावी माझ्या प्रभागात बऱ्याच ठिकाणी पोल नाहीत माझ्या स्वत:च्या घरासमोरील रस्त्यावर तसेच गॉंदुर विमानतळ रोड बीएसएनएल ऑफिस येथे सुद्धा फोन नाहीत त्या ठिकाणी प्रचंड अंधार असतो त्या भागात नाही त्या भागात पुरवठा झाला मार्फत पोल उपलब्ध होतील का याची माहिती सभागृहाला द्यावी.

म.सईद बेग यात नवीन पोल आहेत त्यावरही सदर पुरवठादार का मार्फत लाईट लावणार आहे का व जुन्या पोलावर ही लाईट लावणार आहे का याचा खुलासा करावा.

म.एन.के.बागुल धुळे शहरात हद्दवाढ क्षेत्रासह एलईडी लाईट लावण्याबाबत मे. महासभेत प्रस्ताव सादर केलेला होता महासभेने जो आपला साधारण खर्च आहे 10 कोटी 65 लाख यास मान्यता दिलेली आहे व महासभेच्या मान्यतेनुसार देवपूर व शहर भागासाठी स्वतंत्र निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे शहर भाग म्हणजे पांझरा नदीच्या दक्षिणेकडील भाग व देवपूर भाग म्हणजे पांझरा नदीच्या उत्तरेकडील भाग असे भाग आहेत आपण यापूर्वी तीन वेळा निविदा प्रसिद्ध केली पहिल्या निविदेत प्रतिसाद नव्हता दुसऱ्या निविदेत जो निविदाधारक आलेला होता त्याने निवेदनातून माघार घेतली त्याची बयाणा रक्कम आपण जप्त करून तिसरी निविदा काढलेली आहे यामध्ये वल्लभ इलेक्ट्रिकल्स यांनी क्रॉम्प्टन कंपनीसाठी निविदा भरलेली आहे पूर्ण शहरांमध्ये प्रत्येक एलईडी क्रॉम्प्टन कंपनीचाच लावणार आहे आपण आयटेम रेटनुसार निविदा मागवलेली आहे यामध्ये पाच वर्ष एलईडी संबंधित देखभाल दुरूस्ती ही पुरवठादार यांनी करावयाची आहे तो दुरुस्त करायचा किंवा बदल व्हायचा यामध्ये पुरवठादाराने दहा टक्के फिटिंग व साहित्य ठेवणे बंधनकारक आहे म्हणजे एखादा एलईडी बंद पडला तर तो तात्काळ दुरुस्त झाला पाहिजे व त्याची संपूर्ण हमी घेण्यासाठी 25 टक्के जादा सुरक्षा अनामत रक्कमेची अट आपण निविदेत टाकली होती त्या अटी प्रमाणे आपण देयकातून चार टक्के S.D कपात करतो याव्यतिरिक्त 25 टक्के जादा सुरक्षा अनामत मागितली होती त्यातून दरवर्षी पाच टक्के सुरक्षा अनामत परत करणार होतो संबंधित पुरवठादाराने ही अट मान्य केली आहे त्यामध्ये आपण एकातून कपात न करता जी काही

रक्कम होईल त्याबाबतची बँक गॅरंटी संबंधित पुरवठादार देणार आहे या कामांमध्ये ठेकेदाराने पूर्ण शहरातील एलईडी बसवायचे आहेत काम सुरू झाल्यानंतर सुमारे सात ते आठ महिन्यात शहराचे पूर्ण काम होईल त्याप्रमाणे ठेकेदाराने कर्मचारीवर्ग नियुक्त करावयाचा आहे यामध्ये फक्त स्ट्रीट लाईट बसवण्याचे व्यतिरिक्त लाईटचे दुरुस्ती, स्ट्रीट लाईटचे फॉल्ट काढणे, पर्यवेक्षण करणे मेन स्विच दुरुस्ती यासाठी ही निविदा दर मागवले आहेत आपले जुने मेंन स्विचेस आहेत त्यामध्ये 25 के डब्ल्यू 35 के डब्ल्यू 40 के डब्ल्यू हा लोड आहे ज्यादा लोड मोठे सर्किट असल्याने वारंवार लाईन फॉल्ट होतात एक मेन स्विच अथवा सर्किट बंद पडले तर त्या भागातील शंभर ते दीडशे लाईट बंद पडतात त्यासाठी आपण जादाचे मीटर बसणार आहोत त्या ठिकाणी लोड कमी होईल सर्किट कमी होईल म्हणजे लाईन फॉल्ट कमी होतील यात अजून ज्या भागात पोल आहेत पण स्ट्रीट लाईट नाहीत त्या ठिकाणी पुरवठादारांकडुन स्ट्रीटलाइट कंडक्टर बसवायचे आहेत एमेसिबी कडुन नवीन पोल झाला तर त्यावर लाईट लावण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहणार आहे त्यासाठी वेगळा खर्च व अंदाजपत्रक तयार करण्याची गरज राहणार नाही.पुर्ण प्रभागात पाच वर्षात जे नवीन पोल बसविले जातील त्यावर स्ट्रीट लाईट लावण्याची जबाबदारी ठेकेदाराची असेल व आता जे पोल उभे आहेत व त्यावर स्ट्रीट लाईट कंडक्टर नाहीत त्यावर देखील पुरवठादारांकडुन स्ट्रीट लाईट व कंडक्टर लावण्यात येतील सदरचे लाईट बसवण्याचे काम पूर्णत: तांत्रिक दृष्ट्या करण्यात येणार आहे. ठेकेदाराने देवपूर व शहरी भागासाठी दोन स्वतंत्र तक्रार निवारण कक्ष निर्माण करावयाचा आहे व त्या ठिकाणी एसएमएस सुविधाही ठेकेदाराने करावयाची आहे तक्रार नोंद झाल्यानंतर ठेकेदाराला एसएमएस मिळेल व काम झाल्यानंतर ही तक्रारदाराला एसएमएस मिळेल अशी सुविधा करण्यात येणार आहे. यामध्ये क्रॉम्प्टन कंपनीसाठी रेट आलेले आहेत व संबंधित पुरवठादार त्या कंपनीचे अधिकृत वितरक आहेत तसेच ठेकेदाराची झालेल्या चर्चेमध्ये आपण पूर्ण शहराचा डीपीआर करण्यासाठी अट टाकलेली होती त्यानुसार आपणास ज्या ठिकाणी ज्या आवश्यक क्षमतेचा लाईट आवश्यक आहे त्याच पद्धतीचा व त्या क्षमतेचा लाईट लावण्यात येणार आहे यामध्ये रस्त्याची लांबी रुंदी पोलमध्ये अंतर आवश्यकता या बाबी विचारात घेऊन त्याप्रमाणे त्या क्षमतेचे विद्युत दिवे बसविण्यात येणार आहेत शासनाच्या स्ट्रीट लाईट लाइटिंग कोड प्रमाणे विद्युत दिवे बसविण्यात येतील याचा संपूर्ण डीपीआर तयार करावा लागणार आहे व त्याला मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मान्यता घ्यायची आहे यामुळे आपल्या विद्युत बिल यातही मोठ्या प्रमाणावर बचत होणार आहे व या सर्व अटी शर्ती मध्ये आपण या बाबी नमूद केलेले आहेत ज्या ठिकाणी नवीन पोल आवश्यक आहे त्याठिकाणी नवीन पोल डीपीआर नुसार पुरवठादाराकडून टाकण्यात येतील.

म.सभापती:- शहरात एकूण किती पोल आहेत आपण किती नवीन पोलची ऑर्डर देणार आहे त्यासाठी काही खर्च आहे का?

म.एन.के.बागुल आपण रस्त्याच्या आवश्यकतेप्रमाणे पोल लावणार आहोत टप्प्याटप्प्याने काम करणार आहोत शहरातील रहिवास व वापरातील भाग आहे व ज्या ठिकाणी गरज आहे त्याच ठिकाणी पोल लावण्यात येतील.

म.उपायुक्त आपण मागील निविदेत संबंधित ठेकेदाराला ठराविक रक्कम देत होतो त्यामुळे या सर्व कामावर नियंत्रण ठेकेदाराचे होते त्यामुळे आपल्याला अडचणींचा सामना करावा लागला परंतु या निविदेत आपल्याला ठेकेदाराला पैसे द्यायचे आहेत ज्या ठिकाणी आणि आवश्यकता आहे व त्या ठिकाणी रहिवास आहे त्याच ठिकाणी पोल लावला जाईल.

म.युवराज पाटील — आमच्या भागातील पोल वरून लाईट काढले गेलेले आहेत व अद्याप लाईट लावलेले नाहीत संबंधित असेल ठेकेदार उडवाउडवीचे उत्तर देतो आपण याबाबत काय कारवाई करणार आहोत

म.सभापती — आपण ही जी निविदा काढलेली आहे हीच यासाठीच काढलेली आहे हे यामध्ये आपल्यास पूर्वी लाईट बिल किती येत होते व सदर निविदा दिल्यामुळे आपला फायदा होणार आहे का याचा खुलासा करावा.

म.एन.के.बागुल — आपण याबाबतीत शहराचा जो डीपीआर तयार करणार आहोत त्याचसाठी तयार करणार आहोत आपल्याला आज जे बील येते ते 38 ते 40 लाख रुपये बिल येते एलईडी लावल्यानंतर यात सुमारे 40 टक्के बचत अपेक्षित आहे त्याप्रमाणे अंमलबजावणी काटेकोर करणे गरजेचे आहे ज्याठिकाणी क्षमतेचे व आवश्यक आहेत त्याच क्षमतेच्या विद्युत दिवे बसवल्यास बीलामध्ये मोठ्या प्रमाणावर बचत होणार आहेत. सुमारे 18 लाख रूपये विद्युत बिलात बचत होणार आहे. शहरात सद्यस्व त्यानुसारच एलईडी दिवे बसवले जाणार आहे.

म.अमोल मासुळे:- यामध्ये यापूर्वी पोलवर जे लाईट लावलेले आहेत वेगवेगळ्या क्षमतेचे वेगवेगळ्या प्रकारचे आहेत त्याची आपण काय करणार आहोत याचा खुलासा करावा.

म.एन.के.बागुल:- यामध्ये एलईडी व्यतिरिक्त जे लाईट लागलेले आहेत ते काढले जातील ज्या ठिकाणी जास्त क्षमतेचे असतील तेही लाईट काढले जातील आणि जे एलईडी लाईट बंद असतील ते दुरुस्त केले जातील. आणि जे जुने साहित्य व विद्युत दिली आहे त्याचे आपण सरसकट दोनशे रुपये स्ट्रीटलाइट याप्रमाणे ठेकेदाराकडुन घेणार आहोत व सदरची रक्कम ठेकेदाराच्या बिलातून कपात करण्यात येणार आहे.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून व अटी शर्तीना अधिन राहून आलेल्या निविदा दरास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२३ दिनांक २२/१२/२०२०

धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.88 दि.31-12-2019 नुसार रक्कम **रु.10,65,80,672** मात्र (एकत्रित खर्चास) खर्चास आर्थिक व **प्रशासकीय मंजुरी** देणेत आली आहे.या ठरावातील निर्देशानुसार पांझरा नदीच्या उत्तरेकडील देवपूर भागातील स्वतंत्र व पांझरा नदीच्या दक्षिणेकडील शहर भागातील स्वतंत्र निविदा करणेचे निर्देश असल्याने, दोन भागात ई-निविदा कार्यवाही करणेत आली आहे.

सदरचे कामी अंदाजपत्रकीय बाबींकरिता आयटम रेट ने वार्षिक करार करणेसाठी व पाच वर्ष मुदतीकरिता देखभाल दुरुस्ती करणेसाठी मक्तेदाराकडून दर मागविणेत आले आहे.या कामी ई-निविदा सूचना क्र.77 दि.13-2-2020च्या नुसार निविदा दर माग्विनेत आले असता तीन निविदा प्राप्त न झाल्याने सदरची निविदा रद्द करून फेर निविदा मागविणेत आली. उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./विवि/पापु/9. दि.26-5-2020 अन्वये व दि.27-5-2020 च्या दै.पुण्य नगरी/पथदर्शी किंवा धुळे महानगपालिका/महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www. Dhule corporation. org/www.mahatender.gov.inवर खुल्या ई-निविदा / कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून दि.15-6-2020 रोजी निविदा मागविणेत आले आहेत. ई-निविदा सूचना क्र.11 दि.26-5-2020 च्या नुसार मागविनेत आलेल्या निविदेमध्ये खालीलप्रमाणे 1 ते 4 मक्तेदार यांनी बाबनिहाय दर सादर केलेले होते.सदर निविदेत L१ निविदाधारक यांचे दर तुलनेत कमी आले.तथापि L१ निविदाधारकनि निविदेतून माघार घेतल्याने L१ मक्तेदार यांची बयाना रक्कम जप्त करून तसेच त्यांना एक वर्ष करिता

निविदेसाठी प्रतिबंधित करून पुन्हच निविदा मागविणे करिता दि.27-8-2020 च्या म.आयुक्त सो यांच्या मान्यतेने तिसरी निविदा मागविण्यात आली आहे.

या कामी ई-निविदा सूचना क्र.65 दि.7-102020 च्या नुसार निविदा दर माग्विनेत आले.उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ विवि/पापु /120.दि.7-10-2020 अन्वये व दि.8-10-2020 च्या दै.लोकमत/राज्रंग टाईम्स किंवा धुळे महानगपालिका/महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www. Dhule corporation.org/www.mahatender.gov.inवर खुल्या ई-निविदा / कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून दि.23-10-2020 रोजी निविदा मागविणेत आले आहेत. या निविदेत तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला असता खालीलप्रमाणे दोन मक्तेदाराने निविदेत सहभाग घेतला आहे.

मे.वल्लभ इलेक्ट्रिकल्स,व्ही.यु.नगर,जि.आनंद,गुजरात.

मे.विनवाक सिस्टीम,नाशिक.

वरीलप्रमाणे निविदाधारकांच्या कागदपत्रांची छाननी केली असता मे.विनवाक सिस्टीम यांनी निविदेतील क्र.1.4.6 च्या शर्ती प्रमाणे नमूद केलेल्या LEDकंपनीचे सह्पत्र तथा अधिकार पत्र जोडलेले नाही.त्यामुळे मनपास आवश्यक असेलेल्या मान्यताप्राप्त कंपनीसाठी क्र.2चे निविदाधारक यांनी कुठलेही कागदपत्र जोडलेले नसल्याने हे निविदाधारक अपात्र असल्याने व सदरची निविदा तीसरी असल्याने उर्वरित निविदेत सहभागी मे.वल्लभ इलेक्ट्रिकल्स,गुजरात यांचे लिफाफा क्र.2(commercial bid) उघडणे बाबतच्या मान्यतेप्रमाणे दि.5-11-2020 रोजी उघडण्यात आले.मक्तेदाराने आयटम रेट दर दिलेले होते.

निविदेमध्ये प्राप्त दर व महानगरपालिकेचे प्रार्थमिक अंदाजपत्रकातील दर या बाबतची तुलना करण्यांत आली.

प्राप्त निविदामध्ये मक्तेदाराचे दर जास्त असल्याने मक्तेदारास धुमपा/ विवि /151.दि.6-11-2020 नुसार दर कमी करणेबाबत पत्र देण्यात आले. मक्तेदाराने आ.क्र. 3482. दि.25-11-2020च्या पत्रानुसार निविदेच्या दरांबाबत पत्र दिलेले आहे.त्याचा तपशील खालीलप्रमाणे

Sr. No.	DESCRIPTION OF WORK	UNITS	SVE RATE	SVE AMOUNT	DMC RATE	12% ON DMC RATE	TOTAL DMC RATE	DIFFRENCE	PERCENTAGE (%)
1	Supplying and erecting LED street light fitting suitable above 26W to 36W lamp, including lamp, with PF > 0.95 class IP 65 and above housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete as per specification No FGODF/FLS2.(2-5-3) **Make of Bajaj,Philips,Cromton,Surya,Osram with Lence**	Each	3170	3158.000	2612	313.44	2925.44	232.560	7.949573398

2	Supplying and erecting LED Street light fitting suitable for above 40W to 48W lamp, including lamp, with PF > 0.95 class IP 65 and above housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete as per specification No .FG-ODF/FLS2.(2-5-4) Make of Bajaj,Philips,Cromton,Surya,Osra m with Lence	Each	4120	**4188.000**	3464	415.68	**3879.68**	308.320	7.947047179
3	Supplying and erecting LED street light fitting suitable for above 60W-75W lamp, including lamp, with PF > 0.95 class IP 65 and above housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete as per specification No FGODF/FLS2 (2-5-6) Make of Bajaj,Philips,Cromton,Surya,Osra m with Lence	Each	7000	**7047.000**	5829	699.48	**6528.48**	518.520	7.942430704
4	Supplying and erecting LED street light fitting suitable for above75W - 90W lamp, including lamp, with PF > 0.95, class IP 65 and above housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete as per specification No. FGODF/FLS2.(2-5-7) Make of Bajaj, Philips, Cromton, Surya, Osram with Lence	Each	8593	**8610.000**	7122	854.64	**7976.64**	633.360	7.940185341
5	Supplying and erecting LED FLOOD fitting 150 W, including lamp, with PF > 0.95, class IP 65 and above housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete as per specification No FG-ODF/FLS-2.(2-5-10) Make of Bajaj, Philips, Cromton, Surya, Osram with Lence	Each	18574	18650.000	15426	1851.12	17277.12	1372.88	7.946231779
6	Supplying and erecting street light bracket for erection of side entry fitting on pole with 40 mm. dia. _B' grade G.I. pipe of required length complete as per specification no. FG-BKT/SLB (2-9-9)	mtr	502	550.000	455	54.6	509.6	40.400	7.927786499
7	Supplying & erecting mains with 2x2.5 sq.mm F.R copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WGMA/BW (1-3-3) Reduce rate for alluminium.	mtr	32	32.640	27	3.24	30.24	2.400	7.936507937
8	Dismantling the existing W.T. fluorescent fitting/ S.V./ M.V. /M.H. lamp /LED fitting from pole with brackets complete.(2-14-3)	Each	106	117.250	97	11.64	108.64	8.610	7.925257732

9	Dismantling of faulty LED & Repalcement of repaired or new LED of similar wattage(Including old existing LED street lights of any make and wattages) & repair of minnor faults such as loose connection of wire,carbon at the joints etc. at the pole within 3 days.The contractor have to keep the street light in working condition and if required he have to raplace the fitting.The job include day to day supervision with adapting qualified enginner & technical superviser & day to day reporting to corporation on next day.	per pole per month	7	4.836	4	0.48	4.48	0.356	7.946428571
10	Job of maintaining street light ON/OFF with repair of any type of maintenanace such as MCCB,Contactor,Timmer,Cable,Service connection and day to day fault finding and remeady and repairs of Line faults etc. For 5 years.The contractor should have maintain all swiching point with all material in good condition & after 5 years it must be handed over to corporation with all good working accessories.as per Indian electricity act 2003.	per month per meter point	403	423.155	350	42	392	31.155	7.947704082
11	Supplying & erecting street light control panel in powder coated CRCA 14/16 SWG sheet, outdoor type, single phase, 240 V consisted of suitable rating contactor, 24 hrs digital / astronomical time switch with minimum 5 years battery backup, SPN MCB 40 A, auto/manual selector switch, ON/OFF push buttons, indicator lamps, control wiring, metering device, etc for automatic operation & overcurrent, short circuit, earth fault protection of street lights upto the maximum load of 6 kW on provided iron frame/ CC foundation complete.5-2-16	Each	20500	19858.000	16426	1971.12	18397.12	1460.88	7.940808126

12	Supplying & erecting street light control panel in powder coated CRCA 14/16 SWG sheet, outdoor type, single phase, 240 V consisted of suitable rating contactor, 24 hrs digital / astronomical time switch with minimum 5 years battery backup, SPN MCB 63 A auto/manual selector switch, ON/OFF push buttons, indicator lamps, control wiring, metering device, etc for automatic operation & overcurrent, short circuit, earth fault protection of street lights upto the max load of 12 Kw on provided iron frame / CC foundation complete.5-2-17	Each	25000	25045.000	20717	2486.04	23203.04	1841.96	7.938442549
13	Supplying & erecting street light control panel in powder coated CRCA 14/16 SWG sheet, outdoor type, three phase, 415 V consisted of suitable rating contactor, 24 hrs digital / astronomical time switch with minimum 5 years battery backup, TPN MCB 40 A auto/manual selector switch, ON/OFF push buttons, indicator lamps, control wiring, metering device, etc for automatic operation & overcurrent, short circuit, earth fault protection of street lights upto the max load of 6 kW on provided iron frame / CC foundation complete.5-2-18	Each	25000	24743.000	20466	2455.92	22921.92	1821.08	7.944709693
14	Supplying & erecting street light control panel in powder coated CRCA 14/16 SWG sheet, outdoor type, three phase, 415V consisted of suitable rating contactor, 24 hrs digital/ astronomical time switch with minimum 5 years battery backup, TPN MCB 63 A auto/manual selector switch, ON/OFF push buttons, indicator lamps, control wiring, metering device, etc for automatic operation & overcurrent, short circuit, earth fault protection of street lights upto the max load of 12 kW on provided iron frame / CC foundation complete.5-2-19	Each	32020	32305.000	26722	3206.64	29928.64	2376.36	7.94008682

15	Supplying & erecting street light control panel in powder coated CRCA 14/16 SWG sheet, outdoor type, three phase, 415 V consisted of suitable rating contactor, 24 hrs digital/ astronomical time switch with minimum 5 years battery backup, TPN MCB 110 A auto/manual selector switch, ON/OFF push buttons,indicator lamps, control wiring, metering device, etc for automatic operation & overcurrent, short circuit, earth fault protection of street lights upto the max load of 12 kW on provided iron frame / CC foundation complete.5-2-20	Each	52000	54295.000	44910	5389.2	50299.2	3995.80	7.944062729
16	Providing & erecting 3 Pole MCCB upto 100A, 415V, with short circuit rating 25 kA (Ics=100% of Icu),adjustable thermal (overload) setting and fixed magnetic setting with provided leads,provision for installation of shunt/ UV/ trip alarm contact and MCCB should have phase barriers both sides, in provided enclosure on iron /GI frame as per specification no. SW-SWR/MCCB 5-5-1	Each	5600	5449.000	4507	540.84	5047.84	401.160	7.947161558
17	Providing & erecting 3 Pole MCCB of 200A,415V capacity with short circuit rating 25 kA (Ics=100% of Icu) adjustable thermal (overload) setting and fixed magnetic setting with provided leads,provision for installation of shunt/ UV/ trip alarm contact and MCCB should have phase barriers both sides, in provided enclosure on iron /GI frame as per specification no. SW-SWR/MCCB 5-5-2	Each	11200	10892.000	9009	1081.08	10090.08	801.920	7.947607948
18	Providing & erecting 3 Pole MCCB of 250A,415V capacity with short circuit rating 36 kA (Ics=100% of Icu) adjustable thermal (overload) setting and fixed magnetic setting with provided leads,provision for installation of shunt/ UV/ trip alarm contact and MCCB should have phase barriers both sides, in provided enclosure on iron /GI frame as per specification no. SW-SWR/MCCB 5-5-3	Each	15100	14827.000	12264	1471.68	13735.68	1091.32	7.945147237

19	Providing & erecting 3 Pole MCCB of 315/400A, 415V capacity with short circuit rating 36 kA (Ics=100% of Icu), adjustable thermal (overload) setting and fixed magnetic setting with provided leads, provision for installation of shunt/ UV/ trip alarm contact and MCCB should have phase barriers both sides, in provided enclosure on iron /GI frame as per specification no. SW-SWR /MCCB 5-5-4	Each	20500	19653.000	16256	1950.72	18206.72	1446.28	7.943660363
20	Providing & erecting 3 Pole MCCB of 800A, 415V capacity with short circuit rating 50 kA ,(Ics=100% of Icu), adjustable thermal (overload) setting and fixed magnetic setting with provided leads,provision for installation of shunt/ UV/ trip alarm contact and MCCB should have phase barriers both sides, in provided enclosure on iron /GI frame as per specification no. SW-SWR/MCCB 5-5-6	Each	38060	38230.000	31621	3794.52	35415.52	2814.48	7.947024355
21	Supplying, erecting & terminating XLPE armoured cable 4 core 10 sq. mm. aluminium conductor with continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL 7-1-28	mtr	191	184.970	153	18.36	171.36	13.610	7.942343604
22	Supplying, erecting & terminating XPLE armoured cable 4 core 16 sq. mm. aluminium conductor with continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL 7-1-29	mtr	223	216.400	179	21.48	200.48	15.920	7.94094174
23	Supplying, erecting & terminating XLPE armoured cable 4 core 25 sq. mm. aluminium conductor with continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL 7-1-30	mtr	277	268.400	222	26.64	248.64	19.760	7.947232947

24	Supplying, erecting & terminating XLPE armoured cable 4 core 35 sq. mm. aluminium conductor with continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL 7-1-31	mtr	340	333.650	276	33.12	309.12	24.530	7.935429607
25	Supplying and erecting rolled steel joist (girder) pole 125 x 70 mm (13.3 kg/m) with provided base plate in provided foundation as per specification no.OH-PL/RSJ 8-1-13	mtr	1294	1038.500	859	103.08	962.08	76.420	7.943206386
26	Supplying and erecting all aluminium stranded conductors 7/2.21 mm complete. (Gnat) (73.77kg/km) as per specification no.OH-CON/AAC 8-5-2	km	24910	23247.000	19230	2307.6	21537.6	1709.40	7.936817473
27	Supplying and erecting all aluminium stranded conductors 7/3.10 mm. complete. (Ant.) (145.0 kg/km) as per specification No. OH-CON/AAC 8-5-5	km	47000	38940.000	32210	3865.2	36075.2	2864.80	7.941189515
28	Supplying and erecting pin type LT medium insulator 100 mm x 62 mm dia. with suitable G.I. spindle, nut, bolts complete erected.8-6-1	Each	83	78.570	65	7.8	72.8	5.770	7.925824176
29	Providing pipe type earthing with 40mm. dia. G.I. pipe or 20 mm dia. G.I. Rod complete with all materials as per specification no. EAEP 9-1-4	Each	1640	1510.000	1249	149.88	1398.88	111.120	7.943497655
30	Making cement concrete foundation including excavation (60 x 60 x 150) cm deep in 1:3:6 cement concrete 20 x 25 mm stone metal, (45x 45 x 45) cm /45 cm dia. x 45 cm height plinth duly plastered, with necessary curing and finishing complete. (above 6 m to 9 m poles) 16-3-3	Each	2900	2206.000	1825	219	2044	162.00	7.925636008
31	Making cement concrete foundation including excavation (60 x 60x 150) cm deep in 1:3:6 cement concrete, (20 to 25) mm stone metal with necessary curing and finishing complete.(for stay). 16-3-6	Each	2900	1831.300	1515	181.8	1696.8	134.50	7.926685526
32	Supplying & erecting FRP box of size 150 x 125 x 100 mm, 2.7 mm thick complete on pole/wall as per specification no. CB-SB 7-1-3	Each	610	538.000	445	53.4	498.4	39.600	7.945425361

33	Supplying & erecting mains with 2x6 sq.mm F.R copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WGMA/BW 1-3-7	mtr	133	123.310	102	12.24	114.24	9.070	7.93942577
34	Supplying, fixing and commissioning 4 pole RCBO (residual current breaker with overcurrent short circuit 10 kA and earth leakage protection), with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 6A/10A/16A/20A/25/A as per specification no SWRCCB/RCBO 5-6-14	Each	4700	4226.000	3496	419.52	3915.52	310.480	7.929470415
35	Supplying, fixing and commissioning 4 pole RCBO ((residual current breaker with overcurrent short circuit 10 kA and earth leakage protection), with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 32A/40A as per specification no SW-RCCB/RCBO 5-6-15	Each	5200	4648.000	3845	461.4	4306.4	341.600	7.932379714
36	Supplying, fixing and commissioning 4 pole RCBO ((residual current breaker with overcurrent short circuit 10 kA and earth leakage protection), with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 63A as per specification no SW-RCCB/RCBO 5-6-16	Each	5600	5147.000	4258	510.96	4768.96	378.040	7.927095216
37	Providing, erecting & commissioning 4 pole RCCB of electromagnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 100A, complete as per specification no. SWRCCB/RCCB 5-6-8	Each	5600	5590.000	4624	554.88	5178.88	411.120	7.938395947
38	Supplying and erecting quartz electronic time switch having 24 hour dial to work on 250 V 50 cycle AC having built in rechargeable nickel cadmium batteries to run the time switch on failure of supply having switch contact rating upto 16A to use independently or in conjunction with contactor.4-4-1	Each	3220	2860.000	2366	283.92	2649.92	210.080	7.927786499

39	Supplying and erecting programmable digital almanac timer microcontroller based with real time clock to operate on derived switching —ONǁ & switching —OFFǁ street light as per daily sunset and sunrise respectively automatically having 4 digit LED continuous time display, relay output 230 V / 10A with 10 hrs battery backup and manual over drive facility capable to drive different capacity contactors timer erected in provided M.S. box in an approved manner.4-4-6	Each	7450	7260.000	6005	720.6	6725.6	534.400	7.945759486
40	Supplying and erecting two pole power contactor 230 V, 32 A for time switch complete erected on provided wooden block/ box, with necessary materials.4-4-3	Each	2900	2840.000	2349	281.88	2630.88	209.120	7.948671167
41	Supplying and erecting four pole power contactor 430 V, 40 A for time switch complete erected on provided wooden block/ box, with necessary materials.4-4-8	Each	2900	3128.500	2588	310.56	2898.56	229.940	7.932904615
42	Supplying and erecting iron clad cut out HC type 415V 32A erected on polished wooden block complete.5-10-2	Each	250	235.700	195	23.4	218.4	17.300	7.921245421
43	Supplying and erecting iron clad cut out HC type 415V 63A erected on polished wooden block complete.5-10-3	Each	430	407.400	337	40.44	377.44	29.960	7.93768546
44	Supplying and erecting iron clad cut out HC type 415V 100A erected on polished wooden block complete.5-10-4	Each	790	760.300	629	75.48	704.48	55.820	7.923574835
45	Supplying and erecting iron clad cut out HC type 415V 200A erected on polished wooden block complete.5-10-5	Each	1420	1294.700	1071	128.52	1199.52	95.180	7.934840603
46	Providing earthing with copper earth plate size 30 x 30 x 0.315 cm complete with all materials, testing & recording the results as per specification no. EA-EP 9-1-2	Each	11000	6633.000	5487	658.44	6145.44	487.560	7.933687417
47	Painting of steel tubular / rail / RSJ pole above 6.0 m length along with street light pole brackets, clamps etc by scrapping the existing paint complete. Specificationno CW -PTG/PTP.16-4-3	mtr	92	87.050	72	8.64	80.64	6.410	7.94890873
48	Painting of street light number on existing pole with approved quality enamel paint as directed by engineer in charge.	per pole	25	24.180	20	2.4	22.4	1.780	7.946428571

49	Supplying and erecting G.I. stay set for poles, including loop insulators at inaccessible height complete with anchor plate 300 x 300 x 6 mm., straining screws, G.I. stay wire 7/8 SWG, G.I.stay rod 20 mm x 1.8 m length and pole clamps duly erected in provided cement concrete foundation.8-7-2	Each	2000	1826.500	1511	181.32	1692.32	134.180	7.928760518
50	Supplying and erecting mains with ISI mark WP 2 x 6 sq. mm. 1100 V. grade aluminium PVC insulated and PVC sheathed wires on G.I. bearer wire No. 8 SWG complete erected with required size of porcelain reel insulators and 16 SWG G.I.binding wire.1-4-3	mtr	88	84.630	70	8.4	78.4	6.230	7.946428571
51	Supplying and erecting iron, sheet metal work consisting of CRCA sheets, various sections of iron, plates, chequered plates,rods, bars, MS pipes, etc. for panel board or any other purpose with bending, cutting, drilling and welding complete erected at the position with necessary materials duly painted with one coat of red oxide and two coats of enamel paint to match the switchgears or as per directions by the authority.6-1-19	kg	178	158.350	131	15.72	146.72	11.630	7.926663032
				405805.291			375948.16	29857.1	**7.9418**

त्यांचे पत्रानुसार त्यांनी आयटम रेट चे दर कमी करून प्रत्येक आयटम निहाय सरासरी 7.94% **जास्तीचे** दर दिले आहे.

मक्तेदार श्री.वल्लभ इलेक्ट्रिकल यांनी दर वाटाघाटी करतांना वरीलप्रमाणे निविदेतील दर कमी करतांना निविदेच्या शर्थ क्र.8 मध्ये मक्तेदाराच्या अतिरिक्त सुरक्षा रक्कमेकरीता 5% प्रमानेच्या पाच बँक ग्यारेंटी पत्र करून देण्याचे नमूद केले आहे.मूळ शर्त क्र.8 मध्ये मक्तेदाराची बिलातील LED साठी च्या 1 ते 5 आयटम साठी च्या देय रक्कमेतून 25% अतिरिक्त सुरक्षा रक्कम कपात करायची आहे.मक्तेदारास काम जर समाधानकारक असल्यास 5% प्रती वर्ष परत करावयाचे आहे.यामध्ये दर वाटाघाटी मक्तेदाराने बँक ग्यारेंटी देण्याचे काबुल केले आहे.ज्याकी 5% प्रमाणे पाच या प्रमाणे 25% असतील.

सदर निविदेच्या लिफाफा क्र.1 मध्ये मक्तेदाराने संपूर्ण शहराचा सर्वेक्षण करणे, शासनाच्या निर्धारित स्ट्रीट लाईट नियामाप्रमाणे प्रस्तावित पथदिवे बसविणे, त्यांचे wattge,व पूर्ण पथदिव्यांची गणना करणे,तसेच शहरच्या पथदिवे संरचना मध्ये सुधारणा करणे,व LED पथदिवे बसविलेनंतर होणारी वीज बचत ई. संपूर्ण कामाचा प्रकल्प अहवाल(DPR) तयार करणे.ई कामासाठी 15 लक्ष रुपये दर नमूद केलेले आहे.धुळे महानगरपालिकेने EESL कंपनी धुळे शहराचा वरील प्रमाणे बाब निहाय DPR करणेसाठी मनपा जा.क्र.118 दि.12-9-20198. नुसार रक्कम रु.10,26,000/- करिता कार्यादेश देण्यात आलेला होता.तथापि EESL कंपनीने या कामी कुठलेही काम केले नाही.वारंवार नोटीस देऊनही काम ण केल्याने त्यांचे कार्यादेश रद्द करणेत आले.वरीलप्रमाणे DPR बाबत

मा.आयुक्त सो,अभियंता सो यांच्या कडेस झालेल्या चर्चेनुसार मक्तेदाराने केलेल्या DPR करिता शासकीय प्राधिकरण,मुख्य अभियंता सा.बा.विद्युत विभाग किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडून तांत्रिक मान्यता(Technical Approval) करून आणण्याची जबाबदारी त्यांची असेल हि बाब मान्य केली आहे.करिता मक्तेदाराने DPR करणेसाठी दिलेले दर रु.15 लक्ष मात्र मंजुरीस हरकत नाही.

वरील प्रमाणे उक्त कामी तीन वेळा ई-निविदा कार्यवाही झालेली असून तृतीय निविदेत श्री.वल्लभ इलेक्ट्रिकल यांचे negotiation अंती आलेले दर (Crompton साठी) नमूद केलेले आहे.उक्त अहवालानुसार श्री.वल्लभ इलेक्ट्रिकल्स यांचे negotiation अंती आलेले दरांना मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

उक्त कामी मक्तेदाराने DPR करणेसाठी मक्तेदाराचे दर रु.15 लक्ष (DPR साठी शासकीय प्राधिकरण,मुख्य अभियंता सा.बा.विद्युत विभाग किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडून तांत्रिक मान्यता आणण्याच्या शर्तीवर) करिता खर्च मंजुरीस्तव सादर करण्यांत येत आहे. तसेच negotiation अंती मक्तेदाराने 25% अतिरिक्त सुरक्षा रक्कम बिलातून कपात न करता 5% प्रमाणे पाच स्वतंत्र बँक ग्यारेंटी करून देण्याचे मान्य केलेले आहे.

वरीलप्रमाणे निविदेच्या सर्व अटी व शर्ती मक्तेदार श्री.वल्लभ इलेक्ट्रिकल्स यांना कायम ठेऊन LED पथदिवे बसविणे व पाच वर्ष देखभाल दुरुस्ती करणे कामाकरिता दर करार करणेसाठी मे.स्थायी समितीकडे मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधिन राहून शहर विभागासाठी श्री.वल्लभ इलेक्ट्रिकल्स यांचे negotiation अंती आलेले दरास व मनपाच्या अटी शर्तींना मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत संबंधित पुरवठा धारकाकडून अटी शर्तीचा लेखी करारनामा करण्यांत यावा.

तसेच यापूर्वी असणा-या ठेकेदारास वेळेवर देयके अदा न केल्याने कामात मोठया प्रमाणावर अडचणी निर्माण झालेल्या होत्या त्यामुळे सदर बाब होवू नये यासाठी या प्रस्तावामुळे विदयुत बिलात बचत होणार असून सदर बचत होणारी रक्कम स्वतंत्र बँक खात्यात टाकण्यांत यावी व संबंधित पुरवठादारास त्यामधून कामाची देयके अदा करावीत.

सर्वानुमते मंजुर,
सही/ - x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११० ई-निविदा सूचना क्र.65 धुळे महानगरपालिका हद्दीतील देवपूर भागातील जुने पथदिवे काढुन नवीनLED पथदिवे बसविणे.तसेच आवश्यकतेप्रमाणे गर्डर पोल,स्ट्रीट लाईट कंडक्टर, केबल वायर,टायमर contacter,MCCB,RCCB, स्ट्रीट लाईट कंट्रोल प्यानल व इतर संबंधित विद्युत साहित्य बसविणे.ई (दर करार पध्दतीने आयटम रेट)निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती सदर प्रस्ताव विषय क्रमांक १०९ प्रमाणेच असून यांत पुरवठादार तसेच दर व अटी शर्ती एकाच स्वरुपाच्या आहेत.त्यामुळे सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून व अटी शर्तींना अधिन राहून आलेल्या निविदा दरास मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२४ दिनांक २२/१२/२०२०

धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.88 दि.31-12-2019 नुसार रक्कम **रु.10,65,80,672** मात्र (एकत्रित खर्चास) खर्चास आर्थिक व **प्रशासकीय मंजुरी** देणेत आली आहे.या ठरावातील निर्देशानुसार पांझरा नदीच्या उत्तरेकडील देवपूर भागातील स्वतंत्र व पांझरा नदीच्या दक्षिणेकडील शहर भागातील स्वतंत्र निविदा करणेचे निर्देश असल्याने, दोन भागात ई-निविदा कार्यवाही करणेत आली आहे.

सदरचे कामी अंदाजपत्रकीय बाबींकरिता आयटम रेट ने वार्षिक करार करणेसाठी व पाच वर्ष मुदतीकरिता देखभाल दुरुस्ती करणेसाठी मक्तेदाराकडून दर मागविणेत आले आहे.या कामी ई-निविदा सूचना क्र.77 दि.13-2-2020च्या नुसार निविदा दर माग्विनेत आले असता तीन निविदा प्राप्त न झाल्याने सदरची निविदा रद्द करून फेर निविदा मागविणेत आली. उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./विवि/पापु/9. दि.26-5-2020 अन्वये व दि.27-5-2020 च्या दै.पुण्य नगरी/पथदर्शी किंवा धुळे महानगपालिका/महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.Dhule corporation.org/www.mahatender.gov.inवर खुल्या ई-निविदा / कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून दि.15-6-2020 रोजी निविदा मागविणेत आले आहेत. ई-निविदा सूचना क्र.11दि.26-5-2020 च्या नुसार मागविनेत आलेल्या निविदेमध्ये खालीलप्रमाणे1 ते 4 मक्तेदार यांनी बाबनिहाय दर सादर केलेले होते.सदर निविदेत L१ निविदाधारक यांचे दर तुलनेत कमी आले.तथापि L१ निविदाधारकनि निविदेतून माघार घेतल्याने L१ मक्तेदार यांची बयाना रक्कम जप्त करून तसेच त्यांना एक वर्ष करिता निविदेसाठी प्रतिबंधित करून पुन्हच निविदा मागविणे करिता दि.27-8-2020 च्या म.आयुक्त सो यांच्या मान्यतेने तिसरी निविदा मागविण्यात आली आहे.

या कामी ई-निविदा सूचना क्र.65 दि.7-102020 च्या नुसार निविदा दर माग्विनेत आले.उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ विवि/पापु /120.दि.7-10-2020 अन्वये व दि.8-10-2020 च्या दै.लोकमत/राज्रंग टाईम्स किंवा धुळे महानगपालिका/महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटwww.Dhule corporation.org/www.mahatender.gov.inवर खुल्या ई-निविदा /कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून दि.23-10-2020 रोजी निविदा मागविणेत आले आहेत. या निविदेत तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला असता खालीलप्रमाणे दोन मक्तेदाराने निविदेत सहभाग घेतला आहे.

मे.वल्लभ इलेक्ट्रिकल्स,व्ही.यु.नगर,जि.आनंद,गुजरात.

मे.विनवाक सिस्टीम,नाशिक.

वरीलप्रमाणे निविदाधारकांच्या कागदपत्रांची छाननी केली असता मे.विनवाक सिस्टीम यांनी निविदेतील क्र.1.4.6 च्या शर्ती प्रमाणे नमूद केलेल्या LEDकंपनीचे सह्पत्र तथा अधिकार पत्र जोडलेले नाही.त्यामुळे मनपास आवश्यक असेलेल्या मान्यताप्राप्त कंपनीसाठी क्र.2चे निविदाधारक यांनी कुठलेही कागदपत्र जोडलेले नसल्याने हे निविदाधारक अपात्र असल्याने व सदरची निविदा तीसरी असल्याने उर्वरित निविदेत सहभागी मे.वल्लभ इलेक्ट्रिकल्स,गुजरात यांचे लिफाफा क्र.2(commercial bid) उघडणे बाबतच्या मान्यतेप्रमाणे दि.5-11-2020 रोजी उघडण्यात आले.मक्तेदाराने आयटम रेट दर दिलेले होते.

निविदेमध्ये प्राप्त दर व महानगरपालिकेचे प्रार्थमिक अंदाजपत्रकातील दर या बाबतची तुलना करण्यांत आली. प्राप्त निविदामध्ये मक्तेदाराचे दर जास्त असल्याने मक्तेदारास धुमपा/ विवि /151.दि.6-11-2020नुसार दर कमी करणेबाबत पत्र देण्यात आले. मक्तेदाराने आ.क्र.3482.दि.25-11-2020च्या पत्रानुसार निविदेच्या दरांबाबत पत्र दिलेले आहे.त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

Sr.No.	DESCRIPTION OF WORK	UNITS	SVE RATE	SVE AMOUNT	DMC RATE	12% ON DMC RATE	TOTAL DMC RATE	DIFFRENCE	PERCENTAGE (%)
1	Supplying and erecting LED street light fitting suitable above 26W to 36W lamp, including lamp, with PF > 0.95 class IP 65 and above housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete as per specification No FGODF/FLS2.(2-5-3) **Make of Bajaj,Philips,Cromton,Surya,Osram with Lence**	Each	3170	**3158.000**	2612	313.44	**2925.44**	232.560	7.949573398
2	Supplying and erecting LED Street light fitting suitable for above 40W to 48W lamp, including lamp, with PF > 0.95 class IP 65 and above housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete as per specification No .FG-ODF/FLS2.(2-5-4) Make of Bajaj,Philips,Cromton,Surya,Osram with Lence	Each	4120	**4188.000**	3464	415.68	**3879.68**	308.320	7.947047179
3	Supplying and erecting LED street light fitting suitable for above 60W-75W lamp, including lamp, with PF > 0.95 class IP 65 and above housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete as per specification No FGODF/FLS2 (2-5-6) Make of Bajaj,Philips,Cromton,Surya,Osram with Lence	Each	7000	**7047.000**	5829	699.48	**6528.48**	518.520	7.942430704
4	Supplying and erecting LED street light fitting suitable for above75W - 90W lamp, including lamp, with PF > 0.95, class IP 65 and above housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete as per specification No. FGODF/FLS2.(2-5-7) Make of Bajaj, Philips, Cromton, Surya, Osram with Lence	Each	8593	**8610.000**	7122	854.64	**7976.64**	633.360	7.940185341
5	Supplying and erecting LED FLOOD fitting 150 W, including lamp, with PF > 0.95, class IP 65 and above housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete as per specification No FG-ODF/FLS-2.(2-5-10) Make of Bajaj, Philips, Cromton, Surya, Osram with Lence	Each	18574	**18650.000**	15426	1851.12	**17277.12**	1372.88	7.946231779
6	Supplying and erecting street light bracket for erection of side entry fitting on pole with 40 mm. dia. 'B' grade G.I. pipe of required length complete as per specification no. FG-BKT/SLB (2-9-9)	mtr	502	**550.000**	455	54.6	**509.6**	40.400	7.927786499

7	Supplying & erecting mains with 2x2.5 sq.mm F.R copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WGMA/BW (1-3-3) Reduce rate for alluminium.	mtr	32	**32.640**	27	3.24	**30.24**	2.400	7.936507937
8	Dismantling the existing W.T. fluorescent fitting/ S.V./ M.V. /M.H. lamp /LED fitting from pole with brackets complete.(2-14-3)	Each	106	**117.250**	97	11.64	**108.64**	8.610	7.925257732
9	Dismantling of faulty LED & Repalcement of repaired or new LED of similar wattage(Including old existing LED street lights of any make and wattages) & repair of minnor faults such as loose connection of wire,carbon at the joints etc. at the pole within 3 days.The contractor have to keep the street light in working condition and if required he have to raplace the fitting.The job include day to day supervision with adapting qualified enginner & technical superviser & day to day reporting to corporation on next day.	per pole per month	7	**4.836**	4	0.48	**4.48**	0.356	7.946428571
10	Job of maintaining street light ON/OFF with repair of any type of maintenanace such as MCCB,Contactor,Timmer,Cable,Service connection and day to day fault finding and remeady and repairs of Line faults etc. For 5 years.The contractor should have maintain all swiching point with all material in good condition & after 5 years it must be handed over to corporation with all good working accessories.as per Indian electricity act 2003.	per month per meter point	403	**423.155**	350	42	**392**	31.155	7.947704082
11	Supplying & erecting street light control panel in powder coated CRCA 14/16 SWG sheet, outdoor type, single phase, 240 V consisted of suitable rating contactor, 24 hrs digital / astronomical time switch with minimum 5 years battery backup, SPN MCB 40 A, auto/manual selector switch, ON/OFF push buttons, indicator lamps, control wiring, metering device, etc for automatic operation & overcurrent, short circuit, earth fault protection of street lights upto the maximum load of 6 kW on provided iron frame/ CC foundation complete.5-2-16	Each	20500	**19858.000**	16426	1971.12	**18397.12**	1460.88	7.940808126

12	Supplying & erecting street light control panel in powder coated CRCA 14/16 SWG sheet, outdoor type, single phase, 240 V consisted of suitable rating contactor, 24 hrs digital / astronomical time switch with minimum 5 years battery backup, SPN MCB 63 A auto/manual selector switch, ON/OFF push buttons, indicator lamps, control wiring, metering device, etc for automatic operation & overcurrent, short circuit, earth fault protection of street lights upto the max load of 12 Kw on provided iron frame / CC foundation complete.5-2-17	Each	25000	**25045.000**	20717	2486.04	**23203.04**	1841.96	7.938442549
13	Supplying & erecting street light control panel in powder coated CRCA 14/16 SWG sheet, outdoor type, three phase, 415 V consisted of suitable rating contactor, 24 hrs digital / astronomical time switch with minimum 5 years battery backup, TPN MCB 40 A auto/manual selector switch, ON/OFF push buttons, indicator lamps, control wiring, metering device, etc for automatic operation & overcurrent, short circuit, earth fault protection of street lights upto the max load of 6 kW on provided iron frame / CC foundation complete.5-2-18	Each	25000	**24743.000**	20466	2455.92	**22921.92**	1821.08	7.944709693
14	Supplying & erecting street light control panel in powder coated CRCA 14/16 SWG sheet, outdoor type, three phase, 415V consisted of suitable rating contactor, 24 hrs digital/ astronomical time switch with minimum 5 years battery backup, TPN MCB 63 A auto/manual selector switch, ON/OFF push buttons, indicator lamps, control wiring, metering device, etc for automatic operation & overcurrent, short circuit, earth fault protection of street lights upto the max load of 12 kW on provided iron frame / CC foundation complete.5-2-19	Each	32020	**32305.000**	26722	3206.64	**29928.64**	2376.36	7.94008682
15	Supplying & erecting street light control panel in powder coated CRCA 14/16 SWG sheet, outdoor type, three phase, 415 V consisted of suitable rating contactor, 24 hrs digital/ astronomical time switch with minimum 5 years battery backup, TPN MCB 110 A auto/manual selector switch, ON/OFF push buttons,indicator lamps, control wiring, metering device, etc for automatic operation & overcurrent, short circuit, earth fault protection of street lights upto the max load of 12 kW on provided iron frame / CC foundation	Each	52000	**54295.000**	44910	5389.2	**50299.2**	3995.80	7.944062729

	complete.5-2-20								
16	Providing & erecting 3 Pole MCCB upto 100A, 415V, with short circuit rating 25 kA (Ics=100% of Icu),adjustable thermal (overload) setting and fixed magnetic setting with provided leads,provision for installation of shunt/ UV/ trip alarm contact and MCCB should have phase barriers both sides, in provided enclosure on iron /GI frame as per specification no. SW-SWR/MCCB 5-5-1	Each	5600	**5449.000**	4507	540.84	**5047.84**	401.160	7.947161558
17	Providing & erecting 3 Pole MCCB of 200A,415V capacity with short circuit rating 25 kA (Ics=100% of Icu) adjustable thermal (overload) setting and fixed magnetic setting with provided leads,provision for installation of shunt/ UV/ trip alarm contact and MCCB should have phase barriers both sides, in provided enclosure on iron /GI frame as per specification no. SW-SWR/MCCB 5-5-2	Each	11200	**10892.000**	9009	1081.08	**10090.08**	801.920	7.947607948
18	Providing & erecting 3 Pole MCCB of 250A,415V capacity with short circuit rating 36 kA (Ics=100% of Icu) adjustable thermal (overload) setting and fixed magnetic setting with provided leads,provision for installation of shunt/ UV/ trip alarm contact and MCCB should have phase barriers both sides, in provided enclosure on iron /GI frame as per specification no. SW-SWR/MCCB 5-5-3	Each	15100	**14827.000**	12264	1471.68	**13735.68**	1091.32	7.945147237
19	Providing & erecting 3 Pole MCCB of 315/400A, 415V capacity with short circuit rating 36 kA (Ics=100% of Icu), adjustable thermal (overload) setting and fixed magnetic setting with provided leads, provision for installation of shunt/ UV/ trip alarm contact and MCCB should have phase barriers both sides, in provided enclosure on iron /GI frame as per specification no. SW-SWR/MCCB 5-5-4	Each	20500	**19653.000**	16256	1950.72	**18206.72**	1446.28	7.943660363
20	Providing & erecting 3 Pole MCCB of 800A, 415V capacity with short circuit rating 50 kA ,(Ics=100% of Icu), adjustable thermal (overload) setting and fixed magnetic setting with provided leads,provision for installation of shunt/ UV/ trip alarm contact and MCCB should have phase barriers both sides, in provided enclosure on iron /GI frame as per specification no. SW-SWR/MCCB 5-5-6	Each	38060	**38230.000**	31621	3794.52	**35415.52**	2814.48	7.947024355

21	Supplying, erecting & terminating XLPE armoured cable 4 core 10 sq. mm. aluminium conductor with continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL 7-1-28	mtr	191	**184.970**	153	18.36	**171.36**	13.610	7.942343604
22	Supplying, erecting & terminating XPLE armoured cable 4 core 16 sq. mm. aluminium conductor with continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL 7-1-29	mtr	223	**216.400**	179	21.48	**200.48**	15.920	7.94094174
23	Supplying, erecting & terminating XLPE armoured cable 4 core 25 sq. mm. aluminium conductor with continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL 7-1-30	mtr	277	**268.400**	222	26.64	**248.64**	19.760	7.947232947
24	Supplying, erecting & terminating XLPE armoured cable 4 core 35 sq. mm. aluminium conductor with continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL 7-1-31	mtr	340	**333.650**	276	33.12	**309.12**	24.530	7.935429607
25	Supplying and erecting rolled steel joist (girder) pole 125 x 70 mm (13.3 kg/m) with provided base plate in provided foundation as per specification no.OH-PL/RSJ 8-1-13	mtr	1294	**1038.500**	859	103.08	**962.08**	76.420	7.943206386
26	Supplying and erecting all aluminium stranded conductors 7/2.21 mm complete. (Gnat) (73.77kg/km) as per specification no.OH-CON/AAC 8-5-2	km	24910	**23247.000**	19230	2307.6	**21537.6**	1709.40	7.936817473
27	Supplying and erecting all aluminium stranded conductors 7/3.10 mm. complete. (Ant.) (145.0 kg/km) as per specification No. OH-CON/AAC 8-5-5	km	47000	**38940.000**	32210	3865.2	**36075.2**	2864.80	7.941189515
28	Supplying and erecting pin type LT medium insulator 100 mm x 62 mm dia. with suitable G.I. spindle, nut, bolts complete erected.8-6-1	Each	83	**78.570**	65	7.8	**72.8**	5.770	7.925824176
29	Providing pipe type earthing with 40mm. dia. G.I. pipe or 20 mm dia. G.I. Rod complete with all materials as per specification no. EAEP 9-1-4	Each	1640	**1510.000**	1249	149.88	**1398.88**	111.120	7.943497655

30	Making cement concrete foundation including excavation (60 x 60 x 150) cm deep in 1:3:6 cement concrete 20 x 25 mm stone metal, (45x 45 x 45) cm /45 cm dia. x 45 cm height plinth duly plastered, with necessary curing and finishing complete. (above 6 m to 9 m poles) 16-3-3	Each	2900	**2206.000**	1825	219	**2044**	162.00	7.925636008
31	Making cement concrete foundation including excavation (60 x 60x 150) cm deep in 1:3:6 cement concrete, (20 to 25) mm stone metal with necessary curing and finishing complete.(for stay). 16-3-6	Each	2900	**1831.300**	1515	181.8	**1696.8**	134.50	7.926685526
32	Supplying & erecting FRP box of size 150 x 125 x 100 mm, 2.7 mm thick complete on pole/wall as per specification no. CB-SB 7-1-3	Each	610	**538.000**	445	53.4	**498.4**	39.600	7.945425361
33	Supplying & erecting mains with 2x6 sq.mm F.R copper PVC insulated wire laid in provided conduit/ trunking / inside pole/Bus bars or any other places as per specification No: WGMA/BW 1-3-7	mtr	133	**123.310**	102	12.24	**114.24**	9.070	7.93942577
34	Supplying, fixing and commissioning 4 pole RCBO (residual current breaker with overcurrent short circuit 10 kA and earth leakage protection), with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 6A/ 10A/ 16A/ 20A/ 25/A as per specification no SWRCCB/RCBO 5-6-14	Each	4700	**4226.000**	3496	419.52	**3915.52**	310.480	7.929470415
35	Supplying, fixing and commissioning 4 pole RCBO ((residual current breaker with overcurrent short circuit 10 kA and earth leakage protection), with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 32A/40A as per specification no SW-RCCB/RCBO 5-6-15	Each	5200	**4648.000**	3845	461.4	**4306.4**	341.600	7.932379714
36	Supplying, fixing and commissioning 4 pole RCBO ((residual current breaker with overcurrent short circuit 10 kA and earth leakage protection), with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 63A as per specification no SW-RCCB/RCBO 5-6-16	Each	5600	**5147.000**	4258	510.96	**4768.96**	378.040	7.927095216
37	Providing, erecting & commissioning 4 pole RCCB of electromagnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 100A, complete as per specification no. SWRCCB/RCCB 5-6-8	Each	5600	**5590.000**	4624	554.88	**5178.88**	411.120	7.938395947

38	Supplying and erecting quartz electronic time switch having 24 hour dial to work on 250 V 50 cycle AC having built in rechargeable nickel cadmium batteries to run the time switch on failure of supply having switch contact rating upto 16A to use independently or in conjunction with contactor.4-4-1	Each	3220	**2860.000**	2366	283.92	**2649.92**	210.080	7.927786499
39	Supplying and erecting programmable digital almanac timer microcontroller based with real time clock to operate on derived switching —ONǁ & switching —OFFǁ street light as per daily sunset and sunrise respectively automatically having 4 digit LED continuous time display, relay output 230 V / 10A with 10 hrs battery backup and manual over drive facility capable to drive different capacity contactors timer erected in provided M.S. box in an approved manner.4-4-6	Each	7450	**7260.000**	6005	720.6	**6725.6**	534.400	7.945759486
40	Supplying and erecting two pole power contactor 230 V, 32 A for time switch complete erected on provided wooden block/ box, with necessary materials.4-4-3	Each	2900	**2840.000**	2349	281.88	**2630.88**	209.120	7.948671167
41	Supplying and erecting four pole power contactor 430 V, 40 A for time switch complete erected on provided wooden block/ box, with necessary materials.4-4-8	Each	2900	**3128.500**	2588	310.56	**2898.56**	229.940	7.932904615
42	Supplying and erecting iron clad cut out HC type 415V 32A erected on polished wooden block complete.5-10-2	Each	250	**235.700**	195	23.4	**218.4**	17.300	7.921245421
43	Supplying and erecting iron clad cut out HC type 415V 63A erected on polished wooden block complete.5-10-3	Each	430	**407.400**	337	40.44	**377.44**	29.960	7.93768546
44	Supplying and erecting iron clad cut out HC type 415V 100A erected on polished wooden block complete.5-10-4	Each	790	**760.300**	629	75.48	**704.48**	55.820	7.923574835
45	Supplying and erecting iron clad cut out HC type 415V 200A erected on polished wooden block complete.5-10-5	Each	1420	**1294.700**	1071	128.52	**1199.52**	95.180	7.934840603
46	Providing earthing with copper earth plate size 30 x 30 x 0.315 cm complete with all materials, testing & recording the results as per specification no. EA-EP 9-1-2	Each	11000	**6633.000**	5487	658.44	**6145.44**	487.560	7.933687417
47	Painting of steel tubular / rail / RSJ pole above 6.0 m length along with street light pole brackets, clamps etc by scrapping the existing paint complete. Specification no CW - PTG/PTP.16-4-3	mtr	92	**87.050**	72	8.64	**80.64**	6.410	7.94890873
48	Painting of street light number on existing pole with approved quality enamel paint as directed by engineer in charge.	per pole	25	**24.180**	20	2.4	**22.4**	1.780	7.946428571

49	Supplying and erecting G.I. stay set for poles, including loop insulators at inaccessible height complete with anchor plate 300 x 300 x 6 mm., straining screws, G.I. stay wire 7/8 SWG, G.I.stay rod 20 mm x 1.8 m length and pole clamps duly erected in provided cement concrete foundation.8-7-2	Each	2000	**1826.500**	1511	181.32	**1692.32**	134.180	7.928760518
50	Supplying and erecting mains with ISI mark WP 2 x 6 sq. mm. 1100 V. grade aluminium PVC insulated and PVC sheathed wires on G.I. bearer wire No. 8 SWG complete erected with required size of porcelain reel insulators and 16 SWG G.I.binding wire.1-4-3	mtr	88	**84.630**	70	8.4	**78.4**	6.230	7.946428571
51	Supplying and erecting iron, sheet metal work consisting of CRCA sheets, various sections of iron, plates, chequered plates,rods, bars, MS pipes, etc. for panel board or any other purpose with bending, cutting, drilling and welding complete erected at the position with necessary materials duly painted with one coat of red oxide and two coats of enamel paint to match the switchgears or as per directions by the authority.6-1-19	kg	178	**158.350**	131	15.72	**146.72**	11.630	7.926663032
				405805.291			375948.16	29857.1	**7.9418**

त्यांचे पत्रानुसार त्यांनी आयटम रेट चे दर कमी करून प्रत्येक आयटम निहाय सरासरी 7.94% **जास्तीचे** दर दिले आहे.

मक्तेदार श्री.वल्लभ इलेक्ट्रिकल यांनी दर वाटाघाटी करतांना वरीलप्रमाणे निविदेतील दर कमी करतांना निविदेच्या शर्थ क्र.8 मध्ये मक्तेदाराच्या अतिरिक्त सुरक्षा रक्कमेकरीता 5% प्रमानेच्या पाच बँक ग्यारेंटी पत्र करून देण्याचे नमूद केले आहे.मूळ शर्त क्र.8 मध्ये मक्तेदाराची बिलातील LED साठी च्या 1 ते 5 आयटम साठी च्या देय रक्कमेतून 25% अतिरिक्त सुरक्षा रक्कम कपात करायची आहे.मक्तेदारास काम जर समाधानकारक असल्यास 5% प्रती वर्ष परत करावयाचे आहे.यामध्ये दर वाटाघाटी मक्तेदाराने बँक ग्यारेंटी देण्याचे काबुल केले आहे.ज्याकी 5% प्रमाणे पाच या प्रमाणे 25% असतील.

सदर निविदेच्या लिफाफा क्र.1 मध्ये मक्तेदाराने संपूर्ण शहराचा सर्वेक्षण करणे,शासनाच्या निर्धारित स्ट्रीट लाईट नियामाप्रमने प्रस्तावित पथदिवे बसविणे,त्यांचे wattge,व पूर्ण पथदिव्यांची गणना करणे,तसेच शहरच्या पथदिवे संरचना मध्ये सुधारणा करणे,व LED पथदिवे बसविलेनंतर होणारी वीज बचत ई. संपूर्ण कामाचा प्रकल्प अहवाल(DPR) तयार करणे.ई कामासाठी 15 लक्ष रुपये दर नमूद केलेले आहे.धुळे महानगरपालिकेने EESL कंपनी धुळे शहराचा वरील प्रमाणे बाब निहाय DPR करणेसाठी मनपा जा.क्र.118 दि.12-9-20198. नुसार रक्कम रु.10,26,000/- करिता कार्यादेश देण्यात आलेला होता.तथापि EESL कंपनीने या कामी कुठलेही काम केले नाही.वारंवार नोटीस देऊनही काम केल्याने त्यांचे कार्यादेश रद्द करणेत आले.वरीलप्रमाणे DPR बाबत मा.आयुक्त सो,अभियंता सो यांच्या कडेस झालेल्या चर्चेनुसार मक्तेदाराने केलेल्या DPR करिता शासकीय प्राधिकरण,मुख्य अभियंता सा.बा.विद्युत विभाग किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

यांचे कडून तांत्रिक मान्यता(Technical Approval) करून आणण्याची जबाबदारी त्यांची असेल हि बाब मान्य केली आहे.करिता मक्तेदाराने DPR करणेसाठी दिलेले दर रु.15 लक्ष मात्र मंजुरीस हरकत नाही.

वरील प्रमाणे उक्त कामी तीन वेळा ई-निविदा कार्यवाही झालेली असून तृतीय निविदेत श्री.वल्लभ इलेक्ट्रिकल यांचे negotiation अंती आलेले दर (Crompton साठी) नमूद केलेले आहे.उक्त अहवालानुसार श्री.वल्लभ इलेक्ट्रिकल्स यांचे negotiation अंती आलेले दरांना मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

उक्त कामी मक्तेदाराने DPR करणेसाठी मक्तेदाराचे दर रु.15 लक्ष (DPR साठी शासकीय प्राधिकरण,मुख्य अभियंता सा.बा.विद्युत विभाग किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडून तांत्रिक मान्यता आणण्याच्या शर्तीवर) करिता खर्च मंजुरीस्तव सादर करण्यांत येत आहे. तसेच negotiation अंती मक्तेदाराने 25% अतिरिक्त सुरक्षा रक्कम बिलातून कपात न करता 5% प्रमाणे पाच स्वतंत्र बँक ग्यारेंटी करून देण्याचे मान्य केलेले आहे.

वरीलप्रमाणे निविदेच्या सर्व अटी व शर्ती मक्तेदार श्री.वल्लभ इलेक्ट्रिकल्स यांना कायम ठेऊन LED पथदिवे बसविणे व पाच वर्ष देखभाल दुरुस्ती करणे कामाकरिता दर करार करणेसाठी मे.स्थायी समितीकडे मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधिन राहून देवपूर विभागासाठी श्री. वल्लभ इलेक्ट्रिकल्स यांचे negotiation अंती आलेले दरास व मनपाच्या अटी शर्तींना मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत संबंधित पुरवठा धारकाकडून अटी शर्तींचा लेखी करारनामा करण्यांत यावा.

तसेच यापूर्वी असणा-या ठेकेदारास वेळेवर देयके अदा न केल्याने कामात मोठया प्रमाणावर अडचणी निर्माण झालेल्या होत्या. त्यामुळे सदर बाब होवू नये यासाठी या प्रस्तावामुळे विदयुत बिलात बचत होणार असून सदर बचत होणारी रक्कम स्वतंत्र बॅंक खात्यात टाकण्यांत यावी व संबंधित पुरवठादारास त्यामधून कामाची देयके अदा करावीत.

सर्वानुमते मंजुर,
सही/ - x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे
नगरसचिव कार्यालय
स्थायी समिती सभा क्रमांक १९ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक ३१/१२/२०२०
वेळ सकाळी ११-०० वाजता.

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक ३१/१२/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्री. सोनार सुनिल वसंतराव	सदस्य
४	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
५	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
६	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
७	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
८	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
९	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
१०	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
११	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१२	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या
१३	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
२	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
३	श्री. विनायक कोते	सहा. आयुक्त
४	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
५	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
६	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
७	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
८	डॉ. श्री महेश मोरे	वै.आरोग्याधिकारी
९	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी

११	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल
१२	श्री. एन.पी. सोनार	ईस्टेट मॅनेजर
१३	श्री. रमजान अन्सारी	प्र. कार्यालय अधिक्षक
१४	श्री. आर.बी. सोनवणे	परवाना विभाग अधिक्षक
१५	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१६	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१७	श्री.हेमंत पावटे	ओव्हरसिअर बां.वि
१८	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
१९	श्री. किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख
२०	श्री.प्रसाद जाधव	प्र अतिक्रमण विभाग प्रमुख
२१	श्री.महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी मनपा शि.मं.
२२	श्री.सुक्राम आत्या राऊत	मोटार वाहन विभाग

मा. सभापती — सन्मा. सदस्य मा.उपायुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. सभापती — आज सरत्या वर्षास निरोप देतांना नुतन वर्षात आपण पर्दापण करीत आहोत.गत वर्षात स्थायी समितीच्या माध्यमातून आपण शहराच्या मुलभूत सेवा सुविधा सोडविण्याचा प्रयत्न केला.तसेच सर्वाच्या सहकार्याने आपण धुळे महानगरपालिकेच्या हिताचे व विकासाचे निर्णय घेवू शकलो. यासाठी आपल्या सर्व सन्मा.स्थायी समिती सदस्य, तसेच आयुक्त व सर्व अधिकारी कर्मचारी तसेच लोकशाहीचा आधार स्तंभ असलेले पत्रकार बांधव, छायाचित्रकार या सर्वाचे महत्वाचे सहकार्य लाभलेले आहे. त्यांचे मी प्रथमत:आभार व्यक्त करतो. या सर्वाचे प्रातनिधीक स्वरुपात सत्कार याठिकाणी होणार आहे.मी सर्वाना धन्यवाद देतो. मा. सभापती यांच्या वतीने प्रथमत: स्थायी समिती सदस्य तसेच मनपा अधिकारी व उपस्थित पत्रकार व छायाचित्रकार बांधवांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यांत आला.तसेच सभापती श्री. सुनिल बैसाणे यांचाही सत्कार सभागृहाच्या वतीने करण्यांत आला.

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १११ — धुळे मनपा रस्ता अनुदान योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१४ मध्ये पश्चिम हुडको भागात रस्ता हा कॉक्रीट करणेचे एस्टीमेट रु.४२,८६,९४९/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुंळे — सदर विषयास मान्यता देण्यांत येत आहे

म.कमलेश देवरे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२५ दिनांक ३१/१२/२०२०

धुळे मनपा रस्ता अनुदान योजने अंतर्गत प्रभाग क्रं. १४ मध्ये पश्चिम हुडको भागात रस्ता हा कॉक्रीट करणे या कामाबाबत संदर्भीय पत्रान्वये सादर करण्यात आलेले असून प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केलेली असता सदरच्या भागात रस्ता नसल्याने तेथील नागरिकांना रहदारीस अडथळा येत अससल्याने तेथे रस्त्याची आवश्यकता आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दर सुची सन१९-२० नुसार रु.४२,८६,९४९/-मात्र खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सहाय्यक अनुदान योजेने अंतर्गत करण्यात येणार आहे.

सर्व सन्मा सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त प्रस्तावास व खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- ११३ धुळे मनपा विकास शुल्क योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१४ मध्ये मालेगाव रस्ता ते चाळीसगाव रोड डांबरीकरण करणेचे एस्टीमेट रु.४२,८०,६३४/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. भारती माळी सदर विषयास मान्यता देण्यांत येत आहे

म.कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा,

म. सभापती सर्व सन्मा सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२६ दिनांक ३१/१२/२०२०

स्थायी समिती सभापती श्री. सुनिल भाऊ बैसाणे दि.२८/९/२०२० अन्वये केलेल्या मागणी पत्रानुसार धुळे मनपा विकास शुल्क योजने अंतर्गत प्रभाग क्रं. १४ मध्ये मालेगाव रस्ता ते चाळीसगाव रोड डांबरीकरण करणे या कामाबाबत संदर्भीय पत्रान्वये सादर करण्यात आलेले असून प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केलेली असता सदरच्या भागात रस्ता हा पुर्णपणे खराब झाला असून खड्डे पडले आहे. तेथील नागरिकांना रहदारीस अडथळा येत असल्याने तेथे रस्ता हा डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दर सुची स.न.१९-२०नुसार रु.४२,८०,६३४/- मात्र खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च विकास शुल्क योजेने अंतर्गत करण्यात येणार आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त प्रस्तावास व खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ११२ धुळे महानगरपालिका मलेरीया व आरोग्य विभागात दैनंदीन साफसफाई, मलेरीया फवारणी दैनंदीन साफसफाईसाठी कामगार वाढविणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती सदर विषयाबाबत सर्वप्रथम प्रशासनामार्फत खुलासा करण्यात यावा.

म.पुष्पाताई बोरसे माझ्या प्रभागात नियुक्त केलेल्या सफाई कर्मचारी पैकी काही कर्मचारी मयत झालेले आहेत त्यांच्या जागी नवीन कर्मचारी मिळालेले नाहीत प्रोफेसर कॉलनी नेहरू नगर विभागात मला कर्मचारी वाढवून मिळावे अशी विनंती करते.

म.युवराज पाटील — सभापती महोदय माझ्या भागात प्रथमता किती कर्मचारी आहेत याची मला माहिती मिळणे आवश्यक आहे माझा प्रभाग फार मोठा प्रभाव आहे प्रत्यक्षात तीन ते चार माणसे कामाला येतात त्यांच्याकडे कोणत्या प्रकारचे साहित्य नसते आणि वारंवार यासंदर्भात पत्र देऊन विचारणा केलेली आहे.

म.कमलेश देवरे — यासंदर्भात मी देखील पत्र दिलेले आहे माझ्या प्रभागात किती कर्मचारी आहे याचा देखील खुलासा झालेला नाही हा विषय आपल्या मागच्या स्थायी समिती सभेत आलेला होता आपले मनपाची किती माणसे आहेत ठेकेदारामार्फत किती माणसे लावली गेली याचा कोणताही बोध होत नाही जर आपण ठेक्या कडील कर्मचाऱ्यांना ४०७ रुपये रोज देत आहोत तर त्यांचा कामाचा कालावधी कसा राहील याबद्दल ही माहिती मिळणे आवश्यक आहे या प्रस्तावात मानधनावरील कर्मचाऱ्यांकडून मलेरिया फवारणी दैनंदिन साफसफाई करण्यासाठी कामगार वाढवून मिळावेत असे नमूद आहे मलेरिया फवारणीसाठी १५ ते २० दिवसातून कर्मचारी प्रभागात येतात ज्या ठेकेदाराला आपण ठेका दिला आहे त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची यादी मिळणे आवश्यक आहे याबाबत संपूर्ण प्रभाग निहाय आराखडा तयार करून कोणत्या प्रभागात कायम कर्मचारी किती मानधनावरील कर्मचारी किती याबाबतचा तपशील देण्यात यावा माझी वैयक्तिक मागणी आहे की जोपर्यंत हा विषय तहकुब करावा.

म.सभापती — आपल्या सर्वांच्या मताशी मी सहमत आहे यापूर्वी बैठका घेऊन कोणत्या प्रभागात किती माणसे काम करतात याबाबत तक्ता देणेबाबत आदेशित केले होते जर यापुढे मानधनावरील कर्मचारी कामावर आल्या नसेल तर त्याला मानधन दिले जाणार नाही याबाबत नगरसेवकांच्या तक्रारीबाबत दैनंदिन आढावा घेण्यात यावा जर काम होत असेल तर मोबदला देण्याच्या विरोधात मीदेखील आहे .

म.कमलेश देवरे — माझ्या इंद्रानगर गार्डन परिसरात फक्त दोन स्त्रिया जाण्यासाठी येतात बाकीचे कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहे मी अनेक वर्षांपासून सफाई कामगारांची मागणी केलेली आहे परंतु कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने कर्मचारी देण्यात येत नाही.

म.सभापती — सद्यस्थिती शहराच्या हद्दवाढ झालेली आहे त्या ठिकाणी देखील कर्मचारी देणे आवश्यक आहे त्यासाठी हा प्रस्ताव सभागृहापुढे आलेला आहे आपण पहिले विषय समजून घेऊ त्यानंतर आपण याबाबत निर्णय घेणार आहोत.

म.उपायुक्त — शहराची हद्दवाढ लक्षात घेता व क्षेत्रफळ लक्षात घेता आपल्याकडे सफाई कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे याबाबत कोणतेही दुमत नाही व सार्वजनिक स्वच्छतेबाबत नागरिक व नगरसेवकांची सातत्याने मागणी होत असते व त्या अनुषंगाने प्रभागात खाजगी संस्थेमार्फत कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी आलेली होती त्या अनुषंगाने प्रशासनाने अभ्यास करून प्रस्ताव सादर केलेला आहे याबाबत मी प्रथमता विभागाला आदेशित करतो की प्रत्येक प्रभागात किती कर्मचारी आहेत त्यात स्त्रिया किती पुरुष किती व त्यांच्याकडे काय काम नेमून दिलेले आहे याचा तपशील तपशीलवार तक्ता सर्व संबंधित सन्मान्य नगरसेवकांना उपलब्ध करून द्यावा आरोग्य अधिकारी यांनी याबाबत समक्ष प्राधान्याने कार्यवाही करावयाची आहे कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक हजेरी कंपल्सरी करा त्यामुळे आपल्याला सदर कर्मचारी प्रत्यक्षात कामावर येतो की नाही याबाबत खात्री होऊ शकेल.

म.युवराज पाटील — मी यापूर्वी एका कर्मचारी तक्रारार केलेली आहे सदर कर्मचारी कामावर असताना कशा करून शिवीगाळ करतो त्याची तक्रार करूनही त्याची बदली झालेली नाही.

म.उपायुक्त — जर असा कर्मचारी असेल तर त्याच्या निलंबनाचा प्रस्ताव आजच्या आज माझ्याकडे ठेवा व सदस्यांच्या तक्रारीची दखल घेणे गरजेचे आहे याबाबत सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांना ताकीद द्यावे व अशा कामचुकार कर्मचारी बाबत तात्काळ कारवाईचा प्रस्ताव सादर करा तसेच सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना ड्रेस कोड बाबतही सूचना आपल्या स्तरावरून देण्यात याव्यात.

अमोल मासुळे — सदर कर्मचाऱ्यांना ओळखपत्र देणेही आवश्यक आहे त्याचबरोबर अड्रेस देणे आवश्यक आहे त्यामुळे तो संबंधित कर्मचारी महापालिकेचा आहे किंवा खासगी ठेकेदाराच्या आहे याचा आपल्याला बोध होऊ शकेल.

म.सईद बेग — याबाबत मी सुद्धा चार-पच वेळा पत्र दिलेले आहे माझ्या प्रभागात कामगार मिळणे बाबत मी तक्रार केली होती पण अद्यापही मला कामगार मिळालेले नाहीत.

म.अमोल मासुळे — मागेच्या बैठकीत सदर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत व मानधनावरील रकमेबाबत मान्यता दिली होती अशा संस्थेमार्फत नियुक्त केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची माहिती प्रभाग निहाय देण्यात यावी तसेच त्यांचे मोबाईल नंबर देण्यात यावे तो पर्यंत विषय तहकुब ठेवावा.

म.सभापती — संस्थेमार्फत किती कर्मचारी नियुक्त करणार आहेत व केलेले आहेत याची माहिती सर्व सदस्यांना मिळणे बंधनकारक आहे शहराच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहे आपल्या घनकचरा व्यवस्थापनाच्या बाबतीत निविदा प्रक्रिया सुरू आहे अशा परिस्थितीत शहरातील नागरिकांना आरोग्याबाबत तक्रार निर्माण होणार नाही याचीही काळजी घेणे तेवढेच गरजेचे आहे यासाठी या सर्व गोष्टींचा विचार करून सर्व अटी व शर्तींच्या अधीन राहून या प्रस्तावाला कार्यालयीन अहवालास अधिन राहून मंजुरी देण्यात येत आहे. तसेच सन्मा.सदस्य श्री.नागसेन बोरसे व संतोष खताळ यांच्या मागणी पत्रानुसार त्यांच्या प्रभागात प्रत्येकी ५ कामगार देण्यांत यावे.तसेच कामगारांची आवश्यकता भासल्यास सन्मा. नगरसेवक यांच्या मागणीनुसार प्रशासनाने त्यांच्या स्तरावर कामगार वाढविणेबाबत कार्यवाही करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२७ दिनांक ३१/१२/२०२०

धुळे महानगरपालिका मलेरीया व आरोग्य विभागात दैनंदीन साफसफाई, मलेरीया फवारणी इ.अनुषंगीक कामांकरीता कामगार पुरविणेकामी मंजुर दर रु.४०७.२/- प्रती कामगार प्रती दिवस प्रमाणेआस्था.स्वयंरोजगार सेवा सह.संस्था यांना काम देण्यात आले आहे. त्याअनुषंगाने धुळे शहराचा वाढलेला विस्तार पाहता तसेच वेळोवेळी सन्मा. नगरसेवकांची कामगार वाढविण्या सदर्भात येणाऱ्या तक्रारी लक्षात घेता मा.सभापती सो. स्थायी समिती यांच्या दालनात आरोग्य विभागाची बैठक आयोजीत करण्यात आली असता सदर बैठकीत आरोग्य विभागात दैनंदीन साफसफाईचे काम करणारे कर्मचारींची संख्या लक्षात घेता व सद्यस्थितीत कोरोना कोवीड-१९ आजार सुरु असुन स्वच्छ सर्व्हेक्षण-२०२१ ची तयारी सुरु असल्याने साफसफाईचे कामात नियमीत सातत्य राखणे आवश्यक असल्याने व सन्मा. नगरसेवक यांच्या मागणीनुसार दैनंदीन साफसफाई करीता कामगार वाढविणे बाबत मा. सभापती सो. यांनी निर्देश दिले आहेत.

तरी सद्यस्थितीत धुळे मनपाचे क्षेत्रफळ मोठ्या प्रमाणात वाढल्याने उक्त लावण्यात आलेले कामगार कमी पडत आहे. सद्यस्थितीत स्वच्छ सर्व्हेक्षण-२०२१ सुरु असल्याने शहरातील दैनंदीन साफसफाईत सातत्य ठेवणे आवश्यक आहे. तसेच शहरातील रस्ते सफाई, गटार सफाई व इतर साफसफाई करुन घेणेकामी उक्त् सन्मा.नगरसेवक यांच्या मागणीनुसार व संबधीत स्व.निरीक्षक यांनी दिलेल्याअहवालानुसार कामगार वाढविणे बाबत अहवाल सादर केला होता.

कामाचे ठिकाण / प्रभाग क्र.		सद्यस्थितीत लावलेले कामगार	वाढीव कामगार
१	शहर	५	०
	हद्दवाढ वलवाडी	७	१५
२		५	०
३		२	५
४		३	०
५		७	५
६	हद्दवाढ महिंदळे	१	२०
	शहर	६	०
	हद्दवाढ मोराणे	९	०
	हद्दवाढ वलवाडी / नकाणे	६	१०
७		३	१०
८		२	८
९		८	०
१०	शहर	८	०

	हद्दवाढ वरखेडे	०	२
११	शहर	५	०
	हद्दवाढ बाळापुर	१	१०
१२		४	८
१३		८	०
१४		५	५
१५		५	१०
१६		३	०
१७		३	१०
१८	शहर	४	३०
	हद्दवाढ अवधान	४	
१९		४	१२
एकुण :-		**११८**	**१६०**

तरी उक्त कामी १६० कर्मचारींची वाढ केल्यास त्याचा रु.४०७.२८x३०= १९५४९४४/- इतका मासिक खर्च अपेक्षीत आहे.तरी सदरचा खर्च हा १४ वा वित्त आयोगातुन देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता जा.क्र./ धुमपा /आरोग्य/ ३४१ दि.२०/१०/२०२० अन्वये रु.३,९४,४०,९५२/- सदर खर्चामधुन भागवुन १६० कामगार लावणे बाबत अहवाल प्रशासनामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षांत घेता संस्थेमार्फत किती कर्मचारी नियुक्त करणार आहेत व केलेले आहेत याची माहिती सर्व सदस्यांना मिळणे बंधनकारक आहे शहराच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहे आपल्या घनकचरा व्यवस्थापनाच्या बाबतीत निविदा प्रक्रिया सुरू आहे अशा परिस्थितीत शहरातील नागरिकांना आरोग्याबाबत तक्रार निर्माण होणार नाही याचीही काळजी घेणे तेवढेच गरजेचे आहे यासाठी या सर्व गोष्टींचा विचार करून सर्व अटी व शर्तींच्या अधीन राहून या प्रस्तावाला कार्यालयीन अहवालासअधिन राहून मंजुरी देण्यात येत आहे.तसेच सन्मा. सदस्य श्री. नागसेन बोरसे व संतोष खताळ यांच्या मागणी पत्रानुसार त्यांच्या प्रभागात प्रत्येकी ५ कामगार देण्यांत यावे.तसेच कामगारांची आवश्यकता भासल्यास सन्मा.नगरसेवक यांच्या मागणीनुसार प्रशासनाने त्यांच्या स्तरावर कामगार वाढविणेबाबत कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती विशेष सभा क्रमांक २० चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक ०७/०१/२०२१
वेळ सकाळी ११-०० वाजता.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण २ मधील नियम ३ क नुसार धुळे महानगरपालिका स्थायी समितीची विशेष सभा आज गुरुवार दिनांक ०७/०१/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्री. सोनार सुनिल वसंतराव	सदस्य
४	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
५	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य
६	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
७	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
८	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
९	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
१०	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
११	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	हुद्दा
१	श्री. गणेश गिरी	अति. आयुक्त
२	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
३	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा. आयुक्त
४	श्री. तुषार नेरकर	सहा. आयुक्त
५	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
६	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
७	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
८	डॉ. श्री महेश मोरे	वै.आरोग्याधिकारी
९	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
११	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी तथा नप्र. मुख्य लेखाअधिकारी
१२	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल
१३	श्री. एन.पी. सोनार	ईस्टेट मॅनेजर

१४	श्री. रमजान अन्सारी	प्र. कार्यालय अधिक्षक
१५	श्री. आर.बी. सोनवणे	परवाना विभाग अधिक्षक
१६	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१७	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
१८	श्री.एस.एन. देसले	लिपीक मनपा शि.मं.
१९	श्री.सुक्राम आत्या राऊत	मोटार वाहन विभाग

मा. सभापती — सन्मा. सदस्य मा.अति आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक :- ११४ — धुळे महानगरपालिका हद्दीतील घनकचरा वाहतूक व संकलन करणेकामी यापूर्वी नियुक्त वॉटरग्रेस संस्थेकडून काम काढून घेणे व नविन निविदा प्रक्रिया पूर्ण होई पावेतो पर्यायी व्यवस्था करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

मा.सभापती- — सदर प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर झालेला असून याबाबत प्रथम प्रशासनाचा खुलासा ऐकून घेणे गरजेचे आहे उपायुक्त यांनी याबाबत खुलासा करावा.

म. उपायुक्त- — सदरचा प्रस्ताव हा प्रशासनामार्फत पाठवलेला आहे मागील घनकचरा संकलन वाहतूक कामाचा ठेका वॉटर ग्रेस कंपनीला देण्यात आलेला होता सदर संस्थेबाबत अनेक तक्रारी नागरिकांच्या व नगरसेवकांच्या आलेल्या होत्या त्यामुळे स्थायी समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे त्यांच्यावर आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही सुरू केलेली आहे त्यांना कायदेशीर नोटीस देण्यात आलेली आहे यापूर्वी त्यांना नोटीस देऊनही त्यांच्या कामात कोणतीही सुधारणा झालेली नव्हती त्यामुळे सदर कंपनीबाबत तातडीने कार्यवाही करणे गरजेचे होते त्यासाठी सदर वॉटर ग्रेस कंपनीला ३१डिसेंबर पावेतो काम काढून घेण्याबाबत स्थायी समितीने निर्देशीत केले होतेआपण शहरातील घनकचरा संकलन वाहतूक साठी मागील त्रुटींचा अभ्यास करून नवीन नवीन प्रक्रिया राबवित आहोत परंतु तोपावेतो आरोग्याच्या समस्या निर्माण होणार नाहीत व नागरिकांना त्रास होणार नाहीत यासाठी अनेक पर्यायांचा विचार केला त्याबरोबर मागील निविदेतील एल. 2 ठेकेदार रिलायबल कंपनी यांच्याशी चर्चा केली व निविदा प्रक्रिया कालावधीत त्यांच्याकडून काम करून घेण्याबाबत पर्याय पुढे आला त्यानुसार सदर रिलायबल कंपनी यांना काम देणेबाबत प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे यामध्ये मनपाच्या वर जो काही आर्थिक भार निर्माण होणार आहे त्याची कपात वॉटर ग्रेस कंपनीच्या डिपॉझिट मधून काढण्यात येईल याबाबत रिलायबल कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा झालेली आहे त्यांनीदेखील शहराची संपूर्ण परिस्थितीची पाहणी करून कामाबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे तसेच वॉटर ग्रेस कंपनीच्या ज्या काही अटी-शर्ती असेल त्या रिलायबल कंपनीलाही लागू राहतील त्यानुसार आपल्या समोर हा प्रस्ताव सादर झालेला आहे.

म. संतोष खताळ- — आपण वॉटर ग्रेस कंपनीला स्वत:हून बोलावलेले नाही कंपनी कोणती असो किंवा संस्था कोणती असो आपल्याला त्याबाबत काही देणेघेणे नाही फक्त आपल्याला शहरातील कचरा उचलला गेला पाहिजे व शहराचे आरोग्य चांगले राहिले पाहिजे हीच आपली भूमिका आहे वजन बरोबर येते पण कचरा उचलला जात नाही ही पूर्वीची समस्या होती उद्या रिलायबल कंपनीने हेच काम केले तर आम्ही सुद्धा त्याबाबत तक्रार करू याबाबत आपली जी काही वाहने कंपनीकडे होती ती नादुरुस्त झाली आहेत ती दुरुस्त करून त्यांचे येणारे पैसे वॉटर ग्रेस कंपनीकडून घेण्यात यावेत

म.उपायुक्त- — वॉटर ग्रेस कंपनीला जी वाहने देण्यात आलेली होती ती दुरुस्त करून घेण्यात येत आहेत व त्या बाबतचा जो काही खर्च आहे तो आपण सध्या करणार आहोत व संबंधित खर्च वॉटर ग्रेस कंपनीच्या डिपॉझिट मधून वसूल करण्यात येईल.

म.संतोष खताळ- याचबरोबर ठेकेदाराने जे काही कामगार नियुक्त केले आहेत त्यांचा पगारही देणे बाकी आहे सदरचा पैसाही त्यांच्याकडून वसूल करण्यात यावा.

म.अमोल मासुळे- हा धुळेकर यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहेत यामध्ये पूर्वीच्या ठेकेदाराला ज्या काही निविदा अटी शर्ती होत्या त्याच संबंधित संस्थेला लागू आहेत तसेच रिलायबल कंपनीने दिलेला दरात तफावत आहे सदरचे काम मर्यादित कालावधीत आहे त्यामुळे इतर कोणतेही आर्थिक भार मान्य करू नये.

म.उपायुक्त- ज्या काही अटी-शर्ती कंपनीला निविदेमध्ये होत्या त्यासाठी शर्ती रिलायबल कंपनीलाही लागू राहतील त्यात कोणतीही सूट देण्यात येणार नाही सदर संस्था स्वतः काम करणार आहे धुळे शहरातील इतर कोणाचाही त्यात सहभाग राहणार नाही.

म.अमोल मासुळे- यापूर्वी वॉटर ग्रेस कंपनीच्या ठेकेदाराला शहरात तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यास सांगितले होते परंतु त्यांनी तसे केले नाही आता संबंधित कंपनीला तक्रार कक्ष स्थापन करण्यासाठी कळवण्यात यावे.

म. सभापती- कार्यालयीन अहवाल व त्यावरील सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार यापूर्वी घनकचरा संकलन कामी वॉटरग्रेस कंपनीला कंत्राट देण्यात आलेला होता. सदर कंपनीने अटी व शर्तींचा भंग केल्याने त्यांचेवर दंडात्मक कारवाई देखील करण्यांत आलेली होती.संबंधित संस्थेस काळया यादीत टाकण्याबाबत निर्णय अंतिम स्तरावर आहे.तसेच वारंवार सुचना करुन देखील सदर संस्थेच्या कामकाजात सुधारणा होत नव्हती. तसेच नागरीकांच्या व नगरसेवकांच्याही मोठया प्रमाणावर तक्रारी प्राप्त होत होत्या. तसेच मनपाकडे सद्यस्थितीत अपुरे मनुष्यबळ आहे. धुळेकर नागरीकांची गैरसोय होणार नाही व मनपावर कुठल्याही प्रकारचा आर्थिक बोजा येवू नये याकरिता मनपा प्रशासनाने सादर केलेल्या कार्यालयीन अहवालानुसार सदर निविदेत भाग घेतलेले एल. 2 ठेकेदार रिलायबल एजन्सी यांना नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होई पावेतो धुळे महानगरपालिका हद्दीतील घनकचरा वाहतूक व संकलन करणेकामी नियुक्त करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत वॉटरग्रेस संस्थेशी केलेल्या करारनाम्यातील अटी शर्ती रिलायबल एजन्सी यांना बंधनकारक राहतील. संबंधित ठेका देताना मनपावर कोणताही आर्थिक भार निर्माण झाल्यास वॉटरग्रेस संस्थेच्या अनामत तथा देयकातून कपात करण्यांत यावी. तसेच याबाबत न्यायालयीन बाब तथा वाद निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने उचित कार्यवाही करावी याबाबत प्रशासनाची जबाबदारी राहील. रिलायबल एजन्सीला ठेका देतांना सदर संस्थेच्या अटी शर्तीनुसार मनपावर कोणताही आर्थिक भार येणार नाही याच्या आधिन राहून प्रशासनाने कार्यवाही करावी व दक्षता घ्यावी. सदर ठेका पुढील निविदा प्रक्रिया पूर्ण होई पावेतो देण्यांत येत असून निविदा प्रक्रिया पूर्ण करणेबाबत प्रशासनाने तांतडीने कार्यवाही करावी.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२८ दिनांक ०७/०१/२०२१

धुळे महानगरपालिका हद्दीतील घनकचरा संकलन व वाहतुक करणेकामी जा. क्र./ धुमपा /आरोग्य/६५९/१८-१९ दि.६/३/२०१९ च्या कार्यादेशान्वये वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांना काम देण्यात आले होते. उक्त काम करीत असतांना संस्था हि करुन दिलेल्या करारनाम्यातील अटी शर्तींचा भंग करीत असल्याने व कामात नियमीत तक्रारी प्राप्त होत असल्याने सदर संस्थेस वेळोवेळी नोटीस, दंडात्मक कार्यवाही करण्यात येऊनही संस्थेने कामात अद्याप पावेतो सुधारणा केलेली नाही. त्यामुळे सदर संस्थेस मे.स्थायी समिती ठराव क्र.१०६ दि.१०/१२/२०२० अन्वये वॉटरग्रसे प्रॉडक्टस,नाशिक यांचे काम दि.३१/१२/२०२० पावेतो बंद करुन धुळे मनपा हद्दीतील घनकचरा संकलन व वाहतुक करण्याकामी पर्यायी व्यवस्था करणे बाबत मे.स्थायी समितीने निर्देश दिलेले आहे.

त्याअनुषंगाने सन २०१८ मध्ये धुळे मनपा हद्दीतील घनकचरा संकलन व वाहतुक करुन त्यांचे वजन करुन कंपोस्ट डेपो व गांडुळखत प्रकल्पावर टाकणे बाबत ई-निविदा सुचना क्र.८०/ २०१८-१९ Tender ID-२०१८_DMCD-३९०१४० प्रसिध्द करण्यात आली होती. तरी सदर निविदेत खालीलप्रमाणे एकुण ३ निविदाधारकांनी भाग घेऊन दर प्राप्त झाले होते.

अ.क्र.	निविदाधारकांचे नांव	प्राप्त झालेले दर (मे.टन नुसार)
१	मे.वॉटरग्रसे प्रॉडक्टस,नाशिक	९१८
२	रिलायबल एजन्सीज, वसई जि.पालघर	१०७१.४९

३	बी.व्ही.जी.इंडीया लिमीटेड	१५५०.०४

मे. स्थायी समितीच्या निर्देशानुसार आरोग्य विभागाने दि. २८/१२/२०२० रोजी निविदा प्रसिध्द केलेली आहे. तसेच सदर घनकचरा संकलन व वाहतुकीच्या यापुर्वी केलेल्या निविदेतील L-२ रिलायबल एजन्सीस, वसई यांना सदर कामात स्वारस्य असल्याबाबत माहिती घेण्यासाठी दि. २८/१२/२०२० रोजी पत्र देण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने रिलायबल एजन्सीस यांनी खालीलप्रमाणे अटी व शर्तीस अधिन राहुन मर्यादीत कालावधीकरीता काम करण्यास तयार आहोत असे पत्र सादर केलेले आहे.

सदरील कामासंदर्भातील बाबी खालीलप्रमाणे आहे.

कचरा संकलन करणे कामी धुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या वाहनांची देखभाल दुरुस्ती करुन व जीपीएस यंत्रणा सक्रिय करुन संस्थेच्या ताब्यात द्यावी. अथवा सदर संस्थेने केलेल्या देखभाल दुरुस्ती संदर्भातील देयकाचा मोबदला संस्थेस अदा करावा. कारण सदर वाहनांचा रोजचा वापर लक्षात घेता सदर वाहनांवर जास्तीत जास्त खर्च होईल याची शक्यता नाकारत येत नाही तरी या बाबतीत योग्य तो विचार करावा ही विनंती.

सदरील काम मर्यादीत कालावधीकरीता असल्याकारणामुळे संस्थेकडून शासकीय कर या व्यतिरिक्त् इतर कर भरणा करणेबाबतची मागणी करु नये.संस्थेचे देयक अदा करतांना फक्त २% टीडीएस कपात करण्यात यावा त्याव्यतिरिक्त इतर कुठल्याही प्रकारची रक्कम कपात करण्यात येऊ नये.

संस्था मर्यादीत कालावधीकरीता व महानगरपालिका क्षेत्रातील कचरा संकलनाचा मोठा प्रश्न आहे असे लक्षात घेता संस्था काम करण्यास तयार आहे. भविष्यात कचरा संकलन करो कमी झाला (टन नुसार) व काही तांत्रिक कारणाने, संस्था काम करण्यास असमर्थ आहे. असे लक्षात येताच संस्थेव्दारे काम बंद करण्याची महानगरपालिकेला किमान ०५ दिवसांची पुर्वसुचना देण्यात येईल.

निविदा पत्रकात नमुद केलेला दर हा सन २०१८/१९ वित्तीय वर्षात इंधन व इतर खर्च रु.६७ प्रती लिटर दर विचारात घेऊन निविदा भरणा केली होती सन २०१९/२० हया वर्षातील इंधन व देखभाल दुरुस्तीचा वाढता खर्च रु.८० प्रती लिटर यातील तफावत लक्षात घेता (कमी /जास्त) शक्य असल्यास त्या तफावतीची रक्कम अथवा ०५% वाढ अथवा आपण विचार विनिमय करुन योग्य ती वाढ. सदरील काम मर्यादीत कालावधी साठी असल्यामुळे संस्थेकडून निविदेतील अटीशर्तीनुसार परफॉमर्स सुरक्षा अनामत रक्कम दिली जाणार नाही. परंतु मासिक देयकातील ३% सुरक्षा अनामत रक्कम लेखासंहितेतील तरतुदीनुसार कालावधी संपल्या नंतर तात्काळ मिळावी.तसेच इतर बाबींची मागणी करु नये ही विंनती.

मे.स्थायी समितीच्या निर्देशानुसार नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक असल्याने L-२ रिलायबल एजन्सीस,वसई यांनी वरील अटी शर्तीस अधिन राहुन काम देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण- २ स्थायी समिती कामकाज कलम ३क अन्वये तातडीची विशेष मे.स्थायी समितीचे आयोजन होणेसाठी मान्यतेसाठी पाठविणेस योग्य त्या आदेशार्थ सविनय सादर करण्यांत आलेला आहे.

यासंदर्भात निविदेतील अटी शर्ती मध्ये कोणताही बदल न करता एल. 2 निविदा धारक यांच्या दरानुसार कलम 3 के अन्वये स्थायी समिती समोर सादर करावे असे अभिप्राय म.उपायुक्त यांनी दिलेले असून याबाबत स्थायी समितीची मान्यता घ्यावी. तसेच दरामधील तफावत वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नासिक या संस्थेकडून वसूल करण्याबाबत कार्यवाही करावी.व निविदा प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करावी असे अभिप्राय म.आयुक्त यांनी दिलेले आहे.

त्यानुसार सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 2 कलम 3 क अन्वये मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

कार्यालयीन अहवाल व त्यावरील सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार यापूर्वी घनकचरा संकलनकामी वॉटरग्रेस कंपनीला कंत्राट देण्यात आलेला होता. सदर कंपनीने अटी व शर्तींचा भंग

केल्याने त्यांचेवर दंडात्मक कारवाई देखील करण्यांत आलेली होती. संबंधित संस्थेस काळया यादीत टाकण्याबाबत निर्णय अंतिम स्तरावर आहे.तसेच वारंवार सुचना करुन देखील सदर संस्थेच्या कामकाजात सुधारणा होत नव्हती. तसेच नागरीकांच्या व नगरसेवकांच्याही मोठया प्रमाणावर तक्रारी प्राप्त होत होत्या. तसेच मनपाकडे सद्यस्थितीत अपुरे मनुष्यबळ आहे.धुळेकर नागरीकांची गैरसोय होणार नाही व मनपावर कुठल्याही प्रकारचा आर्थिक बोजा येवू नये याकरिता मनपा प्रशासनाने सादर केलेल्या कार्यालयीन अहवालानुसार सदर निविदेत भाग घेतलेले एल. 2 ठेकेदार रिलायबल एजन्सी यांना नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होई पावेतो धुळे महानगरपालिका हद्दीतील घनकचरा वाहतूक व संकलन करणेकामी नियुक्त करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत वॉटरग्रेस संस्थेशी केलेल्या करारनाम्यातील अटी शर्ती रिलायबल एजन्सी यांना बंधनकारक राहतील. संबंधित ठेका देताना मनपावर कोणताही आर्थिक भार निर्माण झाल्यास वॉटरग्रेस संस्थेच्या अनामत तथा देयकातून कपात करण्यांत यावी. तसेच याबाबत न्यायालयीन बाब तथा वाद निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने उचित कार्यवाही करावी याबाबत प्रशासनाची जबाबदारी राहील. रिलायबल एजन्सीला ठेका देतांना सदर संस्थेच्या अटी शर्तीनुसार मनपावर कोणताही आर्थिक भार येणार नाही याच्या आधिन राहून प्रशासनाने कार्यवाही करावी व दक्षता घ्यावी. सदर ठेका पुढील निविदा प्रक्रिया पूर्ण होई पावेतो देण्यांत येत असून निविदा प्रक्रिया पूर्ण करणेबाबत प्रशासनाने तांतडीने कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे

नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक २१ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक १४/०१/२०२१
वेळ सकाळी ११-०० वाजता.

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक१४/०१/२०२१रोजी सकाळी११-०० वाजता **मा.श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे,सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली.स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
४	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य
५	श्रीमती देवरे सुरेखा भागवत	सदस्या
६	श्रीमती उदासी कशीश गुलशन	सदस्या
७	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
८	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
९	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
१०	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
११	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
१२	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१३	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या
१४	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
२	श्रीमती पल्लवी शिरसाठ	सहा.आयुक्त
३	श्री. विनायक कोते	सहा.आयुक्त
४	श्री. तुषार नेरकर	सहा.आयुक्त
५	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
६	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
७	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
८	श्री. वी. एस. रनाळकर	प्र.मुख्य लेखाधिकारी तथा सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
९	श्री. चंद्रकांत जाधव	सहा.आरोग्याधिकारी
१०	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
११	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल
१२	श्री. एन.पी. सोनार	ईस्टेट मॅनेजर

१३	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१४	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
१५	श्री. किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख
१६	श्री.प्रसाद जाधव	प्र अतिक्रमण विभाग प्रमुख
१७	श्री.महेंद्र सोनवणे	प्रशासन अधिकारी मनपा शि.मं.
१८	श्री.सुक्राम आत्या राऊत	मोटार वाहन विभाग

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा.सदस्या श्रीमती कशीश गुलशन उदासी यांचा आज वाढदिवस असल्याने त्यांचे स्थायी समिती सदस्यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिष्टचिंतन करण्यांत आले.

सभेच्या सुरुवातीस सन्मा.सभापती यांचेकडुन श्रध्दांजली अर्पण करणेबाबत आलेली सुचना भंडारा जिल्हयातील समान्य रुग्णालयात नुकत्याच झालेल्या अग्नी तांडवात १० चिमुकल्या बालकांचा मृत्यू झाला आहे.या दु:खद घटनेबद्दल आजच्या स्थायी समिती सभेत मृत्यू पावलेल्या बालकांना भावपूर्ण श्रध्दाजली अर्पण करावी.

म.सभापती — भंडारा जिल्हयातील सामान्य रुग्णालयांत झालेल्या अग्नीतांडवात मृत्यूमुखी पडलेल्या १० बालकांना आजच्या बैठकीत भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यासाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२९दिनांक १४/०१/२०२१

श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे सभापती यांच्या सुचनेनुसार नुकताच भंडारा जिल्हयातील सामान्य रुग्णालयात झालेल्या अग्नीतांडवात १० चिमुकल्या बालकांचा मृत्यू झाल्या आहे. ही सभा त्यांचेकुटुंबीयांच्या दु:खात सहभागी असून मृत बालकांना चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचा अर्ज.

सभेच्या सुरुवातीस सन्मा.सदस्या भारती अशोक माळी यांनी तब्येत बरी नसल्याने रजा करणेबाबत विनंती केली आहे.तसेच सन्मा.सदस्यश्री.सुनिल वसंतराव सोनार यांनी अपरिहार्य कारणामुळे आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नाही.त्यामुळे आजच्या सभेस रजा करणे बाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्या सौ भारती ताई माळी यांनी तब्येत बरी नसल्याने तसेच श्री. सुनिलभाऊ सोनार यांनी अपरिहार्य कारणामुळे सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजुरीबाबत विनंती केली आहे.तरी त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३० दिनांक १४/१/२०२१

सन्मा.सदस्या भारती अशोक माळी यांनी तब्येत बरी नसल्याने रजा करणेबाबत विनंती केली आहे.तसेच सन्मा.सदस्य श्री.सुनिल वसंतराव सोनार यांनी अपरिहार्य कारणामुळे आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नाही.त्यामुळे आजच्या सभेस रजा करणेबाबत विनंती केली आहे.सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सभापती यांचेकडून आलेला अभिनंदनाची यादी .

मा.सभापती यांनी सुचीत केल्यानुसार आपल्यासाठी नव्हे तर संपूर्ण देशासाठी अत्यंत आनंदाची बातमी आहे.आदरणीय प्रतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या मार्गदर्शनाने प्ररेणनेने व संपकल्पनतून संपूर्ण भारतात गेल्या एक वर्षापासून करोनाचे जे थैमाण आपत्रती सुरु होती त्यात अनेक निपाप जिवांचे जिव गेले. आता करोनाच्या रोगावर सिरम इन्टीटयूट तर्फे कोरोना प्रतिबध्दक लसीकरण संपूर्ण देशांत सुरु झालेले आहे. लसीकरण उलपब्ध होत आहे. यानिमित्त एक अभिनंदनाची आपल्यासाठी बाब आहे. याबद्दल एक अभिनंदनाचा ठराव या इनटीटयूटबद्दल तसेच डॉक्टर मंडळी तसेच संशोधक मंडळाबद्दल अभिनंदनाचा ठराव आजच्या बैठकीत करण्यांत यावा अशी सुचना आदरणीय सभापती महोदय यांनी केली आहे. तसेच योगायोगाने आज मक्ररसंक्रती ब-याच जणांनी सांगितले की, आज मिटींग ठेवू नका. पण चांगल्या दिवशी सर्वाचे गेट टू गेदर होते आणि आज विशेष म्हणजे आपल्या सन्मा.सदस्या सौ. कशीश ताई उदासी यांचा वाढ दिवस आहे. यानिमित्ताने सभापती महोदयांच्या वतीने व सर्व सभागृहाच्या वतीने व सर्व अधिकारी कर्मचा-यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन व स्वागत करण्यांत येत आहे. सर्व सभागृहाच्या वतीने वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे उज्वल भविष्यासाठी व आरोग्यदायी जिवनासाठी अभिष्टचिंतन करण्यांत आले.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३१ दिनांक १४/०१/२०२१

संपूर्ण देशासाठी अत्यंत आनंदाची बातमी आहे.आदरणीय प्रतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या मार्गदर्शनाने प्ररेणनेने व संपकल्पनतून संपूर्ण भारतात गेल्या एक वर्षापासून करोनाचे जे थैमाणआपत्रती सुरु होती त्यात अनेक निष्पाप जिवांचे जिव गेले. आता करोनाच्या रोगावर सिरम इन्टीटयूट तर्फे कोरोना प्रतिबधदक लसीकरण संपूर्ण देशांत सुरु झालेले आहे. लसीकरण उलपब्ध होत आहे. यानिमित्त एक अभिनंदनाची आपल्यासाठी बाब आहे. याबद्दल एक अभिनंदनाचा ठराव या इनटीटयूटबद्दल तसेच डॉक्टर मंडळी तसेच संशोधक मंडळाबद्दल अभिनंदनाचा ठराव आजच्या बैठकीत पारीत करण्यांत येत आहे.

तसेच सन्मा.स्थायी समिती सदस्या सौ.कशीश गुलशन उदासी यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांनाही शुभेच्छा देऊन अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-११५ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (१०/१२/२०२०)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा,

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३२ दिनांक १४/०१/२०२१

मागील स्थायी समिती सभा दि.१०/१२/२०२० रोजीचे स्थायी समिती ठराव नंबर ९३ ते १०७अखेर क्रमश तसेच बैठकीत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील सभापतीनी दिलेले निर्णय वाचून कायम करण्यांत करण्यांत येत आहे. **सही-x x x**

सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-११६ धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील न्यु हॉलंड बॅक हो लोडर मशिन क्र. एम.एच. १८ बी.आर.१५४२ मशिनचे नविन टायर-ट्युब,रिमसह बसविणे कामी येणारा खर्च ₹.१,८१,८९८/- मात्रला ७३ (क)अधिन अनुसूची ड प्रकरण ५(२) (२) अन्वये मंजुरी बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती — विषय क्रं.११६ व ११७ हे दोन्ही विषय एकाच स्वरुपाचे असल्याने वाहन विभाग प्रमुख यांनी माहिती द्यावयाची आहे.

म. संतोष खताळ — साहेब हे बॅक हो लोडर मशिन काय आहे यांची माहिती मिळावी हे जर जे.सी. बी.मशिन असेल तर याला घेवून किती दिवस झाले. इतक्या लवकर टायर कसे खराब झाले आहे. हे टायर हेवी डयुटी नव्हते तर हे कसे खरेदी केले.सदर मशिन आपल्याला कचरा डेपो येथे चालवावयाचे आहे की रस्त्यावर चालवावयाचे आहे. हे देखील स्पष्टीकरण येथे दिले गेले पाहिजे.जे कोणी बाजार घेत नाही ते आपली महानगरपालिका खरेदी करते. तसेच टॅक्टरचे देखील तसेच आहे. जे टॅक्टर कोणी खरेदी करीत नाही ते आपण घेतले आहे.माझे स्वत:चे जे.सी.बी.मशिन आहे. जे.सी.बी थ्रीडी एक्स आजच्या तारेखेत संपूर्ण जगात एक नंबर आहे.त्याचे टायर ३ वर्षापासून मी स्वत: वापरत आहे.३ वर्ष त्यांची हवा देखील चेक करावी लागत नाही. ते न घेता हे एल ॲन्ड टी कसे घेवून आले. यात कोणाचे का आहे याची मला माहिती नाही परंतु जी वस्तु बाजारात चांगली आहे केंद्र शासन पैसे देत आहे अशी चांगली वस्तु घेतली गेली पाहिजे. सदर मशिन घेवून एक वर्ष देखील झाले नसेल त्यांची तारीख सांगावी. तसेच आता देखील सदर टायर हेवी टाकून घ्यावे ज्यामुळे पुन्हा ते बदलण्याची वेळ येणार नाही सदर विषय मंजूर करावा.

म. सभापती — सदरचे काम कोण बघतात त्यांनी खुलासा करावा.

म. उपायुक्त — श्री. राऊत आपण संतोष भाऊ यांनी केलेली सूचनेची नोंद घेवून पूढील वेळी दक्षता घ्यावी.

म.अमोल मासुळे — साहेब त्यांना उत्तर देणेसाठी माईक वर बोलवा आमचे देखील प्रश्नाची उत्तर आम्हाला पाहिजे आहे. न्यु हॉलंड बॅक हो लोडर मशिन कुठे आहे याचे काम धुळे शहरात कुठे सुरु आहे यांची देखील माहिती आम्हाला हवी आहे. सर्वात मोठा भाग हा मी परिसराचा आहे मी स्वतच्छता निरीक्षकांना विचारले तर ते म्हणतात हे मशिन आपल्याकडे नाही. याच संदर्भात मी सहा. आरोग्याधिकारी श्री. लक्ष्मण पाटील यांनी देखील विचारले त्यांनी देखील मला तसे उत्तर दिले. सदर विषयात दिशा भूल करण्यांत आले आहे.जे.सी.बी. म्हणतात परंतु टिपणी न्यु हॉलंड बॅक हो लोडर मशिन असा उल्लेख करतात. जे मशिन कुठेच चालत नाही ते महानगरपालिकेत खरेदी करतात.या मध्ये कोणाचा इंटररेस्ट आहे.आणि आम्ही या ठिकाणी प्रश्न उपस्थित करतो म्हणून आम्हाला बदनाम करण्यांत येते.सभापती महोदय,मशिन घेणेस एक वर्ष देखील झालेले नाही. २- २लाखाचे टायर आपण बदलतो आहे .

म. सभापती — याठिकाणी संबंधितांनी सन्मा. सदस्यांनी उपसिथत केलेल्या मुद्दयांचा खुलासा करावा.

म.वाहन विभाग प्रमुख — सभापती साहेबांच्या वतीने खुलासा करतो की,वाहन खरेदीचे काम भांडार विभागाकडून करण्यांत येते. वाहनाचा वापर आरोग्य विभाग करते.आमच्याकडेस फक्त दुरुस्तीसाठी प्रस्ताव येत असतो.संबंधित विभागाचे अधिकारी आमच्याकडेस दुरुस्ती बाबत रिपोर्ट वरिष्ठ अधिका-या मार्फतआमच्याकडेस पाठवित असतात. रिपोर्ट आल्यानंतर आम्ही त्यावर सविस्तर टिपणी सादर करीत असतो. या ठिकाणी जे.सी.बी.असे लिहिले नाही असे सन्मा.सदस्यांनी म्हटले परंतु त्या मशिनच्या स्पेसीफिकेशन मध्येच न्यु हॉलंड बॅक हो लोडर मशिन असा उल्लेख केलेला आहे. त्यानंतर टिपणीत आम्ही जे.सी.बी. असा शब्द आलेला आहे. बांधकाम विभाग जे.सी.बी. भाडे हे हेड आहे त्यामध्ये तसा उल्लेख आलेला आहे. सदर मशिन खरेदी करतांना त्याला १२ प्लाय टायर खरेदी केलेले आहे. कंपनीच्या इंजिनिअरशी चर्चा केली तर त्यांनी सांगितले की, आम्ही स्पॉटला येवून पाहिजे तर तुम्ही कामे हे नाल्यात सुरु आहे. आतुम्ही खरेदी केले टायर हे इंडस्टील ठिकाणी वापरावयाचे आहे.एक मशिन तसे चालू आहे सदर टायरला नाल्यांत ॲगल लागून ते खराब झालेले आहे. परंतु त्या मशिनला दुस-या मशिनचे टायर लावुन ते चालू आहे. त्यामुळे आपण त्या ड्रायव्हरांनाही दोष देऊ शकत नाही. आणि दुसरे टायर कचरा डेपो येथे खराब झालेले आहे. कचरा डेपो येथे टायर पंक्चर तर होत असते. त्याला आपण काही करु शकत नाही. नवीन टायर हेवी डयुटीचे २० प्लाय चे टाकण्यांत येणार आहे. त्याठिकाणी व्हील रीम रिअर सुध्दा बदलावी लागणार आहे.

म. संतोष खताळ — साहेब आमचा आरोप तो होता की मशिन खरेदी करतांना हेवी डयुटी टायर का टाकण्यांत आले नाही. आपल्याला प्लेन रोडावर मशिन चालवावयाचे नाही त्यामुळे हेवी डयुटी टायर टाकणे गरजेचे आहे. विकत घेणा-या विभागाला हे कळत नाही का हे मशिन आपल्याला नाल्यात चालवावयाचे आहे म्हणून ? माझ्याकडेस जे.सी.बी. मशिन आहे म्हणून हे सर्व सांगू शकतो. बरे ठिक आहे कचरा डेपोचे काम आपण ठेकेदाराला दिले आहे का? एक वर्ष झाले हे काम वॉटर ग्रेस कंपनीचे आहे.आपले जे.सी.बी. कसे दिले. आपण ठेका देतांना तसे नमूद केले आहे का?

म. सभापती — तेथील कचरा आपण बाजूला करावयाचा आहे.

म. संतोष खताळ — आपल्या निविदा अटी शर्तीत काय लिहिले आहे ते उपायुक्त यांनी सांगावे.

म. उपायुक्त — कचरा डेपोवर जागा उपलब्ध करुन देण्यांचे आपले काम आहे.तेथे जे.सी.बी. देखील महानगरपालिकेचे राहील.

म. सभापती — या टेक्नीकल गोष्टी आहे. यानंतर मे.स्थायी समिती समोर कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करतांना टिपणी व्यवस्थित मांडणी करावी तसेच यापुढे कुठलेही साहित्य अथवा मशिनरी घेतांना ते लाईफ टाईम टिकेल अशा स्वरुपाचे घ्यावे. SHORT TIME टिकेल अशा मशिनरी अथवा साहित्य घेवू नये याची दक्षता घ्यावी.

म. उपायुक्त — कचरा डेपो संदर्भात खुलासा करतो की, बॅक हो लोडर हे मशिन आहे याचा जो वापर आहे हे कशासाठी घेतलेले आहे आपला जो शासनाकडुन २५ कोटी डी.पी.आर. सॅक्शन झालेला आहे. आपला जो प्रोसेसींग प्लॅन्ट आहे तेथे जे खत तयार होईल प्रोसेसींगसाठीचे जे काही मटेरियल आहे त्याला गोळा करणेसाठी हे मशिन घेण्यांत आले आहे. बॅक हो लोडर हा कमी क्षमतेचा आहे.आपल्याकडे अजून प्रोसेसींगचे काम चालू झालेले नाही. तेथे हेवी क्षमता चालणार नाही म्हणून आपण कमी क्षमतेचे घेतलेले आहे.

म. संतोष खताळ — माझी अशी सुचना आहे की यापुढे हेवी थ्रीडीएक्स कंपनीचा जे.सी.बी. घेण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने दोन्ही विषयांना मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३३ दिनांक १४/०१/२०२१

धुळे महानगरपालिका धुळे आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील बॅक हो लोडर मशिन क्रं. वाहन एम.एच. १८ बी.आर.१५४२ मशिनची वाहन चालक व मेकॅनिक व सहा. सार्व. आरोग्याधिकारी यांचे अहवालानुसार सद्याचे टायर हे १२ प्लाय चे आहेत. त्यामुळे मशिनचे टायर वारंवार पंक्चर होत असल्याने वाहनास नविन हेवी ड्युटी २० प्लाय टायर व ट्युब बसविणे आवश्यक आहे. त्यामुळे वाहन अधिकृत वितरक, पगारिया ॲटो, प्रा.लि. यांना फोन संदेश देऊन त्यांचे अभियंता मार्फत वाहनांची तपासणी करून इस्टिमेट घेण्यात आले.

मशिनची खरेदी हि जीईएम-पोर्टल वरून दिनांक ३० एप्रिल २०२० रोजी करणेत आली आहे. कंपनी अभियंता यांच्याशी चर्चा केली असता आपण मशिन सोबत खरेदी केलेले टायर हे इंडस्ट्रीअल टायर असल्याने कचरा डेपो व नाल्यात इंडस्ट्रीलअल टायर हे चालणार नाही तरी आपणास अशा ठिकाणी मशिन चालविणे कामी हेवी ड्युटी टायर बसवावे लागतील व त्यासाठी मागील टायरचे रिमसुध्दा बदलावे लागेल.कंपनीस टायर खराब बाबत ई-मेल पाठविणेत आला आहे. त्यांचे उत्तर आलेले नाही.

तसेच टायर मशिन नाल्यात टाकले असता पुढील व मागील टायर वेगवेगळया वेळेस फुटुन टायर निकामी झाला आहे. मशिनचे ५०० तास चाललेले त्यामुळे कंपनीकडेस वॉरंटी मध्ये टायर बदलुन मागितले असता त्यांनी दि.२४/१२/२०२० रोजी अपाघाताने टायर फुटल्यामुळे त्याची वारंटी देता येणार नाही. असे कळविले आहे.

शासकीय खरेदी कार्यपध्दती शासन निर्णय १ डिसेबर २०१६ नियम ३.२.७ व ३.२.३ मधील तरतुदी नुसार करण्यात आली आहे.खालील प्रमाणे तिन पुरवठादाराकडुन दर/नग सर्व करासहित मागविणेत आले. यात एल-I पुरवठा धारक पगारिया ॲटो यांच्याकडुन करण्यात येणारी **खरेदी/दुरूस्ती कामे खालीलप्रमाणे**

अ.क्र.	साहित्यतपशील/	नग	दर	कर	एकुण रक्कम
1	टायर रिअर HD (14×25)-20PR COMBO with free tube & flap	2	27732.03	15529.94	70994
2	व्हील रीम रिअर एचडी	2	27227.97	9802.06	64258
3	फ्रंट टायर 12.5.18-18 PR	2	12542	7023.52	32107.52
4	बोल्ट M18×1,5×35FULL 10.9 ZND,TB80	16	45.76	131.78	863.94
5	वाशर 0.781×1,375×0,134HTS ZND,TB80	16	23.73	68.34	448.02
6	हायड्रॉलिक ऑईल (20 लिटर)	1	3836.44	690.48	4527
				स्पेअर पार्ट रक्कम	139951.80
				इतर हँन्डलिंग चार्ज	2200
				ट्रान्सपोर्ट चार्ज	6500
				सीजीएसटी-९%	16623
				एसजीएसटी-९%	16623
				एकुण स्पेअर पार्ट व मजुरी सर्व करासहित रक्कम	181897.80
				(राऊडेड ऑफ)	0.20
				एकुण स्पेअर पार्ट व मजुरी सर्व करासहित रक्कम	181898

त्यानुसार सर्वात कमी दर एल-I हे पगारिया ॲटो प्रा.लि.अधिकृत वितरक, पुरवठा धारक आहे.व मशिन आरोग्य व स्वच्छता, अतिक्रमन कामी अत्यावश्यक सेवेसाठी वापर होतअसल्याने मशिनची दुरूस्ती हि तातडीने करणे आवश्यक आहे. त्यामुळे मशिनची आवश्यकता लक्षात घेता, ऑपरेटर,मेकॅनिक व सहा.सार्व.आरोग्याधिकारी यांचे अहवालानुसार मशिन कार्यरत करण्यासाठी तातडीने नविन हेवी ड्युटी टायर रिम सह खरेदी करणे आवश्यक आहे. तरी आवश्यकता व वस्तुची निकड लक्षात घेता वस्तु खरेदी करणे गरजेचे आहे.

सन २०२०-२१ या चालु आर्थीक वर्षात खर्च ₹.४०,२६९/-आहे. व या बिलातील खर्च ₹.१,८१,८९८/- मात्र आहे. असे एकुण चालु आर्थिक वर्षात ₹.२,२२,१६७/- मात्र खर्च होत आहे.

बांधकाम विभागाकडील जे.सी.बी भाडे व दुरूस्ती अंदाजपत्रकीय तरतुद १) ₹.१५,०००००/- २) पुर्वीचा खर्च ₹.१,३५,४९१/- ३) या बिलातील खर्च ₹.१,८१,८९८/- आहे आजपावेतो खर्च २ व ३ ची बेरीज ₹.३,१७,३८९/- या बिलातील वाहन दुरूस्ती खर्च वजा जाता आजपावेतो उपलब्ध शिल्लक ₹.११,८२,६११/- आहे .

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कामाची आवश्यकता/निकड लक्षात घेता घेवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (क) अधिन अनुसूची ड प्रकरण ५(२)(२) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-११७ धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील न्यु हॉलंड बॅक हो लोडर मशिन क्र.एम.एच. १८ बी. आर.१५४३मशिनचे नविन टायर- ट्युब, रिमसह बसविणे कामी येणारा खर्च ₹.१,८१,८९८/- मात्रला ७३ (क) अधिन अनुसूची ड प्रकरण ५ (२) (२)अन्वये मंजुरी बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.
म. संतोष खताळ विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३४ दिनांक १४/०१/२०२१

धुळे महानगरपालिका धुळे आरोग्य विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील बॅक हो लोडर मशिन क्रं. वाहन एम.एच. १८बी.आर.१५४३ मशिनची वाहन चालक व मेकॅनिक व सहा.सार्व.आरोग्याधिकारी यांचे अहवालानुसार सद्याचे टायर हे १२ प्लाय चे आहेत. त्यामुळे मशिनचे टायर वारंवार पंक्चर होत असल्याने वाहनास नविन हेवी ड्युटी २० प्लाय टायर व ट्युब बसविणे आवश्यक आहे. त्यामुळे वाहन अधिकृत वितरक, पगारिया ॲटो, प्रा.लि. यांना फोन संदेश देऊन त्यांचे अभियंता मार्फत वाहनांची तपासणी करून इस्टिमेट घेण्यात आले.

मशिनची खरेदी हि जीईएम-पोर्टल वरून दिनांक ३० एप्रिल २०२० रोजी करणेत आली आहे. कंपनी अभियंता यांच्याशी चर्चा केली असता आपण मशिन सोबत खरेदी केलेले टायर हे इंडस्ट्रीअल टायर असल्याने कचरा डेपो व नाल्यात इंडस्ट्रीलअल टायर हे चालणार नाही तरी आपणास अशा ठिकाणी मशिन चालविणे कामी हेवी ड्युटी टायर बसवावे लागतील व त्यासाठी मागील टायरचे रिमसुध्दा बदलावे लागेल. कंपनीस टायर खराब बाबत ई-मेल पाठविणेतआला आहे. त्यांचे उत्तर आलेले नाही.

तसेच मशिन कचरा डेपो येथे काम करीत असताना मागील टायरला सडई लागुन टायर फुटुन निकामी झाला आहे. मशिनचे तास ३५० चाललेले त्यामुळे कंपनीकडेस वॉरंटी मध्ये टायर बदलुन मागितले असता त्यांनी दि.१०/०८/२०२०रोजीअपाघाताने टायर फुटल्यामुळे वॉरंटीमध्ये सदरील बाबत येत नाही. असे कळविले आहे

परंतु मशिनची आवश्यकता व सध्या कोविड-१९आपात्कालीन परिस्थिती लक्षात घेता सदरील दुरूस्ती/साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.

शासकीय खरेदी कार्यपध्दती शासन निर्णय १ डिसेंबर २०१६ नियम ३.२.७ व ३.२.३ मधील तरतुदी नुसार सदर खरेदी करण्यात आली आहे.

यांत एल-I पुरवठा धारक पगारिया ॲटो यांच्याकडुन करण्यात येणारी खरेदी/दुरूस्ती कामे खालीलप्रमाणे

अ.क्र.	साहित्यतपशील/	नग	दर / नग	कर	एकुण रक्कम
1	टायर रिअर HD (14×25)-20PR COMBO with free tube & flap	2	27732.03	15529.94	70994
2	व्हील रीम रिअर एचडी	2	27227.97	9802.06	64258
3	फ्रंट टायर 12.5.18-18 PR	2	12542	7023.52	32107.52
4	बोल्ट M18×1,5×35FULL 10.9 ZND,TB80	16	45.76	131.78	863.94
5	वाशर 0.781×1,375×0,134HTS ZND,TB80	16	23.73	68.34	448.02
6	हायड्रॉलिक ऑईल (20 लिटर)	1	3836.44	690.48	4527
				स्पेअर पार्ट रक्कम	139951.80
				इतर हॅन्डलिंग चार्ज	2200
				ट्रान्सपोट्र चार्ज	6500
				सीजीएसटी-९%	16623
				एसजीएसटी-९%	16623
				एकुण स्पेअर पार्ट व मजुरी सर्व करासहित रक्कम	181897.80
				(राऊडेड ऑफ)	0.20
				एकुण स्पेअर पार्ट व मजुरी सर्व करासहित रक्कम	181898

त्यानुसार सर्वात कमी दर एल- I हे पगारिया ॲटो प्रा.लि. अधिकृत वितरक, पुरवठाधारक आहे. व मशिन आरोग्य व स्वच्छता, अतिक्रमन कामी अत्यावश्यक सेवेसाठी वापर होत असल्याने मशिनची दुरूस्ती हि तातडीने करणे आवश्यक आहे. त्यामुळे मशिनची आवश्यकता लक्षात घेता ऑपरेटर, मेकॅनिक व सहा.सार्व.आरोग्याधिकारी यांचे अहवाला नुसार मशिन कार्यरत करण्यासाठी तातडीने नविन हेवी ड्युटी टायर रिम सह खरेदी करणे आवश्यक आहे.तरी आवश्यकता व वस्तुची निकड लक्षात घेता वस्तु खरेदी करणे गरजेचे आहे.

सन २०२०-२१ या चालु आर्थीक वर्षात खर्च ₹.२१४४१/-आहे. व या बिलातील खर्च ₹.१,८१,८९८/- मात्र आहे.असे एकुण चालु आर्थिक वर्षात ₹.२,०३,३३९/- मात्र खर्च होत आहे.

बांधकाम विभागाकडील जे. सी. बी भाडे व दुरूस्ती अंदाजपत्रकीय तरतुद १) ₹.१५,००००/- २) पुर्वीचा खर्च ₹.३,१७३८९/- ३) या बिलातील खर्च ₹.१,८१,८९८/- आहे आजपावेतो खर्च २ व ३ ची बेरीज ₹.४,९९,२८७/- या बिलातील वाहन दुरूस्ती खर्च वजा जाता आजपावेतो उपलब्ध शिल्लक₹.१०,००,७१३/-आहे.(तरतुद नोंदवही पा.क्र.६३,६४ चे कृपया अवलोकन व्हावे)

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कामाची आवश्यकता/ निकड लक्षात घेता घेवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (क) अधिन अनुसूची ड प्रकरण ५(२)(२) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-११८ प्रभाग क्रं.५ व ६ मधील सुलभ शौचालय साफ सफाई व देखभाल दुरुस्तीसाठी मे.आस्था स्वयं. सेवा संस्थेला देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कमलेश देवरे कार्यालयीन टिपणीत नमूद केले आहेप्रभाग क्रं. ६ व ७ च्या नगरसेवकांचे नांव आले आहे तर प्रभाग क्रं. ५ च्या कोणत्या नगरसेवकाने पत्र दिले आहे. याची माहिती द्यावी.

म. सहा. आरोग्याधिकारी श्री. भगवान अप्पा गवळी यांनी पत्र दिले आहे.

म. सभापती जरत्यांनी पत्र दिले आहे तर त्यांचे नांव टिपणीत का नमूद केले नाही.यापुढे ज्यांचे ज्यांचे पत्र आले असतील त्या सर्वाचे नांवाचा उल्लेख करावा. तसेच धुळे शहरात ज्या २- ३ संस्था शौचालय देखभाल दुरुस्तीचे काम करतात. ही नावाजलेली संस्था आहे आंतर राष्टीय स्तरावर या संस्थेची चर्चा आहे. या नांवाजलेल्या संस्थेचा उल्लेख टिपणी मध्ये नमूद केला पाहिजे. तसेच सर्वाचे पत्र घेत जा. तुम्ही विषय मांडतात विषय मंजूरीला येतात म्हणून स्थायी समिती मंजुरी देत असते.तुम्ही जर विषय आणलेच नाही तर हे विषय मंजूर कसे होतील आणि ज्या काही संस्थांबद्दल प्रश्न चिन्ह निर्माण झालेले आहे त्या बाबत गांभिर्याने लक्ष दिले गेले पाहिजे.अनेक नगरसेवकांनी चौकशीसाठी पत्र दिलेले असतात. तर त्यामुळे गांभिर्याने लक्ष देऊन काम करा. कोणाला फेव्हलरेबल असे आपणास काम करावयाचे नाही ज्यामुळे तुमच्यावर संशय निर्माण होणार नाही याची काळजी घ्या.

म. अमोल मासुळे याच विषयाला अनुसरुन मला उपायुक्त सो. यांचेकडून माहिती हवी आहे की सर्व शौचालयांचे देखभाल दुरुस्तीचे काम रद्द करुन नवीन निविदा काढण्यांची प्रक्रिया कोणत्या स्तरावर आहे. याची माहिती द्यावी.

म.उपायुक्त या संदर्भात आयुक्त सो. यांनी लक्ष्मण पाटील यांचे वर ही जबाबदारी टाकली असून जितके लवकर काम करतील त्याबद्दल आयुक्त सो. हे त्यांना बक्षीस देणार आहेत.

म. सभापती सर्व सन्मा.सदसयांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर प्रस्तावास मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३५ दिनांक १४/०१/२०२१

धुळे महानगरपालिके मार्फत शहरातील प्रभाग क्र.5 व 6 मध्ये खालील दर्शविलेल्या ठिकाणी नविन सुलभ शौचालय बांधण्यात आलेले आहे. सदर शौचालयाचे बांधकाम सद्यस्थितीत पुर्ण झालेले आहे व उक्त संदर्भीय सन्मा.नगरसेवक यांनी सदर शौचालय नागरीकांसाठी खुले करुन शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी आस्था स्वयंरोजगार सेवा सह.संस्था, धुळे यांना देणे बाबत पत्र सादर केले आहे.तरी संबंधीत स्व.निरीक्षक यांनी समक्ष पाहणी करुन दिलेल्या अहवालानुसार सदर शौचालयांमध्ये लाईट,पाण्याची सोय, आऊटलेट, सेप्टीक टॅक, दरवाजे इ. सर्व सुविधा आहे व खालील शौचालय नागरीकांसाठी खुले करणे बाबत अहवाल सादर केला आहे.

तसेच उक्त संदर्भिय क्र.3 सन्मा.नगरसेवक श्री.अहिरराव किरण हरीश्चंद्र, प्रभाग क्र.6 यांच्या पत्रानुसार खालील अ.क्र.6 व7 चे शौचालय पुर्वीचे जुने बांधकाम असुन सद्यस्थितीत नागरीक वापर करीत असुन साफसफाई देखभालसाठी कुठलीही संस्था नेमण्यात आलेली नाही. त्यामुळे साफसफाईची समस्या निर्माण होत आहे.तसेच शौचालयात मोठ्या प्रमाणात दुरावस्था झालेली आहे व त्यांची मनपा बांधकाम विभागामार्फत मोठी दुरुस्ती करुन आस्था स्वयं. सेवा संस्थेला साफसफाई देखभाल साठी देण्याबाबत पत्र सादर केले आहे. तसेच संबंधीत स्व. निरीक्षक यांनी दिलेल्या अहवालानुसार अ.क्र. 6 व 7 हे पुर्वीचे जुने बांधकाम केलेले शौचालय असुन त्यांची मोठी दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

अ.क्र.	शौचालयाचे ठिकाण	सिट संख्या	
		स्त्री	पुरुष
१	प्रभाग क्र.५ नकाणे रोड वडारवाडा	५	५
२	प्रभाग क्र.५ नदि किनारी नविन रोड लगत (१० सिट)		
३	प्रभाग क्र.५ नदि किनारी नविन रोड लगत (१० सिट)		
४	प्रभाग क्र.६ मरीतमाता मंदीर जवळ	८	८
५	प्रभाग क्र.६ मरीतमाता मंदीर मागे	५	५
६	नदि किनारी लाईट फिटींग नाही, मिटर नाही	१२	०
७	हनुमान टेकडी नदि किनारी स्लॅबचे शेड नाही, लाईट नाही, मिटर नाही, सेप्टीक टँक भरलेली आहे, नळ लिकेज आहे	०	२३

तरी वरील अ.क्र.१ ते ५ चे सुलभ शौचालय हे आस्था स्वयंरोजगार सेवा सह. संस्था, धुळे यांना साफसफाई देखभालसाठी देवुन नागरीकांसाठी खुले करणेकामी व सादर व अ.क्र. ६ व ७ चे शौचालय हे बांधकाम विभागामार्फत मोठी दुरुस्ती करुन कार्यालयीन अहवालास अधिन राहून सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने उक्त सर्व शौचालय आस्था स्वयं.सेवा संस्थेस देखभाल दुरुस्तीसाठी देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-११९ प्रभाग क्र.७ येथे मोगलाई भागात अंतर्गत ठिकाणी जुनी जीर्ण झालेली ६ इंची पाईप लाईन काढून नवीन ८ इंची पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणेसाठी झालेला खर्च रु.३,९१,२६७/- मात्रला मनपा अधिनियम प्रकरण ५(२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.संतोष खताळ — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सदर विषय हा माझ्या प्रभागातील आहे. प्रशासन ज्या ज्या निविदा येतात त्या प्रमाणे कामाचे एस्टीमेट तयार करतात. त्यानंतर मंजुरीसाठी जातात त्यानंतर कामाचे टिपणीवर सहया करण्यासाठी अधिका-

याकडे चकरा माराव्या लागतात. अधिका-यांच्या सुचनांनुसार तांतडीने ठेकेदार त्याठिकाणी काम करतो. काम झाल्यानंतर त्या ठेकेदाराला अनेक गोष्टींना याठिकाणी सामोरे जावे लागते. साहेब तुमच्या आदेशाचे पालन जर ठेकेदार त्या वेळी करत असेल तर आणि पाण्याचा हा जो विषय आहे तो स्थायी समितीची बैठक चालू असतांना नागरीकांच्या मोर्चा आलेला होता. त्यावेळी शिंदे साहेब यांनी त्यावेळी नागरीकांची समजूत काढून तात्काळ त्या ठिकाणी ठेकेदाराला सांगून ते काम करुन घेतले आहे.असे अनेक विषय या ठिकाणी सहयासाठी पडलेले आहे. त्यामुळे संबंधित अधिका-यांना व ठेकेदाराला सुध्दा ताटकळ बसावे लागते.साहेब तुमच्या आदेशाचे पालन होत असतांना या गोष्टी देखील गांभिर्याने घेतल्या पाहिजे. मी आता सभापती आपल्या दारी या मोहिमेअंतर्गत वलवाडी या भागात गेलो होतो.या ठिकाणी मी सुचित करतो की, नकाणे वलवाडी येथे जे जलशुध्दीकरण केंद्र आहे. त्याठिकाणी कपौंड वॉल बांधणे अत्यंत जरुरीचे आहे. त्या ठिकाणी जर फिल्टर प्लॅन्टवर कपौंड वॉल बांधले नाही तर त्या ठिकाणी काही दुघर्टना घडली तर त्यास मनपाला जबाबदार धरले जाईल. म्हणून त्याठिकाणी वॉल कपौंड बांधणेचे आदेशित केलेले होते.त्यांचे एस्टीमेट देखील केलेले आहे. आणि सभापती आपल्या दारी या ठिकाणी जात असतांना तेथील जे रस्ते आहेत. ते रस्ते देखील करणे क्रमप्राप्त आहे.आपल्या बांभळे जलशुध्दीकरणापेक्षाही चांगली परिस्थिती तेथील जलशुध्दीकरणाची आहे.सदर जलशुध्दीकरण केंद्रावरील सुमारे ३५० ते ४०० कॉलन्याना पाणीपुरवठा केला जातो. आपण त्या टाक्यांची दक्षता घेतली नाही जर मी शिंदे सो. तुम्हाला विनंती करतो या विषयाला गांभियाने लक्ष घाला. तो सेल्फी पॉईट झाला आहे. सेल्फी पॉईट मुळे तेथे जर एखादी दुर्घटना घडली तर त्यांची सर्वश्री जबाबदारी आपल्याला घ्यावी लागेल. म्हणून ते दोन्ही विषय कार्योत्तर मंजुरीसाठी घेवून यावे. निविदा प्रक्रिया करावयाची असेल तर निविदा प्रक्रिया करा, जे जे प्रक्रिया करावयाच्या असतील त्या करा परंतु सदर काम तांतडीने मार्गी लावा.सदर महानगरपालिकेच्या विकास शुल्काअंतर्गत तथा अन्य निधीतून काम करण्यात यावे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३६ दिनांक १४/०१/२०२१

प्रभाग क्र. ७ मध्ये मोगलाई भागात अंतर्गत ठिकाणी पिण्याच्या पाण्याची जुनी इंची पाईप लाईन असून सदर पाईप लाईन हि जीर्ण झाल्याने वारंवार या पाईप लाईनला गळती लागून पिण्याच्या पाण्याची नासाडी होते तसेच नागरिकांना पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नसल्याने पिण्याच्या पाण्याअभावी मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. त्यामुळे प्रभाग क्र.७ येथे मोगलाई भागात अंतर्गत ठिकाणी जुनी जीर्ण झालेली ६ इंची पाईप लाईन काढून नवीन ८ इंची पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे आवश्यक असल्याने सदर भागात समक्ष पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.३,९१,२६७/- मात्र येणार आहे.

तरी सदरचे कामे हे नागरिकांचा पिण्याचा पाण्याच्या प्रश्न लक्षात घेता सदर काम करणे आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा श्री. संजय दगडू गायकवाड, ठेकेदार यांचे कडुन करून घेणेत आलेले आहे. सदर कामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.३,९१,२६७/- मात्र आलेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदरचे काम विना निविदा करणे कामी आलेला रु.३,९१,२६७/- मात्रच्या खर्चास मनपा अधिनियम प्रकरण ५ (२) (२) अन्वये कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषयक्रमांक:-१२० पाणीपुरवठा विभागातील मानधन तत्वावरील व्हॉलमन, पंप ऑपरेटर, गाळणी चालक, गाळणी निरिक्षक फीटर व विजतंत्री या संवर्गातील कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती मुदत वाढ द्यावयाची का?

म. अमोल मासुळे सभापती महोदय वेगवेगळया७ विभागातील कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना मुदत देण्याचा विषय मंजुरीसाठी आलेला आहे.मागे ६ महिन्यापूवी हया कर्मचा-यांना मुदत वाढ देण्याचा विषय मंजुरीसाठी आला असतांना मी बोललो होतो की, धुळे महानगरपालिकेत सर्वात वाईट विभाग आस्थापना विभाग आहे.या ठिकाणी व्हॉलमन असतील, पंप ऑपरेटर असतील, गाळणी चालक असतील फिटर असतील या कर्मचा-यांची मुदत संपून एक महिना होवून गेला आहे.आणि वीजतंत्री संवर्गातील कर्मचा-यांची मुदत संपून २ महिने झाले आहे. मग २ महिने होवून आता हा विषय उशिराने मंजुरीसाठी सादर केला जात आहे. येथील कर्मचारी एवढे कामात व्यस्त आहे का? या संदर्भात मागेही आस्थापना विभागाकडून कर्मचा-यांच्या नस्ती उशिरा सादर झालेली होती. त्यावेळी देखील आपण आस्थापना विभागाचे प्रमुखांना सक्त ताकीद देवून यापुढे मुदत संपण्याच्या १५ दिवस अगोदर प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचित केले होते.आता टिपणीत काय देत आहे सदर कर्मचा-यांची आज रोजी मुदत संपत आहे. त्यांची मुदत आज संपते आहे का? विषय पत्रिकेवर आज विषय आलेला आहे. साहेब पूर्ण दिशा भूल करणारे विषय आहे.आस्थापना विभागाकडून हा खोडसाळपणा केला जात आहे. आताच्या प्रस्ताव सादर करण्यांस उशिर केला आहे. मुळात हे सर्व कर्मचारी कमी मानधनात काम करीत आहे.यांचा मधील काळातील मानधन कसे दिले जाईल याविषयावर गांभिर्याने विचार करावा ही विनंती.

म. सभापती आस्थापना विभागाचे प्रमुख रमजान अन्सारी आज बैठकीला उपस्थित नाही. ही सर्वस्वी आस्थापना विभागाची जबाबदारी आहे.जर मुदतीच्या आत तुम्ही तो कर्मचा-यांचा विषय आणलेला नसेल आणि मुदतीनंतर जर तो विषय आणलेला असेल तर त्यांचे मानधन देण्यांची जबाबदारी स्विकारणे हे त्या विभागाचे काम आहे. त्या सर्व गोष्टींचा विचार करुन या विषयाला अत्यावश्यक सेवा देणारे हे सर्व कर्मचारी आहे म्हणून तो विषय स्थगित न ठेवता तो विषय मंजूरी देत असतांना उशिराने सादर झालेला विषय व त्यांचे मानधनाचा विषय याला अधिन राहून मंजुरी देण्यांत येत आहे.उशिराने आलेल्या विषयाच्या संदर्भात त्यांचेकडुन याबाबतचा खुलासा घेण्यांत येईल, आणि त्यानंतरच त्या उशिराच्या कालावधीच्या मानधनास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येईल.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३७ दिनांक १४/०१/२०२१

मानधन तत्वारील व्हॉलमन,संवर्गातील खालील कर्मचा-यांना जा क्र/धुमपा/आस्था १९३८ दि.२५/०६/२०२०अन्वये ०६ महिने कालावधी करीता रु ८०००/- मात्र मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आली होती. सदर नियुक्तीचा कालावधी दि.११/१२/२०२० रोजी संपत आहे .

अ.क्र.	कर्मचा-याचे नाव	अ.क्र.	कर्मचा-याचे नाव
१	दिपक छगन बागुल	८	गणेश शंकर बिरारी
२	सैययद इमरान अली जाफर अली	९	किरण राजेंद्र फुलपगारे
३	तुषार गिरीश चौधरी	१०	योगेश भानुदास वाखारकर
४	शिंदे दिनेश रामसिंग	११	श्री ज्ञानेश्वर तुकाराम सैंदाणे
५	चंद्रकांत मोतीलाल फुलपगारे	१२	प्रणय प्रणय राजेंद्र लहामगे
६	हेमराज भाईदास कोळी	१३	रणदिवे राहुल अरुणराव
७	श्री प्रमोद विठठल सोनवणे		

२)पंप ऑपरेटर संवर्गातील खालील कर्मचारी यांना जा क्र /धुमपा/आस्था १९४२ दि २५/०६/२०२० अन्वये०६ महिने कालावधी करीता नियुक्ती देण्यात आली होती. सदर नियुक्तीची मुदत दि

११/१२/२०२० रोजी संपत आहे.श्री कल्पतरु सदाशिव वाघ यांना जा क्र / धुमपा /आस्था/१४४४ दि ४/३/२०२० अन्वये व्हॉलमन या पदावरुन फीटर या वर्ग करणेत आले आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव
१	कल्पतरु सदाशिव वाघ	पंप ऑपरेटर	५	दिपक वसंत माळी	पंप ऑपरेटर
२	पोददार अमित अनिल	पंप ऑपरेटर	६	अमोल नरेंद्र अंपळकर	पंप ऑपरेटर
३	देवरे योगेश साहेबराव	पंप ऑपरेटर	७	ईश्वर विठठल बडगुजर	पंप ऑपरेटर
४	चेतन भानुदास सुडके	पंप ऑपरेटर	८	खैरनार रुपेश महेंद्र	पंप ऑपरेटर

३) गाळणी निरीक्षक संवर्गातील खालील कर्मचारी यांना जा क्र /धुमपा/आस्था १९४३ दि २५/०६/२०२० अन्वये ०६ महिने कालावधी करीता नियुक्ती देण्यात आली होती . सदर नियुक्तीची मुदत दि ११/१२/२०२० रोजी संपत आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव
१	अमोल मधुकर पाटील	गाळणी निरीक्षक	३	खैरनार अरुण राजाराम	गाळणी निरीक्षक
२	गणेश दिगंबर शेलार	गाळणी निरीक्षक			

४) गाळणी चालक संवर्गातील खालील कर्मचारी यांना जा क्र /धुमपा/आस्था १९४१ दि २५/०६/२०२० अन्वये ०६ महिने कालावधी करीता नियुक्ती देण्यात आली होती. सदर नियुक्तीची मुदत दि ११/१२/२०२० रोजी संपत आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव
१	रमेश वेडू बोरसे	गाळणी चालक	५	निलेश पंढरीनाथ करनाळे	गाळणी चालक
२	साळुंखे विनायक जगन	गाळणी चालक	६	किरण गोविंदा चव्हाण	गाळणी चालक
३	बडगुजर राहुल अंबादास	गाळणी चालक	७	राहुल नथ्थुसिंग जाधव	गाळणी चालक
४	महाजन उमेश रविंद्र	गाळणी चालक			

५) फीटर संवर्गातील खालील कर्मचारी यांना जा क्र/धुमपा/आस्था १९४० दि २५/०६/२०२० अन्वये ०६ महिने कालावधी करीता नियुक्ती देण्यात आली होती. सदर नियुक्तीची मुदत दि ११/०६/२०२० रोजी संपत आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव
१	इम्रान शेख इब्राहिम अजहर	फिटर (जा क्र /धुमपा/आस्था/१४४४ दि ४/३/२०२० अन्वये व्हॉलमन या पदावरुन फीटर या वर्ग करणेत आले आहे.)

६) विजतंत्री संवर्गातील खालील कर्मचारी यांना जा क्र /धुमपा/आस्था १९३९ दि २५/०६/२०२० अन्वये ०६ महिने कालावधी करीता नियुक्ती देण्यात आली होती . सदर नियुक्तीची मुदत दि २९/११/२०२० रोजी संपत आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव
१	रोहित रंजन मराठे	विजतंत्री	३	केशव मधुकर महाजन	विजतंत्री
२	पवार परेश गुलाबराव	विजतंत्री	४	विश्वजित विजय गुर्जर	विजतंत्री

७) विजतंत्री संवर्गातील खालील कर्मचारी यांना जा क्र /धुमपा/आस्था १९३९ दि २५/०६/२०२० अन्वये ०६ महिने कालावधी करीता नियुक्ती देण्यात आली होती. सदर नियुक्तीची मुदत दि २९/११/२०२० रोजी संपत आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव	अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदाचे नाव
१	देवेंद्र नामदेव सोनवणे	विजतंत्री	३	वराडे अक्षय राजेंद्र	विजतंत्री
२	रमन भिकु पाटील	विजतंत्री			

तरी वरील तक्त्यात दर्शविलेनुसार त्या त्या संवर्गातील कर्मचारी यांना सदयस्थितीत कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव विचारात घेवून तसेच त्यांच्या कामाची निकड लक्षात घेवून तसेच सदर कर्मचारी सद्य:स्थितीत कार्यरत असल्याने नियुक्तीचा कालावधी संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड करुन रु.८०००/- मात्र एकत्रित मानधनावर ०६ महिने कालावधीकरीता फेर

नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५३ (३) नुसार मे.स्थायी समितीच्या मंजुरीसाठी ठेवणेस मा.आयुक्त सो यांनी मान्य केले आहे. तरी सदरचा विषय मे. स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीनअहवालास अधिन राहून सदर अत्याश्यक सेवेतील मानधनावरील कर्मचारी यांना ठरावाच्या दिनांकापासून मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. उर्वरीत मागील मानधनाबाबत कार्यत्तर मान्यतेसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा.

सर्वानुमते मंजुर,
सही-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे
नगरसचिव कार्यालय
स्थायी समिती सभा क्रमांक २२ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
गुरुवार दिनांक २१/०१/२०२१
वेळ सकाळी ११-०० वाजता.

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक २१/०१/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री. सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली.स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
३	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य
४	श्रीमती उदासी कशीश गुलशन	सदस्या
५	श्री. मन्सुरी मुख्तार कासिम	सदस्य
६	श्रीमती माळी भारती अशोक	सदस्या
७	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
८	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
९	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
१०	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
११	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या
१२	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. शांताराम गोसावी	उपायुक्त
२	श्री. तुषार नेरकर	सहा.आयुक्त
३	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
४	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
५	श्री. डी.व्ही. जाधव	लेखाधिकारी
६	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
७	श्री. लक्ष्मण पाटील	सहा. आरोग्याधिकारी
८	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी

९	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल
१०	श्री. रजमान अन्सारी	प्र. कार्यालय अधिक्षक
११	श्री. आर.बी. सोनवणे	परवाना विभाग प्रमुख
१२	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१३	श्री. सी.सी. बागुल	ओव्हरसिअर पा.पु
१४	श्री. हेमंत पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१५	श्री. राजेंद्र माईनकर	भांडारपाल
१६	श्री. किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख
१७	श्री.प्रसाद जाधव	प्र अतिक्रमण विभाग प्रमुख
१८	श्री.एस.एन.देसले	लिपीक मनपा शि.मं.
१९	श्री.सुक्राम आत्या राऊत	मोटार वाहन विभाग

मा. सभापती — सन्मा. सदस्य मा.उपायुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सन्मा. सभापती सो. यांचेकडून आलेले अभिनंदनाचा प्रस्ताव

आपले धुळे शहरातील पत्रकार मित्र श्री जीवन आबा शेंडगे यांची महाराष्ट्र पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्ष पदावर झालेल्या अभिनंदनीय निवडीबाबत त्यांचा सत्कार व सन्मान स्थायी समितीच्या वतीने सभागृहात करावा असे सभापती यांनी सूचित केले आहे त्यानुसार त्यांचे अभिनंदन करण्यांतयेत आहे.

सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज

सन्मा.सदस्य श्री.युवराज चेत्राम पाटील, श्री.सुनिल वसंतराव सोनार व श्रीमती देवरे सुरेखा भागवत यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या आलेल्या विनंती अर्जावरुन रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३८ दिनाक २१/०१/२०२१

सन्मा.सदस्यश्री.युवराज चेत्राम पाटील,श्री.सुनिल वसंतराव सोनार व श्रीमती देवरे सुरेखा भागवत यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.सन्मा.सदस्यांच्या आलेल्या विनंती अर्जावरुन आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२१ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
(२२/१२/२०२०, ३१/१२/२०२०, ७/०१/२०२१)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ — इतिवृत्त वाचून कायम करावे.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३९ दिनाक २१/०१/२०२१

मागील स्थायी समिती सभा दि.२२/१२/२०२० रोजीचे स्थायी समिती ठराव नंबर१०८ ते १२४ अखेर क्रमश वाचून तसेच बैठकीत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील सभापतीनी दिलेले निर्णय वाचून कायम करण्यांत करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दि.३१/१२/२०२० रोजीचे स्थायी समिती ठराव नंबर १२५ ते १२७अखेर क्रमश वाचून तसेच बैठकीत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील सभापतीनी दिलेले निर्णय वाचून कायम करण्यांत करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दि.७/१/२०२१ रोजीचे स्थायी समिती ठराव नंबर १२८ अखेर क्रमश वाचून तसेच बैठकीत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील सभापतीनी दिलेले निर्णय वाचून कायम करण्यांत करण्यांत येत आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२२ — कोविड १९ कृति आराखडयांतर्गत कोविड केअर सेंटर व रुग्णालयांकरीता आवश्यक मनुष्यबळ विशेष पदभरतीद्वारे उपलब्ध करुन घेणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे — सदर प्रस्तावात तीन कर्मचाऱ्यांनी कोवीड मध्ये काम केल्याचे नमूद आहे याबाबत मी आरोग्य अधिकारी यांच्याशी चर्चा केली परंतु त्यांना सदर कर्मचारी कुठे कार्यरत आहे याबाबत सांगता आले नाही ही बाब अत्यंत खेदजनक आहे त्यांची गरज असेल तर त्यांना निश्चित सामावून घ्यावे त्यांच्या कामाचे स्वरूप आता त्यांना सामावून घेण्यास हरकत नाही तथापि आरोग्य अधिकाऱ्यांना हा विषय माहीत नाही ही बाब गंभीर स्वरूपाची आहे

म. सभापती- — सदर कर्मचारी हे करोना काळात कार्यरत होते त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे काम केलेले आहे व त्यांनी समाधानकारक काम केले असल्याचा दाखला प्रशासनाने दिलेला आहे सद्यस्थितीत महापालिकेस कॉम्प्युटर ऑपरेटरची गरज आहे व ते दहा हजार रुपये मानधनावर काम करण्यास तयार आहेत त्यामुळे त्यांचा विचार होणे गरजेचे आहे याबाबत आस्थापना विभागाने खुलासा करावा

म.कार्यालयीनअधिक्षक — सदर कर्मचाऱ्यांना दोन महिन्यासाठी नियुक्ती दिली होती व त्यांना कामाच्या आवश्यकते नुसारमुदतवाढ दिली त्यानंतर त्यांना कमी करण्यात आले आता त्यांच्या कामाची आवश्यकता असल्याने पुनश्च माननीय आयुक्त यांच्या आदेशाने प्रस्ताव मुदतवाढ देण्यासाठी सादर करण्यात आलेला आहे

म. सभापती — कर्मचाऱ्यांच्या कामाची आवश्यकता लक्षात घेता त्यांना मुदतवाढ देण्यास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४० दिनाक २१/०१/२०२१

धुळे शहरातील कोविड १९ या साथरोगाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी व रुग्णांवर उपचार करण्यासाठी धुळे महानगरपालिका अंतर्गत स्वतंत्र रुग्णालय नसल्यामुळे शासनाच्या आदेशानुसार कोविड केअर सेंटर (CCC) व डेडिकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर (DCHC) ची सेवा चालु करणे

आवश्यक होते त्याकरीता उक्त नमुद दैनिकांमध्ये पदभरती बाबत मा.जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडील पत्र क्र.भुस/ १/ कोविड-१९/ कावि /३५/२०२०दि.१८/०६/२०२०अन्वये दैनिक पुण्यनगरी वृत्तपत्रातील दि.१४/०६/२०२० रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

तरी प्राप्त अर्जानुसार शैक्षणिक अर्हता व त्यामधील गुणांकन तसेच मुलाखतीअंती पद निहाय **डीईओ** या पदांकरीता निवड समिती मार्फत खालील उमेदवारांची निवड होऊन त्यांना जा.क्र. धुमपा /आस्था /२२६३ दि.०५/०८/२०२०अन्वये ३ महिन्यासाठी नियुक्ती आदेश देण्यात आले होते. सदर नियुक्तीची मुदत संपुष्टात आली आहे.

अ.क्र.	अधिकारी/कर्मचारी नांव	पद	वेतन	आदेश क्र./दिनांक
१	पवन किशोर कानडे	डी.ई.ओ.	१७,०००/-	२२६३ दि.०५/०८/२०२०
२	मिलींद रविंन्द्र नगराळे	डी.ई.ओ.	१७,०००/-	२२६३ दि. ०५/०८/२०२०
३	भाग्यश्री प्रकाश मोरे	डी.ई.ओ.	१७,०००/-	२२६३ दि. ०५/०८/२०२०

सदर संगणक लिपीक यांचे दि.०३/१२/२०२०अहवालनुसार डी.ई.ओ.यांचे संगणक हाताळणी बाबत १० मिनीटांचे प्रात्यक्षीक घेणेत आले असुन त्यात ते उत्तीर्ण झालेले आहेत.भाग्यश्री प्रकाश मोरे, मिलींद रविंन्द्र नगराळे, पवन किशोर कानडे यांचा अर्जान्वये उक्त डीईओ यांनी अर्ज सादर करुन रुपये १७,०००/- ऐवजी रुपये१०,०००/-मात्र वर नियुक्ती झाल्यास काम करणेस तयार असले बाबत नमुद केले आहे.म.आयुक्त सो यांचेशी झालेल्या चर्चेनुसार सदर डीईओ यांचे मानधन १७,०००/- ऐवजी १०,०००/-मानधनवर ६ महिन्याकरीता नियुक्ती करणेस मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवाल लक्षांत घेता सदर कर्मचा-यांच्या कामाची आवश्यकता असल्याने प्रस्तावात नमूद कर्मचा-यांना कार्यालयीन अहवालास अधिन राहून रु. १००००/- मानधनावर ६ महिन्यांकरता नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२३ हनुमान टेकडी जलशुद्धीकरण केंद्र येथील फिल्टर दुरुस्ती करणे व मिडियाची रेती बदलणे बाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे विषयास मान्यता देण्यांत येत आहे.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४१ दिनाक २१/०१/२०२१

हनुमान टेकडी जलशुद्धीकरण केंद्र येथील फिल्टर दुरुस्ती करणे व मिडियाची रेती बदलणे कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं.६३ दि. १८/०९/२०२० मा.आयुक्त, धुळे महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दिनांक १९/०८/२०२० अन्वये उक्त कामा बाबत रक्कम रु.४३,३७,३९१/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा, धुळे यांचे पत्र क्र.७११ दिनांक ०९/१०/२०२० अन्वये रक्कम रु.४३,३७,३९१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./३८८ दि. २०/१०/२०२० दि.२१/१०/२०२० रोजीचा दै. दिव्य मराठी / समाज सारथी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि. १९/११/२०२० अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

अ.क्र.	कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव	दिलेले निविदा दर	शेरा
१	**आशिष एम. पटवारी**	**शे ०.९९% कमीने**	**सर्वात कमी दर**
२	श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	
३	हिंद कन्सट्रक्शन	शे ३.५१% जास्तीने	

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **श्री.आशिष एम. पटवारी,** धुळे यांचे शे.०.९९% कमीने दर आलेले आहे. तरी उक्त **श्री.आशिष एम. पटवारी, धुळे** यांचे दर हे जास्तीचे आलेले असल्याने संबंधितांना इकडील जा.क्र./पा.पु.वि./ ६३२ दि. ०४/०१/२०२१ अन्वये दरवाटाघाटीस बोलविले सदर ठेकेदार यांनी सदरचे काम शे.०.९९% कमीने ऐवजी शे.१.९९% कमीने करणेस तयारी दर्शविलेली आहे.

तरी दर वाटाघाटी अंती **श्री.आशिष एम.पटवारी, धुळे** यांनी दि. ०५/०१/२०२१ रोजी दिलेले पत्रानुसार दर शे.१.९९% कमीने करणेस संमती दर्शविलेली आहे. तथापि सदरचे काम शे.१.९९% कमीने दराने करणे बाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केलेले आहे. सबब सदर काम शे.१.९९% कमी दराने आलेले असल्याने यांच्या दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून याकामी ठेकेदार श्री. आशिष एम. पटवारी यांच्या निगोसिएशन अंती आलेल्या दर शे. १.९९% कमीने दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२४ धुळे महानगरपालिकेच्या जेसीबी मशिनवरील मानधन तत्वावर नियुक्त वाहन चालक यांची मुदत संपल्याने त्यांना पुनश्च मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. भारती माळी आताच आपण जेसीबी वाहनचालकांच्या विषय घेतला आहे विषय पत्रिकेवर साहेबराव पाटील हा व्यक्ती यावेळेस आपल्याकडे खूप मोठ्या प्रमाणावर काम होते त्यावेळेस चांगल्या प्रकारे काम केले आहे अशा कठीण परिस्थितीत त्याने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता सतत काम करत राहिला त्याला कुठल्याही सेवा देण्यात आली नाही उदाहरणार्थ वगैरे त्यावेळेस त्याला गरज होती म्हणून त्याला बोलून घेतले व व जेसीबी वर ड्रायव्हर म्हणून काम करायला लावले त्याला व्हेरिफाय करण्यात आले आहे असे समजते की त्याच्यावर पत्ते खेळण्याचा गुन्हा दाखल झाला आहे असं मला समजलं मला असे वाटते की पत्ते खेळण्याचा गुन्हा एवढा मोठा असू शकत नाही त्यांनी ज्या वेळेस आजच्या काळात मोठा धोका होता त्यावेळेस त्यांनी आपल्याकडे काम केले आता त्याला प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले की तुम्ही घरी थांबायला हरकत नाही मला असे वाटते की ह्या मनुष्याला पुनश्च कामावर हजर करा एवढी माझी विनंती आहे प्रशासनाने ज्या वेळेस काम करीत होता त्यावेळेस व्हेरिफाय केले नाही का

सभापती महोदय मी सांगते धुळे मनपाच्या बऱ्याच कर्मचाऱ्यांवर केसेस आहेत हा तर कॉन्ट्रॅक्ट बेस वर काम करतो जर एवढ्याश्या कारणांमुळे जर त्याला कमी करता त्याच्या मागे परिवार आहे मुलेबाळे आहेत तरी त्याला कामावर घेण्यात यावे ही विनंती

म.कार्यालय अधीक्षक — याबाबत ११ नोव्हेंबर २००७ चा शासन निर्णय असून यात नियुक्त कर्मचाऱ्यांना चारित्र्य पडताळणी दाखला आवश्यक असतो व त्यांचा चारित्र्य पडताळणी दाखला घेण्यात यावा असे नमूद आहे जर त्यांच्यावर गुन्हा दाखल असेल तर त्यांना नियुक्ती देऊ नये असे शासन निर्णयात नमूद असल्याने मुदतवाढ देऊ नये असे मा. आयुक्त सो. यांनी आदेशित केले आहे.

म.सभापती — सदर कर्मचाऱ्याने कार्यकाळात काम केले त्यावेळेस त्याच्यावर गुन्हा होता का चारित्र्य दाखला केव्हा घेण्यांत आला.

म.कार्यालय अधीक्षक — तीन महिन्यात घेण्यात आला.

म.सभापती — त्याने किती महिने काम केले

म.कार्यालय अधीक्षक — सहा महिने काम केले

म.सभापती — त्याच्या तीन महिन्यात चारित्र्य दाखला आला तरी तुम्ही त्याला कामावर का ठेवले

म.कार्यालय अधीक्षक — परत मुदतवाढ देताना तसे केले

म.सभापती — तुम्ही तुमचे नियम नका करू जर तुम्ही शासनाचा जीआर दाखवला आहे तर तुम्हाला तीन महिन्यांमध्ये चरित्र दाखला मिळाला होता तरी तुम्ही त्याला कोरोनाच्या कार्यकाळात मध्ये बेकायदेशीररीत्या सहा महिने त्याच्याकडून काम करून घेतले त्याची जबाबदारी कोणाची आहे त्यांना तीन महिने कामावर का ठेवले दाखला मिळूनही त्यांना कामावर ठेवले होते त्यांच्याकडून काम करून घेतले ही जबाबदारी कोणाची आहे माझ्या मते या कायद्यात व या कलमान्वये फक्त दंडाची शिक्षा आहे अद्याप त्यांचा गुन्हा सिद्ध झालेले नाही त्यांनी केलेल्या कामाचा विचार करता त्यांना समाविष्ट करून घेण्यास हरकत नाही गुन्हा सिद्ध झाल्यावर आवश्यक ती कार्यवाही करावी. जोपर्यंत त्याच्यावर गुन्हा सिद्ध होत नाही तोपर्यंत त्याला कामावर समाविष्ट करून घ्या नवीन टिपणी करून मंजुरी द्या या गोष्टी आयुक्त सो यांच्या निदर्शनास आला

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४२ दिनाक २१/०१/२०२१

धुळे महानगरपालिका, आरोग्य विभागात **"जे.सी.बी. वाहन चालक"** या पदाकरीता अन्वये मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार संदर्भिय क्र २ अन्वये सामाजिक एकुण ०२ पदे भरणेसाठी दैनिक आपिला महाराष्ट्र या वृत्तपत्रात दि १६/०५/२०२० रोजी कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती

प्राप्त अर्जानुसार जे.सी.बी. वाहन चालक या पदांकरीता निवड समिती मार्फत खालील उमेदवारांची निवड होऊन त्यांना ६ महिन्यासाठी नियुक्ती आदेश देण्यात आले होते. सदरजे.सी.बी. वाहन चालक यांचे दि. १०/१२/२०२० रोजी नियुक्तीची मुदत संपुष्टात आली आहे.

श्री.राहुल नाना देसले व श्री. जिजाबराव साहेबराव पाटील यांनी मला कामाची आवश्यकता असुन मी माझे काम चांगले करीत आहे. तरी मला मुदतवाढ मिळणेस दि. १५/१२/२०२० रोजी विंनती अर्ज सादर केला आहे. तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी सदर जे.सी.बी. वाहन चालक यांची आवश्यकता आवश्यकता असलेबाबत नमुद केले आहे.

श्री. जिजाबराव साहेबराव पाटील यांचेवर धुळे तालुका पोलीस स्टेशनच्या अभिलेखावर भाग-६ गुरनं २८/२०१७ मुंबई जुगार कायदा कलम १२/अ प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदरची केस न्यासप्रविष्ठ असलेबाबत नमुद केले आहे.

श्री. जिजाबराव साहेबराव पाटील यांचेवर गुन्हा दाखल असल्याने फक्त श्री. राहुल नाना देसले यांना मानधन तत्वावरील जे सी बी वाहन चालक या पदाचा नियुक्तीचा कालावधी संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड करुन रु.१२,०००/- मात्र एकत्रित मानधनावर ०६ महिने

कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत सदरचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मंजुरीसाठी मे स्थायी समिती पुढे ठेवणेस मा.आयुक्तसो यांनी श्री. जिजाबराव साहेबराव पाटील यांचेवर गुन्हा दाखल असल्याने यांना मुदत वाढ देणेत येऊ नये असे नमुद केले आहे. तरी सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर करण्यांत आलेला आहे.

कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार जे.सी.बी. वाहन चालक श्री. राहुल नाना देसले यांना नियमाप्रमाणे सेवा खंड करुन करुन रु.१२,०००/- मात्र एकत्रित मानधनावर ०६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे. तसेच वाहन चालक श्री.जिजाबराव साहेबराव पाटील यांच्यावर किरकोळ स्वरुपाचा गुन्हा असून त्यांच्या कामाची आवश्यकता व त्यांनी केलेले काम लक्षांत घेता त्यांना नियमाप्रमाणे मुदत वाढ देणेबाबत प्रशासनाने उचित कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२५ पाणीपुरवठा विभगाकडील रसायन तज्ञ या संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर भरणेत आले होते त्यांची मदुत संपल्याने त्यांना पुनश्च मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती सदर विषयात उपायुक्त यांनी मुदतवाढ देण्यात येऊ नये असा उल्लेख या टिपणीत केला आहे त्यांना मुदत वाढ नाही दिली तर आपल्याकडे पर्यायी व्यवस्था काय आहे.या ठिकाणी खुलासा करावा.

म.कार्यालय अधीक्षक सदर विषयाबाबत पाणीपुरवठा विभागाकडून अहवाल प्राप्त झालेला आहे रसायन तज्ञ यांना पुढील कामाची व्यवस्था होईपावेतो मुदत वाढ देण्यात यावी अशी शिफारस केली होती सध्या दोन रसायन तज्ञ आहेत वलवाडी शिवारात एक प्लांट आहे तेथे ठेकेदारामार्फत कर्मचारी कामावर ठेवले आहेत.

म.उपायुक्त नवीन निविदा करण्यास काय अडचण आहे या विषयावर संशय येईल अशा पद्धतीचा विषय आहे तुम्हाला सांगितले होते जाहिरात काढायची टिपणी का ठेवली नाही या विषयाचे काही हो नवीन जाहिरात काढा.

म.सभापती वलवाडी येथील प्लँटला प्रदीप चव्हाण, शिंदे सो व मी त्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली त्या ठिकाणी हर्षदा गवळे म्हणून काम करतात रसायन तज्ज्ञ म्हणून २०१६ पासून काम करतात त्यावेळेस ग्रामपंचायत होती आणि ग्रामपंचायतीच्या माध्यमातून त्या काम करीत होत्या. आपण जाहिरात काढून मी ज्यावेळेस प्रतिक्रिया दिली त्यांची सेवा देणार आहे किंवा काय मला माहित नाही परंतु ते रसायनतज्ज्ञ होते ते त्या ठिकाणी काम करीत आहे आणि शैक्षणिक पात्रतेनुसार या पदावर पर्यायी व्यवस्था होईपर्यंत काम करीत आहे त्यांना पर्याय म्हणून नियुक्त करू शकतो आधी सेवा देत आहे त्यांचा विचार कराव.

कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार कु.श्रध्दा मधुकर पाटील व विशाल अशोक गोसावी यांना मानधन तत्वावरील कालावधी संपुष्टात आल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड करुन रु.२०,०००/- मात्र एकत्रित मानधनावर नवीन भरती प्रक्रिया पुर्ण होई पावेतो महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तथापि सदर सेवा अत्यावश्यक स्वरुपाची असून कार्यप्रणालीत व्यत्यय निर्माण होणार नाही यास्तव तसेच वलवाडी ग्रामपंचायत येथील यापूर्वी नियुक्त रसायन तज्ञ कु. हर्षदा गवळे हया अनेक

दिवसांपासून कार्यरत आहेत. त्यांच्याकडे नियमानुसार आवश्यक ती शैक्षणिक पात्रता आहे. त्यांच्या कामाचे स्वरुप पाहता त्यांनाही रु. 20000/- मात्र एकत्रित मानधन देणेबाबत प्रशासनाने नियमानुसार तपासूनकार्यवाही करावी. तसेच नवीन भरती प्रक्रिया राबवितांना यापूर्वी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना त्यांच्या कामाचा अनुभव लक्षांत घेता उचित प्रक्रिया करुन प्राधान्यक्रमाने विचार करण्यांत यावा.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४३ दिनाक २१/०१/२०२१

धुळे महानगरपालिका, पाणीपुरवठा विभागात **"रसायन तज्ञ (Chemist)"** या पदाकरीता मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार संदर्भिय क्र २ अन्वये सामाजिक आरक्षणानुसार अनु. जमाती ०१ व खुला प्रवर्गाकरीता ०१असे एकुण ०२पदे भरणेसाठी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात दि ३१/८/२०२० रोजी कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

शैक्षणिक पात्रतेनुसार निवड समितीमार्फत पात्र उमेदवारां कु.श्रध्दा मधुकर पाटील व श्री. गोसावी विशाल अशोक यांना रु. २०,०००/- मात्र एकत्रित मानधनावर सहा महिन्यांकरिता **"रसायन तज्ञ (Chemist)"** या पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार नियुक्ती आदेश देणेत आला होता.सदर नियुक्तीचा कालावधी दि.१/१२/२०२० रोजी संपुष्टात आलेला आहे.

संदर्भिय पाणी पुरवठा विभागाकडील संदर्भिय अहवालात कोविड-१९ लागण सिध्द झाल्याने शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार तातडीने करावयाच्या उपाययोजनांमध्ये पाणी पुरवठाबाबत प्रत्येक जलकुंभावरील नियोजन सांभाळणे, पाणीपुरवठा सुरळीत करणेबाबत कार्यवाही करणे तसेच पाणी शुध्दीकरणासाठी रसायने व्लोरी टर्नर, ब्लिचींग पावडर ॲलम, मीठ चा पुरवठा मुबलक उपलब्ध करणे कामी कार्यवाही करणे तसेच पाण्याचे शुध्दीकरण करुन तपासणी अहवाल बाबत कार्यवाही करणे अशी महत्वाची कामे या कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहेत. धुळे महानगरपालिका आस्थापना विभागामार्फत नवीन मानधनावरील रसायन तज्ञ यांची भरती प्रक्रीया होईपावेतो किंवा ६ महिने मुदतवाढ देणेबाबत नमुद केले आहे.तथापि म. उपायुक्त सो यांनी नवीन जाहिरात प्रसिध्द करुन नवीन भरती करणे यावी तसेच मुदत वाढ देणेत येऊ नये असे मत दिलेले आहे.

उक्त बाबत म.अति.आयुक्त यांनी सादर कर्मचाऱ्यांना मुदतवाढ न दिल्यास त्यांच्या कामाची पर्यायी व्यवस्था आहे काय? याबाबत विचारणा केली असता पाणी पुरवठा विभागाकडील क. अभियंता यांनी अहवाल सादर कले असून सदर अहवालात असे नमुद केले की, सदर केमीस्ट पाणी पुरवठा जलशुध्दीकरण केंन्द्रासाठी अत्यंत महत्वाचे असल्याने नवीन भरती प्रक्रिया पूर्ण होईपावेतो सदर केमीस्ट यांना मुदतवाढ देणेस हरकत नाही.

तरी वरील कर्मचारी हे मानधन तत्वावरील कालावधी संपुष्टात आल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड करुन रु.२०,०००/- मात्र एकत्रित मानधनावर ०६ महिने कालावधीकरीता कु. श्रध्दा मधुकर पाटील व श्री.गोसावी विशाल अशोक यांना फेर नियुक्ती देणेबाबत सदरचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मंजुरीसाठी मे स्थायी समिती पुढे ठेवणेस मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. तरी सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार कु.श्रध्दा मधुकर पाटील व विशाल अशोक गोसावी यांना मानधन तत्वावरील कालावधी संपुष्टात आल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड करुन रु.२०,०००/- मात्र एकत्रित मानधनावर नवीन भरती प्रक्रिया पुर्ण होई पावेतो महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तथापि सदर सेवा अत्यावश्यक स्वरुपाची असून कार्यप्रणालीत व्यत्यय निर्माण होणार नाही यास्तव तसेच वलवाडी ग्रामपंचायत येथील यापूर्वी नियुक्त रसायन तज्ञ कु. हर्षदा गवळे हया अनेक दिवसांपासून कार्यरत आहेत. त्यांच्याकडे नियमानुसार आवश्यक ती शैक्षणिक पात्रता आहे. त्यांच्या कामाचे स्वरुप पाहता त्यांनाही रु. 20000/- मात्र एकत्रित मानधन देणेबाबत प्रशासनाने नियमानुसार

तपासूनकार्यवाही करावी. तसेच नवीन भरती प्रक्रिया राबवितांना यापूर्वी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना त्यांच्या कामाचा अनुभव लक्षांत घेता उचित प्रक्रिया करुन प्राधान्यक्रमाने विचार करण्यांत यावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- १२६ प्रभाग क्रं. ७ मध्ये आर्थिक दुर्बल घटक योजनेअंतर्गत महाले रावसाहेब यांच्या घरापासून ते किरण पाकळे यांच्या घरापर्यंत तसेच हेमंत लॉन्ड्री ते गवळी वाडा ते कर्मयोगी बंगल्यापर्यत चा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करण्यांचे एकुण एस्टीमेट रु.४९३९४१०/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास आथिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४४दिनाक २१/०१/२०२१

धुळे महानगरपालिका,धुळे प्रभाग क्रमांक 7 मध्ये आर्थिक दुर्बल घटक योजनेअंतर्गत प्रभाग क्रमांक 7 मध्ये महाले रावसाहेब यांच्या घरापासून ते किरण पाकळे व प्रभाग क्रमांक 7 हेंमत लॉर्डी ते गवळी वाडा ते कर्मयोगी बंगल्यापर्यंताचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणाची मागणी केलेली आहे. त्यानुसार त्या भागत समक्ष पाहणी केली असता, सदरचा रस्ता यापुर्वी सुमारे 8 ते 10 वर्षापुर्वी झालेला आहे. त्यामुळे ठिकठिकाणी मोठया प्रमाणावर खडडे पडून रस्ता खराब झालेला आहे. तयामुळे नागरीकांना दळणवळणास व्यत्यय निर्माण होतो. या कारणास्तव सदरचा रस्ता करणे अत्यंत आवश्यक आहे. उक्त कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. सदरचे अंदाजपत्रकातील नमुद बा.बी.सा.बां.विभाग दरसुचीनुसार केलेले आहे. व ते योग्य व वाजवी आहे.वरील रस्तेबाबत येण्या-या अंदाजपत्रकीय रक्कम 49,39,410/- मात्रच्या खर्च अपेक्षित आहे.

तरी अंदाजपत्रकीय रक्कम रू.49,39,410/- मात्रच्या आर्थिक प्रशायकीय व तांत्रिक मंजुरी देवून सदरचा प्रस्ताव मे.स्थायी समितीकडे सादर करणेस्तव मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावात नमूद काम आर्थिक व दुर्बल घटक योजने अतंर्गत घेण्यांस व येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका,धुळे
नगरसचिव कार्यालय
स्थायी समिती सभा क्रमांक २३ चे इतिवृत्त

धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह
सोमवार दिनांक १/०२/२०२१
वेळ सकाळी ११-०० वाजता.

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज सोमवार दिनांक १/०२/२०२१ रोजी सकाळी १०-०० वाजता **मा.श्री. सुनिल तुळशिराम बैसाणे, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

अ.क्रं.	सदस्यांचे नांव	हुद्दा
१	श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम	सभापती
२	श्री. पाटील युवराज चैत्राम	सदस्य
३	श्री. सोनार सुनिल वसंतराव	सदस्य
४	श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद	सदस्या
५	श्री. खताळ संतोष छगन	सदस्य
६	श्रीमती उदासी कशीश गुलशन	सदस्या
७	श्रीमती पाटील मंगला सुरेश	सदस्या
८	श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश	सदस्या
९	श्री. मासुळे अमोल पावबा	सदस्य
१०	श्री. देवरे कमलेश नारायण	सदस्य
११	श्रीमती पठाण हिना अस्लम	सदस्या
१२	श्री. सईद बेग हाशम बेग	सदस्या
१३	श्रीमती. अन्सारी फातमा नुरुल अमीन	सदस्या

उपस्थित अधिकारी गण

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	हुद्दा
१	श्री. गणेश गिरी	अति. आयुक्त
२	श्री. तुषार नेरकर	सहा.आयुक्त
३	श्री. महेंद्र परदेशी	नगररचनाकार
४	श्री. मनोज अरविंद वाघ	प्र.नगरसचिव
५	श्री. डी.व्ही. जाधव	लेखाधिकारी
६	श्री. के.एन. शिंदे	अभियंता
७	डॉ. महेश मोरे	आरोग्याधिकारी

८	श्री. चंद्रकांत जाधव	सहा. आरोग्याधिकारी
९	श्री. बी. एस. रनाळकर	सहा.कर मूल्य निधारण अधिकारी
१०	श्री. प्रदीप नाईक	लेखापाल
११	श्री. एन. पी. सोनार	इस्टेट मॅनेजर
१२	श्री.आर. बी. सोनवणे	परवाना विभाग प्रमुख
१३	श्री.एन.के. बागुल	विद्युत अभियंता
१४	श्री. राजेश गायकवाड	मुख्य लिपीक मनपा शिक्षणमंडळ
१५	श्री. हेमंत पावटे	ओव्हरसिअर बांधकाम विभाग
१६	श्री. किशोर सुडके	बाजार विभाग प्रमुख
१७	श्री.प्रसाद जाधव	प्र अतिक्रमण विभाग प्रमुख
१८	श्री.सुक्राम आत्या राऊत	मोटार वाहन विभाग

मा. सभापती — सन्मा. सदस्य मा.अति. आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

आज विद्यमान स्थायी समिती सभापती यांचे कार्यकाळातील शेवटची सभा आहे. गेल्या वर्षा भरात मा.सभापती सो.यांनी आपल्या सर्वाच्या सहकार्याने या शहराच्या विकासासाठी माध्यमातून अनेक चांगले महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. तरी महानगरपालिकेच्या वतीने मा. सभापती महोदय यांचे तसेच स्थायी समितीचे सर्व सदस्यांचे प्रातिनिधीक स्वरुपात मा. गणेश गिरी सो.यांचे हस्ते हार्दीक पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यांत येत आहे.सभापती महोदयाबरोबर स्थायी समिती वरुन निवृत्त होणारे सन्मा.सदस्यांचे मी शब्द सुमनाव्दारे आभार व्यक्त करतो. तसेच सभापती महोदयांकडून एक सुचना आलेली आहे. स्थायी समितीचे सदस्य श्री. संतोषजी खताळ यांचा उदया वाढदिवस आहे तर आजच त्यांचे देखील पुष्पगुच्छ देऊन त्यांना शुभेच्छा देण्यांत आल्या.

म. सभापती — आजच्या स्थायी समितीच्या शेवटच्या सभेस उपस्थित सर्व सन्मा. सदस्य अधिकारी गण , गेल्या वर्ष भरापासून स्थायी समितीच्या माध्यमातून सभेपुढे आलेले विविध विभागाकडील शहराचे विकासाचे निर्णय घेण्यांत आले. सदर निर्णय घेत असतांना सत्ताधारी तसेच विरोधी पक्षातील सर्व सदस्यांनी मला नेहमीच मोलाचे सहकार्य केले आहे. तसेच गेल्या वर्षभरात मला सर्व अधिकारी श्री. गणेशजी गिरी सो. श्री. शांताराम गोसावी सो.कैलासजी शिंदे, श्री. महेंद्र परदेशी सो. आदि सर्व अधिका-यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. त्या सर्वांचे आभार व ऋण व्यक्त करतो. आमच्या भाजप पक्षश्रेष्ठीनी माझ्यावर जो विश्वास टाकून स्थायी समिती सभापती पदाची जबाबदारी माझ्यावर टाकली त्याबद्दल सर्व पक्षश्रेष्ठीचे आभार व्यक्त करतो.

तसेच महानगरपालिकेचे कामकाज चालवित असतांना नगरसचिव श्री. मनोज भाऊ वाघ यांचे देखील विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे. त्यांचे देखील मी आभार व्यक्त करतो.तसेच पत्रकार बांधव व छायाचित्रकार बांधव यांचे देखील वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे. त्या सर्वांचे आभार व ऋण व्यक्त करतो.

महानगरपालिकेचे हित पाहत असतांना माझ्याकडून अनावधनाने कोणाचा अपमान केला गेला असेल त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो.

सन्मा.सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज

सन्मा.सदस्या श्रीमती माळी भारती अशोक व श्रीमती देवरे सुरेखा भागवत यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या आलेल्या विनंती अर्जावरुन रजा मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४५ दिनाक ०१/०२/२०२१

सन्मा.सदस्य श्रीमती माळी भारती अशोक व श्रीमती देवरे सुरेखा भागवत यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या आलेल्या विनंती अर्जावरुन आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२७ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.१४/१/२०२१, २१/१/२०२१)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.संतोष खताळ — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.अमोल मासुळे — मागील सभेच्या इतिवृत्तात मानधनावरील तांत्रिक कर्मचारी नियुक्ती बाबत प्रस्ताव सादर झालेला होता.सदरचा प्रस्ताव त्यांची मुदत संपल्यानंतर सुमारे १ ते दीड महिन्याने स्थायी समिती समोर आला.सदर कर्मचा-यांनी १/२ महिना विना मानधन काम केलेले आहे. वास्तविकता मुदत संपण्याच्या आधी प्रस्ताव सादर करणे विभागाचे काम आहे. त्यांच्या १ -२ महिन्याच्या मानधनास जबाबदार कोण याबाबत त्यांच्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेवून कार्यवाही करावी.

म. सभापती सदर कर्मचा-यांनी मुदत संपल्यानंतर देखील काम केलेले आहे.त्यामुळे त्यांच्या त्या कालावधीचे मानधन मिळणे आवश्यक आहे. यासाठी आस्थापना विभागामार्फत संबंधित कालावधीचे मानधन देण्यांचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४६ दिनाक ०१/०२/२०२१

मागील स्थायी समिती सभा दिनांक १४/१/२०२१ चे ठराव नं.१२९ ते १३७ अखेर क्रमश वाचून तसेच बैठकीत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील सभापतीनी दिलेले निर्णय वाचून कायम करण्यांत येत आहे

तसेच स्थायी समिती दिनांक २१/१/२०२१ चे ठराव १३८ ते १४४ अखेर क्रमश वाचून तसेच बैठकीत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील सभापतीनी दिलेले निर्णय वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- १२८ मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यत मंजुरी दिलेल्या कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर.
(दि.११/१२/२०२० ते १५/१/२०२१) अखेर

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ विषय मंजुर करण्यांत यावा.

म. अमोळ मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. युवराज पाटील विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती मा. आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु. ५ लाख ते २५ लाखापर्यत मंजुरी दिलेल्या बांधकाम विभागाकडील कार्यादेशाची वाचून माहिती देण्यांत आली.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४७ दिनाक ०१/०२/२०२१

धुळे महानगरपालिका बांधकाम विभागाकडुन होत असलेल्या विकास कामासाठी दि. ११/१२/२०२० ते १५/०१/२०२१ अखेर विकास कामांची निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी

सोबत जोडली आहे.कृपया उक्त यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेली आहे.

धुळे महानगरपालिका धुळे

(बांधकाम विभाग)

दिनांक :- ११/१२/२०२० ते १५/०१/२०२१ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

अ.क्र.	कार्यादेश क्रमांक	दिनांक	कामाचे नाव	रक्कम	निधी
१	२२६	११/१२/२०२०	प्र.क्र.३ मध्ये अडविभाडीक यांच्या घरापासून ते सुशीनाल्या पावेतो बंदिस्त गटार करणे.	९,७७,७३१/-	मनपा निधी अंतर्गत
२	२६२	२१/१२/२०२०	प्र.क्र.१२ हाजी नगर भागात इसाक मशिदी पासून ते टेलर यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे.	१४,९९,६०९/-	रस्ता अनुदान निधी अंतर्गत
३	२६५	२४/१२/२०२०	धुळे मनपा हद्दीतील प्र.क्र.१३ मध्ये मास्टर कॉलनी येथेअसलम मुक्ली घरापासून ते एजाज सोडा वॉटर वाले यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटकरण करणे.	९,९६,९२८/-	म.आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत
४	२६६	२४/१२/२०२०	प्र.क्र.१३ मध्ये मास्टर कॉलनी येथे रातराणी हॉटेल पासून ते जाकीर सर यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करण करणे.	९,९६,२७८/-	म.आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत
५	२७७	२९/१२/२०२०	प्र.क्र.१७ मधील विखेनगर ग.नं.५ वी गल्ली (चक्कीचा गल्लीत) काशिनाथ पाटील यांचे घर ते श्रीराम निकम यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे व गटार करणे.	९,९४,४९१/-	मनपा निधी अंतर्गत
६	२७८	३१/१२/२०२०	जुना प्र.क्र.२३ नवीन प्र.क्र. १३ मध्ये मोबीन निहाल पहेलवान घर ते सार्वजनिक शौचालय पावेतोचा रस्ता काँक्रीट करणे.	९,९९,३२८/-	आर्थिक दुर्बल घटक निधी अंतर्गत
७	२७९	३१/१२/२२०	प्र.क्र.१४प्रताप नगर भागात सर्व्हे नं.६४४/१ वी ओपनस्पेस विकसित करणे..	६,६३,०६६/-	मनपा निधी अंतर्गत
८	२८०	३१/१२/२०२०	प्र.क्र.१३मध्ये दिलदार नगर भागात रस्ता काँक्रीट करणे.	९,९५,५१८/-	मनपा निधीअंतर्गत
९	२८१	३१/१२/२०२०	प्र.क्र.२जे.वी.वडगुजर कॉलनी भागातील प्लॉट नं. ३१ ते प्लॉट नं.४७ पावेतो रस्ता डांबरीकरण करणे.	९,९६,४३५/-	मनपा निधी अंतर्गत
१०	२९०	१२/०१/२०२१	नटराज टॉकीज मागे जलाराम बाप्पा मंदिरा जवळ वॉल कंपाऊंड व पेव्हर ब्लॉक बसविणे.	९,९९,७०६/-	म.आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत
११	२९६	१५/०१/२०२०	छत्रपती राजे संभाजी महाराज पुतळा उभारणेकामी चबुतरा बांधणे बाबत.	२१,३९,११७/-	मनपा निधी अंतर्गत
१२	२९७	१५/०१/२०२०	प्र.क्र.१४ मध्ये मारोती नगर जवळ अंबिका नगर मधील मिळकत क्र.४७२/३ ब -३ चैकी प्लॉट क्र.२१ मध्ये सभागृहाचे बंधकाम करणे.	९,९९,९८८/-	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत

उक्त यादीचे वाचन करुन सभागृहास माहिती देण्यांत आली.

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळ

विषय क्रमांक :- १२९ धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्र.७ मधील मोगलाई मस्जिद ते गवळी वाडा कमान जुना साक्री रोड मोगलाई परिसर येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन नसल्याने सदर ठिकाणी पाईप लाईन टाकण्यांचे काम तांतडीने विना निविदा करुन घेण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रुपये ६,९४,४६४/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२)(२) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ विषय मंजुर करण्यांत यावा.

म. अमोळ मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. युवराज पाटील विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४८ दिनाक ०१/०२/२०२१

धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्र.७ मधील मोगलाई मस्जिद ते गवळी वाडा कमान जुना साक्रीरोड मोगलाई परिसर येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन नसल्याने पिण्याच्या पाण्याअभावी मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे असे सदर भागातील नागरिकांनी मोर्चाद्वारे म.सभापती यांच्या कार्यालयात येवून तक्रार दिलेली आहे. तरी सदरचा भागात समक्ष पहाणी करून ६" पाईप लाईन टाकणे कामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.६,९४,४६४/- मात्र येणार आहे.

तरी सदरचे कामे हे नागरिकांचा पिण्याचा पाण्याच्या प्रश्न लक्षात घेता सदर काम करणे आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा श्री. संजय दगडु गायकवाड, ठेकेदार यांचे कडुन करून घेणेत आलेले आहे. सदर कामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.६,९४,४६४/- मात्र आलेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदरचे काम विना निविदा करणे कामी झालेला रु.६,९४,४६४/- मात्रच्या खर्चास मनपा अधिनियमातील प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३० वलवाडी पाणीपुरवठा केंद्र येथील पंपसेटची एम.एस.पाईप प-यॉजसह बदलणेचे काम तांतडीने करुन घेण्यांत आले.त्यासाठी झालेला खर्च रुये ४९११९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५(२) (२) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ **विषय मंजुर करण्यांत यावा.**

म. अमोळ मासुळे **विषय मंजुर करण्यांत यावा.**

म. युवराज पाटील **विषय मंजुर करण्यांत यावा.**

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४९ दिनाक ०१/०२/२०२१

वलवाडी पाणीपुरवठा योजनेच्या वलवाडी जलशुद्धीकरण केंद्र येथील व्याकुम पंपसेट १ व २ चे पाईप खराब झाल्यामुळे पॅपिंगला अडचणी येत होत्या सदरील पंपसेटचे सब टर्मिनल type असल्याने पॅपिंग उशिराने होते आहे.या बाबत समक्ष पाहणी केली असता दोन्ही पंपसेटचे ४ इंची पाईप व बेडला अनेक छिद्रे पडल्याने सदरील पूर्ण पाईप फल्याज पासून बदलणे गरजेचे असल्याने सादर काम साईकृपा BBSSS धुळे यांचे कडून तातडीने करून घेण्यात आले. सदरचे कामांसाठी खर्च रु.४९,११९/- GST सह मात्र आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन उक्त कामी झालेल्या खर्च रक्कम रु.४९,११९/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५(२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३२ धुळे मनपा प्रभाग क्रं.१०वरखेडी येथे नवीन अमरधाम विकसीत करणेचे एस्टीमेट रु. ७८,२८,३६८/-मात्रला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोळ मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सुनिल सोनार विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास आर्थिक, प्रशासकीय मंजुरी देवून ई निविदा प्रकाशित करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५०दिनाक ०१/०२/२०२१

धुळे मनपा अंतर्गत प्रभाग क्रं. १० मध्ये हद्दवाढ अंतर्गत वरखेडी येथे नवीन अमरधाम विकसीत करुन सुशोभिकरण करणे करिता सन्मा. महापौर सो. यांनी मागणी केलेली आहे.

त्यानुसार उक्त कामाची पाहणी करण्यांत येवून त्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास अंदाजित खर्च रु.७८,२८,३६८/- मात्र अपेक्षित असून सदरचा खर्च हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीनुसार तसून तो खर्च योग्य व वाजवी आहे.त्या खर्चाची नोंद धुळे मनपाच्या तरतूद रजिस्टरला घेण्यांत आलेली आहे.

तरी रु.७८,२८,३६८/- मात्रच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता तसेच तांत्रिक मंजुरी देवून ई निविदा प्रकाशित करणेस मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर कामासाठी अंदाजित खर्च रु ७८,२८,३६८/- मात्रला आर्थिक, प्रशासकीय मंजुरी देवून ई निविदा प्रकाशित करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३३ धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.७ मधील रमापती नगर ते गवळीवाडा पावेतो रस्ता कॉर्कोटकरण करणे व गटार करणेचे एस्टीमेट रु.९५,२२,७९२/-मात्रला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.पुष्पा बोरसे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. अमोळ मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास आर्थिक, प्रशासकीय मंजुरी देवून ई निविदा प्रकाशित करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५१ दिनाक ०१/०२/२०२१

धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्र. ०७ मधील रमापती नगर ते गवळी वाडा पावेतो रस्त्यांची स्थिती खूपच खराब झाल्याने रस्ते कच्च्या स्वरूपाचे व खड्डेयुक्त झालेले असल्याने तेथे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे भागातील नागरिकांना जाणे-येणे साठी खूपच त्रास होत असल्याने रस्ता कॉंक्रीटकरण करणे आवश्यक आहे. तसेच सदर भागातील नागरिकांचे सांडपाणी वाहून जाणेसाठी गटारीची सोय नसल्याने नागरिकांना खूपच त्रास होत आहे. त्यामुळे रोगराई पसरत आहे. तरी सदरच्या भागात रस्ते कॉंक्रीट व गटार करणे आवश्यक आहे.

सदर ठिकाणी समक्ष पाहणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.९५,२२,७९२/- मात्र येणार आहे. सन २०२०-२१ च्या मूळ अंदाजपत्रकातील सन २०२०-२१ साठीच्या विकास कामे या अंतर्गत केलेल्या रु.१५ कोटी सदर खर्च करण्यात यावा.

तरी सदरचा कामीचा अंदाजपत्रकीय खर्च रु.९५,२२,७९२/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी मे.स्थायी समितीची आवश्यकता असल्याने मंजुरीस्तव सादर करण्यांत आलेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर कामासाठी येणारे अंदाजपत्रकीय खर्च रु.९५,२२,७९२/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३१ धुळे म.न.पा क्षेत्रातील पथदिव्यांची दैनदिन निगा व दुरुस्ती, संपूर्ण साहित्य व मजुरी खर्चासह तसेच पथदिवे चालू बंद करणे, व्यवस्था हाताळणी करणेचे काम वार्षिक करार पद्धतीने करणे कामाला ६ महिने मुदत वाढ देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती विद्युत अभियंता यांना या बाबत सविस्तर अहवाल द्या.

म.विद्युत अभियंता संपूर्ण धुळे शहरांमध्ये एलईडी बसविण्याचा कार्यादेश 25 जानेवारी 2021 रोजी दिलेला आहे सुरुवातीला नवीन एलईडी बसविण्यासाठी डी.पी.आर करायचा आहे त्यानंतर काम सुरू करणार आहे जुन्या ठेकेदारांचा कार्यकाळ 10 जानेवारी २०२१ ला संपला आहे जुन्या ठेकेदाराला आणि नवीन ठेकेदाराला आयुक्त सो यांच्या दालनात चर्चेसाठी बोलविले होते

	वल्लभ इलेक्ट्रिकल यांना सांगितले की काम लवकर करा लवकर संपवा धुळे शहरांमध्ये एलईडी बसविण्यासाठी चार ते सहा महिने लागतील तरी आपण त्यांना काम करण्यासाठी 45 दिवसांची मुदत देण्यात आली आहे त्याप्रमाणे ते काम सुरू करतील जसे नवीन ते करण्याचं काम सुरू होईल तसेच जुन्या ठेकेदाराच्या पोलची संख्या कमी होईल त्याला आपण सरसकट जरी देत असलो तरी एलईडी बसण्याची संख्या जुन्या ठेकेदाराच्या बिलातून कमी होईल त्याप्रमाणे आपण मुदतवाढ साठी प्रस्ताव सादर केला आहे
म.सभापती	आपण त्याला सहा महिन्यासाठी मुदत वाढ देत आहोत ते कोणत्या आधारे केले आहे
म.विद्युत अभियंता	त्यांचा जुना दर मंजूर होता त्याप्रमाणे त्याला काम दिले आहे.
म.सभापती	त्या दराप्रमाणे तो काम करीत आहे का त्याच्या बाबतीत अनेक नगरसेवकांच्या तक्रारी आहेत सहा महिन्यानंतर वल्लभ इलेक्ट्रिकल्स यांना काम देण्याबाबत टिपणीत नमूद केले आहे
म.विद्युत अभियंता	वल्लभ इलेक्ट्रिकल्स यांना आयुक्त सो यांनी सूचना केली आहेत काही करून काम लवकरात लवकर सुरू करा
म.सभापती	मंगलमूर्ती इलेक्ट्रिकल्स यांना या काळाचे साधारणत: किती बिल देण्यात येईल
म.विद्युत अभियंता	सद्यस्थितीत जुन्या ठेकेदारास अंदाजे १० लाख रुपये बील दिले जाते. नवीन ठेकेदार काम सुरू करेल तसे जुने ठेकेदाराचे काम कमी होईल व साधारणत: चार ते पाच लाख रुपये बिल येईल व नवीन एलईडी बसवल्यानंतर त्याची देखभाल-दुरुस्ती नवीन ठेकेदाराची असणार आहे
म.सभापती	नव्या व जुन्या ठेकेदाराला बोलून आयुक्त सो यांच्या दालनात चर्चा झाली त्याचे काही इतिवृत्त तयार केले आहे का ? जुन्या ठेकेदाराने कागदपत्रे सादर करायची व काम न करता बिल काढायची याची सर्वस्वी जबाबदारी विद्युत विभागाची राहील नवीन ठेकेदाराला पुन्हा पत्र द्या त्यांच्या काही अडचणी असतील त्या समजून घ्या वर्क ऑर्डर देऊन किती दिवस झाले
म.विद्युत अभियंता	त्यांना 25 जानेवारी 2021रोजी वर्क ऑर्डर दिली आहे ते सोमवारी किंवा मंगळवारी येणार आहेत.
म.संतोष खताळ	ओम मंगलमूर्ती इलेक्ट्रीकल्सचे कर्मचारी संख्या कमी आहे तीन प्रभाग मिळून एक कर्मचारी काम करतो आज कंप्लेंट केली तर आठ दिवसात ती कंप्लेंट सुटत नाही प्रत्येक प्रभागात एक कर्मचारी नेमण्यात यावे
म.सभापती	संबंधित नगरसेवकांनी तक्रार केली आहे त्यांचे काम झाले किंवा नाही यासाठी बिल अदा करतांना नगरसेवकांचा ना हरकत दाखला घेतल्याशिवाय बिल अदा करू नये
म. युवराज पाटील	माझ्या प्रभागात एकच आहे चालू आहे एक महिन्यापूर्वी संपूर्ण चालू करण्याबाबत तक्रार दिली होती आमच्या तक्रारी अर्जाची कोणीही दखल घेत नाही अर्धा मालेगाव रोड अंधारात आहे लिकेज बाबत तक्रार केली होती त्याचेही निरासन झाले नाही आम्ही फक्त तक्रारीच करत राहायचं का ?
म.सभापती	बागुल साहेब तात्काळ कारवाई करा, शिंदे सर मी स्वत: सभापती आपल्या दारी या योजनेअंतर्गत प्रभाग क्रं.१४ च्या भागात फिरलो होतो त्या ठिकाणी लिकेजेस आहेत व

अग्रवाल नगर मध्ये बांधकाम करणाऱ्यांनी पाईप लाईन फोडून टाकले आहे वॉल कंपाउंड रोडवर केले आहे तरी त्वरित कार्यवाही करावी

म. सईद बेग — सभापती साहेब मी लाईट बाबत तक्रार केली तर पंधरा दिवस दुरुस्तीसाठी लागतात रस्त्यावर खड्डे पडले होते त्यात बहुतेक लोक पडून जखमी झालेत पण त्या ठिकाणी लाईट लावला नाही

म.अमोल मासुळे — हा विषय अतिशय शोकांतिकेचा आहे हा विषय मंजूर करून दोन महिने झाले आणि भाजपच्या माध्यमातून धुळे शहर त्यांनी जगात करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत तरी सुद्धा प्रशासनाला सहा महिने मुदत वाढीचा विषय घेऊन आलेला आहे यासाठी महानगरपालिकेचे 50 ते 60 लाख रुपये द्यावे लागेल विषय मंजूर करून त्याला दोन महिने झाले तरी त्याला वर्क ऑर्डर देऊ शकत नाही आपले प्रशासन झोपले आहे का? ही प्रशासनाची जबाबदारी नाही का 25 जानेवारीला ऑर्डर देऊन देखील आता एक तारीख आली तरी देखील ठेकेदाराने शहरात येऊन कामाची सुरुवात कशा पद्धतीने करायची याबाबत नियोजन केले नाही सदर दोन तीन महिन्याची मुदतवाढ देऊन सदर प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा.

म. सभापती — या संदर्भात मक्तेदाराने वाढीव पोल बाबत करारनाम्यात समावेश नसल्याने समावेश करणेबाबत विनंती पत्र सादर केलेले आहे. त्यात नमूद केलेले आहे की, मागील कालावधीत हद्दवाढीतील नवीन भाग नगरोत्थान, दलित वस्ती,आमदार निधी, खासदार निधी तसेच नगरसेवक निधी मधील झालेली रस्त्यांची कामे व त्याठिकाणी टाकण्यांत आलेले नवीन विद्युत पोल याचा करारात समावेश नसल्याने वाढलेल्या पोलची संख्या लक्षात घेता त्यानुसार वाढीव देयके मिळणेबाबत मागणी केलेली आहे.याबाबत मागीलनिविदा अटी शर्तो मध्ये या संदर्भातील मुद्दा नमूद होता किंवा कसे याबाबत आपला खुलासा तसा अभिप्राय विद्युत अभियंता यांनी सभागृहपुढे सादर करावा.

म. विद्युत अभियंता — शहरात बसविण्यांत आलेल्या शासकीय योजनांचे व नगरसेवक निधी मधील पथदिव्यांच्या कामांचा त्या त्या कंत्राटदाराचा हमी कालावधी संपला असल्याने ती कामे ओम श्री मंगलमुर्ती इले. या मक्तेदाराकडून केली जात आहे. सदरचे पथदिवे दुरुस्ती आवश्यक असल्याने नवीन वाढीव पथदिवे या करारात वाढवणे गरजेचे आहे व त्याप्रमाणे देयके अदा करावे लागतील.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच विद्युत अभियंता यांच्या खुलाशानुसार ओमश्री मंगलमुर्ती इले.यांना सहा महिने मुदतवाढ देणेस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच वाढीव पथदिव्यांचा मुदतवाढ कालावधीपासून समावेश करुन घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.याबाबत विभागाने आवश्यक ती कार्यालयीन पूर्तता व कार्यवाही नियमानुसार करावी तसेच मुदतवाढ दिलेल्या दिवसांपासून वाढीव पथदिव्यांबाबत आवश्यक ती सक्षम मान्यता घेण्यांत यावी याबाबत लेखा आक्षेप होणार नाही याची दक्षता घ्यावी.नवीन मक्तेदार मे.वल्लभ इलेक्ट्रीकल्स यांना समक्ष बोलावून तांतडीने सदरचे लवकरात लवकर काम पूर्ण करणेबाबत प्रशासनाने आदेशित करावे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५२ दिनाक ०१/०२/२०२१

धुळे म.न.पा क्षेत्रातील पथदिव्यांची दैनदिन निगा व दुरुस्ती,संपूर्ण साहित्य व मजुरी खर्चासह तसेच पथदिवे चालू बंद करणे,व्यवस्था हाताळणी करणेचे काम वार्षिक करारपद्धतीने करणे कामाचे कार्यादेश धूमपा/वि.वि./40 दि.11/01/2018 नुसार 3 वर्षाकरिता मे.ओम श्री. मंगल मूर्ती इलेक्ट्रिकल्स & CONTRACTOR,नाशिक यांना देण्यात आले होते.3 वर्ष मुदती नुसार दि.10/01/2021 रोजी सदर कामाची मुदत संपुष्ठात येत आहे.

धुळे महानगरपालिका हद्दीतील शहर व देवपूर भागातील जुने पथदिवे काढून नवीन LED पथदिवे बसविणे.तसेच आवश्यकतेनुसार गर्डर पोल,स्ट्रीट लाईट कंडक्तर,केबर वायर, तुमार CONTRACTOR MCCC, RCCCB स्ट्रीट लाईट कंट्रोल panal व इतर संबधित विद्युत साहित्य बसविणे ई. 5 वर्ष मुदतीकरिता कामासाठी ई निविदा क्र.65 दि. 07/10/2020 नुसार कार्यवाही करणेत आली आहे .त्यानुसार कंत्राटदार मे,वल्लभ इलेक्ट्रिकल्स, व्ही. यु. नगर, जि.आनंद,गुजरात.यांना सदर कामांचे कार्यादेश/करारनामा जानेवारी 2021 पर्यंत देण्यात येणार आहेत.

धुळे महानगरपालिका हद्दीतील शहर व देवपूर भागातील जुने पथदिवे काढून नवीन LED पथदिवे बसविणे काम सदर कंत्राटदारास 6 ते 8 महिने कालावधी लागणार आहे.त्यामुळे सदर कालावधीत सद्यस्थितील धुळे म.न.पा क्षेत्रातील पथदिव्यांची दैनदिन निगा व दुरुस्ती संपूर्ण साहित्य व मजुरीखर्चासह तसेच पथदिवे चालू बंद करणे,व्यवस्था हाताळणी करणेचे काम मे.ओम श्री. मंगल मूर्ती इलेक्ट्रिकल्स & CONTRACTOR,नाशिक यांच्या कडून करणेची आवश्यकता आहे.कार्यादेश धूमपा/वि.वि./40 दि.11/01/2018 नुसार 3 वर्षाकरिता कार्यादेश धूमपा/वि.वि./40 दि.11/01/2018 नुसार 3 वर्षाकरिता आहे.नवीन LED पथदिवे पथदिवे बसविण्याचे कार्यादेश झाल्यानंतर पूर्ण पथदिवे बदलविणे व दरम्यानची निगा व दुरुस्ती यासाठी काही कालावधी लागणार आहे.जसजसे नवीन मक्तेदाराचे काम प्रगतीत राहील त्याप्रमाणे पूर्वीच्या मक्तेदाराच्या कंत्राटात मधून त्या पथदिव्यांची संख्या कमी होवून मर्यादेत कामाचे चदेयक ओम श्री.मंगलमूर्ती इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर,नाशिक यांना दिले जाईल. सुमारे तीन ते चार महिने कालावधीत मीटर पोइन्त,मेनस्वीचेस याचे अपग्रेडेशन होईल. त्यामुळे किमान 4 ते 6 महिने जुन्या मक्तेदारास मुदतवाढ देण्याची आवश्यकता असून त्याप्रमाणे अहवाल मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

धुळे मनपा क्षेत्रातील दैनंदिन पथदिवे देखभाल दुरूस्त करणे कामाकरीता मक्तेदार ओमश्री मंगलमुर्ती इले.अॅड कॉन्ट्रॅक्टर,नाशिक यांची मुदत दि.१०/०१/२०२१ संपली असल्याने नवीन एल.ई.डी पथदिवे बसविणे कामास प्रगतीत येई पर्यंत मुदतवाढ देणेसाठी प्रस्तावित आहे.

उक्तबाबत म.आयुक्त सो. यांनी सदर मुदत वाढ देणेबाबत संयुक्त चर्चा करणेसाठी दोन्ही मक्तेदारांना बोलविणे बाबत आदेशीत केल्याप्रमाणे ओमश्री मंगलमुर्ती इले.धुळे व वल्लभ इलेक्ट्रीकल्स,आनंद यांनी दि.२२/०१/२०२१ रोजी संयुक्त चर्चा करणेत आली. म.आयुक्त यांचे समक्ष चर्चत म.अभियंता सो, यांनी नवीन मक्तेदार यांनी तातडीने कामाची

सुरूवात करून सहा महिन्यात यांनी किमान ८०% काम पुर्ण करावे अशा सुचना दिल्या. तसेच पुर्वीचे मक्तेदार यांनी त्यांचे पुर्वीचे मंजुर दराप्रमाणे काम करणेस तयार असल्याचे लेखी पत्र दिले आहे. एल.ई.डी पथदिवे बसविणे चे प्रगतीप्रमाणे पृथ्थकरण होणारी पथदिवेंची संख्या त्या मासिक बिलात कमी करण्यात येतील. दुरूस्ती कामाचे देयकाची मुदत सहा महिने नंतर ही ओमश्री मंगलमुर्ती यांना काम करावे लागल्यास त्याचा खर्च वल्लभ इलेक्ट्रीकल्स यांचेकडुन वसुल करणेत येईल.याबाबत आदेशीत करणेत आले.करीता ओमश्री मंगलमुर्ती इले.यांना दि.१०/०१/२०२१ पासुन सहा महिने करीता मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव मे.स्थायी समिती पुढे सादर करण्यांत आला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच विद्युत अभियंता यांच्या खुलाशानुसार ओमश्री मंगलमुर्ती इले.यांना सहा महिने मुदतवाढ देणेस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच वाढीव पथदिव्यांचा मुदतवाढ कालावधीपासून समावेश करुन घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.याबाबत विभागाने आवश्यक ती कार्यालयीन पूर्तता व कार्यवाही नियमानुसार करावी तसेच मुदतवाढ दिलेल्या दिवसांपासून वाढीव पथदिव्यांबाबत आवश्यक ती सक्षम मान्यता घेण्यांत यावी याबाबत लेखा आक्षेप होणार नाही याची दक्षता घ्यावी.नवीन मक्तेदार मे.वल्लभ इलेक्ट्रीकल्स यांना समक्ष बोलावून तांतडीने सदरचे लवकरात लवकर काम पूर्ण करणेबाबत प्रशासनाने आदेशित करावे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे